*(कार्यालयीन उपयोगासाठी)*

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

***(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) अन्वये)***

***मुख्य लेखापरीक्षक यांचा लेखा परीक्षण अहवाल***

वार्षिक लेखापरीक्षण अहवाल
सन २०१४-२०१५
व
सन २०१५-२०१६

: अ नु क्र म णि का ::

## लेखा परीक्षण अहवाल : सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६


**मुख्य लेखा परीक्षक यांचे लेखापरीक्षणाबाबत निवेदन** : (पृ.क्र. १ ते ३ )

प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल : (पृ.क्र. ४ ते ४ )


### भाग -अ

**(अ) विभागनिहाय लेखापरीक्षण तपशिल** :

| अ.क्र. | विभागाचे नांव | पृष्ठ क्रमांक | लेखापरीक्षण कालावधी | लेखापरीक्षण अहवालातील एकूण परिच्छेद | लेखा परीक्षण आक्षेपातील वसूल रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ०१ | लेखा विभाग | ५ ते १२ | --- | -- | -- |
| ०२ | वॉर्ड - क कार्यालय | १३ ते २६ | सन २०१३-२०१४ | १७ | -- |
| | वॉर्ड अभियंता कार्यालय | २७ ते ४५ | सन २०१३-२०१४ | १६ | **३८,१९६/-** |
| ०३ | वॉर्ड - ड कार्यालय | ४६ ते ६४ | सन २०१३-२०१४ | २८ | -- |
| | वॉर्ड अभियंता कार्यालय | ६५ ते ८५ | सन २०१३-२०१४ | २१ | -- |
| ०४ | वॉर्ड - फ कार्यालय | ८६ ते १०१ | सन २०१३-२०१४ | १५ | -- |
| | वॉर्ड अभियंता कार्यालय | १०२ ते १२० | सन २०१३-२०१४ | १९ | -- |
| ०५ | अग्निशमन विभाग | १२१ ते १७५ | सन २००९-१० ते २०१४-२०१५ | ३१ | **३,२९,३५२/-** |
| ०६ | कर आकारणी विभाग | १७६ ते २१२ | सन २०१३-२०१४ | ५७ | -- |
| ०७ | स्थानिक संस्था कर | २१३ ते २२३ | १ जुलै २०१२ ते डिसेंबर २०१५ | १२ | **१०,२९,४४५/-** |
| ०८ | बीओटी स्लम विभाग | २२४ ते २४३ | सन २०१३-२०१४ | १५ | -- |
| ०९ | नगररचना विभाग | २४४ ते २५७ | सन २०१३-२०१४ | १६ | -- |
| १० | विद्युत विभाग (अ/ड) | २५८ ते २८३ | सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ | २४ | -- |
| ११ | विद्युत विभाग (ब/क) | २८४ ते ३०४ | सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ | २० | -- |
| १२ | विद्युत विभाग (ई/फ) | ३०५ ते ३३४ | सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ | १९ | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | शिक्षण विभाग | ३३५ ते ३८१ | सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ | ४७ | -- |
| १४ | जायकवाडी स्थापत्य जमा बाजू | ३८२ ते ३९३ | सन २०१०-२०११ ते सन २०१४-२०१५ | जमा बाजू -१४ | -- |
| | खर्च बाजू | ३९४ ते ४१५ | | खर्च बाजू-१२ | |
| **चौकशी अहवाल** | | | | | |
| | मनपा,केंद्रीय मा.शाळा, मुकुंदवाडी | ४१७ ते ४२१ | | | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **(ब) विशेष चौकशी अहवाल :** | | | | | |
| ०१ | औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी (परिशिष्टासह) | ४२३ ते ४२७ | | | -- |

जा.क्र.मनपा/मुलेप/२०१६/
कार्यालय महानगरपालिका,औरंगाबाद.
दिनांक :    /१२/२०१६

प्रति,
**मा.सभापती,**
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

विषय :- **सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबादचा लेखापरीक्षणाचा वार्षिक अहवाल.**

**महोदय,**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०६ (३) अन्वये लेखापरीक्षण विभागाच्या कामकाज विषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठीचा वार्षिक अहवाल या सोबत सादर करीत आहे.

अ) अहवाल वर्षात लेखापरीक्षण विभागात खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी कार्यरत होते.

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत कर्मचारी / अधिकारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्य लेखापरीक्षक (उपसंचालक दर्जा) | ०१ | ०१ | १८ फेब्रुवारी २०१६ रोजी शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात आली आहे. |
| २ | उप मुख्य लेखापरीक्षक | ०१ | -०१- | २० सप्टेंबर २०१६ रोजी रूजू. |
| ३ | वरिष्ठ लेखापरीक्षक (कार्यालय अधिक्षक संवर्ग) | ०१ | ०१ | |
| ४ | कनिष्ठ लेखापरीक्षक(वरीष्ठ लिपीक संवर्ग) | ०४ | ०२ | |
| ५ | कनिष्ठ लिपीक | ०४ | ०५ | |
| ६ | वाहनचालक | ०१ | ०१ | |
| ७ | शिपाई | ०२ | ०२ | |
| | **एकूण** | **१४** | **१३** | |

वरील पदावरील अधिकारी / कर्मचा-यां व्यतिरिक्त एक दैनिक वेतन संगणक ऑपरेटर सध्या कार्यरत आहे.

१. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ महसूली उत्पन्न हे रू.४३५.०५ कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू.२२.६३ कोटी) इतके असून खर्च रू.४११.०४ कोटी इतका आहे. त्याचप्रमाणे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ महसूली उत्पन्न रू. ५२०.५४ कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू. २४.८४ कोटी ) इतके असून खर्च रू. ४४५.५२ कोटी इतका झाल्याचे दिसून आले.

२. अहवाल वर्षात मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिका,औरंगाबाद या पदाचा पदभार हा १८ फेब्रुवारी २०१६ रोजी मी स्विकारला आहे. मुख्य लेखापरीक्षक या पदाचा पदभार स्विकारल्यानंतर कामकाज पाहत असतांना महानगरपालिके अंतर्गत विविध विभागाकडून वेतन निश्चिती पडताळणीस्तव सादर होणा-या बहुतांश प्रकरणांमध्ये १९७६,१९८६,१९९६ व २००६ चे वेतन आयोगानुसार अनुज्ञेय सुधारित वेतननिश्चिती बाबतची प्रकरणे ही कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर पडताळणीस्तव सादर होत आहेत आणि त्यामुळे निवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ हे विलंबाने प्रदान केले जातात असे निदर्शनास आले आहे. करिता, भविष्यात सेवानिवृत्त कर्मचा-यांचे सेवापुस्तके वेळोवेळी नियमाप्रमाणे तात्काळ तपासणी करून सादर करणे बाबत सूचित करण्यात आले आहे. जेणे करून सेवानिवृत्तांना वेळेवर सर्व वेतनाचे लाभ प्रदान करता येतील.

३. महानगरपालिका स्तरावरील लेखापरीक्षणाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेता लेखापरीक्षण विभागासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध व्हावा या दृष्टीने जा.क्र.मनपा/मुलेप/२४, दिनांक २४.०१.२०१३ अन्वये एकूण २६ नविन पदांसाठी मान्यता मिळविण्याच्या दृष्टीने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. तरी अस्तित्वात असलेल्या कर्मचारी वृंदाकडून अहवाल वर्षात एकूण **१४** विभागाचे लेखापरीक्षण (थकित लेखापरीक्षणासह) पूर्ण करण्यात आलेले आहे. शिवाय मा.महापौर, मा.सभापती, स्थायी समिती ,मा.आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार विशेष लेखापरीक्षण करून त्याबाबतचे अहवालही विहित वेळेत संबंधित मा.महोदयांना सादर करण्यात आलेले आहेत. अहवाल वर्षात पूर्ण करण्यात आलेल्या लेखापरीक्षणाबाबतचा अहवाल व विशेष तपासणी / चौकशी बाबतचा अहवाल हा या अहवालामध्ये अनुक्रमे भाग १ व भाग २ या स्वरूपात सादर करण्यात आलेला आहे.लेखापरीक्षण विभागाद्वारे दैनंदिन कामकाज करीत असतांना निदर्शनास आलेल्या गंभीर स्वरूपाच्या आक्षेपार्ह / अपहार / अनियमित बाबी या वेळोवळी मा.सभापती, स्थायी समिती व मा.आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या आहेत.

४. शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ व तद्नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन अनुज्ञेय असणार नाही. औरंगाबाद मनपामध्ये दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती दिलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना नियुक्ती आदेशात या अर्थाची अट नमूद केलेली असते, परंतू प्रत्यक्षात लेखा विभागातर्फे योजना लागू करणेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शासन परिपत्रक क्र.:अंनियो/१००७/६७/सेवा-४,मंत्रालय,मुंबई - ४०००६२, दिनांक ३० ऑक्टोबर २००७ अन्वये उक्त योजना गेल्या ९ वर्षापासून अंमलात आणणे आवश्यक होते. तथापि लेखा शाखेने सदरील योजनेची अंमलबजावणी केलेली नसल्याने अधिकारी / कर्मचारी यांच्या सोबतच महानगरपालिकेवर सुध्दा योजना

अंमलबजावणीसाठीच्या खर्चाचे दायित्व वाढलेले आहे. या दरम्यान एखाद्या कर्मचा-याचा आकस्मित मृत्यू झाल्यास अनेक समस्या निर्माण होण्याची शक्याताही नाकारता येत नाही. या सर्व बाबींचे गांभिर्य लेखा शाखेने घेवून तात्काळ योजनेची अंमलबजावणी करावी.

५. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.१०२००४/प्र.क्र.५/नावि-३१, दिनांक ६.७.२००५ मधील निर्देशानुसार द्विनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. औरंगाबाद महानगरपालिके मध्ये National Municipal Account Manual मधील नमुन्यानुसार अभिलेखे न ठेवल्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचे तसेच मत्ता व दायित्वाचे अचूक चित्र स्पष्ट होत नाही. शासन निर्देशाप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब न केल्यामुळे महानगरपालिकेची वास्तववादी आर्थिक स्थिती स्पष्ट होवू शकत नाही, हे खेदाने नमूद करावे लागत आहे.

आपली विश्वासू,

**(दि.मा.देवतराज)**
मुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद.

**औरंगाबाद :**
**दिनांक** :

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद.

**औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.**

## सन 2014-2015 व 2015-2016 पर्यंतचे लेखा परीक्षण

## प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल

| अ.क्र. | विभागाचे नांव | एकूण परिच्छेद | वगळलेले परिच्छेद | प्रलंबित परिच्छेद |
|---|---|---|---|---|
| १ | लेखा विभाग | -- | -- | -- |
| २ | वॉर्ड -क कार्यालय | १७ | -- | १७ |
| | वॉर्ड अभियंता - क | १६ | -- | १६ |
| ३ | वॉर्ड -ड कार्यालय | २८ | -- | २८ |
| | वॉर्ड अभियंता - ड | २१ | -- | २१ |
| ४ | वॉर्ड -फ कार्यालय | १५ | -- | १५ |
| | वॉर्ड अभियंता - फ | १९ | -- | १९ |
| ५ | अग्निशमन विभाग | ३१ | -- | ३१ |
| ६ | कर आकारणी विभाग | ५७ | -- | ५७ |
| ७ | स्थानिक संस्था कर | १२ | -- | १२ |
| ८ | बीओटी स्लम विभाग | १५ | -- | १५ |
| ९ | नगररचना विभाग | १६ | -- | १६ |
| १० | विद्युत विभाग (अ/ड) | २४ | -- | २४ |
| ११ | विद्युत विभाग (ब/क) | २० | -- | २० |
| १२ | विद्युत विभाग (ई/फ) | १९ | -- | १९ |
| १३ | शिक्षण विभाग | ४७ | -- | ४७ |
| १४ | जायकवाडी स्थापत्य विभाग | २८ | -- | २८ |

# लेखा विभाग
## सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६
## लेखापरीक्षण अहवाल.

अहवाल वर्षात महानगरपालिका अंतर्गत जमा व खर्चाचा आढावा हा लेखा विभागाकडील अभिलेख्यांच्या आधारे घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा प्रारंभीच्या शिल्लक रकमेसह रक्कम रू. ४३५.०५ कोटी इतकी असून प्रत्यक्ष खर्च रू. ४११.०४ कोटी इतका आहे. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा प्रारंभीच्या शिल्लक रकमेसह रक्कम रू.५२०.५४ कोटी इतकी असून प्रत्यक्ष खर्च रू.४४५.५२ कोटी इतका आहे. ( अहवाल वर्षात महापालिका अंतर्गत पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांना वेळोवेळी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमा व त्यांचे समायोजन याबाबत लेखा विभागाकडून माहिती घेण्यात आली. प्राप्त तपशिलानुसार खालील प्रमाणे अभिप्राय नमूद करण्यात येत आहेत.)

**परिच्छेद क्र.१ : अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमेतील तफावतीबाबत :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये महापालिकेचे अपेक्षित उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक प्रतीवर्ष तयार करण्यात येते. सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्च याबाबत तपासणी केली असता असे दिसून आले की, महापालिकेस प्रत्यक्षात प्राप्त रकमा आणि महापालिकेद्वारा करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पिय तरतूदीपेक्षा ८% ते २५% कमी अथवा जादा झालेला आहे. त्याबाबतचा तपशिल हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| **वर्ष** | **जमा (रूपये)** | | | | **आकडे कोटीत** |
|---|---|---|---|---|---|
| | **मूळ अर्थसंकल्पिय तरतूद** | **सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद** | **प्रत्यक्ष जमा** | **कमी अथवा जादा रक्कम** | **टक्केवारी** |
| २०१४-२०१५ | ७९०.०८ | ४७०.४९ | ४३५.०५ | ३५.४४ | ८% |
| २०१५-२०१६ | ९५२.९१ | ५९५.६८ | ५२०.५४ | ७५.१४ | १३% |
| | | | | | |
| **खर्च रूपये** | | | | | |
| वर्ष | | | | | |
| २०१४-२०१५ | ७८९.७५ | ४७०.३९ | ४११.०४ | ५९.३५ | १३% |
| २०१५-२०१६ | ९५२.८० | ५९५.२८ | ४४५.५२ | १४९.७६ | २५% |

वरील तपशिलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वार्षिक अंदाजपत्रक तयार करतांना मागील वर्षीच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या प्रमाणात तरतूद ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार जमा व खर्चाची रक्कम आणि प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये तफावत दिसून येते.

तसेच सन २०१५-१६ या वर्षात मूळ अंदाजपत्रकीय तरतूद रक्कम रू.९५२.८० कोटी ठेवण्यात आलेली होती. परंतू सुधारित अंदाजपत्रक तयार करतांना मूळ तरतूद रकमेत दुरूस्ती करून रू.५९५.२८ कोटी तरतूद दर्शविण्यात आली. रू. ३५७.५२ कोटी फरकाबाबत लेखापरीक्षण विभागास लेखा शाखेकडून स्पष्टीकरण प्राप्त झालेले नाही.

मागील वार्षिक अहवालात भविष्यात अशी तफावत होणार नाही याची दक्षता घेण्याविषयी सूचित करण्यात आले होते. तरीही लेखा शाखेने अंदाजपत्रकातील तफावती बाबतची बाब गांभिर्याने घेतलेली नाही.

**परिच्छेद क्र. २: पदाधिकारी /अधिकारी / कर्मचारी यांचेकडील कार्यालयीन कामासाठी / औषधोपचारासाठी देण्यात आलेल्या प्रलंबित अग्रिम रकमेबाबत.**

महापालिका पदाधिकारी/ अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजास्तव व औषधोपाचारासाठी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमेपैकी सन २०१४-२०१५ ते सन २०१५-२०१६ मधील रक्कम रूपये **३,४५,९०,२१६/-** इतक्या अग्रिम रकमेचे समायोजन अद्यापपावेतो करण्यात आलेले नाही.

## अधिकारी / कर्मचारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबतचा तपशिल : सन २०१४-२०१५

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१.४.२०१४ | डॉ.बी.एस.नाईकवाडे | ५००००/- | CAHO | दिल्ली दौरा |
| २ | ०६.०५.२०१४ | श्री.एस.पी.खन्ना | ११०२/- | मालमत्ता अधिकारी | पीआर कार्ड |
| ३ | १२.०५.२०१४ | श्री.प्रमोद खोब्रागडे | ४५०००/- | नगर सचिव | बुध्द पौर्णिमा |
| ४ | ३१.०५.२०१४ | श्री.बी.के.चव्हाण | ७३५००/- | क्रिडा अधिकारी | ट्रॉफी |
| ५ | २०.६.२०१४ | श्रीमती लता मोरलवार | ३०००/- | शिवणकला शिक्षक | परिक्षा फीस |
| ६ | २७.६.२०१४ | श्री. के.बी.देशपांडे | १०००००/- | लेखा विभाग | निवडणूक |
| ८ | ०१.७.२०१४ | श्री.अजमत खान | २५०००/- | वॉर्ड अधिकारी-अ | Sanitation |
| ९ | ०१.७.२०१४ | श्री.एस.आर.जरारे | २५०००/- | वॉर्ड अधिकारी-ड | Sanitation |
| १० | ०१.७.२०१४ | श्री.सि.एम.अभंग | २५०००/- | वॉर्ड अधिकारी-फ | Sanitation |
| ११ | ०२.७.२०१४ | श्री.मधुकर एस.गंगावणे | २०००००/- | डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टर | पुस्तक खरेदी |
| १२ | २५.८.२०१४ | श्री.वामन राघोजी कांबळे | २५०००/- | शाखा अभियंता | बांबु खरेदी |
| १३ | ३०.९.२१४ | श्री.संजिव पी बालय्या | ८०००/- | क्रिडाधिकारी | DSO Honorium |
| १४ | २९.१०.२०१४ | डॉ.सुरेश गोसावी | १०००/- | मेडीकल ऑफिसर | Leprosy training |
| १५ | ३१.१०.२०१४ | वॉर्ड अधिकारी -फ | १६४५६७/- | वॉर्ड अधिकारी-फ | जनगणना |
| १६ | ७.११.२०१४ | डॉ.जयश्री कुलकर्णी | ७९४३७२/- | वॉर्ड अधिकारी | TB Honourium |
| १७ | २९.११.२०१४ | श्रीमती रोशन मकवाना | २५०००/- | वॉर्ड अधिकारी-अ | Sanitation & Misc |
| १८ | २९.११.२०१४ | श्री.एस.आर.जरारे | २५०००/- | वॉर्ड अधिकारी-ड | Sanitation & Misc |
| १९ | ०६.१२.२०१४ | श्री.अहेमद तौसीफ | १५०००/- | जनसंपर्क | Street Play |

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| २० | २२.१२.२०१४ | श्री.मनोज पाटील | २५०००/- | लिपीक-मालमत्ता विभाग | Miscellaneous |
| २१ | २२.१२.२०१४ | श्री.मनोज पाटील | २५०००/- | लिपीक-मालमत्ता विभाग | रंग मंदिर |
| २२ | २२.१२.२०१४ | श्री.मनोज पाटील | २५०००/- | क्लर्क मालमत्ता | सिडको नाट्यगृह |
| २३ | ०३.०१.२०१५ | श्री.मनोज पाटील | २५०००/- | क्लर्क मालमत्ता | PR card |
| २४ | ०९.१.२०१५ | श्री.अनंत के देवगिरीकर | ३०००/- | MPW,N-८ | पुणे मेडीसिन |
| २५ | १२.०१.२०१५ | श्री.संजिव सोनार | ५०००/- | मुख्याध्यापक | २६ जानेवारी २०१५ |
| २६ | २१.०१.२०१५ | श्री.बी.के.चव्हाण | १००००/- | क्रिडाधिकारी | २६ जानेवारी २०१५ |
| २७ | २४.०२.२०१५ | श्री.आबेद अली खान | १००००/- | निवडणूक क्लर्क | मुंबई दौरा |
| २८ | २७.२.२०१५ | श्री.शिवाजी झनझन | ५००००/- | CFO | पेट्रोल |
| | | **एकूण** | **१७८३५४१** | | |

## सन २०१५-२०१६

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०४.४.२०१५ | श्री.एन.पी.गायकवाड | २००००/- | ARO-१ | मनपा निवडणूक-२०१५ |
| २ | ०४.४.२०१५ | श्री.आर.पी.वाघमारे | २००००/- | ARO-२ | मनपा निवडणूक-२०१५ |
| ३ | ०४.४.२०१५ | श्री.शिरीष रामटेके | २००००/- | ARO-३ | मनपा निवडणूक-२०१५ |
| ४ | ०४.४.२०१५ | श्री.आर.एन.संधा | २००००/- | ARO-४ | मनपा निवडणूक-२०१५ |
| ५ | ०४.४.२०१५ | श्री.एस.आर.काथार | २००००/- | ARO-६ | मनपा निवडणूक-२०१५ |
| ६ | ०४.४.२०१५ | श्री.बी.डी.फड | २००००/- | ARO-७ | मनपा निवडणूक-२०१५ |
| ७ | ०४.४.२०१५ | श्री.एम.एम.खान | २००००/- | ARO-९ | मनपा निवडणूक-२०१५ |
| ८ | ०४.४.२०१५ | श्री.पी.जी.पवार | २००००/- | ARO-१० | मनपा निवडणूक-२०१५ |
| ९ | ०४.४.२०१५ | श्री.एस.पी.खन्ना | ५००००/- | ARO-११ | मनपा निवडणूक-२०१५ |
| १० | ०४.४.२०१५ | श्री.आबेद अली खान | ५००००/- | ARO-१२ | मनपा निवडणूक-२०१५ |
| ११ | १३.४.२०१५ | श्री.मो.मझहर अली | २५०००/- | ट्रेसर वॉर्ड-ब | बांबु खरेदी |
| १२ | १६.४.२०१५ | श्री.एच.आर.बाहेती | ५०००/- | मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक. | पोस्टल |
| १३ | १६.४.२०१५ | श्री.एच.आर.बाहेती | ७०००/- | मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक. | टि फॉर एप्रिल |
| १४ | १७.४.२०१५ | श्री.शिरीष रामटेके | २५०००/- | ARO-३ | मनपा निवडणूक-२०१५ |
| १५ | १७.४.२०१५ | श्री.भागवत फड | २००००/- | ARO-७,A/C Section | मनपा निवडणूक-२०१५ |
| १६ | २०.४.२०१५ | श्री.एच.ए.कोल्हे | २०००००/- | Exe.Engr.A/D | पाणी बॉटल्स |
| १७ | २०.४.२०१५ | श्री.सय्यद जमशिद | १००००/- | Building Inspector | टि , कॉफी |
| १८ | २३.४.२०१५ | श्री.अय्युब खान नुर खान | १००००/- | Est-२ | पोस्टल |
| १९ | २८.४.२०१५ | श्री.किशन डी देशमुख | ५००००/- | SecEngr.Light | Adv.for Micro Phones |
| २० | २८.४.२०१५ | श्री.अभय देशमुख | ३०००/- | Swimming pool | Bleaching powder purchase |
| २१ | ३०.४.२०१५ | श्री.एस .के.जोशी | २५०००/- | Ward officer-F | Misc.Exp |
| २२ | ११.५.२०१५ | श्री.एन.एल.चव्हाण | ५००००/- | Ward officer-A | Mansoon cleaning |
| २३ | ११.५.२०१५ | श्री.एस.आर.जरारे | ५००००/- | Ward officer-D | Mansoon cleaning |

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| २४ | २०.५.२०१५ | श्रीमती मंगला जोशी | २५००/- | शिक्षक शिवणक्लास | परिक्षा फीस |
| २५ | २६.५.२०१५ | श्री.के.एन.काटकर | २०००००/- | इंजि.वॉर्ड -ई | नाला सफाई |
| २६ | २६.५.२०१५ | श्री.एस.एस.पाटील | २०००००/- | इंजि.वॉर्ड -ई | नाला सफाई |
| २७ | २६.५.२०१५ | श्री.मधुकर व्ही.चौधरी | २०००००/- | इंजि.वॉर्ड -ई | नाला सफाई |
| २८ | २९.५.२०१५ | श्री.नाथ लक्ष्मण चव्हाण | ५००००/- | Ward officer-A | पावसाळी स्वच्छता |
| २९ | २९.५.२०१५ | श्री.एस.के.जोशी | ५००००/- | Ward officer-B | पावसाळी स्वच्छता |
| ३० | २९.५.२०१५ | श्री.एस.आर.जरारे | ५००००/- | Ward officer-D | पावसाळी स्वच्छता |
| ३१ | २९.५.२०१५ | श्री.सि.एम.अभंग | ५००००/- | Ward officer-F | पावसाळी स्वच्छता |
| ३२ | ०३.६.२०१५ | श्री.अब्दुल बारी पटेल | ५००००/- | Sy.Manager computer section | Recovery |
| ३३ | ०३.६.२०१५ | श्री.निवृत्ती यशवंत गवा | १०००००/- | Dy.Eng.Ward-D | नाला सफाई |
| ३४ | ०४.६.२०१५ | श्री.अब्दुल बारी पटेल | ५००००/- | Sec.Eng.Ward-A | नाला सफाई |
| ३५ | ११.६.२०१५ | श्री.पी.जी.पवार | २०००००/- | Sec.Eng.Ward-A | नाला सफाई |
| ३६ | १२.६.२०१५ | श्री.बी.के.परदेशी | १०००००/- | Sec.Eng.Ward-A | नाला सफाई |
| ३७ | १२.६.२०१५ | श्री.एम.एम.खान | १०००००/- | Sec.Eng.Ward-A | नाला सफाई |
| ३८ | १२.६.२०१५ | श्री.वामन कांबळे | १०००००/- | Sec.Eng.Ward-C | नाला सफाई |
| ३९ | १२.६.२०१५ | श्री.के.पी.पवार | १०००००/- | Sec.Eng.Ward-C | नाला सफाई |
| ४० | १५.६.२०१५ | श्री.जे.पी.गाडेकर | १०००००/- | Sec.Eng.Ward-F | नाला सफाई |
| ४१ | १५.६.२०१५ | श्री.शफीक अहेमद | १०००००/- | Sec.Eng.Ward-F | नाला सफाई |
| ४२ | १५.६.२०१५ | श्री.ए.यु.जाधव | २०००००/- | Sec.Eng.Ward-B | नाला सफाई |
| ४३ | १५.६.२०१५ | श्री.बी.के.अभंग | २०००००/- | Sec.Eng.Ward-B | नाला सफाई |
| ४४ | १६.६.२०१५ | श्री.एम.एम.जाधव | २०००००/- | Sec.Eng.Ward-A | नाला सफाई |
| ४५ | १६.६.२०१५ | श्री.डी.जी.निकम | २०००००/- | Sec.Eng.Ward-B | नाला सफाई |
| ४६ | १८.६.२०१५ | श्री.नाथ लक्ष्मण चव्हाण | २२०२/- | Ward officer-A | आर्थिक Statistical |
| ४७ | १८.६.२०१५ | श्री.एस.के.जोशी | २५६९/- | Ward officer-B | आर्थिक Statistical |
| ४८ | २२.७.२०१५ | श्री.शिवाजी बी झनझन | १०००००/- | CFO | हैद्राबाद शैक्षणिक दौरा |
| ४९ | ३१.७.२०१५ | श्री.वसंत मारूतीराव निकम | ४००००/- | मालमत्ता अधिकारी | Mortgage deed |
| ५० | ०६.८.२०१५ | श्री.डी.आर.निंबाळकर | २००००/- | सहा.सांस्कृतिक | क्रांती दिवस ९ ऑगस्ट |
| ५१ | ०६.८.२०१५ | श्री.बी.के.चव्हाण | ४०००००/- | क्रिडाधिकारी | क्रिडा स्पर्धा |
| ५२ | ०६.८.२०१५ | श्री.नाथ लक्ष्मण चव्हाण | ५००००/- | Ward officer-A | Misc.Exp |
| ५३ | ०६.८.२०१५ | श्री.एस.के.जोशी | ५००००/- | Ward officer-B | Misc.Exp |
| ५४ | ०६.८.२०१५ | श्री.एस.आर.जरारे | ५००००/- | Ward officer-D | Misc.Exp |
| ५५ | ०६.८.२०१५ | श्री.सि.एम.अभंग | ५००००/- | Ward officer-F | Misc.Exp |
| ५६ | ०६.८.२०१५ | श्री.अब्दुल बारी पटेल | ५००००/- | Sy.Manager computer section | Misc.Exp |
| ५७ | १२.८.२०१५ | डॉ.बी.एस.नाईकवाडे | ११५०००/- | Zoo Director | कॅनडा दौरा |
| ५८ | १४.८.२०१५ | श्रीमती अनुजा चितळे | ५०००/- | क्रिडा शिक्षक | १५ ऑगस्ट |
| ५९ | २५.८.२०१५ | श्री.अभय देशमुख | ४७८८०/- | स्विमिंग पुल | ब्लिचिंग पावडर खरेदी |
| ६० | २५.८.२०१५ | डॉ.जयश्री कुलकर्णी | ५००००/- | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | महा स्वच्छता अभियान |
| ६१ | २५.८.२०१५ | श्री.एस.आर.जरारे | ५००००/- | Ward officer-D | महा स्वच्छता अभियान |
| ६२ | २५.८.२०१५ | श्री.सि.एम.अभंग | ५००००/- | Ward officer-F | महा स्वच्छता अभियान |
| ६३ | २५.८.२०१५ | श्री.सि.एम.अभंग | ५००००/- | Ward officer-F | महा स्वच्छता अभियान सातारा देवळाई |
| ६४ | २८.८.२०१५ | डॉ.अर्चना राणे | ५०००/- | वैद्यकीय अधिकारी | Management disaster |

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| ६५ | १०.९.२०१५ | श्री.व्ही.बी.पाटील | ५००००/- | उद्यान अधिक्षक | मराठवाडा मुक्तीसंग्राम |
| ६६ | ११.९.२०१५ | श्री.ए.पी.सुरडकर | १९१३६/- | स्व.नि. वॉर्ड-ड | स्वच्छता अभियान |
| ६७ | १४.९.२०१५ | श्री.रविंद्र पी निकम | ५००००/- | उपायुक्त -A | कार्यालयीन दौरा |
| ६८ | ०५.९.२०१५ | श्री.बी.के.चव्हाण | ४०००००/- | क्रिडा अधिकार | क्रिडा स्पर्धा |
| ६९ | २१.९.२०१५ | श्री.सि.एम.अभंग | ५०००/- | आस्थापना अधिकारी | मराठवाडा मुक्तीसंग्राम |
| ७० | २१.९.२०१५ | श्री.सि.एम.अभंग | ५०००/- | आस्थापना अधिकारी | १५ ऑगस्ट २०१५ |
| ७१ | २३.९.२०१५ | श्रीमती मंगला जोशी | ८०००/- | शिक्षक | फीस |
| ७२ | ०७.१०.२०१५ | आस्थापना अधिकारी-२ | १००००/- | आस्था अधिकारी-२ | पोस्टल एक्सपेनसेस |
| ७३ | ०८.१०.२०१५ | श्री.अभय देशमुख | ४५०००/- | स्विमिंग पुल | क्लोरीन पर्चेसिंग |
| ७४ | १३.१०.२०१५ | श्री.पी.जी.पवार | ८०००००/- | Dy.Eng.ward-D | नाला सफाई |
| ७५ | १५.१०.२०१५ | श्री.एस.के.जोशी | ५००००/- | Ward officer-B | स्वच्छता अभियान |
| ७६ | १५.१०.२०१५ | श्री.अवचित मोरे | ५०००/- | Ward -D | पेट्रोल |
| ७७ | १५.१०.२०१५ | डॉ.स्मिता नलगिरकर | १४६७८२/- | वैद्यकीय अधिकारी | औषध खरेदी |
| ७८ | १५.१०.२०१५ | डॉ.स्मिता नलगिरकर | ११५६९८/- | वैद्यकीय अधिकारी | औषध खरेदी |
| ७९ | २१.१०.२०१५ | श्री.विनोद संतोष हिवाळे | २५०००/- | वॉर्ड - क | पेट्रोल |
| ८० | २२.१०.२०१५ | श्री.डी.के.पंडीत | २५०००/- | Dy.Eng. mechanical | दशहर |
| ८१ | २३.१०.२०१५ | श्री.नाथ लक्ष्मण चव्हाण | ५००००/- | Ward officer-A | स्वच्छता अभियान |
| ८२ | २७.१०.२०१५ | श्री.गणेश रमेश शिंदे | ५०००/- | SFW Ward -A | पेट्रोल |
| ८३ | २७.१०.२०१५ | श्री.विनोद संतोष हिवाळे | ५०००/- | SFW Ward -C | पेट्रोल |
| ८४ | २७.१०.२०१५ | श्री.शिवाजी बाबुराव झनझन | ५००००/- | CFO | |
| ८५ | ०४.११.२०१५ | श्री.जे.एस.वाघ | २०००/- | Light section | |
| ८६ | ०८.१२.२०१५ | श्री.सुनिल ढेकळे | ५०००/- | मा.आयुक्तांचे स्वीय सहाय्यक | |
| ८७ | १०.१२.२०१५ | श्री.बी.डी.पैठणे | १००००/- | आस्थापना अधिकारी-२ | |
| ८८ | १८.१२.२०१५ | श्री.सचिन वाईकर | १५००/- | Jr.Eng. Mechanical | MH-२०-७६७९ |
| ८९ | २१.१२.२०१५ | श्री.अभय देशमुख | ४६०००/- | Swimming Pool | Chlorine purchasing |
| ९० | ३०.१२.२०१५ | श्री.योगेन्द्र एस.राजपुत | ५०००/- | आस्थापना -२ | Internet |
| ९१ | ३०.१२.२०१५ | श्री.शिवाजी बाबुराव झनझन | ५००००/- | CFO | स्वच्छता अभियान |
| ९२ | १२.१.२०१५ | श्रीमती अनुजा चितळे | ५०००/- | शिक्षक | २६ जानेवारी २०१६ |
| ९३ | १२.१.२०१६ | श्रीमती मंगला चिंतावार | ५०००/- | शिक्षक,सिडको एन-७ | २६ जानेवारी २०१६ |
| ९४ | १२.१.२०१६ | श्री.देविदास टारपे | ५०००/- | सहा.शिक्षक बेगमपुरा | २६ जानेवारी २०१६ |
| ९५ | २०.१.२०१६ | श्री.श्रीधर टारपे | ५०००/- | वॉर्ड - ब | २६ जानेवारी २०१६ |
| ९६ | २१.१.२०१६ | डॉ.शैलजा मापारी | २३७५/- | वैद्यकीय अधिकारी | Birth and death S/W |
| ९७ | ०४.२.२०१६ | श्री.तपकिरे | २५९००/- | मुख्याध्यापक मुकुंदवाडी | SSC students workshop |
| ९८ | ०४.२.२०१६ | श्री.संजिव सोनार | ५०००/- | मुख्याध्यापक इंदिरानगर | SSC students workshop |
| ९९ | ०५.२.२०१६ | आस्था-२ | १००००/- | आस्था-२ | पोस्टल |
| १०० | ०५.२.२०१६ | डॉ.सुहास जगताप | ५०००/- | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | |
| १०१ | ०६.२.२०१६ | डॉ.सुरेश गोसावी | ५०००/- | वैद्यकीय अधिकारी | Leprosy program |
| १०२ | ०६..२.२०१६ | श्री.अशोक नारायण चावरिया | ५०००/- | स्वच्छता निरिक्षक -ड | २६ जानेवारी २०१६ |

| Sr. No. | Date | Names | Amount (Rs) | Section | Purpose |
|---|---|---|---|---|---|
| १३३ | २२.२.२०१६ | श्री.नाथ लक्ष्मण चव्हाण | २५०००/- | Ward officer-A | Tax Recovery |
| १३४ | २२.२.२०१६ | श्री.एस.आर.जरारे | २५०००/- | Ward officer-D | Tax Recovery |
| १३५ | २२.२.२०१६ | श्री.सि.एम.अभंग | २५०००/- | Ward officer-E | Tax Recovery |
| १३६ | २६.२.२०१६ | श्री.अभय देशमुख | ४४५००/- | स्विमिंग पुल | ब्लिचिंग पावडर खरेदी |
| १३७ | ८.३.२०१६ | श्री.डि.वाय.जोशी | १५०००/- | कार्यालय अधिक्षक शिक्षण विभाग | महिला दिन |
| १३८ | ११.३.२०१६ | डॉ.बी.एस.नाईकवाडे | ५००००/- | CAHO | प्रांण्यांवरील उपचार |
| १३९ | २८.३.२०१६ | श्री.नाथ लक्ष्मण चव्हाण | २५०००/- | Ward officer-A | Tax recovery |
| १४० | २८.३.२०१६ | श्री.एस.आर.जरारे | २५०००/- | Ward officer-D | Tax recovery |
| १४१ | २८.३.२०१६ | श्री.सि.एम.अभंग | २५०००/- | Ward officer-F | Tax recovery |
| १४२ | २८.३.२०१६ | श्री.एम.बी.काझी | २००००/- | Chief technical cell | मनपा निवडणूक सातारा देवळाई |
| १४३ | ३०.३.२०१६ | श्री.आर.के.सुरे | १९५०००/- | Asst fire officer | अग्नि सप्ताह १०.४.२०१६ |
| | | **एकूण** | **७०,७२,०४२/-** | | |

## परिच्छेद क्र. ४: सन २०१४-१५, २०१५-१६ या आर्थिक वर्षात कर्मचा-यांना वितरीत केलेल्या अतिप्रदान रकमांबाबत.

सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात महानगरपालिका कर्मचा-यांना अतिप्रदान रकमा वितरीत केल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे स्वतंत्र देण्यात येत आहे. अतिप्रदान केलेली रक्कम **रू.१३,१९,५१४/-** अद्यापपर्यंत वसूल करण्यात आलेली नाही.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | अतिप्रदान रक्कम रू. | | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.तिम्मा शेटीबा चव्हाण | ९०,६६३/- | अति.प्रदान | समुदाय संघटक |
| २ | श्री.शेख रहेमान शेख उस्मान | १०,२७८/- | अति.प्रदान | वाहन चालक |
| ३ | श्री.सुनिल अनुपसिंग रिडलॉन | १४,०८३/- | अति.प्रदान | स्विपर |
| ४ | श्री.जनार्धन श्रीपाद वाघुळे | २५,९८३/- | अति.प्रदान | सुरक्षा रक्षक |
| ५ | श्रीमती जिजाबाई तेजराव राऊत | ३२,९५८/- | अति.प्रदान | मजूर |
| ६ | श्री.सुधाकर शिवराम नरवडे | १०१६/- | अति.प्रदान | लाईनमन पापु. |
| ७ | श्री.अनिल वाळूंजकर | ६५१/- | अति.प्रदान | कनिष्ठ लिपीक |
| ८ | श्रीमती शकुंतलाबाई सुदाम शेजूळ | ३२,६९०/- | अति.प्रदान | मजूर |
| ९ | श्री.आश्रु परबत गवळे | ३८,४८५/- | अति.प्रदान | मजूर |
| १० | श्री.रामसिंग सखाराम राऊत | ३८,४३५/- | अति.प्रदान | सुरक्षा रक्षक |
| ११ | श्री.भिमराव पुंजाजी दाभाडे | ७२,९८८/- | अति.प्रदान | मजूर /शिपाई |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | श्रीमती तान्हाबाई चंद्रकांत गवळे | १७,६२२/- | अति.प्रदान | मजूर /शिपाई |
| १३ | श्री.प्रकाश खुशालराव दाभाडे | २,३८७/- | अति.प्रदान | वाहन चालक |
| १४ | श्री.भानुदास यादव मोटे | ८००/- | अति.प्रदान | पापु.लाईनमन |
| १५ | श्री.मो.शाकेर मो.अकबर | १,२४,३३५/- | अति.प्रदान | शाखा अभियंता |
| १६ | श्री.अंबादास भादवे | ४,६५२/- | पेन्शन कॉ. | सह.शिक्षक |
| १७ | श्री.शेख हसन शेख हुसेन | २९,६०७/- | अति.प्रदान | माळी |
| १८ | श्रीमती सुलभा केतकर | ८,७११/- | पेन्शन कॉ. | मुख्याध्यापक |
| १९ | श्री.मुन्नाबी शे.जानु | ६,६४०/- | अति.प्रदान | सफाई मजूर |
| २० | श्री.मनसाराम यादव हिवराळे | ४७,१३८/- | अति.प्रदान | पापु लाईनमन |
| २१ | श्री.बिहारीलाल ब-हाणपुरे | ४९,२१३/- | अति.प्रदान | वाहन चालक |
| २२ | श्रीमती चंदा वि.दिवान | ७,४९०/- | अति.प्रदान | परिचारिका |
| २३ | श्री.प्रेम उजाला चावरीया | ०८/- | अति.प्रदान | स्विपर |
| २४ | श्री.फकीरचंद रामा गायकवाड | २२,९०६/- | अति.प्रदान | मजूर |
| २५ | श्रीमती इंदुबाई बन्शी चांदणे | १६,९३३/- | अति.प्रदान | मजूर |
| २६ | श्री.शिवराम किसन रमंडवाल | ३८,८८१/- | अति.प्रदान | नाईक |
| २७ | श्री.शर्निक सर्जेराव शिंदे | १६,२७०/- | अति.प्रदान | शाखा अभियंता |
| २८ | श्री.सय्यद कय्युम स.हुसेन | २,६६,०७४/- | अति.प्रदान | स्व.निरिक्षक |
| २९ | श्री.लक्ष्मण अभिमान माळे | ९,४३६/- | अति.प्रदान | स्वे.से.नि. दु.आवेक्षक |
| ३० | श्री.देवचंद | १,२९६/- | अति.प्रदान | सफाई मजूर |
| ३१ | श्रीमती द्वारकाबाई पहिलवान | ५,९९०/- | अति.प्रदान | सफाई मजूर |
| ३२ | श्री.कृष्णा प्रभाकर पुराणिक | १,३४,५८८/- | अति.प्रदान | स्व.निरिक्षक |
| ३३ | श्री.लियाकत अली नामदार खान | १७,६७२/- | अति.प्रदान | कनिष्ठ लिपीक |
| ३४ | श्री.रामलाल गंगाराम निभोर | ७१,९०८/- | अति.प्रदान | सरक्षा रक्षक |
| ३५ | मो.जहिरोद्दीन वली मोहम्मद | ५८,००३/- | अति.प्रदान | वाहन चालक |
| ३६ | श्री.एकनाथ बाबुराव खंदारे | २,७२४/- | अति.प्रदान | मजूर |
| | **एकूण** | **१३,१९,५१४/-** | | |

उपरोक्त रकमेचे समायोजन करून, महानगरपालिका फंडात भरणा करणे आवश्यक आहे. सदरील रकमा भरणा झाल्याची खात्री करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.५: शासनाच्या विविध कराच्या रकमांची वसूली झाल्यानंतर रकमा वेळोवेळी शासकीय कोषागारात भरणा न करणे बाबत.**

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले आहे की, लेखा शाखेने सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात विविध देयकातून केलेल्या कपाती या शासनाच्या संबंधित विभागाकडे वेळेवर जमा करणे बंधनकारक असतांना सुध्दा रकमा जमा केलेल्या नाहीत.

विभागाने वेळोवेळी शासकीय रकमा शासकीय कोषागारात भरणा कराव्यात जेणे करुन संबंधित विभागाकडून होऊ शकणारी अप्रिय कार्यवाही टाळता येईल.

उपरोक्त बाबींबाबत निष्काळजीपणा केलेल्या अधिकारी/ कर्मचा-यांविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.६ : नविन अंशदान निवृत्ती योजने बाबत. (Defind Contributory Pension Scheme)**

शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ व त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन अनुज्ञेय असणार नाही. याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. औरंगाबाद मनपामध्ये दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती दिलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना नियुक्ती आदेशात या अर्थाची अट नमूद केलेली असते, परंतू प्रत्यक्षात लेखा विभागातर्फे योजना लागू करणेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. उक्त योजना गेल्या ९ वर्षापासून अंमलात आणणे आवश्यक होते. तथापि लेखा शाखेने सदरील योजनेची अंमलबजावणी केलेली नसल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्या सोबतच महानगरपालिकेवर सुध्दा योजना अंमलबजावणीसाठीच्या खर्चाचे दायित्व वाढलेले आहे. या दरम्यान एखाद्या कर्मचा-याचा आकस्मित मृत्यू झाल्यास अनेक समस्या निर्माण होण्याची शक्याताही नाकारता येत नाही. या सर्व बाबींचे गांभिर्य लेखा शाखेने घेवून तात्काळ योजनेची अंमलबजावणी करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.७: द्विनोंद लेखा पध्दतीच्या अंमलबजावणी बाबत.**

शासनाच्या निर्देशानुसार द्विनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. औरंगाबाद महानगरपालिके मध्ये या पध्दतीचा अवलंब केलेला नाही. तसेच National Municipal Account Manual मधील नमुन्यानुसार महानगरपालिकेचे लेखे ठेवलेले नाहीत. या पध्दती अवलंबिल्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचे अचूक चित्र स्पष्ट होवू शकते.

लेखा शाखेने प्राधान्याने लेखा विभागातील सर्व कामे द्विनोंद लेखा पध्दतीने व National Municipal Account Manual मधील नमुन्यात लेखे ठेवण्यासाठीची कार्यवाही तातडीने करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

# लेखापरीक्षण अहवाल
# वॉर्ड कार्यालय - क
# सन २०१३-२०१४

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड - क कार्यालयाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१४/९२, दिनांक २९.४.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. दरम्यान जमा बाजूचे (चाचणी स्वरूपाचे) नियमित लेखापरीक्षण उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार करण्यात आले.त्यानुषंगाने वॉर्ड कार्यालयाचे मालमत्ता पावती पुस्तके, अकृषिक पावती पुस्तके व पाणीपुरवठा पावती पुस्तके वसूल केलेल्या रोख रकमा व धनादेश रकमांचे ताळमेळ घेवून वेळोवेळी भरणा केलेल्या रकमेची तपासणी करण्यात आली. तसेच नामांतराच्या संचिका विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या संचिका, बेबाकी प्रमाणपत्राच्या संचिका तपासण्यात आल्या आहेत. याशिवाय वॉर्ड - क कार्यालयाचे नोंदवहीत नोंदविलेल्या नोंदी तपासण्यात आल्या. वॉर्ड - क अंतर्गत उपअभियंता विभागाचे खर्च बाजूचे ए-१ रेटलिस्ट कामाच्या संचिका, तसेच बी-१ निविदा कामाच्या संचिका, ड्रेनेज दुरूस्ती, क्वॉर्टर दुरूस्ती, डांबरीकरण संचिका व पेव्हर ब्लॉक संचिकेची चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली .

त्या दरम्यान वॉर्ड - क कार्यालयास लेखापरीक्षणा अंतर्गत जमा बाजूचे **१७** व खर्च बाजूचे **१६** असे एकूण **<u>३३</u>** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

## वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांच्या कार्यकाळाबाबत.

सन २०१३-२०१४ या कालावधीत **श्रीमती प्रियंका केसरकर** यांनी वॉर्ड अधिकारी - क व **श्री.एम.एम.खान,** शाखा अभियंता यांनी प्रभारी वॉर्ड अभियंता - क म्हणून काम पाहिले.

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :**

१. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लि (पथक प्रमुख)

२) श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक

३) श्रीमती पंचशिला खरात, कनिष्ठ लिपीक

४) श्रीमती शिल्पा जोशी, कनिष्ठ लिपीक

वॉर्ड - क कार्यालयाकडून प्रलंबित लेखापरीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे - सन २००२-२००३ ते सन २००७-०८ या कालावधीत एकूण प्रलंबित आक्षेप ०६ व एकूण आक्षेपित रक्कम रू. **९२,९२०/- इ**तकी आहे. प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन त्वरीत करून आक्षेपाधित रकमेचा निपटारा विभागाने करून घेणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. १   : लेख्यांची सर्वसाधारण स्थिती.**

वॉर्ड - क कार्यालयाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी विभागाने अभिलेखे उपलब्ध करून दिले. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यातील मालमत्ता मागणी नोंदवही, दैनंदिन वसूल केलेल्या करांची नोंद केलेली रोखकिर्द इत्यादी अभिलेखे तपासली. मालमत्ता मागणी नोंदवहीतील घेण्यात आलेल्या नोंदी अपूर्ण आढळल्या. मागणी नोंदवहीची एकूणच स्थिती अत्यंत खराब व दयनीय आहे. मागणी नोंदवहीत पुढील आणि मागील पाने फाटलेली असल्याने नोंदी अस्पष्ट आहेत. मागणी नोंदवही वर नोंदी घेणा-या कर्मचारी / अधिकारी यांचे सांक्षाकन नाही. मागणी नोंदवही ही कायम जतन करणा-या अभिलेख्यातील अभिलेखे असल्याचे गांभीर्य विभागास नसल्याचे दिसून आले.

करीता विभागाने मालमत्ता मागणी नोंदवहीची स्थिती तपासावी. रजिस्टरच्या पुढील व मागील पानावरील नोंदी नष्ट होणार नाही याबाबत तातडीने नविन मागणी नोंदवही तयार करून संबंधित कर्मचारी / अधिका-यांचे नोंदवहीवर साक्षांकन करून घ्यावे. मागणी नोंदवहीतील अपूर्ण नोंदी जसे कर आकारणी संदर्भ, कर आकारणी मूल्य, एकूण कर योग्य असल्याची खातरजमा करावी.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. :२  लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून न देणे बाबत.**

१. स्वच्छता साहित्याची माहिती.
२. अधिकारी / कर्मचारी सेवापुस्तके, सेवापट, हजेरीपत्रक, दैनंदिन अहवाल, मासिक पगारपत्रके, पुरवणी देयके इत्यादी.
३. वैद्यकीय प्रतीपूर्ती संचिका.
४. जड संग्रह नोंदवही.
५. स्टॉक रजिस्टर (१०९,११० व १११)
६. आवक - जावक नोंदवही.
७. कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांचे ताळेबंद सादर करणे बाबत.
८. वॉर्ड कार्यालय - क अंतर्गत जन्म- मृत्यू प्रमाणपत्राच्या वसूल करण्यात आलेल्या फी बाबतची माहिती.
९. मालमत्ता फेर आकारणी संचिका उपलब्ध करून देणे बाबत.

**विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत साशंकता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.:३ दोन वेगवेगळ्या मालमत्ता असतांना एकच मालमत्ता दर्शवून त्यापैकी सन २००६-०८ पर्यंतचा कर वॉर्ड - अ मध्ये भरलेला वजा करून मनपाचे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

वॉर्ड कार्यालयाचे मालमत्ता मागणी नोंदवहीतील मागणीच्या नोंदी तपासतांना नोंदवही क्र. १/१ पान क्र.१९७ वर मालमत्ता कर पावती क्र. २०२४५९ दिनांक १८.१.२००८ अन्वये रू.१२३४=०० वसूल करण्यात आले. सदरील वसूलीची पावती मालमत्ता क्रमांक २-९-६८/P फाजलपुरा येथील असून वॉर्ड - अ कार्यालयाने वसूल केल्याचे दिसून येते. मागणी नोंदवहीतील मालमत्ता क्र.२-९-६८/२ मित्रा कॉलनी या मालमत्तेची नोंद आहे. त्यामुळे वॉर्ड - अ कार्यालयाची पावतीच्या झेरॉक्स प्रती वरून वजा केलेली रक्कम रू.१२३४=०० वजा करणे योग्य नाही.

संबंधितांकडून रू.१२३४ = ०० वसूल करून उपरोक्त अनियमितते बाबत लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.:४ अझीम गादी घर यांच्याकडून कर आकारणी करतांना निवासी दराने वसूली केल्याबाबत.**

मालमत्ता मागणी रजि.क्र.१६/१ नविन व जुने पान क्र.२४४-२४५, मालमत्ता संगणक क्र.C०००३५८५ वर भोगवटा धारकाचे नांव अझीम गादी घर, बारी कॉलनी घ.क्र.४-१२-२४/१२०, या मालमत्तेस करयोग्य मूल्य रू.८४४६/- लावण्यात आलेले असून ते केव्हा पासून लावण्यात आले याचा उल्लेख दर्शविण्यात आलेला नाही आणि संबंधित मालमत्ताधारकां कडून सन २०१५ पर्यंतची मालमत्ता कराचा भरणा हा निवासी दराने वसूल करण्यात आलेला आहे.

परंतू संबंधित मालमत्ता धारकाकडून मालमत्ता कर वसूली करतांना निवासी दराने वसूली न करता व्यावसायिक दराने वसूली करावयास पाहिजे होती त्यानुसार वसूली करण्यात आलेली नाही.

याबाबत विभागाने सदर मालमत्तेचा वापर निवासी आहे अथवा व्यावसायिक आहे याची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष स्थळपाहणी करावी. मालमत्तेच्या वापरानुसार कराची आकारणी करून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करण्यात यावे. प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.:५ करयोग्य मूल्यात वाढ झालेली असतांना जुन्या करयोग्य मूल्यानुसारच मालमत्ता कराची वसूल होत असल्यामुळे मनपाचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.**

मालमत्ता मागणी नोंदवही क्रमांक १/१ पान क्र.२१७ वरील मालमत्ता घर क्र. २-९-७२/१, मित्रा कॉलनी फाजलपुराच्या मालमत्तेस दिनांक १.४.१९९८ पासून कर आकारणी संदर्भ २०७ अन्वये रू.२१२८=०० करयोग्य मूल्य आकारले होते. तद्नंतर कर आकारणी संदर्भ क्र.५२५७४/२००४/२००५/WardC / ३७७९ /२००८-०९, दिनांक १०.५.२००८ नुसार सन २००४-०५ पासून रू.५१२८=०० करयोग्य मूल्यात वाढ करण्यात आली. मागणी नोंदवहीत जुन्याच करयोग्य मूल्यानुसार कराची वसूली करण्यात आलेली आहे. दोन्ही करयोग्य मूल्यानुसार वर्षनिहाय येत असलेल्या फरकाची रकमेचा तक्ता पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | वर्ष | अपेक्षित मालमत्ता कर | वसूल मालमत्ता कर | फरक रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २००४-०५ | २१२८ | ८८५ | १२४३ |
| २ | २००५-०६ | २१२८ | ८८५ | १२४३ |
| ३ | २००६-०७ | २४३६ | ९९२ | १४४४ |
| ४ | २००७-०८ | २४३६ | ९८८ | १४४८ |
| ५ | २००८-१० | ४८७२ | २०७५ | २७९७ |
| ६ | २०१०-११ | ३१०३ | ९८८ | २११५ |
| ७ | २०११-१४ | ९००१ | ४२२० | ४७८१ |
| | **एकूण** | | | **१५,०७१/-** |

प्रकरणांत प्रत्यक्ष तपासणी करून शहानिशा करून महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत खुलाशासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.:६ वॉर्ड - क कार्यालयातील सन २०१३-१४ या वर्षात झालेल्या नामांतर प्रकरणातील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - क कार्यालयास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वॉर्ड - क कार्यक्षेत्रातील मालमत्तांचे नामांतर प्रकरणे नाममात्र तपासली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

१. वॉर्ड कार्यालयाने नामांतर आदेश निर्गमित करतांना स्वतंत्र जावक नोंदवही ठेवलेली आहे. नोंदवहीतील अनुक्रमांक प्रत्येक महिन्यासाठी स्वतंत्र दिलेले आहेत. प्रत्यक्षात वॉर्ड कार्यालयातील कामकाजाचा एकच आवक व जावक नोंदवही असणे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने व नागरीकांच्या सोयीच्या दृष्टी कोनातून असणे क्रमप्राप्त आहे.

२. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/०९/२०१४, दिनांक २५.२.२०१४ अन्वये शे.अमीन शे.इब्राहीम सीटीएस क्रमांक १२०३९/१, घर क्र.४-११-८४/५२६ किराडपुरा संगणकीय मालमत्ता क्र.C००१७०५१ या मालमत्तांचे नामांतर मंजूर करण्यात आले आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण -८ नियम २ (२) अन्वये मनपास दिलेल्या नोटीसीवर मिळकत विकणा-याचे नाव (१) मुसाखान छोटेखान (२) अ.गफार मो.कासीम असे दर्शविलेले आहे. मनपा अभिलेख्यात अ.गफ्फार मो.कासीम यांचे एकट्याचेच नांव आहे. पी.आर.कार्ड मधील नोंदीनुसार शे.अमीन शे.इब्राहीम यांनी सदरील मालमत्ता शे.मुसा छोटे खान यांचेकडून खरेदी केलेली आहे. त्या कारणाने अ.गफार मो.कासीम यांचेकडून मालमत्तेची खरेदी झालेली नसतांना मंजूर केलेले नामांतर आदेश नियमबाह्य आहेत. तसेच संबंधितांकडे पाणीपट्टी रजिस्टर क्र.W७/४ पान क्र. ४३/४४ वरील नोंदीनुसार सन २०१३-१४ पर्यंत संबंधितांकडे ३०७५०/- थकबाकी असतांना रू.३००७५/- वसूली केलेली आहे. रू.६७५/- कमी वसूली झालेली असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. मनपाचे झालेले नुकसान वसूलीस पात्र.

३. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर /०१/२०१४, दिनांक ६.३.२०१४ शे.सलीम शे.रहेमान घ.क्र.४-१४-८०, जिन्सी या नावाने मनपा अभिलेख्यात नोंद आहे. अतीका बेगम शे.सलाह या नावाने नामांतर झालेले आहे. नामांतर करतांना संबंधित मालमत्तांवर असलेली थकबाकी वसूल केल्यानंतरच नामांतर करण्यात येते. नामांतर सोबत सन २०१३-१४ ची रक्कम वसूलीची पावती जोडली आहे. पावती व मागणी रजिस्टरचा ताळमेळ घेतला असता सन २००२-०३ ते सन २०१२-१३ पर्यंत संबंधितांकडे रू.५६९०/- थकीत असल्याचे जुन्या मागणी नोंदवहीतील नोंदीनुसार निदर्शनास आले. संबंधिताकडे थकीत असलेली रक्कम वसूली शिवाय सन २०१३-१४ या वर्षाची वसूली कोणत्या आधारे करण्यात आली याचा बोध होत नाही.

४. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर /०८/२०१४ दिनांक १५.३.२०१४ घ.क्र.४-७-६५/२ नवाबपुरा, रामप्रसाद शुक्ला यांचे नावाने नोंद आहे. प्रत्यक्षात नामांतर वारसा हक्काने करणे आवश्यक होते तसे न होता वारसांनी सदरील मालमत्ता पंकज सुराणा यांना विक्री केली. तद्नंतर नामांतर झालेले आहे. वारसा हक्काने नामांतर न करताच उपरोक्त प्रमाणे झालेले नामांतर नियमबाह्य आहे.

५. कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/नामांतर/वॉर्ड-क/०९/२०१४, दिनांक १५.३.२०१४ अन्वये हबीबुन्नीसा बेगम एम.एम. सिद्यीकी यांचे नावा ऐवजी N.P.O अमानुरबी आसीफ सय्यद टकारे असे नांव समाविष्ट केले. तद्नंतर कार्यालयीन पत्र क्र.वॉर्डक/नामांतर/८०/२०१४ दिनांक ३०.९.२०१४ अन्वये संबंधितांनी कार्यालयात दाखल केलेल्या पुराव्यानुसार N.P.O च्या नावे नामांतर केलेले आहे. प्रकरणांत दिनांक ३०.९.२०१४ रोजी केलेले नामांतर हे विना मोबदला नामांतर नोंदीमध्ये दुरूस्ती दर्शवून केले असून मनपाची नामांतर फी संबंधिताकडून घेणे आवश्यक होते, पूर्वी N.P.O.म्हणून नाव समाविष्ट केले होते. त्यावेळी घेतलेली फी व नामांतर फी वेगवेगळी आहे. करीता रू.२०००/- संबंधीतांकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करावा.

६. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड -क/१४, दिनांक २४.३.२०१४ अन्वये जुना मालमत्ताधारक श्री.स.जमीर स.महेबूब यांचे नांव असून N.P.O. नजीर महेबूब सय्यद यांचे नावाचे आदेश पारीत झालेले आहे. मालकी हक्काचे कागदपत्रात सदरील घर जमीन घ.क्र.४-१२-५१/५८५, इंदिरानगर बायजीपुरा N.P.O.धारक नजीर महेबूब सय्यद यांनी महमद अ.रज्जाक महंमद कासीम यांचे कडून खरेदी केलेली आहे. पूर्वीचे मालक यांनी जमीन कोणाकडून खरेदी केली त्याचे नामांतर न होताच नविन N.P.O. धारक यांचे नांवे करणे ही बाब नियमबाह्य आहे. त्यामुळे मनपाचे नामांतर फीचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

७. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/१३, दिनांक २४.३.२०१४ अन्वये चंद्रशेखर एस.मुरलीयार यांचे C०००८८७५ फ्लॅट क्र.३, गादीया पार्क, बसैय्येनगर येथील मालमत्तेचे नामांतर नरहर नारायणराव बाळंखे यांचे नावे केलेले आहे. मनपास नामांतर बाबत दिलेल्या नोटीसीमध्ये चंद्रशेखर एस.मुरलीयार यांच्या नावाचा समावेश नाही. नरहर नारायण बाळंखे यांनी प्रशांत नरहर बाळंखे यांचेकडून घर खरेदी केल्याचे अभिलेख्यावरून दिसते. तसेच चंद्रशेखर मुरलीयार यांनी घर प्रशांत बाळंखे यांना विक्री केल्यावर मनपा अभिलेख्यात नामांतराची नोंद झालेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

८. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/१२/२०१४ नय्यर खातून अ.कादर अल अमोदी घ.क्र.८-१८-१९९ जसवंतपुरा, संगणकीय मालमत्ता क्र.C००२२२१७ या नावाने नामांतर झालेले आहे. मनपा अभिलेख्यात मिर्झा कलीम बेग मिर्झा ईस्माईल बेग अशी नोंद आहे. सदरील प्रकरणी सद्यस्थितीत झालेले नामांतर हे नियमबाह्य झालेले असल्याचे अभिलेख्यावरून दिसून येते. कारण मिर्झा बेग यांनी त्यांची मालमत्ता मो.शाकेर मो.याकुब यांना विक्री केलेली आहे. प्रथमत: त्यांचे नांव नामांतर न करता तिस-या व्यक्तीच्या नांवे नामांतर आदेश मंजूर केलेले आहेत. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच सदरील मालमत्ता मीश्र असल्यामुळे नामांतर फी रू.३०००/- ऐवजी रू.१०००/- वसूल करून रू.२०००/- व पूर्वीचे नामांतर रू.३०००/- असे एकूण रू.५०००/- रकमेचे आर्थिक नुकसान वसूलीस पात्र आहे.

९. कार्यालयीन पत्र क्र.नामांतर/६/२०१४, दिनांक ६.३.२०१४ अन्वये वारसा हक्काने शे.मुश्ताक अहमद गुलाम अहमद यांचे नावाने सीटीएस क्र.१०५२७ घ.क्र.२-२-७७/P शहाबाजार येथील शॉप क्र.१,२,७,८ या मालमत्तेचे नामांतर केलेले आहे. संगणकीय

मालमत्ता क्र.C००२०४५९ आहे. करआकारणी संदर्भ क्र.७७१०/२०१२-१३, दिनांक ७.१२.२०१२ अन्वये मालमत्ता घ.क्र.२-२-७७/P या मधील चार दुकानांना कर आकारणी केलेली आहे. त्यात शॉप क्र.१,२,७ व ८ असा उल्लेख नाही. नामांतर करतांना अभिलेख्यात शॉप क्रमांकाच्या नोंदी नसतांना कोणत्या आधारे क्रमांक नोंदविले याचा बोध होत नाही. तसेच नामांतर संचिकेत एनएस-१ वर केलेल्या सादरीकरणात संबंधितांकडे असलेली थकीत रक्कम रू.६२०६०/- वसूल न करता केवळ ५०,०००/- रकमेचा धनादेश घेवून नामांतर आदेश पारीत करून प्रकरणात अनियमितता झालेली आहे. संबंधितांचे नांवे नामांतर आदेश देण्यापूर्वी सुध्दा संपूर्ण रक्कम मनपा फंडात जमा झालेली नसल्याने मनपाचे रू.१२०६०/- चे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे. मनपाचे आर्थिक नुकसान वसूलीस पात्र आहे.

**उक्त मुद्यांबाबत विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उपरोक्त प्रकरणे ही नाममात्र असून या व्यतिरिक्त नामांतराच्या इतरही प्रकरणांची अनियमितता तपासून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.:७ जुन्या मागणी नोंदवहीत १" नळ कनेक्शन नुसार मागणी व वसूली करण्यात येत असतांना नविन रजिस्टर वर नोंद घेतांना मागणी नोंदवहीत १" व्यासाच्या दराच्या ऐवजी १/२" व्यासाचे दर नोंदवून मनपाचे झालेले आर्थिक नुकसानीबाबत.**

१. जुने नळ मागणी रजिस्टर क्र.२७ पान क्र.१२०-१२१ वर नळ खाते क्र.८१२०७ व्यास १" व या पानावर पुढील पान क्र. १७८-१७९ वर पहा (डबल नोंद) असे दर्शविण्यात आले. त्या अन्वये पान क्र.१७८-१७९ वर नळ खाते क्र.८१२०७ व्यास १/२" निवासी दर्शविण्यात आले. म्हणजेच पान क्र.१२०-१२१ अन्वये १" व्यासा प्रमाणे संबंधिताकडे सन २०१४-१५ पर्यंतची थकबाकी रू.९५,२१०/- येते. त्यापैकी मागणी रजिस्टर वरील नोंदी नुसार रू.२९२५+५४००= असे एकूण ८३२५/- वजा जाता सन २०१४-१५ पर्यंत संबंधिताकडे रू.८६,८८५/- थकबाकी आहे. नविन रजिस्टर वरील नोंदी नुसार पान क्र.१६५ वर रू.१३,७००/- थकबाकी सह सन २०१४-१५ ची मागणी दर्शविलेली आहे. दर्शविलेली मागणी रू.७३,१८५/- ने कमी दर्शविलेली आहे. नळाचा व्यास १" असतांना पुढील पानावर नळाचा व्यास बदलून घेतलेली नोंद महानगरपालिकेची दिशाभूल करणारी व आर्थिक नुकसान करणारी आहे.

२. मागणी रजिस्टर क्र.२७ पान क्र.१२२,१२३ वर नळ खाते क्र.६९४२९ खात्यावर जुन्या मागणी नोंदवहीत १" नळ कनेक्शन नुसार मागणी व सन २००४ ते ०६ पर्यंतची वसूली १" व्यासाच्या (निवासी) दराने वसूली करण्यात आली. परंतू नविन मागणी रजिस्टर क्रमांक २७ पान क्र.११२ व ११३ वर सन २००६ ते सन २०१३ पर्यंतची थकबाकी ही १/२" निवासी दराने मागणी नोंदविण्यात आली आहे. नविन रजिस्टरला मागणी नोंदवितांना व्यास कमी दर्शवून रू.५०,२००/- थकबाकी वरून सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन वर्षाची मागणी रू.२१४००/- असे एकूण ७१,६००/- दर्शविणे अपेक्षित होते. परंतू रू.१९,१००/- दर्शवून रक्कम रू.५२,५००/- कमी दर्शविलेले आहे.

३. जुने मागणी रजिस्टर क्र.२७ पान क्र.१२४,१२५ नळ खाते क्र.६९४५० या खात्यावर जुन्या मागणी नोंदवहीत १" नळ कनेक्शन नुसार मागणी व सन २००४-०६ पर्यंतची वसूली १" व्यास (निवासी) दराने वसूली करण्यात आली.

परंतू नविन मागणी रजिस्टर क्रमांक २७ पान क्र.११४,११५ वर सन २००६ ते २०१५ पर्यंतची थकबाकी ही ½" निवासी दराने मागणी नोंदविण्यात आली आहे. नविन रजिस्टरला मागणी नोंदवितांना व्यास कमी दर्शवून थकबाकी व चालू मागणी अशी एकत्रित रक्कम रू.७१,६००/- दर्शविणे अपेक्षित होते. परंतू थकबाकी व चालू मागणी रक्कम रू.१९१००/- दर्शवून रक्कम रू.५२,५००/- कमी दर्शविलेले आहे.

**उपरोक्त मुद्या क्र. १ ते ३ बाबत अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ८ : संगणकीय अभिलेख्यानुसार पावती तयार करतांना पावतीची रक्कम व स्विकृत रकमेमध्ये वेगवेगळ्या रकमांचा तपशील नमूद केल्या जात असल्याबाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र.C००१९०६०, घर क्र.३-१२-११ शहागंज या मालमत्ते संबंधी संगणकीय अभिलेख्यानुसार रू.१३,६४५/- मालमत्ता कराची रक्कम दर्शविलेली आहे. दिनांक ११.३.२०१४ रोजी संबंधितांनी वॉर्ड कार्यालयात धनादेश क्र.०२०३२२ अन्वये मालमत्ता कराचा भरणा केला त्यांना पावती क्र.As/५१३८४ अन्वये पावती देण्यात आली. पावतीवरील धनादेशाची रक्कम रू.१३६४५/- आणि स्वीकृत रक्कम रू.१३८६/- दर्शविलेली आहे. पावत्याच्या तपशील अहवालात रक्कम रू.१३६४५/- भरणा दर्शविलेला आहे. तर पावतीच्या स्वीकृत रकमेत तफावत कशी येते याचा बोध होवू शकला नाही.

अशाच प्रकारे C००१९०५९, घर क्र.३-१२-१०, शहागंज या मालमत्तेच्या बाबत सुध्दा क्र.As/७०१६९, दिनांक ३१.३.२०१४ अन्वये पावतीची रक्कम रू.१३८६/- आणि स्वीकृत रक्कम रू.४०८/- दर्शविलेली आहे. या प्रकरणी रकमेचा भरणा रोख स्वरूपात केलेला आहे.

उपरोक्त दोन्ही प्रकरणी संगणकीय अभिलेख्यातील नोंदी नुसार पावती तयार करतांना भरणा रक्कम व स्वीकृत रकमेत तफावत येणे ही बाब भविष्यात मनपाचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

**विभागास संगणकीय अभिलेख्यांसंबंधी येत असलेल्या तफावतीबाबत लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ९ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड - क कार्यालयात विवाह नोंदणी केलेल्या प्रकरणात ज्ञापनासोबत प्रती प्रकरण घ्यावयाची रू.१५.०० फी घेतलेली नसल्याबाबत.**

महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम १९९९ कार्यपध्दती नमूद केलेली आहे. उक्त विनियमाच्या नियम -५ (२) प्रमाणे विवाह नोंदणीच्या ज्ञापनासोबत प्रती प्रकरण रू.१५.०० फी आकारण्याची तरतूद आहे. वॉर्ड - क कार्यालयाने सन २०१३-१४ या वर्षात एकूण ४८ इतके विवाह नोंदणी प्रकरणात रू.१५.०० प्रती प्रकरण फी आकारलेली नाही, त्यामुळे मनपाचे रक्कम रू.७२०.०० चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**विभागास रक्कम रू.७२०.०० मनपा फंडात भरणा करण्यात येवून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१० :बेबाकी प्रमाणपत्र वितरीत करण्यापूर्वी संबंधितांकडे नळ कनेक्शन नसल्याबाबत सक्षम प्राधिकरणाचा अभिप्राय न नोंदविलेल्या प्रकरणांबाबत.**

वॉर्ड कार्यालयाने सन २०१३-१४ या वर्षातील वितरीत केलेल्या परंतू लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यातील नाममात्र अभिलेखे तपासली असतांना बेबाकी प्रमाणपत्र वितरीत करण्यापूर्वी संबंधितांकडे असलेल्या करांचा भरणा केल्यानंतरच बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येत असते. तथापि सोबतच्या प्रमाणपत्रामध्ये संबंधित मालमत्ता धारकाकडे नळ नसल्याचा उल्लेख केलेला आहे. याबाबत सक्षम प्राधिकरणाचा अभिप्राय नोंदविलेला नाही.

**विभागास अर्धसमास पत्र क्र. १३ सोबत दिलेल्या यादीतील प्रकरणांबाबत खातरजमा करून संबंधितांकडे नळ नसल्याबाबत सक्षम प्राधिकरणाचा अभिप्राय घेण्यात यावा व तसा अभिप्राय लेखापरीक्षण विभागास सादर करण्यात यावा असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११ :दोन वेगवेगळ्या मालमत्ता असतांना एकच मालमत्ता दर्शवून महानगरपालिकेचे होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

मालमत्ता मागणी रजि.क्र.५०/१ पान क्रमांक ७१ वरील नोंद जुने रजिस्टर क्र.B/१ पान क्र.२०२,२०३ वरील नोंद नविन रजिस्टरमध्ये पान क्र.७१ वर नोंदविण्यात आली होती. याचा संगणकीय मालमत्ता क्र.C०० १५५७९ असा असून मालमत्तेचा पत्ता यशोधरा कॉलनी औरंगाबाद असा आहे. सदरील मालमत्तेचे करयोग्य मूल्य १७२८ असून कर आकारणी संदर्भ ९६७/६७७/२०९२/९०/९१, दिनांक १.४.१९९१ पासून दर्शविलेला आहे. नविन रजिस्टरमधील पान क्र.७१ हिच नोंद पान क्र.८० वर घेण्यात आल्याचा शेरा लिहिलेला आहे. पान क्र.८० तपासले असता त्यावरील मालमत्ता / भोगवटा धारकाचे नांव हे सारखेच आहे. परंतू मालमत्तेचा पत्ता वैशालीनगर, नेहरूनगर घ.क्र.४/११/८४/१०२२ असा दर्शविलेला आहे. पान क्र.८० वर जुने रजिस्टर क्र.९, पान क्र.१८४,१८५ असे दर्शवून जुने करयोग्य मूल्य ४५७५ व ३७८८ असे नोंदविलेले आहे. कर आकारणी संदर्भ ३७९८/६७७/२०९२/९०-९१, दिनांक १.४.८९ व दिनांक १.४.९१ असे नमूद केलेले आहे.

पान क्रमांक ७१ वरील नोंद पान क्र.८० वर घेण्यात आली असा शेरा देवून दिशाभूल करण्यात येत आहे. कारण पान क्र.७१ वरील मालमत्ता व पान क्र.८० वरील मालमत्ता भिन्न असून कर आकारणी संदर्भ व करयोग्य मूल्य या दोन्ही मध्येही भिन्नता आहे. तसेच संगणकीय अभिलेख्यात १७२८/- करयोग्य मूल्य दर्शवून संबंधितांकडे मालमत्ता कराची मागणी करण्यात येत आहे.

या दोन मालमत्ता वेगवेगळ्या असून सुध्दा संगणकीय अभिलेख्यात एकाच मालमत्तेची नोंद आहे. दुस-या मालमत्तेची नोंद संगणकीय अभिलेख्यात नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

उक्त दोन्ही मालमत्ता बाबतच्या नोंदी तपासून नविन मागणी रजिस्टरमध्ये दोन्ही नोंदीच्या थकबाकीसह चालू मागण्या नोंदवून संगणकीय अभिलेख्यात याबाबतची नोंद घेवून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती उक्त अनियमिततेबाबत अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२ :व्यावसायिक वापरास निवासी दराने पाणीपट्टी वसूली होत असल्याबाबत.**

पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र.२७ पान क्रमांक १०७ वर डॉ.एम.ए.माजेद (ॲपेक्स हॉस्पिटल) गादीया पार्क, नळखाते क्र.९१८६० नळाचा व्यास १/२" निवासी वापर व पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र. २७, पान क्र.१०९ डॉ.भावना संतोष टाकळकर (ॲपेक्स हॉस्पिटल) गादीया पार्क नळ खाते क्र.९१८६१, नळाचा व्यास १/२" निवासी वापर दर्शविलेला आहे. संबंधित मागणी रजिस्टरवर ॲपेक्स हॉस्पिटल असा उल्लेख असल्याने याचा वापर व्यावसायिक असल्याचे मागणी रजिस्टरच्या नोंदीवरून दिसून येते. प्रत्यक्षात संबंधितांना मंजूर केलेले नळ कनेक्शन हे निवासी आहे काय की व्यावसायिक याची खातरजमा करण्यासाठी संबंधित अभिलेखे उपलब्ध झालेले नाही.

प्रकरणांत प्रत्यक्ष तपासणी करून मंजूर केलेल्या नळ कनेक्शन बाबत आदेशानुसार नोंदी व वसूली योग्य असल्याची खातरजमा करून अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त प्रकरणी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असल्यास संबंधितांकडून रकमा वसूल कराव्यात. प्रकरणातील अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १३ : वॉर्ड - क कार्यालयातील मालमत्ता मागणी नोंदवहीत थकबाकीच्या रकमा नविन नोंदवहीत कमी दर्शविणे बाबत.**

मालमत्ता मागणी नोंदवह्या पैकी ६ मागणी नोंदवह्यातील जुन्या व नव्या रजिस्टरमधील नोंदी तपासण्यात आल्या. तपासण्यात आलेल्या मालमत्ता मागणी रजिस्टरचे क्रमांक व भाग पुढील प्रमाणे -

१.) १/१ फाजलपुरा
२) २५ औरंगाबाद टाईम्स कॉलनी
३) ११ जुना मोंढा
४) १६/१ बारी कॉलनी
५) १०/४ टाकळकर सोसायटी
६)५०/१ जिव्हेश्वर कॉलनी

मागणी रजिस्टर तपासतांना निदर्शनास आलेल्या त्रुटी खालील प्रमाणे -

१) मागणी रजिस्टरमध्ये रजिस्टरच्या सुरूवातीचे व शेवटची पाने फाटलेली आहेत. त्यामुळे त्यावर घेण्यात आलेल्या नोंदी नष्ट झालेल्या आहेत. पर्यायाने अशा नोंदी बद्यलची असलेली मागणी वसूल होत नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

२) जुनी मागणी नोंदवहीतील थकीत रक्कम नविन मागणी नोंदवहीत नोंदवितांना संबंधित कर्मचा-याने कमी मागणी नोंदविलेली आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३) मागणी रजिस्टरमध्ये नोंदी घेतांना रजिस्टरच्या प्रत्येक पानावर लिपिक व वॉर्ड ऑफिसर यांनी घेतलेल्या नोंदी योग्य असल्याबाबत साक्षांकन केलेले नाही.

४) मागणी रजिस्टरमध्ये नोंदी घेतलेल्या पानांची संख्या रजिस्टरच्या शेवटी प्रमाणपत्र देवून प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रमाणपत्र संबंधित अधिका-याने दिलेले नाही.

५) जुन्या मागणी नोंदवहीतील नोंदी नविन नोंदवहीत नोंदवितांना ब-याच प्रकरणांत नोंदी नविन रजिस्टरला नोंदविलेल्या नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

उपरोक्त त्रुटी संदर्भाने अर्धसमास पत्र क्र. १६ सोबत स्वतंत्र तपशिलाचा विवरण तक्ता देण्यात आलेला आहे. उपरोक्त मुद्यांबाबत संबंधितांना आदेशित करून थकबाकीच्या रकमा, सूटलेल्या नोंदी नविन रजिस्टरला नोंदविणे बाबत कार्यवाही व्हावी.तसेच रजिस्टरच्या मागील व पुढील पानांवरील नष्ट झालेल्या नोंदीचा तपास घेवून त्या नोंदी नविन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात याव्यात. तसेच उपरोक्त तपासण्यात आलेले रजिस्टर हे नाममात्र तपासलेलेअसून विभागातील इतर मागणी रजिस्टरमध्ये नोंदी तपासून नविन रजिस्टरला त्याच्या नोंदी योग्य असल्याबाबतची खातरजमा करून सर्व अभिलेखे अद्ययावत केल्याबाबतचे प्रमाणपत्रासह लेखापरीक्षण विभागास दर्शवावे असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने सदरील प्रकरणी महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र १४ : मालमत्ता मागणी नोंदवहीत मागणी नोंदविलेली नसणे, कर आकारणी संदर्भ व करयोग्य मूल्य न दर्शविणे इत्यादी अनियमिततेमुळे महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

मालमत्ता मागणी नोंदवही तपासात असे निदर्शनास आलेली आहे की, मागणी नोंदवहीत संबंधित मालमत्ता धारकाचे नाव नोंदविलेले आहे. परंतू संबंधित मालमत्तेचे करयोग्य मूल्य, कर आकारणी संदर्भ व वर्ष याबाबत नोंदी नाहीत. त्यामुळे संबंधितांकडे मालमत्ता कर किती थकीत आहे याची खात्री करता आलेली नाही. अशा नोंदी बाबतचा विवरण तक्ता अर्धसमास पत्र क्र.१७ सोबत देण्यात आलेला आहे. लेखापरीक्षणा दरम्यान असेही निदर्शनास आले की, जुन्या मागणी नोंदवहीतील काही नोंदी नविन मागणी रजिस्टरला नोंदविलेल्या नाहीत.

अर्धसमास पत्र क्र. १७ सोबत दिलेल्या  नोंदी या नाममात्र असून या सोबत वॉर्ड कार्यालयातील सर्व मागणी रजिस्टरवरील नोंदी (जुन्या व नव्या मागणी नोंदवहीतील नोंदी) तपासून योग्य असल्याबाबतची शहानिशा व खातरजमा करून आवश्यक तेथे दुरूस्त्या करून लेखा परीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने सदरील प्रकरणी महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत प्रशासकय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१५ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड - क कार्यालयातील प्रलंबित न वटलेल्या धनादेशाची रक्कम रू.३,४६,७०५/- वसूलीबाबत.**

लेखा शाखा आणि वॉर्ड कार्यालय - क यांचेकडून सन २०१३-१४ या वर्षातील प्रलंबित न वटलेल्या धनादेशा संदर्भाची माहिती प्राप्त झाली. प्राप्त माहिती नुसार वॉर्ड कार्यालयातील न वटलेल्या धनादेशाच्या नोंदी संबंधित मागणी नोंदवहीत पडताळण्यात आल्या. त्यापैकी काही मालमत्ता धारकाकडून न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल न करताच त्यांच्याकडील पुढील वर्षाची मागणी रक्कम वसूल केलेली दिसून आली. वास्तविक पाहता प्रथमतः संबंधितांकडून प्राप्त  झालेल्या परंतू न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल होणे अभिप्रेत आहे.

वॉर्ड कार्यालयातील प्रलंबित असलेल्या धनादेशाची रक्कम रू.३,४६,७०५/- संबंधितांकडे थकीत असून ती प्राधान्याने वसूल करणे क्रमप्राप्त आहे. लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, धनादेशाचा अनादर झाल्यानंतर संबंधितांविरूध्द Negotiable Instrument Act चे कलम (१३८) नुसार कार्यवाही केलेली नाही. अशा न वटलेल्या धनादेशाबाबतचा विवरण तक्ता अर्धसमास पत्र क्र.१८ सोबत देण्यात आलेला आहे.

**उपरोक्त प्रकरणांत धनादेशाचा अनादर केलेल्या संबंधित मालमत्ता धारकाकडून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र १६: वॉर्ड - क कार्यालयातील पाणीपट्टी मागणी नोंदवहीत थकबाकीच्या रकमा नविन नोंदवहीत कमी दर्शविणे बाबत.**

वॉर्ड -क कार्यालयातील मागणी नोंदवह्या पैकी ६ मागणी नोंदवह्यातील जुन्या व नव्या नोंदी तपासण्यात आल्या. तपासण्यात आलेल्या मागणी रजिस्टरमधील रजिस्टरचा क्रमांक व भाग पुढील प्रमाणे -

१) ६, गणेश कॉलनी
२) २७ बसैय्येनगर
३) ५/३ - मुजीब कॉलनी.
४) ७, इंदिरानगर
५) ७/९ जिव्हेश्वर कॉलनी.
६) २/1 कैसर कॉलनी

मागणी रजिस्टर तपासतांना निदर्शनास आलेल्या त्रुटी खालील प्रमाणे -

१) मागणी रजिस्टरमध्ये रजिस्टरची सुरूवातीचे व शेवटचे पाने फाटलेले आहेत. त्यामुळे त्यावर घेण्यात आलेल्या नोंदी नष्ट झालेल्या आहेत. पर्यायाने अशा नोंदीबद्यलची असलेली मागणी वसूल होत नसल्याने मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

२) जुनी मागणी नोंदवहीतील थकीत रक्कम नविन मागणी नोंदवहीत नोंदवितांना संबंधित कर्मचा-याने कमी मागणी नोंदविलेली आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३) मागणी रजिस्टरमध्ये नोंदी घेतांना रजिस्टरच्या प्रत्येक पानावर लिपिक व वॉर्ड ऑफिसर यांनी घेतलेल्या नोंदी योग्य असल्याबाबत साक्षांकन केलेले नाही.

४) मागणी रजिस्टरमध्ये नोंदी घेतलेल्या पानांची संख्या रजिस्टरच्या शेवटी प्रमाणपत्र देवून प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रमाणपत्र संबंधित अधिका-याने दिलेले नाही.

५) जुन्या मागणी नोंदवहीतील नोंदी नविन नोंदवहीत नोंदवितांना ब-याचशा प्रकरणांत नोंदी नविन रजिस्टरला नोंदविलेल्या नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

उपरोक्त त्रुटी संदर्भाने या अर्धसमास पत्र क्र.१९ सोबत स्वतंत्र तपशिलाचा विवरण तक्ता देण्यात आलेला आहे. उपरोक्त मुद्यांबाबत संबंधितांना आदेशित करून थकबाकीच्या रकमा, सुटलेल्या नोंदी, नविन रजिस्टरला नोंदविणे बाबत कार्यवाही व्हावी तसेच रजिस्टरच्या मागील व पुढील पानांवरील नष्ट झालेल्या नोंदीचा तपास घेवून त्या नोंदी नविन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात याव्यात. तसेच उपरोक्त तपासण्यात आलेले रजिस्टर हे नाममात्र तपासलेले असून विभागातील इतर मागणी रजिस्टरमध्ये नोंदी तपासून नविन रजिस्टरला त्याच्या नोंदी योग्य असल्याबाबत खातरजमा करून सर्व अभिलेखे अद्ययावत केल्याबाबतचे प्रमाणपत्रासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेल नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१७: वॉर्ड - क कार्यालयातील रजिस्टर क्र.जी-आर मध्ये मालमत्ता कराच्या थकबाकीच्या रकमा नविन नोंदवहीत कमी दर्शविणे बाबत.**

वॉर्ड -क कार्यालयातील शासकीय कार्यालय व व्यावसायिक मालमत्ता बाबतच्या नोंदी असलेले मागणी नोंदवही क्र. जी.आर. रजिस्टरच्या जुन्या व नव्या नोंदी नाममात्र तपासण्यात आलेल्या आहेत.

मागणी रजिस्टर तपासतांना निदर्शनास आलेल्या त्रुटी पुढील प्रमाणे -

१) मागणी रजिस्टरमध्ये रजिस्टरची सुरूवातीचे व शेवटचे पाने फाटलेले आहेत. त्यामुळे त्यावर घेण्यात आलेल्या नोंदी नष्ट झालेल्या आहेत. पर्यायाने अशा नोंदीबद्यलची असलेली मागणी वसूल होत नसल्याने मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

२) जुनी मागणी नोंदवहीतील थकीत रक्कम नविन मागणी नोंदवहीत नोंदवितांना संबंधित कर्मचा-याने कमी मागणी नोंदविलेली आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३) मागणी रजिस्टरमध्ये नोंदी घेतांना रजिस्टरच्या प्रत्येक पानावर लिपिक व वॉर्ड ऑफिसर यांनी घेतलेल्या नोंदी योग्य असल्याबाबत साक्षांकन केलेले नाही.

४) मागणी रजिस्टरमध्ये नोंदी घेतलेल्या पानांची संख्या रजिस्टरच्या शेवटी प्रमाणपत्र देवून प्रमाणित करणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारचे प्रमाणपत्र संबंधित अधिका-याने दिलेले नाही.

५) जुन्या मागणी नोंदवहीतील नोंदी नविन नोंदवहीत नोंदवितांना ब-याचशा प्रकरणांत नोंदी नविन रजिस्टरला नोंदविलेल्या नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

उपरोक्त त्रुटी संदर्भाने या अर्धसमास पत्र क्र. २० सोबत स्वतंत्र तपशिलाचा विवरण तक्ता जोडण्यात येत आहे. उपरोक्त मुद्यांबाबत संबंधितांना आदेशित करून थकबाकीच्या रकमा, सुटलेल्या नोंदी, नविन रजिस्टरला नोंदविणे बाबत कार्यवाही व्हावी तसेच रजिस्टरच्या मागील व पुढील पानांवरील नष्ट झालेल्या नोंदीचा तपास घेवून त्या नोंदी नविन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात याव्यात. तसेच उपरोक्त रजिस्टर मध्ये तपासण्यात आलेल्या नोंदी नाममात्र तपासलेल्या असून याच रजिस्टरमधील इतर नोंदी तपासून नविन रजिस्टरला त्याच्या नोंदी योग्य असल्याबाबत खातरजमा करून सर्व अभिलेखे अद्ययावत केल्याबाबतचे प्रमाणपत्रासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेल नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## वॉर्ड अभियंता
## वॉर्ड - क कार्यालय

**परिच्छेद क्र.:१ लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून न देणे बाबत.**

उक्त संदर्भिय कार्यालयीन आदेशान्वये वॉर्ड - क अभियंता कार्यालयाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत आहे. लेखापरीक्षणा दरम्यान खालील अभिलेख्यांची तात्काळ आवश्यकता आहे.

१. जड संग्रह नोंदवही.

२. स्टॉक रजिस्टर (१०९,११० व १११)

३. मत्ता (Assets) रजिस्टर.

४. ए-१ व रेटलिस्टच्या कामाच्या संचिका.

**विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत साशंकता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२ : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.५१ इंदिरानगर (द) ग.नं.३० व ३१ साठी कॉंक्रीट रस्ते तयार करणे.**
**(अं.प.रक्कम रू.९,९८,३८७/- (खर्च रक्कम रू.९,५९,०२३/-)**

वॉर्ड क्र.५१ इंदिरानगर (द) ग.नं.३० व ३१ साठी कॉंक्रीट रस्ते तयार करणेचे कामाकरीता ई-टेंडरिंग विभागा मार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या. त्यापैकी एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा सुबोध कन्स्ट्रक्शन यांची ०.०१% कमी दराची होती. निविदेस अंतीम मान्यता देण्यापूर्वी कंत्राटदारास वाटाघाटीस बोलावले असतांना ३% कमी दराने काम करण्यास संबंधितांनी सहमती दर्शविली.तथापि कार्यकारी अभियंता यांनीदिनांक ५.३.२०१३ रोजी दिलेल्या टिपणीनुसार एकच निविदा प्राप्त असल्याने सदरील कामाची निविदा दिनांक ८.४.२०१३ रोजी पुनश्च मागविण्यात आली. यावेळी दोन निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा २.१५% सुबोध कन्स्ट्रक्शन यांची होती. संबंधितांची निविदा अंतीमरित्या स्विकारण्यात आली. कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/३९५/२०१३, दिनांक १८.७.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील कामाची मुदत सहा महिने होती. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१ . दिनांक ६.२.२०१३ रोजी प्रथमत: निविदा मागविण्यता आली होती. त्यावेळी ३% कमी दराने संबंधित कंत्राटदाराने काम करण्यास सहमती दर्शविलेली होती. परंतू एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दिनांक ८.४.२०१३ रोजी निविदा मागविली. त्यात कमी दर २.१५% प्राप्त झाले. दुस-या वेळीही कमी दर पहिल्या वेळीच्या कंत्राटदारांचेच होते. परंतू त्यानंतर संबंधितांनी याच कामात ३% कमी दराने सहमती दर्शविली होती ही बाब विचारात घेतलेली नाही.

२. देयकाची रक्कम रू.९,५९,०२३/- मधून वजावटी कपात केल्यानंतरची रक्कम रू.८,१९,७११/- येते. देयकात रू.८,२९,७११/- दर्शविलेली आहे. म्हणजेच रक्कम रू.१०,०००/- जास्तीचे दर्शवून कंत्राटदारास अदा केले असल्याचे निदर्शनास येते. जास्तीची अदा रक्कम रू.१०,०००/- वसूलीस पात्र आहे.

३. निविदा नियमावली अट क्र.३८ नुसार ॲटमनिहाय परिमाणात २५% वाढ अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा परिमाणे वाढलेली आहेत. त्यावर झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये.

| अ.क्र. | तपशील | देयकातील परिमाण / रक्कम | अं.प.तील परिमाण / रक्कम | परिमाणातील वाढ | फरक परिमाण व रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Raising to exist MH chamber<br>दर रू.८७२/- | २५<br>२१८०० | १६<br>१३९५२ | ५६% | ९<br>७८४८ |
| २ | Fixing of SFRC to MH chamber<br>दर रू.४१५/- | २५<br>१०३७५ | १६<br>६६४० | ५६% | ९<br>३७३५ |
| ६ | P/L in Situ c.c.१:४:८ of trap quartesize metal in all<br>दर रू.२९३८.८६ | ११९.६११<br>३,५१,५२० | ७९.१२<br>२३२५२२.६० | ५१% | ४०.४९१<br>११८९९७ |
| | | | | एकूण रक्कम रू. | १,३०,५८०/- |

४. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्र.४०५६ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नसल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

५. कंत्राटी कामाचा विमा कालावधी दिनांक १६.१.२०१४ ते १५.७.२०१४ पर्यतचा आहे. कंत्राटी काम झाल्यानंतरच्या कालावधीचा विमा उतरविल्यामुळे विमा काढल्याचा हेतू सफल होत नाही.

६. कामाचे शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

७. कंत्राटदाराची करारनाम्यावर स्वाक्षरी नाही.

**उपरोक्त मुद्यांबाबत आपल्या स्तरावर तपासणी करावी. मनपाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३ : वॉर्ड क्र. २८, टाईम्स कॉलनी येथे श्री.सय्यद अख्तर यांचे घरापासून टाईम्स न्युज पेपर ऑफिस पर्यंत इटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४,९९,४६५/- (खर्च रक्कम रू.३,९८,३८६/-)**

प्राप्त अभिलेख्यानुसार वॉर्ड क्र.२८ टाईम्स कॉलनी येथे श्री.सय्यद अख्तर यांचे घरापासून ते टाईम्स न्यूज पेपर ऑफिसपर्यंत इटालियन पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाकरीता ई-निविदा मागविण्यात आल्या असतांना एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी श्री.मुजीब ऊर रहेमान एम.खान मेहमुद खान यांची १८.०३% कमी दराची निविदा मान्य करून जा.क्र.मनपा/वॉर्ड-इंजि-क/३७२/२०१४, दिनांक ४.३.२०१४ अन्वये ६ महिन्याच्या मुदतीत सदर काम करण्याचे आदेश देण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक ४३३२ तपासणीस उपलब्ध झाली नाही. परिणामी संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. Shedule - B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

३. सदरील काम करण्यासाठीची add FSD ही काम सुरू होण्यापूर्वी मनपा फंडात जमा करून घेणे बंधनकारक आहे. परंतू सदर रक्कम देयकातून Add FSD ५% रक्कम १९,९१९/- कपात केली आहे. त्यामुळे अनामत रक्कम जमा करून घेण्याचा उद्येश सफल झालेला नाही. त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे तात्पुरते नुकसान झालेले आहे.

४. निविदा पुस्तिका अट क्र.३८ प्रमाणे देयकातील ॲटममध्ये २५% वाढ ॲटम निहाय अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा जास्त वाढ झालेली असतांनाही त्याला सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली नाही. करिता सदरची रक्कम का अमान्य करण्यात येवू नये ?

वाढीव ॲटमचा तपशिल खालील प्रमाणे -

| अ.क्र. | तपशिल | देयकातील परिमाण / रक्कम | अंदाजपत्रकातील परिमाण / रक्कम | परिमाणातील वाढ | फरक परिमाण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| १ | Breaking & Eeroving the onisting bitumen pavement<br>दर रक्कम रू.५२५/- | ६७.८५६<br>३५६२४ | ४७.६०<br>२४९९० | ४२.५५% | २०.२५६<br>१०६ |
| २ | Encavertion for road way in earth soil<br>दर रक्कम रू.९४.५०/- | ६७.८५६<br>६४१२ | ५०.४८<br>४७७०.३६ | ३४% | १७.३७६<br>१६४२ |
| ३ | Canveying material obtaineal from road cutting<br>दर रक्कम रू.१३२.०५/- | १३५.७१२<br>१७९२१ | ९८.०८<br>१२९५१.४६ | ३८% | ३७.६३२<br>४९६९.५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | Providing & supplying ८० mm size trapmetal etc दर रक्कम रू.६१८.५८/- | ६६.५०६<br>४११३९ | ४७.६०<br>२९४४४.४१ | ३९.७१% | १८.९०६<br>११६९४.५९ |
| | | | | **एकूण खर्च रक्कम रू.** | **२८९४०.१९** |

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४ : प्रभाग क्र.५१, इंदिरानगर (द) विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे. (अं.प.रक्कम रू.४,९८,८००/-)(खर्च रक्कम रू.४,७३,०२०/-)**

प्राप्त अभिलेख्यानुसार वॉर्ड - क्र. ५१, इंदिरानगर (द) विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन अप्रुटींग करण्याच्या कामाकरीता - ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ०१ निविदा विक्री झाली तर निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ०१ निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदांपैकी सुबोध कन्स्ट्रक्शन २.२% या कंत्राटदाराची निविदा सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराची प्राप्त झाली. संबंधित कंत्राटदारास वाटाघाटी करीता बोलावले असता सदरील काम २.२% कमी दराने करण्यास संबंधितांनी संमती दिली कार्यालयाने निविदा स्विकृत करून ठेकेदारास ५% इसारा रक्कम व मनपा सोबत करारनामा करण्याकरीता कळविण्यात आले. संबंधितांनी करारनामा केल्यानंतर व ५% अनामत रक्कम भरल्यानंतर कार्यालयाने कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड/अभि/वॉर्डक/९९४/१४, अन्वये कार्यादेश दिनांक २१.१.२०१४ निर्गमित केले. कार्यादेशात सदरील कामाची मुदत ५ महिने नमूद करण्यात आलेली आहे. सदरील काम दिनांक १७.२.२०१४ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहेत. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. B१ निविदा पुस्तिका अटी शर्तीतील अट क्र.५४ अन्वये कंत्राटी कामाचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. परंतू कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम रूपये ४९८८/- कपात करून काम झाल्यानंतर कपात केल्यामुळे शासनाचा विमा काढण्यामागचा हेतू सफल होत नाही.

२. सदरील कामाचे शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

३. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तिका ४०६९ उपलब्ध करून न दिल्याने लेखापरीक्षण पथकास संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

४. निविदा पुस्तिकेतील अट क्र.३८ अन्वये ॲटम निहाय २५% पर्यंत कामात वाढ अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा जास्तीची वाढ झालेली आहे. जास्तीच्या वाढलेल्या

परिमाणाबाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नसल्याने असा खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचाही खुलासा व्हावा. ॲटमच्या परिमाणात झालेल्या वाढीचा तपशिल पुढील प्रमाणे -

| **अ.क्र.** | **तपशील** | **देयकातील परिमाण** | **अं.प.परिमाण/ रक्कम** | **परिमाणातील वाढ** | **फरक परिमाण रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १ | Ex.for trenchers insail<br>दर रू.१३२=०० | ३५९.८९<br>४७५०५ | २४७.५०<br>३२६७० | ४५% | ११२.३९<br>१४८३५ |
| २ | Ex.for trenches in B.m.road<br>दर रू.१६५ =०० | ९१.६१<br>१५११६ | ३३.७५<br>५५६८ | १९५% | ५७.८६<br>९५४८ |
| ४ | Removing exist २५० Rcc Pipeline<br>दर रू.४४ = ६५ | ४५९.६५<br>२०५२३ | ३००<br>१३३९५ | ५३% | १५९.६५<br>७१२८ |
| ५ | P/s of २५० mm swg.Pipe line<br>दर रू.२५० = ०० | ४५९.६५<br>११४९१३ | ३००<br>७५००० | ५३% | १५९.६५<br>३९९१३ |
| ६ | L/L/J of २५० mm, Swg pipe line<br>दर रू.१४९ =०० | ४५९.६५<br>६८५३४ | ३००<br>४४७३० | ५३% | १५९.६५<br>२३८०४ |
| १२ | Refilling the trench<br>दर रू.५८ =८० | ४२८.९५<br>२५२२२ | ३०३.७५<br>१७८६० | ४१% | १२५.२०<br>७३६२ |
| | | | | **एकूण रक्कम रू.** | **१०२५९०/-** |

५. ॲटम क्र.१ व २ चे परिमाण ४५१.५५ येते. ॲटम क्र.१२ चे परिमाण ४२८.९५ वजा जाता उर्वरीत परिमाण २२.५५ शिल्लक राहीले. परंतू ॲटम क्र.१३ अन्वये ७०.८७ परिमाणाचे देयक अदा केले आहे. जेव्हा की,२२.५५ परिमाणाचे देयक अदा करणे आवश्यक होते. ४८.३२ परिमाणाचे जादा देयक अदा करून रू.८१२७=०० खर्च जास्तीचा तसेच नियमबाह्य आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा करणेत यावा. तसेच मनपाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.५ : प्रभाग क्र.४६, अल्तमश कॉलनी येथे श्री.असीमभाई यांच्या गल्लीत ड्रेनेज लाईन अप्रुटींग करणे. (अं.प.रक्कम रू.४,९९,३५४/-)(खर्च रक्कम रू.४,४८,६३८/-)**

प्राप्त अभिलेख्यानुसार वॉर्ड क्र.४६ अल्तमश कॉलनी येथे श्री.अझीमभाई यांच्या गल्लीत ड्रेनेज लाईन अप्रुटींग करण्याच्या कामाकरीता ई-निविदा मागविण्यात आली असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी लोकसेवा सुशिक्षित रोजगार सेवा सहकारी संस्था यांची कमी दराची म्हणजेच ९.९९% निविदा मान्य करून संबंधितास जा.क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/४६९/१३, दिनांक २०.७.२०१३ अन्वये कार्यादेश देवून ३ महिने कामाचा कालावधी निश्चित करण्यात आला. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क यांच्या स्वाक्षरीने संबंधित कंत्राटदार यांना काम करण्यासंबंधीचा कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/४६९/१३, दिनांक २०.७.२०१३ अन्वये देण्यात आला. संबंधित कार्यादेशात विषयच नोंदविलेला नाही. करिता सदरील कामाचा कार्यादेश कोणत्या कामाच्या संदर्भात दिलेला आहे. याचा बोध होत नाही.

२. B१ निविदा पुस्तिका अटी व शर्तीतील अट क्र.५४ अन्वये कंत्राटी कामाचा विमा काम सुरु होण्यापूर्वी काढणे आवश्यक असते. परंतू सदरचे काम दिनांक १९.८.२०१३ रोजी पूर्ण झालेले आहे व विम्याचा कालावधी १८.९.१३ ते १७.१२.१३ काम पूर्ण झाल्यानंतरचा आहे. त्यामुळे विमा काढण्या मागचा हेतू सफल होत नाही.

३. सदरील कामाची ScheduleB ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

४. मोजमाप पुस्तिका २४३३ उपलब्ध करुन न दिल्याने लेखापरीक्षण पथकास संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

५. निविदा पुस्तिकेतील अट क्र.३८ अन्वये ॲटम निहाय २५% पर्यंत कामात वाढ अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा जास्तीची वाढ झालेली आहे. जास्तीच्या वाढलेल्या परिमाणाबाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नसल्याने असा खर्च का अमान्य करण्यात येवू नये याचाही खुलासा व्हावा. ॲटमच्या परिमाणात झालेल्या वाढीचा तपशिल पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | तपशील | देयकातील परिमाण रक्कम रू. | अं.प.परिमाण/ रक्कम रू. | परिमाणातील वाढ | फरक परिमाण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २ | Ex for Trenches in WBM road<br>दर रक्कम रू.१६५.०० | ८२.२७<br>१३५७५ | ६०.७५<br>१००२३.७५ | ३५% | २१.५२<br>३५५१.२५ |
| ३ | eX for Trenches in SR/old cc road<br>दर रक्कम रू.४६२.०० | ५४.८५<br>२५३४१ | ४०.५०<br>१८७११ | ३५% | १४.३५<br>६६३० |
| ४ | Remo os Exist २५०mm Rcc Pipe<br>दर रक्कम रू.४४.६५ | ३६५.७०<br>१६३२९ | २७०.००<br>१२०५५ | ३५% | ९५.७<br>४२७४ |
| ५ | Plsupp of २५० mmSwg Pipe Line<br>दर रक्कम रू.२५०.०० | ३६५.७०<br>९१४२५ | २७०.००<br>६७५०० | ३५% | ९५.७<br>२३९२५ |
| ६ | L/L/J०९ २५०mm Swg pipe Line<br>दर रक्कम रू.१४९.१० | ३६५.७०<br>५४५२६ | २७०.००<br>४०२५७ | ३५% | ९५.७<br>१४२६९ |
| | | | | एकूण रक्कम रू. | ५२६४९.२५ |

५. ॲटम क्र.१,२,३ चे परिमाण ३११.१८ येते. ॲटम क्र.१२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे परिमाण पुर्नभरणा बाबतचे आहे. त्याचे देयक अदा केल्यानंतरही पुनश्च ॲटम क्र.१३ मध्ये surplus material दर्शवून ॲटम क्र. -१३ अन्वये ८९.९७ परिमाणाचे जादा देयक अदा करुन रू.१५,१३२=०० खर्च जास्तीचा तसेच नियमबाह्य आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अहवाल सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.६ : वॉर्ड क्र.४१, शहाबाजार येथील ओहनेवाली गल्लीत ड्रेनेज लाईन बदलणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४,९९,३८२/-)(खर्च रक्कम रू.४,९१,७२७/-)**

वॉर्ड क्र.४१, शहाबाजार ओहनेवाली गल्लीत ड्रेनेजलाईन बदलण्याबाबतची संचिका तपासण्यात आली. सदरील कामासाठी ४,९९,३८२/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. ई-निविदा विभागामार्फत कामाच्या निविदा मागविल्या असता २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी १ निविदा तांत्रिक दृष्ट्या अमान्य करण्यात आली. उर्वरीत १ निविदा ०.१% कमी दराची प्राप्त झाली. प्राप्त निविदा अमन असोसिएट यांची होती. संबंधितांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी १.५०% कमी दराने काम करण्यास सहमती दर्शविली. त्यानुसार मा.आयुक्त यांनी सदरील कामाची निविदा व एजन्सीस मान्यता दिली. संबंधितांनी महानगरपालिकेसोबत करारनामा केल्या नंतर त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/९७४/२०१४, दिनांक १७.१.२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील कामाची मुदत ५ महिने ठेवण्यात आली. सदरील काम दिनांक ३१.३.२०१४ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत जोडले आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता लेखापरीक्षणाच्या दृष्टीकोनातून खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा दिनांक २९.११.२०१३ रोजी उघडतांना अहेमद काझी बाबर काझी यांची निविदा तांत्रिकदृष्ट्या अमान्य करतांना त्यांनी DD सोबत जोडलेला नाही असे कारण दर्शविलेले आहे. निविदा उघडण्याच्या सविस्तर माहितीच्या कागदावर संबंधिताचा DD No, Bank Name, DD च्या मुदतीबाबतचा उल्लेख असूनही DD सोबत जोडला नाही असे निविदा उघडतांना नमूद करणे ही बाब संयुक्तिक वाटत नाही.

२. सदरील काम करण्या संबंधाने स.सदस्यांनी काम करण्याबाबतची आवश्यकता व विनंती बाबतचे पत्र उपअभियंता वॉर्ड - क यांचे नावे देतांना दिनांकाचा उल्लेख केलेला नाही. तसेच वॉर्ड अभियंता कार्यालयाने स.सदस्यांचे पत्र कार्यालयीन आवक दस्तऐवजात नोंदविलेले नाही.

३. Shedule -B ची प्रत संचिकेत जोडली नाही.

४. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४३३० लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करुन दिली नसल्याने संपूर्ण लेखापरीक्षण करता आले नाही.

५. कंत्राटी कामाचा विमा रक्कम देयकातून कपात केलेली आहे. तथापि काम सुरु करण्यापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविणे क्रमप्राप्त आहे. केवळ देयकातून विम्याची रक्कम कपात केल्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू साध्य होत नाही.

६. B१ निविदेतील अटी व शर्तीनुसार Clause -३८ प्रमाणे Item निहाय कामाच्या परिमाणात २५% पर्यंतची वाढ अनुज्ञेय आहे. तथापि खालील Item मध्ये झालेल्या वाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. करिता झालेला खर्च का अमान्य करण्यात येवू नये. विवरण पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | तपशिल | देयकातील परिमाण रक्कम रू. | अंदाजपत्रकातील परिमाण रक्कम | परिमाणातील वाढ | फरक परिमाण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०६ | Providing & Constructing Circular Mainhole chamber दर र. रू.८२३८/- | २८ २१२९७९ | १८ १४८२८४ | ५५% | १० ६४६९५ |
| ०७ | Providing SFRC Frame & Cover दर र. रू.२०२३/- | ३६ ७२८२८ | १८ ३६४१४ | १००% | १८ ३६४१४ |
| | | | | एकूण फरक रक्कम रू. | १०११०९/- |

७. Item, क्रमांक ०६ नुसार २८ main holechamber तयार करण्यात आले. देयकात Item क्रमांक ०७ नुसार ३६ SFRC Frame व Cover पुरवठा करण्याबाबत देयक अदा करण्यात आलेले आहेत. जर २८ chamber तयार केले तर त्या chamber साठी लागणारे Frame व cover २८ च बसविलेले असावेत. परंतू देयक अदा करतांना देयकात ८ Frame व Cover चे प्रति Cover २०२३/- प्रमाणे १६,१८४/- रू. जास्तीचे अदा करून महानगरपलिकेचे नुकसान झालेले आहे. जे की, वसूलीस पात्र आहे.

**मुद्या क्र.१ ते ७ बाबत आपल्या स्तरावर संचिकेची सविस्तर शहानिशा व खातरजमा करून महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून सविस्तर खुलाशासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.७ : प्रभाग क्र.४१, शहाबाजार अशोकनगर तसेच बदामगल्ली ते मुख्य लाईन पर्यंत ३००mm swg लाईन टाकणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४,९९,८९५/-) (खर्च रक्कम रू.४,७४,३७६/-)**

प्राप्त अभिलेख्यानुसार वॉर्ड क्र.-४१ शहाबाजार अशोकनगर तसेच बदामगल्ली ते मुख्य लाईन पर्यंत ३००mm swg लाईन टाकणे बाबतच्या कामाकरीता ई - निविदा विभागा मार्फत निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत दोन निविदा विक्री झाल्या. तर निविदा

स्विकृतीच्या तारखेपर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी अहेमद काझी बाबर  काझी या कंत्राटदाराची निविदा सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराची प्राप्त झाली. संबंधित कंत्राटदारास वाटाघाटी करीता बोलावले असता सदरील काम ५% कमी दराने करण्यास संबंधितांनी संमती दिली. कार्यालयातर्फे निविदा स्विकृत करून ठेकेदारास २% इसारा रक्कम व मनपा सोबत करारनामा करण्याकरीता कळविण्यात आले. संबंधितांनी करारनामा केल्यानंतर व २% अनामत रक्कम भरल्यानंतर कार्यालयाने कार्यालयीन पत्र मनपा वॉर्ड अभियंता/वॉर्ड-क/५०९/२०१३, अन्वये कार्यादेश निर्गमित केले. कार्यादेशात सदरील कामाची मुदत ५ महिने नमूद करण्यात आलेली आहे. सदरील काम दिनांक १७.९.२०१३ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. B१ निविदा पुस्तिका अटी शर्तीतील अट क्र.५४ अन्वये कंत्राटी कामाचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. परंतू कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकातून १% रक्कम रूपये ४७४४/- कपात न केल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. सदरील कामाचे शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

३. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तिका क्र.३०७३ उपलब्ध करून न दिल्याने लेखापरीक्षण पथकास संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

४. निविदा पुस्तिकेतील अट क्र.३८ अन्वये ॲटम निहाय २५% पर्यंत कामात वाढ अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा जास्तीची वाढ झालेली आहे. जास्तीच्या वाढलेल्या परिमाणाबाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नसल्याने असा खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचाही खुलासा व्हावा. ॲटमच्या परिमाणात झालेल्या वाढीचा तपशील पुढील प्रमाणे -

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशिल | देयकातील परिमाण/ रक्कम रु. | अंदाजपत्रकातील परिमाण / रक्कम | परिमाणातील वाढ | फरक परिमाण व रक्कम . |
|---|---|---|---|---|---|
| ६ | PRO and constrg.main hole chamber रू.८२३८=०० | २६<br>१,९७,८६७/- | १९<br>१,५६,५२२/- | ३७% | ०७<br>४१,३४५ |
| ८ | Rasingthe Existing manhole chamber ८७२/- | ७<br>६१०४ | ५<br>४३६० | ४०% | २<br>१७४४ |
| ९ | PRO and Repairing to Existing Manehole chamber | ७<br>४८८६ | ४<br>२७९२ | ७५% | ३<br>२०९४ |
| १० | Fixing of SFRC Farme रू.४१५ | ७<br>२९०५ | ४<br>१६६० | ७५% | ३<br>१२४५ |
| | | | | **एकूण रक्कम रू.** | **४६,४२८/-** |

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा तसेच झालेले आर्थिक नुकसान संबंधित विभागात भरणा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेदक्र.८ : वॉर्ड क्र.५४ बायजीपुरा गोधडीपुरा स्लम येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४,९९,०१५/- (खर्च रक्कम रू.४,८५,१९५/-)**

वॉर्ड क्र.५४ बायजीपुरा, गोधडीपुरा स्लम येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणेचे कामाकरीता ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या.निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा एशियन कन्स्ट्रक्शन यांची १५.७६% कमी दराची होती. कंत्राटदाराने महानगरपालिका औरंगाबाद यांच्यासोबत करार केल्यानंतर कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/वॉर्ड इंजि-क/७८८/१३, दिनांक २०.११.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील कामाची मुदत पाच महिने होती. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. देयकाची रक्कम रू.५,०३,३०७/- मधून वजावटी कपात केल्यानंतरची रक्कम रू.४,२३,४४५/- येते. देयकात रू.४,४१,५६५=०० दर्शविलेली आहे. म्हणजेच रू.१८,१२०=०० इतकी जास्तीचे दर्शवून कंत्राटदारास अदा केली असल्याचे निदर्शनास येते. जास्तीची अदा रक्कम रू.१८,१२०/- वसूलीस पात्र.

२. निविदा नियमावली अट क्र.३८ नुसार ॲटम निहाय परिमाणात २५% वाढ अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटममध्ये त्यापेक्षा परिमाणे वाढलेली आहेत. त्यावर झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये.

| अ.क्र. | तपशिल | देयकातील परिमाण / रक्कम | अंदाजपत्रकातील परिमाण / रक्कम | परिमाणातील वाढ | फरक परिमाण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ६ | Conveying material optic for cutting in alletccomp.<br>दर रक्कम रू.१३२.०५ | १६१.०१<br>२१,२६१=०० | ११९.०१<br>१५७१५.२७ | ३५% | ४२<br>५५४६ |
| | | | | **एकूण रक्कम रू.** | **५५४६/-** |

३. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका २०४९ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नसल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

४. कंत्राटी कामाचा विमा कालावधी दिनांक ५.३.२०१४ ते ४.८.२०१४ पर्यंतचा आहे. सदरील काम दिनांक २५.२.२०१४ रोजी पूर्ण झाले असल्याचा रिपोर्ट संचिकेत आहे. विमा काढल्याचा दिनांक त्यानंतरच्या कालावधीचा असल्याकारणाने विमा काढण्यामागचा उद्येश सफल होत नाही.

५. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम FDR द्वारे स्विकारले आहे. तथापि FDR ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही किंवा संबंधितांना परत केल्याबाबतचा टिप्पणीमध्ये उल्लेख नाही.

६. तसेच अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रू.२५,१६५/- देयकातून कपात केलेली आहे. कार्यादेश देण्यापूर्वीच अतिरिक्त सुरक्षा ठेव महानगरपालिकेत ठेवणे क्रमप्राप्त होते. तथापि सदरील रक्कम देयकातून कपात करण्यात आलेली आहे. काम झाल्यानंतर अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम स्विकारल्यामुळे ज्यासाठी अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम ठेवण्यात येते याचा उद्येश या प्रकरणी सफल झालेला नाही. तसेच महानगरपालिकेचे तात्पुरते नुकसान झालेले आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा तसेच झालेले आर्थिक नुकसान संबंधित विभागात भरणा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.९ : वॉर्ड क्र.५२ इंदिरानगर गल्ली क्र.२० पाच फुटांची गल्लीत ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे.(अं.प.रक्कम रू.२,४९,९५७/-)(खर्च रक्कम रू.२,१०,७८१/-)**

वॉर्ड क्र.५२ इंदिरानगर गल्ली क्र.२० पाच फुटांची गल्लीत ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणेचे कामाकरीता ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी १५.५% कमी दराची श्री.अमन कन्स्ट्रक्शन यांची निविदा होती. कंत्राटदाराने महानगरपालिका औरंगाबाद यांच्या सोबत करार केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/२११/१३, दिनांक ४.६.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील कामाची मुदत दोन महिने होती.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका २४३३ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा हा सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून B१ निविदा पुस्तिका कलम ५४ नुसार काम सुरु होण्यापूर्वी काढणे आवश्यक असते. परंतू सदरील कामाचा विमा उतरविलेला नाही. त्यामुळे विमा काढण्यामागचा हेतू सफल झालेला नाही व शासनाचेही नुकसान झालेले आहे. करीता सदरील १% रक्कम वसूलीस पात्र.

३. ॲटम क्र.१,२ व ३ चे परिमाण १७०.५७ येते. ॲटम क्र.१२ नुसार तेवढयाच परिमाणाचा पुर्नभरणा केलेला दिसून येतो. असे असतांना ॲटम क्र.१३ नुसार ९१.८८ ची रक्कम रू.१३,७७१/- अदा करण्यात आलेली आहे. सदरील जास्तीचा झालेला खर्च नियमबाह्य असून वसूलीस पात्र आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१०: प्रभाग क्र.४६, रहिमनगर व इतर गल्ल्यांमध्ये ड्रेनेजलाईन अप्रुटींग / दुरूस्ती करणे. (अं.प.रक्कम रू.४,९९,१४१/- खर्च रू.४,५०,५९०/-)**

प्राप्त अभिलेख्यानुसार वॉर्ड क्र.४६ रहिमनगर व इतर गल्ल्यांमध्ये ड्रेनेज लाईन अप्रुटींग / दुरूस्ती करण्याच्या कामाकरीता ई - निविदा विभागामार्फत निविदा मागविल्या असता निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सहकारी संस्था यांचे ९.६६% कमी दराने मान्य करुन संबंधितास जा.क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/४६८/१३, दिनांक २०.७.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आला. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कार्यकारी अभियंता वॉर्ड ब व क यांच्या स्वाक्षरीने संबंधित कंत्राटदार यांना काम करण्या संबंधीचा कार्यालयीन कार्यादेश दिनांक २०.७.२०१३ रोजी जा.क्र.मनपा/वॉर्ड इंजिक/४६८/१३, देण्यात आला. त्यात काम पूर्ण करण्यासंबंधी विहित मुदत नोंदविलेली नाही. ही बाब गंभीर आहे.

२. B१ निविदा पुस्तिका अटी शर्तीतील अट क्र.५४ अन्वये कंत्राटी कामाचा विमा काम सुरु होण्यापूर्वी उतरविणे बंधनकारक आहे. परंतू कंत्राटी कामाचा विमा काम सुरू होण्यापूर्वी न उतरविता देयकातून रक्कम वजा करण्यात आलेली आहे. त्यामुळे विमा उतरविण्यामागचा हेतू सफल होत नाही.

३. सदरील कामाची Schedule -B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

४. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तिका २८५५ उपलब्ध करुन न दिल्याने लेखापरीक्षण पथकास संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

५. सदरील काम करण्यासंबंधी स.सदस्यांनी काम करण्याबाबतची आवश्यकता व विनंती बाबतचे पत्र उप-अभियंता वॉर्ड - क यांचे नावे देतांना दिनांकाचा उल्लेख केलेला नाही. तसेच वॉर्ड अभियंता कार्यालयाने स.सदस्यांचे पत्र कार्यालयीन आवक दस्तऐवजात नोंदविलेले नाही.

६. ॲटम क्र.१,२ व ॲटम क्र.३ चे परिमाण ३३०.५९ येते. ॲटम क्र.१२ चे परिमाण ३३०.५९ वजा जाता परिमाण शिल्लक उरत नाही. परंतू ॲटम क्र.१३ अन्वये ७१.६९ परिमाणाचे देयक रक्कम रू.१२०५८/- जादा देयक अदा करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहे. जे की नियमबाह्य आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११: वॉर्ड क्र.४० मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४,९८,१९२/-)(खर्च रक्कम रू.४,९७,९९५/-)**

वॉर्ड क्र.४० मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,९८,१९२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. ई -निविदा विभागामार्फत संबंधित कामाची बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या तुलनात्मक दृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा सर्वात कमी दराची ०.०७% श्री.राणा कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त झाली. त्यास मा.शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या मंजूरीअन्वये संबंधित ठेकेदारास २% अनामत रक्कम व करारनाम्याची पूर्तता करण्यासाठी पत्र देण्यात आले. संबंधित ठेकेदारास जा.क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क /१५६/२०१३, दिनांक ४.५.२०१३ अन्वये कार्यादेश व दिलेल्या कामाची मुदत तीन महिने देण्यात आली. संबंधित काम दिलेल्या कालावधीत दिनांक १४.६.२०१३ रोजी संपल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेतील १००/- रू. च्या मुद्रांकावर करारनाम्याची पूर्तता केली आहे. त्यावर संबंधित ठेकेदार यांची स्वाक्षरी नसतांना त्यास कार्यादेश देवून बिल अदा करण्यात आले.

२. B१ निविदा पुस्तिका अटी शर्तीतील अट क्र.५४ अन्वये कंत्राटी कामाचा विमा काम सुरू होण्यापूर्वी उतरविणे बंधनकारक आहे. परंतू कंत्राटी कामाचा विमा काम सुरू होण्यापूर्वी न उतरविलेला नाही. तसेच देयकातूनही रक्कम रू.४९८१/- कपात करण्यात आलेली नाही. तरी संबंधितांकडून विम्याची रक्कम वसूल करून शासनाकडे जमा करण्यात यावी.

३. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्र.२७२६ तपासणीस उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

**विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत शहानिशा करून तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२: वॉर्ड क्र.५१ येथे गल्ली क्र.२९ येथे उर्वरीत सिमेंट रस्ता तयार करणे.**
**(अंदाजपत्रकीय रक्कम रू.९,९९,५८८/-)( खर्च रक्कम रूपये १०,२१,२०७/-)**

प्राप्त अभिलेख्यानुसार वॉर्ड क्र.५१ येथे गल्ली क्र.२९ येथे उर्वरीत सिमेंट रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सुबोध कन्स्ट्रक्शन यांची २.२ कमी दराची निविदा मान्य करून त्यांना जा.क्र.मनपा/वॉर्ड -क/९९८/१४, दिनांक २३.१.२०१४ च्या आदेशान्वये काम करण्यासंबंधी आदेशित करण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील काम करण्यासंबंधी स.सदस्यांनी काम करण्याबाबतची आवश्यकता व विनंती बाबतचे पत्र उप-अभियंता वॉर्ड - क यांचे नांवे देतांना दिनांकाचा उल्लेख केलेला

नाही. तसेच वॉर्ड अभियंता कार्यालयाने स.सदस्यांचे पत्र कार्यालयीन दस्तऐवजात नोंदविलेले नाही.

२. सदरील कामाची schedule - B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

३. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४०५६ लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

४. B१ निविदा पुस्तिका अटी व शर्तीतील अट क्र.५४ अन्वये कंत्राटी कामाचा विमा काम सुरू होण्यापूर्वी उतरविणे बंधनकारक आहे. परंतू लेखाशाखेच्या तपासणी अहवालात विमापत्र / विमा कपात रक्कम देयकातून कपात असा उल्लेख आहे. संचिका तपासली असता सदरील कामाच्या संदर्भाचे विमापत्रही संचिकेत आढळून आले नाही व विमा रक्कम ही देयकातून कपात केलेली नाही.

५. निविदा पुस्तिका अट क्र.३८ प्रमाणे देयकातील ॲटममध्ये २५% वाढ ॲटमनिहाय अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटममध्ये त्यापेक्षा जास्त वाढ झालेली असतांनाही त्याला सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली नाही. करिता सदरची रक्कम का अमान्य करण्यात येवू नये.

वाढीव ॲटमचा तपशिल पुढील प्रमाणे -

| **अ.क्र.** | **तपशील** | **देयकातील परिमाण / रक्कम** | **अंदाजपत्रकातील परिमाण / रक्कम** | **परिमणातील वाढ** | **फरक परिमाण रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | Raising to Erist MH chamber दर रक्कम रू.८७२/- | १९<br>१६५६८ | १४<br>१२२०८ | ३५% | ५<br>४३६० |
| ०३ | Fixing of SFRC to MH chamber दर रक्कम रू.४१५/- | १९<br>७८८५ | १४<br>५८१० | ३५% | ५<br>२०७५ |
| | | | | **एकूण खर्च रक्कम रू.** | **६४३५ = ००** |

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा करण्यात यावा. तसेच महानगरपालिकेचे झ ाालेले आर्थिक नुकसान संबंधीतांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र १३.: सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.५१ इंदिरानगर (द) ग.नं.२१ व २२ साठी कॉँक्रीट रस्ते तयार करणे.**
**(अं.प.रक्कम रू.९,९९,६७४/- (खर्च रक्कम रू.९,५५,९३९/-)**

वॉर्ड क्र.५१ इंदिरानगर (द) ग.नं.२१ व २२ साठी कॉँक्रीट रस्ते तयार करणेचे कामाकरीता ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत २ निविदा विक्री

झाल्या. त्यापैकी एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा सुबोध कन्स्ट्रक्शन यांची ०.०१% कमी दराची होती. निविदेस अंतीम मान्यता देण्यापूर्वी कंत्राटदारास वाटाघाटीस बोलावले असतांना ३% कमी दराने काम करण्यास संबंधितांनी सहमती दर्शविली. तथापि कार्यकारी अभियंता यांनी १७.३.२०१३ रोजी दिलेल्या टिपणीनुसार एकच निविदा प्राप्त असल्याने सदरील कामाची निविदा दिनांक ८.४.२०१३ रोजी पुनश्च मागविण्यात आली. त्यावेळी दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी सर्वात कमी दराची निविदा २.१०% सुबोध कन्स्ट्रक्शन यांची होती. संबंधितांची निविदा अंतिमरित्या स्विकारण्यात आली. कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड इंजि -क/३९७/२०१३, दिनांक १८.७.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील कामाची मुदत सहा महिने होती. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. दिनांक ६.२.२०१३ रोजी प्रथमत:निविदा मागविण्यात आली होती. त्यावेळी ३% कमी दराने संबंधित कंत्राटदाराने काम करण्यास सहमती दर्शविली होती. परंतू एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दिनांक ८.४.२०१३ रोजी निविदा मागविली. त्यात कमी दर २.१०% प्राप्त झाले. दुस-या वेळीही कमी दर पहिल्या वेळीच्या कंत्राटदाराचे होते. परंतू त्यानंतर संबंधितांनी याच कामात ३% कमी दराने सहमती दर्शविली होती ही बाब विचारात घेतलेली नाही.

२. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्र.४०५६ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध नसल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. कंत्राटी कामाचा विमा कालावधी दिनांक १६.१.२०१४ ते १५.७.२०१४ पर्यंतचा आहे. कंत्राटी काम पूर्ण झाल्यानंतरच्या कालावधीचा विमा उतरविल्यामुळे विमा काढल्याचा हेतू सफल होत नाही.

४. कामाचे शेडयूल्ड B चे पत्र संचिकेत उपलब्ध नाही.

५. कंत्राटदाराची करारनाम्यावर स्वाक्षरी नाही.

६. निविदा नियमावली अट क्र.३८ नुसार ॲटम निहाय परिमाणात २५% वाढ अनुज्ञेय आहे. परंतू खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा परिमाणे वाढलेली आहेत. त्यावर झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **देयकातील परिमाण / रक्कम** | **अंदाजपत्रकातील परिमाण / रक्कम** | **परिमाणातील वाढ** | **फरक परिमाण रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| २ | Raising to exit M.H.chamber<br>दर रक्कम रू.८७२/- | २८<br>२४४१६=०० | १७<br>१४८२४=०० | ६५% | ११<br>९५९२ |
| ३ | Fixing of SFRC to MH chamber<br>दर रक्कम रू.४१५/- | २८<br>११६२०=०० | १७<br>७०५५=०० | ६५% | ११<br>४५६५ |
| ६ | P/Lin situ c.c. १:४:८ of trap quart size metal in all<br>दर रक्कम रू.२९३८=८६ | ११८.५०७<br>३४८२७५=०० | ७९.१२<br>२३२५२२.६० | ५०% | ३९.३८७<br>११५७५३ |
| | | | | एकूण रक्कम रू. | १२९९१०=०० |

**उपरोक्त मुद्यांबाबत आपल्या स्तरावर तपासणी करावी. मनपाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूली करून अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र १४.: वॉर्ड क्र.५१, इंदिरानगर (द) येथे विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनचे काम करणे.(अं.प.रक्कम रू.४,९९,४३६/-)(खर्च रक्कम रू.४,७३,९२३/-)**

वॉर्ड क्र.५१ इंदिरानगर (द) येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन बदलण्याची संचिका तपासण्यात आली. सदरील कामासाठी रक्कम रू.४,९९,४३६/-रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. ई निविदा विभागामार्फत सदरील कामाच्या निविदा मागविल्या असता १ निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा २.२% कमी दराची होती. प्राप्त निविदा सुबोध कन्स्ट्रक्शन यांची होती. संबंधितांना दराच्या वाटाघाटीसाठी बोलावले असता त्यांनी ५% कमी दराने काम करण्यास सहमती दर्शविली. त्यानुसार मा.आयुक्त यांनी सदरील कामाची निविदा व एजन्सीस मान्यता दिली. संबंधितांनी महानगरपालिकेसोबत करारनामा केल्यानंतर त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/९८५/१४, दिनांक २१.१.१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदर कामाची मुदत ५ महिने ठेवण्यात आली. सदरील काम दिनांक १७.२.२०१४ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत जोडले आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता लेखापरीक्षणाच्या दृष्टीकोनातून खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील काम करण्यासंबंधी कंत्राटी कामाचा विमा रक्कम देयकातून कपात केलेली आहे. तथापि काम सुरु करण्यापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविणे क्रमप्राप्त असते. कंत्राटी कामाचा विमा देयकातून कपात करून विम्याचा हेतू साध्य होत नाही.
२. schedule - B ची प्रत संचिकेत जोडलेली नाही.
३. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४०६९ लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून न दिल्यामुळे संपूर्ण लेखापरीक्षण करता आले नाही.
४. B१ निविदेतील अटी व शर्तीनुसार clause ३८ प्रमाणे Item निहाय कामाच्या परिमाणात २५% पर्यंतची वाढ अनुज्ञेय आहे. तथापि खालील Item मध्ये झालेल्या वाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. करिता खर्च अमान्य का करण्यात येवू नये ? वाढीव परिमाणाचे व रकमेचे विवरण पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | देयकातील परिमाण रक्कम रू. | अं.प.परिमाण/ रक्कम रू. | परिमाणातील वाढ | फरक परिमाण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Ex.for trenches in soil<br>दर रक्कम रू.१३२.०० | ३५०.५६<br>४६२७४ | २४७.५०<br>३२६७० | ४२% | १०३.०६<br>१३६०४ |
| ०२ | Ex.for trenches in WBM Road<br>दर रक्कम रू.१६५=०० | ८०.२८<br>१३२४६ | ३३.७५<br>५५६८.७५ | १३८% | ४६.५३<br>७६७७ |
| ०४ | Removing Exist २५० Rcc Pipe Line<br>दर रक्कम रू.४४.६५ | ३९५.७५<br>१७६७० | ३००<br>१३३९५ | ३२% | ९६<br>४२७५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५ | Plsupp of २५०mm SWG Pipeline<br>दर रक्कम रू.२५० =०० | <u>३९५.७५</u><br>९८९३८ | <u>३००</u><br>७५००० | ३२% | <u>९६</u><br>२३९३८ |
| ०६ | L/L/Jog २५० mm SWG Pipeline<br>दर रक्कम रू.१४९.१० | <u>३९५.७५</u><br>५९००६ | <u>३००</u><br>४४७३० | ३२% | <u>९६</u><br>१४२७६ |
| १२ | Refilling the trenches<br>दर रक्कम रू.५८.८० | <u>४११.४३</u><br>२४१९२ | <u>३०३.७५</u><br>१७८६० | ३५% | <u>१०८</u><br>६३३२ |
| | | | | एकूण फरकाची रक्कम | ७०१०२/- |

**मुद्या क्रमांक ०१ ते ०४ बाबत आपल्या स्तरावर संचिकेची सविस्तर शहानिशा व खातरजमा करून महानगरपालिकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीची वसूली करून त्याबाबतचा लेखी खुलाशासह अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१५ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.४६ येथे स.स.यांच्या गल्ली मध्ये कॉंक्रीट रस्ते दुरुस्ती करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.९,९९,३५०/-) (खर्च रक्कम रू.१०,९०,८४८/-)**

वॉर्ड क्र.४६ येथे स.नगरसेवक यांच्या गल्लीमध्ये कॉंक्रीट रस्ते, दुरूस्ती करणेचे कामाकरीता ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या दिनांकापर्यंत २ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी एकच निविदा स्वीकृती तारखेपर्यंत प्राप्त झाली. प्राप्त निविदा शे.मुजाहेद सादिक शेख यांची ८.९९% जास्त दराची होती. संबंधित कंत्राटदारास वाटाघाटीस बोलावण्यात आले. वाटाघाटी अंती अं.प.दराने काम करण्यास कंत्राटदाराने सहमती दर्शविली. परंतू शहर अभियंता यांनी एकच निविदा असल्याने निविदा दराने सादर करावे असा शेरा नोंदविला. तद्नंतर १% कमी दर अंतीम करण्यात आले. कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यादेश क्र.मनपा/वॉर्ड इंजि-क/२२९३/२०१३, दिनांक २.२.२०१३ अन्वये देण्यात आले. कामाची मुदत ५ महिने ठेवण्यात आली. संचिकेची तपासणी केली असतांना खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. कार्यादेश देण्यापूर्वी २% सुरक्षा ठेव रक्कम एफ.डी.आर.क्र.४७३१७ दिनांक १२.४.२०१२ चा असून त्याची मुदत दिनांक १२.४.२०१३ पर्यंतच होती. सदरील कामाची मुदत ५ महिने असल्याने दिनांक २.७.२०१३ पर्यंत येते. परंतू सुरक्षा ठेवीची मुदत त्यापूर्वीच संपल्याने सुरक्षा ठेव स्विकारतांना विभागाने एफ.डी.आर.चा दिनांक न तपासताच स्वीकारली.

२. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेल्या विमा पत्रात त्याचा कालावधी दिनांक २५.२.२०१३ ते २४.५.२०१३ पर्यंतचा आहे. सदरील काम दिनांक २१.६.२०१३ रोजी पूर्ण झाले. त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

३. सदरील काम अं.प.रकमेपेक्षा ९.१६% जास्तीचे झालेले असल्याने अंतीम देयकास मान्यता देतांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

४. B१ निविदा पुस्तिका अट क्र.३८ नुसार ॲटम निहाय परिमाणात २५% वाढ अनुज्ञेय आहे. तथापि खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा जास्तीची वाढ होवूनही सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नसल्याने जास्तीचा झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा सादर करावा. ॲटम निहाय तपशील पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | तपशील | देयकातील परिमाण रक्कम रू. | अं.प.परिमाण/ रक्कम रू. | परिमाणातील वाढ | फरक परिमाण व रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Ex.for road way in earth sail.<br>दर रू.९४.५० | १८९.२३<br>१७८८२ | ११४.७५<br>१०८४४ | ६५% | ७४.४८<br>७०३८ |
| २ | Carting of road cutting material<br>दर रू.१३२.०५ | १८९.२३<br>२४९८८ | ११४.७५<br>१५१५३ | ६५% | ७४.४८<br>९८३५ |
| ४ | Prollay c.c. १:४:८ for foundation and bed<br>दर रू.२९३८ = ८६ | ७३.५३४<br>२१६१०६ | ५७.५३<br>१६९०७३ | २८% | १६.००४<br>४७०३४ |
| | | | | एकूण रक्कम रू. | ६३९०७/- |

५. मोजमाप पुस्तिका क्र.२४३३ लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध न झाल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

**उपरोक्त मुद्यांबाबत सविस्तर तपासणी करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१६ : वॉर्ड अभियंता - क कार्यालयातील विविध कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉर्ड कार्यालयाने केलेल्या कामाचे मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. The Maharashtra Public Works Maual च्या Appedix- १० मधील तरतदूी नुसार मोजमाप पुस्तिका लिहिणे, तपासणे व त्याचे जतन करणे इत्यादी बाबी स्पष्टपणे नमूद आहेत.

मोजमाप पुस्तिका हे स्थायी कागदपत्रातील एक भाग असून ते अभिलेखे नेहमीसाठी संबंधित कार्यालयात उपलब्ध ठेवण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे. वॉर्ड अभियंता कार्यालयाने त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांच्या नावाने मोजमाप पुस्तिका दिल्याचे तोंडी समजले. परंतू मोजमाप पुस्तिकेचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाहीत.

वॉर्ड अभियंता कार्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या संचिकांचे लेखापरीक्षण मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून दिलेल्या नसल्याने १००% लेखापरीक्षण होवू शकले नाही.

**तरी उपरोक्त बाबीबाबत सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मोजमाप पुस्तिका अद्ययावत न ठेवणे ही गंभीर स्वरूपाची बाब असून साशंकता निर्माण करणारी आहे. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**विशेष बाब: लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षण पथकाने आक्षेपित केलेल्या चार आक्षेपांची रक्कम रू.३८,१९६/- वसूल करण्यात आली.**

# लेखापरीक्षण अहवाल
# वॉर्ड - ड कार्यालय
# सन २०१३-२०१४

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड - ड कार्यालयाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१४/९२, दिनांक २९.४.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. दरम्यान जमा बाजूचे (चाचणी स्वरूपाचे) नियमित लेखापरीक्षण उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार करण्यात आले.त्यानुषंगाने वॉर्ड कार्यालयाचे मालमत्ता पावती पुस्तके, अकृषिक पावती पुस्तके व पाणीपुरवठा पावती पुस्तके वसूल केलेल्या रोख रकमा व धनादेश रकमांचे ताळमेळ घेवून वेळोवेळी भरणा केलेल्या रकमेची तपासणी करण्यात आली. तसेच नामांतराच्या संचिका विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या संचिका, बेबाकी प्रमाणपत्राच्या संचिका तपासण्यात आल्या आहेत. याशिवाय वॉर्ड - ड कार्यालयाचे नोंदवहीत नोंदविलेल्या नोंदी तपासण्यात आल्या. दरम्यान जमा बाजूच्या एकूण २८ परिच्छेदांचा अहवालात समावेश करण्यात आला आहे. वॉर्ड - ड अंतर्गत उपअभियंता विभागाचे खर्च बाजूचे ए-१ रेटलिस्ट कामाच्या संचिका, तसेच बी-१ निविदा कामाच्या संचिका, ड्रेनेज दुरूस्ती, क्वॉर्टर दुरूस्ती, डांबरीकरण संचिका व पेव्हर ब्लॉक संचिकेची चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली .

त्या दरम्यान वॉर्ड - ड कार्यालयास लेखापरीक्षणा अंतर्गत जमा बाजूचे २८ व खर्च बाजूचे २१ असे एकूण **४९** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**वॉर्ड अधिकारी वॉर्ड अभियंता यांच्या कार्यकाळाबाबत.**

**सन २०१३-२०१४ या कालावधीत श्री. एस.आर.जरारे यांनी वॉर्ड अधिकारी - ड व श्री. बी.डी. फड यांनी वॉर्ड अभियंता -ड म्हणून काम पाहिले.**

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :**

१. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ट लिपीक (पथक प्रमुख)

२. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक.

३. श्रीमती शिल्पा जोशी, कनिष्ठ लिपीक

वॉर्ड - ड कार्यालयाकडून प्रलंबित लेखापरीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे - सन २००५-२००६ ते सन २००८-०९ या कालावधीत एकूण प्रलंबित आक्षेप ०८ व एकूण आक्षेपित रक्कम रू. **२०,८०,१५७/- इ**तकी आहे. प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन त्वरीत करून आक्षेपाधित रकमेचा निपटारा विभागाने करून घेणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. १ : लेख्यांची सर्वसाधारण स्थिती.**

वॉर्ड - ड कार्यालयाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी विभागाने अभिलेखे उपलब्ध करून दिले. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यातील मालमत्ता मागणी नोंदवही, दैनंदिन वसूल केलेल्या करांची नोंद केलेली रोखकिर्द इत्यादी अभिलेखे तपासली. मालमत्ता मागणी नोंदवहीतील घेण्यात आलेल्या नोंदी अपूर्ण आढळल्या. मागणी नोंदवहीची एकूणच स्थिती अत्यंत खराब व दयनीय आहे. मागणी नोंदवहीत पुढील आणि मागील पाने फाटलेली असल्याने नोंदी अस्पष्ट आहेत. मागणी नोंदवही वर नोंदी घेणा-या कर्मचारी / अधिकारी यांचे सांक्षाकन नाही. मागणी नोंदवही ही कायम जतन करणा-या अभिलेख्यातील अभिलेखे असल्याचे गांभीर्य विभागास नसल्याचे दिसून आले.

करीता विभागाने मालमत्ता मागणी नोंदवहीची स्थिती तपासावी. रजिस्टरच्या पुढील व मागील पानावरील नोंदी नष्ट होणार नाही याबाबत तातडीने नविन मागणी नोंदवही तयार करून संबंधित कर्मचारी / अधिका-यांचे नोंदवहीवर साक्षांकन करून घ्यावे. मागणी नोंदवहीतील अपूर्ण नोंदी जसे कर आकारणी संदर्भ, कर आकारणी मूल्य, एकूण कर योग्य असल्याची खातरजमा करावी.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. २ :लेखापरीक्षण कामी अभिलेखे उपलब्ध करुन देणे बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयाचे लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खालील अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

१) अधिकारी / कर्मचारी सेवापुस्तके, सेवापट, हजेरी पुस्तक, दैनंदिन अहवाल, मासीक पगारपत्रके, पुरवणी देयके इत्यादी.
२) वैद्यकीय प्रतीपूर्ती संचिका.
३) जड संग्रह नोंदवही.
४): वॉर्ड - ड कार्यालयास सन २००५-०६ या वर्षात प्राप्त झालेल्या अधिकाराप्रमाणे करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या मूल्यनिर्धारणाच्या संचिका बाबत.

५) वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांचे एकूण मालमत्ता, मालमत्ता कराची थकबाकी, चालू मागणी, वसूली व शिल्लक याबाबतचा ताळेबंद सादर केलेला नाही. बाबत.

**लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही गंभीर स्वरूपाची असून संबंधित विभागाबाबत साशंकता निर्माण करणारी आहे. हेतूपुरस्सर अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याने संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३ : वॉर्ड - ड कार्यालयाने पाणीपट्टी पोटी जमा रक्कम महानगरपालिका फंडात भरणा न करताच संबंधिताच्या खात्यात पावतीची नोंद घेतल्याबाबत.**

एप्रिल - २०१३ चे संगणकीय (summary) तपशिल अहवाल तपासला असता पावती क्र. F १०४/७९७० दिनांक ३०.४.२०१३ रक्कम रू. २७५०/- पाणीपुरवठा खाते क्र. ६१८३ plot No.८ए रोकडीया हनुमान कॉलनी, मागणी रजि. क्र.३३ पान क्र. ३२३ वर सन २०१३-१४ चे पाणीपट्टीच्या रकमेची नोंद घेण्यात आलेली आहे. सदरील रक्कम धनादेश क्र. ३०९६२४ दिनांक ३०.४.२०१३ अन्वये रकमेचा भरणा केल्याचे निर्देशनास आलेले आहे.

सदरील प्रकरणांत असे दिसून आले की, मनपा फंडात सदरील चेक जमा केलेला आहे. परंतू पावत्यांच्या तपशील अहवालात उपरोक्त नमूद पावतीचा क्रमांक नोंदविलेला नाही. म्हणजेच संबंधितांना पावती देवून त्याची नोंद मागणी रजिस्टरला घेवून रोखकिर्दमध्ये पावतीचा उल्लेख न करणे ही बाब गंभीर आहे.

**विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे झ ालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करण्यात यावे. अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४ : वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत येणा-या शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालये, दवाखाने व चॅरीटेबल ट्रस्ट इ. संस्थांना आकारण्यात येणा-या पाणीपट्टीच्या दराबाबत.**

शासकीय कार्यालयाच्या मागणी नोंदवहीत नोंदविलेल्या शासकीय इमारतींना सन २०१२-१३ या आर्थिक वर्षापासून पाणीपट्टी व्यावसायिक दराने आकारलेली आहे. परंतू सन २०१२-१३ पूर्वी निवासी दराने पाणीपट्टी वसूल केल्याचे प्रयोजन लेखापरीक्षणास समजलेले नाही.

करिता, सन २०१२-१३ पूर्वी विषयांकित कार्यालयास निवासी दराने पाणीपट्टी वसूलीबाबतचे आदेशाच्या प्रती लेखापरीक्षण पथकास तात्काळ सादर कराव्यात असे विभागास सूचित करण्यात आले असता ,अहवाल अंतीम होईपर्यंत अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

**विभागाने आकारलेली व वसूल केलेली पाणीपट्टी योग्य असल्याबाबतची खात्री करावी जर उक्त कार्यवाही योग्य नसल्यास संबंधितांकडून फरकाची रक्कम वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५ : वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत येणा-या व्यावसायिक नळ खातेदारांच्या प्रकरणांमध्ये दिसून आलेल्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयातील व्यावसायिक नळधारकांची नोंद असलेले ८-६ मागणी रजिस्टर तपासले. मागणी नोंदवहीत घेतलेल्या नोंदीमध्ये नळ बंद, रस्ता रूंदीकरणात नळ बंद व व्यावसायीक नळ कनेक्शनचे रुपांतर निवासी वापरात, जास्त व्यासाचे रुपांतर कमी व्यासात असे दर्शविण्यात आलेले आहे. मागणी रजिस्टर मध्ये नोंदविलेल्या नोंदी सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेल्या नाहीत. तसेच पुढील मागणी रजिस्टर मध्ये थकबाकीसह रकमा घेतलेल्या नाहीत. नविन मागणी रजिस्टर मध्ये नोंदी

घेणे आवश्यक आहे. लेखापरीक्षण पथकाने पाणीपट्टी संबंधीचे एकच रजिस्टर नाममात्र तपासले आहे, त्यामध्ये निदर्शनास आलेल्या बाबींचे विवरणपत्र सोबत जोडण्यात येत आहे.

करीता उपरोक्त प्रमाणे विवरणपत्रातील नोंदी तपासाव्यात आणि त्या संबंधीचे कार्यालयीन आदेश, संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध करून द्याव्यात तसेच मागणी रजिस्टर मधील नोंदीबाबतही खुलासा सादर करावा असे अर्धसमास पत्र क्र. (४) सोबत दिलेल्या यादीत नमूद प्रकरणांबाबत सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त प्रकरणी तपासणी करावी महानगरपालिकेचे होत असलेले नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ६ : वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत येणा-या शासकीय कार्यालय निमशासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालय, दवाखाने, बँका, इन्शुरन्स कंपन्या व चॅरीटेबल ट्रस्ट इत्यादी संस्थाना आकारण्यात आलेल्या पाणीपट्टीच्या दराबाबत.**

विषयांकित मालमत्तांना दिनांक १.४.२०१२ पूर्वी आपण निवासी दराने आकारलेल्या पाणीपट्टी बाबतचे आदेशाच्या प्रती उपलब्ध करून द्याव्यात असे कळविण्यात आले होते. परंतू आपल्या कार्यालयाने सदरील आदेशाच्या प्रती देण्यास असमर्थता दर्शविली आहे.

वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत येणा-या विषयांकीत मालमत्तांच्या पाणीपट्टी संदर्भाने नोंदी असलेले GR मागणी रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले आहे. यातील मालमत्तांचा वापर व्यावसायीक स्वरूपाचा असल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आलेले आहे. परंतू दिनांक १.४.२०१२ पूर्वी निवासी दराने पाणीपट्टीची आकारणी केलेली आहे.

तसेच काही मालमत्तांना दिलेल्या नळ कनेक्नशनचे देयक मीटर रीडींग सरासरी दर्शविलेली आहे. परंतू नोदवहीत मीटर क्रमांकाचा उल्लेख नाही. सरासरी देयक आकारण्याचे प्रयोजन काय होते याचा बोध होवू शकला नाही.

**उपरोक्त अनियमिततेमूळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करीता सोबतच्या तक्त्यातील नोंदी तपासून संबंधिताकडून पाणीपट्टीच्या रकमा वसूल कराव्यात. अर्धसमास पत्र क्र. (५) सोबत दिलेल्या नोंदी या नाममात्र असून इतर रजिस्टर आपल्या स्तरावर तपासण्यात याव्यात, केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने संबंधितांकडून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ७ : वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांचे नामांतर प्रकरणातील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांचे नामांतर प्रकरणे तपासली असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

१) जा.क्र.मनपा/वॉर्ड-ड/नामांतर/११/२०१३, दिनांक ५.१२.२०१३ शेख सईद अ. सत्तार मोहल्ला खोकडपुरा, सीटीएस क्र.१४०११, घर क्र. ५-२४-१९६७ सदरील मालमत्ता शे.चाँद शे.अ.रहमान यांचे नावावर आहे. सदरील मालमत्ता खरेदी खता

द्वारे शे.फारूख शे.महेबूब यांचे नावे सीटी सर्व्हे अभिलेख्यात दिनांक २०.६.२०११ रोजी नामांतर झालेली आहे. तद्नंतर शेख आसीफ शे.युसुफ बागवान यांचे नावे खरेदी खताधारे दिनांक ७.१.२०१२ रोजी फेर झाला. तसेच दिनांक १.३.२०१३ रोजी नाजमिन बानो पिता शे.चाँद या नावे वारसाने फेर झालेला आहे. हीच मालमत्ता खरेदीने दिनांक ६.४.२०१३ रोजी शे.सईद अ.सत्तार यांचे नावे फेर झाला व उपरोक्त क्रमांकान्वये मनपा अभिलेख्यात नामांतर केलेले आहे. सदरील मालमत्ते संबंधी यापूर्वी सीटी सर्व्हे अभिलेख्यात झालेल्या फेरफार नोंदी प्रमाणे मनपा अभिलेख्यात नामांतर झालेले नाही. त्यामुळे मनपाचे नामांतर फीचे आर्थिक नुकसान झालेले असून कायदेशीर दृष्ट्या मनपा अभिलेख्यात नोंद असलेल्या व्यक्तींचे नांव नामांतर नोटीस मध्ये उल्लेखीत नसतांना नामांतर आदेश पारीत केलेले आहेत.

२) कविता चंद्रशेखर जोशी, plot No.१२७/६ समर्थनगर यांनी रामचंद्र तुकारामपंत देव यांचेकडून मालमत्ता खरेदी केलेली आहे. नामांतर आदेश क्र.१४/२०१३ दिनांक ५.१२.२०१३ अन्वये नामांतर मंजूर करण्यात आलेले आहे. सदरील मालमत्तेची NRV १०३९३ दर्शविलेली आहे. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/विक/कआ/२४५५ / २०१३ दिनांक ५.१०.२०१३ अन्वये जूने करयोग्य मूल्य रू.५९४००/- दिनांक ३१.१२.२००२ पर्यंत कायम व पुढे बंद सुधारित करयोग्य मूल्य रू.१०३९३, दिनांक १.१.२००३ पासून कायम केले. संगणकीय मालमत्ता क्र. D००२३१३८ असा आहे. नामांतर करतांना मालमत्ता कराची पूर्ण वसूली झालेली नाही. संबंधिताकडे बदलीमध्ये रू.१,८०,२१३/- थकीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. मालमत्ता मागणी नोंदवही मध्ये रजिस्टर क्र. ३A पान क्र.१९७ वर कर आकारणी विभागाच्या आदेशाप्रमाणे सुधारीत नोंद घेतलेली नाही. कर कमी केल्याची संचिका लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही. कर कमी केल्याचे आदेशात संबंधिताचा अर्जाची तारीख दिनांक १४.५.२०१३ दर्शविलेली आहे आणि कर दिनांक १.१.२००३ पासून कमी करण्यात आलेला आहे.

३) गंगाधर विश्वनाथ कांबळे, रमानगर सीटीएस नं.१४६०९ घर क्र.५-५-५४/१०७ या मालमत्तेचे वारसा हक्काने नामांतर झालेले आहे. नामांतर कार्यालयीन पत्र क्र.वॉर्डड/नामांतर/०२२/२०१३, दिनांक १९.१२.२०१३ अन्वये मंजूर करण्यात आले. नामांतर करतांना P.R. कार्ड अभिलेख्यात विश्वनाथ शंकर कांबळे यांचे मृत्यू नंतर १) श्रीमती भागाबाई विश्वनाथ कांबळे व २) गंगाधर विश्वनाथ कांबळे असे दोन्ही नावे पी.आर.कार्ड मध्ये आहेत. परंतू मनपा कार्यालयात केवळ गंगाधर विश्वनाथ कांबळे यांच्याच नावाने नामांतर मंजूर केलेले आहे.

४) शांताबाई देवमन परदेश NPO, सौफीया अजीज खान, घ.क्र.४-१९-५२, भोईवाडा येथील मालमत्ता क्र.D०००५३७४ मालमत्ता बाबतचे नामांतर करतांना NPO आदेश क्र.२५/२०१३ दिनांक १९.१२.२०१३ अन्वये उपरोक्त प्रमाणे नामांतर (NPO) करण्यात आलेले आहे. सदरील प्रकरणाच्या संचिकेत नोंदणीकृत खरेदीखत क्र.५५३५, दिनांक २२.१०.९९ याचा उल्लेख आहे. सदरील खरेदीखत सौफीया खान अजीजखान यांनी १) निलेश व विजेंद्र सुरेश कुलकर्णी २) भारती उर्फ निताबेन बाळु भाई कोठारी यांचे कडून लिहून घेण्यात आलेले आहे. सदरील

मालमत्ता वारसा हक्काने विक्री करणा-याचे मालकी व ताब्यातील आहे असा उल्लेख आहे.प्रकरणात प्रथमतः वारसांच्या नावाने मनपा अभिलेख्यात नामांतर न होताच त्यांनी खरेदीखत करून दिलेल्या व्यक्तीच्या नावे नामांतर झालेले आहे. ही बाब नियमबाह्य स्पष्ट होते.

**उक्त तपासलेली प्रकरणे नाममात्र असून इतरही प्रकरणे आपल्या स्तरावर तपासावीत. सदरील प्रकरणांबाबतचा लेखी अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने नामांतर प्रकरणातील अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून तसेच महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ८ : महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ च्या नियम ४ अन्वये विवाह मंडळाची नोंदणी निबंधकाकडे करणे बाबत.**

वॉर्ड -ड ,कार्यालयीन पत्र क्र.मनपा/आवि/विवाह नोंदणी/०७/३१९, दिनांक २३.३.२००७ अन्वये प्रभाग अधिकारी यांना दिनांक ०९.०४.२००७ पासून विवाह मंडळ व विवाह यांचे निबंधक म्हणून नियुक्ती केल्याचे नमूद आहे. वॉर्ड अधिकारी यांना प्राप्त झालेल्या कालावधी पासून विवाह नोंदणी केल्याचे निदर्शनास आलेले आहे. परंतू विवाह मंडळाचे नोंदणी केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षणास प्राप्त झालेले नाहीत.

करीता आपल्या स्तरावर तपासणी करून, शहानिशा करून उक्त अधिनियमान्वये विवाह मंडळाची नोंदणी वॉर्ड - ड कार्यालयाने केलेली असल्यास वॉर्ड कार्यालयाचे कार्यक्षेत्रात किती विवाहमंडळे कार्यरत आहेत यासंबंधीची सविस्तर माहिती व अभिलेखे लेखापरीक्षण पथकास सादर करावी असे विभागास सूचित केले असता **विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अभिलेखे सादर केलेले नसल्याने महाराष्ट्र विवाह मंडळांचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ च्या नियम ४ अन्वये विवाह मंडळाची नोंदणी निबंधकाकडे करणे बंधनकारक असतांनाही विभागाकडे नोंदणी झालेली नसल्यास अशा प्रकारचे मंडळे, शोधून त्यांचे वर दंडनिय कार्यवाही करून नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.**

**विभागाने संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ९ : वॉर्ड कार्यालयाने सन २०१३-१४ या वर्षात त्यांचे कार्यक्षेत्रातील वितरीत केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणे पत्राबाबत कमी वसूली केलेल्या रकमेसंबंधी.**

महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी नियम १९९९ चे नियम ५(२) नुसार विवाह नोंदणी ज्ञापना सोबत रू.१५/- एवढी फी आकारणे आवश्यक आहे. परंतू सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड - ड कार्यालयात नोंदविलेल्या २१८ प्रकरणांत रू.१५/- प्रती नोंदणी फी आकारलेली नाही. त्यामुळे रू.३२७०/- रकमेचे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

तसेच दिनांक २०.५.२०१३ रोजी लोहिया गोविंद रमेशलाल व तोतला श्रृतिका अरूण यांचे विवाह नोंदणीची प्रमाणीत प्रत देण्यात आलेली असून संचिकेत रू.२०/- शुल्क वसूल केलेले दिसून येत नाही.

**करीता उपरोक्त प्रकरणी आपल्या स्तरावर तपासणी करून वॉर्ड कार्यालयास निबंधक म्हणून प्राप्त झालेल्या अधिकाराच्या तारखेपासून वसूल न झालेल्या रकमा संबंधितांकडून वसूल**

**करून मनपा फंडात रक्कम जमा करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र. १०: वॉर्ड - ड कार्यालयात मालमत्ताधारक व नळधारकांनी सन २०१३-१४ या वर्षात रक्कम रू.११,१४,२८८/- रकमेचे धनादेश न वटल्यामुळे मनपाचे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालया अंतर्गत येत असलेल्या मालमत्तांसंबंधी नागरीकांनी सन २०१३-१४ या वर्षात भरणा केलेल्या मालमत्ता कर व पाणीपट्टी पैकी रक्कम रू.११,१४,२८८/- रकमेचे धनादेश बँकेत न वटता परत आलेले आहेत.

बँकेतून न वटता परत आलेल्या धनादेशाधारका विरूध्द इन्स्टुमेंट निगोशिएबल ॲक्टचे कलम १३८ अन्वये मा.न्यायालयात दावा दाखल करून न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल करणे अपेक्षित होते. परंतू तशी कार्यवाही विभागाने केलेली नाही.

सन २०१३-१४ मधील प्रलंबित न वटलेल्या धनादेशाची यादी अर्धसमास पत्र क्र. ९ सोबत देण्यात आलेली आहे. सोबतच्या यादीत शेरा या स्तंभात लेखापरीक्षणास निदर्शनास आलेल्या त्रुटी नमूद केलेल्या आहेत.

करीता न वटलेल्या धनादेशाची रक्कम संबंधितांकडून वसूल करावी. तसेच सोबतच्या यादीतील शेरा स्तंभातील त्रुटी संबंधी सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त नाही.

**विभागाने उक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे संबंधिताकडून रकमा वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करव्यात तसेच अर्धसमासासोबत दिलेल्या यादीतील शेरा स्तंभात दर्शविण्यात आलेल्या त्रुटीसंबंधी खुलासा सादर करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ११ : पावती क्रमांक F१०४/८१०४५, दिनांक२५.०३.२०१४ ची नोंद कॅश नोंदवहीत (summary) न दर्शविल्या बाबत.**

विषयांकित पावती द्वारे रक्कम रू.२७५०/-(२०१३-१४) चा घर क्रमांक ५-२५-९३, नळ खाते क्रमांक ६०३० निवासी व्यास १/२" मोहल्ला अजबनगर यांनी भरणा केलेला असून भरणा रकमेचा cash रजिस्टरवर नोंद दर्शविल्याचे आढळून आलेले नाही.

**करिता, रक्कम रूपये २७५०/- भरण्याबाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १२: वॉर्डन युथ हॉस्टेल स्टेशन रोड यांची सर्व्हीस चार्ज / करआकारणी बाबतची संचिका उपलब्ध करून देणे बाबत.**

मालमत्ता वॉर्डन युथ हॉस्टेल ५-१४-२७ स्टेशन रोड ही मालमत्ता असून या मालमत्तेचे करयोग्य मूल्य २८,६८६/- असून त्यास कर आकारणी संदर्भ अथवा दिनांक दर्शविलेला नाही.

तसेच उक्त मालमत्ता राज्य शासन / केंद्र शासनाची आहे, याबाबत बोध होत नाही व सर्व्हीस चार्ज कधी पासून आकारणी करण्यात आला, कोणत्या नियमानुसार आकारणी करण्यात आली याबाबतचा उल्लेख नाही.

करीता याबाबतचे आदेश व करआकारणी संचिका लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे संबंधितांकडून वसूल करण्यात आलेला कर योग्य असल्याबाबतची खात्री लेखापरीक्षण पथकास झालेली नाही.

**विभागाने उक्त मालमत्तेस आकारण्यात येणारा कर योग्य असल्याबाबत खात्री करावी. आवश्यक त्या अभिलेख्यासह व सविस्तर खुलाशासह अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र. १३: मालमत्ता कराची नोंद जुन्या मागणी रजिस्टरवरून नविन रजिस्टर मध्ये न घेतल्यामुळे मनपाचे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.

मालमत्ता कराची नोंद जुन्या मागणी रजिस्टरवरून नविन रजिस्टर मध्ये न घेतल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्याची विभागणी खालीलप्रमाणे -

१) संगणकीय मालमत्ता क्र. D००१५६१९, CTS No - १९३८१/८१ बन्सीलाल नगर, घर नंबर ६-७-०१, या मालमत्तेस दिनांक १.१०.२००६ पासून करयोग्य मूल्य रूपये १,९१,३३४/- हे कर आकारणी संदर्भ क्र. १४३७८६/२००४-०५, दिनांक १०.१०.२००६ अन्वये कराची आकारणी करण्यात आलेली आहे. तत्पूर्वी सदरील मालमत्तेस मोकळ्या जागेचा कर आकारण्यात येत होता. तद्नंतर सदरील मालमत्तेस दिनांक १.१०.२००६ पासून आकारलेल्या करामध्ये सुधारीत कर आकारणी दिनांक १.४.२००८ पासून कार्यालयीन पत्रक्रमांक मनपा/करआ/CR/९४९ / २०१२ , दिनांक६.१.२०१२अन्वये रक्कम रूपये १,०८,०००/- करयोग्य मूल्य निश्चित करण्यात आले. उपरोक्त मालमत्तेस दिनांक १.१०.२००६ पासून सन २०१४-१५ पर्यंत एकूण मालमत्ता कराची मागणी रक्कम रूपये ९,२५,३०२/- इतकी होते. या मालमत्तेबाबत संबंधिताने वेळोवेळी एकूण ५,९८,७४९/-रकमेचा भरणा महानगरपालिकेकडे केल्याच्या नोंदी एकूण ४ पावत्या अन्वये असल्याचे आढळून आले.

संबंधिताकडे माहे ऑक्टोबर २००६-०७ते मार्च -२०१५ पर्यंत रू.९,२५,३०२/- इतकी आहे.त्यातून संबंधिताने भरणा केलेली रक्कम रू.५,९८,७४९/- वजा जाता रक्कम रू.३,२६,५५३/- इतक्या रकमेची थकबाकीसह चालू मागणी बाकी आहे.

उपरोक्त मालमत्ता धारकाकडे रक्कम रू.३,२६,५५३/- इतकी मालमत्ता कराची मागणी असतांनाही मालमत्ता कराचे मागणी रजिस्टर जुने ABC पान क्र. १३९ वरून नविन ABC रजिस्टर मध्ये नोंदी घेतलेल्या नाहीत, ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्याचप्रमाणे संगणकीय अभिलेख्यात संबंधित मालमत्ताधारकाकडे केवळ सन २०१४-१५ चालू मागणी , जुन्या मालमत्ता कराची रक्कम रू.१,०२,०६०/- इतकीच दर्शविलेली आहे. थकबाकी रक्कम रू.२,२४,४९३/- इतक्या रकमेचा उल्लेख संगणकीय अभिलेख्यात नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. संगणकीय मालमत्ता क्र.D००००७५२,CTS No -१९३८१/८११/A, बन्सीलाल नगर,औरंगाबाद या मालमत्तेचे मोकळया जागेचे करयोग्य मूल्य रक्कम रू.५३१६/- जा.क्र.मनपा/करआ/विक/२३३६/१३, दिनांक १६.०९.२०१३ अन्वये open land Tax,

दिनांक १६.४.२०११ पासून निवासी दराने आकारण्यात आलेला आहे. मोकळ्या जागेचा कर आकारल्याच्या तारखेपासून संबंधिताकडून कराची वसूली झालेली नाही. संबंधिताकडे १६.४.२०११ ते २०१४-१५ पर्यंत रक्कम रू.६३१३/- थकबाकी आहे याची नोंद जुने ABC रजिस्टर पान क्र.३१ वरून नविन रजिस्टर घेण्यात आलेले नाही. परंतू संगणकीय अभिलेख्यात रक्कम रू.१७,११०/- संबंधितांकडे थकबाकी असल्याचे दर्शविण्यात येत आहे, ही बाब परस्पर भिन्न वाटते. संबंधिताकडे थकबाकी असतांनाही नविन मागणी नोंदवहीत नोंद न घेणे व त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणे ही बाब गंभीर आहे.

करिता, उपरोक्त दोन्हीही मालमत्तांचे नविन मागणी रजिस्टर मध्ये नोंद का घेण्यात आली नाही ? तसेच संगणकीय मालमत्ता क्रमांक D००१५६१९ यांचेकडे रक्कम रू.२,२४,४९३/- इतक्या थकबाकी रकमेची नोंद का घेण्यात आली नाही? तसेच संगणकीय मालमत्ता क्रमांक D००००७५२ यांच्या कडील थकबाकी रकमेबाबत आपल्या स्तरावर तपासणी व शहानिशा करावी. तसेच महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानीची वसूली करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे तसेच उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १४:सन २०१३-१४ या वर्षात एकाच मालमत्तेच्या निवासी व व्यावसायिक नोंदी असतांना संगणकात व्यावसायिकची नोंद न करणे तसेच मोठे निवासी असल्याबाबत नोंद न घेणे या अनियमिततेमुळे महानगरपालिकेच्या झालेल्या नुकसानी बाबत.**

वॉर्ड -ड कार्यालयातील मालमत्तांचे ABC नावाची मागणी नोंदवही तपासली असतांना पान क्रमांक १८७ व पानक्रमांक २७१ यावर घरक्रमांक ५-९-७, रेल्वेस्टेशन येथील मालमत्तेच्या पूर्वी करयोग्य मूल्य २१,६००/- मध्ये विशेष कक्षाच्या कार्यालयीन आदेश क्रमांक विक/२/४०५/२०११-१२, दिनांक ४.६.२०११ अन्वये दिनांक १.४.२०११ पासून मालमत्ता कराचे करयोग्य मूल्य रूपये १८,९३२/- निवासी वापर व रक्कम रू.५९,४००/- व्यावसायीक वापराचे दर्शविले आहे.त्यानुसार सन २०१३-१४ पर्यंत मालमत्ता कराची वसूली झालेली आहे. परंतू निवासी वापराच्या करयोग्य मूल्यावर २०१३-१४ या वर्षात मोठे निवासीकर रू.१८९३/- वसूल केलेला नाही. त्याप्रमाणे २०१४-१५ च्या मागणी मध्येदेखील मोठे निवासी कराची रक्कम रू.१८९३/- दर्शविलेले नाही. एकूणच रक्कम रू.३७८६/- महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

त्याचप्रमाणे व्यावसायीक करयोग्य मूल्य याबाबत सन २०१४-१५ मध्ये संगणकीय अभिलेख्यात त्याची नोंद नसल्याचे निदर्शनास आले आहे. उपरोक्त करयोग्य मूल्याप्रमाणे संबंधितावर प्रतिवर्ष रूपये ५६,१३३/- कर दर्शविणे आवश्यक आहे. परंतू संगणकातच नोंद नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

तसेच ABC नविन पान क्रमांक १२७ व पान क्रमांक २०९ यावर व्यावसायीक करयोग्य मूल्य ५९,४००/- नुसारच नोंदी घेतलेल्या आहेत, निवासी करयोग्य मूल्याची नोंद अभिलेख्यात घेतलेली नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत कार्यवाही करून संबंधिताकडे थकीत मालमत्ता कराची वसूली करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने संबंधिताकडे थकीत मालमत्ता कराची वसूली करून अनियमिततेबाबत संबंधितांवर प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १५: वॉर्ड कार्यालय - ड अकृषिक कर पावती क्रमांक F१०४/७५९२०, दिनांक १८.३.२०१४ ची कॅश रजिस्टर summary ला नोंद न दर्शविले बाबत.**

माहे मार्च २०१४ चे कॅश रजिस्टर (summary) पाहिले असता अकृषिक कराची उक्त पावती निर्मला अनिल जाधव, सुनिल खैरनार व इतर , दाऊतपुरा, उस्मानपुरा, रमानगर, CTS, क्रमांक १४८२० क्षेत्र ३८३.३३ चौ. एवढे आहे.

परंतू संबंधिताने पावतीद्वारे रक्कम रूपये ११४२/- वसूल करतांना कॅश रजिस्टरला(summary) मागणी रजिस्टर पान क्रमांक NA-१/२६३ वर अकृषिक कर वसूल केलेली नोंद घेतलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विभागाने प्रत्यक्ष तपासणी करून याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूलीअंती तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करून अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. १६: मालमत्ता कराची कमी आकारणी करणे, थकबाकीची नोंद नविन रजिस्टर मध्ये न घेणे त्यामुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानी बाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र. D००००८८४, शॉप क्र.५२, जय टॉवर्स पद्मपुरा, CTS No. १९६६० या मालमत्तेस कर आकारणी क्रमांक २६७ दिनांक १.४.२०१० पासून रू.६०४८/- कर योग्य मूल्य आकारण्यात आले आहे. सदरील मालमत्तेस व्यावसायीक करयोग्य मूल्य असल्याने सामान्य कर ४५% आकारणे आवश्यक आहे. परंतू ए.बी.सी.जुने मागणी नोंदवहीत पान क्र.३६९ वर सन २०१०-११ पासून ३७.५% दराने कर आकारण्यात आलेला आहे. तसेच नविन ए.बी.सी. रजिस्टर पान क्र.३०५ वर सुध्दा ३७.५% दराने सामान्य कराची नोंद घेतलेली आहे. त्यामुळे सन २०१०-११ पासून प्रतीवर्ष रू.४५४/- प्रमाणे ५ वर्षाची रक्कम रू.२२७०/- चे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

तसेच सन २०१०-११ ते २०१३-१४ पर्यंतची मागणी नोंदवहीतील नोंदीनुसार एकूण मागणी रू.२१८९६/- होते. संबंधितांना सन २०१४ पर्यंत कर भरणा केल्याची पावती देवून त्यांचेकडून रू-१८२७३/- रकमेचा भरणा केल्याची नोंद आहे. एकूण मागणी व वसूल रकमेत रू.३६२३/- ची तफावत असून वसूलीला पात्र आहे.

**विभागाने प्रत्यक्ष तपासणी करून याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूलीअंती तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १७: वॉर्ड- ड अंतर्गत मालमत्ताधारक अजितसिंग रघुविरसिंग नि-ह (हॉटेल राजदुत) कुशलनगर P-७ संगणक क्रमांक D००००८३० यांचे मालमत्ता कराची संचिका व आदेश उपलब्ध करून देणे बाबत.**

मालमत्ता रजिस्टर ABC(जुने) पान क्रमांक २६३ उक्त मालमत्ताधारकांचे डिमांड पाहिले असता करयोग्य मूल्य १७८०१/- जा.क्र.मनपा/वॉर्ड(ड)/७०/०६/from Date १.४.२००४ नुसार असे असतांना पुन्हा विभाजन झाले. १.४.२००४ पासून पूर्वीचा कर / ८६८/०२/D२३१५/ वर ही बंद पासून पुढे ३१.३.२००४ पर्यंत असे नमूद करण्यात आले आहे.

परंतू यात स्पष्ट बोध होत नाही. मालमत्ता विभाजनाची संचिका व विभाजनाचे आदेश लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे उक्त आदेशान्वये केलेली कार्यवाही योग्य असल्याची खात्री झालेली नाही. **विभागाने शहानिशा करून आवश्यक त्या अभिलेख्यासह सविस्तर खुलासा व अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १८: मालमत्ता कर, पाणीपट्टी कर मागणी रजिस्टर सन २०१३-१४ चे रोख किर्द इत्यादी अभिलेखे अद्ययावत व प्रमाणित न करणे बाबत.**

मालमत्ता कर, पाणीपट्टी कर डीमांड मागणी रजिस्टरची पाहणी केली. रजिस्टर क्रमांक खालील प्रमाणे

| **मालमत्ता कर डीमांड रजिस्टर क्रमांक** | **पाणीपट्टी कर डीमांड रजिस्टर क्रमांक** |
|---|---|
| B.१४,A-२६,A-२८,A-२१<br>५/३, A-१५, A-२०<br>जुने ABC | ९२,२५,४७,६८,<br>C-६ /सन २०१३-१४ |

सदरील काही रजिस्टरचे पाने फाटलेले असून, प्रमाणित केलेले नाही. त्यामुळे त्यांची वैधता सिध्द होत नाही. डिमांड रजिस्टर मालमत्त, पाणीपट्टी कराची नोंद घेतांना प्रत्येक पानावर लिपीक व वॉर्ड अधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

**विभागाने प्रत्येक कर रजिस्टर अद्ययावत व प्रमाणित करून त्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. अभिलेखे अद्ययावत ठेवणे याबाबत विभागाअंतर्गत नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचा-यावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १९: व्यावसायीक मालमत्तांच्या थकबाकी रकमांची मागणी नविन मागणी नोंदवहीत नोंदविली नसल्याने मनपाचे रक्कम रू.५,०५,७५४/-चे आर्थिक नुकसानी बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयातील जुने ABC व्यावसायीक मागणी नोंदवहीतील नोंदीचा नविन मागणी रजिस्टर ABC मधील नोंदी सोबत ताळमेळ घेतला असतांना असे निदर्शनास आले की जुन्या मागणी रजिस्टर मधील नोंदी नविन रजिस्टरला नोंदविलेल्या नाहीत. याबाबतचा स्वतंत्र विवरण तक्ता या अर्धसमासासोबत देण्यात आलेला आहे.

तसेच काही मालमत्तांचा संगणकीय मालमत्ता क्रमांक असतांनाही त्याची नोंद संगणकीय अभिलेख्यात दिसून आलेली नाही.

सामान्य कराचा दर कमी दर्शविण्यात आला, वापर निवासेत्तर असतांना निवासी दर्शविलेला आहे. त्याबाबतचे आदेश लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही.

सेवरेज कराच्या रकमेची थकबाकी पुढे नोंदविलेली नाही. अशा बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

उपरोक्त मुद्यांवर तपासणी करुन शहानिशा करुन आवश्यक त्या दुरुस्त्या करुन अभिलेखे अद्ययावत करण्यात यावेत.

उपरोक्त नोंदी या केवळ नाममात्र तपासल्या असून वॉर्ड कार्यालयातील इतरही मागणी रजिस्टर मधील नोंदी अद्ययावत असल्याची खात्री करुन सर्व नोंदी योग्य असल्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास अर्धसमास पत्र क्र.१९ सोबत दिलेल्या यादीसह अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन दर्शविलेले नाही.

**विभागाने उक्त परिच्छेदात नमूद मुद्यांप्रमाणे कार्यवाही करून तसा अनुपालन अहवाल सादर करावा.**

**परिच्छेद क्र. २० : वॉर्ड - ड कार्यालयातील मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.१६/१ मधील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयातील मालमत्ता मागणी रजिस्टर क्रमांक १६/१ मधील मागणी व थकबाकीच्या नोंदी चाचणी स्वरुपात पाहिले असता मालमत्ता रक्कम वसूल करतांना मागील थकबाकी वसूल न करता पुढील रक्कम वसूल करण्यात आली. तसेच करयोग्य मूल्य कमी करण्यात आले असून त्या बाबतचा आदेश उपलब्ध झालेला नाही.

उपरोक्त नोंदी या केवळ नाममात्र तपासल्या असून वॉर्ड कार्यालयातील इतरही मागणी रजिस्टर मधील नोंदी अद्ययावत असल्याची खात्री करुन सर्व नोंदी योग्य असल्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास अर्धसमास पत्र क्र.२० सोबत दिलेल्या यादीसह अनुपालन सादर करण्यास कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन दर्शविलेले नाही.

**विभागाने उक्त परिच्छेदात नमूद मुद्याप्रमाणे कार्यवाही करून तसा अनुपालन अहवाल सादर करावा.**

**परिच्छेद क्र. २१ : संगणकीय मालमत्ता क्र.D००००८८७ व्यावसायीक असतांना संगणकीय अभिलेख्यात निवासी वापर दर्शविल्यामुळे मनपाचे होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र. D००००८८७ ही अर्थ कॉम्प्लेक्स शॉप क्र.२१०,२११,२१२ केसरसिंगपुरा CTS No.१८००५ व १८०११ बाबत आहे. सदरील मालमत्तेची नोंद जुने ABC रजिस्टर पान क्र.३७५वर असून त्याची नोंद नविन ABC रजिस्टर क्र.३११ वर घेण्यात आली परंतू रजिस्टरमध्ये

संबंधित मालमत्तेची मागणी नोंदविलेली नाही. संबंधितांची मालमत्ता व्यावसायीक असतांना संगणकीय अभिलेख्यात निवासी वापर दर्शविलेला आहे. करयोग्य मूल्य रू.१५२८२/- आहे. संबंधिताकडे खालील प्रमाणे थकबाकी व चालू मागणी शिल्लक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | दिनांक १.१.२०११ ते ३१.३.२०१२ पर्यंत सेवरेज कराची रक्कम | रू.८४०/- |
| २. | सन २०१२-१३ व २०१३-१४ ची रक्कम | रू.२८८८०/- |
| | एकूण थकबाकी रक्कम रू. | रू. २९७२०/- |
| ३. | सन २०१४-१५ ची मागणी रक्कम | रू.१४४०/- |
| | | **एकूण रक्कम रू. ४४,१६०/-** |

संगणकीय अभिलेख्यात दुरूस्ती करून नियमाप्रमाणे थकीत रकमेवर व्याज आकारून संबंधितांना दुरूस्ती देयक देवून वसूली करण्यात यावी. तसेच नविन ABC रजिस्टर मध्ये नोंद घेवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करण्यास कळविण्यात आले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.

**विभागाने संगणकीय अभिलेख्यात दुरूस्ती करून नियमाप्रमाणे थकीत रकमेवर व्याज आकारून कराची वसूली करावी. केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवालासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २२ : संगणकीय मालमत्ता क्र.D००००८८१ मीश्र वापर असतांना संगणकीय अभिलेख्यात केवळ निवासी वापर दर्शविल्यामुळे मनपाचे होत असलेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र. D००००८८१ चा वापर निवासी व व्यावसायीक असा आहे. घर क्रमांक ४-९-७० व ७१, CTS क्र.५२२४, शॉप क्र.१,२,३,४,७,८,९ व पवार प्लाझा औरंगपुरा या मालमत्तेस कर आकारणी पत्र क्र.विक/१/२४१/२०११-१२, दिनांक २४.११.२०११ अन्वये निवासी करयोग्य मूल्य रू.३१३९५/- व्यावसायीक कर योग्य मूल्य रू.१६०९२/- दिनांक १.१०.२०११ पासून आकारले आहे. जुना कर दिनांक ३०.९.२०११ पासून आकारले आहे. जुना कर दिनांक ३०.९.२०११ पर्यंत पुढे बंद अशी नोंद आहे. सदरील आदेश लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेले नाही. जुने ABC रजिस्टर पान क्र.३६३ वरील नोंद नविन ABC रजिस्टर पान क्र.२९९वर घेण्यात आली आहे. जुने मागणी रजिस्टरवर मागील रजिस्टरचा संदर्भ दिलेला नाही. संबंधितास अभिलेख्याची मागणी केल्यावर मागील मागणी रजिस्टर क्र.१४B - ३२७ व रजिस्टर क्र.१४B-३२९ उपलब्ध झाले. उपरोक्त कर आकारणीचे आदेशानुसार संबंधितांकडे खालील प्रमाणे थकबाकी प्रलंबित आहे.

| अ.क्र. | वर्ष | मागणी | वसूली | थकबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | १.१०.११ ते २०१३ | २२४५८/- | ७०५८/- | १५४००/- |
| २ | २००८ ते २०११(रजि क्र.१४B प्रमाणे) | ४०००/- | ३६९०/- | ३१०/- |
| ३ | २०१२ ते २०१४ | ७७५६०/- | २१४७६/- | ५६०८४/- |
| | | **१,०४,०१८/-** | **३२,२२४/-** | **७१,७९४/-** |

रजिस्टर क्र.१४/B पान क्र.३२७ व ३२९ वरील थकीत रक्कम पुढील मागणी रजिस्टरमध्ये दर्शविलेली नाही. तसेच थकबाकी रक्कम रू.७१७९४/- व चालू मागणी सन २०१४-१५ रू.३८७८०/-

एकूण रू.१,१०,५७४/- व नियमाप्रमाणे व्याज आकारणी करून दुरुस्ती रकमेसह वसूली करण्यात यावी. देयकात मोठे निवासी कराचा समावेश केलेला नाही. दुरूस्तीच्या वेळी याबाबत सुध्दा दुरूस्ती व्हावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करून संबंधिताकडून कराची वसूली करून केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवालासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २३ : नविन मागणी नोंदवहीत नोंद घेण्यात येतांना D००००८७१ ची मागणी मागणी नोंदवहीत न दर्शविल्याबाबत.**

D००००८७१, P.No.२५ CTS No.२०२९५/२/४३, पान क्र.३४७ करयोग्य मूल्य १४१९१ दर्शविलेले आहे.

सदर मालमत्तेची सन २०१३-१४ ची कर वसूली करण्यात आलेली नसून नविन रजिस्टर ABC वर सदरील नोंद घेण्यात आलेली नाही. सदरील बाबीमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येते ही बाब गंभीर आहे.

उपरोक्त प्रमाणे नोंदी तपासून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. २४ : सामान्य करात दिलेल्या सवलती बाबत.**

सेक्रेटरी - महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल अजबनगर, करयोग्य मूल्य ५१,९५९/- असून दिनांक ३०.३.१९९०, कार्यालयीन पत्र क्र. जा.क्र./कआ/५२९/९० अन्वये कर आकारणी केलेली आहे.

सामान्य करात सन २०१०-११ व सन २०११-१२ या वर्षात (१००%) पूर्णपणे सूट दिल्याचे निदर्शनास आलेले असून सन २०१२-१३ पासून सामान्य कर आकारण्यात आलेला आहे. सदर प्रकरणांत संबंधितांना सामान्य करात १००% सूट कोणत्या वर्षापासून दिली याचा बोध झालेला नाही. तसेच सन २०१२-१३ पासून सामान्य कर पुन:श्च आकारला गेला याबाबतही लेखा परीक्षण पथकास कार्यालयीन आदेश प्राप्त झालेले नाही.

**दोन्ही बाबीसंबंधी कार्यालयाने निर्गमित केलेले आदेश लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून द्यावेत असे कळविण्यात आले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. उक्त संस्थेस दिलेली सवलत योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाबा संशयास्पद असून प्रशासकीय कार्यवाहीअंती सविस्तर खुलाशासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २५ : संगणकीय मालमत्ता क्र.D००००८८६ ही व्यावसायीक असतांना सन २०१४-१५ या वर्षात निवासी वापर दर्शवून मनपाचे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

प्लॉट क्र.४५, CTS No.२/३१/A रॉयल कोर्ट हॉटेल, केसरसिंगपुरा, अशोका हॉटेल ले आऊट, अदालत रोड, औरंगाबाद या मालमत्तेस कर आकारणी क्र.२५९८/२०११-१२, दिनांक १.२.२०१२ पासून करयोग्य मूल्य रू.८९५४३/- दर्शविलेले आहे. ती नोंद जुने ABC रजिस्टर पान क्र.३७३ वर घेण्यात आलेली आहे. सन २०१४-१५ मध्ये नविन मालमत्ता मागणी नोंदवही ABC पान क्रमांक ३०९ वर थकबाकी व चालू मागणीची नोंद घेतलेली नाही. संगणकीय अभिलेख्यात करयोग्य मूल्य व्यावसायीक वापरा ऐवजी निवासी वापर दर्शवून संबंधितांना देयक अदा केले आहे. दिलेले देयक अयोग्य असून खालील प्रमाणे थकबाकी व चालू मागणी वसूलीस पात्र आहे.

| तपशिल | मागणी | वसूली | शिल्लक |
|---|---|---|---|
| २०१२-१३ | ८४,४३१/- | ३००००/- | ५४,४३१/- |
| २०१३-१४ | ८४,४३१/- | -- | ८४,४३१/- |
| २०१४-१५ | ८४,४३१/- | -- | ८४,४३१/- |
| | | **एकूण** | **२,२३,२९३/-** |

संगणकीय अभिलेख्यात दुरुस्ती करुन थकबाकीसह चालू मागणी वसूल करुन लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन दर्शविण्यात आलेले नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती सविस्तर अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २६ : संगणकीय मालमत्ता क्र.D००२३५१९ या मालमत्तेची सन २०१३-१४ ची थकीत रक्कम रू.५०६५२/- संगणकीय अभिलेख्यात दर्शविलेली नसल्याबाबत.**

मालमत्ता कराच्या व्यावसायीक नोंदीचे जुने ABC रजिस्टर पान क्र.३९१ वरील नोंद नविन ABC रजिस्टर पान क्र.३२९ वर घेतांना केवळ नावाचा उल्लेख आहे. संबंधितांकडेसन २०१३-१४ ची थकबाकी रू.५०,६५२/- व सन २०१४-१५ या वर्षाची चालू मागणी रू.५०,६५२/- नविन रजिस्टर मध्ये नोंदविलेली नाही.

त्याच प्रमाणे संगणकीय अभिलेख्यात केवळ सन २०१४-१५ ची चालू मागणी रक्कम रू.५०६५२/- चाच उल्लेख आहे. थकबाकी रू.५०६५२/- चा उल्लेख नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रकरणी नविन ABC नोंदवही पान क्र.३२९ वर थकबाकी व चालू मागणी रकमेची नोंद घ्यावी. त्याच प्रमाणे संगणकीय अभिलेखे अद्ययावत करुन संबंधितांकडून मालमत्ता कराच्या रकमेची थकबाकीसह वसूली करुन लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन दर्शविण्यात आलेले नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती सविस्तर अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २७ : बेबाकी प्रमाणपत्र देतांना मालमत्ता कर व पाणीपट्टी यांच्या नोंदी तपासून संबंधितांकडे थकबाकी नसल्यानंतरच बेबाकी प्रमाणपत्र देणे बाबत.**

वॉर्ड कार्यालयाच्या बेबाकी प्रमाणपत्राबाबत नाममात्र प्रकरणांची संचिका व वितरीत करण्यात आलेले प्रमाणपत्र तपासले असतांना त्यातील पाणीपट्टीच्या रकमेबाबत निरंक असा उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच संचिकेत संबंधितांकडे नळ नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेण्यात येवून बेबाकी प्रमाणपत्र अदा केलेले आहे. तर काही प्रकरणात संबंधित पाणीपट्टी वसूली लिपीक यांचे अभिप्राय घेवून प्रमाणपत्र दिलेले आहे.

पाणीपट्टी वसूली लिपीकाने संचिकेत आपला अभिप्राय नोंदवितांना मागणी रजिस्टर नुसार नळ कनेक्शन आढळून आले नाही असे अभिप्राय दिलेले आहे.

सदरील प्रकरणी नळ कनेक्शन बाबत बे - बाकी प्रमाणपत्र देण्यापूर्वी सक्षम प्राधिका-याचा अभिप्राय आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे अभिप्राय न घेतलेल्या नाममात्र प्रकरणांची यादी पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | नांव | पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | एम.सी.मेहेर व श्री.एस.सी.तरटे | घर नं.४-१९-९३ जरीपुरा | |
| २ | सौ.सुभद्रा बी धानोरकर (धनेधर) | ४-१९-१०२/६४ बापुनगर | |
| ३ | तुकाराम उदाराम बन्सवाल | ५-११-६, पदमपुरा | |
| ४ | रामचंद्र गोलाजी बनकर | ४-१९-५३/२२८ गौतमनगर | |
| ५ | चंद्रकलाबाई विश्वनाथराव दोमकोंडवार | ३०, जालाननगर | |
| ६ | राधा वल्लभ रामनाथ धुत इंडियन मेडीकल असो.बँक | केसरसिंगपुरा | |
| ७ | हनिफ खॉ वाशिल खॉ | ४-१४-५३/८० बहादुरपुरा | |
| ८ | लक्ष्मीबाई (धोंडिराम) छोटीराम जीवनलाल | ५-११-५४ पदमपुरा | |
| ९ | शिखा आनंददिप अग्रवाल | रविकिरण अपार्टमेंट श्रेयनगर | |
| १० | कृष्णासाहेबराव पाटील व जयराम नाथु साळुंके | CTS No -२०/४९ ५/१ समर्थनगर | संचिकेत नोंद करतांना open plot असतांना NA च्या मागणी रजिस्टर ऐवजी पाणीपट्टी असा उल्लेख केलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | अशोक चिंकुजी इंगोले | क्रांतीनगर | |
| १२ | मो.सिराज ख्वाजा मिया | ४-२३/८०५, शहाकॉलनी उस्मानपुरा. | |
| १३ | बबाबाई बंडेराव गायकवाड | ५-२४-२७/१९ कामगार कॉलनी, खोकडपुरा | |
| १४ | संगिता आनंद डांगे | श्रेयस अपार्टमेंट श्रेयनगर | |
| १५ | निर्मला अनिल जाधव | दाऊदपुरा रमानगर | |
| १६ | सुनिल गोवर्धन खैरनार | दाऊदपुरा रमानगर | |
| १७ | वासंती शिवादास चौधरी (पदमाकर मधुकर मांडे) | फ्लॅट क्र.७, लक्ष्मीनारायण अपार्टमेंट | वॉर्ड अधिका-यांनी स्थळ पाहणीचे आदेश दिल्यानंतर मागणी रजिस्टर क्र.१३/३४३ वर मागणी आढळून आली. नावाऐवजी फ्लॅट क्रमांकावरुन तपासले. |
| १८ | प्रकाश दामोधर पुजारी | रोकडा हनुमान कॉलनी | |
| १९ | बन्सीलाल अंबादास डोंगरदिवे | ४-५-१४८ भाग्यनगर | |
| २० | दिवाकर अनंतराव जोशी | फ्लॅट नं , एल-७ तिरुपती सुप्रिम, जालाननगर | इमारतीत असलेल्या नळ कनेक्शनची वसूली केल्याबाबची माहिती अप्राप्त. |
| २१ | अजितसिंग राठोड, राजधी अजिसिंह राठोड | F-१९, तिरुपती सुप्रिम जालाननगर | इमारतीत असलेल्या नळ कनेक्शनची वसूली केल्याबाबची माहिती अप्राप्त. |
| २२ | मोहनराव पुंजाजी इंगळे | घर क्र.४-१९-५३/२६ बहादुरपुरा | |
| २३ | नामदेव प्रधान | ४-१९-१०२/६ बापुनगर | |
| २४ | जगदीश भालाराम बाहेती दिलीप मनाजी तारडे | सारा प्राईड रणजितनगर | |
| २५ | विनिता गर्दे | प्लॉट क्र.१५,मित्रमंडळ कॉलनी | |
| २६ | सरस्वतीबाई टी साबळे | ४-१९-५४/३२/A गांधीनगर | |
| २७ | प्रकाश बाबुराव जाधव | मालजीपुरा | |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | शेख मक्बुल शेख चाँद, शेख सलामत शेख सिराज | घर नं.४-१८-२६/P जाफरगेट | |
| २९ | रखमाजी मणिराम कुटारे | ५-११-२२, पदमपुरा | |
| ३० | मारुती पांडुरंग शेळके | ५-१७-३३/४४८ समतानगर | |
| ३१ | दर्शनिसंग इंदरसिंग सोधी केवलसिंग इंदरसिंग सोधी | क्रांतीचौक | |
| ३२ | दत्तात्रय वसंत सुभेदार | घर नं.४-१९-५३/१०३/१ बंजारा कॉलनी | |
| ३३ | बाबुलाल काशिराम कांबळे | ५-१२-६९/२, पद्मपुरा | |
| ३४ | प्रकाश रामाजी बिरारे | बापुनगर | |
| ३५ | अजमत उल्ला खॉ, असदउल्ला खॉ पिता हाजी सरदार खॉ | ५-१०-२६/२ कोकणवाडी | |
| ३६ | सय्यद अफजलउद्यीन सय्यद मजहरुद्यीन नेहरी | ५-२५-७९ अजबनगर | |
| ३७ | महावीरकुमार पन्नालाल गंगवाल | ५-२६-१/१/१ अजबनगर | |
| ३८ | वामन कोंडीराम मोकळे गंगाधर रंगनाथ पोळ | ५-१०-२१/३ कोकणवाडी | |
| ३९ | अभयकुमार प्रेमराज बोरा | ५-२६-४६/P अजबनगर | |

अ.क्र.१७ वासंती शिवदास चौधरी, लक्ष्मी नारायण अपार्टमेंट यांचेकडे दिनांक १८.६.२०१३ नुसार सादर केलेल्या टीपणी मध्ये नळ नाही असे अभिप्राय पाणीपुरवठा वसूली विभागातील कर्मचा-यांचे असल्याबाबत उल्लेख आहे. या सादरीकरणास वॉर्ड अधिकारी यांनी स्थळ पाहणी करा असे आदेश दिल्यानंतर संबंधितांकडे नळ असल्याचे समजले. नळाची नोंद वासंती शिवराम चौधरी यांचे ऐवजी पद्माकर मधुकर पांडे यांच्या नावाची असून त्यांची पाणीपट्टीची पावती जोडून बेबाकी दिलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, इतरही अशाच नळ नसल्याचे अभिप्राय, नळ बंदचा अभिप्राय व नळ नसल्याचे प्रतीज्ञापत्र प्रकरणी सुध्दा स्थळ पाहणी करून खात्री करणे आवश्यक होते. परंतू तशी कार्यवाही विभागाने केलेली नाही. तसेच पदमाकर मधुकर पांडे यांची सन २०१३-१४ ची पावती देतांना सन २०११-१२ या वर्षात रू.१८००/- पावती क्र.१५२९९ पुस्तक क्र.१५३ दिनांक २.३.२०१२ अन्वये वसूलीची नोंद मागणी रजिस्टरला आहे. सदरील ठिकाणी ३/४" व्यासाचे नळ कनेक्शन असल्याने रू.२९२५/- वसूल न केल्यामुळे मनपाचे रू.११२५/- च आर्थिक नुकसान झालेले आहे. संबंधिताकडून रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

तसेच संगणकीय मालमत्ता क्र.२४६४४ र.नं.८/१७१ जुना संगणकीय क्र.D००००२९६७ अन्वये F१०४/२३३३८ दिनांक ११.७.२०१३ नुसार रू.४५०६/- चा भरणा सन २०१३-१४ पर्यंत केलेला आहे. बेबाकी प्रमाणपत्र क्र.१६७६/१३, दिनांक २५.७.२०१३ अन्वये वितरीत केलेले आहे. परंतू सन २०१४-१५ पर्यंतची मागणी बील क्र.३६५७६ वर रू.४६००/- दिनांक ३१.३.२०१४ पर्यंतची थकबाकी संगणकात दर्शविली आहे. बेबाकी प्रमाणपत्र दिलेले असतांना संगणकीय अभिलेख्यात पुनश्च थकबाकी का दर्शविली गेली याचा खुलासा व्हावा.

**विभागाने ज्या प्रकरणांमध्ये सक्षम प्राधिका-याचा अभिप्राय घेतला नाही अशी सर्व प्रकरणे तपासावीत. अ.क्र.१७ अन्वये दिलेल्या बेबाकी प्रमाणपत्रातील पाणीपट्टी रू.११२५/- संबंधितांकडून वसूल करावी तसेच बेबाकी प्रमाणपत्र दिलेले प्रकरणे योग्य आहेत याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२८: वॉर्ड-ड कार्यालयात प्राप्त झालेल्या सन २०१३-१४ मधी स्वच्छता साहित्याबाबत.**

सन २०१३-२०१४ या वर्षात प्राप्त झालेल्या स्वच्छता साहित्याचे अभिलेखे तपासण्यात आली. स्टॉक रजिस्टर क्र.१०९,११० व १११ विहीत नमुन्यात अभिलेखे नाहीत केवळ एकाच साध्या रजिस्टरमध्ये प्राप्त साहित्य, वाटप व शिल्लक याबाबतच्या नोंदी घेतलेल्या आहेत. फावडे, टोपले, खुरपे इत्यादी सारखे साहित्य नव्याने वाटप करतांना खराब झालेले जुने साहित्य जमा करून घेणे आवश्यक होते, परंतू जुने साहित्य जमा केलेले नाहीत. तसेच सक्षम प्राधिका-याने साक्षांकित केलेले नाही.

**विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

# वॉर्ड - अभियंता
# लेखापरीक्षण अहवाल.
# सन २०१३-२०१४.

**परिच्छेद क्र. १ : लेखापरीक्षण कामी अभिलेखे उपलब्ध करुन दिलेली नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान मागणी करुनही खालील अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाही.

१. स्टॉक रजिस्टर क्र.१०९,११० व १११.

२. जडसंग्रह नोंदवही

३. मत्ता (Assets) रजिस्टर.

४. ए-वन व रेटलिस्टच्या कामाच्या संचिका.

५. बी-१ निविदा कामाच्या अपूर्ण संचिका.

**उपरोक्त प्रमाणे अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अतिशय गंभीर असून संशय निर्माण करणारी आहे. याबाबत विभागाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २ : सन २०१३-१४ या वर्षात फायर स्टेशन, रेल्वेस्टेशन येथील क्वॉर्टरची दुरुस्ती करणे. या कामाबाबत (अं.प.रक्कम रू.१,९८,७५८/-) (खर्च रक्कम रू.१,८४,२६३/-)**

फायरस्टेशन, रेल्वेस्टेशन येथील क्वॉर्टरची दुरुस्ती करणे कामाची निविदा मागविण्यात आल्या असतांना ई - निविदा विभागातून ३ निविदा विक्री झाल्या. ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची ७.५% निविदा अशफाक मोहीयुद्यीन फारुकी या कंत्राटदाराची असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९८,७५८/- आहे. संबंधिताची ७.५% कमी दराची निविदा स्विकारण्यात आली. तद्नंतर संबंधितांनी २% अनामत रक्कम रू.५०००/- बँकेचे FDR क्र.४७८१४ दिनांक २७.११.२०१२ अन्वये करारनाम्यासह सादर केली. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभि-ड/८३/२०१३, दिनांक २९.४.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशात कामाची मुदत २ महिने दर्शविलेली आहे. सदरील काम दिनांक २८.२.२०१४ रोजी पूर्ण होवून संबंधितांना रू.१,८४,२६३/- रकमेचे देयक अदा करण्यात आलेले आहे. सदरील संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कार्यादेशात कामाची मुदत २ महिने दर्शविलेली असतांना काम दिनांक २८.२.२०१४ रोजी पूर्ण झालेले आहे. मुदतवाढ देतांना कंत्राटदाराने बाजारात रेती उपलब्ध झाली नाही, नागरीकांनी काम वेळेवर न करु देणे अशी कारणे देवून विनंती अर्ज केल्याचे संचिकेतील पान क्र. Ns-५ वर शाखा अभियंता यांनी टीपणीत नमूद केलेले आहे. परंतू संचिकेत कंत्राटदाराचा अर्ज नाही.

२. सदरील कामाच्या ॲटम क्र.५,७ व १२ मध्ये Quantity मध्ये अनुक्रमे २३१%, १५९% व १७४% वाढ झालेली आहे. B१ निविदा पुस्तीकात clause क्र.३८ नुसार Quantity मध्ये २५% वाढ अभिप्रेत आहे. विभागाने संचिकेतील पान क्र.Ns-५ वरील टीपणीत उपरोक्त ॲटमचे परिमाणामध्ये वाढ झाली. परंतू निविदेतील इतर बाबींमध्ये बचत झाल्याचे दर्शवून तसेच कामावरील एकंदरीत खर्च देय मर्यादेत असल्याबाबत सादरीकरण केलेले आहे. परंतू केलेले सादरीकरण हे नियमबाह्य आहे. लेखा शाखा, तांत्रीक कक्ष या विभागांनी सुध्दा देयक मंजूरी पूर्वी Quantity मधील वाढ सक्षम प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिलेली नाही व मान्यता घेतलेली नाही.

जास्तीच्या परिमाणावर खालील प्रमाणे झालेला खर्च का अमान्य करण्यात येवू नये याचा खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ५ | Providing and applying oil bound distemper etc दर रू.३९.९० | २७५.४० | ९११.६१ | ६३६.२१ | २५३८५/- |
| ७ | P/F in position reinforced plastic door etc complete दर रू.२७६५.७० | ५.४० | १४.०० | ८.६० | २३७८५/- |
| १२ | P/a three coats of synthetic enamedl paint etc. दर रू.५३.५६ | ३२.४० | ८८.८८ | ५६.४८ | ३०२५/- |
| | | | | **एकूण** | **५२,१९५/-** |

३. देयकातून करण्यात येणा-या विविध कपाती पैकी कंत्राटी कामाचे विमापत्र संचिकेत नाही. तसेच याबद्यल १% रक्कम रू.१८४३/- देयकातून कपात केली किंवा नाही याबाबत खात्री झाली नाही.

४. कंत्राटदाराने करारनाम्या सोबत जमा केलेला FDR हा सन २०१२ चा आहे. प्रत्यक्षात कामाची निविदा दिनांक २९.१.२०१३ रोजी उघडण्यात आलेली आहे. त्यामुळे निविदा उघडण्यापूर्वीचा FDR स्वीकारणे योग्य नाही.

५. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तीका क्र.२८०२ उपलब्ध करुन दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३ : सन २०१३-१४ या वर्षात औरंगाबाद शहरातील अमरप्रीत - महर्षी दयानंद चौकात मा.हिंदू ह्दय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या नविन वाहतूक बेटाचे सुशोभिकरण करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.९,८८,८६०/-) (खर्च रक्कम रू.९,८४,३३०/-)**

सन २०१३-२०१४ या वर्षात विषयांकित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व एकच निविदा अंदाजपत्रकीय दराची प्राप्त झाली. अं.प.दराची श्री.आर.बी.रूडसमुद्र यांची निविदा स्वीकृत करण्यात आली. निविदा स्वीकृती नंतर संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर संबंधितांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/उपअभियंता ड/४३२४/१४, दिनांक १८.१.२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत दोन महिने होती. काम दिनांक २९.३.२०१४ रोजी पूर्ण झाले. संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील बाबी आक्षेपाह निदशनास आलेल्या आहेत.

१. कामाची मुदत दिनांक १८.३.२०१४ रोजी पूर्ण झाली. प्रत्यक्षात काम दिनांक २९.३.२०१४ रोजी पूर्ण झाली. प्रत्यक्षात काम दिनांक २९.३.२०१४ रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र अभिलेख्यावरुन समजते. साधारणपणे ११ दिवस उशिराने काम पूर्ण झालेले आहे. उशिराने काम पूर्ण झाल्यानंतर कार्यादेशात नमूद केल्याप्रमाणे संबंधित कंत्राटदाराविरूध्द दंडात्मक कार्यवाही झालेली नाही.

२. ॲटम क्र.२,३,४,५,११,१३ व १४ मध्ये शेड्यूल्ड B मध्ये दर्शविलेल्या कामाच्या परिमाणापेक्षा अनुक्रमे २६९%, १९४%, १५६%, ७९१%,२४०%,३४३% व २५८% वाढ झालेली आहे. B१ निविदा पुस्तिका clause क्र. ३८ नुसार कामाच्या परिमाणामये २५% वाढ अनुज्ञेय आहे. विभागाने संचिकेतील पान क्र.Ns-९ वर केलेल्या सादरीकरणात उपरोक्त प्रमाणे वाढ झाली आहे. परंतू इतर बाबी मध्ये बचत झाल्याने एकंदरीत कामावरील खर्च हा देय मर्यादेत असल्याबाबत नमूद करून देयक मंजूरीस्तव प्रस्तावित केलेले आहे. परंतू याबाबत लेखाशाखेनेही देयक मंजूरी करणाला ॲटमच्या परिमाणा बद्यल भाष्य केलेले नाही. तसेच सक्षम प्राधिकरणाची परीमाणात वाढ झाल्याबाबतही मान्यता प्राप्त नाही. त्यामुळे खालील प्रमाणे नमूद खर्च का अमान्य करण्यात येवू नये याचा खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ४ | P/L Situ c.c.m-१० १:३:६ for and bedding दर रू.३२९७.९९ | ३.९६ | १०.१५३ | ६.१९३ | २०४२४/- |
| ५ | P/L Situ c.c.m-१५ १:२:४ for bed books दर रू.४३२७.१६ | ०.५३ | ४.७२० | ४.१९ | १८१३१/- |
| ११ | P/L २५ mm thick preast polished दर रू.३६०.६९ | १०.०० | ३३.९७ | २३.९७ | ८६४६/- |
| | P/A three coats Appex print दर रू.९७.६५ | ३९.६० | १७५.५० | १३.५९ | १३२७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Conveying of excarated material<br>दर रू.१३२.०५ | १५.८४ | ५६.७४ | ४०.९० | ५४०१/- |
| | | | | **एकूण** | **६०२१२/-** |

३. विभागाने लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तीका क्र.२२२४ उपलब्ध करुन दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

४. विभागाने पी.टी.वर्क्स रजिस्टर मध्ये घेतलेल्या नोंदी लेखाशिर्षनिहाय नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.६५ अंतर्गत रमानगर स्मशान भूमी विकसीत करणे कामाबाबत.(अं.प.रक्कम रू.६,९७,४९४/- ) (खर्च रक्कम रू.६,३५,५२४/-)**

वॉर्ड क.६५ अंतगत रमानगर स्मशान भूमी विकसीत करणेच्या कामासाठी ई निविदा विभागा मार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपयंत २ निविदा विक्री झाल्या. २ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी श्री.विजयसिंग परदेशी यांची निविदा ७.९९% कमी दराची असून ती स्वीकृत केली. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर त्यांना कार्यालयीन पत्र क.मनपा/उप-अभि-ड/२०१३, दिनांक ११.२.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ४ महिने होती. सदरील काम दिनांक २८.२.२०१३ रोजी पूर्ण झाले. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपाई निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कंत्राटी कामाचा विमा द न्यू इंडिया इंशुरन्स कंपनी लिमिटेड यांचे कडील आहे. विमा पत्रात विम्याचा कालावधी दिनांक २०.३.२०१३ ते १९.७.२०१३ असा दर्शविलेला आहे. सदरील कामाचा कालावधी कार्यादेशात नमूद प्रमाणे दिनांक ११.२.२०१३ पासून होता. काम दिनांक २८.२.२०१३ रोजी पूर्ण झालेले आहे असे असतांना काम पूर्ण झाल्यानंतरचे विमा पत्र कार्यालयात संबंधित कंत्राटदाराने सादर केले. त्यामुळे कामानंतर विमा काढणे, यामुळे विम्याचा हेतू साध्य होत नाही.

२. देयकातील ॲटम क्र.२,५,७ च्या परिमाणामये अनुक्रमे ४३%, ३४% व ६७% वाढ झालेली आहे. B१ निविदा पुस्तिका clause क्र.३८ नुसार परिमाणामध्ये २५% वाढ अनुज्ञेय आहे. याबाबत विभागाने कंत्राटदाराचे देयक मंजूर करतानाही परिमाणामध्ये वाढ झालेली असल्याबाबतची बाब निदर्शनास आणून दिलेली नाही. तसेच यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे खालील प्रमाणे दर्शविलेला खर्च का अमान्य करण्यात येवू नये याचा खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २ | Conveying excarated material दर रू.१३२.०० | १२३.७८० | १७६.६७ | ५२.८९ | ६९८१ |
| ५ | P/L Situ c.c. १:४:८ foundation and bedding दर रू.२९३८.८६ | २.०२५ | २.७२ | ०.६९५ | २०४२ |
| ७ | P/L Situ c.c. १:२:coping to plinth दर रू.४३२७.१६ | १.५४५ | २.५८ | १.०३५ | ४४७९ |
| | | | | एकूण | १३५०२ |

३. मोजमाप पुस्तीका क्र.२१७९ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५ :सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.६२ अंतर्गत भिमसंदेश चौकात मेनहोल चेंबर बांधणे व ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४९,९२७/- ) (खर्च रक्कम रू.४९,७२२/-)**

वॉर्ड क्र.६२ अंतर्गत भिमसंदेश चौकात मेनहोल चेंबर बांधणे व ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे हे काम तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) अन्वये मा.आयुक्तांची कार्योत्तर मान्यता घेतली आहे. उपलब्ध ठेकेदार श्री.सुरेश डोईफोडे यांचेकडून सदरील काम करुन घेण्यात आलेले आहे. कामाची सविस्तर संचिका तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. देयक अदा करतांना देयकातून कंत्राटी कामाची १% विमा रक्कम रू.४९९/- कपात केली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. कामाचे शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

३. ॲटम क्र.१ मधील खोदकामातून निघालेले साहित्याची परिमाण व ॲटम क्र.४ अन्वये Refiling चे परिमाण सारखेच असल्याने जागेवर surplus material कोणते शिल्लक राहिले याचा बोध होत नाही. तथापि ॲटम क.१० अन्वये वाहतूकीचा खर्च रू.२०९१/- अनुज्ञेय होत नाही.

४. मोजमाप पुस्तीका क्र.४१२४ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण पथकास संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर तपासणी करून अनावश्यक झालेला खर्च संबंधितांकडून वसूल करावा. त्याचप्रमाणे शासनाचे झालेले आर्थिक नुकसानही वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ६ : वॉर्ड क्र.६२ अंतर्गत भाग्यनगर येथे मेनहोल चेंबर बांधणे व ड्रेनेज लाईन टाकणे. (अं.प.रक्कम रू.१,४२,८९४/- )**

वॉर्ड क्र.६२ अंतर्गत भाग्यनगर येथे मेनहोल चेंबर बांधणेसाठी उक्त दर्शविल्याप्रमाणे अंदाजपत्रक रकमेचे सन २०१२-१३ च्या दरसूची नुसार बनविले असून काम तातडीचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) अंतर्गत करण्यात आले आहे.

उपलब्ध गुत्तेदार श्री.सुरेश डोईफोडे यांच्या कडून काम करून घेण्यात आलेले असून कामाची निविदा बी -१ असून मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक २४.०२.२०१४ रोजी घेण्यात आली असून कार्यादेश जा.क्र.मनपा/उपअभि/४६६०/२०१४, दिनांक ४.३.२०१४ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आले असून सदरील खच जलनि:सारण देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षकातून करण्यात आलेला आहे.

संचिकाची पाहणी करतांना खालील प्रमाणे बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेमध्ये B शेड्यूल्ड उपलब्ध नाही.

२. २% सुरक्षा अनामत (EMD)रक्कम रू.२८६०/- निविदा रक्कम ३६०/- ही कार्यादेश देण्यापूर्वी घेणे आवश्यक असतांना ती देयकातून वजावट करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

३. मोजमाप पुस्तीका क्रमांक २१०३ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

४. निविदा नियम ५४ विमास/१०९८/प्र.क्र./२८/९८ शासन हमी मंत्रालय मुंबई दिनांक १९.८.९८ अन्वये कामाचा विमा नाही. त्यामुळे संबंधितांकडून १% प्रमाणे १४२९/- रूपये वसूल करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास ७ दिवसात सादर करावा.

**उपरोक्त मुद्यांवर तपासणी करून अनावश्यक झालेला खर्च संबंधितांकडून वसूल करावा. त्याचप्रमाणे शासनाचे झालेले आर्थिक नुकसानही वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ७ :सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील गणपती विसर्जन विहीरीतील गाळ काढून साफसफाई करणे व रंगरंगोटीच्या कामाबाबत. (अं.प.रक्कम रू.४,९९,०००/- ) (खर्च रक्कम रू.४,८८,७२८/-)**

स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथील गणपती विसर्जन विहीरीतील गाळ काढून साफसफाई करणे व रंगरंगोटी देणेच्या कामाकरीता मा.आयुक्त यांच्या मान्यतेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) अन्वये उपलब्ध ठेकेदार चेअरमन स्त्री मजूर सहकारी संस्था यांना विचारणा

करण्यात आली. अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराने काम करण्यास तयार झाले. त्यानुसार संबंधितांनी अधिनियमाचे कलम ६७(३)(क) अन्वये काम मंजूर करण्यात आले. संबंधित कंत्राटदाराने महानगरपालिके सोबत सदरील कामाचा करारनामा रू.१००/- च्या मुद्रांकावर केला. तसेच २% रक्कम देयकातून कपात कार्यादेश देण्याची विनंती केली. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभियंता-ड/८०३/२०१३, दिनांक २१.८.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अंतर्गत काम मंजूर झालेले असतांना कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित कंत्राटदारा कडून २% सुरक्षा ठेव व निविदा रक्कम देयक अदायगीपूर्वी करणे आवश्यक आहे. सुरक्षा ठेव नंतर देयकातून कपात केल्याने सुरक्षा ठेव ठेवण्याचा हेतू साध्य होत नाही.

२. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/काअ/पापु/वॉर्डब/क/११६/२०१३, दिनांक २०.६.२०१३ अन्वये मा.आयुक्तांनी गणेश उत्सवा संदर्भात तयारी बाबतचे आदेश निर्गमित केले असतांना उशिराने सदरील कामाची संचिका प्रस्तावित करणे ही बाब आक्षेपार्ह आहे.

३. कामगार कल्याण निधीची रक्कम देयकातून कपात केली नाही. त्यामुळे शासनाचे रू.४८८७/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदरील रक्कम संबंधितांकडून वसूल करणे यावी.

४. कंत्राटी कामाचा विमा काम सुरु करण्यापूर्वी काढणे बंधनकारक आहे. तसे न करता देयकातून रक्कम कपात केलेली आहे. ही बाब अयोग्य आहे.

५. संचिकेत सदरील कामाचे शेड्यूल्ड B उपलब्ध नाही. तसेच अंदाजपत्रकावर कार्यालयीन अधिक्षक यांची स्वाक्षरी नाही.

६. मोजमाप पुस्तीका क्र.२८०२ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

७. सदरील कामाच्या ॲटम क्र.२ व ३ मये परिमाणामध्ये अनुक्रमे ४१% व ३८% वाढ झालेली आहे. B१ निविदा पुस्तीका clause क्र.३८ नुसार परिमाणामध्ये २५% वाढ अनुज्ञेय आहे. याबाबत विभागाने कंत्राटदाराचे देयक मंजूर करतानाही परिमाणामध्ये वाढ झालेली असल्याबाबतची बाब निदर्शनास आणून दिलेली नाहीच तर सक्षम प्राधिकरणाचीही मान्यता घेतलेली नाही. जास्तीच्या परिमाणावर झालेला खालील प्रमाणे खर्च का अमान्य करण्यात येवू नये ? याचा खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २ | Desilting /existing well intake well दर रू.६२८.९५ | ३४६.८४४ | ४८८.६७ | १४१.८२६ | ८९२०१/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | Tran.of desilted material with on १५०mm lead. दर रु.२७६.४४ | ३४६.८४४ | ४७८.८० | १३१.९५६ | ३६४७८/- |
| | | | | **एकूण** | **१,२५,६७९/-** |

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा. तसेच शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभाागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ८ : झांबड इस्टेट वॉर्ड क्र.६४ येथे अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे.**
**(अं.प.रक्कम रू.९,९७,८००/- ) (एकूण खर्च रू.१०,८२,८५२/-)**

झांबड इस्टेट वॉर्ड क्र.६४ येथे अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी निविदा मागविल्या गेल्या एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २ निविदा तांत्रिक दृष्ट्या बाद झाल्या. उर्वरीत २ निविदांपैकी १% कमी दराची श्री.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजूर करण्यात आली. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत कामाचा करारनामा केल्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड इ.ड/अशअ/१५१०/१३, दिनांक ४.१.२०१३ अन्वये कामाचे कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ३ महिने होती. काम विहित मुदतीत पूर्ण झाले असे अभिलेख्यांवरुन दिसून येते. एकूणच सविस्तर तपासणी केली असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. संबंधित कंत्राटी कामाचा विमा हा कार्यादेशाच्या आदेशापासून काढायला पाहिजे होता, परंतू कामाची मुदत संपल्यावर म्हणजेच ०३.०६.२०१३ ते २.१०.२०१३ पर्यंत काढलेले आहे. यामुळे विमा काढण्यामागचा हेतू साध्य होत नाही.

२. मोजमाप पुस्तिका क्र. १४०० लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. परिणामी लेखापरीक्षण करता आलेले नाही.

३. B निविदा पुस्तिकेतील clause क्र.३८ नुसार कामाचे परिमाणात २५% वाढ अनुज्ञेय आहे. तथापि खालीलप्रमाणे कामाच्या काही ॲटममध्ये मर्यादेपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. वाढीव परिमाणाच्या बाबतीत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

करिता खालीलप्रमाणे ॲटम निहाय दर्शविलेला जादा अदा खर्च का अमान्य करण्यात येवू नये याचा खुलासा करण्यात यावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Excavtion for road way in earth soil etc<br>दर रक्कम रू. ९४.५० | ६२.५४ | १३५.९४ | ७३.४ | ६९३६/- |
| ०२ | conveying the excavated from road site etc<br>दर रक्कम रू. १३२.०५ | ६२.५४ | १३५.९४ | ७३.४ | ९६९२/- |
| १२ | Providing & laying hot mix hot lid etc complete<br>दर रक्कम रू. २३५.१४ | १८४० | २०५४.६३ | २१४.६३ | ५०४६८/- |
| | | | | **एकूण** | **६७,०९६/-** |

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा व अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा तसेच शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ९ : वॉर्ड क्र.३७ अंतर्गत S.B.colony, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी येथे FRP बेंचेस बसविणे बाबत.(अं.प.रक्कम रू.१,९९,९९२/- + १,९९,९९२/- = ३,९९,९८४/-) (एकूण खर्च रू. ३,९९,९८४/-)**

वॉर्ड क्र.३७ अंतर्गत S.B.colony, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी या २ ठिकाणी FRP बेंचेस बसविणे बाबत स.नगरसेवक यांनी दिनांक २५.३.२०१३ व २८.३.२०१३ रोजी पत्र देवून त्यांचे सन २०११-१२ च्या नगरसेवक स्वेच्छानिधीतून बेंचेस बसविण्याबाबत विनंती केलेली आहे. दोन्हीही पत्र विभागाने स्वतंत्र संचिका तयार करुन लेखाविभागाच्या मान्यतेसाठी व अंदाजपत्रकीय नोंद करण्यासाठी सादर केल्या आहेत. लेखा विभागाने दोन्ही संचिका या सन २०११-१२ च्या नगरसेवक स्वेच्छा निधीतून स.नगरसेवकांच्या विनंती ऐवजी सन २०१२-१३ या वर्षात नोंदविलेले आहे. E-Tendering विभागामार्फत दिनांक ५.१२.२०१३ रोजी दोन ठिकाणच्या कामाचे परंतू एकाच वॉर्डात असलेल्या कामाच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. निविदा विक्री व स्वीकृतीच्या तारखेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त दोन्ही कामाच्या निविदा मॉडेल आर्ट वर्क्स यांच्या असून संबंधितांनी अंदाजपत्रकीय दराने निविदा E-Tendering मार्फत नोंदविलेल्या आहेत. संबंधिताची निविदा मा.आयुक्त यांनी स्वीकृत केल्यानंतर संबंधितांनी मनपा सोबत करारनामा केल्यानंतर त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उप.अभि ड/४४५० व ४४५१/२०१४, दिनांक ०४.०२.२०१४ अन्वये कार्यादेश देवून कार्यादेशात १ महिना कामाची मुदत नमूद केली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१) नगरसेवक स्वेच्छा निधी हा त्याच संदर्भिय वर्षात खर्च करावा लागतो की मागील वर्षाचा शिल्लक निधी सुध्दा वापरता येतो याचा बोध झालेला नाही. कारण सदरील प्रकरणी स.सदस्यांनी सन २०१२-१३ मध्ये पत्र देवून सन २०११-१२ या वर्षाचा स्वेच्छानिधी खर्च करण्यास्तव नोंदविण्यात यावा असे कळविले होते. लेखा शाखेने स.सदस्य यांचे पत्रानुसार नोंद न घेता सन २०१२-१३ मध्ये नोंद घेतलेली आहे हे करीत असतांना संबंधित स.नगरसेवकांची संमती घेतलेली नाही.

२) एकाच वॉर्डात एकाच वेळी एकसारख्याच कामाचे, एक सारख्या रकमेची निविदा असतांना त्याचे २ भाग करुन निविदा मागविणे ही बाब संयुक्तिक वाटत नाही.

३) कामाच्या शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

४) कंत्राटी कामाचा विमा united India Insurance Company Ltd. यांच्याकडे उतरविलेला आहे. तथापि विम्याचा कालावधी हा सदरील काम पूर्ण झाल्यानंतरचा असून विमा उतरविण्याचा हेतू या ठिकाणी साध्य होवू शकत नाही.

५) मोजमाप पुस्तिका ४०९२ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा व अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा तसेच शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १० : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.६२ अंतर्गत समतानगर येथील मेनरोडवर क्रांतीचौक पोलिस स्टेशनच्या अलीकडे मेनहोल चेंबर बांधणे बाबत. (अं.प.रक्कम रु.४२,४३३/-) कार्योत्तर मान्यता.**

वॉर्ड क्र.६२ अंतर्गत समतानगर येथील मेनरोडवर क्रांतीचौक पोलिस स्टेशनच्या अलीकडे मेनहोल चेंबर बांधले. हे काम तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क ) अन्वये आयुक्तांची कार्योत्तर मान्यता घेतली आहे.उपलब्ध ठेकेदार श्री.सुरेश डोईफोडे यांचे कडून सदरील काम करून घेण्यात आलेले आहे. कामाची सविस्तर संचिका तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. देयक अदा करतांना देयकातून कंत्राटी कामाची १% विमा रक्कम रु.४२४/- कपात केली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. कामाचे शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

३. मोजमाप पुस्तिका क्र.२१०३ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण पथकास संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

उपरोक्त मुद्यांवर तपासणी करून शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभाागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ११ : वॉर्ड क्र.५९ अंतर्गत फुले कॉलनी येथे नविन सभागृह बांधणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.५,९९,७५६/-)**

वॉर्ड क्र.५९ अंतर्गत फुले कॉलनी येथे महानगरपालिकेच्या खुल्या जागेत नविन सभागृह बांधणेसाठी B१ निविदा मागविण्यात आली असून मे.नाज डेव्हलपर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% जास्त दराने एकच निविदा प्राप्त झाली असून लेखाशिर्ष मनपा विकास इमारती शाळा व दवाखाने या शिर्षामधून हा खर्च करण्यात आला असून जा.क्र.मनपा/उप अभि.ड/१६६९, दिनांक २८.०१.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले आहे.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिका पान क्रमांक एनएस-२ वर नगररचना विभागाचा अभिप्राय मागविणे असे नमूद असतांना अभिप्राय नोंदविलेला नाही.
२. सभागृह बांधणेचे काम २५% जास्त दराने असतांना समक्ष वाटाघाटी करुन ते १०% जास्त मंजूर करण्यात आले. परंतू निविदा पान क्रमांक २६ वर ९% जास्त दराने दर नमूद केल्याचे निदर्शनास आले आहे.
३. मोजमाप पुस्तिका क्रमांक २७८९ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.
४. कामाचा विमा १% प्रमाणे रक्कम रु.५०९६/- वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेला नाही.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करुन याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभाागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १२ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.६१, समर्थनगर अंतर्गत पुष्पनगरी येथील नाना - नानी पार्कची देखभाल दुरुस्ती करणे.**
**(अं.प.रक्कम रू.४९,२४०/- खर्च रू.४८,३७१/-)**

वॉर्ड क्र.६१, समर्थनगर अंतर्गत पुष्पनगरी येथील नाना- नानी पार्कची देखभाल दुरुस्ती करणे कामाकरीता ई निविदा विभागाने निविदा मागविल्या होत्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत एकच निविदा मॉडेल आर्ट वर्क्स यांची प्राप्त झाली. निविदा अंदाजपत्रकीय दराची असून ती सक्षम प्राधिकरणाने स्वीकारल्यानंतर संबंधित एजन्सीने मनपा सोबत करारनामा केला. कार्यालयीन पत्र क्र.

मनपा/वॉर्डड/उपअभि/४४५३/२०१४, दिनांक ४.२.२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ३ महिने होती. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहे.

१. नाना - नानी पार्कची देखभाल दुरुस्तीच्या निविदेतील ॲटम क्र.३ पाण्याचे टँकर पुरविणे बाबत आहे. परंतू टँकरचे लॉग बुक लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

२. सदरील पार्कची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे झालेली आहे किंवा कसे याबद्यल उद्यान विभागाचे अभिप्राय नाहीत.

३. देखभाल दुरुस्तीचे कामाचा कालावधी ३ महिन्याचा असतांना दोनच महिने काम केलेले आहे. परंतू देयक पूर्ण अदा केलेले आहे.

४. मोजमाप पुस्तिका क्र.२७९१ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

५. सदरील पार्कचे एकूण क्षेत्रफळ किती ? त्यानुसार ॲटम क्र.२ चे दर निश्चित होणे अपेक्षित होते. (clearing,sweeping etc) परंतू त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले नाही.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करुन याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभाागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १३ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.६४, क्रांतीचौक येथे कलश मंगल कार्यालय मार्गात रस्त्यांचे डांबरीकरा करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२४,८८,५३३/- खर्च रू.२६,०७,९२०/-)**

वॉर्ड क्र.६४, क्रांतीचौक येथे कलश मंगल कार्यालय मार्गात रस्त्यांचे डांबरीकरण करणेचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ६ निविदा विक्री झाल्या. ६ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी एक निविदा तांत्रिक दृष्ट्या बाद झाली. उर्वरीत ५ निविदा पैकी ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा १% कमी दराची आहे. कमी दराची निविदा स्वीकृत केली. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड ई ड/अशअ/१५११/२०१३ दिनांक ४.११.२०१३ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत ४ महिने होती. काम दिनांक ३०.४.२०१३ रोजी पूर्ण झाले. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक ३.६.२०१३ पासून २.१०.२०१३ पर्यंत उतरविलेला आहे. प्रत्यक्षात कामाच्या कालावधीत विमा उतरविणे आवश्यक होते. काम झाल्यानंतर विमा उतरविण्याचा हेतू साध्य झालेला नाही.

२. देयकात ॲटम क्र.१० चे परीमाण ९४.४४ आहे. दर रू.३०४३.३२ नुसार रक्कम रू.२,८७,४११/- देय होतात. परंतू रू.२,९०,४५४/- कंत्राटदारास अदा केलेले आहे. त्यामुळे मनपाचे रू.३०४३/- चे आर्थिक नुकसान झालेले असून संबंधितांकडून जादा अदा रक्कम वसूल करण्यात येवून मनपा फंडात भरणा करावी.

३. सदरील कामाच्या परिमाणात विहीत कर्यादेपेक्षा जास्तीची वाढ झालेली असून त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे खालील प्रमाणे नमूद खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ११ | P/L Hot mix hot lid BB ३.३०% bitumen<br>दर रक्कम रू.५५३५.७० | १०५.१२ | २०४.५३ | ९९.४१ | ५,५०,३०४/- |
| १२ | P/L Hot mix hot lid etc complete<br>दर रक्कम रू.२३५.१४ | २१०२.५० | ३९२३.२६ | १८२०.७६ | ४,२८,१३३/- |
| | | | | **एकूण** | **९,७८,४३७/-** |

४. सदरील कामाची मोजमाप पुस्तीका क्र.१४०० लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करुन याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १४ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.३८, अंतर्गत बहादुरपुरा, गांधीनगर व बापुनगर भागात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.९,९८,५६३/- खर्च रू.८,१८,१३०/-)**

वॉर्ड क्र.३८ अंतर्गत बहादुरपुरा, गांधीनगर व बापुनगर भागात पेव्हर ब्लॉक बसविणेबाबतच्या कामाची निविदा ई - टेंडरिंग विभागामार्फत मागविली. एकूण ६ निविदा विक्री झाल्या व ६ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी मे.नाज डेव्हलपर्स यांची निविदा सर्वात कमी दराची आहे. १८.११% कमी दराची निविदा स्वीकृत केली. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत कामाचा करारनामा केल्यानंतर कार्यालयीन आदेश पत्र क्र.मनपा/उपअभि-ड/१७७६/२०१३, दिनांक ७.२.२०१३ अन्वये कामाचे कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ३ महिने होती. काम मुदतीत पूर्ण झालेले असल्याचे अभिलेख्यावरून दिसते. एकूणच संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१ . कंत्राटी कामाचा विमा पत्रात विम्याचा कालावधी काम पूर्ण झाल्यानंतरचा आहे. त्यामुळे विमा पत्राचा हेतू सफल होत नाही.

२. मोजमाप पुस्तीका क्र.२१७७ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्याचा परिणाम संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

३. B१ निविदा पुस्तीकेतील clause क्र.३८ नुसार कामाचे परिमाणात २५% वाढ अनुज्ञेय आहे. तथापि खालील प्रमाणे कामाच्या काही ॲटममध्ये मर्यादेपेक्षा जास्त वाढ

झालेली आहे. वाढीव परिमाणाच्या बाबतीत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. करीता खालील प्रमाणे ॲटमनिहाय दर्शविलेला जादा अदा खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ३ | Prov/laying ६०mm size hard trap stone soling including दर रक्कम रू.७३३.०१ | १११.३७ | १८६.१९ | ७४.८२ | ५४८.४४/- |
| ४ | Prov/fixing ६०mm thick fact c.c. block Italian दर रक्कम रू.६१२.०५ | ७४२.५० | ९३५.४६ | १९२.९६ | ११८१०१/- |
| | | | | एकूण | १,७२,९४५/- |

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करुन याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १५ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.६५, अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.१९,०२,३३६/- खर्च रू.२३,०८,०११/-)**

वॉर्ड क्र.६५ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाबाबत ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. २ निविदांची विक्री होवून दोन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेमध्ये एम.ए.सईद यांची कमी दराची निविदा अं.प.दरापेक्षा २०.१% जास्त दराची प्राप्त झाली. संबंधितांना वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले. दर २०.१% जास्त ऐवजी १५.६८% जास्त दर स्वीकृत करण्यात आले. संबंधितांना मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभि-ड/१७८२/२०१३, दिनांक ११.२.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ६ महिने होती. काम मुदतीत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत जोडलेले आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कंत्राटी कामाचा विमा ६ महिने कालावधी ऐवजी ३ महिने कालावधीचाच आहे. त्यामुळे विम्याचा हेतू सफल होत नाही.

२. मोजमाप पुस्तीका क्र.२५२६ व २१०५ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. ॲटम क्र.१,२ व ३ चे परिमाण १७४२.८७ आहे. ॲटम क्र.७ चे परिमाण १६३५.२८ वजा जाता १०७.५९ शिल्लक राहतात. ॲटम क्र.१३ चे परिमाण १९५.०० दर्शवून देयक अदा केलेले आहे. प्रत्यक्षात १०७.५९ परिमाणाचे देयक अदा करणे अभिप्रेत आहे. ८७.४१ जास्त परिमाणासाठी १२१-१५ दराने रू.१०५९० जास्तीचा अदा केलेला असून तो अमान्य का करण्यात येवू नये.

४. सदरील कामाचे परिमाणात B१ निविदा पुस्तीका clause ३८ नुसार २५% पेक्षा जास्त वाढ झाल्यास विहित कार्यवाही करून सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारची मान्यता विभागाने घेतलेली नसल्याचे लेखापरीक्षण पथकाचे निदर्शनास आलेले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे नमूद खर्च अमान्य का करण्यात येवू नये.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ८ | Repairing to existing MH chambers etc दर रक्कम रू.६२१.०० | ४० | ६४ | २४ | १४९०४/- |
| ९ | Providing and construction BBM circular MH chamber- etc दर रक्कम रू.५४५४.०० | ७५ | १३१ | ५६ | ३०५४२४/- |
| १० | Providing SFRC Frame & covere etc दर रक्कम रू.१८९२.०० | ७५ | ११५ | ४० | ७५६८०/- |
| | | | | **एकूण** | **३,९६,००८/-** |

५) शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत पहावयास मिळाली नाही.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १६ : वॉर्ड अभियंता कार्यालयातील विविध कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

संबंधित विभागाने केलेल्या कामाचे मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. The Maharashtra Public Works Manual च्या Appendix - १० मधील तरतूदी नुसार मोजमाप पुस्तिका लिहिणे, तपासणे व त्याचे जतन करणे इत्यादी बाबी स्पष्टपणे नमूद आहेत. मोजमाप पुस्तिका हे स्थायी कागदपत्रातील एक भाग असून ते अभिलेखे नेहमीसाठी संबंधित कार्यालयात उपलब्ध ठेवण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे. वॉर्ड अभियंता कार्यालयाने त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचा-याच्या नावाने मोजमाप पुस्तिका दिल्याचे तोंडी समजले. परंतू मोजमाप पुस्तिकेचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाहीत.

वॉर्ड अभियंता कार्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या संचिकांचे लेखापरीक्षण मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून दिलेल्या नसल्याने १००% लेखापरीक्षण होवू शकले नाही.

**उपरोक्त बाबीबाबत सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. तसेच संबंधित कामाच्या मोजमाप पुस्तिका सादर केलेल्या नाहीत. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब**

**संशयास्पद आहे. संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १७ :सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.६४, पन्नालाल नगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे.(अं.प.रक्कम रू. २४,८५,०००/- खर्च रू. २६,८०,२/-)**

वॉर्ड क्र.६४ पन्नालाल नगर येथील अंतर्गत रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणेसाठी ई - निविदा विभागा मार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ७ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी १ निविदा तांत्रिक दृष्ट्या बाद झाली. उर्वरीत ६ निविदापैकी ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा १% कमी दराची आहे. ती स्वीकृत झाली. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत करार केल्यानंतर त्यांना कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/वॉर्ड ई ड/अशअ/१५०७/१३, दिनांक ४.१.२०१३ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत ४ महिने होती. काम विहीत मुदतीत पूर्ण झाले. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक ३.६.२०१३पासून २.१०.१३ पर्यंत उतरविला आहे. प्रत्यक्षात कामाच्या कालावधीत विमा उतरविणे आवश्यक होते. काम झाल्यानंतर विमा उतरविल्यामुळे विमा उतरविल्याचा हेतू साध्य झालेला नाही.

२. सदरील कामाच्या परिमाणात विहीत मर्यादेपेक्षा जास्तीची वाढ झालेली आहे. निविदा नियम ३८ अन्वये परीमाणात २५% पर्यंत वाढ होणे अपेक्षित होते. परंतू संचिकेमध्ये काही ॲटम मधील वाढ ही २५% पेक्षा जास्त आहे. करिता खालील प्रमाणे नमूद खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Excvation for road way in earth soil etc<br>दर रक्कम रू.९४.५० | ७८.१५ | २७१.७८ | १९३.४३ | १८,२७९/- |
| ०२ | Conveying the excavated from road site etc.<br>दर रक्कम रू.१३२.०५ | ७८.१५ | २७१.५६ | १९३.४१ | २५,५४०/- |
| ०७ | Supplying hard murum of roadsite including etc<br>दर रक्कम रू.३३४.७३ | २५.७६ | ४४.०८ | १८.०८ | ६०५१/- |
| | | | | **एकूण** | **४९,८७०/-** |

३. सदरील कामाची मोजमाप पुस्तिका क्र.२७८५ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १८ :सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.९४, अंतर्गत रस्त्याचे बन्सीलालनगर अंतर्गत वॉचमन रूम बांधणे व स्वच्छता गृह बांधणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू. ४,५४,५०४/- खर्च रू. २,७७,००४/-)**

वॉर्ड क्र.९४ अंतर्गत बन्सीलाल नगर अंतर्गत वॉचमन रूम बांधणे व स्वच्छता गृह बांधणेचे कामाकरीता ई -टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. २ निविदा प्राप्त झाल्या त्यापैकी विशाल विजय परदेशी यांची ३०.३% कमी दराची निविदा प्राप्त झाली. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा करून दिल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/उपअभि-ड/१९०४/२०१३, दिनांक ४.३.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ४ महिने होती. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. सदरील काम हे मनपाच्या खुल्या जागेत आहे किंवा कसे ? याबाबत संचिकेत सादरीकरण नाही. विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार जर खुल्या जागेत काम केलेले असेल तर १०% पेक्षा जास्त बांधकाम अनुज्ञेय नाही. नगररचना विभागाचे अभिप्राय नोंदविलेले नाहीत. तसेच खुल्या जागेत स्वच्छता गृह बांधणे ही बाब नियमबाह्य आहे.

२. B१ निविदा पुस्तिकेतील clause ३८ नुसार २५% पेक्षा जास्त परिमाणांबाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नसल्याने खालील प्रमाणे झालेला खर्च अमान्य करण्यात का येवू नये याचा खुलासा करावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | Ex.for& in earth soil<br>दर रक्कम रू.१२६ | १५.१२ | २१.२६ | ६.१४ | ७७४/- |
| ३ | P/L in situ cc१:४:८ for fdn bedding<br>दर रक्कम रू.२९३८.८६ | ३.३५ | ४.५२६ | १.१७६ | ३४५६/- |
| ६ | P/casting in situ c.c. m-२० for R.C.C.beams lintel<br>दर रक्कम रू.६५५६.७९ | २.८१ | ३.६७२ | ०.८६२ | ५६५२/- |
| ८ | P/casting in situ c.c. m-२० for R.C.C.chajja<br>दर रक्कम रू.६७१४.२९ | ०.४० | ०.५१६ | ०.११६ | ७७९/- |
| १८ | Prov.internal cement plaster १२ mm thick in single coats<br>दर रक्कम रू.१३३.५१ | १७.८२ | ३१.६२ | १३.८० | १८४२/- |
| २२ | Pro/laying polished kotha stone flooring २५/३० thick including<br>दर रक्कम रू.७०९.७४ | १५.३७ | २६.५०९ | ११.१३९ | ७९०६/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४ | Pro/laying white glazed tiles<br>दर रक्कम रू.७५५.४५ | २.१६ | ३.२० | १.०४ | ७८६/- |
| ३१ | P/fixing on wall/celling floor G.I.pipe<br>दर रक्कम रू.१२९.१५ | ३०.०० | ६७.१० | ३७.१० | ४७९१/- |
| ३५ | P/fixing Indian type white glazed w/c pan<br>दर रक्कम रू.१३२३.०० | १.०० | २.०० | १.०० | १३२३/- |
| ३७ | P/fixing in position w Pvc ११० mm dia rain water pipes<br>दर रक्कम रू.२९२.९५ | ३.०० | ९.१० | ६.१० | १७८७/- |
| | | | | **एकूण** | **२९०९६/-** |

३. मोजमाप पुस्तीका क्र.२८०६ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

४. सदरील कामाचे देयक मंजूर करतांना सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरीविना देयक मंजूर केलेले आहे. तसेच लेखा शाखेनेही याबाबत तपासणी न करताच देयक पारीत केले आहे.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १९ : वॉर्ड क्र.६४ येथे मित्रमंडळ सोसायटी अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. (अं.पत्रकीय रक्कम रू.२४,८५,७००/-)**

वॉर्ड क्र.६४ येथे मित्रमंडळ सोसायटी अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी अं.प.रक्कम रू.२४,८५,७०८/- एवढ्या रकमेचे अंदाजपत्रक करण्यात आले असून सदरील खर्च सन २०१२-१३ या वर्षातील शहरी भागात पुर्न:डांबरीकरण या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे.

ई निविदा विभागा मार्फत निविदा सूचना स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देवून निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ७ निविदा विक्री झाल्या आहेत. त्यामध्ये सर्वात कमी दराची निविदा मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००% below (कमी) दराने निविदा मान्य करण्यात आली असून त्या अन्वये जा.क्र.मनपा/वॉर्ड ई व ड/अ.श.अ./१५१२/२०१३ दिनांक ४.१.२०१३ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आला असून ४ महिने कालमर्यादा मध्ये काम पूर्ण करायचे आहे.

संचिकेची पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदर कामाचा दोष दायित्व कालावधी (डी.एल.पी.) ३ वर्षासाठी असतांना यापूर्वी हे काम कोणत्या वर्षी करण्यात आले होते या कालावधीसाठी काही अनामत रक्कम राखीव ठेवण्यात आले आहे का याचा बोध होत नाही.

२. संबंधित गुत्तेदाराचे कागदपत्र संचिकेत दिसून आलेले नाही.

३. दिनांक २९.५.२०१३ रोजी १ RA Bill रक्कम रुपये १७,५६,२४४/- देयक अदा करण्यात आले असून Item क्रमांक (१२) २१६१.३३x२३४.१५=५०६०७५/- एवढी रक्कम अदा करणे असतांना संबंधितास ५०८२१५/- एवढी रक्कम अदा झालेली आहे. म्हणजेच रुपये २१४०/- जास्तीचे अदा करण्यात आले आहे.

४. कामाचा विमा हा ज्या क्षेत्रात काम करत आहोत त्याचाच असणे आवश्यक असतांना वॉर्ड क्रमांक ९१, उस्मानपुरा येथील विमा पावती संचिकेत लावण्यात आली आहे. तरी संबंधितांकडून १% विमा रक्कम २४,८५७/- निविदा नियम ५४ विमास/१०९८/ प्र.क्र./२८/ ९८ शासन हमी, मंत्रालय मुंबई दिनांक १९.८.१९९८ अन्वये वसूलीस पात्र आहे.

५. उक्त काम करतांना खालील दर्शविलेल्या परिमाणावर जास्तीचा खर्च करण्यात आला आहे.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेड्यूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ११ | Prov and laying hot mix hot lid BB ३.३०% bitumen Rate ५५३५.७० | १०५.०० | १७५.३७ | ७०.३७ | ३,८९,५४७/- |
| १२ | Prov and laying hot mix hot lid etc complete Rate २३५.१४ | २१००.०० | ३५३४.४१ | १४३४.४१ | ३,३७.२८७/- |

तरी झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा विभागाने करावा.

६. मोजमाप पुस्तिका क्रमांक २७८५ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करुन याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभाागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २० : वॉर्ड क्र.६१ समर्थनगर अंतर्गत विविध ठिकाणी पुर्न:डांबरीकरण करणे.**
**(अं.प.रक्कम रु.१४,९१,४००/-) (खर्च रक्कम रु.१५,५१,४००/-)**

प्रभाग क्र.६१, समर्थनगर अंतर्गत विविध ठिकाणी पुर्न:डांबरीकरण करण्याची निविदा E-Tendering विभागामार्फत मागविली. एकूण ४ निविदा विक्री झाल्या व ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी १ निविदा तांत्रिक दृष्ट्या रद्य होवून उर्वरीत दोन निविदांपैकी ८.८६% above निविदा स्वीकृत केली. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत कामाचा करारनामा केल्यानंतर कार्यालयीन आदेश क्र.

मनपा/वॉर्ड ईड/अशअ/१६६८/१३, दिनांक २८.१.२०१३ अन्वये कामाचे कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ३ महिने होती. काम मुदतीत पूर्ण करण्यात आल्याचे अभिलेख्यावरुन दिसून येते. एकूणच संचिकेची तपासणी केली असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. संबंधित कामाची निविदा मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची दिनांक १३.१२.१२ रोजी उघडण्यात आलेली असतांना संबंधिताने दिनांक ६.१२.१२ रोजी १.०१ वाजता कामाचा विमा उतरविला आहे. निविदा उघडण्यापूर्वी कंत्राटी कामाचा विमा उतरविणे ही बाब संशयास्पद आहे. तसेच ई-टेंडरिंग अन्वये निविदा मागविली असतांनाही अशा प्रकारे निविदा उघडण्यापूर्वीच आपल्यालाच निविदा मिळेल हा हेतू ठेवून विमा काढलेला दिसून येतो. एकूणच ई-टेंडरिंग विभागाचे निविदा कामात letter &spirit follow न करता निविदा काढली आहे.

२. मोजमाप पुस्तिका १६६८ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याचा परिणाम संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. B निविदा पुस्तिकेतील clause क्र.३८ नुसार कामाचे परिमाणात २५% वाढ अनुज्ञेय आहे. तथापि खालील प्रमाणे कामाच्या काही ॲटममध्ये मर्यादेपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. वाढीव परिमाणाच्या बाबतीत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

करिता, खालील प्रमाणे ॲटमनिहाय दर्शविलेला जादा अदा खर्च का अमान्य करण्यात येवू नये याचा खुलासा करण्यात यावा.

| ॲटम क्र. | ॲटमचा तपशील व दर | शेडयूल्ड B मधील परिमाण | देयकातील परिमाण | फरक | जादा अदा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ११ | Providing hot mix hot lid BM Avg ३.३०% दर रक्कम .५५३५.७० | ६३.०० | १०६.६८ | ४३.६८ | २,४१,७९९/- |
| १२ | Providing hot mix hot lid BM Avg ३.३०% दर रक्कम .२३५.१४ | १२६०.१४ | २१३३.८३ | ८७३.६९ | २,०५,४३९/- |
| | | | | **एकूण** | **४,४७,२३८/-** |

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करुन याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**विभाागाने उक्त मुद्यांवर खुलासा सादर करावा. मनपा/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

### परिच्छेद क्र.२१ : वॉर्ड अभियंता - ड कार्यालयातील विविध कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन न दिल्याबाबत.

वॉर्ड कार्यालयाने केलेल्या कामाचे मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. The Maharashtra Public Works Maual च्या Appedix- १० मधील तरतदूी नुसार मोजमाप पुस्तिका लिहिणे, तपासणे व त्याचे जतन करणे इत्यादी बाबी स्पष्टपणे नमूद आहेत. मोजमाप पुस्तिका हे स्थायी कागदपत्रातील एक भाग असून ते अभिलेखे नेहमीसाठी संबंधित कार्यालयात उपलब्ध ठेवण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे.

वॉर्ड अभियंता कार्यालयाने त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांच्या नावाने मोजमाप पुस्तिका दिल्याचे तोंडी समजले. परंतू मोजमाप पुस्तिकेचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाहीत.

वॉर्ड अभियंता कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या संचिकांचे लेखापरीक्षण मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दिलेल्या नसल्याने १००% लेखापरीक्षण होवू शकले नाही.

**तरी उपरोक्त बाबीबाबत सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मोजमाप पुस्तिका अद्ययावत न ठेवणे ही गंभीर स्वरूपाची बाब असून साशंकता निर्माण करणारी आहे. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

# लेखापरीक्षण अहवाल
# वॉर्ड कार्यालय - फ
# सन २०१३-२०१४

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड - फ कार्यालयाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्याकरीता कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१४/९२, ,दिनांक २९.४.२०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. दरम्यान जमा बाजूचे (चाचणी स्वरूपाचे) नियमित लेखापरीक्षण उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यानुसार करण्यात आले. त्यानुषंगाने वॉर्ड कार्यालयाचे मालमत्ता पावती पुस्तके, अकृषिक पावती पुस्तके व पाणीपुरवठा पावती पुस्तके वसूल केलेल्या रोख रकमा व धनादेश रकमांचे ताळमेळ घेवून वेळोवेळी भरणा केलेल्या रकमेची तपासणी करण्यात आली. तसेच नामांतराच्या संचिका विवाह नोंदणी प्रमाणपत्राच्या संचिका, बेबाकी प्रमाणपत्राच्या संचिका तपासण्यात आल्या आहेत. याशिवाय वॉर्ड - फ कार्यालयाचे नोंदवहीत नोंदविलेल्या नोंदी तपासण्यात आल्या. वॉर्ड - फ अंतर्गत उपअभियंता विभागाचे खर्च बाजूचे बी-१ निविदा कामाच्या संचिका, ड्रेनेज दुरूस्ती, डांबरीकरण संचिका व पेव्हर ब्लॉक संचिकेची चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली .

त्या दरम्यान वॉर्ड - फ कार्यालयास लेखापरीक्षणा अंतर्गत जमा बाजूचे **१५** व खर्च बाजूचे **१९** असे एकूण **३४** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

## वॉर्ड अधिकारी व वॉर्ड अभियंता यांच्या कार्यकाळाबाबत.

सन २०१३-२०१४ या कालावधीत **श्री. व्ही.डी.राठोड** यांनी वॉर्ड अधिकारी - फ व **श्री. विष्णु वझे** यांनी वॉर्ड अभियंता -फ म्हणून काम पाहिले.

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :**

१. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक
२. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक
३. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक.
४. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक.

वॉर्ड - फ कार्यालयाकडून प्रलंबित लेखापरीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे - सन २००६-२००७ ते सन २००८-०९ या कालावधीत एकूण प्रलंबित आक्षेप **१३** व एकूण आक्षेपित रक्कम रू. **५२,०९६/- इ**तकी आहे. प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन त्वरीत करून आक्षेपाधित रकमेचा निपटारा विभागाने करून घेणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्र. १ : लेख्यांची सर्वसाधारण स्थिती.**

वॉर्ड - फ कार्यालयाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यासाठी विभागाने अभिलेखे उपलब्ध करून दिले. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यातील मालमत्ता मागणी नोंदवही, दैनंदिन वसूल केलेल्या करांची नोंद केलेली रोखकिर्द इत्यादी अभिलेखे तपासली. मालमत्ता मागणी नोंदवहीतील घेण्यात आलेल्या नोंदी अपूर्ण आढळल्या. मागणी नोंदवहीची एकूणच स्थिती अत्यंत खराब व दयनीय आहे. मागणी नोंदवहीत पुढील आणि मागील पाने फाटलेली असल्याने नोंदी अस्पष्ट आहेत. मागणी नोंदवही वर नोंदी घेणा-या कर्मचारी / अधिकारी यांचे सांक्षाकन नाही. मागणी नोंदवही ही कायम जतन करणा-या अभिलेख्यातील अभिलेखे असल्याचे गांभीर्य विभागास नसल्याचे दिसून आले.

करीता विभागाने मालमत्ता मागणी नोंदवहीची स्थिती तपासावी. रजिस्टरच्या पुढील व मागील पानावरील नोंदी नष्ट होणार नाही याबाबत तातडीने नविन मागणी नोंदवही तयार करून संबंधित कर्मचारी / अधिका-यांचे नोंदवहीवर साक्षांकन करून घ्यावे. मागणी नोंदवहीतील अपूर्ण नोंदी जसे कर आकारणी संदर्भ, कर आकारणी मूल्य, एकूण कर योग्य असल्याची खातरजमा करावी.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. २ : लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्याबाबत.**

१. आर्थिक वर्ष २०१३-१४ या कालावधीतील प्राप्त साहित्य नोंद असलेले रजिस्टर क्रमांक १०९,११०,१११

२. जड संग्रह रजिस्टर .

३. विवाह मंडळ नोंदणी रजिस्टर.

४. :वॉर्ड - फ कार्यालया अंतर्गत असलेल्या मालमत्तांची एकूण संख्या, त्यावर येणा-या मालमत्ता कराची सन २०१३-१४ पर्यंतची थकबाकी, चालू मागणी, वसूली व शिल्लक रक्कम याबबातचा ताळेबंद सादर न करणे बाबत.

**उपरोक्त प्रमाणे अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब अतिशय गंभीर असून संशय निर्माण करणारी आहे. याबाबत विभागाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३: मालमत्ता कर, पाणीपट्टी व इतर करा संदर्भाने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील न वटलेल्या धनादेशाची रक्कम महानगरपालिका फंडात भरणा न केलेल्या प्रलंबित न वटलेल्या धनादेशाधारकांची यादी व रक्कम रू.१८,८२,७५८/- चा मनपा फंडात भरणा झालेले नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान सन २०१३-१४ मधील प्रलंबित न वटलेल्या धनादेशाची यादी एप्रिल ते ऑक्टोबर पर्यंतची लेखा शाखेकडून प्राप्त झालेली आहे. नोव्हेंबर ते मार्च पर्यंतच्या कालावधीची न वटलेल्या धनादेशाची यादी वॉर्ड - फ कार्यालयातून प्राप्त झाली.

प्राप्त यादी व वॉर्ड कार्यालयातील लेखे तपासले असता धनादेश दिलेल्या व्यक्तीचे नांव व मालमत्ता धारकांचे नांव या मध्ये तफावत आहे.

धनादेश वटला नाही ही बाब वॉर्ड कार्यालयास कळाल्यानंतर वॉर्ड कार्यालयाने संबंधितास कायद्यातील तरतूदीप्रमाणे नोटीस दिलेली नाही. तथापि रक्कम वसूलीसाठी प्रयत्नही केलेले नाही.

धनादेश वटला नाही अशी माहिती वॉर्ड कार्यालयास प्राप्त झाल्यावर संबंधित वसूलीच्या मागणी नोंदवहीतील नोंदी रद्द केलेल्या नाहीत.

निगोशिएबल इन्स्टुमेंट ॲक्ट च्या कलम १३८ प्रमाणे कार्यवाही न झाल्याने वॉर्ड - फ कार्यालयाचे सन २०१३-१४ या कालावधीतील न वटलेल्या धनादेशाची प्रलंबित रक्कम रू.१८,८२,७५८/- एवढी असून त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**विभागाने लेखापरीक्षणा दरम्यान तसेच अहवाल अंतीम होईपर्यंत उपरोक्त बाबीवर खुलासा सादर केलेला नाही. त्याचप्रमाणे न वटलेल्या धनादेशाची रक्कम रू.१८,८२,७५८/- संबंधितांकडून वसूल झाल्याबाबत अनुपालन सादर केलेले नाही. संबंधित विभागास अर्धसमास पत्र क्र.७ अन्वये न वटलेल्या धनादेशाच्या यादीचे सविस्तर विवरण देण्यात आलेले आहे. विभागाने संबंधितांकडून उपरोक्त रक्कम वसूल करावी तसेच न वटलेल्या धनादेशाची रक्कम वसूल करण्यास विलंब करणा-या संबंधित कर्मचा-यांविरूध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**वसूलीस पात्र रक्कम रू. १८,८२,७५८/-**

**परिच्छेद क्र. ४ : वॉर्ड - फ कार्यालयास अधिकार प्राप्त झाल्यानंतर मालमत्ता धारकांचे नामांतर प्रकरणाबाबतच्या अनियमितता.**

वॉर्ड - फ कार्यालयास वॉर्ड अधिकारी यांना सन २०१३-१४ मध्ये कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२०१३/१२९०, दिनांक २५.९.२०१३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(१) अन्वये मालमत्ता व पाणीपट्टी धारकांचे नामांतर व नावात दुरूस्तीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

वॉर्ड कार्यालयाने उपरोक्त आदेशान्वये केलेल्या मालमत्तांच्या नामांतरांच्या नामांतर संचिका तपासल्या असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संजय मिठ्ठाला कांकरीया व इतर यांचे नामांतर आदेश क्र.नामांतर/०२/२०१३, दिनांक १५.१०.२०१३ सी.टी.एस.क्र.१५३५९/२६, प्लॉट क्र.२६ विनायकनगर, गारखेडा, खरेदी खत व पीआर कार्ड नुसार नामांतर करण्यात आले. परंतू पी.आर.कार्ड व खरेदी खतातील नांवे महानगरपालिका अभिलेख्यात न घेता केवळ एकाच व्यक्तीचे नावाने नामांतर केलेले आहे. पुढील नांवे नामांतर करतांना विचारात घेतलेली नाहीत.
   १) वैशाली संजय कांकरीया २) रूपाली प्रसाद कुंकूलोळ ३) निर्मला अशोकचंद कुंकूलोळ ४) सुंदरबाई मिठाला कांकरीया तसेच नामांतरासाठी विहित नमुना अर्जावर आणि प्रतिज्ञापत्रावर संजय मिठालाल कांकरीया यांचीच स्वाक्षरी आहे. याबाबत संबंधिताचा खुलासा आवश्यक आहे.

२. नोंदणीकृत खरेदीखत असतांना श्री.रघुनाथ लक्ष्मण गायकवाड ६-२२-४५ नक्षत्रवाडी यांचे प्रकरणांत नविन भोगवटाधारक म्हणून आदेश क्र.मनपा/वॉर्ड-

फ/नामांतर/१८/२०१३, दिनांक २.११.२०१३ अन्वये निर्गमित केलेले आहे. संबंधितांकडून पी.आर.कार्ड किंवा ७/१२ चा उतारा संचिकेत नाही. नामांतर ऐवजी नविन भोगवटाधारक अशी नोंद महानगरपालिकेच्या अभिलेख्यात करणे एक प्रकारचे नामांतरच आहे. याबद्यल विभागाने खुलासा करावा.

३. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड-फ/नामांतर/२०/२०१३,दिनांक २.११.२०१३ अन्वये ॲङ ऋषीकेश अविनाश ठाकरे, १९-B अजिक्यनगर यांना नविन भोगवटाधारक म्हणून आदेश निर्गमित केलेले आहेत. ॲड. ऋषीकेश अविनाश ठाकरे यांनी नोटरीकृत खरेदीखत श्री.नंदकुमार लक्ष्मणराव गाडेकर यांनी लिहून दिलेले आहे. प्रत्यक्षात आदेशात कागदपत्राआधारे पूर्वीचे नांव श्री.सोनवणे सोपानराव विठ्ठल यांचे नांव आहे. मालमत्ता कराची पावती सोनवणे यांच्याच नावाची आहे. परंतू ॲड ठाकरे यांनी श्री.गाडेकर यांचेकडून खरेदी केल्यामुळे मालमत्तेमध्ये सोनवणे यांचे ऐवजी श्री.ठाकरे यांचे नांव नोंदविणे आक्षेपार्ह आहे.

४. कार्यालयीन आदेश क्र.नामांतर/वॉर्ड-फ/४०११३, दिनांक १६.११.२०१३ संचिका क्र.५१/२०१३ अन्वये मे.अर्बन कॉन्सेप्टस्. तर्फे भागीदार १)श्री.उमेश पोपटलाल मुनोत २) राहुल गणपतराव वालेकर ३) रामनिवास सत्यनारायण दोंडिया या नांवे नामांतर करण्यात आले. संचिकेत विहीत नमुन्यातील नमुना अर्ज व शपथपत्र एकाच भागीदाराने लिहून दिलेले असून सदरील बाब आक्षेपार्ह आहे.

५. तसेच मालमत्तांचे नामांतर करतांना महानगरपालिके तर्फे सर्व करांचा भरणा करून घेण्यात येतो. परंतू खालील नाममात्र नोंदीवरून असे दिसून येते की, मालमत्ता धारकाचे ऐवजी दुस-यांचे नावाच्या करांच्या पावत्या नामांतर प्रकरणांत संचिकेत जोडून नामांतर मंजूर केलेले आहे. नामांतर मंजूर करतांना संबंधितांनी करांच्या पावत्या मालमत्ताधारकांच्या नावाच्या आहेत की नाही याची खातरजमा केलेली नाही. नाममात्र इतर व्यक्तींच्या नावाने नामांतर प्रकरणांत जोडलेल्या पावत्यांचा विवरण तक्ता पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मालमत्ता धारकाचे पूर्वीचे नांव | मालमत्ता धारकाचे नंतरचे नांव | नामांतरा सोबत जोडलेल्या पाणीपट्टी कराच्या पावतीतील नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | एस.व्ही.महाजन F.No.८,अशोकनगर अश्र्वमेध अपार्टमेंट गारखेडा. | प्रफुल्लता प्रभाकर पत्की F.No.८,अशोकनगर अश्र्वमेध अपार्टमेंट गारखेडा. | शिरीष गणेशराव सांगडे A/cF-९५७१ , उल्कानगरी Reg No.F२२/३०९ | |
| २ | अतुल भगवानराव देशमुख F.No.९ गारखेडा | आशुतोष रमेश देगांवकर F.No.९ B विशालपार्क गारखेडा | सुरेखा विकास खातेर A/c ३९०८७ , P.No १७,१८,१९, विशालपार्क गारखेडा Reg No. २२/१०१ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | राजेंद्र सदाशिवराव मोहरीर F.No.५ शिवनेरी अपार्टमेंट | सौ.राजश्री गंगा जिंतूरकर F.No.५ शिवनेरी अपार्टमेंट गारखेडा | प्रभाकर गोविंदराव कुलकर्णी A/c ५२२७५, Plot no २१ शिवनेरी नगर, Reg No. F६/२७७ | |
| ४ | मनोज बाबुराव रुपनरे F.No.५ गुरू गंगाधर अपार्ट. उल्कानगरी | योगेश लक्ष्मणराव जाधव F.No.५ गुरू गंगाधर अपार्ट.उल्कानगरी | अनिल भास्कर अंदुरकर A/c ९०९५७, गुरू गंगाधर अपार्ट. Reg No. F१०/३२३ | |

६. त्याचप्रमाणे नामांतराचे आदेश देतांना संबंधित मालमत्तेचे करयोग्य मूल्य आदेशात दर्शविलेले नाही.

**विभागाने सादर केलेला खुलासा हा सद्यस्थितीत सुरु असलेल्या कार्यालयीन कामकाजाच्या आधारे सादर केलेला आहे. त्याचप्रमाणे कायदेशीर बाबीचा आधार न घेताच सादर केलेला आहे. अर्धसमासामध्ये दिलेला मुद्दा क्र. १ ,४ ६ बाबत कार्यालयीन कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे. मुद्दा क्र.३ अन्वये सादर केलेल्या खुलाशानुसार जर एका नामांतर प्रकरणांत चार खरेदी खताच्या आधारे नामांतर झालेले असेल तर महानगरपालिकेचे नामांतर शुल्काचे आर्थिक नुकसान झालेले आहे. या व इतर प्रकरणांत संबंधितांकडून नामांतर शूल्क वसूल करण्यात यावे तसेच लेखापरीक्षण विभागास उपरोक्त अनियमिततेबाबत जबाबदार असलेले अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५ : सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात वॉर्ड - फ कार्यालयाने वितरीत केलेल्या करांच्या बेबाकी प्रमाणपत्रामधील अनियमिततेबाबत.**

वितरीत केलेल्या बेबाकी प्रमाणपत्रांपैकी नाममात्र प्रकरणे तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. बेबाकी प्रमाणपत्र देतांना पाणीपट्टी कराबाबत संबंधितांकडे नळ कनेक्शन नाही असा अहवाल सक्षम प्राधिका-याने दिलेला नसतांनाही प्रमाणपत्र दिलेले आहे. आऊट सोर्सींगच्या कर्मचा-यांचा अहवाल नोंदविलेला आहे.
२. मालमत्ता धारकांच्या ऐवजी इतर व्यक्तीने अर्ज सादर केल्यास त्या व्यक्तीस बेबाकी प्रमाणपत्र देण्यात आले.
३. मालमत्ता धारकांच्या ऐवजी मालमत्ता कर वगळता इतर पावत्या दुस-याच व्यक्तीचे नांवे असतांनाही प्रमाणपत्र दिलेली आहेत.
४. बेबाकी प्रमाणपत्रा संदर्भाने तपासलेल्या नाममात्र संचिका बाबतचा तक्ता पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | बेबाकी प्रमाणपत्रावरील अर्जदाराचे नांव | मालमत्ता धारकाचे नांव व मालमत्ता पावती क्रमांक व रक्कम रू. | पाणीपट्टी धारकाचे नांव व पाणीपट्टी पावती क्रमांक व रक्कम रू. | N-A टॅक्स पावती वरील नांव व पावती क्रमांक व रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.बन्सी गांगवे | १)बन्सीलाल तुळशीराम गांगवे As४७५३० ३.३.२०१४ रक्कम रू.५३७५/- २) वसंतलाल एस.गांधी गांगवे इंडस्ट्रीज As४७५३६ ३.३.२०१४ रक्कम रू.१८२६/- | १)बन्सीलाल तुळशीराम गांगवे F१०४/६८६१० ३.३.२०१४ रक्कम रू.१३७५०/- २)F१०४/६८६१५ ३.३.२०१४ रक्कम रू.१३७५०/- | |
| २ | श्री.शेखर मधुकर थोरात बी-१ चाण्क्यपुरी,शहानूरवाडी | ब्रिगेडीयर मोहींदर बन्ना व बन्ना गिता मोहीद १८३/B,page No८९ F०००८६८६ As५२००२ १२.३.२०१४ रक्कम रू.२०८६/- | मोहींदर बन्ना श्री.शेखर मधुकर थोरात A/c No ९३०८५, F no B०१, चाण्क्यपुरी F१०४/७३२४७ १२.३.२०१४ रक्कम रू.११२२५/- | |
| ३ | श्री.बबनराव रावसाहेब बनकर | बबनराव रावसाहेब बनकर F००२०२०४ ६५/Rc/C१८० Page No.१५८ As/६५०८५ २८.३.२०१४ रक्कम रू.२३५४/- | -- | |
| ४ | श्री.सिताराम जगन्नाथ मिसाळ रा.काब्रानगर | सिताराम जगन्नाथ मिसाळ F०० ४३७२०,page No १९४ As/४२६२४ १७.२.२०१४ रक्कम रू.७५८/- | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्री.आर.एस.चाटुफळे<br>A-४०३ खिंवसरा बुक्स<br>उल्कानगरी, गारखेडा | चिवळे अतुल विश्वनाथ<br>Foo २७३९६<br>As/५६७५७<br>२०.३.२०१४<br>रक्कम रू.२८७५/- | उदय पांडुरंग सहस्त्रबुध्दे<br>A/c ७७६२, F No<br>D-४०२ खिंवसरा वुड्स,<br>Reg NoF२२/८७<br>१)F१०४/२५२१३<br>२३.७.२०१३<br>रक्कम रू.४३५०/-<br>नंदकुमार माधवाचार्य<br>निलंगेकर<br>A/c F-१७६३, F No-१<br>F२२/८३,A१०४ -<br>२५२१२<br>२३.७.२०१२ रक्कम<br>रू.४३५०/-<br>D - ४०२ खिंवसरा | |
| ६ | नवनाथ मारोती गायकवाड<br>शिवाजीनगर | एम.के.बागुल<br>Foo३३११६<br>Wf/C-/७३६<br>As/५८५६७<br>२३.३.२०१४<br>रक्कम रू.३८५०/- | एम. के.बागुल<br>A/c No ७९६४६<br>११-१४-C-४८/५<br>शिवाजीनगर<br>F१०४/८२००४<br>२६.३.२०१४<br>रक्कम रू.२७५०/- | |
| ७ | रुख्मिनीबाई वाघिरे | दिलीप रामदास सरोदे<br>Foo१५७३<br>Reg No ८९/१६/B/४८<br>As/६९४२<br>३०.५.२०१४<br>रक्कम रू.१४६५/- | -- | |
| ८ | डॉ.आनंददिप ओमप्रकाश<br>अग्रवाल | पार्वतीबाई प्रभानंद मेहता<br>Reg NoB/९३/१/४५<br>Fooo ८०१०<br>As/१४४०९<br>१६.८.२०१३<br>रक्कम रू.२१२४३/- | -- | |
| ९ | श्री.दामोधर पंढरीनाथ साबळे,<br>P.No.४२ न्यू बालाजीनगर | साबळे दामोधर पंढरीनाथ<br>Foo १५५८६<br>Wf/c/११५/३०<br>As/२६४७४<br>२८.११.२०१३<br>रक्कम रू.१३,१९४/- | -- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | सौ.शैलजा रमेश कुलकर्णी E/B६, तिरुपती विहार गारखेडा परिसर | कुलकर्णी रमेश शैलजा Foo १०३०६ Wf/Ro-c-१८९/१२१ गारखेडा As/४४२५७ २२.२.२०१४ रक्कम रु.११२९/- | विनोद शिवप्रसाद व्यास a/c ८३३५७, तिरुपती विहार Reg.No.७८११३१, F१०४/४९९ = ४३५०/- ३.४.२०१४ F१०४/५०२ = ४३५०/- ३.४.२०१४ सौ.आशा शशिकांत काळे F१०४/५०६ = ४३५०/- ३.४.२०१४ | शैलजा रमेश कुलकर्णी F१०४/६६३३६ २६.२.२०१४ रक्कम रु.४५४/- |
| ११ | -- | नुपुर लिजींग ॲण्ड फीसकल लि. (नुपुर थिएटर) Reg.No. Foo ३९९९९ As/२२३११ २५.१०.२०१३ रक्कम रु.१,९४,६१३/- | -- | राज बिल्डर्स & डेव्हलपर्स F१०४/५८६२८ ३.२.२०१४ रक्कम रु.१,६०,०००/- |

५. बेबाकी प्रमाणपत्रावर संबंधित अधिका-याने स्वाक्षरी केल्यानंतरच ब-याच दिवसांनी त्यास जावक नोंदवहीत नोंद घेवून वितरीत केले आहे.

**विभागाने विहित मुदतीत खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त मुद्यांबाबतच्या अनियमिततेमुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करण्यात यावे. तसेच या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ६ : वॉर्ड - फ कार्यालया अंतर्गत टाऊन सेंटर या भागातील मालमत्तांचे पाणीपट्टी बाबतचे व्यावसायिक नळ कनेक्शनचे रक्कम रु.५२,६५,९५९/- च्या नोंदी सन २०१४-१५ मधील मागणी नोंदवहीत नोंदविलेल्या नसल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.**

टाऊन सेंटर भागातील व्यावसायीक नळ कनेक्शनच्या नोंदी पुढील नविन आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये घेतांना थकबाकी रक्कम कमी दर्शविणे, नळ कनेक्शनच्या नोंदी न घेणे यामुळे अर्धसमासा सोबतच्या तक्त्यातील नमूद रु.५२,६५,९५९/- रकमेच्या नोंदी घेतलेल्या नाहीत. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. प्रामुख्याने खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. नविन रजिस्टरमध्ये कमी थकबाकी दर्शविलेल्या नोंदी बाबतच्या तक्त्यात अ.क्र.२,६,२०,२८ अन्वये रक्कम रु.१,४९,७५०/- कमी दर्शविलेली आहे.

२. नविन रजिस्टर मध्ये मागील रजिस्टर मधील नोंदी न घेतल्याचेही निदर्शनास आले आहे. अर्धसमासा सोबतच्या तक्त्यातील एकूण रु.५१,१६,२०९/- च्या नोंदी घेतलेल्या नाहीत.

३. अर्धसमासा सोबतच्या तक्त्यातील अ.क्र.२१ वरील नोंदीतील मालमत्ताधारकाकडे नळ नाही असे प्रमाणपत्र सक्षम अधिका-याकडून न घेता संबंधितास त्यांचेकडे रक्कम रू.३,२२,१५०/- थकबाकी असतांनाही बेबाकी प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

**विभागाने विहित मुदतीत खुलासा सादर केलेला नाही. <u>अर्धसमास पत्र क्र. ११, अन्वये सविस्तर विवरणपत्र विभागास देण्यात आलेले आहे</u>. मुद्या क्र. १ नुसार नविन मागणी रजिस्टरमध्ये कमी दर्शविलेल्या रकमेच्या नोंदी घेवून वसूल करण्यात याव्या. मुद्या क्र.२ नुसार नविन मागणी रजिस्टरमध्ये नोंदी घेवून रकमा वसूल करण्यात याव्यात. मुद्या क्र.३ नुसार मागणी रजिस्टरमध्ये संबंधितांकडे थकबाकी असतांनाही बेबाकी प्रमाणपत्र वितरीत केले ही बाब गंभीर असून त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करिता महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून यासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेविरूध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**
**<u>वसूलीस पात्र रक्कम रू.५२,६५,९५९/-</u>**

**परिच्छेद क्र. ७ : सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील वॉर्ड - फ येथील जन्म -मृत्यु दाखल्याचे लेखे व स्टॉक रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत.**

उक्त संदर्भिय कार्यालयीन आदेशान्वये वॉर्ड - फ कार्यालयाचे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असून त्या करीता वॉर्ड - फ कार्यालयामधील जन्म -मृत्यु दाखल्याचे लेखे व स्टॉक रजिस्टर वर्षनिहाय तपशिल लेखापरीक्षण कामी आवश्यक असून उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेले अभिलेखे हे संबंधित हॉस्पिटल्स कडून प्राप्त झालेल्या माहितीचे आहेत . जन्म-मृत्यू नोंद कायद्याचे तरतूदीनुसार अभिलेखे ठेवलेले नाहीत. तसेच संगणकीय जन्म- मृत्यू अभिलेख्याची नोंद सुध्दा कायद्यातील तरतूदीनुसार ठेवलेली नाही.

**विभागाने कायद्यातील तरतूदीची पूर्तता करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ८ : सन २०१३-२०१४ या वर्षातील वॉर्ड - फ कार्यालयाने विवाह मंडळाची नोंदणी केलेले अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

लेखापरीक्षणासाठी वॉर्ड - फ कार्यालयास विवाह मंडळांच्या नोंदणी केलेले अभिलेखे लेखापरीक्षण कामी तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विवाह मंडळाचे नोंदणी रजिस्टर उपलब्ध करून दिलेले नाही. कायद्यातील तरतूदीनुसार महानगरपालिकेस विवाह नोंद व विवाह मंडळाची नोंद ठेवणे करीता प्राधिकृत केलेले आहे.

**विभागाने कार्यक्षेत्रांतर्गत कार्यरत असलेल्या विवाह मंडळाचा शोध घेवून त्याची रितसर नोंदणी करून संबंधितांकडून आवश्यक असल्यास दंड वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ९ : वॉर्ड - फ अंतर्गत संगणकीय मालमत्ता क्र. F००१५९५४ ही मालमत्ता निवासेत्तर असतांना निवासी दराने मालमत्ता कराची आकारणी केल्यामुळे मनपाचे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.**

मालमत्ता कर मागणी नोंदवही क्र.१३२/१ पान क्र.८५ वर दक्षिण भारत जैन मराठवाडा विभाग असे नांव असून अरिहंत नगर घर क्र.४-१८-३४ येथे उपरोक्त संस्थेमार्फत सौ.सुमनबाई राजाभाऊ मुर्लीचे वस्तीगृह श्रमविकास क्षेत्र औरंगाबाद तर्फे श्रीपाल दिपचंद गंगवाल असा उल्लेख आहे. संबंधित मालमत्तेस दिनांक ११.२.२००२ पासून फेर आकारणी जा.क्र.मनपा/करआकारणी/सीआर/१२२/२००२ अन्वये करयोग्य मूल्य रू.७२८६८/- ऐवजी रू.३०६२९/- करण्यात आले. फेर आकारणी केल्याचे आदेश लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेले नाही.

उपरोक्त जागेवर मालमत्ता मागणी नोंदवहीतील नोंदीनुसार वस्तीगृह असल्याचे दिसून आले. परंतू मालमत्ता कराची आकारणी निवासी दराने केलेली आहे. मालमत्तेचा वापर निवासेत्तर असल्याने संबंधित मालमत्तेस सामान्य कर ३७.५% राज्य, शिक्षण कर, १२% साफ सफाई कर १८%, रोजगार हमी योजना कर ३% व सेवरेज कर २२% (सन २००९-२०१०) ते सन २०११-२०१२ पर्यंत ) आणि सन २०१२-२०१३ पासून १५% अनुज्ञेय आहे. परंतू वॉर्ड कार्यालयाने निवासी दराने कर वसूल केल्यामुळे खालील प्रमाणे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | कराचा तपशिल | निवासेत्तर कर | निवासी कर | फरक |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर ३७.५ | ११४८६ | ९१८९ | २२९७ |
| २ | साफसफाई कर १०% | ३०६३ | ९१९ | २१४४ |
| ३ | राज्य शिक्षण कर १२% | ३६७५ | १८३८ | १८३७ |
| ४ | रोजगार हमी कर ३% | ९१९ | -- | ९१९ |
| ५ | सेवरेज कर २२% (०९-१० ते ११-१२) | ६७३८ | ३९८२ १३% | २७५६ |
| ६ | सेवरेज कर १५% | ४५९४ | ३०६३ | १५३१ |
| | | | **एकूण** | **११४८४** |

उपरोक्त तक्त्यानुसार एक वर्षाचा फरक दर्शविलेला आहे. सदरील मालमत्तेस दिनांक १.४.२००७ पासून निवासी दराने कर आकारणी केलेली आहे. निवासेत्तर दराने कर आकारणी आवश्यक आहे.

**उपरोक्त मुद्यांबाबत तपासणी करून खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने महानगपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**<u>परिच्छेद क्र. १०</u> : महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ अन्वये वॉर्ड - फ कार्यालयाने वितरीत केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राबाबतच्या प्रकरणातील अनियमिततेबाबत.**

सन २०१३-१४ या वर्षात विवाह नोंदणी एकूण २३४ प्रकरणांची झालेली आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या दिनांक २९ मार्च २००३ अन्वयेच्या अधिसूचने मध्ये महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियम आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९९ अन्वये आकारण्यात येणा-या विवाह नोंदणी व त्या संबंधीच्या नियमातील बाबतीत शुल्काच्या दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. उक्त अधिनियमातील नियम क्र.११(१) नुसार विवाह नोंदवही तपासण्यासाठीच्या अर्जासोबत रू.१५/- शुल्क संबंधितांनी भरणा करणे आवश्यक आहे. वॉर्ड कार्यालयातील नाममात्र संचिका तपासल्या असता रू.१५/- शुल्क वसूल केलेले नाही. त्यामुळे एकूणच वॉर्ड- फ कार्यालयास विवाह निबंधक म्हणून प्राप्त झालेल्या अधिकाराच्या तारखेपासून मार्च -२०१४ पर्यंत एकूण १४९४ विवाह नोंदणी प्रमाणपत्र वितरीत केलेले आहे. रू.१५/- प्रमाणे १४९४ प्रकरणांत तपासणी शुल्क वसूल न केल्यामुळे महानगरपालिकेचे रक्कम रू.२२,४१०/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

विवाह नोंदणी नोंदवही Form I मध्ये विवाहासंबंधीच्या नोंदी घेतल्या जातात. संबंधित नोंदवहीस पान क्रमांक दिलेला नाही. एकूण रजिस्टर मध्ये किती पाने नोंदविलेली आहेत याबाबतची रजिस्टरच्या शेवटी प्रमाणपत्र दिलेले नाही. विवाह नोंदवही खंड क्र.११ मध्ये अनुक्रमांक १३२१ ते १३२९ हे दोन वेळा नोंदविलेले आहेत. दोन वेळा एकच अनुक्रमांक नोंदविणे हि बाब नियमबाह्य आहे.

विवाह नोंदवही रजिस्टर क्र.१२ अ.क्र.१४७१ नोंदणी ही दिनांक २७.१२.२०१३ अन्वये कोहकडे रविंद्र अप्पासाहेब व आहेर अबोली रामचंद्रराव यांना प्रमाणपत्र दिलेले आहे. परंतू अ.क्र.१४७१ हा रजिस्टर क्र.१३ मधील अनुक्रमांक आहे या क्रमांकावर शैलेश अरविंदराव देशपांडे व दिप्ती यशवंत जोशी यांना विवाह नोंदणी करून प्रमाणपत्र दिलेले आहे. लोहकडे रविंद्र अप्पासाहेब यांना दिलेल्या प्रमाणपत्राची नोंद रजिस्टरमध्ये घेतलेली नाही. केलेली नोंदणी नियमबाह्य आहे.

विवाह नोंदवही क्र.१३ मधील अ.क्र.१४८० अन्वये दिनांक १०.३.२०१४ रोजी कैलाश ओमप्रकाश हेडा व सुशीला राधेशाम साहु यांची नोंदणी केली. परंतू संबंधितांकडून नोंदणी व तपासणी शुल्क वसूल केलेले नाही.

विवाह नोंदणी प्रमाणपत्रात अ.क्र.१४०१ चे अन्वये गिरीजा भास्कर दाभाडे व उबाळे प्रिती भिकु यांचे प्रमाणपत्रावर रजिस्टर क्र.१२ ऐवजी १३ दर्शविला आहे.

**उपरोक्त प्रमाणे नाममात्र प्रकरणांची तपासणी केलेली असून विभाग स्तरावर विवाह नोंदणी केलेल्या प्रकरणांची सविस्तर तपासणी करावी. तसेच तपासणी शुल्क व विवाह नोंदणी शुल्क वसूल न केल्यामुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.**

**महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

परिच्छेद क्र. ११ :मागणी रजिस्टरवर व संगणकात नामांतर न करतांच दुरूस्ती करणे बाबत.

मालमत्ता क्रमांक F००३७८०१, विष्णुनगर, मागणी रजिस्टर क्र.१३२/१/१६० वर श्री. देवराम शिवराम चव्हाण या नावाची नोंद रद्य करुन श्री.नरहरी देवराव चव्हाण अशी नावाची नोंद घेण्यात आली.

परंतू संबंधित विभागाने मालमत्ता धारकाकडून कोणत्या कागदपत्राद्वारे व नामांतर फी रू.१०००/- चा भरणा न करता आणि सक्षम अधिका-याची मंजूरी न घेता नामांतर केलेले असून व मागणी रजिस्टरवर नामांतर केल्याबाबतचा अनुक्रमांकही नोंदविण्यात आलेला नाही व सदरील बाबतची संचिकाही लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

**विभागाने याबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.**

**महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

परिच्छेद क्र. १२ :मागणी रजिस्टरवर व संगणकात नामांतर न करतांच दुरूस्ती करणे बाबत.

मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.१३२/१ मधील जुन्या व नविन रजिस्टरसोबत ताळमेळ घेतला असतांना असे निदर्शनास आले की, काही नोंदी वगळण्यात आल्या आहेत. तसेच नविन रजिस्टर मध्ये नोंदी घेतांना थकबाकी कमी दर्शविलेली आहे. अशा नोंदीचा स्वतंत्र तक्ता या पूर्वी अर्धसमासासोबत माहितीस्तव देण्यात आलेला आहे. रू. १,४९,४२३/- चे मनपाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून महानगरपालिका फंडात जमा करणे आवश्यक आहे.

**अर्धसमासा सोबत दिलेल्या तक्यातील प्रकरणांची तपासणी करून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने अनुपालन सादर केलेले नाही.**

**महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १३ : महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम (७६) अन्वये मागणी पुस्तके तयार करणे बाबत.**

सन २०१३-१४ या वर्षात मालमत्ता कराचे संगणकीकरण झालेले असल्याने मागणी रजिस्टर मधील नोंदी नविन मागणी रजिस्टरला घेण्यात आलेल्या नाहीत. एका मागणी रजिस्टर मध्ये पाच वर्षाचा नोंदी लिहिण्यासाठी व्यवस्था आहे. परंतू त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी मागणी रजिस्टर वापरण्यात आले. मागणी रजिस्टर मधील बहुतांश मागील व पुढील पाने फाटलेली असून त्या संदर्भातील मालमत्तांमधून येणा-या मालमत्ता कराचे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम (७६) अन्वये नमुना ४७ प्रमाणे प्रत्येक मालमत्ता कराच्या निर्धारणानंतर मागणी नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. या संदर्भात वॉर्ड - फ कार्यालय विभागाचे प्रमुख कर निर्धारक व संकलक यांनी त्यांचे पत्र क्र.मनपा/कनिवसं/२०१४/२६, दिनांक ०३.०२.२०१४ अन्वये दरवर्षी सर्व वॉर्ड कार्यालयाने मागणी नोंदवही रजिस्टर तयार करणे गरजेचे आहे असे कळविण्यात आलेले असतांनाही वॉर्ड कार्यालयाने मागणी रजिस्टर मध्ये नोंदी घेतलेल्या नाहीत ही बाब अत्यंत गंभीर आहे.

**उपरोक्त मुद्यांवर कार्यवाही करून नविन मागणी रजिस्टर तयार करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत मागणी रजिस्टरचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.**

**विभागाने महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम (७६) अन्वये मागणी रजिस्टर तयार करून प्रशासकीय कार्यवाहीअंती उक्त अनियमितेबाबत अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद : १४ मालमत्ता व पाणीपट्टी मागणी रजिस्टरचे पाने फाटलेले असल्याबाबत.**

मालमत्ता व पाणीपट्टी मागणी रजिस्टरची तपासणी करतांना सदरील रजिस्टरची पुढील व मागील पाने फार प्रमाणात फाटलेली असल्याने अशा किती मालमत्ता धारकांच्या नोंदी नविन मागणी रजिस्टरवर घेण्यात आल्या याची खात्री करता आली नाही. नाममात्र तपासलेल्या रजिस्टरनिहाय फाटलेल्या पानांच्या नोंदीचा तपशिल पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मालमत्ता व पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक | रजिस्टर मधील पुढील पान क्रमांक | रजिस्टरमधील मागील पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | C-१५०/२ | १ ते २४ | ३९० ते अखेरपर्यंत |
| २ | C-१५० | १ ते ४ | १८१ ते अखेरपर्यंत |
| ३ | B-४५ | १ ते २९ | ३७३ ते अखेरपर्यंत |
| ४ | C-२५५ | १ ते ०६ | ३४६ ते अखेरपर्यंत |
| ५ | C-१२५ | १ ते १३ | -- |
| ६ | १५०/२ | १ ते २५ | ३९० ते अखेरपर्यंत |
| ७ | B-८७ | १ ते २८ | -- |
| ८ | B- १९२ | सदरील रजिस्टर मध्ये पान क्रमांकाचे नंबर योग्य नाही व पाने फाडण्यात आली. | |
| ९ | B-३८/१ | -- | ३९१ ते अखेरपर्यंत |
| १० | B-C-१०६ | १ ते २० | ३५७ ते अखेरपर्यंत |
| ११ | C-८ | -- | ३९२ ते अखेरपर्यंत |
| १२ | C-१३२/१ | १ ते १५ | ३८५ ते अखेरपर्यंत |
| १३ | F-९ | १ ते १२ | -- |
| १४ | ९/७ | १ ते ११ | -- |
| १५ | ७९ | १ ते ०५ | १९६ ते अखेरपर्यंत |
| १६ | F-८ | -- | ३८६ ते अखेरपर्यंत |
| १७ | TC-५ | १ ते २४ | ३७८ ते अखेरपर्यंत |
| १८ | F-१० | १ ते १७ | -- |
| १९ | TC - व्यावसायिक (water) जुने | १ ते १३ | -- |
| २० | १३२/१ | १ ते १५ | ३८४ ते पुढील पान नाहीत. |

**उपरोक्त बाबी तपासून फाटलेल्या पानावरील नोंदी शोधून ,नविन रजिस्टरमध्ये नोंदी घेवून व महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन दर्शविलेले नाही.**

**विभागाने उपरोक्त अभिलेखे अद्ययावत करून , महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १५ : वॉर्ड - फ अंतर्गत कार्यरत वर्ग-३ / ४ कर्मचा-यांचे सेवापट/सेवापुस्तक चाचणी स्वरुपात तपासणी केली असता निदर्शनास आलेल्या त्रुट्यांबाबत.**

विभागामध्ये एकूण २१६ वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी कार्यरत असल्याबाबत विभागाने लेखापरीक्षण कामी यादी उपलब्ध करून दिली,यापैकी फक्त १३ सेवापट / सेवापुस्तक उपलब्ध झाले. यामध्ये तपासणीअंती खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. **श्री.अशोक पांडुरंग सुरडकर, स्वच्छता निरिक्षक,**
संबंधितास दिनांक ११.५.२००३ पासून आश्वासित प्रगती योजनेचा लाभ प्रदान आहे. प्रकरणी नियमाप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात यावी.

२. **श्री.मोहम्मद ईक्बाल गुलाम जिलानी, कनिष्ठ लिपीक**
संबंधितांची दिनांक १७.७.१९९७ पासून सुधारित केलेली वेतननिश्चिती (निवडश्रेणी) बरेबर आहे. मात्र दरम्यानच्या कालावधीत अतिप्रदान झालेले वेतन रक्कम वसूलीची नोंद सेवापुस्तकात दिसून आली नाही. खुलासा व्हावा.

३. **श्रीमती सुषमा कुलकर्णी, कनिष्ठ लिपीक**
संबंधितास दि.१.७.२०१२ रोजीचे वार्षिक वेतनवाढ रू.४९०/- इतके परिगणित करून त्यानुसार पुढील नोंदी घ्याव्यात. दरम्यानचे कालावधीत अतिप्रदान झालेले वेतन वसूल करून तशी सेवापुस्तकात नोंद घेण्यात यावी.

४. **श्री.साहेबराव धनाजी बनकर, कनिष्ठ लिपीक.**
१) संबंधितास दिनांक ९.६.१९९४ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान आहे. (दिनांक १.१०.१९९४ पासून विकल्प) वेतननियम ११.४.१९९४ प्रमाणे सुधारित वेतननिश्चिती व अनुषंगिक कार्यवाही विभागाने करावी.

२) संबंधितास नियमित वार्षिक वेतनवाढी प्रदान केल्याच्या नोंदी सेवापुस्तकात दिसून येत नाही.याबाबत स्पष्ट खुलासा करावा.

५. **श्री.दत्तात्रय पंडू सुर्यवंशी, कनिष्ठ लिपीक,** यांचे मूळ सेवापुस्तक नोंदीप्रमाणे तपासणी केली असता वेतननोंदी बरोबर आहेत.

६. **श्री.परमेश्वर धोंडू पनाड, शिपाई** / मजूर दिनांक ९.६.१९९४ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान आहे. संबंधिताची सुधारित वेतननिश्चिती वेतन नियम ११ (४) प्रमाणे करून अनुषंगिक कार्यवाही विभागाने करावी.

७. **श्रीमती हिराबाई शंकर रगडे, सफाई मजूर,**

१)संबंधिताचा पोलिस आयुक्त, औरंगाबाद यांनी दिलेला वर्तणूक / चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद सेवापटामध्ये नाही.

२) प्रथम नियुक्ती आदेश क्र.मनपा/आस्था-२/२०००/६४,दिनांक ११.७.२००० अन्वये आदेशामध्ये घालून दिलेली अट क्र.४ चे नमूद केल्याप्रमाणे ४ थी पर्यंतची शैक्षणिक अर्हता नियुक्तीपासून २ वर्षात सादर करण्यात यावी. तसे सेवापटामध्ये दिसून आलेले नाही. याबाबत विभागाने कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

८. **श्रीमती सुनंदा प्रकाश उमाप, सफाई मजूर,**

१) वैद्यकीय रजा आदेश क्र.मनपा/वॉर्ड-फ/७०३/२०१४, दिनांक ५.५.२०१४ अन्वये रजेची नोंद सेवापटामध्ये घेतली नाही.

२) दिनांक १.७.२०१४ रोजीची वार्षिक वेतनवाढ प्रदान केल्याचे दिसून येत नाही.

९. **श्रीमती सुनिता कैलास गायकवाड, सफाई मजूर**

१) मूळ सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत.

२) संबंधिताचे वैद्यकीय शारीरिक तपासणी / पोलिस -चारित्र्य पडताळणी अहवालाच्या नोंदी सेवापटामध्ये घेतलेल्या नाहीत.

३) वेळोवेळी उपभोगलेल्या रजा - नोंदी सेवापटामध्ये घेतलेल्या नाहीत. परिविक्षाधिन कालावधी अद्यापही खुला केल्याची नोंद सेवापटात नाही. परंतू वार्षिक वेतनवाढी प्रदान केल्याच्या सेवापटात नोंदी आहेत. या बाबत विभागाने स्पष्ट खुलासा करावा.

१०. **श्री.सिध्दार्थ बाबुराव जाधव, सफाई मजूर**

संबंधिताचे वैद्यकीय शारिरीक तपासणी / पोलिस -चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद सेवापटात दिसून येत नाही.

११. **श्री.पुनमचंद भानुदास मोटे, सफाई मजूर**

संबंधिताचे वैद्यकीय शारिरीक तपासणी / पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद सेवापटात दिसून येत नाही.

१२. **श्री.प्रभाकर ओंकार पवार, सफाई मजूर**

संबंधितास दिनांक ९.६.१९९४ पासून (दिनांक १.२.१९९५ विकल्प) पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान आहे. संबधिताची वेतननियम ११ (४) प्रमाणे सुधारित वेतननिश्चिती करून अनुषंगिक कार्यवाही करावी.

१३. **श्री.दशरथ दगडू जोंधळे, शिपाई**

१) दि.१.७.२००८ रोजीची वार्षिक वेतनवाढ २२०/- इतकी येते. मात्र २३०/- प्रदान केल्याची नोंद आहे. विभागाने दुरूस्ती / कार्यवाही करावी.

२) दि.१७.११.२००९ पासून आश्वासित प्रगती योजने अंतर्गत केलेली वेतननिश्चिती आदेशाची नोंद सेवापटामध्ये घेतलेली नाही.

वरील कर्मचा-यांचे सेवापुस्तक / सेवापट मध्ये निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबी विभागाने प्रत्यक्षात तपासून खातरजमा करावी. त्यानुषंगाने पूर्तता / कार्यवाही करुन तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही.

**विभागाने उक्त प्रकरणासोबत इतर सर्व प्रकरणे तपासून अद्ययावत करावीत. तद्नुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल प्रशासकीय कार्यवाहीअंती सादर करावा.**

# लेखापरीक्षण अहवाल

## वॉर्ड अभियंता
## वॉर्ड - फ कार्यालय

**परिच्छेद क्र. १ : लेखापरीक्षण कामी अभिलेखे उपलब्ध करुन दिलेली नसल्याबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान मागणी करुनही खालील अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाही.

६. स्टॉक रजिस्टर क्र.१०९,११० व १११.

७. जडसंग्रह नोंदवही

८. मत्ता (Assets) रजिस्टर.

९. ए-वन व रेटलिस्टच्या कामाच्या संचिका.

१०. बी-१ निविदा कामाच्या अपूर्ण संचिका.

**उपरोक्त प्रमाणे अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब अतिशय गंभीर असून संशय निर्माण करणारी आहे. याबाबत विभागाने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २ : वॉर्ड क्र.९२ मिलिंद नगर येथील नागसेननगर मशिदच्या मागील गल्लीत ड्रेनेज लाईन बदलणे बाबत. (अं.प.रक्कम रू.१,४९,४८९/-) एकूण खर्च रू.१,४०,३२२/-**

वॉर्ड - फ कार्यालयातील लेखापरीक्षणासाठी प्राप्त अभिलेख्यातील वॉर्ड क्र.९२ मिलिंदनगर येथील नागसेन नगर मशिदच्या मागील गल्लीत ड्रेनेज लाईन बदलणे करीता ई-टेंडरिंग विभागामार्फत रू.१,४९,४८९/- रकमेच्या अंदाजपत्रकीय कामाची निविदा मागविण्यात आली होती. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ४ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृती तारखेपर्यंत ४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी ५.९९% Below दराची निविदा राजेंद्र बाबुराव कांबळे यांची होती. संबंधितांनी २% अनामत रकमेचा भरणा व कंत्राटी कामाचा करारनामा महानगरपालिके सोबत केल्यानंतर संबंधितांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड-फ/वॉर्ड अभियंता/१२६३/२०१३, दिनांक १४.३.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत एक महिना दर्शविलेली आहे. सदरील काम दिनांक २२.३.२०१३ रोजी पूर्ण झाले. संबंधितांना देयक अदायगी व अनामत रक्कम परत करण्यात आलेली आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. संचिकेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाचे नोंदणी पत्र जोडलेले नाही. त्यामुळे सदरील काम करण्यास संबंधित गुत्तेदार पात्र आहेत याची खात्री झाली नाही. त्यांच्या ऐवजी इतर एका निविदेतील सहभागी कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले आहे.

२. संचिकेत शेड्यूल B ची प्रत नाही. कंत्राटदाराने केलेले काम अंदाजपत्रकीय दरानुसार तपासावे लागले.

३. अंदाजपत्रकातील ॲटम क्र.११ fixing /Refixing SFRC Frame and cover ची संख्या २ दर्शविली. जेव्हा की ॲटम क्र.१० मध्ये नमूद manhole ची संख्या एक आहे. दोन संख्या दर्शवून रू.४१५/- जादा अदा केले आहेत. संबंधितांकडून वसूल करावे. वसूल रक्कम महानगरपालिका फंडात जमा करावी.

४. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तिका क्र.३०९९ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नसल्याने संपूर्ण लेखापरीक्षण करता आले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा करण्यात यावा. तसेच रू.४१५/- संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करावा, तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करणेबाबत कळवूनही अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही.**

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३ : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात हॉटेल विटस् ते आनंद गाडे चौक पर्यंत रस्त्यालगत फुटपाथ बांधणे, ड्रेनेज लाईन बदलणे व सौंदर्यीकरण करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.१,१९,८३,१२२/-) एकूण खर्च रू.१,२४,१३,९२८/-)**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात हॉटेल विटस् ते आनंद गाडे चौक पर्यंत रस्त्यालगत फुटपाथ बांधणे, ड्रेनेज लाईन बदलणे व सौंदर्यीकरण करणे या कामाकरीता मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.७२, दिनांक १७.१२.२०१२ अन्वये रक्कम रू.१,१९,८३,१२२/- च्या उपरोक्त कामास मंजूरी प्रदान केलेली आहे. सदरील कामासाठी ई-टेंडरिंग विभागातर्फे निविदा मागविल्या असता दोन निविदा विक्री झाल्या,निविदा स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या.त्यापैकी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा ९.९९% जास्त दराची, परंतू दोन निविदा पैकी कमी दराची निविदा प्राप्त झाली. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन या कंत्राटदारास जास्त दराची निविदा असल्यामुळे दर निश्चित करणे करीता वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले. संबंधित कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास संमती दिल्यानंतर मा.आयुक्त यांनी निविदा दर स्वीकृतीस मान्यता दिली. कंत्राटदाराने कामाचा करारनामा करून दिला. कंत्राटदारास कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्ड-फ/वॉर्ड अभियंता/१०१४/२०१३, दिनांक ६.३.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत १२ महिन्याची होती. सदरील काम दिनांक २७.५.२०१३ रोजी पूर्ण झाले. उपरोक्त कामाची संचिका व मोजमाप पुस्तिका क्र.२९९८ तपासली असता पुढील बाबी लेखापरीक्षण मध्ये आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. शेड्यूल B मध्ये कामाची विभागणी A,B,C,D अशा चार भागात केलेली आहे. परंतू पार्ट D बाबत सौंदर्यीकरणाचे सविस्तर अंदाजपत्रक व दर नमूद केलेले नाहीत.

२. शेड्यूल B वर कार्यकारी अभियंता यांनी व संबंधित कंत्राटदार यांनी स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे दर वैध आहेत याची खात्री झाली नाही.

३. सदरील काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिलेले आहे. तथापि शेड्यूल B मधील पार्ट D मधील सौंदर्यीकरणाचे काम झालेले नाही.

४. काम पूर्ण होण्याच्या अगोदरच संबंधितांच्या २% व ३% अनामत रकमांचा परतावा केलेला आहे.

५. पहिल्या व दरम्यानच्या देयकात शेड्यूल B पार्ट A मधील ॲटम क्र.३ पेव्हर ब्लॉकची जाडी ८०mm असावी असे नमूद असून दर निश्चित झालेले आहे. परंतू शेड्यूल B मध्ये नमूद केलेल्या पेव्हर ब्लॉकच्या specification ऐवजी काही संख्येत ६०mm जाडीचे पेव्हर ब्लॉक वापरले त्यामुळे कमी जाडीचे पेव्हर ब्लॉक वापरुन उद्येश सफल झाला असे दिसून आले नाही.

६. दुस-या व दरम्यानच्या देयकात कंत्राटदारास शेड्यूल B पार्ट C मधील ॲटम क्र.५ (Refilling the trenches with excavated stuf etc) ची Quantity मधून वजा करण्याच्या ऐवजी बेरीज करुन रु.६३८४/- जादा अदा केले आहे. जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूली करुन महानगरपालिका फंडात जमा करावी.

७. तिस-या व दरम्यानच्या देयकात शेड्यूल B पार्ट B ॲटम क्र.९ SFRC Frame and cover supply करण्याबाबत संख्या ३९ पाहिजे असता ४० दर्शविली. कारण प्रत्यक्षात ३९ मेनहोल चेंबर तयार केल्याची नोंद आहे. एका फ्रेम व कव्हरचे दर रु.२४३८/- असून कंत्राटदारास जादा रक्कम अदा केलेली आहे. सदरील जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करुन महानगरपालिका फंडात भरणा करावी.

८. निविदा अंतिम करतांना शासन निर्णय क्र.२ जानेवारी १९९२ मधील तरतूदींचे पालन केलेले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा प्रकरणाची शहानिशा, खातरजमा करुन करण्यात यावा. तसेच जादा अदा रक्कम महानगरपालिका फंडात भरणा करुन तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करणेबाबत कळवूनही अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झ ाालेला नाही.**

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४ : वॉर्ड क्र.९९ शिवाजीनगर मधील सी सेक्टर व रेल्वेलाईन मधील गटार व संरक्षित भिंतीची दुरुस्ती करणे. (अं.प.रक्कम रु.९,९५,८७५/-)**

वॉर्ड क्र.९९ शिवाजीनगर मधील सी सेक्टर व रेल्वे लाईन मधील गटार व संरक्षित भिंतीची दुरुस्ती करण्याकरीता आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये मा.महापौर आपत्कालीन निधी या लेखाशिर्षा मधून प्रस्तावित करण्यात आला आहे. त्या अन्वये ९,९५,८७५/- खर्चास मा.आयुक्त यांनी दिनांक ३०.३.२०१२ रोजी मान्यता दिली आहे.

कार्यालयीन निविदा सूचना क्रमांक ५९-१२-४६ अन्वये दिनांक २४.०८.२०१२ रोजी निविदा काढण्यात आल्या असून त्यानुसार दोन निविदा प्राप्त झाल्या असून ५.०% कमी दराची निविदा गुत्तेदार श्री.उत्तम किसनराव पंडील यांची असून त्यास परिच्छेद क्रमांक ३५, दिनांक १२.१०.२०१२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१ . निविदा मागवितांना कमीत कमी तीन निविदा प्राप्त होणे आवश्यक असतांना फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या आहे. त्यानुसार कमी दराच्या निविदा धारकास निविदा मंजूर करण्यात आली आहे. दिनांक २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील तरतूदींचे पालन झालेले नाही.

२. संचिका पान क्रमांक N-४ परिच्छेद क्रमांक १३ अन्वये सदरील संरक्षित भिंत व गटार ही रेल्वे विभागाने रेल्वे पटरी लगत गाडलेल्या हद्यी पोलच्या बाहेर असून सदर जागा ही सिडकोच्या हद्यीत येत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच कार्यकारी अभियंता यांनी जागेची स्थळपाहणी करण्या करीता अभिप्राय नोंदविलेला आहे. स्थळ पाहणी अहवाल संचिकेत उपलब्ध नाही. त्याबाबतची टिप्पणी नमूद नाही. या विषया संदर्भाने विभागाने त्याचे परिच्छेद क्रमांक ३४ मध्ये कामाची जागा सिडको हद्यीत असल्याने व कंसात महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्याचे परिच्छेद क्र.१३ नमूद केले आहे असे दर्शवून दोन्ही संदर्भ हे परस्पर विरोधी आहे.

३. निविदेतील ॲटम क्र.१० हा अंदाजपत्रकातील quantity ५३३.८० $m^२$ असून प्रत्यक्ष देयक अदाई करतांना ११८३.२० $m^२$ इतकी आहे. म्हणजेच अंदाजपत्रकापेक्षा ६४९.४० इतकी quantity वाढलेली आहे. सदर वाढ १२१.६५% असून यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतल्या खेरीज देयक अदा करण्यात आले आहे. जास्तीचा झालेला खर्च अमान्य करण्यात येतो.

४. विभागाने संचिका प्रस्तावित करतांना सदरील खर्च हा मा.महापौर आपत्कालीन निधी या लेख्राशिर्षातून प्रस्तावित केला आहे. तथापि लेख्रा शाखेने सदरील अंदाजपत्रकास मान्यता देतांना "शहरी भागात खुल्या गटारी बांधणे " या लेख्राशिर्षात खर्च नोंदवून अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे. लेख्राशिर्षा बाबत खुलासा अपेक्षित आहे.

५. अंदाजपत्रकास मान्यता देण्यापूर्वी संरक्षित भिंती बाबतची जागा व त्यांची मालकी बाबत निविदेपूर्वी पुन: तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा प्रकरणाची शहानिशा, खातरजमा करून तसा अनुपालन अहवाल लेख्रापरीक्षण विभागास सादर करणेबाबत कळवूनही अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही.**

**विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**<u>परिच्छेद क्र. ५</u> वॉर्ड क्र.६९, शितल अपार्टमेंट पाठीमागील नाला संरक्षित भिंत बांधणे व स्लॅब टाकणे बाबत. (अं.प.रक्कम रू.१४,९४,२०३/-)(खर्च रक्कम रू.१९,९८,१३५/-)**

वॉर्ड क्र.६९ शितल अपार्टमेंट पाठीमागील नाला संरक्षित भिंत बांधणे व स्लॅब टाकणेच्या कामाची संचिकेत ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. या कामासाठी ५ वेळा निविदा मागवून प्रतिसाद मिळाला नाही. ६ व्या वेळी एक निविदा विक्री झाली व एक निविदा प्राप्त झाली. फाईव्ह स्टार कन्स्ट्रक्शन यांनी ५०% Above दराने निविदा सादर केली. संबंधिता सोबत वाटाघाटी अंती १७% Above दराने स्वीकृत केली. संबंधितांनी महानगरपालिके सोबत करारनामा करून दिल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्ड अभि/१९३४/२०१२, दिनांक २९.६.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशात ६ महिन्याची मुदत देण्यात आली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील काम १७% Above दराने स्वीकृत केल्यानंतर ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव स्विकारली नाही. त्यामुळे मनपाचे रू.७४७१०/- रकमेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. सदरील कामाबाबतची मोजमाप पुस्तिका क्र.२६०९ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. सदरील कामाबाबत शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत पहावयास मिळाली नाही.

४. सदरील कामासाठी अंदाजपत्रकात नमूद बाबी मधील ॲटम क्र.३,९,१०,११,१२,१३,१६ वरील कामे पार पाडली नसल्याने केवळ नाल्यावर संरक्षित भिंत बांधकामाचे काम झाले. परंतू स्लॅब टाकणे हे काम झाले नसल्यामुळे काम १००% सफल झाले नाही.

५. उपरोक्त मुद्यातील ॲटम मधील कामाचा निधी अंदाजपत्रकातील इतर बाबींवर खर्च करुन ॲटम क्र.१,४,५,६,७,१४ व १५ यावर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २५% हून जादा खर्च झालेला असून नियमबाह्य आहे, अतीरिक्त झालेल्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही. त्यामुळे खर्च अमान्य करण्यात येतो.

६. अंदाजपत्रकातील ॲटम व्यतीरिक्त Extra ॲटमवर सुध्दा खर्च झालेला असून संचिकेत परिच्छेद (१६४) प्रमाणे Extra ॲटम वरील खर्च वगळून उर्वरीत देयक अदा करण्याची शिफारस लेखा शाखेने केलेली आहे. यावर विभागाने खुलासा सादर केला. त्याबाबतची लेखा शाखेने परिच्छेद (१७३) नुसार कामाचे स्वरूप अतिरिक्त बाब ठरत नाही यासाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून कामे करणे अनुज्ञेय ठरते अशी टिपणी देवून तांत्रिक कक्षाने परिच्छेद (१७६) अन्वये प्रकरण आयुक्तांच्या विचारार्थ व आदेशास्तव सादर केलेले असतांना आयुक्तांनी स्पष्ट देयक अदायगी बाबत अभिप्राय नोंदविलेले नसतांनाही लेखा शाखेने रू.४,७५,०४२/- रकमेचे देयक पारीत कोणत्या आधारे केले याची स्पष्टता होवू शकली नाही. लेखा शाखेने सदरील संचिकेत देयक पारीत करण्यापूर्वी परिच्छेद (१६४) व (१७३) प्रमाणे दिलेले अभिप्राय विचारात न घेता पारीत केलेले आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा प्रकरणाची शहानिशा, खातरजमा करून करण्यात यावा. तसेच जादा अदा रक्कम महानगरपालिका फंडात भरणा करून तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करणेबाबत कळवूनही अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झ ालेला नाही.**

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**<u>परिच्छेद क्र. ६</u> :प्रभाग क्र.९६ स.नगरसेवक यांच्या घरासमोर कॉंक्रेटींग करणे ऐवजी पेव्हर ब्लॉक बसविणेच्या कामाबाबत.(अं.प.रक्कम रू.४,९७,२०६/- (खर्च रक्कम रू.४,३७,१०९/-)**

प्रभाग क्र.९६ स.नगरसेवक यांच्या घरासमोर कॉंक्रेटींग करणेच्या कामाऐवजी स.स.यांच्या पत्रानुसार पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम करणे बाबत कामे करण्यात आली. सुरूवातीस सदरील ठिकाणी कॉंक्रीट कामे करण्याची निविदा ई टेंडरिंग विभागामार्फत मागविली असता एक निविदा विक्री झाली. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली. नाझ डेव्हलपर्स यांनी १२.१२% Below दराची निविदा दाखल केली.

संबंधितांनी महानगरपालिके सोबत कामाचा करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड-फ/वॉर्ड अभि/४५३८/२०१२, दिनांक १२.१०.२०१२ अन्वये सदरील कामाचे कार्यादेश निर्गमित केले. कामाची मुदत २ महिने दर्शविण्यात आली. सदरील ठिकाणी कॉंक्रीट ऐवजी पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामास दिनांक ८.८.२०१३ रोजी मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली. सदरील काम दिनांक ८.८.२०१३ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. कार्यादेशात नमूद केल्याप्रमाणे कामाची मुदत २ महिने असतांना काम विलंबाने पूर्ण झाले. तरी सुध्दा संबंधित कंत्राटदारा विरुध्द कार्यादेशात नमूद केल्याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही झालेली नाही.

२. कार्यादेशात नमूद केल्यानुसार देयकातून कामगार कल्याण निधीची १% रक्कम रू.४९७२/- कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. कंत्राटी कामाचा विमा दिनांक ८.८.२०१३ रोजी काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक २७.८.२०१३ ते २६.११.२०१३ या कालावधीसाठी काढण्यात आला. कंत्राटी कामाचा विमा काम सुरु असतांना काढणे आवश्यक होते, त्यामुळे विमा उतरविल्याचा हेतू सफल होत नाही.

४. लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने मोजमाप पुस्तिका क्र.३०८९ उपलब्ध करुन दिलेली नसल्याने तयार केलेले देयक व प्रत्यक्षात झालेली कामे योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

५. कामाचे completion Report वर कामाचे नांव कॉंक्रेटीकरण करणे असेच नमूद आहे. सुधारित अंदाजपत्रकात पेव्हर ब्लॉकचे काम नमूद आहे. त्यामुळे नेमके कोणते काम झाले याचा बोध होत नाही. तसेच सदरील Report वर कार्यादेशाची दिनांक १२.१०.२०१२ ऐवजी दिनांक १२.१०.२०१३ दर्शविली. प्रत्यक्षात काम दिनांक ८.८.२०१३ रोजी पूर्ण झाल्याचे नमूद आहे. तारखांमधील विसंगती योग्य नाही.

**उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने शासनाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ७ :वॉर्ड क्र.८७, उल्कानगरी भागातील चेंबर्स बांधणे व ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.७,६०,७७८/-)(खर्च रक्कम रू.७,१७,२७४/-)**

वॉर्ड क्र.८७ उल्कानगरी भागातील चेंबर्स बांधणे व ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणेच्या कामाकरीता ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदा विक्री झाल्या. २.९९% Below ची निविदा अब्दुल हबीब यांची होती. संबंधित कंत्राटदाराने महानगरपालिके सोबत कामाचा करारनामा केल्यानंतर कार्यालयाने पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्डअभियंता/१२०८/२०११, दिनांक २३.५.२०११ अन्वये कार्यादेश दिले. कामाची मुदत तीन महिने ठेवण्यात आली. सदरील कामाच्या संचिकेत शाखा अभियंता यांनी संबंधित ठेकेदारास पूर्वीच्या कामाची बिले मिळालेली नसल्यामुळे मार्च २०१३ पर्यंत मुदत वाढवून देण्याची मागणी केली आहे असे टिपणीत नमूद आहे.

त्यानुसार प्रथम व अंतिम देयकास मान्यता प्रदान करतांना सदरील कामास मा.आयुक्त यांनी दिनांक २०.३.२०१३ पर्यंत मुदतवाढ दिनांक १८.५.२०१३ रोजी मान्यता दिली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील कामाच्या मुदतवाढी बाबत शाखा अभियंता यांनी संचिकेच्या NS८ परिच्छेद (२३) प्रमाणे कंत्राटदारास पूर्वीच्या कामाची बिले मिळालेली नसल्यामुळे कामास विलंब झाला असे नमूद करुन त्यांच्या मागणी नुसार मुदतवाढ प्रथम व अंतीम देयकाचे वेळी सादरीकरण करणे योग्य नाही. संबंधित कंत्राटदारांची विनंती अर्ज संचिकेत नसतांनाही सादरीकरण केलेले आहे. काम ३ महिने ऐवजी विलंबाने झाले त्यामुळे नागरीकांना त्रास सहन करावा लागला.

२. मोजमाप पुस्तिका क्र.२५९४ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन न दिल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. देयकात ॲटम क्र.१, २ व ३ अन्वये निघालेले material च्या quantity तून ॲटम क्र.१२ मध्ये नमूद quantity वळती झाल्यावर उर्वरीत material साठी ॲटम क्र.१४ नुसार देयक पारीत करणे आवश्यक होते.

| ॲटम क्र.१,२,३ ची quantity | ॲटम क्र.१२ ची quantity | ॲटम क्र.१४ ची quantity | जादा अदा quantity |
|---|---|---|---|
| ७६१.०७ | ७०२.३५ | १५०.६६ | ९१.९४ |

सदरील कामात ॲटम क्र.१४ मध्ये ९१.९४ जादा quantity दर्शवून रू.९३.७५ दराप्रमाणे रू.८६१९/- रक्कम जादा अदा केलेली आहे. जी वसूलीस पात्र आहे.

४. सदरील कामाचे देयकात ॲटम क्र.७ मधील १.०० मीटर खोलीचे मेन होल चेंबर ६ तयार करण्यात आले. त्याचे दर रू.३३०९/- प्रती चेंबर आहेत. त्यानुसार रू.१९,८५४/- संबंधितांना अदा करणे ऐवजी रू.२०२१४/- अदा केले. रू.३६०/- जादा अदा रक्कम वसूलीस पात्र आहे.

**विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत तपासणी करून, खातरजमा करून जादा अदा केलेली रक्कम वसूल करून तसेच इतर अनियमिततेबाबत लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले असता विभागाने अहवाल अंतीम होईपयंत खुलासा सादर केलेला नाही.**

**महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ८ : वॉर्ड क्र.८६, अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर येथील कब्रस्थान लगत नाल्याची सफाई करणे. (अं.प.रक्कम रू.२,४९,६५०/-)(खर्च रक्कम रू.१,६४,७१९/-)**

वॉर्ड क्र.८६ अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर येथील कब्रस्थान लगत नाल्याची सफाई करणेच्या कामाची संचिका तपासली. सदरील कामासाठी ई निविदा विभागामार्फत ५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ५ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा ३३.९९ Below दराची राजेंद्र बाबुराव कांबळे यांची होती.

ेसंबंधितांनी करारनाम्या सोबत २% अनामत भरणा करुन ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रु.१२५००/- देयकातून कपात करण्याची विनंती केली. संबंधितांची विनंती मान्य करुन त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्ड अभि/३०९५/२०१३, दिनांक २७.५.२०१३ अन्वये कामाची मुदत नमूद न करता कार्यादेश देण्यात आले. काम दिनांक २६.३.२०१४ रोजी पूर्ण झाले. संचिकेमध्ये निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे आहेत.

१. सदरील काम नाले सफाईचे असून मा.सभापती स्थायी समिती यांच्या दिनांक १८.४.२०१३ च्या संचिकेतील पत्र क्र.मनपा/सभापती/२०१३/२२८ नुसार नाले सफाई मान्सूनपुर्व करणेची आवश्यकता नमूद आहे. परंतू कार्यादेशात कामाची मुदत नमूद नाही व काम मुदतीत न केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असेही नमूद आहे. काम दिनांक २६.३.२०१४ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. नाले सफाईचे काम मान्सूनपूर्व पूर्ण न झाल्यामुळे कामाचा हेतू सफल झालेला नाही.

२. सदरील काम ३३.९९% Below दराने करण्याची निविदा स्वीकृत केली. काम सुरु करण्यापूर्वी हमी म्हणून ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रु.१२५००/- संबंधितांकडून भरणा करुन घेतल्यानंतरच कार्यादेश देणे योग्य बाब होते. या ठिकाणी कंत्राटदाराची विनंती मान्य करुन देयकातून रु.१२५००/- ऐवजी रु.८२३६/- कपात केले. रु.४२६४/- कपात न केल्यामुळे मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले. तसेच कार्यादेश देण्यापूर्वी ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव वसूल केलेली नाही ही बाब नियमबाह्य ठरते. अतिरिक्त सुरक्षा ठेव ही कामाच्या performance शी निगडीत असते.

३. लेखापरीक्षण पथकास मोजमाप पुस्तीका क्र.२६०८ उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे देयकातील बाबी योग्य आहे की नाही याची खात्री करता आलेली नाही.

४. कामगार कल्याण निधीची रक्कम रु.२४९७/- ऐवजी रु.१६४७/- कपात केली. त्यामुळे शासनाचे रु.८५०/- रकमेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्यास कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपयंत खुलासा सादर केलेला नाही.**

**महानगरपालिका/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ९ : वॉर्ड क्र.८८, जयविश्वभारती कॉलनी येथील शिवराज कॉलनी व इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे व नविन ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. (अं.प.रक्कम रु.६,९०,३४३/-)(खर्च रक्कम रु.८,६४,४९४/-)**

वॉर्ड क्र.८८ जयविश्वभारती कॉलनी येथील शिवराज कॉलनी व इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे व नविन ड्रेनेज लाईन टाकणे च्या कामाची संचिका तपासली. सदरील कामासाठी ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व एक निविदा स्वीकृतीच्या तारखेस प्राप्त झाली. विजयसिंग परदेशी यांनी २७.२७% Above दराची निविदा सादर केली. संबंधित एजन्सी सोबत झालेल्या वाटाघाटी अंती कामाचा करारनामा केला. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्ड अभि/१३५/२०१२, दिनांक १६.११.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील काम तीन महिन्याचे मुदतीत करण्यात यावे असे कार्यादेशात नमूद आहे.

संबंधित कंत्राटदाराने दिनांक २२.३.२०१२ पर्यंत कामास सुरुवात केली नाही म्हणून त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड अभि फ/८५६/२०१२ अन्वये ३ दिवसात काम सुरु करावे अन्यथा B१ निविदेतील अटी शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असे कळविले. सदरील काम दिनांक २९.११.२०१२ रोजी पूर्ण झाले. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्यात.

१. कामाची मुदत ३ महिन्याची असतांना संबंधित कंत्राटदारास सूचना करुनही काम विहीत मुदतीत पूर्ण झालेले नाही. त्यामुळे संबंधितांविरुध्द दंडात्मक कार्यवाही विभागाने केलेली नाही. सदरील कामास ३० नोव्हेंबर २०१२ पर्यंत प्रथम व दरम्यानचे देयक मंजूर करतांना दिनांक ७.९.२०१२ रोजी मा.आयुक्तांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

२. सदरील कामाची निविदा बोलावण्यापूर्वी अंदाजपत्रक मंजूर करतांना तांत्रीक कक्षाने दर्शविलेली रक्कम रु.६,८८,४००/- अशी होती. परंतू निविदेमध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,९०,३४३/- दर्शवून मनपाचे रु.१९४३+२४% above असे रु.२४०९/- चे आर्थिक नुकसान केलेले आहे.

३. कंत्राटी कामाचा विमा कालावधी दिनांक ३.८.२०१२ ते १५.९.२०१२ पर्यंत आहे. प्रत्यक्षात काम दिनांक २९.१२.२०१२ रोजी पूर्ण झाल्याचे अभिलेख्यावरुन स्पष्ट होते. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू साध्य होत नाही.

४. दुस-या व दरम्यानच्या देयकात ॲटम क्र.६ ची quantity नुसार ४८९.४०x१०२.९० रु.५०३५९/- अनुज्ञेय आहे. प्रत्यक्षात रु.८६८०६/- अदा केले. रु.३६४४७/- जादा रक्कम अदा केली. तसेच ॲटम क्र.१० च्या quantity नुसार १x१५७३= रु.१५७३/- अनुज्ञेय आहे. प्रत्यक्षात रु.१२२६९४/- अदा केले. रु.१२११२१/- जादा अदा केलेले असून जादा अदा केलेली रक्कम रु.३६,४४७/- +१,२१,१२१/- असे एकूण रु१,५७,५६८/- वसूलीस पात्र आहेत.

५. सदर कामाची मोजमाप पुस्तीका क्र.२८९३ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

६. शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

७. सदर काम २४% जास्त दराने असल्याने ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव संबंधितांकडून वसूल न केल्यामुळे रु.३४५१७/- रकमेचे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे.

**उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करुन जादा अदा रक्कम संबंधितांकडून वसूल करुन सविस्तर खुलाशासह अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करण्यास कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपयंत खुलासा सादर केलेला नाही.**

**महानगरपालिका/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १० : वॉर्ड क्र.८९, ज्योतीनगर अंतर्गत रेखा कॉम्प्लेक्स ते इंद्रप्रस्थ कूजलेव्ह व इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे बाबत.(अं.प.रक्कम रू.४,९९,८३६/-) (खर्च रक्कम रू.४,९९,२५५/-)**

वॉर्ड क्र.८९, ज्योतीनगर अंतर्गत रेखा कॉम्प्लेक्स ते इंद्रप्रस्थ कूजलेव्ह व इतर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्री तारखेपर्यंत २ निविदा विक्री झाल्या. २ निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदेपैकी म्हस्के कन्स्ट्रक्शन यांची २% जास्त दराची निविदा कार्यालयाने स्वीकृत केली. संबंधितांनी महानगरपालिके सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्ड-फ/वॉर्ड-अभि/५०५३/२०१२, दिनांक २७.११.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ३ महिन्याची होती. काम दिनांक २०.२.२०१३ रोजी पूर्ण झाले. संचिकेची सविस्तर तपासणी केली, खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. मोजमाप पुस्तिका क्र.३०९६ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाही.

२. शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत नाही.

३. कंत्राटी कामाचा विमा, काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक १८.४.२०१३ ते १७.७.२०१३ या कालावधीसाठी काढल्यामुळे विमा काढण्याचा हेतू पूर्ण होत नाही.

४. देयक अदायगी करतांना एकूण खोदकामातून निघालेले विविध मटेरियल, जसे माती, मुरम इत्यादीची Quantity मधून सदरील ठिकाणी ड्रेनेज पाईप टाकून Refiling साठी वापरलेले मटेरियल वजा जाता surplus material ची quantity येणे अभिप्रेत आहे. २३.९० quantity ची रक्कम अनुज्ञेय आहे. त्या ठिकाणी ११२.९९ quantity ची रक्कम अदा केली. रू.१२१.१५ प्रमाणे रू.१३६८९/- अदा केले. अनुज्ञेय रक्कम रू.२८९५/- ठरते. अदा रकमेतून अनुज्ञेय रक्कम वजा जाता रू.१०७९४/- जादा अदा केलेली असून वसूलीस पात्र आहे.

**उपरोक्त मुद्यांवर आपल्या स्तरावर तपासणी करुन, जादा अदा रक्कम वसूल करावी. तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे कळविण्यात आले असता विभागाने अहवाल अंतीम होईपयंत खुलासा सादर केलेला नाही.**

**महानगरपालिका/ शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ११ : वॉर्ड क्र.९२, येथील मिलिंद नगर येथे हाफ राऊंड गटार बांधणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२४,९४,७२६/-)(खर्च रक्कम रू.२६,०१,७४६/-)**

वॉर्ड क्र.९२, येथील मिलिंद नगर येथे हाफ राऊंड गटार बांधणे बाबत च्या कामाची संचिका तपासली. संचिकेत सदरील कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. २ निविदा विक्री व २ निविदा स्वीकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत प्राप्त झाल्या. पैकी एक निविदा तांत्रिकदृष्ट्या Reject करण्यात आली. दुसरी निविदा १३.८५% Above दराची पार्थ कन्स्ट्रक्शन यांची आहे. संबंधितास वाटाघाटीस बोलावण्यात आले. संबंधितांनी दर कमी करुन ४.५०% Above दराने काम करण्यास संमती दिली. संबंधितांची ४.५% Above दराची निविदा स्वीकृत करण्यात आली. संबंधितांनी करारनामा केल्यानंतर त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्ड अभि/५९८७/२०१३, दिनांक ७.१.२०१३ अन्वये सदरील काम चार महिन्यात करण्याबाबत कार्यादेश दिले.

सदरील काम दिनांक २.४.२०१३ रोजी पूर्ण होवून दिनांक ८.८.२०१३ रोजी मनपाकडे हस्तांतरीत करण्यात आले. संचिकेची तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्यात.

१. कंत्राटी कामाचा विमा कालावधी काम पूर्ण झाल्यानंतरचा दिनांक २३.८.२०१३ ते २२.१२.२०१३ चा आहे. त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.
२. सदरील काम दिनांक २.४.२०१३ रोजी पूर्ण झाल्यानंतर दिनांक ८.८.२०१३ रोजी तब्बल ४ महिने उशिराने हस्तांतरीत करण्याचा हेतू काय होता याची स्पष्टता झालेली नाही.
३. कामाचे देयक अदायगी दिनांक ८.८.२०१३ रोजी सादरीकरण झालेले आहे. प्रत्यक्षात लेखा शाखेने देयक पारीत केल्याची तारीख नमूद नाही.
४. सदरील संचिकेच्या सोबतची मोजमाप पुस्तीका क्र.३०८४ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नसल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

**करीता उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने उक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १२ : वॉर्ड क्र.९२, अंतर्गत नागसेननगर येथील चॅनेल गटार दुरूस्त करणे. (अं.प.रक्कम रू.९,५२,२००/-)(खर्च रक्कम रू.९,९९,८१०/-)**

वॉर्ड क्र.९२ अंतर्गत नागसेननगर येथील चॅनल गटार दुरूस्त करणेचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असतांना २ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत २ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा १८.९९% Below सचीन वाकळे यांची होती. संबंधितांनी महानगरपालिके सोबत करारनामा करून दिल्यानंतर त्यांना कार्यादेश जा.क्र.मनपा/वॉर्ड फ/वॉर्ड अभियंता/६४३/२०११, दिनांक ३०.३.२०११ अन्वये देण्यात आले. संबंधितांनी विहीत मुदतीत काम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र संचिकेत प्राप्त आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तिका क्र.१७३० उपलब्ध झाली नाही. त्यामुळे पूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.
२. प्रथम व दरम्यानचे देयकात ॲटम क्र.५ चा दर रू.४५.६८ असतांना रू.२१२.१३ देण्यात आला. ३००.५० संख्येस रू.६३७४५/- अदा केले. रक्कम रू.१३,७२६/- अदा करणे आवश्यक होते. रक्कम रू.५००१९/- जास्तीचे अदा केलेले असून संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे.
३. दुस-या व दरम्यानच्या देयकात ॲटम क्र.११ ची Quantity जास्तीची दर्शविली आहे. प्रथम व दरम्यानच्या देयकात दर्शविलेली Quantity अनुज्ञेय आहे. संबंधितांना जास्तीची Quantity दर्शवून रू.६५७७/- जादा रक्कम अदा केलेली असून जी वसूलीस पात्र आहे.
४. संचिकेत शेड्यूल्ड B उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा तसेच संबंधितांना जादा अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करुन महानगरपालिका फंडात भरणा करण्यात यावी, त्यानुसार लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**<u>परिच्छेद क्र. १३</u> :वॉर्ड क्र.६९, शिवनेरी कॉलनी येथील वाचनालयाच्या इमारतीचे उर्वरीत कामे करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.७,४०,२४०/-)(खर्च रक्कम रू.६,६५,८९६/-)**

वॉर्ड क्र.६९ शिवनेरी कॉलनी येथील वाचनालयाच्या इमारतीचे उर्वरीत कामे करणे करीता ई-टेंडरिंग विभागामार्फत निविदा मागविण्यात आली. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली. निविदा स्वीकृतीच्या तारखेस एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा १.१% Below दराची श्री.प्रकाश वाणी या कंत्राटदाराची होती. कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केला. तद्नंतर कार्यालयाने पत्र क्र.मनपा/वॉर्ड-फ/वॉर्ड अभियंता/२६८१/२०११,दिनांक ९.९.२०११ अन्वये संबंधितांना कार्यादेश दिले. सदरील कामाची मुदत ३ महिने होती. सदरील कामाचे ठिकाणी अंदाजपत्रकातील काही बाबी करीता विद्युत व्यवस्थेची आवश्यकता आहे. परंतू सदर कामाच्या ठिकाणी विद्युत व्यवस्था होवू न शकल्याने सदर कामास दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत मुदतवाढ द्यावी असे सादरीकरण दिनांकासह सही न करता संबंधित शाखा अभियंता यांनी केले. त्यास कार्यकारी अभियंता यांनी प्रथम व दरम्यानचे देयक अदा करण्याच्या मंजूरीच्या टिपणीत मान्यता प्रदान करण्यासाठी दिनांक ११.१.२०१३ रोजी सादरीकरण केले. दिनांक ३१.३.२०१३ पर्यंतच्या मुदतवाढीस मा.आयुक्तांनी प्रथम व दरम्यानचे देयक अदा करतांना मान्यता प्रदान केली. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. संचिकेत शेड्यूल्ड B ची प्रत उपलब्ध नाही.

२. कार्यादेशात कामाची मुदत ३ महिने होती. दिनांक ९.९.२०११ रोजी कार्यादेश निर्गमित केलेले आहेत. तीन महिन्याची मुदत दिनांक ९.१२.२०११ रोजी संपते. तथापि संबंधित शाखा अभियंता यांनी संचिकेत NS-७ परिच्छेद (२४) व (२५) वरील प्रथम व दरम्यानचे देयकाचे सादरीकरण करतांना अद्यापपर्यंत विद्युत व्यवस्था उपलब्ध होऊ शकली नाही अशी टिपणी देवून दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत मुदतवाढ देणे बाबत अभिप्राय सही खाली तारीख न टाकता केलेले आहे. यास मा.आयुक्तांनी मुदतवाढीसह प्रथम व दरम्यानचे देयक दिनांक २२.१.२०१३ रोजी मंजूर केले. प्रत्यक्षात सदरील कामाची मुदत दिनांक ९.१२.२०११ रोजी पूर्ण होत असतांना तब्बल साधारणपणे दोन वर्षाने मुदत वाढीचा प्रस्ताव सादर करणे संयुक्तिक नाही. संबंधित जागेवर विद्युत व्यवस्थेच्या आवश्यकते बाबत विभागाने निविदा काढण्यापूर्वीच दक्षता घेणे अभिप्रेत आहे. झालेल्या कामाच्या विलंबामुळे वाचनालयाच्या उर्वरीत कामाचा हेतू सफल झाला का याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

३. सदरील कामाचे प्रथम व दरम्यानचे देयकात खालील ॲटम साठी Reduce Rate दिलेले आहे. परंतू द्वितीय व अंतीम देयकात याच ॲटमचे दर निविदेनुसार दिले. Reduce Rate दिल्यानंतर पुनश्च निविदा दर देतांना आलेल्या फरकाची रक्कम पुढील प्रमाणे -

| ॲटम क्रमांक | प्रथम व दरम्यानचे देयकातील दर | दिलेली रक्कम | द्वितीय देयकातील दर | दिलेली रक्कम रू. | फरक |
|---|---|---|---|---|---|
| ४ | २२५७/- | ६०५३३/- | २३०३.३४ | ६१७७६/- | १२४३/- |
| ५ | ६४७/- | १०८१९८/- | ६८१.५६ | ११३९७७/- | ५७७९/- |
| ६ | ४४१/- | २६६०२४/- | ४६३.५२ | २७९६०९/- | १३५८५/- |

संचिकेत Reduce Rate का दिले आणि अंतीम देयकात निविदा दर देण्याची टिपणी नाही. याबाबत विभागाचा खुलासा अपेक्षित आहे.

४. मोजमाप पुस्तिका क्र.२५९४ उपलब्ध झाली नसल्याने लेखापरीक्षण संपूर्णपणे करता आले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर शहानिशा करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १४ : वॉर्ड क्र.९०, उस्मानपुरा पोलिस स्टेशन जवळील ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे. (अं.प.रक्कम रू.२,४९,५७६/-)(खर्च रक्कम रू.२,५२,७२१/-)**

वॉर्ड क्र.९० उस्मानपुरा पोलिस स्टेशन जवळील ड्रेनेज लाईन दुरूस्त करणेचे कामाची संचिका तपासली . सदरील कामासाठी ई - निविदा विभागामार्फत निविदा मागविल्या असता एक निविदा विक्री झाली व एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा २% Above दराची होती. विभागाने संबंधित कंत्राटदार मो.जाकेर मो.खालेद यांना दर कमी करण्यासाठी वाटाघाटीस बोलावले परंतू संबंधितांनी दर कमी करण्यास नकार दिला. लेखा शाखेने सदरील निविदा दर मंजूर करतांना एकच निविदा प्राप्त आहे. “स्पर्धा होत नाही, चर्चा करा ” असे शेरे नोंदविले. संबंधित लेखा शाखेतील अधिकारी यांनी तारीख नमूद न करता, “ चर्चा करा ” असे शेरे नोंदविले. संबंधित लेखा शाखेतील अधिकारी यांनी तारीख नमूद न करता, “ चर्चा केली मान्य” असा शेरा नोंदवून २% Above दराने निविदा स्वीकृतीस संबंधित विभागाकडे पाठविण्यात आली. कंत्राटदाराने सदरील कामाचा करारनामा केल्यानंतर कामाची मुदत न दर्शविता कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्डअभि /५२०७/ २०१२ , दिनांक १२.१२.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील काम दिनांक ५.२.२०१३ रोजी पूर्ण झाल्याचे नमूद आहे. संचिकेत आढळलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. लेखा शाखेने एकच निविदा आहे, स्पर्धा होत नाही, चर्चा करा असे शेरे नोंदवून लगेच चर्चा केली. मान्य असे अभिप्राय तारीख न नोंदविणे ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. कार्यादेशात कामाची मुदत दर्शविणे आवश्यक असतांना कामाची मुदत का दर्शविली नाही याची स्पष्टता झाली नाही.

३. देयकातून कंत्राटी कामाचा १% विमा रक्कम रू.२५२७/- कपात न केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. देयकात ॲटम क्र.१३ मधील quantity ही ॲटम क्र.१ व २ च्या बेरजेतून ॲटम क.७ मधील Quantity वजा जाता येणे अभिप्रेत आहे. तथापि ॲटम क्र.१३ मधील Quantity ४८.७५० दर्शविली जी १३.१२ दर्शविणे अपेक्षित आहे. जास्त quantity दर्शवून रू.६५५७/- संबंधितांना अदा केले. प्रत्यक्षात रू.१७६४/- अदा करणे आवश्यक होते. रू.४७९३/- जादा अदा केलेली रक्कम वसूलीस पात्र आहे.

५. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तीका क्र.३०११ उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे देयकातील नमूद नोंदीची खात्री करता आली नाही, संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा तसेच वसूल पात्र रक्कम संबंधितांकडून वसूल करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**महानगरपालिकेचे / शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १५ : वॉर्ड क्र. ९२ अंतर्गत मिलिंदनगर येथील गटार दुरूस्त करणे.**
**(अं.प.रक्कम रू. ९,७९,४१९/- खर्च रक्कम रू. ८,९१,२२८/- )**

वॉर्ड क्र.९२, मिलिंदनगर येथील गटार दुरूस्तीची संचिका तपासली. ई- निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या. ४ निविदांची विक्री होवून ३ निविदा प्राप्त झाल्या. १८.५% Below दराची निविदा स्वीकृत करण्यात आली. संबंधित कंत्राटदार मुजीब रहमान खान महेमूद खान यांना २% व ५% अनामत रकमेचे स्मरणपत्रे देवूनही त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. त्यानंतर दुस-या व तिस-या क्रमांकाच्या कंत्राटदारांना काम करण्यास तयार आहेत का अशी विचारणा केली. परंतू त्यांनीही काम करण्यास नकार दिला व तिस-या क्रमांकाच्या गुत्तेदाराने १८.५% कमी दराचे ऐवजी १.११% कमी दराने दिल्यास काम करण्यास तयार आहे असे कळविले. तद्नंतर दुस-या व तिस-या क्रमांकाचे गुत्तेदार काम करण्यास तयार नाही. त्यामुळे फेर निविदा मागविणे व श्री.मुजीब रहेमान खान मेहमूद खान यांचे नांव काळ्या यादीत समाविष्ट करण्याकरीता मा.आयुक्त यांनी दिनांक ३०.६.२०११ रोजी मान्यता देवून कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वॉर्डअभियंता/फ/२४१२/२०११, दिनांक २५.८.२०११ अन्वये कार्यादेश निर्गमित केलेले आहे.

तद्नंतर संबंधित गुत्तेदार यांनी दिनांक २६.८.२०११ रोजी पत्र देवून त्यांच्या विरूध्द केलेली कार्यवाही रद्य करण्याची विनंती केलेली आहे. तसेच सदरील काम करण्यास तयार आहे. कार्यालयाने सदरील काम मा.महापौर यांच्या वॉर्डातील असून तातडीने सुरू करावे अशा सूचना प्राप्त झाल्या असल्याने तसेच नविन निविदा काढण्यास कालावधी लागणार असल्याने गुत्तेदाराच्या विनंतीनुसार त्यांना काळ्या यादीत टाकलेल्या कार्यवाहीवर पुन्हा विचार करण्यासाठी सादरीकरण केलेले आहे. त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १५.११.२०११ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/वॉर्डअ /फ/ ५०५१ / २०११ दिनांक २०.१२.२०११ अन्वये कार्यादेश रद्य करण्याचे परिपत्रक निर्गमित केले आहे. गुत्तेदाराने २% अनामत भरणा करून ५% अनामत रक्कम बिलातून कपात करण्याची विनंती केलेली आहे व मनपा सोबत करारनामा करून दिलेला आहे. कार्यालयीन पत्र क्र.मनपा /वॉर्डफ /वॉर्डअ /७४ /२०१२,दिनांक ७.१.२०१२ अन्वये सदरील कामाचे कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहे. कामांची मुदत तीन महिने ठेवण्यात आलेली आहे. सदरील काम दिनांक ५.४.२०१२ रोजी पूर्ण झाल्याची संचिकेत नमूद आहे.

परंतू प्रस्तावित कामाची मुदत दिनांक १०.१२.२०१२ पर्यंत वाढवून अतिरिक्त बाबींचा खर्च मंजूर करावा असे सादरीकरण केलेले आहे. त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक १४.११.२०१२ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहे.

१. लेखापरीक्षणा दरम्यान मोजमाप पुस्तीका क्र.२६०९ उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्ण लेखापरीक्षण करता आलेले नाही.

२. सदरील कामाची निविदा दिनांक १.१२.२०१० रोजी उघडण्यात आली होती. परंतू संबंधित गुत्तेदाराने काम करण्यास नकार देणे, संबंधितांना काळ्या यादीत समाविष्ट करणे, गुत्तेदाराच्या विनंतीनुसार पुन्हा काळ्या यादीत टाकलेले कार्यादेश रद्य करणे इत्यादी बाबींमध्ये तेरा महिन्याचा कालावधी व्यर्थ गेलेला आहे. संबंधितांस दिनांक ७.१.२०१२ रोजी कार्यादेश निर्गमित करणे ही नियमबाह्य आहे. कामाचा उद्येश या ठिकाणी सफल झाल्याचे सिध्द होत नाही. कामाची तातडी तसेच १३ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर सदरील कामास निधी उपलब्धतेबाबत तपासणी झालेली नाही.

३. सदरील काम दिनांक ५.४.२०१२ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत असतांना परिच्छेद क्र. ३६ प्रमाणे अंशत: काम पूर्ण झाले असे नमूद करून सदरील कामास दिनांक १०.१२.२०१२ पर्यंत मुदतवाढ घेवून तसेच अतिरिक्त बाबींचा समावेश करून अंदाजपत्रकीय मंजूर रकमेच्या आत अतिरिक्त बाबींचा खर्च रू.३,५९,९९४/- भागविला जाईल ही बाब परस्पर भिन्न आहे. काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्रावरील तारीख व मुदत वाढीची तारीख याबद्यल साशंकता निर्माण होते.

४. सदरील काम १८.५% कमी दराने असल्याने अतिरिक्त सुरक्षा ठेव ही रक्कम रू.४४५६१/- ही भरणा न करून घेता काम पूर्ण झाल्यानंतर देयकातून कपात केल्यामुळे मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे. अतिरिक्त सुरक्षा ठेव कामाच्या performance शी निगडीत असते. त्यामुळे नंतर देयकातून कपात होणे, ही बाब नियमबाह्य आहे.

५. देयकातील बेरीज रक्क्रम रू. ८,९१,२२८/- अशी दर्शविली. प्रत्यक्षात रक्कम रु.८,०१,९७७/- येते. देयकात रु.८९,२५१/- ही बेरजेत जास्तीची दर्शवून संबंधित गुत्तेदारास अदा करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे ते वसूलीस पात्र आहे.

**मुद्या क्र. १ ते ५ बाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १६ :वॉर्ड क्र.५० सुराणानगर येथील हॉटेल यशोदिप लगतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू. २२,३४,१२२/- खर्च रक्कम रू. २१,७९,०८०/- )**

वॉर्ड क्र.५० सुराणानगर येथील हॉटेल यशोदिप लगतच्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाची संचिका तपासली. सदरील कामासाठी एकूण ४ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी आर.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा Technicaly Rejected करण्यात आली. उर्वरीत ३ निविदेमध्ये अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे १३.१% Below दर प्राप्त झालेले होते. कमी दराची निविदा स्वीकारण्यात आली. कंत्राटदाराने महानगरपालिके सोबत कामाचा करारनामा केल्यानंतर संबंधितांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्डअभि/२०१२/४८६५, दिनांक ६.११.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामास सहा महिन्याची मुदत होती. काम दिनांक २९.१.२०१३ रोजी पूर्ण झाले. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने मोजमाप पुस्तीका क्र.२२९८ उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे देयकातील नोंदी योग्य असल्याची खात्री करता आली नाही.

२. देयकातून कंत्राटी कामाचा विमा १% रक्कम रु.२१,७९१/- कपात केलेली नसल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. देयकात ॲटम क्र.१ ची Quantity ४०.२२% दर्शविलेली आहे. यास ५२५.०० दर नमूद आहेत. दिलेली Quantity व दर याचा गुणाकार केल्यास रू.२११२०/- येते. देयकात कंत्राटदारास रु.२,११,२०२/- अदा केले. रु.१,९०,०८२/- जास्तीचे अदा केले. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. संबंधितांकडून जादा अदा रक्कम वसूलीस पात्र आहे.

४. शेड्यूल B ची प्रत संचिकेत नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर तपासणी करून मुद्या क्र.२ व ३ प्रमाणे झालेले आर्थिक नुकसान वसूल करुन सविस्तर खुलाशासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने महानगरपालिकेचे / शासनाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१७ : वॉर्ड क्र.९७, सादातनगर येथील गल्ली क्र.१३ मधील ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे बाबत. (अं.प.रक्कम रू. २,४९,९२४/- खर्च रक्कम रू. २,५२,०७०/- )**

वॉर्ड क्र.९७ सादातनगर येथील गल्ली क्र.१३ मधील ड्रेनेज लाईन दुरुस्त करणेबाबतची संचिका तपासली. सदरील कामाची कामाची निविदा ई निविदा विभागाने प्रसिध्द केली. निविदा विक्री व स्वीकृतीच्या तारखेस एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा मो.झाकेर मो.खालेक या कंत्राटदाराची आहे. संबंधितांनी सादर केलेली निविदा २% Above दराची आहे. वाटाघाटीसाठी संबंधितांना बोलावले परंतू दर कमी करण्यास नकार दिल्याने २% Above दराची निविदा स्वीकृत केली. कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर संबंधितांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्डअभि/२०१२/५२०६, दिनांक १२.१२.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशात कामाची मुदत नमूद नाही. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. कार्यादेशात कामाचा कालावधी नमूद नसल्याने विहित मुदतीत काम पूर्ण झाल्याची खात्री पटली नाही.

२. मोजमाप पुस्तीका क्र.२६७९ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे संपूर्ण लेखापरीक्षण करता आले नाही.

३. संचिकेत शेड्यूल्ड B ची प्रत नाही.

४. देयक अदा करतांना ॲटम क्र.१३ ची Quantity जास्तीची दर्शवून देयक अदा केले आहे. एकूण खोदकामातून निघालेले material खोदकामात भरणा केलेले material आणि उर्वरीत Material चे वाहतूकीची रक्कम अनुज्ञेय ठरते.

| ॲटम क्र.१ व २ ची बेरीज | ॲटम क्र.७ नुसार संख्या | उर्वरीत मटेरियल |
|---|---|---|
| १८२.१४ | १७३.५४ | ८.६ |

अंदाजपत्रक तयार करतांना सुध्दा याच पध्दतीने अंदाजपत्रक आहे. तरीसुध्दा ॲटम क्र.१३ अन्वये ४९.९७ Quantity दर्शवून रू.६७२०/- अदा केले. प्रत्यक्षात रू.११५७/- अदा करणे अपेक्षित होते. रू-५५६३/- जादा अदा रक्कम वसूलीस पात्र आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा आणि महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**<u>परिच्छेद क्र. १८</u>: वॉर्ड क्र.९२, कबीरनगर व नागसेन नगर येथे आरसीसी ओपन ड्रेनेज व हाफ राऊंड गटार बांधणे बाबत.(अं.प.रक्कम रू. २४,९१,५१८/- खर्च रक्कम रू. २६,०१,५२४/- )**

वॉर्ड क.९२, कबीरनगर व नागसेन नगर येथे आरसीसी ओपन ड्रेनेज व हाफ राऊन्ड गटार बांधणेबाबतची संचिका तपासली. सदरील कामासाठी ई निविदा विभागाने निविदा प्रसिध्द केली होती. ३ निविदा विक्री झाल्या. ३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २ निविदा तांत्रिकरित्या अपात्र करण्यात आल्या. उर्वरीत एक निविदा पार्थ कन्स्ट्रक्शन यांची असून ११.९७% जादा दराची होती. वाटाघाटी अंती ४.५०% जादा दराची निविदा स्वीकृत केली. संबंधितांनी महानगरपालिकेसोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वॉर्डफ/वॉर्डअभि/२०१३/५९८५, दिनांक ७.१.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत चार महिने होती. काम दिनांक ७.४.२०१३ रोजी पूर्ण होवून दिनांक ८.८.२०१३ रोजी हस्तांतरीत करण्यात आले. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. काम दिनांक ७.४.२०१३ रोजी पूर्ण झाले तर हस्तांतरीत करण्यासाठी पुनश्च ४ महिन्याचा कालावधी कशासाठी लागला याची स्पष्टता झाली नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा काम झाल्यानंतर दिनांक २३.८.२०१३ ते २२.१२.२०१३ या कालावधीसाठी काढलेला असून विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

३. मोजमाप पुस्तीका क्र.२२९४ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे १००% लेखापरीक्षण करता आले नाही.

४. कामाचे शेड्यूल्ड B ची प्रत संचिकेत नाही.

५. सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना ॲटम क्र.७,८, व ९ मधील बाबी बाबत कामाच्या विषयात संबध नाही. त्यामुळे अंदाजपत्रक चूकीचे तयार करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करण्याची विधी अंमलात आणली आहे.

६. अंदाजपत्रकातील ॲटमची Quantity ही B१ निविदा नियमावली पेक्षा जास्तीची quantity ची रक्कम प्रत्यक्ष देयकात नमूद असून जास्तीचे देयक अदा केलेले आहे. खालील ॲटम नुसार अंदाजपत्रकापेक्षा जादा Quantity दिलेले आहे.

| ॲटम क्रमांक | अं.प.तील Quantity | प्रत्यक्ष देयकातील Quantity | फरक | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| २ | ८१.४२० | २४३.३९ | १६१.९७ | ५०% |
| ३ | ११५.६५० | २३८.७१ | १२३.०६ | ९४% |
| ४ | ७७.१०० | १५७.०३ | ७९.९३ | ९६% |

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा आणि महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१९ : वॉर्ड अभियंता - फ कार्यालयातील विविध कामाच्या मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

वॉर्ड कार्यालयाने केलेल्या कामाचे मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. The Maharashtra Public Works Maual च्या Appedix- १० मधील तरतदूी नुसार मोजमाप पुस्तिका लिहिणे, तपासणे व त्याचे जतन करणे इत्यादी बाबी स्पष्टपणे नमूद आहेत. मोजमाप पुस्तिका हे स्थायी कागदपत्रातील एक भाग असून ते अभिलेखे नेहमीसाठी संबंधित कार्यालयात उपलब्ध ठेवण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखाची आहे. वॉर्ड अभियंता कार्यालयाने त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांच्या नावाने मोजमाप पुस्तिका दिल्याचे तोंडी समजले. परंतू मोजमाप पुस्तिकेचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाहीत.

वॉर्ड अभियंता कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या संचिकांचे मोजमाप पुस्तिका उपलब्ध करुन दिलेल्या नसल्याने १००% लेखापरीक्षण होवू शकले नाही.

**उपरोक्त बाबीबाबत सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मोजमाप पुस्तिका अद्ययावत न ठेवणे ही गंभीर स्वरुपाची बाब असून साशंकता निर्माण करणारी आहे.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## *लेखापरीक्षण अहवाल*
## *अग्निशमन विभाग*
## *सन २००९-२०१० ते २०१४-२०१५*

***<u>प्रस्तावना :</u>***

मा.सर्वसाधारण सभेच्या दिनांक २०.८.२०१५ (का.प.क्र.०६) ॲक्शन पॉईन्टच्या निर्णयाप्रमाणे अग्निशमन विभागाचे सन २००९-१० ते सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे जमा व खर्च बाजूचे व इतर अनुषंगिक अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करण्यात आले.

त्यानुषंगाने औरंगाबाद शहरातील / शहराबाहेरील फायर कॉल दैनंदिन रजिस्टर, अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र नोंदणी रजिस्टर, मागणी रजिस्टर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वाळुज संचिका (सेवाशुल्क) फोम लिक्वीड खरेदी संचिका, वाहनांचे लॉगबुक, कॅपिटेशन फिस व लायसन्स फीस नोंद रजिस्टर, खरेदी बाबतच्या उपलब्ध संचिका व इतर अभिलेखे विभागाने अपूर्ण स्वरूपात उपलब्ध करून दिले.

त्या दरम्यान अग्निशमन विभागाच्या लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **३१** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**<u>अग्निशमन अधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत</u> :**

सन १.९.१९८७ पासून ते आजपावेतो अग्निशमन विभागात मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.शिवाजी बाबुराव झनझन कार्यरत आहेत.

लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे -

१) श्री.नासेर लईख, वरीष्ठ लिपीक (पथक प्रमुख)

२) श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक

३) श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक

**अग्निशमन विभागाकडून प्रलंबित लेखापरीक्षण अहवालातील वर्षनिहाय परिच्छेदांचा गोषवारा पुढील प्रमाणे - सन २००५-२००६ ते सन २००८-०९ या कालावधीत एकूण प्रलंबित आक्षेप १५ व एकूण आक्षेपित रक्कम रू. १८,२२,२८५/- इतकी आहे. प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन त्वरीत करून आक्षेपाधित रकमेचा निपटारा विभागाने करणे आवश्यक आहे.**

**परिच्छेद क्र.०१ : आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१४-१५ या कालावधीतील अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

अग्निशमन विभागातील जमा व खर्च बाजूचे लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | आवक जावक रजिस्टर (वर्षनिहाय) | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| २ | कॅपिटेशन फीस व लायसन्स फीस नोंद रजिस्टर, मागणी रजिस्टर (वर्षनिहाय) | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध वर्षनिहाय ठेवण्यात आलेले नाहीत. |
| ३ | फायर प्रोटेक्शन व रेस्क्यू टुल्स खरेदी संचिका. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ४ | वाहनांचे लॉग बुक (वर्षनिहाय) | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ५ | डेड स्टॉक रजिस्टर | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ६ | पी.टी. रजिस्टर. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ७ | अग्निशमन विभागातील भांडार मध्ये अत्यावश्यक सेवेसाठी राखील असलेल्या पेट्रोल / डिझेल/ऑईल बाबतचे लॉगबुक व रजिस्टर क्र.१०९,११० व १११ उपलब्ध करून देणे बाबत. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ८ | आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१४-१५ मधील अग्निशमन विभागातील वाहनाचे डिझेल / पेट्रोल स्टॉक रजिस्टर, वितरण रजिस्टर, स्टोअर्स लेंजर, इतिहास पुस्तक. | उपलब्ध नाही. |
| ९ | औरंगाबाद शहरातील / शहराबाहेरील हॉटेल, बार व लॉजींग, दवाखाने व औरंगाबाद शहरातील हायराईज बिल्डींग, पेट्रोलपंप, चित्रपटगृह, गॅस एजन्सी, शॉमिल, (लाकडाची वखार) , शाळा, मॉल, कंपन्या यांना देण्यात आलेली फायर एन.ओ.सी.ची माहिती. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |

उपरोक्त लेखे हे वर्षनिहाय ठेवण्यात आलेले नाहीत व या लेखापरीक्षणाद्वारे आपणास सूचित करण्यात येते की, वित्तीय वर्षनिहाय मागणी रजिस्टर विहित नमुन्यात ठेवण्यात यावेत व पुढील लेखापरीक्षणाच्या वेळी अपूर्ण अभिलेखे पूर्ण करून सादर करण्यात यावे.

**विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०२ : मे.सॅफ्रॉन असोसिएट्स तर्फे गट क्र.५७ (पार्ट) बिल्डींग सातारा औरंगाबाद यांची ना हरकत प्रमाणपत्र फीस वसूल न करणे बाबत. (रक्कम रू.४०,०००/-)**

अग्निशमन विभागातील उपलब्ध अभिलेख्यांचे लेखापरीक्षणा दरम्यान खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**खालील पावत्या बनवून रद्य केल्या.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मे.सॅफ्रॉन असोसिएट्स तर्फे गट क्र.५७ (पार्ट) पत्ता सातारा औरंगाबाद | ए - १ बिल्डींग | ४५९०५६ २५/५/२०१२ | १)कपीटेशन फीस २५०००/- २)एनओसी फीस १००००/- एकूण ३५०००/- |
| २ | मे.सॅफ्रॉन असोसिएट्स तर्फे गट क्र.५७ (पार्ट) पत्ता सातारा औरंगाबाद | ए - २ बिल्डींग | ४५९०५७ २५/५/२०१२ | १)कपीटेशन फीस २५०००/- २)एनओसी फीस १००००/- एकूण ३५०००/- |
| ३ | मे.सॅफ्रॉन असोसिएट्स तर्फे गट क्र.५७ (पार्ट) पत्ता सातारा औरंगाबाद | ए - ३ बिल्डींग | ४५९०५८ २५/५/२०१२ | १)कपीटेशन फीस २५०००/- २)एनओसी फीस १००००/- एकूण ३५०००/- |
| ४ | मे.सॅफ्रॉन असोसिएट्स तर्फे गट क्र.५७ (पार्ट) पत्ता सातारा औरंगाबाद | ए - ४ बिल्डींग | ४५९०५९ २५/५/२०१२ | १)कपीटेशन फीस २५०००/- २)एनओसी फीस १००००/- एकूण ३५०००/- |
| | | | | **एकूण १,४०,०००/-** |

**नविन पावत्या बनविण्यात आल्या. त्यामध्ये एनओसी ची रक्कम वसूल केली नाही.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मे.सॅफ्रॉन असोसिएट्स तर्फे गट क्र.५७ (पार्ट) पत्ता सातारा औरंगाबाद | ए - १ ए - २ | ४५९०६० २५/५/२०१२ | १)कपीटेशन फीस २५०००/- २५०००/- एकूण ५००००/- |
| २ | मे.सॅफ्रॉन असोसिएट्स तर्फे गट क्र.५७ (पार्ट) पत्ता सातारा औरंगाबाद | ए - ३ ए - ४ | ४५९०६१ २५/५/२०१२ | १)कपीटेशन फीस २५०००/- २५०००/- एकूण ५००००/- |

वरील प्रमाणे विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी व संबंधिताकडून ना हरकत प्रमाणपत्र फिस चार बिल्डींगची प्रत्येकी रक्कम रू.१०,०००/- प्रमाणे रक्कम रू.४०,०००/- वसूल करून मनपा फंडात भरून सदरची फीस वसूल न करणे बाबत लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अग्निशमन विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक असून पावती क्र.४५९०९५, दिनांक २१.६.२०१२ अन्वये रक्कम मनपा फंडात जमा केली आहे. करिता परिच्छेद वगळण्यात येतो.

**परिच्छेद क्र.०३ : वसूल रकमेचा कमी भरणा करणे बाबत. (जनरल पावती ३९८८४३, दिनांक ६.९.२०१०, रू.१०,०००/-)**

लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने ठेवलेले कॅश रजिस्टर व मनपाचे मुख्य कार्यालयात वसूल रक्कम भरणा करणे बाबतचे चालन पुस्तक क.१२३५ एकत्रित तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

जनरल पावती क्र.३९८८४३ दिनांक ६.९.२०१० अन्वये रू.१०,०००/- वसूल करणेत आलेले आहे. मात्र प्रत्यक्षात चालन क्र.१२३५ दिनांक ८.९.२०१० रोजी मनपाचे मुख्यालयात भरणा करतांना रू.९०००/- भरणा केल्याची नोंद आहे. म्हणजेच रू.१०००/- इतकी रक्कम कमी भरणा केलेली आहे.

**विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी कमी भरणा रकमेचा भरणा करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक असून परिच्छेद वगळण्यात येतो.**

**परिच्छेद क्र.०४ : फायर कॉल रक्कम भरणा करतांना पावती क्रमांक न दर्शविले बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान विभागातील कॉल रजिस्टर पाहिले असता संबंधिताने रक्कम वसूल केली. परंतू पावती दर्शविलेली नाही अशा कॉलधारकाचे नांवे खालील प्रमाणे

| अ.क्र. | नांव | कॉलचा प्रकार | रक्कम व दिनांक | भरणा रक्कम रू. | भरणा न केलेली रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.सुभाष पांडुरंग घुले मु.पो.चिंचखेड चापानेर जवळ ता.कन्नड | फायर कॉल | १४४०३/- दि.२.६.२०१२ | ४,४०३/- | १००००/- | पा.क्रमांक नाही. |
| २ | श्री.बाबु चंपालाल मुगदिया, हसमुख किराणा स्टोअर्स वैजापुर ९४२१४१७७२५ | फायर कॉल | १३९९७/ दि.२३.१२.२०११ | ८९९७/- | ५०००/- | पा.क्रमांक नाही. |
| | | एकूण | **२८,४००/-** | **१३४००/-** | **१५०००/-** | |

विभागाने लेखापरीक्षणा अंती रकमेचा भरणा केलेला असून तो सुध्दा कमी केला आहे. रक्कम रू.२८,४००/- ऐवजी रक्कम रू.१५,०००/- चा भरणा केला आहे. उर्वरीत थकीत रक्कम रू.१५,०००/- वसूल करणे आवश्यक आहे. थकीत रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे .

**तसेच याप्रकरणी विभागाने जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०५ :अग्निशमन विभागातील फायर कॉल, रेस्क्यू कॉल ,बंदोबस्त कॉल, ॲम्ब्युलन्स चार्जेस व इतर कॉलचे वसूल न झालेल्या रक्कम रू. ३९,२९,०३४/- बाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान फायर कॉल, रेस्क्यू कॉल, बंदोबस्त कॉल, ॲम्ब्युलन्स चार्जेस व इतर कॉल यांची रक्कम रूपये **३९,२९,०३४/-** एवढया रकमेची वर्षनिहाय थकबाकी रक्कम खालील प्रमाणे आहे. तपशीलवार यादी अर्धसमास पत्र क्र.१७ अन्वये सोबत देण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| सन २००९-२०१० | **४,२१,७८२/-** |
| सन २०१०-२०११ | **३,१६,१२१/-** |
| सन २०११-२०१२ | **५,३५,५२७/-** |
| सन २०१२-२०१३ | **७,७९,६४५/-** |
| सन २०१३-२०१४ | **६,४०,६४७/-** |
| सन २०१४-२०१५ | **१२,३५,३१२/-** |
| **एकूण** | **३९,२९,०३४/-** |

थकीत रकमेच्या वसूली बाबत विभागाने केलेल्या कार्यवाही संबंधी अहवाल / खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. विभागाने थकीत रक्कम वसूलीबाबत कोणतीही कार्यवाही/ पाठपुरावा केलेला नाही, त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. विभागाची थकीत रकमा वसूली संबंधी निष्क्रीयता दिसून येते. थकीत रकमा मोठ्या प्रमाणात राजकीय पक्षांच्या प्रचार बंदोबस्तासाठीच्या आहेत. ज्या पाठपुराव्याअंती वसूल होऊ शकतात.

उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून रक्कम रू.३९,२९,०३४/- ची संबंधिताकडून वसूली करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.०६ :अ) आर्थिक वर्ष २००९-२०१० ते २०१४-१५ मधील वसूल रक्कम विलंबाने भरणा करणे बाबत.**

**ब) मनपा फंडात जमा होणा-या रकमा चलन द्वारे मनपा खात्यात बँकेत जमा करणे बाबत.**

अग्निशमन विभागात कपीटेशन फीस , ना हरकत प्रमाणपत्र फिस, ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण व इतर द्वारे वसूल रक्कम संकलित केली जाते. वसूल रकमेचे कॅश नोंद रजिस्टरची वर्षनिहाय पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कार्यालयात जमा झालेली दैनंदिन रक्कम जमा झाल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी महानगरपालिका फंडात जमा होणे आवश्यक असतांना त्या पध्दतीने रकमा मनपा फंडात जमा झालेल्या नाही. त्यामुळे लेखा संहिता १९७१ प्रकरण ४ नियम ४१(१) चा भंग झालेला आहे.

२. संबंधित रोखपाल यांनी वसूल रक्कम वेळच्या वेळी जमा न करता विलंबाने रकमा जमा केल्याने शासकीय रकमेचा वापर केल्याचे दिसून येते.

अग्नीशमन विभागातील रकमा धनादेश व रोख स्वरूपात स्वीकारण्यात येतात. स्वीकारलेल्या रकमा लगेचच दुस-या दिवशी मनपा फंडात जमा होणे आवश्यक आहे. तसेच मनपाच्या इतर विभागातर्फे वसूल करण्यात येत असलेले शुल्क, फी बाबतच्या रकमा रोख / धनादेश स्वरूपात स्वीकारल्या जात नाहीत. अग्निशमन विभागामार्फत संबंधित ग्राहकांना / नागरीकांना अग्नीशमन शुल्क / फी व इतर रकमा जमा करण्यासाठी रोख / धनादेशाद्वारे न स्वीकारता नगररचना विभाग/ मालमत्ता विभाग यांच्या विभागातील रकमा जशा बँक चलान मार्फत स्वीकारल्या जातात त्याप्रमाणे मनपाच्या बँक खात्यात चलनामार्फत जमा झाल्यास कार्यालयीन कामात सुसूत्रता राहील. तसेच वसूल रकमा भरण्यासाठी होत असलेला विलंब टाळता येऊ शकेल.

**वरील अनियमिततेबाबत जसे की, विलंबाने रकमा मनपा फंडात जमा झाल्याने मनपाचे तात्पुरते झालेले आर्थिक नुकसानी संबंधी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०७ : अग्निशमन दलासाठी नविन वॉटर मिस्ट मिनी फायर टेंडर खरेदी करणे बाबत. रक्कम रू.३९,२६,३७८/-**

अग्निशमन दलासाठी एक मिनी फायर टेंडर घेण्याचे प्रस्तावित आहे. सर्व व्हीआयपी बंदोबस्तासाठी सध्याची अग्निशमन वाहने जावू शकत नाही. त्यामुळे जास्त जोरात धावतांना तोल जावून अपघात होत आहेत. लहान लहान गल्ल्यांमध्ये / झोपडपट्टया मध्ये मोठे वाहन जावू शकत नाही त्यासाठी लहान वाहन खरेदी आवश्यक आहे.

अग्निशमन दलाच्या साहित्य खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झालेला आहे. अर्थसंकल्पिय लेखाशिर्ष अग्निशमन सहित्य व टॅकर खरेदीची नोंद घेतली.सर्वसाधारण सभा विषयक क्र.७८० दिनांक १९.१२.२००९ व स्थायी समिति ठराव क्र.४६, दिनांक ३०.८.२०१० नुसार उक्त खरेदीची मंजूरी घेतली.

खरेदीची निविदा सूचना राज्यस्तरीय वर्तमानपत्रामध्ये देण्यात आली. दोन निविदा प्राप्त झाल्या. १)एम.ई.एस.इंजि.ठाणे २) मुरली टेक्नो प्रा.लि. दोन निविदा प्राप्त असल्यामुळे फेर निविदा मागविण्यास मा.आयुक्त यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी मंजूरी दिली. तथापि मा.आयुक्त यांच्या मान्यतेप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. निविदा एम.ई.एस.इंजि.ठाणे, यांची मान्य झालेली आहे. उक्त खरेदी बाबत खालील प्रमाणे लेखापरीक्षणात आक्षेप आढळून आलेले आहेत.

1. जा.क्र.मनपा/काअ/पापु/४७९/२००६, दिनांक २४.५.२००६ व मा.स्थायी समिती ठराव क्र.२९७,दिनांक २८.३.२००६ अन्वयेच्या मान्यतेप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेसाठी टेंडर सेलचे संगणकीकरण केलेले असतांना ई- टेंडरिंग द्वारे निविदा का मागविण्यात आल्या नाहीत याबाबत बोध होत नाही.
2. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाली नाही. दोनच निविदा प्राप्त झाल्या. किमान तीन वैध निविदा स्पर्धात्मक दर प्राप्तीसाठी नियमान्वये प्राप्त होणे आवश्यक होते. नियमबाह्य निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे.
3. निविदाधारक एम.ई.एस.इंजि.ठाणे,यांनी प्रत्यक्ष निविदा १% कमी दराने भरलेली आहे. परि.क्र.(१११) मध्ये १% दर कमी करण्यास संमती दर्शविली आहे. म्हणजे निविदा दर १% कमी व दर वाटाघाटीने दर १% कमी असे एकूण २% दर कमी प्रमाणे पुरवठा आदेश देणे आवश्यक होते.
4. पुरवठाधारकास पुरवठा आदेश क्र.मनपा/अशाद /९३४ /२०१० दिनांक २३.९.२०१० अन्वये फक्त १% कमी दराने पुरवठा आदेश पारित केलेले आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. म्हणजेच वॉटर मिस्ट मिनिफायर टेंडरची किंमत रू.३९,६६,०३९/- च्या २% कमी दराने आदेश निर्गमित करण्या ऐवजी १% कमी दर नमूद केल्याने संबंधितांना मनपा तर्फे रक्कम रू.३९,६६०/- जास्तीची अदा झाली. याचा परीणाम मनपाचे रू.३९,६६०/- चे आर्थिक नुकसानीमध्ये झाले. संबंधिताकडून जादा अदा रक्कम वसूली होणे आवश्यक आहे.

५. अंदाजपत्रक तयार करतांना वस्तुनिहाय किंमत दर्शवून तयार करणे आवश्यक होते. तसे न करता एकत्रित किंमत रू.२८,५०,०००/- दर्शविलेली आहे. ही बाब आक्षेपार्ह ठरते. ही रक्कम एकत्रित रित्या दर्शविल्यामुळे कुठल्या वस्तुवर किती खर्च झाला आहे याची पडताळणी करता आलेली नाही.

6. वरील प्रमाणे खरेदी करावयाचे वाहन हे मोठ्या रकमेचे व अत्यंत महत्वाचे असल्याने, ही खरेदी मुळातच मनपाचे यांत्रिकी विभागामार्फत करणे हिताचे व नियमाप्रमाणे ठरले असते. मात्र विभागाने कारण नसतांना पत्र क्र.मनपा/अशाद/२०६/२०१०, दिनांक ११.२.२०१० अन्वये अग्निशमन वाहने खरेदीस तांत्रिक मदत करणे बाबत तांत्रिक सल्लागार म्हणून श्री.जी.बी. सोनी सेवानिवृत्त उपअभियंता (यांत्रिकी) मनपा, मुख्य अग्निशमन अधिकारी, नाशिक/औरंगाबाद/मुंबई यांना नियुक्त केल्याचे दिसून येते. त्यांनी सदरचे वाहनाचे फायर बॉडी कन्स्ट्रक्शन सुरू असतांना एकदा तांत्रिक तपासणी अहवाल देणे जरूरी आहे असे असतांना संचिकेत तांत्रिक तपासणी अहवाल दिसून आला नाही. प्रकरणी झालेली खरेदी ही विनातपासणी झाल्याबाबत तांत्रिक सल्लागार यांनी तक्रार स्वरूपात दिनांक १५.१२.२०१० रोजी गोपनीय पत्र (संचिका पृ.क्र.सी/६२५ ते सी /६२९ वर संलग्न) मध्ये वॉटर मिस्ट फायर टेंडरची तांत्रिक तपासणी झालेली नसल्याबाबतचे त्यांचे पत्रामध्ये १० मुद्यांत नमूद करून कळविलेले आहे.

अ. फायर मिस्ट टेंडरचे काम चालू असतांना कामची तांत्रिक तपासणी मुख्य अग्निशमन अधिकारी, नाशिक, २) मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई ३) मुख्य अग्निशमन अधिकारी, औरंगाबाद ४) उपअभियंता (यांत्रिकी), औरंगाबाद यांचे पथकामार्फत करून घेणे कंपनीस टेंडर कंडीशन प्रमाणे बंधनकारक होते. परंतू यामध्ये कोणत्याही प्रकारची तपासणी न करताच डायरेक्ट फायर मिस्ट निविदेचे पूर्ण काम करून पोहच दिलेली आहे.

ब. अंडर राईटस लॅबोरेटरीज आयएनसी ह्यांनी दिनांक २.१२.२०१० रोजी तपासणी अहवाल दिला आहे. सदरचे प्रमाणपत्रावर तपासणी करणा-याचे नांव व हुद्दा दिलेला नाही. फक्त स्वाक्षरी केली आहे. सदरचे एजन्सीकढून तांत्रिक समितीसमोर तपासणी, परत एकदा करून घेणे योग्य राहील असे नमूद आहे.

क. सदरचे वाहनाची आरटीओ फीटनेस / नोंदणी ही कागदपत्रे तपासणी साठी उपलब्ध करून दिले नाही.

ड. टाटा कंपनीच्या नियमा प्रमाणे वाहनाची उंची प्रमाणात आहे काय, फास्ट स्पिडने जातांना बॅलेन्स बरोबर आहे काय, इ.चा रिपोर्ट वाहनचालक / मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडून घेणे गरजेचे आहे.

ई. निविदेतील अटी / शर्ती प्रमाणे मनपा कर्मचा-यांना कमीत कमी ३० दिवसाचे पूर्व प्रशिक्षण देणे जरूरी आहे. प्रत्यक्ष प्रात्याक्षिकासाठी वाहन ३-४ वेळा कॉल्स वर व मान्यवरांच्या बंदोबस्तासाठी पाठविणे, प्राप्त ट्रायल घेवून रिपोर्ट देणे जरूरी आहे. तसेच पत्रानुसार मुद्या क्र.१ ते १० बाबत श्री.जी.बी.सोनी, से.नि.उपअभि.(यांत्रिकी), तुलसी पन्नालालनगर,औरंगाबाद यांनी गोपनीय दिलेल्या पत्राप्रमाणे पूर्तता करून घेणे आवश्यक होते.

३. प्रस्तावित वाहन खरेदी खर्च रक्कम रू.३९,६६,०३९/- चा करारनामा करतांना, मुंबई मुद्रांक अधिनियम - १९५८ कलम - ३४ चे तरतूदी प्रमाणे रक्कम रू.३१००/- च्या मुद्रांकावर करणे आवश्यक होते. विभागाने रू.४००/- च्या मुद्रांकावर करारनामा केल्याने रू.२७००/- इतक्या रकमेचा शासनाच्या महसूलचे नुकसान झालेले आहे.

४. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/अशाअ./२०६/२०१०, दिनांक ११.२.२०१० अन्वये श्री.जी.बी.सोनी सेवानिवृत्त उपअभियंता (यांत्रिकी), मनपा औरंगाबाद यांना तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त केलेले असून, त्यांनी अंदाजपत्रक तयार करणे, निविदा मागविणे, स्क्रु टनी करणे, निविदा मंजूरीसाठी सल्ला देणे, जी कामे मंजूर झाली, त्या मशनरीची तांत्रिक तपासणी व अंतीम तपासणी करणे इ.कामे करणे असे असतांनाही, त्यांनी प्रस्तावित कोणतेही काम केल्याचे दिसून येत नाही.

५. सदर नविन वॉटर मिनी फायर खरेदी प्रक्रिया यांत्रिकी विभागामार्फत पूर्ण होणे आवश्यक असतांना परस्पर अग्निशमन विभागाने वाहन खरेदी करण्याचे प्रयोजना बाबत बोध होत नाही.

६. उपरोक्त सर्व मुद्यांबाबतही तांत्रिक सल्लागार यांनी नियमाप्रमाणे वेळीच सल्ला देवून पूर्तता करून घेवून त्याची खात्री करणे आवश्यक होते. मात्र तसे न केल्याचे संचिकेवरून दिसून येते. प्रकरणी संबंधित सल्लागार यांना मानधन म्हणून निव्वळ किती खर्च करण्यात आला याचा संचिकेवरून स्पष्ट बोध होत नाही. उक्त खर्च हा वायफळ झालेला असून महानगरपालिकेस भुर्दंड पडलेले आहे. याचा खुलासा विभागाने करावा.

**उक्त सर्व मुद्यांची विभागाने प्रत्यक्ष शहानिशा करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. आक्षेप कायम करण्यात येतो.**

**मुद्या क्र.४ प्रमाणे मनपाचे रक्कम रू.३९,६६०/- आणि मुद्या क्र.१२ नुसार शासनाचे रक्कम रू.२७००/- संबंधिताकडून वसूल करण्यात यावेत. तसेच उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०८ : पोर्टेबल फ्लोरपंप एएफ १५०० एफएल खरेदी बाबत.**
**( खर्च रक्कम रू.७२,३८,०००/-)**

सन २००९-१० या वर्षामध्ये पोर्टेबल पंप खरेदी रू.७२,३८,०००/- चा प्रस्ताव सादर केलेला आहे. अग्निशमन विभागाकरीता पावसाळ्यात / उन्हाळ्यात विहीरीतून पाणी उपसणे करीता अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी या लेखाशिर्ष मधून खर्च करणेसाठी मा.मु.ले.अ. व मा.आयुक्त यांनी दिनांक १९.१२.२००९ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे.

खरेदीची निविदा सूचना वर्तमान पत्रात देण्यात येवून निविदा उघडण्याच्या दिनांकास दिनांक २३.४.२०१० रोजी एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. बॅनोलॅट असोसिएट्स कंपनीची निविदा सर्वात कमी दराने प्राप्त झाली. पोर्टेबल फ्लोरपंप -१० नगाकरीता एकूण रू.७०,१०,०००/- दिनांक २५.५.२०१० रोजी मा.आयुक्त यांचे दालनामध्ये वाटाघाटीच्या बैठकीअंती १% कमी दरास मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे रू.६९,३९,९००/- खरेदीस मा.स्थायी समिती ठराव क्र.१० दिनांक ३०.६.२०१० रोजी मान्यता दिली.संबंधित पुरवठाधारकास करारनामा व पुरवठा आदेश जा.क्र.मनपा/अशाद/७७२/२०१०, दिनांक ९.७.२०१० अन्वये देण्यात आला. प्रस्तावित खर्चाची संचिकाची तपासणी केली असता, खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पोर्टेबल फ्लोरपंप एएफ १५०० एफएल १० नग खरेदी रक्कम रू.६९,३९,९००/- रकमेच्या ५% रक्कम रू.३,४६,९९५/- सुरक्षा अनामत म्हणून कार्यालयात भरणा करावी, अशी परि.क्र.८० मध्ये नोंद आहे. सुरक्षा ्क्कम रू.३,४६,९९५/- चा धनादेश क्र.८६८७४२, दिनांक ७.७.२०१० बँक ऑफ महाराष्ट्र सादर केलेले आहे. मात्र सदरचा धनादेश मनपा फंडात तात्काळ जमा न करता, विलंबाने दोन महिन्यानंतर दिनांक २१.९.२०१० जनरल पावती क्र.४०५७५१ अन्वये जमा केलेले आहे. त्यामुळे मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान झाले आहे.

२. मे.बॅनोलेट असोसिएट्स पुणे, यांनी ईएमडी करीता डीडी क्र.००३५६० दिनांक १८.३.२०१० रू.१,००,०००/- एच.डी.एफ. सी.बँकचा डी.डी. अग्निशमन विभागामध्ये जमा केलेला होता. मात्र सदरचा डी.डी.मनपाच्या लेखा शाखेत जमा करणे आवश्यक असतांना सदरचा धनाकर्ष अग्निशमन विभाग यांनी साधारण एक वर्ष ठेवून घेतला आहे. ही बाब मनपाचे आर्थिक नुकसान करणारी आहे. तसेच धनाकर्ष अग्निशमन विभागात ठेवून घेणे ही बाब गंभीर आहे. निविदेसोबतच्या ईएमडी ची रक्कम मनपा फंडात भरणा झाल्याशिवाय निविदा प्रक्रियेतील दुसरा लिफाफा उघडता येत नाही. एकूणच निविदा प्रक्रिया संशयास्पद असल्याचे दिसून येते.

३. खरेदीची एकूण रक्कम रू.६९,३९,९००/- करारनामा रू.१००/- मुद्रांकावर केलेला आहे. नियमाप्रमाणे मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ मधील (२) चे तरतूदी नुसार, प्रस्तावित खर्चाचे रकमेवर रू.६१००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक आहे. यामुळे शासनाचे महसूली नुकसान झालेले आहे.

४. पोर्टेबल फ्लोटींग फ्लोर पंप खरेदी बाबत पुरवठाधारकांनी टॅक्स इनव्हॉईस नं.बीए/२०१०-११/०४० दिनांक २८.८.२०१० रोजी प्रस्तावित. एकूण १० नग पंपाचा पुरवठा केल्याचे दिसून येते. मात्र सदरचे टॅक्स इनव्हॉईस वर पंपाचे क्रमांकाची नोंद घेतलेली नाही. त्यामुळे नक्की कोणते पंप प्राप्त झाले या बाबत साशंकता निर्माण होते.

तसेच प्रस्तावित खरेदी केलेले पंप हे अग्निशमन दलाकरीता व अग्निशमन विभाग यांचे आर्थिक तरतूद / लेखाशिर्षामधून, विभागाची आवश्यकता दर्शवून खरेदी केलेली आहे. असे असतांना एकुण -१० नग पंपापैकी वॉर्ड कार्यालय (६ नग x ६,९३,९९०= ४१,६३,९४०) यांना वितरीत केल्याचे संचिकेवरून दिसून येते. कोणत्याही वॉर्ड कार्यालयांनी पोर्टेबल फ्लोटींग पंपाची मागणी नोंदविलेली नसतांना अनावश्यक खरेदी करून मनपाचे आर्थिक नुकसान केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते. वॉर्ड कार्यालयाकरीता पुरवठा केलेल्या प्रपत्रावरील झालेला खर्च रक्कम रू. ४१,६३,९४०/- वसूलीस पात्र.

**वरील सर्व मुद्यांबाबत विभागाने प्रत्यक्ष तपासणी करून खात्री करावी, तसा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. विभागाने सक्षम प्राकिरणाच्या मान्यतेविना खरेदी केलेली आहे. करीता झालेला संपूर्ण खर्च अमान्य करण्यात येतो. शासनाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूली करण्यात यावे. उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०९ : आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१४-१५ मधील वसूल रकमेची पावती बनवून रद्य केल्याबाबत.**

अग्निशमन विभागात कपिटेशन फीस ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण व इतर द्वारे वसूल रकमेची पावती बनवून मोठ्या प्रमाणे पावती रद्य केल्याची दिसून येते. सदरील पावत्या कोणत्या कारणाने रद्य केल्या याबाबतचा उल्लेख न करताच पावत्या रद्य केल्या ही बाब शंकास्पद आहे. पावत्या रद्य केल्याबाबतची यादी अर्धसमास पत्र क्र.१२ सोबत देण्यात आलेली आहे.

वरील बाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून तसा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून आक्षेप कायम करण्यात येतो. विभागातर्फे वसूल करण्यात येणारी रक्कम ही योग्य असल्यावरच आणि संबंधिताकडे पावतीची रक्कम पुरेशी असल्यानंतरच पावती तयार करणे आवश्यक आहे. तसे अग्निशमन विभागात झालेले नाही. **वेळोवेळी विविध कारणे दाखवून पावत्या रद्य करणे ही बाब संशयास्पद आहे. उक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१० : फोम लिक्वीड खरेदी बाबत.**

आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये अग्निशमन विभागास आवश्यक असलेले ३ प्रकारचे फोम खरेदी करण्यासाठी नियंत्रण कक्ष अधिकारी व सब ऑफिसर यांनी दिनांक २०/५/२०११ रोजी अहवाल सादर केला आहे.

यापूर्वीच्या आर्थिक वर्षातील फोम लिक्वीड पूर्णपणे संपलेले असल्याने नविन फोम लिक्वीड मागविण्याबाबत अहवाल सादर केला असून त्यानुसार

१) एएफएफएफ फोम लिक्वीड १०,००० लि.
२) अल्कोहोल रिनी स्टींग फोम - ४००० लि.
३) प्रोटीन फोम - २००० लि.

याप्रमाणे ३ प्रकारचे एकूण १६००० लि.फोम लिक्वीड खरेदी करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. त्यासाठी २३,२२,०००/- रूपये खच येणार असल्याचे नियंत्रण कक्ष अधिकारी यांनी नमूद केले आहे. होणारा खर्च लेखाशिर्ष अग्निशमन साहित्य व टँकर खरेदी यामधून करण्यात येणार असून प्रस्तावित केल्यानुसार ई-निविदा द्वारे / निविदा मागविण्यासाठी मा.आयुक्त यांनी नियमानुसार निविदा प्रक्रिया मा.सर्वसाधारण सभेत सादर करणेस्तव मान्यता दिली आहे.

यानुसार दैनिक वर्तमानपत्रात / ई टेंडरिंग विभाग यांना देण्यासाठी जाहीर निविदा सूचना तयार करण्यात आली. निविदा विक्रीचा दिनांक ११.७.२०११ ते २५.७.२०११ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत निविदा दाखल करण्याचा कालावधी होता. दिनांक २६.७.२०११ दुपारी २.०० वाजेपर्यंत निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ २६.७.२०११ दुपारी ४.०० वाजता होता. फेर निविदा का मागविल्या, याबाबत संचिकेत कोणताही उल्लेख करण्यात आला नाही.

परीच्छेद क्रमांक २१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सदरचा प्रस्ताव जाहिर निविदा राज्यस्तरीय वर्तमान पत्रातून ई- निविदा मार्फत देण्याच्या व प्रारूप जाहीर निविदा मान्यतेस्तव सादर करण्यात आली अशी नोंद होती. त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली असून निविदा विक्रीचा दिनांक ८.८.२०११. निविदा दाखल करण्याची व निविदा उघडण्याची दिनांक २४.८.२०११ होती. परंतू या तारखेपर्यंत एकही निविदा प्राप्त झालेली नाही. त्यामुळे फेर निविदा करण्यात येत असून दुस-या वेळी निविदा मागविण्यासाठी मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. दुसरी वेळ निविदा मागवूनही एकच वैध निविदा प्राप्त झाली आहे. २ जानेवारी १९९२ च्या शासननिर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तीन निविदा वैध प्राप्त होणे आवश्यक आहे. के.व्ही. फायर केमीकल इंडिया प्रा.लि. मुंबई यांनी २६,८६,३००/- एवढा खर्च दर्शविला असून त्यामुळे खर्चात १५.६९% वाढ झालेली आहे. दराच्या वाटाघाटीसाठी संबंधित पुरवठाधारकास बोलाविले असता दरातून २% दर कमी करण्याचे संबंधितांनी मान्य केले आहे. त्यानुसार २३,५६,३१२/- खर्चाचा करारनामा व हमीपत्र घेणे / पुरवठा आदेश देण्यास मा.आयुक्त यांनी परीच्छेद ९६ अन्वये मान्यता दिली आहे. मा.आयुक्त यांना ५० लक्ष पर्यंतचे अधिकार असल्याने खर्चास मान्यता घेण्यात आली.

जा.क्र.मनपा/अशाद/१५९ / २०१२, दिनांक २१.०२.२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले असून ३० दिवसात पुरवठा करणे आवश्यक आहे.

संचिकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ७ नियम ७३ (३) अंतर्गत असलेल्या तरतूदीनुसार सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेविना खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरील खर्च अमान्य करण्यात येतो.

२. ई- निविदा दिनांक २६.१२.२०११ रोजी उघडण्यात आल्या. त्यानुसार निविदा उघडतांना कार्यकारी अभियंता, मुख्य लेखाधिकारी ई - निविदा व्यवस्थापक यांनी निविदा उघडल्यानंतर त्यांच्या समक्ष निविदा उघडण्यात आली यासाठी साक्षांकन करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात साक्षांकन केलेले नाही.

३. के.व्ही. फायर केमीकल इंडिया प्रा.लि.मुंबई यांच्याकडूनच कोटेशन मागावून प्रथम दर काढण्यात आले होते व पुन्हा दुस-या निविदेमध्ये वाटाघाटी करून २% कमी दर दर्शवून त्यातील १५.६९% जास्तीचा खर्च दर्शवून त्यांची निविदा मंजूर करण्यात आली. त्यामुळे यावर जास्तीचा खर्च करण्यात आला आहे. साठा रजिस्टरवरील साठ्याची माहिती घेवून त्यानुषंगाने आधीच निविदा प्रक्रिया का सुरू करण्यात आलेली नाही. त्यामुळे १५.६९% जास्त दराने निविदा मान्य करावी लागली. परिणामी मनपाला अधिकचा भुर्दंड सहन करावा लागलेला आहे.

४. करारनामा करतांना एकूण खर्च २३,५६,३१२/- या रकमेवर मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ अन्वये मुद्रांक शुल्क १५००/- घेणे आवश्यक असतांना फक्त २००/- रू. मुद्रांक शुल्क घेण्यात आले आहे. त्यामुळे शासनाच्या महसूलीचे नुकसान झाले आहे.

५. के.व्ही. फायर केमीकल इंडिया या कंपनीने केलेल्या हमीपत्र / करारानुसार देयक रक्कम रू. २४,०४,४००/- अदा करण्यात आले आहे. परंतू देयकातून २०% रक्कम रूपये ४,८०,८८०/- ६ महिन्यासाठी राखून ठेवण्यात यावी. अशा अटी / शर्ती मध्ये नमूद असतांना रक्कम अदा करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. तसेच मनपाचे तात्पुरते आर्थिक नुकसान करणारी ठरते.

६. फोम लिक्वीड या मालाचा पुरवठा करतांना रजि.क्र.१०९ पान क्र.१३८ दिनांक ३१.२.२०१२ रोजी पुरवठाधारकाने दिलेल्या इनव्हॉईस नं.१५०४ दिनांक ८.३.२०१२ व इनव्हॉईस नं.१५१६, दिनांक ११.३.२०१२ अन्वये पुरवठा झाला आहे. के.व्ही.फायर केमीकल लि.,मुंबई यांनी मालाचा पुरवठा खालील प्रमाणे केला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) ए.एफ.एफ.एफ. फोम लिक्वीड | १०,००० | लिटर |
| २) अल्कोहोल फोम | ३,००० | लिटर |
| ३) प्रोटीन फोम | २,००० | लिटर |
| | **एकूण १५,०००/-** | **लिटर** |

७. फोम लिक्वीडची मुदत १८ महिन्याची असल्याचे करारनाम्यामधील अट क्र.२ मध्ये नमूद केले आहे. यानुसार फोम लिक्वीडची वैधता दिनांक ३१.९.२०१३ पर्यंतची होती.

मात्र संबंधित विभागाने एकूण खरेदीपैकी एका मुख्य केंद्राला व दोन उपकेंद्राला एकूण वापर ४४०० लिटर केला आहे. उक्त साठा १५००० लि.एकूण साठ्यातून खर्च ४४०० लि. वजा जाता १०६०० लि. ज्याची एकूण किंमत रक्कम रू.१५,७०,५५०/- आहे व शिल्लक राहिलेला साठा निकामी (एक्सपायरी) झाला असतांनाही वापरण्यात येत आहे. वैधता समाप्तीनंतर त्या मालाची क्षमता संपते अर्थातच साहित्य निकामी होते. अग्निशमन विभागाने असे निकामी झालेले केमीकल वापरून मनपा प्रशासन तसेच नागरीकांची दिशाभूल केली आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. तसेच विनियोजन रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे पूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

८. लेखापरीक्षण दिनांकापर्यंत साठा नोंदवही तपासले असता फोम लिक्वीड शिल्लक नसल्याचे निदर्शनास आले. आपत्कालीन परिस्थितीत फोम लिक्वीडची आवश्यकता पडू शकते हे विभागास ज्ञात असतांना संपूर्ण साठा संपल्यानंतर उशिराने खरेदी प्रक्रिया केल्याने १५.६९% जास्त दराने निविदा मान्य करावी लागल्याने महानगरपालिकेस जास्तीचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागलेला आहे असे संचिका पाहणीवरून दिसून येते. वास्तविक सदरचे फोम लिक्वीड खरेदी करते वेळेस अचूक अंदाज प्रमाणे केले गेले नाही. त्यामुळे जास्तीचे फोम लिक्वीड खरेदी केलेले आहे. व सदरचे लिक्वीड हे फक्त १८ महिन्याकरीता वैध असल्यामुळे आवश्यक तेवढेच खरेदी करणे आवश्यक होते. जास्तीचे खरेदीमुळे मनपाचे नुकसान झालेले आहे. सक्षम प्राधिका-याची मान्यता नसल्यामुळे संपूर्ण खर्च अमान्य करण्यात येतो.

**तरी विभागाने वरील सर्व मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासणी करून खात्री करावी व तसा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून आक्षेप कायम करण्यात येतो.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून मनपाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती खुलासा सादर करण्यात यावा.**

**परिच्छेद क्र.११ : स्कॉरपिओ (डिझेल) व्हीएलएक्स ७ एसटीआर एअर बॅग बीएस-III महिन्द्रा ॲन्ड महिन्द्रा गाडी खरेदी बाबत. रक्कम रू. १२,३६,२५३/-**

अग्निशमन विभाग महानगरपालिका औरंगाबाद करीता महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लि.कंपनीकडून स्कॉरपिओ व्हीएलएक्स ७ एस.टी.आर. एअर बॅग्ज बी.एस.- III ही गाडी खरेदी करायची असल्याने वाहनाची एकूण किंमत सर्व कर मिळून रक्कम रू. १२,३६,२५३/- एवढी आहे. खरेदीसाठी प्रस्ताव ठेवण्यात आला असून गाडीवर होणारा खर्च आपत्ती व्यवस्थापन या शिर्षातून खर्च करणेच्या मान्यतेस्तव सादर केला असता या शिर्षातून तरतूद नसल्याने अग्निशमन विभागात लेखा शाखेकडून संचिका परत पाठविण्यात आली.

विभागाने पत्र नसतांनाही परिच्छेद २१ मध्ये लेखापाल यांनी नमूद केल्याप्रमाणे १३ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीतून अग्निशमन विभागाकरीता स्कारपिओ वाहन प्रस्ताव दिलेला आहे. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात प्राप्त रू.४.८८ कोटी निधीतून मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करता येईल. करीता मान्यतेस्तव सादर करून मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी आहे. मुख्यलेखाधिकारी यांना परिच्छेद क्र.२२ अन्वये मा.आयुक्त यांनी चर्चा करा असा शेरा दिला असता मुख्य लेखाधिकारी यांची चर्चा न होता मुख्य अग्निशमन अधिकारी यांची चर्चा झाली असे परिच्छेद क्रमांक (२३) मध्ये नमूद आहे. मुख्य लेखाधिकारी यांची याबाबत स्वाक्षरी कुठेही दिसून आली नाही.

परिच्छेद क्रमांक २८ नुसार संचिका फेर सादर करण्यात आली असून परिच्छेद क्रमांक ३३ अन्वये मा.आयुक्त यांनी मुख्य लेखाधिकारी यांनी पहावे असे नमूद केले असता लेखा विभागाने सादर केले. मा.स्थायी समितीचे / मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७६ व ७७ नुसार) प्रस्तावित खरेदी घसारा निधीतून करता येईल असे नमूद करून मा.आयुक्त यांची स्वाक्षरी आहे. प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्याच्या मान्यतेस्तव सादर करून मा.आयुक्त, मा.नगरसचिव, मा.महापौर, प्रस्ताव मंजूरी घेण्यासाठी दिनांक ७.१.२०१२ रोजी सादर केला आहे.

मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८/२/२०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये विषय क्र.५९१ मान्यता देण्यात आली. तद्नंतर प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करून रक्कम रू.१२३६२५३/- च्या खर्चास घसारा निधी मधून खरेदी करण्यास मान्यता दिली आहे.

परिच्छेद क्रमांक ४५ अन्वये ३४ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७६,७७ नुसार मालमत्तेचे संपादन करण्या संबंधीचा महानगरपालिकेचा अधिकार तसेच नियम ७७ हा स्थावर मालमत्ता संपादन करणे बाबत आहे. त्यात घसारा निधी खर्च करण्याची तरतूद नाही असे लेखाधिकारी यांनी नमूद केले असतांनाही वाहन खरेदी करण्यास दिनांक २.३.२०१२ रोजी मा.आयुक्त यांनी मान्यता देण्यात आली आहे. वाहन खरेदी करतांना यांत्रिकी विभागामार्फत संचिका सादर करून खरेदी होणे आवश्यक असतांना यांत्रिकी विभागाचा अभिप्राय सुध्दा नोंदविलेला नाही.

संचिकाची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. स्कॉरपिओ व्हीएलएक्स ७ एसटीआर एअर बॅग बीएस-III खरेदी करण्यासाठी महिन्द्रा ॲन्ड महिन्द्रा लि.पुणे यांच्याकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव होता. परंतू रत्नप्रभा मोटर्स चिकलठाणा यांच्याकडून दिनांक २६.९.२०११ अन्वये कोटेशन मागावून गाडी खरेदी करण्यासाठी जा.क्र.मनपा/अशाद/१९२/१२, दिनांक ६.३.२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला. टॅक्स इनव्हॉईस नं.आरपीएज १४४७/११-१२, दिनांक ९.३.२०१२ अन्वये वाहनाची किंमत १०२८०००/- इतकी नमूद केली आहे व त्यास महानगरपालिकेने आयडीबीआय बँक चा धनादेश क्रमांक १५७४३६/७.३.२०१२ नुसार रक्कम रूपये १२३६२५३/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. रक्कम रू.२,०८,२५३/- जास्तीचे मे.रत्नप्रभा मोटर्स यांना अदा करून मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. जास्तीची अदा रक्कम संबंधिताकडून वसूल करणे योग्य.

२. विभागाने प्रादेशिक परिवहन नोंदणी शुल्क करासाठी रक्कम रू. **१,४८,०७०/-** अदा करण्यात आली आहे. मुंबई मोटर वाहन कर कायदा १९५८ कलम १३ अन्वये महानगरपालिकेच्या वाहनांना १००% कर माफी देण्यात आलेली असतांना रक्कम अदा केलेली आहे ही बाब आक्षेपार्ह आहे. विभागाने प्रत्यक्ष खात्री करून अदा केलेली रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविले असता विभागाने जा.क्र.मनपा/अशाद/१३७०/१६ दिनांक २९.३.२०१६ अन्वये खुलासा सादर केलेला आहे की, सारस्वत बँक चेक क्र.२६३६८०, दिनांक ११.१.२०१६ रोजी पावती क्र. एफ१०४/३५९१०, दिनांक १४.१.२०१६ च्या पावतीद्वारे रक्कम रू. १,४८,०७०/- चा भरणा करण्याऐवजी रक्कम रू.१,३८,९७२/- चा भरणा केला आहे. संबंधिताकडून ९०९८/- चा कमी व विलंबाने भरणा केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. स्थानिक संस्था कर रक्कम रू. २% २०५६०/- एजन्सीला अदा करण्यात आली आहे. २% ऐवजी १.५% रक्कम रू.१५४२० देणे असतांना रक्कम रू.५१४०/- जास्तीचे अदा झालेले आहे. (१४ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णय रहदारी फी रद्य झाल्यानंतर दर वाढ करण्यात आली.)

४. प्रत्यक्षात खर्च घसारा निधीतून केलेला असल्यास संबंधित लेखाशिर्षात पुरेशी तरतूद उपलब्ध होती काय या बाबतची खात्री विभागाने केली नाही.

५. नविन वाहने खरेदीची प्रक्रिया यांत्रिकी विभागामार्फत करणे गरजेचे असतांना त्यांच्या अधिकारावर अतीक्रमण करण्याचे काम अग्निशमन विभागाने केले आहे.

**विभागाने प्रत्यक्ष खातरजमा / शहानिशा करून जादा अदा रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र.१ प्रमाणे २,०८,२५३/-, मुद्या क्र.२ प्रमाणे रक्कम रू. ९०९८/- व मुद्या क्र. ३ प्रमाणे रक्कम रू.५१४०/- असे एकूण २,२२,४९१/- चा संबंधिताकडून वसूल करावे. वरील अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२ : नविन बॉलेरो झेडएलएक्स - बीएस-३ खरेदी करणे बाबत.**
**(खर्च रक्कम रू.९,३७,९९७/-)**

सन २०१२-१३ या वर्षात विभागाने नविन बॉलेरो - झेडएलएक्स बीएस-३ वाहन खरेदीच्या खर्चाची संचिकाची पाहणी केली असता (खरेदी खर्च रक्कम रू.९,३७,९९७/-) वाहन खरेदीची गरज असल्याने दिनांक १०/७/२०१२ रोजी बाजारातून कोटेशन मागवून रत्नप्रभा मोटार्स, औरंगाबाद यांचे एकच कोटेशनचे आधारे महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा या कंपनीचे वाहन खरेदी करणेत आले. प्रकरणी मा.स्थायी समितीचा ठराव क्र.७६ दिनांक १६.१०.२०१२ अन्वये व मा.आयुक्त यांची दिनांक त्याच रोजी मान्यता घेण्यात आली. रत्नप्रभा या एजन्सीस पुरवठा आदेश क्र.मनपा/अशाद /८५१/२०१२, दिनांक २३.१०.२०१२ देण्यात आले. वाहन पुरवठा टॅक्स इनव्हॉईस नं. आरपीएम /१०२६/१२-१३, दिनांक १.११.२०१२ करण्यात आला.

उक्त वाहन खरेदीची संचिकेचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. वरील प्रस्तावित वाहन खरेदी करतांना शासन निर्णय दिनांक २ जानेवारी १९९२ अन्वये निविदा मागवून खरेदी करणे आवश्यक होते. मात्र विभागाने दरपत्रक मागवून खरेदी केलेली आहे.

२. सदरील वाहन खरेदी करतांना संबंधित एजन्सी रत्नप्रभा यांना प्रादेशिक परिवहन नोंदणी शुल्क आणि पथकरा करीता रू.१,६०,३९४/- अदा केलेले आहे. मात्र, मुंबई मोटार वाहन कर कायदा १९५८ कलम -१३ अन्वये महानगरपालिकेच्या वाहनांना प्रादेशिक परिवहन रजिस्ट्रेशन व रोड टॅक्स मध्ये १००% कर माफीची तरतूद असतांना, संबंधित एजन्सी रत्नप्रभा यांना रू.१,६०,३९४/- इतकी रक्कम जास्तीची अदा करण्यात आली, कराची रक्क्म संबंधिताकडून वसूल करणे योग्य राहील.
लेखापरीक्षण आक्षेपानंतर जा.क्र./मनपा/अशाद/१३६९/२०१६, दिनांक २९.३.२०१६ अन्वये संबंधित विभागाने खुलासा सादर केला की , चेक नं. २६३६७९, दिनांक ११.१.२०१६ रोजी पावती क्र. एफ१०४/३५९१२, दिनांक १४.१.२०१६ अन्वये रक्कम रू.१,४०,३८०/- भरणा विलंबाने करून घेतलेला आहे. मे. रत्नप्रभा मोटार्स यांना रू.१,६०,३९४/- अदा केले होते. परंतू त्यांचेकडून लेखापरीक्षण आक्षेपानंतर रू. १,४०,३४०/- रकमेचाच भरणा करून घेतला. रक्कम रू.२०,०१४/- अद्यापही वसूल केलेले नाही.

३. वाहन खरेदी करतांना त्यापोटी स्थानिक संस्था कर व इतर कामासाठी एकूण रू.३८,२९३/- इतकी रक्कम संबंधित एजन्सीधारकास देयकामध्ये अदा करण्यात आलेले आहे. मात्र स्थानिक संस्था कर व इतर करण्यात आलेल्या खर्चाबाबतच्या पावत्या वस्तुनिहाय बिल देणे अनिवार्य आहे. पावत्या संचिकेत तपासणी करीता दिसून आल्या नाही.

४. नविन वाहने खरेदीची प्रक्रिया यांत्रिकी विभागामार्फत होणे अभिप्रेत आहे. अग्निशमन विभागाने परस्पर खरेदी करून यांत्रिकी विभागाच्या अधिकारावर अतिक्रमण केले आहे.

**संबंधिताकडून कमी भरणा केलेली रक्कम रू.२०,०१४/- वसूल करून इतर अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१३ : वाळुज एम.आय.डी.सी. अग्निशमन दलाचा खर्च व परतावा वसूली बाबत. (सन १९९३ ते २००८ पर्यंत) (थकीत रक्कम रू. ३८,३०,१५७/-)**

खर्चाचे लेखे / संचिका, वाळुज औद्योगिक वसाहतीतील अग्निशमन केंद्र चालविण्याबाबत झालेला खर्च अद्यापपर्यंत थकित असल्याची संचिकांची पाहणी केली असता, त्यामध्ये खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास येतात.

संचिका मधील पृ.क्र.एनएस/१४० चे परि.क्र. (२७८) ते (२८०) नुसार एम.आय.डी.सी. अग्निशमन केंद्राकडे सन १९९३ ते २००८ पर्यंत खर्चाचा परतावा रक्कम रू.**३८,३०,१५७/-** इतकी थकीत रक्कम येणे बाकी आहे. याबाबत मा.आयुक्त, यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी संबंधिताकडे पाठपुरावा करणे करीता मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधितास पत्र

क्र.मनपा/अशाद/१४/२०१०, दिनांक ४.१.२०१०) अन्वये मा.आयुक्त यांचे स्वाक्षरीने थकित रक्कम वसूली बाबत पत्र पाठविलेले आहे. तद्नंतर अद्यापपर्यंत थकित रक्कम वसूलीबाबत अग्निशमन विभागामार्फत कोणताही पाठपुरावा केलेला संचिकेवरून दिसून येत नाही. त्यामुळे मनपाची थकित रक्कम रू.**३८,३०,१५७/-** इतकी मोठी रक्कम वसूल झालेली नाही. परिणामत: मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

वरील प्रकरणी विभागाने तात्काळ कार्यवाही / पाठपुरावा करून थकीत रक्कम रू.**३८,३०,१५७/-** वसूल करून तसा, लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. आक्षेप कायम करण्यात येतो.

**विभागाने उक्त रक्कम रू.३८,३०,१५७/- बाबत संबंधितांकडून वसूली करावी. विलंबाबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र १४.: अग्निशमन विभाग मनपा औरंगाबाद करीता एक रेस्क्यू व्हॅन खरेदी बाबत. रक्कम रू.२,३६,५७,२६३/- चेसीस नं. ३७३३४४ सीआरझेड ७१५७९१ इंजिन नं. ६९७ टीसी एस.एस.सी.आर.झेड ८१७६०७**

रेस्क्यू व्हॅन खरेदीच्या खर्चाच्या संचिकेची पाहणी केली रेस्क्यू व्हॅन खर्च रक्कम रू.२,३६,५७,२६३/-, दिनांक १२.२.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त विषय क्र.४१८ नुसार मान्यता मिळाली आहे.

१२ व्या वित्त आयोगाकडून विशेष निधी मिळाल्यानंतर व जाहीर निविदा मागविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

दरम्यान एक निविदा प्राप्त झाली. फेर निविदेसाठी मा.आयुक्त यांनी दिनांक २४.८.२०१० रोजी मान्यता दिली. दिनांक २९.९.२०१० रोजी निविदा उघडण्यात आली. त्यामध्ये एकच निविदा प्राप्त झाली.

1. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झाली नाही. एकच निविदा प्राप्त झाली. किमान तीन वैध निविदा स्पर्धात्मक दर प्राप्तीसाठी नियमान्वये तीन वेळेस निविदा मागविणे आवश्यक असतांना एकच निवेदेवर निविदा प्रक्रिया पार पाडण्यात आली आहे जे की नियमबाह्य आहे.

२. तसेच प्रस्तावित अनुदान हे भूसंपादनासाठी प्राप्त झालेले होते. ते अनुदान त्याच कामासाठी वापरणे आवश्यक असतांना तसे न करता सदरील अनुदान वाहन खरेदीसाठी वापरून प्राप्त अनुदानाचा दुरूपयोग करण्यात आल्याचे दिसून येते तसेच सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेविना झालेला खर्च अमान्य करण्यात येतो.

ब्रिजवासी हायटेक उद्योग यांची निविदा दर रू.२,५१,४७,५१४/- प्राप्त झाली. अंदाज दरपत्रक रू.२,२७,८७,२९०/-असून निविदाधारकांचे जास्तीचे दर रूपये २,५१,४७,५१४/- असे आले व एकच निविदा असल्यामुळे दराबाबत थर्ड पार्टी व्यक्तीचे मत विचारणा करण्यासाठी

तीन सदस्याची समिती नियुक्त करण्यात आली. त्यामध्ये खालील तीन अधिका-यांचा समावेश करण्यात आला आहे.

१. श्री.उदय तटकरे मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई.

२. श्री.अनिल महाजन मुख्य अग्निशमन अधिकारी, नाशिक.

३. श्री.जी.बी.सोनी सेवानिवृत्त उपअभि. यांत्रिकी मनपा औरंगाबाद

मा.आयुक्त यांचे दालनात रेस्क्यू व्हॅन खरेदीची वाटाघाटी बैठक घेण्यात आली. दुसरी वेळ जाहिर निविदा दर रूपये २,५१,४७,५१४/- आहेत त्यास चर्चेअंती (३,४७,५१४/-) कमी करून रू. २,४८,००,०००/- दरास प्रशासकीय व स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात आली. त्यानंतर दिनांक २७.५.२०११ रोजी संबंधित निविदाधारकास करारनामा व पुरवठा आदेश देण्यास मंजूरी दिली आहे.

पुरवठा आदेश जा.क्र.मनपा/अशाद/६२१/२०११, दिनांक २७.५.२०११ रोजी देण्यात आला आहे.

संचिका तपासतांना खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. करारनामा करतांना एकूण खर्च रूपये २,४८,००,०००/- या रकमेवर २४०००/- मुद्रांकावर करणे आवश्यक असतांना रक्कम रूपये २५००/- चा मुद्रांकावर करारनामा करण्यात आला. मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ (२) अन्वये मुद्रांक शुल्क रू.२२३००/- शासनाच्या महसूलाचे नुकसान झालेले आहे.

२. दुसरी वेळ निविदा जा.क्र.मनपा/अशाद/८३५/२०१०, दिनांक २४.८.२०१० मध्ये कामाची मुदत ३ महिने अशी होती. मात्र पुरवठा आदेश देतांना आठ महिन्याच्या आत पुरवठा करण्यात यावा अशी नोंद आहे. तर प्रत्यक्षात पुरवठा कालावधी कोणता होता याबाबत बोध होत नाही. त्याचप्रमाणे निविदेतील अटी शर्तीचा समावेश पुरवठा आदेशात असणे बंधनकारक असतो, ही बाब अग्निशमन विभागाने हेतू पुरस्सर दुर्लक्षित केली.

३. पुरवठा आदेश अटी शर्ती १ प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका तर्फे पुरवठा करण्यात आलेल्या टाटा १६१३/४२ २ पीटी चेसीसवर फॅब्रिकेट करणे व त्यावर लागणारे सर्व ॲक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे व चाचणी देणे आवश्यक असतांना अटी शर्ती प्रमाणे पूर्तता झाल्याचे अहवाल संचिकेत नाहीत.

४. फायर बॉडी कन्स्ट्रक्शन चालु असतांना दोन तांत्रिक तपासणी बंधनकारक आहे असे नमूद केले आहे. तसे केल्याचे दिसून आलेले नाही.

५. डिलीव्हरी करीता वाहन तयार झाल्यावर साईटवर व औरंगाबाद येथे टेस्टींग देणे बंधनकारक आहे असे असतांना याबाबत संचिकेत उल्लेख नाही.

६. निविदा व करारनाम्यातील अटी व शर्तीप्रमाणे काम करावे लागेल व वेळोवेळी कामाचा प्रोग्रेस रिपोर्ट द्यावा लागेल असे नमूद आहे. तथापि याबाबत कोणताही प्रोग्रेस रिपोर्ट संचिकेत उपलब्ध नाही.

७. बँक गॅरेन्टी नं.७१/०८ ई निविदेनुसार २४ महिन्याची असणे आवश्यक होते. (सी-३९३ नुसार ) परंतू बँक गॅरेन्टी दिनांक ३.६.२०११ ते २.१२.२०११ पर्यंतच असल्याचे दिसून आले. कामाच्या परफॉर्मन्ससाठी बँक गॅरेन्टी संबंधिताकडून घेण्यात येते. निविदा अटी शर्तीचा भंग झालेला असून बँक गॅरेन्टी घेण्याचा हेतू सफल झाला नाही.

८. निविदा अटी शर्ती क्रमांक ३७ नुसार पुरवठाधारकाने जे साहित्य पुरविले आहे त्यांची वॉरेन्टी २ वर्षाची असणे आवश्यक होते. मात्र वॉरेन्टी बाबत संचिकेत उल्लेख नाही. तसेच वॉरेन्टी कार्ड सुध्दा नाही.

९. ब्रिजबासी- हाय टेक उद्योग, लि. यांनी विक्रीकर इनव्हॉईस दिले आहे. नं.१५४ दिनांक २३.३.२०१२ त्यामध्ये काम केल्याबाबत टॅक्स इनव्हॉईस मध्ये वस्तु नुसार दर्शवून मोजमाप पुस्तिकेत याबाबत नोंद (रेकॉर्डिंग) करणे आवश्यक होते. मात्र तशी नोंद घेतलेली दिसून आलेली नाही.

१०. संचिकेतील परिच्छेद क्रमांक २२२ पान क्रमांक ७६ वर नमूद केले आहे की, पूर्व पृष्ठावरील परि. क्र.२१५ मधील अ.क्र. ०२ व ०३ वरील १३ व्या वित्त आयोगातील भूसंपादनासाठी राखीव ठेवलेल्या रक्कम रू. २.९६ कोटीपैकी प्रस्तावित रेस्क्यू व्हॅनसाठी रू.२.४८ कोटी नियोजन करून देयक अदाईसाठी उपयोगात आणणे. त्यानुसार ७०% रक्कम रू. १,७३,६०,०००/- संबंधितास अदा करण्यात आले आहे. यामध्ये मा.आयुक्त यांनी परिच्छेद क्रमांक २२३ मध्ये स्पष्ट शेरा दिला आहे की, भूसंपादनाचे पैसे वर्ग करू नयेत तरी यामधून रक्कम अदा झालेली आहे.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ चा भंग झालेला आहे.

११. परिच्छेद क्रमांक २२४ अन्वये नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत बाकी असलेल्या रकमेतून खर्च करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. मात्र मा.आयुक्त यांनी पुरवठा आदेश व त्यातील अटी संदर्भात पुन्हा एकदा तपासा असे प.क्रमांक २२५ मध्ये नमूद केले आहे. विभागाने तपासून परिच्छेद क्रमांक २२७ नुसार मा.आयुक्त यांना ७०% रक्कम देण्यास शिफारस केली आहे. त्यास परिच्छेद क्रमांक २२८ नुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रथम देयक दिनांक ३१.३.२०१२ रोजी अदा केले आहे. यामध्येही कायद्याचा भंग झालेला आहे.

१२. संचिकेतील पान क्रमांक सी-२०१-२११ वर गाडीचे अंदाजपत्रकीय अंदाजपत्रक दर्शविले आहे. त्यामध्ये एकूण २,२७,८७,२९०/- सर्व करासह दर्शविले आहे. मात्र सी-२११ वर पुन्हा किरकोळ बदल ७.५% प्रमाणे १४,१३,१६५/- एवढी रक्कम दर्शविली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. कारण आपण अंदाजपत्रकात ऐनवेळी काही वस्तु वाढले तर त्यास मंजूरी घेवून वाहनाचे काम करतांना त्याचे हिस्ट्री

बुक तयार करून तपशिलवार वस्तुनिहाय नोंदणी त्यात दरासह व टॅक्सेस सह नोंद घेणे आवश्यक आहे, मोजमाप पुस्तिकेत सुध्दा नोंद घेणे आवश्यक आहे. अशी नोंद घेतल्याचे दिसून आली नाही. निविदा नियम ३८ अन्वये मंजूरी घेणे आवश्यक होते. तसे केल्याचे दिसून आलेले नाही. रक्कम वसूलीस पात्र आहे. या रकमेवर १२.५% व्हॅट रक्कम रू. १७६६४२/- अदा करण्यात आली आहे. सदरची रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा.

१३. देयक अदा करतांना सेल टॅक्स, कपात होणे आवश्यक होते परंतू कपात झालेला नाही. (निविदा नियम ५४ ) नुसार निविदा अट क्र.३९ अन्वये ३०% रक्कम खालील दर्शविलेल्या देयकातून -

II आरए - ४६२१२६० - दिनांक ८.१०.२०१२

III आरए - १२८१४७४- दिनांक १३.४.२०१३

वजावट करणे आवश्यक होते. मात्र तसे न करता १०% रक्कम रू. १५,३७,२६०/- ठेवून बाकी रक्कम अदा करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

१४. मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद, दिनांक ११.२.२०१० च्या आदेशानुसार अग्निशमन वाहने खरेदी करण्यासाठी व पंप खरेदीसाठी ३ अधिकारी यांची वाहनाचे अंदाजपत्रक/ तांत्रिक निविदा, निविदा स्विकृती वित्तीय बाबींची तपासणी तसेच थर्ड पार्टी इन्स्पेक्शनसाठी तीन सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यांची नांवे सादरीकरणात दर्शविलेले आहे. श्री.जी.बी.सोनी,सेवानिवृत्त उपअभियंता यांनी दिनांक १.१२.२०१२ च्या पत्रान्वये मुख्य अग्निशमन अधिकारी महानगरपालिका, औरंगाबाद यांना वाहनांच्या कामाबाबत खालील आक्षेप नोंदविलेले आहे.

अ. कंपनीने वस्तुनिहाय बिल न बनविल्यामुळे त्यांना जास्तीचे पेमेंट अदा झाले आहे.

ब. वाहनाचे हिस्ट्री बुक तयार करून तपशिलवार वस्तुनिहाय नोंदणी त्यात दरांसह व टॅक्सेस इत्यादीसह करणे आवश्यक आहे.

क. मथुरा, आग्रा रोड येथे तपासणीसाठी सल्लागार यांना बोलावण्यात आले नसल्याचे संचिकेत नमूद आहे.

ङ संचिकेमध्ये एजन्सीला जास्तीचे प्रदान न देणे बाबत सूचविले आहे.

ई. कंपनीने सदरील ट्रेनींग कमी दिवस व प्रत्यक्ष डेमो देवून पूर्ण केलेली वाटत नाही. अंदाजपत्रका नुसार तपासणी केली असता -

| | |
|---|---|
| १) ए ते जे वस्तुसाठी - | १,४१,३४,५२५/- |
| २) भाग -ब - अंदाजपत्रक | २२,५०,०००/- |
| **एकूण** | **१,६३,८४,५२५/-** |
| १५% नफा | २४,५७,६७९/- |
| | **१,८८,४२,२०४/-** |

| | |
|---|---|
| अधिक ७.५% किरकोळ बदल | १४,१३,१६५ |
| [अदा न केलेले ] | **२,०२,५५,३६९/-** |
| व्हॅट टॅक्स १२.५% | २५,३१,९२१/- |
| | **२,२७,८७,२९०/-** |

१५. नविन वाहने खरेदी यांत्रिकी विभागामार्फत न करण्याचे प्रयोजन लेखापरीक्षणास अनाकलनीय वाटते.

सल्लागार म्हणून तांत्रिक सल्लागारातील एका सदस्याने सल्ला दिला आहे. ह्या बाबीवर विचार करून तातडीची कार्यवाही करावी व मनपाचे झालेले नुकसान एजन्सीकडून रिकव्हरी करून वसूल करावे.

वरील आकडे तपासले तर निदर्शनास येते की, ७.५% किरकोळ बदल हे ऐनवेळी अंदाजपत्रका व्यतिरिक्त काही वस्तु वाढल्या तरच त्या प्रमाणात मंजूरी घेवून द्यावयास पाहिजे म्हणजेच १४,१३,१६५/- ही रक्कम कोणतेही जास्तीचे काम न करता देण्यात आली आहे. वस्तुनिहाय जर रेकॉर्डींग केले असते तर सदरील बाब निदर्शनास आली असली. स्थापित केलेल्या समितीच्या सल्ल्याचा विचार खरेदी प्रक्रियेत कोठेही केला असल्याचे संचिका पाहणीत आढळून आलेले नाही.

पुरवठा केलेले महाग वस्तुचे चे वॉरेन्टी कार्ड / तांत्रिक तपशिल त्यांना दाखविले नाही. असे संबंधिताने दर्शविले आहे. तर यांच्या उक्त दर्शविले प्रमाणे मुद्यांवर का सुधारणा करण्यात आल्या नाही याबाबत विभागाने खुलासा सादर करावा.

कामाच्या बिलाची अदाई ही आर.टी.ओ. तपासणी व रजिस्ट्रेशन मुख्य अग्निशमन अधिकारी व तांत्रिक समितीने तपासणी केल्यानंतर केली जाईल. परंतू रजिस्ट्रेशन व तांत्रिक समितीने तपासणी केल्याबाबतचा उल्लेख संचिकेत नाही. तसेच प्रादेशिक परिवहन रजिस्ट्रेशनसाठी किती खर्च करण्यात आला याचा उल्लेख अथवा कागदपत्र जोडलेले नाही.

**तरी, उपरोक्त मुद्यांवर विभागाने लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. रू.१४,१३,१६५/- अनकाऊन्टेड रक्कम संबंधित एजन्सीकडून वसूल करून इतर अनियमितते बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१५ :अग्निशमन दलासाठी नविन तीन टाटा -१६१३ एल.पी.टी. चेसीसवर फायर टेंडर फॅब्रीकेट करणे, सर्व ॲक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविणे रू. १,११,३४,५२०/- बाबत. (भाग -१)**
**१)चेचीस क्रमांक ३७३३४४ सीआरझेड ७१५४६५**
**२)३७३३४४ सीआरझेड ७१५७८६**
**3) 373344 बीआरझेड 709259**

अग्निशमन दलासाठी नविन तीन टाटा - १६१३ एल.पी.टी. चेसीसवर फायर टेंडर फॅब्रीकेट करणे सर्व ॲक्सेसरीज व इक्वीपमेंट बसविने व सन २००९-१० या वित्तीय वर्षात वित्त आयोगा अंतर्गत प्राप्त अनुदानातून रक्कम खर्च करावयाची आहे. विभागाने २ वर्षापूर्वी ४ फायर टेंडर चेसीस खरेदी केलेल्या आहेत ज्याची किंमत रू.३४,८२,५७२/- एवढी आहे

केवळ फायर टेंडर फॅब्रीकेशन वर्क अभावी विना वापर पडून आहे. विभागाने फॅब्रीकेशन वर्षी रू.३.६५ कोटीचा प्रस्ताव सादर केला आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा ई-निविदा द्वारे मागविणे करीता ११.२.२०१० रोजी मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली. या कामासाठी तीन निविदा प्राप्त झाल्या. दिनांक ७.७.२०१० रोजी निविदा उघडण्यात आली आल्या असता खालील प्रमाणे अंदाजपत्रकयी दर प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | अंदाज दर | निविदा दर | अंदाज दराची तुलना |
|---|---|---|---|---|
| १ | ब्रिजवासी, उद्योग मुंबई | १,०८,३०,००० | १,२२,१४,२४५ | यादीप्रमाणे |
| २ | श्रीटेकॉन हैद्राबाद | १,०८,३०,००० | १,१२,४६,९९० व्हॅट ९९९७३२५ | ७.९६५ कमी |
| ३ | देवी फायर सर्व्हीस सोलापुर | १,०८,३०,००० | १,१३,०९,६२५ | ४.४२८ जास्त |

फेर निविदा मागविल्या असता दोन निविदा प्राप्त झाल्या आहे. त्यापैकी एक निविदा अपात्र झाली. श्रीटेकॉन, हैद्राबाद यांची निविदा उघडण्यात आली. वाटाघाटीअंती १% कमी दराने मान्यता देण्यात आली. रक्कम रू.१,१२,४६,९९०/- च्या १% कमी दर १,११,३४,५२०/- या रकमेस दिनांक २४.८.२०१० रोजी मान्यता घेवून स्थायी समिती ठराव क्र.४७, दिनांक ७.९.२०१० रोजी मंजूर करण्यात आला. सुरक्षा अनामत रक्कम रू.५,५७,०००/- डी.डी.क्रमांक १५५८४८/ दिनांक ७.३.२०११ पावती क्र. ३९९०८८, दिनांक ९.३.२०११ रोजी जमा करण्यात आला. श्रीटेकॉन कंपनी यांना पुरवठा आदेश जा.क्र.मनपा/अशअ/२६८/२०११,दिनांक १४.३.२०११ रोजी देण्यात आला.

संचिकांची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. रक्कम रू.१,०८,३०,०००/- या अंदाजपत्रकीय कामे करण्यासाठी धोरणात्मक निर्णयास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात आलेली नाही, त्यामुळे सर्वच खर्च अमान्य करण्यात येतो.

२. यांत्रिकी विभागा मार्फत कामे प्रस्तावित न करण्याचे कारण समजू शकले नाही. मनपाकडे स्वतंत्र वाहनांची कार्यशाळा उपलब्ध आहे. त्यांचा अभिप्राय सुध्दा संचिकेत घेतलेला नाही.

3. श्रीटेकॉन कंपनी यांच्याशी कामाचा करार करतांना रक्कम रू.१००/- च्या मुद्रांक शुल्कावर करारनामा केला आहे. ही बाब आक्षेपार्ह असून करारनामा करतांना मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ३४ (२) अन्वये रक्कम रू.१०,३००/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करणे आवश्यक होते. त्यामुळे शासनाचे महसूली नुकसान झालेले आहे.

४. गाडीची तांत्रिक तपासणी करणेसाठी, मुख्य अग्निशमन अधिकारी मुंबई, मुख्य अग्निशमन अधिकारी नाशिक आणि उपअभियंता यांत्रिकी (निवृत्त) जी.बी. सोनी यांची नेमणूक करण्यात आली.

५. मनपा/अशअ/२६८/२०११, दिनांक १४.३.२०११ रोजी गाडीचे काम करण्यासाठी कार्यादेश व श्रीटेकॉन प्लॉट नं. १२२९ रोड - ६० ज्युब्ली हिल्स हैद्राबाद ५०००३४ यांना आदेश देण्यात आले होते. त्यानुसार संबंधिताने १८.६.२०११ रोजी पत्र देवून पहिली वाहनाची तपासणी करण्यासाठी नियुक्त केलेल्या तांत्रिक कमिटी पाठविणे बाबत कळविले आहे. त्यानुसार मा.आयुक्त यांची दिनांक १५.९.२०११ रोजी मान्यता घेवून वाहनाची तांत्रिक तपासणी करण्यासाठी संबंधितांना दिनांक ६.११.२०११ व ७.११.२०११ रोजी हैद्राबाद येथे पाठविण्यात आले आहे. (आदेश क्रमांक जा.क्र.मनपा/अशाद / १२८१, दिनांक ३.११.२०११)

उक्त प्रमाणे तांत्रिक सल्लागार पथकाने तपासणी करून तसा अहवाल संचिका पृ.क्र.सी/११०७ वर संलग्न केलेले आहे.

६. परिच्छेद क्र.१६४ वर मा.मुख्य लेखाधिकारी यांनी प्रत्येक वाहनासाठी प्रति वाहन ५,५७,०००/- सुरक्षा अनामत रकमेचा भरणा करून घेणे बाबत नमूद केले असतांना संबंधिताकडून डीडी क्रमांक १५५८४८, दिनांक ७.३.२०११, पावती क्र.३९९०८८ दिनांक ९.३.२०११ अन्वये फक्त ५,५७,०००/- चाच भरणा करून घेण्यात आलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे ११,१४,०००/- चे तात्पुरते आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

७. संचिकेतील पान क्रमांक ८५७ अन्वये विषय क्र. ४७, दिनांक ७.९.२०१० रोजी मे.श्रीटेकॉन हैद्राबाद यांचे दर सर्वात कमी असल्याने त्याचे दर ९९,९७,३२५/- यावर १२.५% व्हॅट १२४९६६५ = १,१२,४६,९९० यावर १% दर कमी करून १,११,३४,५२०/- ही रक्कम दर्शवून मान्यता देण्यात आली. मात्र देयक अदा करतांना १,१३,३२,६६७.७५ एवढी रक्कम अदा करण्यात आली. रक्कम रू.१,९८,१४७/- जास्तीची रक्कम वसूलीस पात्र

८. अटी शर्ती क्रमांक ३७ [सी -८३७] अन्वये २ वर्षाचा वॉरेन्टी कालावधी असतांना वॉरेन्टी कार्ड संचिकेत उपलब्ध नाही.

९. संचिकेतील पान क्रमांक C-८०५ परिशिष्ट -ब -१ मध्ये रक्कम रूपये ९९,६७,३२५/- एवढी दर्शवून त्यावर समितीची स्वाक्षरी आहे. मात्र खरेदी निविदा बाबत दिनांक ७.७.२०१० रोजी अग्निशमन कार्यालयात अधिका-यांच्या उपस्थितीत बैठकी मधील परिच्छेद क्रमांक १०२ ते १०४ मध्ये निविदांचे दर ९९,९७,३२५/- एवढी दर्शविली आहे. म्हणजेच रक्कम रू.३०,०००/- जास्तीचे दर्शविले आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. जास्तीची अदा केलेली रक्कम वसूलीस पात्र.

१०. अटी/शर्ती नुसार कामाचा कालावधी ९० दिवसाचा असतांना काम दिनांक २५.११.२०११ रोजी पूर्ण करण्यात आले. म्हणजेच ५ महिने १० दिवस उशिरा करण्यात आले. विलंबाने काम करण्यात आल्यामुळे कम करण्यामागचे उद्दिष्ट सफल झालेले नाही. प्रतिदिन अटी शर्ती प्रमाणे २००/- रू. दंड आकारून १६३ दिवस x २०० = ३२६००/- रू. वजावट करणे आवश्यक होते. विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. संबंधिताकडून दंडाची रक्कम वसूलीस पात्र.

११. अटी / शर्ती क्रमांक ३९ नुसार देयक अदा करतांना १०% रक्कम रू.११,१०,११०/- एवढ्या रकमेवर मनपाला व्याज मिळाले असते.

१२. प्रकरणी खरेदी करणेत आलेल्या नविन फायर टेंडर वाहनांचे प्रादेशिक परिवहन रजिस्ट्रेशन करीता जो खर्च करणेत आला त्याबाबतची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आली नाही.

१३. वाहनाची कामे करतांना संपूर्ण कामे, खरेदी ही यांत्रिकी विभागामार्फत होणे आवश्यक होते. महानगरपालिकेकडे स्वतंत्र वाहनांची कार्यशाळा असूनही त्यांचा अभिप्राय सुध्दा घेण्यात आलेला नाही.

**उपरोक्त मुद्यांवर विभागाने लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र.३ प्रमाणे रक्कम रू.१०,३००/- चे शासनाचे झालेले आर्थिक नुकसान, मुद्या क्र.५ प्रमाणे रू.१,९८,१४७/-, मुद्या क्र.७ प्रमाणे ३०,०००/-, मुद्या क्र.८ प्रमाणे रू.३२,६००/- असे एकूण रक्कम रू.२,६०,७४७/- चे मनपाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करण्यात यावा. तसेच उपरोक्त अनियमततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१६ : शुभम कॉटन शिऊर बंगला वैजापुर आगीच्या प्रमाणपत्राबाबत.**

वैजापुर येथील शुभम कॉटन श्री. विजय मदनलाल अग्रवाल, शिऊर बंगला ता.वैजापुर जिल्हा औरंगाबाद गट क्रमांक ७१३/७०७ यांची सीआरओ यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जावून तपासणी केली. संचिकेत परिच्छेद क्रमांक ६,७,८,९,१०,११ मध्ये असलेल्या त्रुटी नमूद करण्यात आल्या आहे.

त्याचबरोबर परिच्छेद क्रमांक १२ अन्वये झालेल्या आगीच्या घटना त्याचा दिनांक, नुकसान याबाबत संचिकेत माहिती देण्यात आली आहे. प्रत्येक वेळी औरंगाबाद अग्निशमन विभागाने आग विझवण्यास मदत केली आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान संचिकांची तपासणी केली असता पुढील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. शुभम कॉटन वैजापुर यांनी महाराष्ट्र फायर प्रिव्हेशन ॲन्ड लाईफ सेफ्टी मेजर्स ॲक्ट २००६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३७६ (१) व डीसीआर नं.८२ नुसार अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे असे असतांना संबंधितांकडे ६ वेळा आगीची घटना घडूनही अद्यापपर्यंत ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. तर विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात आली याचा लेखी खुलासा सादर करावा.

२. दिनांक २५.११.२०१०, ९.४.२०११, ७.५.२०११ रोजी आग लागलेली आहे. देयक क्र. ११४५, दिनांक ४.३.२०१० नुसार पावती क्र.३९८९५९ दिनांक ६.१२.२०१० अन्वये रक्कम रू. ६०६५/- वसूल करण्यात आली.

**तरी, उपरोक्त मुद्यांवर विभागाने लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमितते बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१७ : अग्निशमन विभागासाठी नेमलेले सल्लागार ह्यांना मानधन देणे बाबत.**

सन २०१२-१३ या वर्षात अग्निशमन विभागासाठी नेमलेले सल्लागार यांची नियुक्ती आदेश क्र.मनपा/अशाद/२०६/२०१०,दिनांक ११.२.२०१० नुसार करण्यात आली. महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास अद्यावत करण्यासाठी निम्नलिखित मशिनरी खरेदी करणे करीता -

| | | |
|---|---|---|
| १. | रेस्क्यू व्हॅन | - १ नग |
| २. | मिनी फायर टेंडर | - १ नग |
| ३. | फायर टेंडर | - ३ नग |
| ४. | ब्रोंटो स्काय लिफ्ट | - १ नग |
| ५. | फ्लोरिंग पंप | - १० नग |

उक्त खरेदीचे कामासाठी तांत्रिक सल्लागार (कन्सलटंट) म्हणून खालीलप्रमाणे नियुक्त करणे आली.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. उदय तटकरे | - मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई मनपा. |
| २. | श्री.अनिल महाजन | - मुख्य अग्निशमन अधिकारी,नाशिक,मनपा. |
| ३. | श्री.जी.बी.सोनी | - उपअभि.(यांत्रिकी) सेवानिवृत्त मनपा औरंगाबाद. |

उक्त नियुक्त सल्लागार श्री.जी.बी.सोनी यांनी आदेशाचे तारखेपासून अंदाजपत्रक तयार करणे, निविदा मागविणे, स्कूटनी करणे, निविदा मंजूरी करीता तांत्रिक सल्ला देणे, तसेच जी कामे मंजूर झाली. त्या मशिनरीची तांत्रिक तपासणी करणे व अंतिम तपासणीकरणे इ.कामे करणे.

तांत्रिक सल्लागार म्हणून मान्यता देतांना मा.आयुक्त यांनी दिनांक २४.११.२००९ स्वाक्षरी केली, त्यातच परि.क्र.(२४) मध्ये तांत्रिक सल्लागार यांना मानधन देणे बाबत संबंधितांना विचारणा करावी. मानधाबाबत प्रथम स्पष्टता करून घ्यावी, असे स्पष्ट सूचित केलेले आहे. सदर संचिकेचे अवलोकन केले असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त केलेले श्री.जी.बी.सोनी, उपअभि.(यांत्रिक) सेवानिवृत्त - मनपा यांनी १) रेस्क्यू व्हॅन -१ नग २) मिनिफायर टेंडर - १ नग ३) फायर टेंडर - ३ नग ४) ब्रोटोस्काय लिफ्ट - १ नग, ५) फ्लोरिंग पंप- १० नग खरेदी करीता - अंदाजपत्रक तयार करणे, निविदा मागविणे, स्कूटनी करणे ,निविदा मंजूरी करीता तांत्रिक सल्ला देणे, तसेच जी कामे मंजूर झाली त्या मशिनरीची

तांत्रिक तपासणी व अंतिम तपासणी करणे इ. कामे करणे असे होते. मात्र यानुसार कोणतेही पूर्णपणे कामेपार पाडल्याचे दिसून येत नाही.

२. संबंधित तांत्रिक सल्लागार यांची नियुक्ती करणे पूर्वी, त्यांचे मानधन किती द्यावे लागेल याची विचारणा करावी. मानधनाबाबत प्रथम स्पष्टता करून घ्यावी असे मा.आयुक्त महोदय यांनी सूचित केलेले असतांनाही याबाबत विभागाने कोणताही स्पष्ट निर्णय घेतलेला नाही. १) श्री.जी.बी.सोनी, से.नि.उप-अभि.(यांत्रिकी) मनपा यांना दिनांक २९.४.२०१२ रोजी प्रथम रक्कम रूपये एक लक्ष मानधन म्हणून अदा केलेले आहे. अदा केलेल्या रकमेस आधार काय ? यासंबंधी संचिकेत सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

३. पुन्हा दिनांक १९.७.२०१२ रोजी संबंधिताने मानधनाची मागणी केल्यानुसार त्यांना दिनांक ४.२.२०१३ रोजी रक्कम रूपये एक लक्ष मानधन म्हणून अदा केले. प्रकरणी विभागाने मानधन देणेबाबत वेळीच निर्णय न घेतल्याने, मोठ्या प्रमाणात आर्थिक भूर्दंड सोसावा लागला आहे. मानधनापोटी एकूण रू.२ लक्ष रक्कम अदा करूनही श्री.जी.बी.सोनी, हे वारंवार मानधनाबाबत पत्र देवून मागणी करीत असल्याचे संचिकेवरून दिसून आले.

४. तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त करणेत आलेले १) श्री.उदय तटकरे, मुख्य अग्निशमन अधिकारी, मुंबई २) श्री. अनिल महाजन - मुख्य अग्निशमन अधिकारी , नाशिक यांना मानधनापोटी किती रक्कम अदा करणेत आली, याबाबत संचिकेत नोंद दिसून आली नाही.

5. प्रकरणी अग्निशमन विभागाकरीता लागणारी मशिनरी खरेदी करीता, तांत्रिक सल्ला / अभिप्राय इ.बाबी करीता महानगरपालिकेकडे स्वतंत्र - यांत्रिकी विभाग आहेत. त्यांचे मार्फत उक्त प्रमाणे खरेदी करणे मनपाचे आर्थिक हिताचे ठरले असते.

**तरी, उपरोक्त मुद्यांवर विभागाने लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमितते बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१८ : टोयाटो (इनोव्हा) नविन वाहन खरेदी करण्याबाबत.रक्कम रू.१५,९८,३४७/-**

भारत सरकारचा आपत्कालीन व्यवस्थापन कायदा -२००५ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने विभागाचे आपत्कालीन व्यवस्थापन केंद्र स्थापन केलेले आहे. औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी शोध बचाव कार्य पथकास आपत्कालीन सेवा बंधनकारक आहे. वेळोवेळी मदत पुरविणे, मदतकार्य व बचाव कार्य योग्य प्रकारे पार पाडता येण्यासाठी एक वाहनाची आवश्यकता आहे.

सादरीकरण करतांना महिन्द्रा ॲन्ड महिन्द्रा कंपनीची महिन्द्रा राईज एक्स.यु.व्ही - ५०० डब्ल्यू ८/व्हाईट झेड डब्ल्यू डी/एसटी/ एचटी वाहन घ्यावयाचे आहे. रत्नप्रभा मोटर्स चिकलठाणा, औरंगाबाद यांच्याकडून कोटेशन मागविण्यात आले. त्याची किंमत करसहीत

१७,२०,८३८/- दिली. मा.आयुक्त यांना फिल्डवर जाण्या/ येण्यासाठी या वाहनाची आवश्यकता आहे.

परिच्छेद क्रमांक ५ मध्ये संचिका राईज एक्स.यु.व्ही - ५०० डब्ल्यू ८/व्हाईट झेड डब्ल्यू डी/एसटी/ एचटी या वाहनाच्या मंजूरीसाठी असतांना या ऐवजी इनोव्हाचे नांव दर्शवून साशंकता निर्माण केली आहे. म्हणजे वाहन कोणते खरेदी करावयाचे आहे याबाबत बोध होत नाही.

वाहन खर्च शासनाच्या अनुदान आपत्ती व्यवस्थापन या शिर्षातून होणार आहे असे असतांना परिच्छेद क्र.१५ मध्ये वर्ष २०१३-१४ मध्ये अर्थसंकल्पिय पुस्तक पृष्ठ क्र. ई-५५ मध्ये तरतूद निरंक असून गाडी  एक्सयुव्ही -५०० येणारा खर्च रूपये १७,२०,८३०/- आहे.

परिच्छेद क्र.१६ अन्वये तरतूद निरंक असतांना मा.आयुक्त, मुख्यलेखाधिकारी यांनी दिनांक ३०.१२.२०१३ रोजी मान्यता दिली असून एक्सयुव्ही -५०० वाहन खरेदीसाठी स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवून येणा-या खर्चास मान्यता घेणेसाठी रूपये १४,७७,०३६/- चा प्रस्ताव ठेवण्यात आला. मा.स्थायी समितीने मान्यता प्रदान केलेली आहे. पुरवठा आदेश जा.क्र.मनपा/अशाद/९८९/२०१४, दिनांक २७.२.२०१४ रोजी दिला आहे.

संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मा.स्थायी समिती ठराव क्र.१८२, दिनांक २४.२.२०१४ अन्वये इनोव्हा कार रूपये १४,७७,०३६/- रकमेस मान्यता दिली असतांना परिच्छेद क्र.२० अन्वये १५,९८,३४७/- एवढा खर्च दर्शविला आहे. रक्कम रू.१,२१,३११/- जास्तीचे दर्शविण्यात आले आहे. जास्तीच्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

२. वाहनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालय रजिस्ट्रेशन फी स्थानिक संस्था कर. फी भरणा केलेली पावतीचे कागदपत्र संचिकेत नाही.

३. मुंबई मोटार वाहनकर कायदा १९५८ कलम १३ अन्वये महानगरपालिका वाहनांना प्रादेशिक परिवहन कार्यालय रजिस्ट्रेशन आणि रोड टॅक्सची १००% कर माफी असतांना रक्कम रूपये ५९०८१/- अदा करण्यात आले आहे. ही बाब आक्षेपार्ह असून रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागात अहवाल सादर करावा.

४. स्थानिक संस्था कर  रक्कम रूपये ४% प्रमाणे ५९०८१/- अदा करण्यात आली आहे. स्थानिक संस्था कर नियमानुसार १.५०% रक्कम रू.२२,१५६/- अदा करणे आवश्यक होते. रक्कम रूपये ३६९२५/- जास्तीची अदा करण्यात आली. (रहदारी फी बंद झाल्यानंतर स्थानिक संस्था कर दर १४.८.२०१४ वाढविण्यात आले.)

५. इन्शुरन्स रक्कम रूपये ५७,२३०/- देयकामध्ये दर्शविण्यात आली. परंतू रक्कम भरतांना पॉलीसी क्रमांक टीयुआयl/१११११७५९२ अन्वये रक्कम रूपये ५४३१३/- देण्यात आली. म्हणजेच रू.२९१७/- वसूलीस पात्र आहे.

६. पुरवठा आदेश व देयक व्हाऊचर मध्ये दर्शविलेली रक्कम रू.१४,७७,०३६/- चे देयक अदा केले आहे. दिनांक १४.३.२०१४ रोजी गाडी मिळाली आहे. टॅक्स इनोव्हा १४००००१२० दिनांक १४.३.२०१४ मध्ये वाहन व व्हॅट ची रक्कम १२,४३,०५४/- + १५५३८१/- एकूण रक्कम रू. १३,९८,४३५/- दर्शविलेली आहे. देयकामध्ये रक्कम रू.१४,७७,०३६/- अदा केलेली जास्तीची रक्कम रूपये ७८,६०१/- वसूल करून लेखापरीक्षण विभागात अनुपालन सादर करावे.

७. वाहनाची खरेदी करतांना यांत्रिकी विभागामार्फत खरेदी होणे आवश्यक होते. महानगरपालिकेची वाहनासाठी स्वतंत्र कार्यशाळा आहे. प्रत्येक वाहनाची खरेदी व देखभाल दुरूस्ती ही विभागामार्फत केली जाते. परंतू अग्निशमन विभागाने यांत्रिकी विभागाचा अभिप्राय घेतलेला नाही.

**करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत लेखापरीक्षण पथकास खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र. १ प्रमाणे जास्तीचा खर्च रू.१,२१,३११/-, मुद्या क्र. ३ प्रमाणे रू.५९०८१/-, मुद्या क्र.४ प्रमाणे रक्कम रू. ३६९२५/-, मुद्या क्र.५ प्रमाणे २९१७/- व मुद्या क्र.६ प्रमाणे रू. ७८६०१/- असा एकूण रू.२,९८,८३५/- खर्च संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१९ : अग्निशमन विभागात आगीचे प्रमाणपत्र वसूल रकमेबाबत.**

आगीचे प्रमाणपत्राच्या संचिका तपासण्यात आल्या यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. आगीचे प्रमाणपत्र देण्यासाठी फी वसूली करतांना नियमानुसार रक्कम वसूल केली नाही, काही प्रमाणपत्र देण्यात आले. यामध्ये कमी फी रक्कम वसूल केली त्याबाबतचा तक्ता अर्धसमास पत्र क्र.२३ सोबत देण्यात आलेला आहे. संबंधिताकडून नियमानुसार फी वसूल करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा.

२. अग्निशमन विभागाने फायर कॉल विवरण रजिस्टर मध्ये नोंद केलेली दिसून आली नाही. मात्र आगीचे प्रमाणपत्र संचिका बनवून आगीचे प्रमाणपत्र दिलेले दिसून आले आहे. याबाबत विभागाने खातरजमा करून अनुपालन अहवाल सादर करावा.

३. अग्निशमन विभागाने फायर कॉलची फी रकमेचा हिशोब तक्ता यादीनुसार उपलब्ध करून द्यावे व संबंधितांकडून फायर कॉल चार्जची किती रक्कम वसूल केली / किंवा केली नाही याबाबत खातरजमा करून अहवाल सादर करावा. दोन्ही नोंदवह्यांचा एकमेकांशी समन्वय साधावा.

४. सन २००९-१०, २०१०-२०११, २०१४-२०१५ या वर्षातील आगीचे प्रमाणपत्र वितरण केलेल्या संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेल्या

नाही. अभिलेखे लेखापरीक्षणासाठी न देणे ही बाब संशयास्पद व गंभीर स्वरूपाची आहे.

५. अग्निशमन विभागाकडून नुकसान झाल्याबाबत रिपोर्ट बनविण्यात आले आहे. त्याचा जावक क्रमांक दर्शविलेले नाही. आगीचे प्रमाणपत्राबाबतचा तक्ता अर्धसमास पत्र क्र.२३ सोबत देण्यात आलेला आहे.

**उपरोक्त मुद्यांबाबत विभागाने अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही.**

**करिता, वरील अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२० : अग्निशमन विभागातील महानगरपालिका निवासस्थानात राहणा-या अधिकारी /कर्मचा-यांकडील घरभाडे/ पाणीपट्टी वसूली बाबत.**

अग्निशमन विभागातील अधिकारी /कर्मचारी यांचेसाठी पद्मपुरा, सिडको व चिकलठाणा अग्निशमन केंद्र येथे महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम (६०) (१) अ प्रमाणे निवासस्थाने उपलब्ध करून दिलेली आहेत. अशा निवासस्थानात राहत असणा-या कर्मचा-यांची नांवे, त्यांना दिलेले निवासस्थान, निवासस्थान मिळाल्याचा दिनांक, त्यांच्या वेतनातून कपात होणारे घरभाडे/ पाणीपट्टी इत्यादी बाबतची वर्षनिहाय माहिती लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून द्यावी.

**उपरोक्त बाबत विभागाने अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही.**

**करिता, वरील अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२१ : छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था तर्फे आयुर्वेद कॉलेज व हॉस्पीटल बिल्डींग व प्रशासकीय बिल्डींग गट क्र. ४४ (पी) ४५ (पी) कंचनवाडी औरंगाबाद.**

ए टाईप बिल्डींग एकूण बांधकाम क्षेत्रफळ - ६६३२.५८ चौ.मी.
बी टाईप बिल्डींग एकूण बांधकाम क्षेत्रफळ - ९३०.९३ चौ.मी.

दोन बिल्डींगचे ७५६३.५१ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ दर्शविले आहे. त्यानुसर ए टाईप बिल्डींग बांधकाम क्षेत्रफळ ६६३२.५८X ५ = ३३१६३.०० व ना हरकत प्रमाणपत्र फिस रूपये १०,०००/- असे एकूण रूपये ४३१६३/- बी टाईप बिल्डींग एकूण बांधकाम क्षेत्रफळ ९.३०X९३ X ५ = ४६५४.६५ कमीत कमी कॅपीटेशन फिस रूपये २५०००/- व ना हरकत प्रमाणपत्र फीस १०,०००/- असे एकूण ३५०००/- असे दोन्ही ए+ बी = ७८१६३/- दर्शविले आहे.

संचिकांची तपासणी करतांना मा.मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी तपासणी म्हणून संचिकेत नोंद दर्शवून दिनांक ६.१.२०१२ रोजी तपासणी केली असून फीस घेणे आवश्यक

असे नमूद करण्यात आले व पुन्हा सादर करण्यात आले. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सादरीकरण करतांना आयुर्वेद कॉलेज व हॉस्पीटल बिल्डींग गट नं. ४२ (पी) व ४४ (पी)पत्ता कांचनवाडी यांनी फायर ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी दिनांक २७.१२.२०११ रोजी अर्ज सादर केला आहे. त्यानुसार मा.मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी आर्किटेक्ट मनिष काळे यांच्यासह दिनांक ०२.०१.२०१२ रोजी स्थळपाहणी केली असता दोन्ही मिळून एकच बिल्डींग आहे व त्याचे एकूण प्लॉट ८०७६.८४ चौ.मी.व एकूण बांधकाम क्षेत्र ६६३२.५८ व उंची ९.९० मीटर दर्शविण्यात आली आहे.

१) आयुर्वेदिक कॉलेज बिल्डींग व हॉस्पीटल बिल्डींग एकूण बांधकाम क्षेत्र = ६६३२.५८X७ = ४६४३० व ना हरकत प्रमाणपत्र रूपये १०,००० असे एकूण रूपये = ५६४३०/- जनरल पावती क्रमांक ४५८८८४ रोजी वसूल करण्यात आले ही बाब आक्षेपार्ह असून संबंधिताकडून ९१४३०/- एवढी रक्कम वसूल करणे आवश्यक होते. म्हणजेच ३५०००/- कमी वसूल करण्यात आले आहे.

२. सादरीकरणामध्ये व संचिकेत लावलेल्या नकाशाचा गट क्रमांकामध्ये ताळमेळ नाही ही बाब आक्षेपार्ह असून संबंधिताने त्यामध्ये खाडाखोड केली आहे. याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून रक्कम वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने खुलासा सादर केला असून उपरोक्त कमी वसूल रक्कम लेखापरीक्षणा दरम्यान पावती क्र.५०६५६ दिनांक १८.१२.२०१५ अन्वये रक्कम रू. ३५,०००/- मनपा फंडात जमा करण्यात आली आहे.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२२ : अग्निशमन विभाग व्यवसायाचे (फायर) ना हरकत प्रमाणपत्रा बाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये अग्निशमन विभागाचे लेखापरीक्षण कार्यरत असून , प्राप्त लेख्याचे सन २००९-१० ते सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण केले असता, शिक्षण संस्था, हायराईज बिल्डींग, शॉपिंग मॉल, गॅस एजन्सी, पेट्रोल पंप च्या उपलब्ध संचिकांची तपासणी केली असता ब-याच प्रकरणांमध्ये फायर ना हरकत प्रमाणपत्राकरीता अर्ज केलेला असल्याचे दिसून आले. मात्र अद्यापपर्यंत फायर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नसून त्यापासून फिसच्या स्वरूपात मिळणारे महानगरपालिकेचे उत्पन्न प्रलंबित आहे. काही प्रकरणात फायर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. त्यापुढील प्रत्येक वर्षी वर्षाच्या सुरूवातीस फायर ना हरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. तसे न करता नुतनीकरण केलेले नसल्याने आजपर्यंत नियमाप्रमाणे मोठ्या प्रमाणात नुतनीकरण फीस व दंडनिय रक्कम अद्यापपर्यंत थकीत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६३ (५) २८५ ते २८९ तसेच ३७६, ३७६ (१) ३७६ (ए), ३८६(१) व महानगरपालिका बांधकाम विकास नियंत्रण नियमावली क्रमांक ६:२६:१/६:५, ६:१ या नियमानुसार ना हरकत प्रमाणपत्र / फायर

लायसन्स देण्यात येते. संचिकांची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

## **१. शिक्षण संस्था :**

ना हरकत प्रमाणपत्राबाबत : शहरात अनेक शाळा, कॉलेज धोकादायक अवस्थेत आहेत. या सर्वांनी अग्निशमन विभागाच्या सुचनेनुसार आग संरक्षक यंत्रे बसविणे बंधनकारक आहे. मात्र ब-याच शाळा / कॉलेज यांनी अग्निशमन विभागाची परवानगी घेत नसल्याचे आढळून आले आहे. औरंगाबाद शहरात अद्यापपर्यंत सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीत विभागाने उपलब्ध करून दिलेल्या तक्त्याप्रमाणे शाळा/ कॉलेज यांनी खालील दर्शविलेले शाळा / कॉलेज यांनी नविन ना हरकत प्रमाणपत्रासाठी व नोंदविण्यात आलेल्या नुतनीकरणासाठी अर्ज दाखल केले असता ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे व त्यातील अद्यापपर्यंत काही बाकी आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | शिक्षण संस्था/ शाळा कॉलेज | नविन ना हरकत प्रमाणपत्र | दिलेले ना हरकत प्रमाणपत्र | बाकी | नुतनीकरण अर्ज | एकूण नुतनीकरण | बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | -- | ०८ | ०७ | ०१ | ०३ | ०२ | ०१ |
| २ | २०१०-११ | -- | १३ | ०४ | ०९ | ०३ | ०३ | -- |
| ३ | २०११-१२ | -- | ०७ | ०९ | -- | ०४ | ०३ | ०१ |
| ४ | २०१२-१३ | -- | ०६ | ०५ | ०१ | ०५ | ०५ | -- |
| ५ | २०१३-१४ | -- | १४ | १० | ०४ | ०२ | ०३ | -- |
| ६ | २०१४-१५ | -- | १४ | १४ | -- | ०४ | ०२ | ०२ |
| | | | **६२** | **४९** | **१५** | **२१** | **१८** | **०४** |

या मधील काही उपलब्ध संचिकांपैकी चाचणी स्वरूपात संचिकांची तपासणी केली असता प्रथम ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे व ना हरकत प्रमाणपत्र नियमित / नुतनीकरण केलेली नाही. उपलब्ध संचिकांमध्ये थकीत रक्कम रूपये १०,४४,३००/- एवढी आहे. इतर अनेक संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून न दिल्यामुळे हा आकडा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. (थकीत रक्कम असल्याबाबतची चाचणी स्वरूपात तपासणी केलेल्या शाळा / कॉलेज च्या रक्कम वसूली करण्यासाठी अथवा नविन ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी व नुतनीकरण करून घेण्यासाठी विभागामार्फत कोणतेही प्रयत्न / कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. याबाबत विभागा मार्फत महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकते. यापूर्वी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. विभागाने सर्व शाळांनी / कॉलेज यांनी आग संरक्षण यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. मात्र याबाबत विभागाने दक्षता घेतल्याचे दिसून येत नाही.

## २. <u>पेट्रोल पंप :</u>

औरंगाबाद शहरात / शहराबाहेर अनेक पेट्रोल पंप असून या सर्वांनी आग संरक्षण यंत्र बसविणे बंधनकारक आहे. मात्र ब-याच पेट्रोल पंप यांनी अग्निशमन दलाची परवानगी घेत नसल्याचे आढळून आले आहे. विभागाने दिलेल्या वर्षनिहाय नविन ना हरकत प्रमाणपत्र व नुतनीकरणासाठी दाखल केलेल्या अर्जाबाबतची मागील व सन २००९-१० ते सन २०१४-१५ या कालावधीत दिलेल्या परवानगीची तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | पेट्रोल पंप | नविन ना हरकत प्रमाणपत्र | दिलेले ना हरकत प्रमाणपत्र | बाकी | नुतनीकरण अर्ज | एकूण नुतनीकरण | बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | -- | ०७ | ०४ | ०३ | १० | ०५ | ०५ |
| २ | २०१०-११ | -- | ०५ | ०५ | -- | ०७ | ०७ | -- |
| ३ | २०११-१२ | -- | ०५ | ०२ | ०३ | १६ | १३ | ०३ |
| ४ | २०१२-१३ | -- | ०७ | ०८ | -- | ०८ | ०४ | ०४ |
| ५ | २०१३-१४ | -- | ०५ | ०८ | -- | ०७ | ०६ | ०१ |
| ६ | २०१४-१५ | -- | ०४ | ०३ | ०१ | ०८ | ०९ | -- |
| | | | **३३** | **३०** | **०७** | **५६** | **४४** | **१३** |

अद्यापपर्यंत दिलेल्या नविन ना हरकत प्रमाणपत्र व नुतनीकरणाबाबतचे विवरण यामध्ये दर्शविले आहे. पेट्रोलपंपा बाबतचे नविन व नुतनीकरणासाठी आलेल्या अर्जानुसार ना हरकत प्रमाणपत्र देतांना मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ३८६ (२) मधील तरतूदी व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६, कलम ११ नुसार अग्निशमन सेवेची फी आकारणी व दरवाढ करण्यासाठी ठराव क्र. २९८दिनांक २३.३.२०११ व मा.स्थायी समिती ठराव क्र.२१२, दिनांक १७.३.२०११ नुसार फी आकारणी व दरवाढ करण्यात मंजूरी देण्यात आली. त्यानुसार तपशिल मधील अ.क्र.१९ नुसार प्रत्यंक प्रमाणपत्राचे नुतनीकरण प्रतिवर्षी करणे बंधनकारक आहे असे असतांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३७६ (१) नुसार ५००/- व प्रति दिवसासाठी ५०/- दंड आकारण्यात यावा असे असतांना नियमांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.

या मधील विभागाने उपलब्ध करून दिलेल्या संचिकांची चाचणी स्वरूपात तपासणी केली असता फायर ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण फिस दंडनिय रक्कम रू. २०,५६,२५०/- एवढी आहे. याबाबतचा तक्ता सोबत जोडला आहे.

विभागाने ना हरकत प्रमाणपत्राबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. यामधून महानगरपालिकेस लाखे रूपयाचा महसूल प्राप्त होवू शकतो व शहराचा विकासात भर पडू शकते.

## ३. <u>हायराईज बिल्डींग</u> :

औरंगाबाद शहरात अनेक इमारती आहेत. यातील काही इमारती १५/२४ मि.उंचीचा असून या इमारतींना अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र / नुतनीकरण बाबतच्या माहिती तक्त्यानुसार

सन २००९-१० ते सन २०१४-१५ पर्यंत नाममात्र हायराईज बिल्डींगला ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे दर्शविले आहे.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | हायराईजा बिल्डींग | नविन ना हरकत प्रमाणपत्र | दिलेले ना हरकत प्रमाणपत्रा | बाकी | नुतनीकरण अर्ज | एकूण नुतनीकरण | बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | -- | २३ | १२ | ११ | ०३ | ०१ | ०२ |
| २ | २०१०-११ | -- | ४९ | ५१ | -- | -- | -- | -- |
| ३ | २०११-१२ | -- | १०९ | ७६ | ३३ | ०१ | ०१ | -- |
| ४ | २०१२-१३ | -- | ५४ | ४६ | ०८ | -- | -- | -- |
| ५ | २०१३-१४ | -- | ९० | १२४ | -- | -- | -- | -- |
| ६ | २०१४-१५ | -- | ३८ | ४८ | -- | ०२ | ०२ | -- |
| | | | **३६३** | **३५७** | **५२** | **०६** | **०४** | **०२** |

त्याचे वर्षनिहाय विवरण दर्शविण्यात आले आहे. हायराईज बिल्डींगच्या विभागाने उपलब्ध करून दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र/ नुतनीकरण संचिकांची चाचणी स्वरूपात तपासणी केली असता नुतनीकरण फीस थकीत व दंडनीय रक्कम रू. ६,१७,५००/- इतकी आहे. ती अद्याप वसूल केलेली नाही. नगररचना विभागाने बांधकाम परवानगी देतांना अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. नगररचना विभागाकडे किती हायराईज बिल्डींग शहरात आहे या बाबतची माहिती लेखापरीक्षण कामी मागविली. जा.क्र./मनपा/मुलेप/१५५, दिनांक १४.९.२०१५ रोजी पत्र दिले असता अद्यापही नगररचना उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे किती हायराईज बिल्डींग आहे याची खात्री करता आलेली नाही. अग्निशमन विभागाने याबाबतची माहिति घेवून कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतू तसे केल्याचे दिसून येत नाही.

**४. <u>शॉपींग मॉल :</u>**

शहरात महानगरपालिकेच्या हद्दीत शॉपींग मॉल आहे. या सर्वांनी अग्निशमन विभागाच्या सूचनेनुसार आग संरक्षक यंत्रे बसविणे बंधनकारक आहे. मात्र काही शॉपींग मॉल अग्निशमन परवानगी घेत नसल्याचे आढळून आले आहे. औरंगाबाद शहरामधील सन २००९-१० ते सन २०१४-१५ विभागाने दिलेल्या तपशिला प्रमाणे खालील दर्शविलेल्या शॉपींग मॉल यांनी नविन ना हरकत प्रमाणपत्रासाठी व नुतनीकरणासाठी अर्ज दाखल केले असता ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे व त्यातील काही बाकी असल्याचे दिसून येते.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | शॉपींग मॉल | नविन ना हरकत प्रमाणपत्र | दिलेले ना हरकत प्रमाणपत्रा | बाकी | नुतनीकरण अर्ज | एकूण नुतनीकरण | बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | **--** | **--** | ०१ | -- | ०२ | ०१ | ०१ |
| २ | २०१०-११ | **--** | ०३ | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०१ |
| ३ | २०११-१२ | **--** | ०६ | ०३ | ०३ | -- | ०१ | -- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २०१२-१३ | -- | ०१ | ०१ | -- | ०१ | ---- | ०१ |
| ५ | २०१३-१४ | -- | -- | -- | -- | ०१ | ०२ | --- |
| ६ | २०१४-१५ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | | | **१०** | **०५** | **०५** | **०६** | **०५** | **०३** |

या मधील विभागाने उपलब्ध करून दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्र / नुतनीकरण संचिका पाहिल्या असता थकीत रक्कम / दंडात्मक रक्कम पैकी २,१३,७५०/- रूपये थकीत आहे. ना हरकत प्रमाणपत्राबाबत विभागाने वर्षनिहाय अग्निशमन नियमानुसार नोटीस देवून ना हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. मात्र तसे केल्याचे दिसून येत नाही. यामुळे महानगरपालिकेची रक्कम मोठ्या प्रमाणात थकीत आहे.

**५. <u>हॉटेल ना हरकत प्रमाणपत्राबाबत :</u>**

शहरात अनेक हॉटेल आहे. यांनी अग्निशमन विभागाचे सूचनेनुसार आग संरक्षक यंत्रे बसविणे बंधनकारक आहे. मात्र अनेक व्यावसायिक अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता, आग संरक्षक यंत्रे न बसविता राजरोसपणे व्यवसाय करीत आहेत.

विभागाने उपलब्ध करून दिलेल्या संचिकांपैकी काही संचिकांची चाचणी स्वरूपात पाहणी केली असता ना हरकत प्रमाणपत्र / नुतनीकरण विलंबाने केले असता दंडात्मक रक्कम नियमाप्रमाणे न घेता नियमबाह्य वसूल केले आहे. तसेच मागील व सन २००९-२०१० ते सन २०१४-१५ पर्यंत नविन ना हरकत प्रमाणपत्र व नुतनीकरण करण्यासाठी प्राप्त अर्जाबाबतचे विभागाने दिलेल्या तक्त्यानुसार पाहिले असता नाममात्र ना हरकत प्रमाणपत्र दिल्याचे नोंद झाल्याची दिसून येते. त्याचा सविस्तर तक्ता खालील प्रमाणे).

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | हॉटेल / लॉजिंग/बोर्डींग/ बार/ रेस्टॉरंट | नविन ना हरकत प्रमाणपत्र | दिलेले ना हरकत प्रमाणपत्र | बाकी | नुतनीकरण अर्ज | एकूण नुतनीकरण | बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | -- | ४५ | २९ | १६ | ११४ | १०२ | १२ |
| २ | २०१०-११ | -- | ३६ | २२ | १४ | १०६ | ९० | १६ |
| ३ | २०११-१२ | -- | ३२ | २० | १२ | १११ | ९२ | २९ |
| ४ | २०१२-१३ | -- | ३८ | ३६ | १२ | १५१ | १३९ | १५ |
| ५ | २०१३-१४ | -- | ३८ | --५५ | --१० | ११५ | १११ | --०९ |
| ६ | २०१४-१५ | -- | ५२ | २९ | २३ | १२८ | १२५ | ०८ |
| | | -- | **२६१** | **१९१** | **८७** | **७२५** | **६५९** | **८९** |

साधारणत: शहरात आजघडीला ५०० हून अधिक बिअर बार व पाच हजाराहून जास्त रेस्टॉरेन्ट आहेत. त्यापैकी नाममात्र व्यवसायधारकांनी अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याच्या नोंदी आहेत.

नविन कायद्याने अग्निशमन विभागास अधिकार प्रदान केले असतांनाही त्यानुसार अपेक्षित कार्यवाही होणे आवश्यक होते. मात्र तसे काहीच झालेले दिसत नाही.

विभागाने ना हरकत प्रमाणपत्र / नुतनीकरणाबाबत कोणतीही कार्यवाही अथवा नविन नोंद घेतल्याबाबत प्रयत्न केल्याचे दिसत नाही. वर्षनिहाय संचिका असणे आवश्यक असतांना वर्षनिहाय संचिका उपलब्ध करून दिलेल्या नाही.

अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र / नुतनीकरणाबाबत विभागाने वर्षनिहाय डिमांड रजिस्टर ठेवणे आवश्यक होते. परंतू विभागाने यापूर्वीचही सूचना देवून डिमांड रजिस्टर ठेवलेले नाहीत.

## ६. मंगल कार्यालय ना हरकत प्रमाणपत्राबाबत :

शहरामध्ये विविध ठिकाणी मंगल कार्यालय असून मंगल कार्यालयास अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र (ना हरकत प्रमाणपत्र) घेणे आवश्यक असतांना मंगल कार्यालयांनी ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याचे दिसत नाही.

विभागाने दिलेल्या संचिका चाचणी स्वरूपात पाहणी केली असता ना हरकत प्रमाणपत्रासाठी काही मंगलकार्यालयाने अर्ज केले आहे व त्यातील काही मंगल कार्यालयाने प्रथम वर्ष ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे. काहींची ना हरकत प्रमाणपत्र दिलेली नाही, अशा कार्यालयाची आजपर्यंतची थकीत रक्कम ६,०१,७५०/- एवढी आहे. वसूली बाबत कार्यवाही झालेली नाही.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | मंगल कार्यालय | नविन ना हरकत प्रमाणपत्र | दिलेली ना हरकत प्रमाणपत्र | बाकी | नुतनीकरण अर्ज | एकूण नुतनीकरण | बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २ | २०१०-११ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | २०११-१२ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | २०१२-१३ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | २०१३-१४ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ६ | २०१४-१५ | -- | **०१** | -- | **०१** | -- | -- | -- |
| | | | **०१** | -- | **०१** | | | |

शहरामधील मंगल कार्यालयांची तपासणी करणे गरजेचे आहे. अद्यापपर्यंत ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्यामुळे एखाद्या वेळेस मोठी जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विभागाने उपलब्ध करून दिलेल्या यादीनुसार उक्त दर्शविलेल्या वर्षात नविन ना हरकत प्रमाणपत्रासाठी १ अर्ज असल्याची नोंद आहêü.

विभागाने शहरातील प्रत्येक मंगल कार्यालयाची नोंद घेणे आवश्यक आहे. मात्र तसे झाल्याचे दिसत नाही. यामुळे महानगरपालिकेचे महसूली उत्पन्न बुडाले आहे.

## ७. एल.पी.जी. गॅस एजन्सी ना हरकत प्रमाणपत्राबाबत :

शहरामध्ये विविध ठिकाणी गॅस एजन्सी असून प्रत्येक गॅस एजन्सीला अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. मात्र काही एजन्सीने प्रथम वर्ष ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण केलेले आहे. त्यानंतर नुतनीकरण केलेले नाही. म्हणून विलंब कालावधी दंडाची रक्कम विभागाने वसूल केलेली नाही. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या संचिकांपैकी काही संचिकांची चाचणी स्वरूपात पाहणी केली असता विभागाने नुतनीकरण फीस / दंडाची रक्कम असे दोन्ही मिळून रक्कम रूपये १,१२,५००/- वसूल केलेले नाही. त्याबाबतचा तक्ता यापूर्वीच अर्धसमास पत्र क्र.४५ सोबत देण्यात आलेला आहे.

शहरात अशा किती गॅस एजन्सी आहे. याबाबतची माहिती मिळाली नाही. शहरात एजन्सीबाबत पूर्ण नोंद झालेली नाही. विभागाने दिलेल्या तपशिलानुसार नविन ना हरकत प्रमाणपत्रासाठी १ अर्ज, नुतनीकरणासाठी ०७ असे एकूण ०८ ची एजन्सीची नोंद असल्याचे विवरणावरून दिसून येते.

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | गॅस एजन्सी | नविन ना हरकत प्रमाणपत्र | दिलेली ना हरकत प्रमाणपत्र | बाकी | नुतनीकरण अर्ज | एकूण नुतनीकरण | बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००९-१० | -- | -- | | -- | | | -- |
| २ | २०१०-११ | -- | -- | | -- | | | -- |
| ३ | २०११-१२ | -- | -- | | -- | ०३ | ०३ | -- |
| ४ | २०१२-१३ | -- | -- | | -- | ०१ | ०१ | -- |
| ५ | २०१३-१४ | -- | ०१ | ०१ | --- | ०१ | ०१ | --- |
| ६ | २०१४-१५ | -- | -- | -- | -- | ०२ | ०२ | -- |
| | | **एकूण** | **०१** | **०१** | **--** | **०७** | **०७** | **--** |

विभागाने ना हरकत प्रमाणपत्राबाबत प्रत्यक्ष काहीच कार्यवाही केलेली दिसत नाही. याबाबत प्रशासनाने दखल घेवून कार्यवाही केल्यास महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात महसूल मिळू शकतो.

८. **<u>दवाखाने ना हरकत प्रमाणपत्राबाबत</u>** :

शहरामध्ये विविध ठिकाणी दवाखाने असून प्रत्येक दवाखान्याला अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. मात्र काही दवाखाने प्रथम वर्ष ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण केलेले आहे. त्यानंतर नुतनीकरण केलेले नाही म्हणून विलंब कालावधी दंडाची रक्कम विभागाने वसूल केली नाही. विभागाने उपलब्ध करून दिलेल्या संचिकांपैकी काही संचिकांची चाचणी स्वरूपात पाहणी केली असता विभागाने नुतनीकरण फीस / दंडाची रक्कम असे मिळून रक्कम रूपये ५,११,१२५/- वसूल केलेले नाही. त्याबाबतचा तक्ता अर्धसमास पत्र क्र. ४५ सोबत जोडला आहे.

९. **<u>उद्योजक / व्यावसायिक यांचे फायर ना हरकत प्रमाणपत्राच्या संचिका लेखापरीक्षणास्तव उपलब्ध न झाल्याबाबत.</u>**

अग्निशमन विभाग कार्यक्षेत्राअंतर्गत येणारे व्यावसायिक जसे , साखर कारखाने / कारखाने, सिनेमा हॉल, खदान स्फोटके, अल्कोहोल साठा, मोबाईल, टॉवर्स, रॉकेल साठा, स्पिरीट व ऑईल साठा, कमर्शियल बिल्डींग, बँक , व्हिडीओ सेंटर, आनंद नगरी, सर्कस, फटाका शॉप, पेंट शॉप, मिनी ट्रेन, गोडावून, नाट्यगृह, इंटरनेट कॅफे, रास दांडिया, प्रदर्शन, इ. शहरामध्ये / शहराबाहेर आहेत, अग्निशमन विभागाचे सूचनेनुसार फायर ना हरकत प्रमाणपत्र घेणे व दरवर्षी फायर ना हरकत प्रमाणपत्र नुतनीकरण करणे कायद्याने बंधनकारक आहे. अशी प्रकरणे लेखापरीक्षण कामी वेळोवेळी मागणी करून विभागाने उपलब्ध करून दिलेली नाहीत. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांनी फायर ना हरकत प्रमाणपत्र घेतलेली आहे काय ? घेतली असल्यास नियमित नुतनीकरण केलेले आहे काय ? याचे लेखापरीक्षण करता आले नाही. अभिलेखे दडविल्याने साशंकता निर्माण होते.

**विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष शहानिशा / खातरजमा करून लेखापरीक्षण पथकास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**सदरील मुद्या क्र.१ ते ९ प्रमाणे आस्थापनांकडून येणारी रक्कम वसूल करण्यात आली असती तर मनपास कोट्यावधी रूपयांचा महसूल प्राप्त झाला असता. परंतू विभागाने कार्यवाही न केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच ज्या आस्थापना आग प्रतिबंध यंत्रे त्यांच्या इमारतीत बसवित नाहीत अशा विरूध्द विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे, त्यानुसार कार्यवाही व्हावी आणि तसा अनुपालन अहवाल सादर करावा.**

**तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२३ : अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.**

विभागातील कर्मचा-यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

**१. श्री.राजु काशिनाथ सुरे - प्र.अग्निशमक.**

१. पोलिस चारित्र्य पडताळणी अहवालाची सेवापुस्तकामध्ये नोंद नाही. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याचे आदेश नोंद सेवापुस्तकामध्ये नाही.

२. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२००६/१५८६, दिनांक १६.९.२००६ ची नोंद सेवापुस्तकामध्ये नाही.

३. आदेश क्र./मनपा/आस्था-१/३७३५/१९९५ दिनांक १५.१२.१९९५ अन्वये अग्निशमक पदास दिनांक ९.६.१९९४ पासून ८२५-१२०० ऐवजी सुधारित वेतनश्रेणी ९५०-१५०० ही लागू झाली.

४. संबंधिताची प्रथम नियुक्ती दिनांक २५.७.१९९० अशी असल्याने नियमित वार्षिक वेतनवाढ दिनांक १.७. अशी राहील. सुधारित वेतनश्रेणी ९५०-१५०० दिनांक ९.६.१९९४ पासून लागू आहे. मात्र सेवापुस्तकामध्ये दिनांक २९.६.१९९३ पासूनच ९५०-१५०० वेतनश्रेणी लागू करून तशी सेवापटामध्ये नोंद आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

५. दिनांक १.७.२००६ रोजीची वार्षिक वेतनवाढ ३८०/- अशी आहे. सदरची वेतनवाढ रू.३७०/- इतकी येते, त्यापुढील सर्व नोंदी दुरूस्ती / पूर्तता करून अतिरिक्त झालेले वेतन वसूल करून तशी सेवापुस्तकामध्ये नोंद घ्यावी.

**२. श्री.अशोक नरसू खांडेकर - प्र.अग्निशमक.**

१. प्रथम नियुक्ती दिनांक २.४.१९९४.
२. पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.
३. संबंधितास ८२५-१२०० वेतनश्रेणी ऐवजी सुधारित वेतनश्रेणी दिनांक ९.६.१९९४ पासून ९५०-१५०० लागू झाली, त्या नुसार दिनांक ९.६.१९९४ रोजी ९५० वेतन व पुढील वार्षिक देय वेतनवाढ दिनांक १.६.१९९५ रोजी रू.९७०/- येणे प्रमाणे पुढील सर्व वेतन नोंदी दुरूस्त / पूर्तता इ.कार्यवाही करण्यात यावी.

**३. श्री.एच.बी.पवार - अग्निशमक**

१. प्रथम नियुक्ती दिनांक २.४.१९९४.
२. पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.
३. संबंधितास ८२५-१२०० वेतनश्रेणी ऐवजी सुधारित वेतनश्रेणी दिनांक ९.६.१९९४ पासून ९५०-१५०० लागू झाली, त्या नुसार दिनांक ९.६.१९९४ रोजी ९५० वेतन व पुढील वार्षिक देय वेतनवाढ दिनांक १.६.१९९५ रोजी रू.९७०/- येणे प्रमाणे पुढील सर्व वेतन नोंदी दुरूस्त / पूर्तता इ.कार्यवाही करण्यात यावी.

**४. श्री.एस.एस.शकिल - अग्निशमक**

१. प्रथम नियुक्ती लातुर - नगरपरिषद येथे टेलिफोन ऑपरेटर दिनांक ३०.८.१९८२ .

२. महानगरपालिका औरंगाबाद कडे वर्ग- आदेश क्र.मनपा/आस्था-१/७२९८/९०, दिनांक २३.७.१९९० अन्वये.

३. औरंगाबाद महानगरपालिकेत अग्निशमन विभागामध्ये दिनांक ५.१.१९९१ रोजी रूजू झालेले आहे. प्रथम नियुक्ती - टेलिफोन ऑपरेटर ते मनपा औरंगाबाद येथे अग्निशमक म्हणून दिनांक ५.१.१९९१ पर्यंतचे पेन्शन कॉन्ट्रीब्युशन व रजा कॉन्ट्रीब्युशन निश्चित करून मनपा फंडात जमा केलेले दिसून येत नाही. तात्काळ जमा करण्यात यावे व तशी सेवापुस्तकामध्ये नोंद घेण्यात यावी.

४. आदेश क्र.मनपा/आस्था-I/ ७२९८/९० दिनांक २३.७.१९९० अन्वये, संबंधितास मनपा औरंगाबाद अग्निशमन विभागात अग्निशमक पदावर नियुक्ती करतांना अटी /शर्तीवर नियुक्ती आहे. त्यामध्ये नमूद अट क्र.(२) मध्ये स्पष्ट नमूद आहे की, मनपा सेवेत समाविष्ट झाल्यानंतर त्यांना अग्निशमक पदाच्या मूळ वेतन (८२५-१२००) व (सुधारित वेतन श्रेणी ९५०-१५००) श्रेणीवर (इनिशियल पे) वर पगार मिळेल व पे - प्रोटेक्टरची सवलत मिळणार नाही. मात्र आदेश क्र./मनपा/ आस्था-I/४४४४/९१, दिनांक १.१.१९९४ अन्वये पे - प्रोटेक्शन दिलेले दिसते, सदरचे आदेशास सक्षम अधिकारी यांची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. प्रकरण विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी कार्यवाही / पूर्तता करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**५. श्री.सुभाष कदम - अग्निशमक,**

१. प्रथम नियुक्ती दिनांक २.४.१९९४.
२. पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी.
३. संबंधितास ८२५-१२०० वेतनश्रेणी ऐवजी सुधारित वेतनश्रेणी दिनांक ९.६.१९९४ पासून ९५०-१५०० लागू झाली, त्या नुसार दिनांक ९.६.१९९४ रोजी ९५० वेतन व पुढील वार्षिक देय वेतनवाढ दिनांक १.६.१९९५ रोजी रू.९७०/- येणे प्रमाणे पुढील सर्व वेतन नोंदी दुरूस्त / पूर्तता इ.कार्यवाही करण्यात यावी.

अशी सर्व प्रकरणे विभागाने तपासून पूर्तता करावी. तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**६. श्री.बाकडे वैभव विजयराव - अग्निशमक,**
सेवापुस्तक तपासले - नोंद बरोबर असल्याचे दिसून आले.

**७. श्री.होळंबे श्रीकृष्ण भानुदास, अग्निशमक,**

सेवापुस्तक तपासले - नोंद बरोबर असल्याचे दिसून आले.

८. **श्री.सोमीनाथ एकनाथ भोसले,-अग्निशमक,** यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता .

१. संबंधित कर्मचारी यांना भिवंडी - निजामपुर महानगरपालिका, यांचेकडून महानगरपालिका,औरंगाबाद कडे दिनांक १९.२.२०११ रोजी मनपा अग्निशमन विभाग येथे रूजू करून घेतलेले आहे.
महानगरपालिका औरंगाबाद कार्यालय आस्थापना वर जागेची उपलब्धी, संवर्ग व सेवेची आवश्यकता असल्यास सेवेत सामावून घेणे करीता तसा ठराव मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे गरजेचे ठरते. तशी मान्यता घेतल्याचे संचिकेत आढळून येत नाही.

२. प्रकरणी प्रथम नियुक्ती दिनांक ३.४.२००७ ते (औरंगाबाद मनपा येथे रूजू) दिनांक १८.२.२०११ पर्यंत ६ व्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती भिवंडी - निजामपुर

महानगरपालिका भिवंडी यांचे मार्फत केलेली दिसून येत नाही. तसेच रजा अंशदान व निवृत्ती वेतन अंशदान योजना (नविन अंशदान) जमा केलेली नोंद ही सेवापुस्तकामध्ये आढळून आली नाही.

वरील प्रमाणे प्रकरण, विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही / पूर्तता करून तसा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

९. **श्री.झाडे मिनिनाथ कचरू - वाहनचालक,**
मूळ सेवापुस्तकाचे वेतन नोंदी तपासले असता त्या बरोबर असल्याचे दिसून आल्या.

१०. **श्री.सय्यद हमीदुल्ला स.अब्दुल्ला - ड्रायव्हर ऑपरेटर** या पदावर कार्यरत कर्मचारी यांचे मूळ सेवापुस्तक व वैयक्तिक संचिकांची तपासणी केली असता --

१. संबंधितास आदेश क्र.मनपा/आस्था-I/ १९९९/२०५४, दिनांक १५.५.१९९९ अन्वये (१२ वर्षाची समय श्रेणी ऐवजी) दिनांक ९.६.१९९४ पासून ७ वर्षानंतर देय वेतनश्रेणी १४००-२३०० लागू केलेली आहे. पुन्हा सुधारित कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-I/२०१४/९०२, दिनांक १८.७.२०१४ अन्वये संबंधितास ड्रायव्हर ऑपरेटर या पदावर कार्यरत कर्मचा-यांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत १२ वर्षानंतर देय असलेली सुधारित वेतन श्रेणी दिनांक ०२.७.१९९६ पासून (५५००-९००० पाचव्या वेतन आयोगानुसार ) व वेतन बॅन्ड ९३००-३४८०० + ग्रेड पे ४३०० (६ व्या वेतन आयोगानुसार) प्रदान केलेली दिसून येते. उक्त प्रमाणे वेतनश्रेणी लागू करणे बाबत शासन निर्णय / वेतन नियम / शासनाचे परिपत्रक / आयोगामध्ये सूचित केलेले दिसून येत नाही.
तथापि प्रकरण विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, याबाबतचे अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे.

११. **श्री.शिवाजी विठ्ठल देवकाते - शिपाई**

१. मूळ सेवा पटाचे प्रथम पृष्ठावरील नोंदी सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

२. संबंधितास दिनांक १.७.२००८ रोजीचे वार्षिक वेतनवाढ रू.२६०/- प्रदान केलेली होती. दुरूस्ती नंतर रू.२५०/- इतकी सुधारित करून तशी सेवापटामध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. मात्र दरम्यानचे कालावधीत अतिप्रदान झालेले वेतन वसूल केल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये दिसून येत नाही.

३. संबंधित कर्मचारी दिनांक १.७.२०१० पासून वेतन ७५४० इतके म्हणजे बॅण्ड (४४४०- ७४४० चे कमाल टप्प्यावर वेतन घेत असल्याने (शासन निर्णय दिनांक ५ मे २०१० नुसार) असलेले वेतनावरच वेतनवाढ अधिक करून (दिनांक १.७.२०११ रोजीचे वेतन ७५४०+२८०= ७८२० + ग्रेड पे - १६००) त्यापुढील सर्व नोंदी सुधारित करणेत याव्यात, तसा लेखी अहवाल लेखा परीक्षण विभागास सादर करावा.

१२. **श्री.गोरखनाथ वामन नागरगोजे - सुरक्षा रक्षक,**

संबंधिताचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता -

आदेश क्र.मनपा/आस्था-२/२००९/९७, दिनांक २२.०१.२००९ अन्वये दिनांक ४.१२.२००८ पासून सुरक्षा रक्षक यांना २७५०-४४०० वेतनश्रेणी ऐवजी सुधारित वेतनश्रेणी ३०५०-४५९० लागू केलेली आहे. त्यामुळे संबंधितास सहाव्या वेतन आयोगानुसार दिनांक ४.१२.२००८ रोजी वेतन वाढ देय ठरत नाही. मात्र विभागाने संबंधितास दिनांक ४.१२.२००८ रोजी वेतनवाढ प्रदान केल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये दिसून येते. प्रकरण विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी,

**उपरोक्त मुद्या क्र. १ ते १२ तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा. तसेच विभागाअंतर्गत सर्व सेवापुस्तक / सेवापट आपल्या स्तरावर तपासून योग्य ती कार्यवाही करावी असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही.**

**कर्मचा-यांना अती प्रदान केलेल्या रकमा वसूली कराव्यात तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२४ : कामाच्या वेळापेक्षा जादा कामाचा मोबदला देण्याबाबत.**

अग्निशमन विभागांतर्गत वर्ग -३ व वर्ग-४ संवर्गातील एकूण -५५ कर्मचारी कार्यरत असल्याचे विभागाने उपलब्ध करून दिलेल्या तक्त्यावरून दिसून आले. तसेच विभागाने उपलब्ध करून दिलेले कर्मचा-यांचे दैनंदिन कामाचे विवरणावरून काही अग्निशमक पदाचे कर्मचारी हे आपल्या पदाचे काम न करता अग्निशमन कार्यालयात फायर ना हरकत प्रमाणपत्र व कार्यालयाचे काम करीत असल्याचे दिसून आले.

वरील प्रमाणे कार्यरत कर्मचारी हे कार्यालयीन वेळेपेक्षा अतिरिक्त वेळ / तास काम करीत असल्याने, वेळोवेळी पारीत झालेले आदेशान्वये विहीत ९ तासांच्या कामाच्या वेळेपेक्षा जास्त काम केल्याने अतिकालीक भत्ता लागू करून प्रदान केलेला असल्याचे, कर्मचा-यांच्या पुरवणी देयकांवरून दिसून आले. विभागाने उपलब्ध करून दिलेले कर्मचा-यांचे दैनंदिन कामाचा तपशिल (कामानुसार)

१. श्री. सुभाष दगडू कदम
२. श्री.अनिल तुकाराम नागरे
३. श्री.मोहन बाबासाहेब नरके

यांनी कार्यालयीन काम करणे (फायर ना हरकत प्रमाणपत्र) प्रकरणे सादर करून ना हरकत प्रमाणपत्र देणे असे दर्शविलेले आहे. संबंधित कर्मचा-यांनी कार्यालयीन वेळेपेक्षा जास्तीचे काम केल्याचे स्पष्ट होत नाही. तथापि विभागाने ठेवलेले दैनंदिनी रजिस्टर सोबत जास्तीचे काम केल्याचे हजेरी / पुरवणी देयक एकत्रित तपासले असता, प्रत्यक्षात येण्याची वेळ व जाण्याची वेळ नियमित कार्यालयीन वेळेपेक्षा जास्तीचे तास काम केल्याचे दिसून येत नाही. (सन २०१२-१३ व सन २०१४-१५) या आर्थिक वर्षाचे माहे ऑक्टोबर -२०१२ व माहे एप्रिल २०१४ या महिन्याचे दैनंदिन रजिस्टरची चाचणी स्वरूपात तपासणी केली. येण्याची

वेळ व जाण्याची वेळ दर्शविलेली नोंदीबाबतचा तक्ता अर्धसमास पत्र क्र. ४० सोबत देण्यात आलेला आहे.

१. अतिरिक्त काम केल्याचे वेळ - रविवार व इतर सार्वजनिक सुट्टयांच्या दिवशी जास्तीचे काम केलेले दर्शविलेले आहे.

२. कर्मचारी कार्यालयात येण्याची वेळ दर्शविली आहे, मात्र जाण्याची वेळेची नोंद दर्शविलेली नाही.

३. कर्मचारी कार्यालयाचे वेळेच्या वेळेनंतर उशिराने कार्यालयात आल्याची नोंद दैनंदिनी रजिस्टर मध्ये आहे. त्या दिवशी पण अतिरिक्त काम केल्याचे दर्शवून मोबदला / भत्ता प्रदान केलेला आहे.

1. श्री.सुभाष डी.कदम - अग्निशमक यांना अतिरिक्त तास काम केल्याचा भत्ता खालील प्रमाणे देण्यात आला.

| अ.क्र. | सन | अदा केलेला भत्ता |
|---|---|---|
| १ | २००९-२०१० | ८७६८=०० |
| २ | २०१०-२०११ | ७५२०=०० |
| ३ | २०११-२०१२ | २३,८८८=०० |
| ४ | २०१२-२०१३ | ४८,३२०=०० |
| ५ | २०१३-२०१४ | ४४,४८०=०० |
| ६ | २०१४-२०१५ | ४०,४८०=०० |
| | **एकूण** | **१,७३,४५६/-** |

२. श्री.मोहन बाबासाहेब नरके, अग्निशमक

| अ.क्र. | सन | अदा केलेला भत्ता |
|---|---|---|
| १ | २०१०-२०११ | १०,२७२=०० |
| २ | २०११-२०१२ | २५,५०४=०० |
| ३ | २०१२-२०१३ | ४९,२८०=०० |
| ४ | २०१३-२०१४ | ४४,७६०=०० |
| ५ | २०१४-२०१५ | ४४,४८०=०० |
| | **एकूण** | **१,७४,२९६=००** |

३. श्री.अनिल तुकाराम नागरे - अग्निशमक,

| अ.क्र. | सन | अदा केलेला भत्ता |
|---|---|---|
| १ | २०१०-२०११ | १०,०८०=०० |
| २ | २०११-२०१२ | २२,४२८=०० |
| ३ | २०१२-२०१३ | ४६,४००=०० |
| ४ | २०१३-२०१४ | ४३,६८०=०० |
| ५ | २०१४-२०१५ | ३९,५२०=०० |
| | **एकूण** | **१,६२,१०८=००** |

उक्त प्रमाणे अतिप्रदान झालेले वेतन वसूलपात्र आहे. अतिरिक्त तास काम केल्याचा भत्ता प्रदान केल्याचे विभागाने पारीत केलेले अतिरिक्त कामाचे देयकाचे नोंदी वरून सादर केलेले आहे. सदरचे पुरवणी देयक व अतिरिक्त तास काम केल्याचे हजेरी दर्शविणारे हजेरी पत्रकाचे अवलोकन केले असता नियंत्रण कक्ष अधिकारी, यांनी बरोबर असल्याचा शेरा नोंदवून स्वाक्षरी करून प्रमाणीत केलेले आहे. मात्र प्रकरण प्रत्यक्षात न तपासताच प्रमाणित केल्याचे दिसते.

सन २००९-१० ते सन २०१४-१५ पर्यंत इतर कर्मचारी यांनीपण प्रत्यक्षात विहित वेळेपेक्षा जास्तीचे तास काम केलेले आहे किंवा नाही याची खात्री दैनंदिन रजिस्टर व अतिरिक्त तास केल्याचे हजेरीपत्र सोबत तपासून अतिरिक्त कामाचा भत्ता घेणारे सर्व कर्मचा-यांचे दैनंदिन येणा-या व जाणा-या रजिस्टर व जास्तीचे तास दर्शविणारे हजेरीपत्रकासोबत / एकत्रित तपासून विभागाने खात्री करावी, व तसा लेखापरीक्षण अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

तरी मुद्या क्र.१ प्रमाणे रक्कम रू. १,७३,४५६/-, मुद्या क्र. २ प्रमाणे १,७४,२९६/- व मुद्या क्र.३ प्रमाणे १,६२,१०८/- अशी एकूण रक्कम रू. ५,०९,८६०/- संबंधितांकडून वसूल करून, अतिप्रदान झालेल्या रकमेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२५ : एमएच-२०/ बीबी -३३३३ (सफारी पेट्रोल ) वाहना बाबत.**

| अ.क्र. | माहे / सन | कि.मी. | कमी / जास्त कि.मी. |
|---|---|---|---|
| | | **सन २००९-२०१०** | |
| १ | ऑक्टोबर -२००९ | ३० कि.मी. | ३० कि.मी.जास्त |
| २ | नोव्हेंबर -२००९ | ९५ कि.मी. | ९५ कि.मी.जास्त |
| ३ | डिसेंबर -२००९ | ३० कि.मी. | ३० कि.मी.जास्त |
| ४ | जोनवारी -२०१० | २३३ कि.मी. | २३३ कि.मी. जास्त |
| | | **३८८ कि.मी.** | **३८८ जास्तीची नोंद** |
| | | **सन २०१०-२०११** | |
| ५ | ऑगस्ट -२०१० | २८४ कि.मी. | २८४ कि.मी.जास्तीची नोंद |
| ६ | ऑक्टो/नोव्हे-२०१० | १४६ कि.मी. | १४६ कि.मी.जास्तीची |
| ७ | ऑगस्ट -२०१० | २८४ कि.मी. | २८४ कि.मी.जास्तीची नोंद |
| ८ | ऑक्टो/नोव्हे-२०१० | १४६ कि.मी. | १४६ कि.मी. जास्तीची |
| ९ | जानेवारी -२०११ | ९८७ कि.मी. | ९८७ कि.मी. जास्तीची |
| | | **१४१७** कि.मी. | **१४१७ कि.मी. जास्तीची** |
| | | **सन २०१०-२०११** | |
| १ | फेब्रुवारी -२०१० ते एप्रिल -२०१० | २७८ कि.मी. | २७८ कि.मी. कमी |
| २ | मे -२०१० ते जून -२०१० | ७३ कि.मी. | ७३ कि.मी. कमी |
| ३ | जुलै -२०१० | ४० कि.मी. | ४० कि.मी. कमी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | सप्टेंबर -२०१० | १०० कि.मी. | १०० कि.मी. कमी. |
| ५ | डिसेंबर -२०१० | ३३५ कि.मी. | ३३५ कि.मी. कमी. |
| ६ | फेब्रुवारी -२०११ | ९८८ कि.मी. | ९८८ कि.मी. कमी |
| | | **१८१८ कि.मी.** | **१८१८ कि.मी. कमी** |

| | | | |
|---|---|---|---|
| **सन २०११-२०१२** | | | |
| १ | डिसेंबर -२०११ ते जानेवारी -२०१२ | १४५ कि.मी. | १४५ कि.मी. जास्तीची |
| २ | फेब्रुवारी -२०१२ | ४३० कि.मी. | ४३० कि.मी. जास्तीची |
| | **एकूण** | **५७५ कि.मी.** | **५७५ कि.मी. जास्तीची** |
| ३ | एप्रिल -२०११ | १२४ कि.मी. | १२४ कि.मी. कमी |
| ४ | मे-२०११ | २६६ कि.मी. | २६६ कि.मी. कमी |
| ५ | जुलै -२०११ | २१३ कि.मी. | २१३ कि.मी. कमी |
| ६ | मार्च -२०१२ | १६१ कि.मी. | १६१ कि.मी. कमी |
| | **एकूण** | **७६४** कि.मी. | **७६४ कि.मी. कमी** |
| **सन २०१२-२०१३** | | | |
| १ | एप्रिल -२०१२ | २७४ कि.मी. | २७४ कि.मी.जास्तीची |
| २ | ऑगस्ट-२०१२ | २७९ कि.मी. | २७९ कि.मी.जास्तीची |
| | **एकूण** | **५५३** कि.मी. | **५५३** कि.मी.**जास्तीची** |
| १ | मे -२०१२ | १६१ कि.मी. | १६१ कि.मी. कमी |
| २ | जून/ जुलै २०१२ | ११३६ कि.मी. | ११३६ कि.मी. कमी |
| | **एकूण** | **१२९७ कि.मी.** | **१२९७ कि.मी. कमी** |

लॉगबुकच्या माहेवार दिनांक १ ते ३१ पर्यंत केलेल्या किलोमीटर नोंदी पासून पर्यंत व चालकाने दर्शविलेल्या लॉगबुक वरील नोंदी याप्रमाणे नोंदी तपासल्या असता किलोमीटर कमी / जास्त नोंदी केल्याचे निदर्शनास आले.

**वरील मुद्यांबाबत विभागाने प्रत्यक्ष तपासणी करून संबंधित वाहन चालकाकडून रक्कम वसूल करून जबाबदारी निश्चित करावी व तसा अनुपालन अहवाल लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अहवाल सादर केलेला नाही. प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२६ : एमएच-२०/ बीबी -३३३३ सफारी (पेट्रोल ) वाहनाचा बाहेरगावी वापर केल्याबाबत.**

वाहन क्रमांक एमएच-२०/ बीबी -३३३३ सफारी (पेट्रोल) वाहनाचे लॉगबुकची तपासणी केली असता खालील आर्थिक वर्षात वाहनाचा बाहेरगावी वापर करण्यात आला आहे.

**एमएच-२०/ बीबी -३३३३ सफारी ( पेट्रोल )**

**सन २००९- २०१०**

| | |
|---|---|
| दि. १८.६.२००९ | नांदेड |
| दि.५.७.२००९, ६.७.२००९ व ७.७.२००९ - | मुंबई |
| दि.८.७.२००९ | मुंबई, पुणे, औरंगाबाद. |
| दि.५.१.२०१० | नाशिक , कल्याण, डोंबिवली. |

| | |
|---|---|
| दि.६.१.२०१० ते ७.१.२०१० | मुंबई - पुणे. |
| दि.१६.१.२०१० | पुणे |
| दि.५.२.२०१० | नाशिक. |
| दि.२०.२.२०१० | नाशिक. |

**सन २०१०-२०११**

| | |
|---|---|
| दि. १.६.२०१० | नगर, पुणे. |
| दि.२.६.१०ते ३.६.२०१०. | मुंबई - औरंगाबाद (१०९१ किमी) |
| दि.१८.८.२०१० ते १९.८.२०१० | मुंबई, पुणे, औरंगाबाद. |
| दि.२१.८.२०१० ते २२.८.२०१० | औरंगाबाद, पुणे, मुंबई, पुणे,औरंगाबाद. (९८९ किमी) |
| दि.८.११.२०१० | श्रीरामपुर (खाजगी) औबाद. |
| दि.३०.१.११ ते १.२.२०११ | पुणे -मुंबई -औरंगाबाद. |
| दि.१३.२.११ ते १५.२.२०११ | पुणे- मुंबई - औरंगाबाद. |
| दि.१६.२.२०११ | पुणे, औरंगाबाद. |
| दि.२५.२.२०११ | पुणे, मुंबई, (९०५ कि.मी.) |
| दि.२६.२.२०११ | पुणे, मुंबई, औरंगाबाद. |

**सन २०११-२०१२**

| | |
|---|---|
| दि.२२.७.२०११ ते २३.७.२०११ | मुंबई, पुणे, औरंगाबाद. (९६१ किमी) |
| दि.३.८.२०११ ते ५.८.२०११ | पुणे, मुंबई, औरंगाबाद. (८९५ किमी) |
| दि.८.१०.२०११ | नागपुर, कारंजा,औरंगाबाद. |
| दि.१७.१२.२०११ | अमरावती,नागपुर,औबाद (१२०१ किमी) |
| दि.१.३.२०१२ | भुसावळ,औबाद (३७० किमी) |

**सन २०१२-२०१३**

| | |
|---|---|
| दि.२.४.२०१२ ते ३.४.२०१२ | पुणे, मुंबई,औरंगाबाद. (७३३ किमी) |
| दि. २२.४.२०१२ | बीड (३०० किमी) |

उपरोक्त बाबींवरून मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी बाहेरगावी वाहन वापरल्याचे निदर्शनास येते. बाहेरगावी जाण्यासाठीचे आदेश लेखापरीक्षण करतांना सादर करण्यात

आलेले नाही. विभागाने पूर्तता करावी असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यत आदेश सादर करण्यात आले नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२७ : एमएच-२०/ एएस- ९९३३ (स्कॉरपिओ ) या वाहनाबाबत.**

वाहन क्रमांक एमएच-२०/ एएस-९९३३ (स्कॉरपिओ) च्या लॉग बुकची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सन २०१२-१३ मधील माहे जून मध्ये ३३० किमी, माहे जुलै मध्ये ३५ किमी माहे सप्टेंबर १९६ किमी, माहे मार्च मध्ये २३१ किमी जास्तीची किमी. नोंद दर्शविण्यात आली आहे. म्हणजेच एकूण ७९२ किमी जास्तीची नोंद दर्शविण्यात आली.

२. माहे जानेवारी २०१३ मध्ये वाहन १६७ किमी कमी, माहे फेब्रुवारी मध्ये ६० कि.मी. कमी नोंद लॉग बुकला दर्शविलेली आहे.

३. सन २०१३-१४ मध्ये माहे एप्रिल २१० किमी , माहे मे,६६ किमी जुलै -१२ किमी ऑगस्ट ७७ किमी,ऑक्टोबर ४४३ किमी, नोव्हेंबर १५० किमी, फेब्रुवारी २०१४, ३०९ किमी ची नोंद कमी दर्शविण्यात आली. एकूण १२६७ किमी. कमी नोंद लॉगबुकला दर्शविली आहे.

४. जून १८७ किमी, सप्टेंबर - १६८ किमी, डिसेंबर - ३४४ किमी, मार्च २०१४ ८२ किमी जास्तीची नोंद लॉगबुकला दर्शवून एकूण ७८१ किमी. जास्तीचे किमी दाखविण्यात आले आहे.

५. सन २०१४-१५ मध्ये एप्रिल -१४,३३ किमी, माहे मे- १२६ किमी., माहे जुलै २०७ किमी., जानेवारी -१५, ४३ किमी मार्च - १८४ किमी असे एकूण ५९३ किमी जास्तीची नोंद दर्शविण्यात आली आहे.

६. जून -२०१४, १२८ किमी, ऑगस्ट -१४, ८९ किमी, नोव्हेंबर -५२ किमी, डिसेंबर ७३ किमी, फेब्रुवारी -१५, ६८९ किमी. असे एकूण १०३१ किमी, कमी नोंद लॉगबुक वर दर्शविली आहे.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खात्री करून संबंधिताकडून रक्कम वसूल करून जबाबदारी निश्चित करावी व तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अहवाल सादर केलेला नाही. उपरोक्त प्रमाणे रक्कम वसूल करावी. तसेच उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२८ : एमएच- २०/ एएस- ९९३३ (स्कॉरपिओ ) या वाहनाचा बाहेरगावी वापर केल्याबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये अग्निशमन विभागाचे लेखापरीक्षण कार्यरत असून , वाहन क्रमांक एमएच-२०/ एएस-९९३३ (स्कॉरपिओ) च्या लॉग बुकची तपासणी केली असता खालील दर्शविलेल्या आर्थिक वर्षात दर्शविलेल्या दिनांकाला वाहनांचा बाहेरगावी वापर करण्यात आला आहे.

**एमएच-२०, एएस - ९९३३ (स्कॉरपिओ )**

**सन २०११-२०१२**

| | |
|---|---|
| दि.१२.३.२०१२ | औरंगाबाद- पुणे - मुंबई (१०५ किमी) |
| दि.१४.३.२०१२ | मुंबई - पुणे - औरंगाबाद (५७५ किमी ) |

**सन २०१२-२०१३**

| | |
|---|---|
| दि.६.७.२०१२ | औरंगाबाद - मुंबई (८०१ किमी )<br>ठाणे - औरंगाबाद. |
| दि.२९.७.२०१२ | औरंगाबाद - पुणे (५४३ किमी) |
| दि.३०.७.२०१२ | औरंगाबाद. |
| दि.१५.११.१२ ते १६.११.२०१२ | औरंगाबाद - मुंबई -औरंगाबाद<br>औरंगाबाद - पुणे (१०४८किमी) |
| दि.२२.३.२०१३ | औरंगाबाद - बीड - औरंगाबाद<br>(३२६ किमी ) |

**सन २०१३-२०१४**

| | |
|---|---|
| दि.११.६.२०१३ | औरंगाबाद - नाशिक - औरंगाबाद<br>(४८४ किमी) |
| दि.१७.६.१३ ते १९.६.२०१३ | औरंगाबाद - पुणे - औरंगाबाद<br>(७०५ किमी ) |
| दि.२५.१०.१३ ते २७.१०.२०१३ | औरंगाबाद - नाशिक - मुंबई-पुणे<br>औरंगाबाद. (९६० किमी ) |
| दि.२८.१२.२०१३ | औरंगाबाद -अहमदनगर -औरंगाबाद<br>(२४१ किमी ) |
| दि.९.१.२०१४ | औरंगाबाद - जालना - औरंगाबाद<br>(३०९ किमी ) |
| दि.१२.१.१४ ते १३.१.२०१४ | औरंगाबाद - पुणे - औरंगाबाद.<br>(७५६ किमी) |

**सन २०१४-२०१५**

| | |
|---|---|
| दि.३०.१.१५ ते ३१.१.२०१५ | औरंगाबाद - मुंबई - पुणे -औबाद (९७६ किमी ) |
| दि.१६.३.१५ ते १७.३.२०१५ | औरंगाबाद - मुंबई - औरंगाबाद. (१०९४ किमी) |

सदरील गाडीचे लॉगबुक लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. प्रतिमाह वाहन किलोमीटर मर्यादा प्रत्येक वाहनास किती आहे? दरमहा प्रतिवाहन किती लिटर डिझेल मर्यादा देय आहे? याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे वाहनाचा वापर व प्रशासनाने घालून दिलेली मर्यादा यांचा ताळमेळ घेता आलेला नाही. उपरोक्त बाबींवरून मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी बाहेरगावी वाहन वापरल्याचे निदर्शनास येते. बाहेरगावी जाण्यासाठीचे आदेश लेखापरीक्षण करतांना सादर करण्यात आलेले नाही. विभागाने पूर्तता करावी.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२९ : अग्निशमन विभागातील वाहन क्रमांक एमएच-२०-एच-३३३३ (जीप्सी) व वाहन क्रमांक एमएच-२० बीबी-३३३३ (टाटा सफारी) ह्यांच्या अनियमिततेबाबत.**

लेखापरीक्षणा दरम्यान महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ कलम (६९) नुसार ठेवण्यात आलेल्या मोटार वाहनांचे लॉग बुकनुसार पाहणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ कलम ६९ (३) नुसार पुरविण्यात आलेल्या लॉग बुक मध्ये वाहनांनी केलेल्या निरनिराळ्या फे-यांचा तपशिल दर्शविण्यात यावा असे असतांना पूर्णपणे तपशिल नोंदविला जात नाही.

२. वाहनाचा वापर करणा-या व्यक्तीने स्तंभ ४ ते ९ आणि ११ ते १३ मधील तपशिलांची नोंद रोजवहीत (लॉगबुक) मध्ये करावी असे असतांना दर्शविलेल्या दोन्ही वाहनांची स्तंभ ४ व स्तंभ ५ मध्ये बाहेर नेण्याची वेळ व वाहनांची परतीची वेळ दर्शविण्यात आलेली नाही.

३. लॉगबुकमधील स्तंभ १ नुसार दोन्ही वाहनांच्या लॉग बुकमध्ये दिनांक दर्शविले आहे. त्याच दिनांकाला एकच अधिका-यांनी दोन्ही वाहनांचा वापर करून संबंधित वाहन चालक यांनी स्तंभ १३ मध्ये व अधिका-यांनी स्तंभ १५ मध्ये स्वाक्षरी केल्या आहे. म्हणजेच दोन्ही वाहनांचे वापर एकाच वेळी एकाच दिनांकास केल्याचे दिसते.

४. मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी एकाच दिवशी (एकाच दिनांकाला) दोन्हीही वाहनांचा वापर केल्याचे लॉग बुकच्या नोंदीवरून दिसून येते.

५. दोन्ही वाहन एकाच दिवशी दोन वेगवेगळे वाहनचालकासह वापर केल्याचे लॉगबुकच्या त्या त्या वाहनाच्या नोंदीनुसार दिसून आले.

६. वाहन क्रमांक एमएच-२०- बीबी-३३३३ सफारी (पेट्रोल) हे वाहन एकाच दिनांकाला एकाच दिवशी एकच अधिकारी बाहेरगावी वापरत असल्याचे लॉग बुक नोंदीवरून दिसते व दुसरे वाहन क्रमांक एमएच-२०- एच -३३३३ (जिप्सी) हे वाहन शहरात वापरल्याचे लॉग बुक नोंदीवरून दिसून येते. म्हणजेच दोन्ही वाहन एकाच दिवशी वेगवेगळे वाहन चालकासह वापर केल्याचे दिसून येते. याबाबतचा सविस्तर तक्ता अर्धसमास पत्र क्र.४१ सोबत देण्यात आलेला आहे.

**याबाबत विभागाने खातरजमा करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. वरील सर्व मुद्यांबाबतच्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३० : अग्निशमन विभागातील वाहनांची विधीग्राह्यता (मुदत ) संपल्या बाबत.**

विभागातील कार्यरत वाहनांची लेखापरीक्षण तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार फायर | वाहन क्रमांक | वर्ष |
|---|---|---|---|
| १ | फायर टेंडर | एमसीए २१२५ | १९८८-१९८९ |
| २ | फायर टेंडर | एमएच-२०- ए-२५२४ | १९९०-१९९१ |
| ३ | फायर टेंडर | एमएच २० ए--५८०४ | १९९२-१९९३ |
| ४ | फायर वॉटर टँकर | एमएच -०४ एच-८०१६ | १९९२-१९९३ |
| ५ | फायर फोम टेंडर | एमएच -०४ एच -८०२७ | १९९२-१९९३ |
| ६ | रूग्णवाहिका | एमएच -०४ एच -७४ | १९९२-१९९३ |

उक्त दर्शविलेली वाहने प्रादेशिक परिवहन नियमानुसार १५ वर्ष विधीग्राह्यता असतांना व त्यानंतर विधी ग्राह्यता संपल्यानंतरही अग्निशमन या अत्यावश्यक सेवेतील विभागात कार्यरत आहेत.

२. अग्निशमन विभागात उक्त दर्शविलेली वाहने जुने झाल्या असल्याने याच धरतीवर नविन ३ फायर टेंडर व १ रेस्क्यू व्हॅन वाहन खरेदी करण्यात आले आहे. मात्र हे वाहन सुध्दा कार्यरत असल्याचे दिसते.

३. प्रादेशिक परिवहन विभागात वाहनांची नोंदणी केल्यानंतर वाहन यांत्रिक व तांत्रिक दृष्ट्या सुस्थितीत असल्याचे तपासले जाते. वाहन सुस्थितीत आढळल्यास व मोटार वाहन कायद्यातील बांधणी विषयी सर्व तरतूदीचे पालन करीत असल्यास त्यास योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) दिले जाते. नविन वाहन असल्यास दोन वर्ष विधीग्राह्य असलेल्या मुदतीचे प्रमाणपत्र दिले जाते. त्यानंतर प्रत्येक वर्षी पुन्हा

वाहनाची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्राचे नुतनीकरण करून घ्यावे लागते. तरी सदरची वाहने विधी ग्राह्यता संपलेले असतांनाही अग्निशमन सारख्या अत्यावश्यक सेवेतील विभागात कार्यरत असल्याचे दिसून येते. यामुळे भविष्यात मनुष्य हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. प्रादेशिक परिवहन विभागाने वाहनाची आयुष मर्यादा १५ वर्ष ग्राह्य धरलेली असून १५ वर्षानंतर जे वाहन वापरण्यात येइल अशा वाहनास पर्यावरण कर भरणे आवश्यक आहे. मात्र पर्यावरण कर भरल्याबाबतचा पुरावा दिसून आलेला नाही. विभागाने पूर्तता करावी.

५. आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये दर्शविलेली वाहने वर्षभरात फार कमी प्रमाणात चालले आहे. त्यांचा सविस्तर तक्ता पुढील प्रमाणे इ

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन क्रमांक | वर्षभरात चाललेले एकूण कि.मी. |
|---|---|---|---|
| १ | फायर टेंडर | एमसीए -२१२५ | ४३७ |
| २ | फायर टेंडर | एमएच-२०- ए-२५२४ | ३२५ |
| ३ | फायर टेंडर | एमएच २० ए--५८०४ | १६३ |
| ४ | फायर वॉटर टँकर | एमएच -०४ एच-८०१६ | ६१ (बंद) |
| ५ | फायर फोम टेंडर | एमएच -०४ एच -८०२७ | १८८२ |
| ६ | रूग्णवाहिका | एमएच -०४ एच -७४ | ४२२३ (बंद) |

६. वाहनांवर वर्षनिहाय किती खर्च करण्यात आला आहे. याबाबतची माहिती, हिस्ट्री बुक नसल्याने उपलब्ध झालेली नाही.

**करीता याबाबत विभागाने प्रत्यक्ष तपासणी करून याबाबतचा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३१ : अग्निशमन विभागतील वाहनांच्या लॉगबुकमधील अनियमिततेबाबत.**

अग्निशमन विभागातील वाहनांचे महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ नियम ६९ नुसार असलेल्या लॉगबुकच्या दर्शविलेल्या नोंदी तपासण्यात आल्या. त्यानुसार वर्षनिहाय विभागाने केलेला प्रत्येक गाडीचा वापर, त्यासाठी वर्षभरात लागलेले डिझेल / पेट्रोल बाबतचा सविस्तर तक्ता पुढील प्रमाणे.

तक्ता.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | आर्थिक वर्ष | एकूण किमी वाहनाचा वापर | एकूण डिझेल | १ लिटर डिझेल सरासरी नुसार डिझेल | डिझेल खर्च होणे अपेक्षित | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एमएच-२० सीटी ३२३१ रेस्क्यू वाहन | १.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | २२६५<br>५७९<br>४५३<br>५९८ | ६११<br>५६५<br>४०३<br>२०६ | | | |
| २ | एमसीए २१२५ फायर टेंडर | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ४७८१<br>५३४६<br>६२२३<br>२४२<br>१५०<br>४३७ | १४२४<br>१३०७.५<br>१५१८<br>१९४<br>८५<br>२८८ | | | |
| ३ | एमएच-२० ए २५२४ फायर टेंडर | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ७३६३<br>५०९८<br>४६८१<br>९९<br>७११<br>३२५ | १७७८<br>१४९०<br>१२७१<br>४९<br>२९४<br>२५९ | | | |
| ४ | एमएच-२० ए ५८०४ फायर टेंडर | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ५५२५<br>५३५०<br>४४४५<br>३३०<br>बंद<br>१६३ | १५५४<br>१५०९<br>१४५०<br>१५३<br>बंद<br>१५८ | | | |
| ५ | एमएच-२० सीटी. १४६८ फायर टेंडर (९.४.२०११) (नविन गाडी) | १.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | २५१०<br>७९१५<br>६२०२<br>५८७१ | ७९०<br>२१५७<br>२०२१<br>१३३० | | | |
| ६ | एमएच-२० सीटी. १४६९ (९.४.२०११) (नविन गाडी) | १.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | २७६३<br>८४२३<br>७१११<br>७६२८ | ७९२<br>१९०४<br>१८३५<br>१९०५ | | | |
| ७ | एमएच-२० सीटी. १४७० (९.४.२०११) (नविन गाडी) | १.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ४००४<br>८४६२<br>६५८२<br>९४५२ | १०५७<br>२१४६<br>१७९६<br>२४१० | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | एमएच-०४ एच<br>-८०१६ फायर<br>वॉटर टँकर | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | २८१०<br>१५४५<br>१७५४<br>१११८<br>२७९<br>६१ | ६२३<br>४२५<br>४७४<br>३५३<br>१२६<br>बंद | | | |
| ९ | एमएच-०४-<br>एच- ८०२७ | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ४३७८<br>२४६२<br>२६५८<br>५६८<br>७४४<br>१८८२ | १२८०<br>६९३<br>७१०<br>२०४<br>३७५<br>४८७ | | | |
| १० | एमएच -०४-<br>बीए- ४५३८<br>वॉटर मिस्टमिनी<br>फायर टेंडर<br>(१३.१२.२०१०) | १.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | १३७२<br>४०८१<br>४१७९<br>२४७२<br>२८६७ | १९८<br>४८८<br>५१५<br>३१८<br>४०१ | | | |
| ११ | एमएच--२०<br>एएस-९९३३<br>स्कारपिओ | १.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | --<br>१०६६२<br>२३५९०<br>२१५४३ | २१२<br>१०१३<br>२३७६<br>२०५९ | | | |
| १२ | एमएच-२०<br>एएस ३२३३<br>बलोरे जीप | १.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ८१४२<br>१३००५<br>१३३७३ | ९०४<br>११८४<br>११९१ | | | |
| १३ | एमएच- २०<br>बीबी-३३३३<br>टाटा सफारी | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | २३६७८<br>२६८०८<br>२८८१७<br>१३४२७<br>३९३<br>बंद | ३४६०<br>५४९३.९<br>२<br>४०५४.८<br>३<br>७३६२.१<br>६१.३८<br>--- | | | |
| १४ | एमएच-२०<br>डब्ल्यू- ९५१३<br>टाटा मोबाईल<br>व्हॅन | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | १३४५६<br>११९१४<br>१४२६०<br>१३५०९<br>८०५२<br>४५०४ | १४२१<br>१२०७<br>१४५१<br>१३२२<br>८६२<br>४६५ | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | एमएच-०४<br>एच- ७४<br>रूग्णवाहिका | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ९४०२<br>८५७४<br>९०१२<br>५१३९<br>३६०१<br>४२२३ | ११२७<br>११८८<br>११३५<br>६९२<br>४७२<br>४८८ | | | |
| १६ | एमएच-२०<br>एच- ३३३३<br>जीप्सी | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ३५६१<br>४१८४ | ६४९<br>७४६ | | | |
| १७ | एमएच-२०<br>ए ५३४७<br>ॲम्ब्युलन्स | १.४.२००९ ते ३१.३.२०१०<br>१.४.२०१० ते ३१.३.२०११<br>१.४.२०११ ते ३१.३.२०१२<br>१.४.२०१२ ते ३१.३.२०१३<br>१.४.२०१३ ते ३१.३.२०१४<br>१.४.२०१४ ते ३१.३.२०१५ | ७६०७<br>७६४६<br>१५१३<br>--<br>--<br>-- | १०३४<br>९३६<br>२८५<br>--<br>--<br>-- | | | |

महानगरपालिका कार्यशाळा उपअभियंता व त्यांच्या वरिष्ठांना खालील दर्शविलेले पत्र, देण्यात आले.

१. जा.क्र.मनपा/मुलेप/२०१५/१५३, दिनांक ११.९.२०१५
२. जा.क्र.मनपा/मुलेप/२०१५/१६१, दिनांक १४.९.२०१५
३. जा.क्र.मनपा/मुलेप/२०१५/१८०, दिनांक ९.१०.२०१५
४. जा.क्र.मनपा/मुलेप/२०१५/३०४, दिनांक २९.१०.२०१५
५. जा.क्र.मनपा/मुलेप/२०१५/३१५, दिनांक १७.११.२०१५ (का.अभियंता)

मात्र प्रतिलिटर ॲव्हरेजची माहिती अद्यापही उपलब्ध झालेली नाही.त्यामुळे निश्चित खात्री करता आली नाही. तसेच एकूण वाहनाची धाव व प्रत्यक्ष इंधनाचा वापर यामये तफावत आढळून येत आहे. दरमहा लॉगबुक गोषवारासह सादर केला असता वाहनांची सरासरी इंधन वापर किती झाले हे समजले असते. यांत्रिकी विभागास उक्त ५ स्मरणपत्रे देवून सुध्दा माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे उक्त बाब स्पष्ट झाली नाही.

सदर बाब ही गंभीर स्वरूपाची व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे. त्रुटी राहिल्यास व वसूलपात्र रक्कम निघाल्यास खाते प्रमुख जबाबदार राहील. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**अग्निशमन विभागाने वाहनांची खरेदी करीत असतांना यांत्रिकी विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक असतांना एकूण रक्कम रू. ३७,७२,५९७/- ची अग्निशमन विभागासाठी खरेदी विनापरवानगी करण्यात आलेली आहे.**

| **अ.क्र.** | **वाहनांचा प्रकार** | **वर्ष** | **खरेदी शिर्ष** | **कोणासाठी** | **रक्कम रूपये** |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्कॉरपिओ- एमएच-२० एएस-९९३३ | २०११-२०१२ | आपत्कालीन परिस्थिती व्यवस्थापन तेरावा वित्त आयोग | अग्निशमन विभागासाठी | १२,३६,२५३/- |
| २ | बलेरो जीप एमएच-२० एएस-३२३३ | २०१२-२०१३ | आपत्कालीन परिस्थिती व्यवस्थापन व महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय | अग्निशमन विभागासाठी | ९,३७,९९७/- |
| ३ | टोयाटो इनोव्हा एमएच-२० सीयु -३३०० | २०१३-२०१४ | आपत्कालीन परिस्थिती व्यवस्थापन व महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय | अग्निशमन विभागासाठी | १५,९८,३४७/- |
| | | | | **एकूण खर्च रक्कम रूपये** | **३७,७२,५९७/-** |

यांत्रिकी विभागाच्या अभिप्रायाविना खरेदी करणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**विशेष बाब:** **लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षण पथकाने आक्षेपित केलेल्या अर्धसमास पत्र क्र. ५,२७,३०,२९ अंती एकूण रक्कम रू.३,२९,३५२/- चा भरणा करून घेण्यात आला.**

**लेखापरीक्षण अहवाल.**
**कर आकारणी विभाग**
**सन २०१३-२०१४**

## प्रस्तावना :

औरंगाबाद महानगरपालिका,अंतर्गत कर आकारणी विभागाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण मा.मुख्य लेखापरीक्षक यांच्या कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/मुलेप/२०१४/९२, दिनांक २९.४.२०१४ अन्वये करण्यात आले. दरम्यान चाचणी स्वरुपात लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन दिलेले अभिलेखे / संचिका यांचे लेखापरीक्षण करण्यात आले. त्यानुषंगाने मालमत्ता कर आकारणी संबंधित संचिका, व्यावसायिक मालमत्ता कर आकारणी संबंधित संचिका, नामांतर संचिका इत्यादी उपलब्धतेनुसार तपासण्यात आले.

मालमत्ता कर कमी केल्याबाबतची प्रकरणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील उभारलेल्या मोबाईल टॉवर्सची माहिती, मालमत्ता करातून प्राप्त झालेल्या उत्पन्नात करनिहाय थकबाकी, चालू मागणी, एकूण मागणी ,एकूण वसूली व शिल्लक याबाबतची माहिती , मनपा हद्यीत निवासी, निवासेत्तर , व्यावसायिक , औद्योगिक इत्यादी मालमत्तांना आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराची माहिती वेळोवेळी पाठपुरावा करुनही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे पूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही. अभिलेखे उपलब्ध न करुन देणे ही बाब गंभीर स्वरुपाची व साशंकता निर्माण करणारी आहे.

त्या दरम्यान कर आकारणी विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण ५७ परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

### कर मुल्य निर्धारक व संकलक यांच्या कार्यकाळाबाबत.

सन २०१३-२०१४ या कालावधीत **श्री.एस.बी.झनझन,** यांनी कर मुख्य निर्धारक व संकलक म्हणून काम पाहिले.

## लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :

१. श्री.संजय जक्कल, कार्यालयीन अधिक्षक,
२. श्री.नासेर लईख, वरीष्ठ लिपीक.
३. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक.
४. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक.
५. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक.
६. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक.
७. श्रीमती पंचशिला खरात, कनिष्ठ लिपीक.
८. श्रीमती शिल्पा जोशी , कनिष्ठ लिपीक.

**परिच्छेद क्र. १ : <u>अभिलेखे व माहिती उपलब्ध न करून देणे बाबत.</u>**

लेखापरीक्षणा दरम्यान कर आकारणी विभागास अभिलेखे व माहिती उपलब्ध करून देणे बाबत कळविण्यात आलेले होते. लेखापरीक्षण पूर्ण होईयपर्यंत विभागाने खालील अभिलेखे व माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.

१. औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील मालमत्तांना आकारण्यात आलेल्या कराच्या संदर्भाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनूसुची-ड चे प्रकरण - ८ कलम २१ (२) अन्वये दर पाच वर्षातून निदान एकदा तरी नविन आकारणी पुस्तक तयार करण्यात आले पाहिजे अशी तरतूद आहे. कर आकारणी विभागाने उक्त नियमानुसार यापूर्वी कोणत्या वर्षी नविन आकारणी पुस्तक तयार केलेले आहे. याबाबत लेखापरीक्षण पथकास माहिती उपलब्ध झालेली नाही.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनूसुची -ड चे प्रकरण - ८ कलम ४ अन्वये महानगरपालिका आयुक्तांना निबंधकाकडून माहिती मागवता येईल अशी स्पष्ट तरतूद आहे.परंतू उक्त कलमान्वये विभागाने निबंधकाकडून माहिती मागविली किंवा कसे याचे स्पष्टीकरण झालेले नाही. तसेच विभागाने लेखापरीक्षण पथकास माहिती दिलेली नाही.

३. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात कर आकारणी विभागाने विविध मालमत्तांवर आकारलेल्या व कर कमी केलेल्या नोंदीचे समरी रजिस्टर .

४. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिळकतींना करण्यात आलेल्या कर आकारणी व मालमत्ता कर वसूली संदर्भाने कार्यालयात व मा.न्यायालयात दाखल झालेल्या वादग्रस्त प्रकरणांमध्ये उपलब्ध अभिलेखे व वस्तुस्थितीनुसार मालमत्ता कर आक्षेप अर्जावर निर्णय घेवून मालमत्ता कर अंतिम करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. सदरील समितीने वेळोवेळी उक्त प्रकरणांबाबत घेतलेली सुनावणी / इतिवृत्त रजिस्टर / कार्यवाही याबाबतचे सर्व अनुषंगिक लेखे लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले होते.

**उक्त प्रकरणांत मुद्या क्र.३ व ४ बाबत विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक व अभिलेख्यांसह उपलब्ध करून न दिल्याने खातरजमा करता आलेली नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**<u>परिच्छेद क्र. २</u> : मालमत्तांचे कर योग्य मूल्य - कर आकारणीचे गोषवारा पुस्तकामधील व मालमत्ता कर आकाणीची खास नोटीस मध्ये तफावत / वेगवेगळी नोंद दर्शविणे बाबत.**

मालमत्ता कर आकारणी करणेत आलेल्या संचिका, विभागाने ठेवलेले गोषवारा पुस्तकांचे चाचणी स्वरूपामध्ये तपासणी करणेत येत असून, यामध्ये मालमत्ता धारकास पारित केलेली मालमत्ता कर आकारणीची खास नोटीस व कर आकारणीचे गोषवारा पुस्तकामधील नोंदी एकत्रितपणे तपासल्या असता करयोग्य मूल्य वेगवेगळे/तफावत दिसून आलेल्या मालमत्ता पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | मालमत्ता धारकाचे नांव | कर आकारणी क्रमांक | पत्ता | खास नोटीस NRV/Tax | गोषवारा पुस्तक NRV/Tax |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.महेश प्रभाकर बावस्कर व सौ.वर्षा महेश बावस्कर | ६० shop no.७ | गारखेडा | ७३४४ रू.६९३९ | ११०१६ रू.१०४०८ |
| २ | सौ.सुजाता रतन कांबळे | ६४ shop no.२ | गारखेडा | ७३४४ रू.६९३९ | ११०१६ रू.१०४०८ |
| ३ | श्री.तुषार विठ्ठल बोडखे | ६५ shop no.२ | गारखेडा | ७३४४ रू.६९३९ | ११०१६ रू.१०४०८ |
| ४ | श्री.विजय भिसनदास अरोरा | ६५ shop no.५/६ | गारखेडा | १४३५३ रू.१३५६३ | २१५१४ रू.२०३३० |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ८ अन्वये मालमत्ता धारकाने मालमत्तांचे / खोल्यांची लांबी / रुंदी,क्षेत्रफळ इ. भरुन माहिती पत्रक स्वत:चे स्वाक्षरीने सादर करणे व त्यानुसार नियमाप्रमाणे करयोग्य मूल्य निश्चित करून त्याची नोंद प्रथम विभागाने ठेवलेले गोषवारा पुस्तकामध्ये घेवून, मालमत्ता कर वसूल करणे करीता तशी नोटीस / मागणी मालमत्ताधारकास पारीत करणेत येते, मात्र गोषवारा पुस्तक व पारित केलेले मालमत्ता कर आकारणी खास नोटीस यामधील करयोग्य मूल्य वेगवेगळे/ तफावतीबाबत विभागास खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. करयोग्य मूल्यामधील रकमेत तफावत असणे ही बाब महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानी बाबतची आहे.

**प्रकरणात उपरोक्त प्रमाणे दिलेले नाममात्र नोंदीसह इतरही प्रकरणे तपासून तफावत रक्कम दुरुस्त करून संबंधित मालमत्ता धारकास दुरुस्ती नोटीस देवून महानगरपालिकेचे होत असलेले आर्थिक नुकसान तातडीने वसूल करण्यात यावे . या संदर्भाने संबंधित दोषी कर्मचा-यांविरूध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३ : मालमत्ता कर आकारणी कमी दर्शविल्याबाबत.**

कर आकारणी क्रमांक ८०/१३-१४ दिनांक १८.४.२०१३, मालमत्ता संगणक क्रमांक F०० ४४६४४ सिटी सर्व्हे नंबर १८३४०/१ मोहल्ला रेल्वे स्टेशन रोड यांची संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील दुकान Ground Floor ला असून दुकानाची लांबी / रुंदी ४.१०X३.२० एकूण १३.१२ sq meter एवढे क्षेत्रफळ दर्शविण्यात आले आहे. परंतू संबंधितांचे खरेदीखत पाहिले असता दुकानाचे क्षेत्रफळ २२.८० sq meter एवढा दर्शविले आहे. म्हणजेच ९.६८ sq m२ कमी दर्शविण्यात आले आहे.

२. करयोग्य मूल्य ६८९५ एवढे दर्शविणे आवश्यक असतांना ३९६४ एवढे दर्शविण्यात आले. म्हणजेच २९३१ एवढे करयोग्य मूल्य कमी दर्शविण्यात आले असून त्यामुळे दिनांक १.४.२०१३ पासून मनपाचे रक्कम रू.२६९८/- प्रतिवर्ष नुकसान झालेले आहे.

३. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ फॉर्म डी नुसार संस्थेच्या नोंदणी क्रमांक दु/औ.बाद/२६३/६९५९८/२०११, दिनांक २१.१२.२०११ रोजी झालेली असतांना संबंधितांची कर आकारणी दिनांक १.४.२०१३ पासून करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

४. कर आकारणी क्र.११६९/२०१३-१४ या मालमत्तांचे करयोग्य मूल्य रू.३१००/- ऐवजी रू.२७१०/- दर्शविले आहे. म्हणजेच रू.३९०/- करयोग्य मूल्य कमी दर्शविलेले आहे.

**उक्त मुद्यांवर विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र.२ नुसार प्रतिवर्ष रू.२६९८/- रकमेचे व मुद्या क्र् ४ नुसार प्रतिवर्ष रू.३९०/- असे एकूण रू. ३०८८/- करयोग्य मूल्यावर येणारा मालमत्ता कराचे आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानीस जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करून महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूलीच्या कार्यवाही अंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४ : मा.उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हाधिकारी कार्यालय परिसर हॉटेल विसावा रेस्टॉरन्ट यांचे मालमत्ता कर आकारणी बाबत.**

कर आकारणी क्र.१४६९/२०१३-१४ मालमत्ता संगणक क्रमांक COO२२४७४ अन्वये (अनाधिकृत बांधकाम) यावर मालमत्ता करआकारणी करणे करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण-८ नियम ८ प्रमाणे माहितीपत्रक, कर आकारणी हिशोब तक्ता, अन्वये मालमत्ता कर आकारणीची खास नोटीस मध्ये दर्शविलेले आहे.

वरील प्रमाणे मालमत्ता कर आकारणी करणे करीता मालमत्ता मालकी हक्काबाबतचे खालील प्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

१. मालकी हक्क खरेदीखत
२. भाडे करारनामा.
३. बांधकाम परवाना/ भोगवटा प्रमाणपत्र.
४. लाईट बिल.
५. पूर्वीची कर आकारणी झालेली असल्यास कर भरणा पावती/ कर आकारणी नोटीस.
६. ॲग्रीमेन्ट लिज / जागेचा नकाशा, इत्यादी कागदपत्रे असणे आवश्यक होते.

परंतू प्रकरणी/संचिकामध्ये दिसून येत नाही. सदरील मालमत्ता शासकीय असल्याने मालकी हक्काचे कागदपत्र अधिकृत असणे आवश्यक आहे.

तसेच माहिती पत्रकावर माहिती पत्रक भरुण घेणा-या दुय्यम आवेक्षक यांची स्वाक्षरी नाही आणि त्यावर बांधकामाचा प्रकार कोणता आहे ही माहिती लिहिण्यात आलेली नाही. ह्या बाबी आक्षेपार्ह आहे.

**विभागास वरील प्रमाणे खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. शासकीय इमारतीच्या परिसरात असलेल्या हॉटेल विसावा रेस्टॉरेन्ट याचा वापर व्यावसायिक स्वरूपाचा आहे. तसेच झालेले बांधकाम हे अधिकृत आहे की अनाधिकृत याबाबत लेखापरीक्षण पथकास संबंधित विभागाने अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्याने आकारण्यात आलेला मालमत्ता कर योग्य असल्याची खात्री झालेली नाही. त्यानुषंगाने विभागाने सविस्तर खुलाशासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५ : विशेष कक्ष कर आकारणी विभागामार्फत मालमत्ता धारकाच्या मालकी हक्काचे कागदपत्र उपलब्ध नसतांना कर आकारणी करणे बाबत.**

कर आकारणी विभागामार्फत मालमत्ता धारकांना लावण्यात आलेला कर हा संबंधित मालमत्ता धारकाकडून त्याचे मालकी हक्काचे कागदपत्र जसे खरेदी खत, बांधकाम परवाना, पी.आर.कार्ड, भोगवटा प्रमाणपत्र इत्यादी हस्तगत न करता कर आकारण्यात आले.

विभागाने अर्धसमास क्र. १२ सोबत दिलेल्या यादीनुसार संबंधित मालमत्ता धारकांच्या मालमत्तेवर करण्यात आलेली कर आकारणी साठी कोणत्या कागदपत्रांचा आधार घेतला , याबाबत खुलासा मागविण्यात आला होता. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**विभागाने केलेली कर आकारणी योग्य आहे याबाबत लेखापरीक्षणाची खात्री झालेली नाही. करिता, सविस्तर खुलाशासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करण्यात यावे.**

**परिच्छेद क्र. ६ : विशेष कक्ष (कर आकारणी) विभाग येथे मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली. परंतू आकारणी गोषवारा पुस्तकावर नोंद दर्शविली असतांना संगणकावर नोंद न दर्शविणे बाबत.**

विशेष कक्ष विभागात महानगरपालिकेच्या हद्दीतील विविध वॉर्डातील मालमत्ता धारकांना मालमत्ता कर आकारणी करण्यात आली असून सदरील आकारणी झालेल्या मालमत्तांची नोंद गोषवारा रजिस्टरला दर्शविली आहे.

परंतू नोंद झालेल्या मालमत्ता संगणकावर नोंद घेवून त्यास संगणकीय मालमत्ता क्रमांक देणे आवश्यक होते व त्या नोंदणी संबंधित वॉर्डामध्ये मागणी रजिस्टरला नोंदवून घेणे सुध्दा आवश्यक असतांना नोंद न झाल्यामुळे महानगरपालिकेचे रक्कम रु. ७,५०,०२०/- प्रतीवर्ष आर्थिक नुकसान झालेले दिसून येते. अशा प्रकारच्या इतरही नोंदी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. लेखापरीक्षण पथकाने या सोबत नाममात्र नोंदी दर्शविण्यात आलेल्या आहेत.

विभागास अर्धसमास पत्र क्र.१८ सोबत नाममात्र नोंदीची माहिती देण्यात आलेली होती. त्यावर खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यातही आले होते. संबंधितांकडून अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. औरंगाबाद महानगरपालिकेचे मालमत्ता कराची वसूली संगणकीय प्रणालीतून होत असल्याने संगणकातील Data हा वेळोवेळी Up-date होणे आवश्यक आहे. या बाबीचे गांभिर्य संबंधित विभागाच्या अधिकरी / कर्मचा-यांना नसल्याचे उक्त बाबींवरुन स्पष्ट होते. याचा परिणाम महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या वसूलीवर होत असून महापालिकेस आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

**तरी विभागाने उक्त नोंदी व या व्यतिरिक्त इतरही नोंदींची संगणकावर Data, Up-date केल्याची खात्री करावी . दरम्यानच्या काळात महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचारी विरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.**

**परिच्छेद क्र. ७ : कर आकारणी क्र.१२०८/२०१३-१४ दिनांक २३.७.२०१३ अन्वये विशेष कक्ष कर आकारणी विभाग यांनी केलेली कर आकारणीचे संगणकीकरण झालेले नसल्याने महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीबाबत.**

श्री.सुदाम पंढरीनाथ शिसोदे, व इतर पाच भाडेकरू - व्यवस्थापक, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (पेट्रोलपंप), प्लॉट क्र. १,२,१५ व १८ , तारक हाऊसिंग सोसायटी, सातारा, या मालमत्तेस कर आकारणी क्र. १२०८/२०१३-१४ दिनांक २३.७.२०१३ (संगणक क्रमांक नाही.) अन्वये व्यावसायिक कर योग्य मूल्य रू.४५,८८९/- व मोकळ्या जागेचे करयोग्य मूल्य ८८,०९२/- असे आकारण्यात आलेले आहे. सदरील करयोग्य मूल्यानुसार मालमत्ता कराची रक्कम रू. ४३,३६५/- व रू.३९,६४२/- असे एकूण ८३,००७/- येते. सदरील संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. उपरोक्त मालमत्तेस जुनी कर आकारणी क्र.Wf /१९४ /RO-८/ ६ /PG-१६८ अन्वये मोकळ्या जागेचे करयोग्य मूल्य रक्कम रू.१५,७८३/-दर्शविलेली आहे. त्यास व्यावसायिक दराने रू.३,९४६/- प्रतिवर्षी कर दिनांक १.४.२००३ पासून आकारलेला आहे. आकारलेल्या कराची वसूली केल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे दिनांक १.४.२००३ ते दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत संबंधित मालमत्ता धारकाकडे रक्कम रू. ६१,५५९/- कराची थकबाकी दिसून येते.

२. सदरील मालमत्तेवर बांधकाम झाल्याचे दर्शवून दिनांक १.४.२०१३ पासून बांधकाम झालेले क्षेत्र व मोकळ्या जागेवर नव्याने करआकारणी करून जुनी कर आकारणी दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत व पुढे बंद असे दर्शविले आहे. सदरील प्रकरणी संचिकेत बांधकाम परवाना किंवा भोगवटा प्रमाणपत्र नकाशा जोडलेला नाही. त्यामुळे बांधकाम कोणत्या वर्षी झाले याची स्पष्टता होवू शकलेली नाही.

३. मुद्या क्र.२ अन्वये दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत जुन्या दराने कर आकारणी करणे व पुढे बंद असे नमूद असतांना आजही संगणकीय क्रमांक F००१३३०१ अन्वये रक्कम रू.१५,७८३/- या करयोग्य मूल्यावरच मालमत्ता कराची वसूली केल्या जात आहे. त्यामुळे नविन कर आकारणी केल्यानंतर त्याची संगणकीकरणात नोंद झालेली नसल्याने महानगरपालिकेचे प्रतिवर्षी रक्कम रू. ८३,००७ /- आर्थिक नुकसान होत आहे.

४. माहिती पत्रकात दिलेले मोजमापा मध्ये पेट्रोल पंपाकरीता वापरण्यात येणा-या पेट्रोलच्या टाक्यांचे मोजमाप दर्शविलेले नाही. एकूण टाकीचे बांधकाम किती, त्यानुसार मालमत्ता कराची आकारणी करून संबंधितांकडून कर वसूली करणे आवश्यक आहे. पेट्रोल पंपाची टाकी हा पेट्रोल पंपाच्या विकासाचा एक भाग आहे. यासाठी विविध प्राधिकरणाच्या NOC तथा मान्यतेची आवश्यकता असते.

**उपरोक्त बाबीं संबंधी तपासणी करून योग्यतेबाबत शहानिशा करून विभागास खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेल्या खुलाशानुसार थकबाकीसह चालू मागणीचे देयक संगणकात जनरेट करण्यात आले आहे. तथापि विभागाने खुलासा सादर करतांना कुठलाही पुरावा अथवा अभिलेखे सादर केलेले नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणाबाबत शहानिशा करता आलेली नाही. उक्त मुद्या क्र.१ ते ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनुपालन अहवाल सादर करण्यात यावा.**

**परिच्छेद क्र. ८ : विशेष कक्ष विभागात महानगरपालिका हद्दीतील वॉर्ड- फ कार्यालयास अंतर्गत मालमत्ता कर लावतांना एकाच इमारतीचे मोजमाप करून उर्वरीत मालमत्ता धारकांना तीच छायांकित प्रत लावल्या बाबत.**

विशेष कक्ष विभागाने मालमत्ता कर आकारणी करतांना मोहल्ला १०८ ग्रीन बीडबायपास या इमारतीला मालमत्ता कर आकारणी करण्यात आली असता एकाच घराची मोजणी करुन तीच छायांकित प्रत उर्वरीत मालमत्ता धारकांना दर्शविली आहे व सगळ्यांना एकच कर दर्शविला आहे.

तद्वतच माहिती पत्रकांची छायांकित प्रत असतांना इतर आवश्यक मालमत्तेची मालकी हक्काची कागदपत्रे दर्शविलेली नाही. तसेच माहिती पत्रकावर मोजमाप घेतलेल्या दुय्यम आवेक्षक यांची स्वाक्षरी नाही तसेच घरमालक व भोगवटा धारकाची स्वाक्षरी नाही.

विभागास अर्धसमास पत्र क्र.३ अन्वये मालमत्ताधारकाची यादी देवून त्यावर खुलासा मागविण्यात आला होता. परंतू अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. प्रकरणात एका इमारतीतील एकाच फ्लॅटचे मोजमाप घेवून इतर सर्व फ्लॅटला सारखीच कर आकारणी करणे ही बाब आक्षेपार्ह आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची - ड चे प्रकरण ८ कराधान नियम मधील तरतूदीनुसार प्रत्येक मालमत्ता धारकाचे स्वतंत्र कर आकारणी संबंधीचे अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे. एकाच फ्लॅटच्या मोजमापानुसार इतरही फ्लॅट त्याचसारखे असतील असा अंदाज बांधून करआकारणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या प्रकरणी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच करण्यात आलेली कर आकारणी योग्य असल्याबाबत प्रत्यक्ष जागेवरील मोजमाप घेवून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ९ :आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये मालमत्ता कर आकारणी करतांना एकच करयोग्य मूल्य दर्शविणे बाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विशेष कक्ष विभागात लेखापरीक्षण करीत असतांना खालील मालमत्ता धारकाचे करयोग्य पाहणी केली असता -

| अ.क्र. | मोहल्ला | करयोग्य मूल्य | एकूण कर | कर आकारणी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्णानंद हौसिंग सो.नक्षत्रपार्क | ३२१८<br>दि.१.१.२०१४ | १८५०/- | २४०१/२०१३-१४<br>२४१८/२०१३-१४<br>३१.१.२०१४ | एकूण - १८ |
| २ | कृपानंद हौसिंग सो. | ३२१८<br>१.१.२०१४ | १८५०/- | २४१९/२०१३-१४<br>२४४२/२०१३-१४<br>३१.१.२०१४ | एकूण - ४४ |
| ३ | ब्रम्हानंद हौसिंग सो. | ३२१८<br>१.१.२०१४ | १८५०/- | २४४३/२०१३-१४<br>२४५९/२०१३-१४<br>३१.१.२०१४ | एकूण - १२ |
| ४ | स्वरूपानंद हौसिंग सो. | ३२१८<br>१.१.२०१४ | १८५०/- | २४६०/२०१३-१४<br>२४८३/२०१३-१४<br>३१.१.२०१४ | एकूण - ३४ |

संबंधित मालमत्ताधारकांना मालमत्ता कर आकारणी करतांना एकच करयोग्य मूल्य ३२१८ व एकूण कर १८५०/- दर्शविला असून सर्व घर एकाच टाईपचे असल्याचे करयोग्य मूल्यावरुन दिसून येते. कर आकारणी करतांना मालमत्ता धारकाचे मालकी हक्काचे दस्ताऐवज लावणे आवश्यक असतांना मालकी हक्कांचे दस्ताऐवज नाही. माहितीपत्रकावर स्वाक्षरी नाही.

प्रकरणात एका हाऊसिंग सोसायटीतील एकाच फ्लॅटचे मोजमाप घेवून इतर हाउसिंग सोसायटीला सारखीच कर आकारणी करणे ही बाब आक्षेपार्ह आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूची - ड चे प्रकरण ८ कराधान नियम मधील तरतूदीनुसार प्रत्येक मालमत्ता धारकाचे स्वतंत्र कर आकारणी संबंधीचे अभिलेखे ठेवणे आवश्यक आहे. एकाच फ्लॅटच्या मोजमापानुसार इतरही सोसायटीतील प्लॉटवरील बांधकाम त्याचसारखे असतील असा अंदाज बांधून करआकारणी केल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या प्रकरणी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच करण्यात आलेली कर आकारणी योग्य असल्याबाबत प्रत्यक्ष जागेवरील मोजमाप घेवून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. १० : मालमत्ता कर आकारणी करतांना अपेक्षित भाड्याचा दर प्रति चौ.मी. कमी आकारले बाबत.**

मालमत्ता संगणक क्रमांक E००३११७२,कर आकारणी क्रमांक १६३३/२०१३-१४ दिनांक १.११.२०१३ सिटी सर्व्हे नं. १५९८/१४५, घर क्रमांक १४ मोहल्ला परिमल हौ.सो. गारखेडा ,दिनांक १.१०.२०१३ पासून मालमत्ता कर आकारणी करण्यात आली असून कर आकारणी हिशोब तक्ता पाहणी केली असता एकूण क्षेत्रफळ १४३.४४ चौ.मी. त्यास अपेक्षितभाड्याचा दर ९ रु. प्रति चौ.मी. दर्शवून मासिक अपेक्षित भाडे १२९०.९६ एवढेअसून त्यावर करयोग्य मूल्य १३९४३/- एवढे दर्शविले आहे ते चूकीचे आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे प्रतिवर्ष रक्कम रु.१८१४/- एवढे नुकसान झालेले आहे.

त्याबाबतचा सविस्तर तक्ता खालील प्रमाणे.

| **दर्शविलेले करयोग्य मूल्य निवासी १३९४३ (रु.९ प्रमाणे)** | **पाहिजे असलेले निवासी करयोग्य मूल्य (रु.११ प्रमाणे)** | **फरक (रक्कम रु.)** |
|---|---|---|
| एकूण कर ५८.५%<br>रक्कम रु. ८१५६/- | १७०४२<br>९९७० | ३०९९/-<br>१८१४/- |

म्हणजेच रक्कम रु.१८१४/- प्रतिवर्ष दिनांक १.१०.२०१३ पासून कमी दर्शविला आहे, कर आकारणीसाठी आवश्यक दस्ताऐवज संचिकेत दिसून आलेले नाही.

**विभागाने उपरोक्त बाबतीत लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे होत असलेले आर्थिक नुकसानीबाबत विभागाने आपल्या स्तरावर तपासणी करावी. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करावे. उक्त नुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.**

**परिच्छेद क्र. ११ : मालमत्ता कर आकारणी बाबत. कर आकारणी क्र. २३६४/२०१३-२०१४**

मालमत्ता संगणक क्र.E०० ३१६८७, घर क्र. L-१-२-१, मोहल्ला श्रीरामनगर एन-२, सिडको यांचे मालमत्ता एकूण क्षेत्रफळ ३५.६४ इतके माहिती पत्रकावर दर्शविलेले आहे. या मालमत्तेस दिनांक ०१.०४.२००६ पासून कर आकारणी केलेली आहे.

मात्र मालमत्ता कर निवासी १६.२० m२ इतक्या क्षेत्रफळ भागास दिनांक ०१.०४.२००६ पासून रू.६४०/- इतका कर आकारणी केली व निवासेत्तर क्षेत्रफळ १९.४४m२ इतक्या भागास दिनांक १.४.२०१३ पासून रू.५५५३/- इतका कर आकारणी दर्शविलेली आहे. यामध्ये मालमत्ताचे एकूण क्षेत्रफळास दिनांक १.४.२००६ पासून कर आकारून दिनांक १.४.२०१३ पासून निवासेत्तर दराने कर आकारणी करणे योग्य होते. तथापि प्रकरण विभागाने फेर तपासून खात्री करावी. कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करणे बाबत कळविण्यात आले होते.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्त्ेचा वापर निवासी व निवासेत्तर असा दोन प्रकारचा आहे. वापरानुसार कर आकारणी योग्य झालेली आहे किंवा नाही याची खात्री करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १२ :मालमत्ता कर आकारणी बाबत कर आकारणी क्र.२३६५/२०१३-१४,**
**दिनांक ३०.१.२०१४**

मालमत्ता संगणक क्र.E००३१६८८, घर क्र. L-१-२-२ मोहल्ला श्रीरामनगर N-२ सिडको सदरचे मालमत्तेचे एकूण क्षेत्रफळ ३५.६४ इतकी माहिती पत्रकावर दर्शविलेला आहे.

मात्र प्रत्यक्ष कर आकारणी करतांना निवासी क्षेत्रफळ १६.२०m२ रू.६४०/- प्र.वर्षी दिनांक १.४.२००६ पासून व उर्वरीत क्षेत्रफळ १९.४४m२ रू.५५५३/- प्र.वर्ष दिनांक १.४.२०१३ पासून कर आकारण्ी केलेली आहे. वास्तविक एकूण क्षेत्रफळ ३५.६४ यावर दिनांक १.४.२००६ पासून कर आकारणी करून दिनांक १.४.२०१३ पासून उर्वरीत क्षेत्रफळ १९.४४m२ वर आकारणी करणे योग्य. तथापी प्रकरण विभागाने पुन्हा तपासून खातरजमा करावी. कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करणे बाबत कळविण्यात आले होते.

**विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १३ : कर आकारणी कमी दर्शविले बाबत. (अवैध बांधकाम mix)**

विशेष कक्ष विभागात लेखापरीक्षण करीत असतांना लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, कर आकारणी क्रमांक २७०१/२०१३-१४ दिनांक २४.२.२०१४ सिटी सर्व्हे नं.२०/१ गारखेडा, ३० मोहल्ला भुषण नगर (पहाडे कॉर्नर जवळ) मालमत्ता कर आकारणी हिशोब तक्ता पाहणी केला असता क्षेत्रफळ निवासी ३६.८७ m२ वर प्रति चौ.मी. ११ प्रमाणे लावणे आवश्यक असतांना संबंधितांनी बांधकामाचा प्रकार (अ) असतांना ८/- रू. प्रति चौ.मी.अपेक्षित भाडे वसूल केलेले आहे.

म्हणजेच ३६.८७X११ = ४०५.५७
३६.८७X०८ = २९४.४८ (दिनांक १.४.२०१३ पासून)
एकूण १११.०९ कमी

एकूण १११.०९ प्रति वर्ष भाडे कमी दर्शविले आहे. त्यामुळे कर योग्य मूल्य ११९९ रु.कमी दर्शविले आहे.६८९X२=१३७८ प्रतिवर्ष प्रमाणे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच राज्य शिक्षण कर ५% प्रमाणे घेणे आवश्यक असतांना १% कमी दर्शविला आहे. मालमत्ता करासाठी आवश्यक दस्ताऐवज संचिकेमध्ये दिसून आलेले नाही.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १४ : व्यावसायिक मालमत्ता कर आकारणी करतांना माहिती पत्रकात मोजमाप कमी दर्शविले बाबत.**

विशेष कक्ष विभागात चाचणी लेखापरीक्षण करीत असतांना लेखापरीक्षणा दरम्यान भोगवटाधारक हॉटेल अव्होन इंटरनॅशनल,मुकुंदवाडी गांव, (अनाधिकृत बांधकाम) यांनी कर आकारणी क्रमांक १७०५/१३-१४, दिनांक २०.११.२०१३ रोजी मालमत्ता कर आकारणी करण्यासाठी माहिती पत्रकावर मोजमाप दर्शविण्यात आले आहे. एकूण मोजमाप ५६१.१८ $m^२$ एवढे दर्शविले असून दर्शविलेले मोजमाप हे चूकीचे आहे. प्रत्यक्षात एकूण मोजमाप ६०५.२१ $m^२$ एवढे दर्शविणे आवश्यक होते.

मोजमाप ६०५.२१ $m^२$ नुसार मासिक अपेक्षित भाडे १६९४७/- एवढे येईल व एकूण कर योग्य मूल्य १८३०२८ एवढे होवून त्यावर एकूण कर ९४.५% नुसार १७२९६१ व अनाधिकृत बांधकाम असल्यामुळे १७२९६१X२ = ३४५९२२/- प्रतिवर्ष मालमत्ता कर आकारणी करणे आवश्यक आहे.

म्हणजेच संबंधिताने ३४५९२२-३२०७५६= २५१६६/- रु. मा.कर कमी आकारल्याचे स्पष्ट होते. तसेच संबंधित मालमत्ता धारकाने कोणतेही कागदपत्र व माहिती पत्रकावर सही दर्शविलेली नाही.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १५ : मालमत्ता कर आकारणी करतांना क्षेत्रफळ कमी दर्शविणे बाबत. कर आकारणी क्र.२६७८/२०१३-१४, दिनांक ६.३.२०१४ अन्वये दिनांक ०१.०१.२०१४ पासून आकारणी. (मालमत्ता संगणक क्रमांक F००४४२८७)**

मालमत्ता कर आकारणी क्र.२६७८/१३-१४ दिनांक ६.३.२०१४ अन्वये मालमत्ता क्षेत्रफळ ३८६.५२$m^२$ दर्शवून प्रतिवर्ष मालमत्ता कर रू.१,१०,४४५/- इतका आकारणी दिनांक १.१.२०१४ पासून केलेली मालमत्ता कर आकारणी खास नोटीस वरुन दिसते.

वरील प्रकरण तपासणी करतांना मालमत्तांचे क्षेत्रफळ परिगणीत केले असता माहिती पत्रकावरील दर्शविलेले ३८६.५६ $m^2$ ऐवजी ४०२ $m^2$ इतके येते. त्यानुसर NRV १२१५६५/- होते आणि प्रतीवर्ष मालमत्ता कर रू.११४८७९/- इतका निश्चित होतो. म्हणजेच रू.४४३४/- इतका कमी कर आकारणी केल्यामुळे परिणामी मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १६ : मालमत्तेचे क्षेत्रफळ कमी दर्शवून मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र.F००४४८३६, शॉप क्र. १ व गोडावून शहर भूमापन क्र.१५८४७/८४ उद्योगशक्ती अपार्टमेंट गारखेडा या मालमत्तेस दिनांक २३.२.२०११ पासून कर आकारणी क्र.२९७४, दिनांक १५.३.२०१४ अन्वये रक्कम रू.३३७१८/- कर योग्य मूल्य ठरवून प्रतीवर्ष रक्कम रू. ३१८६४/- मालमत्ता कर आकारण्यात आलेला आहे. प्राप्त कर आकारणी संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह आहेत.

१. माहिती पत्रकावर घरमालक तथा भोगवटा धारकाची स्वाक्षरी नाही.

२. करयोग्य मूल्य रू.३३७१८/- असून त्यास अंतीम मान्यता प्रदान करतांना सक्षम प्राधिका-याची मान्यता नाही.

३. संदर्भीय दुकानाच्या खरेदीखता मध्ये नमूद दुकान क्र.१ व गोडावूनचे क्षेत्रफळ २३०.४९ चौ.मी.दर्शविलेले आहे. प्रत्यक्षात कर आकारणी १११.४९ चौ.मी.क्षेत्रफळावर झालेली आहे. खरेदी खतातील क्षेत्रफळ आणि कर आकारणी केलेले क्षेत्रफळ वजा जाता ११९ चौ.मी.वर पुढील प्रमाणे कर आकारणी अपेक्षित आहे.

   खरेदी खतामध्ये दर्शविलेल्या जागेच्या क्षेत्रफळानुसार कर आकारणी केलेली नाही. ११९ चौ.मी. x २८ = ३३३२x१२, ३९९८४-३९९८ = ३५९८६ कर योग्य मूल्य असून ९४.५०% व्यायवसायीक दराने रू.३४००७/- प्रतीवर्ष मालमत्ता कराचे आर्थिक नुकसान झालेले आहे. म्हणजेच जवळपास तीन वर्षापासून एकूण ३४००७x३=१,०२,०२१/- एवढे आर्थिक नुकसान झालेले असून वसूलीस पात्र आहे.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १७ : व्यावसायिक मालमत्ता आकारणी करतांना मोजमाप कमी दर्शविले बाबत.**
**(संगणक क्रमांक E०००७५४५)**

कर आकारणी क्रमांक २०३५६/२०१३-१४ दिनांक १७.१२.२०१३ सिटी सर्व्हे नंबर १५२९८/४७, घर क्रमांक ०९, मोहल्ला विशालनगर गारखेडा, यांची मालमत्ता कराची संचिका पाहणी केली असता माहिती पत्रकावर निवासेत्तर २३९.८१ $m^2$ क वर्ग बांधकाम दर्शविण्यात आले आहे.

परंतू त्याच अ वर्ग बांधकामासाठी अपेक्षित दर २६ प्रति चौ.मी. दर्शविलेला आहे तो २८ प्रति चौ.मी. दर्शविणे आवश्यक होते. क वर्ग बांधकाम दर १८ रू. दर्शविला आहे. तो रु २०/- होणे आवश्यक होते. संचिकेसोबत आवश्यक कागदपत्र दिसून आलेले नाही.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १८ : मालमत्ता कराची आकारणी करतांना कमी आकारणी करून महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

कर आकारणी क्रमांक २१५७/२०१३-१४ दिनांक १३.१.२०१४ सिटी सर्व्हे क्रमांक १२४८९/१/३५ मोहल्ला मंजीत नगर औरंगाबाद यांना निवासी व्यावसायिक (mix) मा. कर आकारणी करण्यात आली आहे. संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेतील माहिती पत्रक क्रमांक १ एकूण क्षेत्रफळ २०६.०६$m^2$ चे (व्यावसायिक) मोजमाप उपलब्ध असून माहितीपत्रक क्रमांक २ (निवासी) वापर एकूण क्षेत्रफळ १७१. ४५$m^2$ चे माहिती पत्रक संचिकेत दिसून आलेले नाही.

२. उपलब्ध माहिती पत्रकावर घरमालकाची स्वाक्षरी नाही.

३. भोगवटा प्रमाणपत्रानुसार एकूण क्षेत्रफळ ६९२.९० $m^2$ दर्शविले आहे. कर आकारलेले क्षेत्रफळ ३७७.५१ $m^2$ आहे. भोगवट्यातील क्षेत्रफळ वजा जाता ३१५.३९ $m^2$ क्षेत्रफळावर कर आकारणी झालेली नाही असे दिसून येते.

३१५.३९ m x २८ = ८८३१ मासिक करयोग्य मूल्य
८८३१x१२ = १०५९७२
१०% सूट = १०५९७/-
करयोग्य मूल्य = ९५३७५/-

९४.५% एकूण मालमत्ता कर = ९०१२९/- प्रतिवर्ष (१२-२-१३ पासून )

४. भोगवटा प्रमाणपत्रासोबत जोडलेल्या मंजूर नकाशात Store Room चे बांधकाम १०७.१८ $m^2$ दर्शविले आहे. Parking चे बांधकाम १५३.४८ $m^2$ दर्शविले आहे.Parkingचे बांधकाम १५३.४८ $m^2$ एवढे आहे. हे दोन्ही बांधकामे existing basement floor plan असा नकाशात उल्लेख आहे. Parking चे क्षेत्रफळ वगळता store Room हे जर कधी पूर्वीच अस्तित्वात होती. तर Store Room च्या अस्तित्वापासून मालमत्ता कराची आकारणी करणे बंधनकारक आहे. तथापि सदरील प्रकरणी मालमत्ता कर आकारणी करतांना पूर्वीची कर आकारणी मोकळ्या जागेची कर आकारणी केल्याची नोंद आहे.

Store Room : १०७.१८ $m^2$ x २८ = ३००१
३००१ x १२ = ३६०१२
१०% सूट = ३६०१
करयोग्य मूल्य = ३२४११/-
९४.५% = ३०६२८ प्रतिवर्ष (एकूण कर)

म्हणजेच ३०६२८/- प्रतिवर्ष इतका कराचे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. संचिकेतील अभिलेखेनुसार बांधकाम परवानगी उपलब्ध नाही. त्यामुळे प्रत्यक्ष Store Room बांधकाम केव्हा झाले याचा बोध होत नाही. भोगवटा प्रमाणपत्रान्वये सुधारित बांधकाम परवानगी आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये निर्गमित केलेली आहे. त्या आधारे ३ वर्षापूर्वीचे Store Room बांधकाम समजून ३०६२८ प्रतिवर्ष x ३ = ९१८८४/- इतके महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १९ : कर आकारणी क्रमांक २०३७/२०१३-१४ यांची मालमत्ता कर आकरणी बाबत.**

मालमत्ता कर आकारणी क्रमांक २०३७/२०१३-१४ मालमत्ता संगणक क्रमांक F०० ३२२०२ अन्वये व्यावसायिक करयोग्य मूल्य ५५०८० व मोकळ्या जागेचे करयोग्य मूल्य ३७६३२ असे आकारण्यात आलेले आहे. सदरील करयोग्य मूल्यानुसार मालमत्ता कराची रक्कम रू.५२०५१/- व रू.१६९३४/- असे एकूण ६८९८५/- येते.

सदरील संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. कर आकारणी क्रमांक २०३७/२०१३-१४ यांचे कोणत्या वर्षी बांधकाम झाले. त्याबाबतचे कागदपत्र संचिकेत नाही. मालमत्ता संगणक क्रमांक F००३२२०२ या जागेचे कागदपत्र मागवून त्यातील नमूद क्षेत्राप्रमाणे कर आकारणी झाल्याचे खात्री करणे आवश्यक आहे.

२. सदरील कर आकारणी मध्ये मालमत्ता संगणकीय क्रमांक F०० ३२२०२ यांस बांधकाम क्षेत्रास दिनांक १.४.२००८ पासून कर आकारणी केलेली आहे. परंतू याच मालमत्तेच्या व्यावसायिक मोकळ्या जागेचे कर आकारणी दिनांक १.४.२०१२ प्रमाणे करण्याचे प्रयोजन काय होते ही बाब स्पष्ट झालेली नाही.

३. सदरील मालमत्तेस व्यावसायिक मोकळ्या जागेचे क्षेत्र ३५८४.०० चौ.मी. असून त्यास १०.५ प्रमाणे एक महिन्याचे ३७६३२/- रक्कम येते . यास बारा महिन्यासाठी रू.४,५१,५८४/- येते. यास सामान्य कराचा दर ४५% असून २,०३,२१३/- रक्कम सामान्य कराची होते. त्यानुसार कर

आकारणी होणे आवश्यक आहे. परंतु कर आकारणी करतांना रू.१६,९३४/- सामान्य कराची आकारणी करुन रु.१,८६,२७९/- चे प्रतिवर्ष आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. माहिती पत्रकावर घरमालक / भोगवटा धारकाची स्वाक्षरी नाही.

५. औरंगाबाद शहरातील केंद्र सरकारचे कार्यालय सेंट्रल एक्साईज कार्यालय यांना मा.सर्वोच्च न्यायालयाचे सीव्हील अपील क्र. ९४५८-९४६३/२००३ निर्णयानुसार एकूण मालमत्ता कराच्या ७५% सेवा कर आकारण्यात आलेला आहे. त्याप्रमाणेच इतरही केंद्र सरकारचे कार्यालयास सेवा कराची आकारणी केल्यास मनपा तर्फे पुरविल्या जाणा-या सेवांचे वसूली होवून मनपाचा आर्थिक फायदा होईल.

६. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केंद्र सरकारची कार्यालयांना सेवा कराची आकारणीचे पुर्णमूल्यांकन करावे. संबंधितांकडून सेवा कराची वसूली अंती अनुपालन दर्शवावे.

**उक्त मुद्या क्र.१ ते ६ बाबत विभागाकडून खुलासा मागविण्यात आला होता. लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा केलेला नाही. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २० : मालमत्ता कर आकारणी बाबत. कर आकारणी क्र.१२४९/२०१३-१४,**

मालमत्ता कर आकारणी क्रमांक १२४९/२०१३-१४, मालमत्ता संगणकीय क्रमांक E००३०८७९ घर क्रमांक २०/A सर्व्हे नंबर ४८ मोहल्ला गारखेडा, यांचे एकूण क्षेत्रफळ २८५.१४ चौ.मी. इतके माहिती पत्रकावर दर्शविलेले आहे. या मालमत्तेच्या मोकळ्या जागेस दिनांक १.४.२०१३ पासून कर आकारणी करण्यात आली.

मात्र सदरील मालमत्तेस गुंठेवारी नियमितीकरणाचा दाखला दिनांक १८.१०.२०११ पासून देण्यात आलेला आहे. म्हणजेच संबंधितास मोकळ्या जागेचा मालमत्ता कर दिनांक १.४.२०१३ पासून न आकारता त्यास दिनांक १८.१०.२०११ पासून मोकळ्या जागेचा कर आकारणे आवश्यक होते.

**तथापि प्रकरण विभागाने फेर तपासून अनुपालन सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त बाबतीत महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २१ : मालमत्ता कराची आकारणी करतांना कमी आकारणी करून महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

मालमत्ता कर आकारणी क्रमांक १०३०/२०१३-१४, दिनांक ६.७.२०१३, सर्व्हे नंबर १७/p एन-८ जसवंतसिंगपुरा, सिडको औरंगाबाद, निवासेत्तर यांना कर आकारणी करण्यात आली असून सिडको बांधकाम परवाना क्रमांक सिडको/BP/ATPO/५९१/ दिनांक १८.९.९३ अन्वये -

B.Area - २१४.३६$m^२$ दर्शविला.

माहिती पत्रकातील मोजमाप - ८३.८७ $m^२$ निवासेत्तर.

१३०.४९ $m^२$

मालमत्ता कर कमी दर्शविला आहे.

१३०.४९ $m^२$ x २१ = २७४०/-

२७४० x १२ = ३२८८०/-

१०% सुट = ३२८८/-

करयोग्य मूल्य (निवासेत्तर)२९५९२/-

८७% एकूण मालमत्ता कर = २५६९८/- प्रतिवर्ष [१-४-१२]

म्हणजेच प्रतिवर्ष मालमत्ता कर रु.२५७४५/- महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**तथापि प्रकरण विभागाने फेर तपासून अनुपालन सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त बाबतीत महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.: २२ मालकी हक्काचे कागदपत्रावरील नावे व मालमत्ता धारकाचे नावें वेगवेगळी असतांना नामांतर मंजूर करणे बाबत.**

१. कर आकारणी विभागाचे नामांतर संचिकेत आदेश क्र.नामांतर /५३३/१३, दिनांक १६.९.२०१३ अन्वये सीटीएस क्र.१२३५९, घर क्र.४-१३-५२ बायजीपुरा येथील मालमत्ता नामांतर करतांना संचिकेत प्राप्त अभिलेख्यानुसार नविन मालकाने दिलेली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनूसूची ५ मधील प्रकरण -८ नियम (२) पोट नियम (३) नुसार मनपास दिलेली नोटीस मधील पूर्वीच्या घरमालकाचे नावे आणि नामांतर मंजूर करतांना पूर्वीच्या घर मालकाचे नांव यात तफावत आहे. नोटीस मधील नांव मनपा अभिलेख्यात नसतांनाही नामांतर मंजूर करण्यात आलेले आहे. जे नियमबाह्य आहे.

२. कर आकारणी विभागाचे नामांतर संचिकेत आदेश क्र.नामांतर /५२५/१३, दिनांक १२.९.२०१३ अन्वये सीटीएस क्र.१५८४७/१७५, प्लॉट क्र.१२, गारखेडा येथील मालमत्ता नामांतर करतांना संचिकेत प्राप्त अभिलेख्यानुसार नविन मालकाने दिलेली महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनूसूची ५ मधील प्रकरण -८ नियम (२) पोट नियम (३) नुसार मनपास दिलेल्या नोटीस मधील पूर्वीच्या घरमालकाचे नाव आणि नामांतर मजूर करतांना पूर्वीच्या घर मालकाचे नाव यात तफावत आहे. नोटीस मधील नाव मनपा अभिलेख्यात नसतांनाही नामांतर मंजूर करण्यात आलेले आहे. जे नियमबाह्य आहे.

**उक्त दोन्ही प्रकरणांबाबत विभागास खुलासा सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. तथापि विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून कर आकारणी विभागाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील दर्शविलेल्या तरतूदीप्रमाणे कामे करणे आवश्यक आहे. वरील दोन्ही प्रकरणात नियमबाह्य कामे झालेली असल्याने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २३ : मालमत्ता कराची आकारणी करतांना मालमत्तेचे क्षेत्र कमी दर्शविल्याबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विशेष कक्ष विभागात लेखापरीक्षण करीत असतांना लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, मालमत्ता क्र.B००३८७४८,प्लॉट क्र. D-८०,चिकलठाणा , MIDC , Industrial Area यांना MIDC यांनी त्यांचे पत्र क्र.DB/१३०१/२०१०, दिनांक २०.७.२०१० अन्वये ६२,६९४.१५ चौ.मी. इतके बांधकाम करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. तद्नंतर सदरील परवानगीच्या अनुषंगाने एकूण ६०,५६६.११ चौ.मी. Builtup Area व ५२,०३४.१५ चौ.मी. इतक्या मोकळ्या जागेचे भागश: भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे अभिलेख्यातील कागदपत्रांच्या नुसार निर्देशनास आले.

सदरील मालमत्तेस आकारण्यात आलेले कर आकारणी बाबतचे हिशेब तक्ता तपासला असतांना एकूण ५२,२०३.५७ चौ.मी. क्षेत्रफळास कर आकारणी झालेली आहे. भागश: भोगवटा प्रमाणपत्रातील बांधकाम पूर्णत्वाच्या क्षेत्रफळापैकी १०,४९०.५८ चौ.मी. इतके क्षेत्र कमी दर्शविण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरील क्षेत्रावर रू.३१,७२,३५१/- त्यावर ९४.५% कर रूपये २९,९७,८७२/- प्रतिवर्ष होतो. कमी क्षेत्र दर्शविल्यामुळे प्रतिवर्ष रक्कम रू.२३,८९,७४६/- इतके आर्थिक नुकसान झाले आहे. झालेले आर्थिक नुकसान हे भोगवट्याच्या तारखेपासून होत आहे.

भागश: भोगवटा प्रमाणपत्रात मोकळ्या जागेचे क्षेत्र ५२,०३४.१५ चौ.मी. दर्शविलेले असून प्रत्यक्ष मोकळ्या जागेची कर आकारणी ७५० चौ.मी. वर आकारण्यात आलेली आहे. भागश: भोगवटा प्रमाणपत्रातील मोकळी जागा व आकारलेल्या मोकळ्या जागेवरील कराचे क्षेत्रफळ यामध्ये ५१२८४.१५ चौ.मी. इतकी तफावत आहे. मोकळ्या जागेचे करयोग्य मुल्य रक्कम रू.७६,९२,६२२/- होते. त्यावर ४५% सामान्य कर, रक्कम रू.३४,६१,६८०/- प्रतिवर्ष आकारावयास पाहिजे होता. भागश: भोगवटा प्रमाणपत्रातील नोंदीनुसार कराची आकारणी केलेली नसल्याने भोगवट्याच्या तारखेपासून महानगरपालिकेचे प्रतिवर्ष रक्कम रू.३४,६१,६८०/- रकमेचे आर्थिक नुकसान होत आहे.

**उपरोक्त मुद्याप्रमाणे प्रतिवर्ष रक्कम रू. ६४,५९,५५२/- इतक्या मालमत्ता कराचे आर्थिक नुकसान झाले असून प्रथम कर आकारणीच्या वर्षापासून म्हणजेच सन २०१०-११ ते सन २०१३-१४ एकूण चार वर्षाची रू.२,५८,३८,२०८/- इतकी रक्कम वसूलीस पात्र आहे.**

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २४ : करयोग्य मूल्य रू.२५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या मालमत्तांची कर आकारणी करतांना कर निर्धारक व संकलक यांची मान्यता न घेतल्याबाबत.**

कर आकारणी विभागाचे लेखापरीक्षणा दरम्यान कर आकारणी विभागातून प्राप्त अभिलेख्यात जा.क्र.मनपा/विक/करआ/२४५०/२०१३, दिनांक १४.१०.२०१३ चे आदेश पाहावयास मिळाले. त्यानुसार कर आकारणी केलेल्या प्रकरणांची तपासणी केली असता त्यातील काही प्रकरणे उक्त आदेशात नमूद सक्षम प्राधिकरणाची मान्यता न घेताच अंतिम करण्यात आलेले आहे. अशा नाममात्र प्रकरणांची यादी अर्धसमास पत्र क्र.२० सोबत देण्यात आलेली आहे.

सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसतांना मालमत्तावर कर आकारणी करणे ही बाब नियमबाह्य आहे. नाममात्र प्रकरणा सोबत कर आकारणी विभागाने उक्त आदेशानुसार इतरही सर्व प्रकरणांत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवून अंतीम केलेले आहेत किंवा नाही याची खातरजमा करावी असे कळवून खुलासा मागविण्यात आला होता.

**विभागाने उक्त बाबींचा केलेला खुलासा असमाधानकारक असून सक्षम प्राधिकरणाची मान्यता विना काम करणे, ही बाब नियमबाह्य आहे. या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही अंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २५ : मालमत्ता नामांतर शुल्क कमी आकारले बाबत व मालमत्ता कर कमी लावले बाबत.**

P.No.९, एन-२,सिडको औरंगाबाद मालमत्ता क्रमांक E००२३४६६ या मालमत्ताधारकाचे जा.क्र./नामांतर/३९८/१३, दिनांक २५.७.२०१३ अन्वये नामांतर करण्यात आले असून, सिडको Shoplet/Plot Transfer Order, सिडको,ADM /AEO /AOR /२०१३/१६६९, दिनांक ३.६.२०१३ अन्वये सदरील Plot हा व्यावसायिक असून व्यावसायिक मालमत्ता नामांतर करतांना नामांतर शुल्क २०००/- रू. वसूल करणे आवश्यक असतांना रू.१००/- दिनांक २२.७.२०१३ रोजी वसूल केल्याचे दिसते. म्हणजेच रक्कम रू.१०००/- कमी वसूल करण्यात आले आहे.

तसेच सिडको /प्रशा/मालमत्त/औ./२०१३/१९०९, दिनांक १५.५.२०१३ अन्वये शॉपलेट भुखंडाचे क्षेत्रफळ २७.०० चौ.मी. असून शॉपलेट भूखंडावर एकूण १९.८० चौ.मी. बांधकाम दर्शविले असतांना त्यावर मालमत्ता कर आकारलेला दिसून आलेला नाही.

मालमत्ता कर पावती क्रमांक AS/१००९२,दिनांक २८.६.२०१३ अन्वये सन २०१३-१४ मोकळ्या जागेचा कर रुपये ९१/- प्रतिवर्ष मागील थकबाकी सह रक्कम रू.३२१/- नाममात्र मालमत्ता कर वसूल करून बे-बाकी, (२०११-२०१४) प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

प्रत्यक्षात मालमत्ता कर वसूल करतांना खालील प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करून कर वसूली करणे आवश्यक होते.

| मोकळ्या जागेचा कर | शॉपलेट बांधकाम |
|---|---|
| ७.२ चौ.मी. X १२.५० = ९० मासिक भाडे | १९.८० X २८ = ५५४/- मासिक भाडे |
| ९० X १२ = १०८० (करयोग्य मूल्य) | ५५४ X १२ = ६६४८/- |
| ४५ % = ४८६ /- (प्रति वर्ष) (सामान्य कर) | १०% सूट = ६६५/- |
| | करयोग्य मूल्य ५९८३ |
| | ९४.५% = ५६५४/- (प्रति वर्ष) |

**विभागाकडून प्राप्त खुलासा असमाधानकारक आहे. महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २६ : विशेष कक्ष (कर आकारणी) विभाग येथे मालमत्ता नामांतर करतांना सक्षम प्राधिकारी यांची अंतीम मान्यता न घेणे बाबत.**

विशेष कक्ष विभागात महानगरपालिकेच्या हद्यीतील विविध वॉर्डातील मालमत्ता नामांतर करण्यात आलेल्या संचिका तपासल्या असता नामांतर झालेल्या संचिकेत मालमत्ता नामांतर करत असतांना त्यावर सक्षम प्राधिकारी यांची अंतीम मान्यता घेणे आवश्यक असतांना त्यांची अंतीम मान्यता घेतली नसल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या इतरही नोंदी असल्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्धसमास पत्र क्र.२७ सोबत नाममात्र प्रकरणांची यादी दिलेली होती. सदरील प्रकरणी विभागाकडून खुलासाही मागविण्यात आलेला होता.

**विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेविना मंजूर केलेली प्रकरणांबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २७ : मालमत्ता कराची थकबाकी पाणीपट्टी व एन.ए.टॅक्स वसूल न केल्यामुळे मनपाचे व शासनाचे झालेले आर्थिक नुकसानी बाबत.**

विशेष कर आकारणी विभागाचे लेखापरीक्षण कार्यरत असून लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, कर आकारणी विभागाने कार्यालयीन आदेश क्र. नामांतर/४०४/१३, दिनांक २५.७.२०१३ अन्वये सीटीएस क्र.१९९८९ संगणकीय मालमत्ता क्र. D००२२६२९, पद्मपुरा या मालमत्तेचे नामांतर केलेले आहे. नामांतर करतांना मनपाचे थकीत कर चालू वर्षापर्यंत वसूल केल्या जातात. परंतू मालमत्ता कर सन २०१२-१३ पर्यंत वसूल केला. परंतू चालु वर्षाचा मालमत्ता कर वसूल केलेला नाही. तसेच पाणीपट्टी व एन.ए.ची वसूलीची पावती जोडलेली नाही.

**विभागाकडून प्राप्त खुलासा असमाधानकारक आहे. महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २८ : महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची -ड चे प्रकरण ८ मधील नियम (२) पोटनियम (३) नुसार मालमत्ता नामांतरची नोटीस व मंजूर नामांतर या दोन्ही मध्ये मिळकत विकणा-याच्या नावातील तफावती बाबत.**

विशेष कर आकारणी विभागाचे लेखापरीक्षण कार्यरत असून लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, नामांतर संचिकेतील मिळकत धारकाने अधिनियमातील तरतूदी नुसार दिलेल्या नोटीस मध्ये मिळकत विकणा-याचे नांव प्रल्हाद दौलतराव चव्हाण असे नमूद आहे. कार्यालयीन आदेश क्रमांक नामांतर/४०२/१३, दिनांक २५.७.२०१३ अन्वये सदरील मालमत्ता संतोष भिमराव चिमणे यांचेकडून खरेदी केल्याचे दर्शवून घर क्र. C-१-५७ पोलिस कॉलनी, एन-७ येथील मालमत्तेचे नामांतर सौ.मनिषा उत्तमराव जाधव यांचे नांवे केलेले आहे. दोन्ही अभिलेख्यात मिळकत विकणा-याचे नावात तफावत आहे.

संचिकेत प्राप्त अभिलेख्यानुसार सदरील मालमत्ता सिडको कार्यालयाचे मालमत्ता हस्तांतरण आदेश क्र. CIDCO/ADM/AEO/AVR/२००७/१२०१, दिनांक २८.६.२००७ अन्वये संतोष भिमराव चिमणे यांचे नावावरून प्रल्हाद दौलतराव चव्हाण यांचे नावे केलेली आहे. मनपा अभिलेख्यात संतोष भिमराव चिमणे यांचे नावे मालमत्ता आहे. त्यामुळे सदरील मालमत्तेचे नामांतर करतांना प्रथमत: प्रल्हाद दौलतराव चव्हाण यांचे नांवे नामांतर करणे आवश्यक होते. प्रल्हाद दौलतराव चव्हाण यांचे नावावरून मनिषा उत्तमराव जाधव (सुरडकर) यांचे नांवे मालमत्ता हस्तांतरण आदेश क्र. CIDCO/ADM/AEO/AVR/२०११/६०४, दिनांक ११.५.२०११ अन्वये झालेले आहे. नामांतर करतांना प्रथम झालेल्या व्यवहारातील नामांतराचा विचार विभागाने केलेला नाही. तसेच मनपास प्राप्त होणारी नामांतर फी चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

**विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे नामांतर करतांना शासकीय कार्यालयातील अभिलेखे व महानगरपालिकेतील अभिलेखे व त्यामधील समाविष्ट नांवे यांचा एकमेकांशी ताळमेळ साधणे आवश्यक आहे. महानगरपालिके तर्फे वितरीत केलेल्या नामांतराची कागदपत्रे देतांना संबंधित जागेचा मालकी हक्क ज्या व्यक्तीकडे जातो त्या व्यक्तीच्याच नावे नामांतर झालेले आहे याची खात्री होणे गरजेचे आहे. अशी कार्यवाही होत असतांना एक मालमत्ता अनेक वेळा एकाच्या नावावरून दुस-याच्या नावावर हस्तांतरीत होत असते. त्या प्रत्येक व्यवहाराच्या वेळी संबंधित मालमत्ताधारकाने महानगरपालिकेकडे अर्ज सादर करून नियमानुसार नामांतर फीचा भरणा करणे आवश्यक आहे. उक्त प्रकरणांत असे किती वेळा व्यवहार झ‍ाले त्यानुसार संबंधितांकडून नामांतर शुल्क वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २९ : न्यु एस.टी.कॉलनी मिनाताई ठाकरे नगर P.No.१५० येथील नामांतर करीत असतांना खरेदी खत जोडलेले नाही.**

उक्त संदर्भिय आदेशान्वये विशेष कर आकारणी विभागाचे लेखापरीक्षण कार्यरत असून लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, न्यु एस.टी.कॉलनी, मिनाताई ठाकरे नगर p.no. १५० येथील नामांतर करीत असतांना खरेदी खताची जोडणी केलेली नाही.

**विभागाने प्रत्यक्ष शहानिशा करून अनुपालन दर्शविणे बाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपयंत अनुपालन दर्शविलेले नाही. मालमत्तेचे नामांतर करतांना आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी केली असल्याची विभागाने खात्री करावी व त्यानुसार अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३० : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम अनुसूची - ड चे प्रकरण (८) नियम (४) प्रमाणे निबंधकाकडून माहिती मागविली नसल्यामुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानी संबंधी.**

विषयांकित प्रकरणी मा.आयुक्तांना निबंधकाकडून माहिती मागविण्याची अधिनियमात तरतूद आहे. परंतू खालील नाममात्र प्रकरणाची तपासणी केली असता विभागाने निबंधकाकडून माहिती मागविली नसल्याने सदरील मालमत्तेची खरेदी कोणत्या तारखेस झालेली आहे याचा बोध झालेला नाही. तसेच संबंधित मालमत्तांचे सातबारावर तारीख नसल्यामुळे कराची आकारणी दिनांक १.४.२०१३ पासून केलेली आहे.

१. कर आकारणी क्रमांक २२६९/२०१३-१४, दिनांक २२.१.२०१४, गट क्र.५७, प्लॉट क्र.१९,२०,२१,२८ व २९ मोहल्ला सातारा येथील मालमत्तेस खुल्या भूखंडाची करआकारणी केलेली असून करयोग्य मूल्य ४७,८८०/- इतके आहे.

२. कर आकारणी क्रमांक २२७०/२०१३-१४, दिनांक २२.१.२०१४ ाट क्र.५७, प्लॉट क्र. २२,२३,२६ व २७ मोहल्ला सातारा येथील मालमत्तेस खुल्या भूखंडाची करआकारणी केलेली असून करयोग्य मूल्य ३६,४४४/- इतके आहे.

विभागाने सन २०१३-१४ मध्ये उपरोक्त प्रकरणा प्रमाणेच इतरही प्रकरणांत प्लॉट खरेदीचे कागदपत्रे न तपासता मालमत्ता कराची कर आकारणी केलेली असल्याचे नाकारता येणार नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी व त्या व्यतिरिक्त इतरही प्रकरणे तपासून मालमत्तेच्या खरेदीच्या कागदपत्रानुसार करआकारणी करावी. **महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन सादर करणे बाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३१ : मालमत्तेची कर आकारणी करतांना बांधकाम परवानगी प्रमाणे नमूद मोजमापा पैकी भागश: कर आकारणी केल्याबाबत.**

विशेष कर आकारणी विभागाचे लेखापरीक्षण कार्यरत असून लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने नगर भूमापन क्र.१११४९, मोहल्ला रेल्वे स्टेशन येथे सुधारित बांधकाम परवानगी परवाना क्र. ६८६/२०११-१२, दिनांक १४.११.२०११ अन्वये बांधकाम परवानगी निर्गमित केलेली आहे. सदरील बांधकाम परवानगीनुसार संबंधित जागेवर बांधकाम झाल्याचे दर्शवून केवळ पहिल्या मजल्यावरील ऑफिस क्र. १०१ ते १०४ या मालमत्तेस कराची आकारणी केलेली आहे. उर्वरीत भाग under construction असल्याबाबत नमूद आहे. संचिकेत आढळलेल्या त्रुटी पुढील प्रमाणे -

१. औरंगाबाद महानगरपालिकेने दिलेली बांधकाम परवानगी १४.११.२०११ रोजीची असून त्याचा अंमल परवान्याच्या तारखेपासून १ वर्षापर्यंत राहील असे परवान्यात नमूद असतांना जर तेथील बांधकाम under construction असल्याचे कर आकारणी विभागाचे म्हणणे असेल तर सदरील परवान्यास औरंगाबाद महानगरपालिकेने दिलेल्या मुदतवाढीचे कागदपत्रे संचिकेत असणे आवश्यक आहे.

२. महानगरपालिकेने दिलेल्या परवानगीतील बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते. त्यानंतरच सदरील जागेचा वापर करण्यात येतो. उपरोक्त प्रकरणी चार दुकाने / ऑफिस यांना भागश: भोगवटा प्रमाणपत्र दिलेले असल्यास त्याची सुध्दा प्रत संचिकेत असणे आवश्यक आहे.

**उपरोक्त बाबीचा कागदपत्रासह खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे करण्यात आलेली कर आकारणी योग्य असल्याची खात्री होत नाही. करिता विभागाने सदरील प्रकरणाची तपासणी करून आवश्यक त्या कागदपत्रासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३२ : मालमत्ता कर आकारणी बाबत.**

मालमत्ता शॉप नं.३५ सेक्टर B हडको नविन औरंगाबाद यांची फेर आकारणी करण्यात आली असून फेर आकारणी संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मालमत्ताधारक यांनी फेर आकारणी करण्यासाठी २५.३.२०१३ रोजी अर्ज सादर केला आहे की, माझे N-११-B-३५ मध्ये घर असून त्या समोर एक छोटेसे दुकान आहे. दुकानाचा आकार १०X१२ चे दुकान आहे असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे.

२. सदरील मालमत्तेस पूर्वी कर आकारणी करण्यात आलेली होती. ती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | करयोग्य मूल्य | करआकारणी क्रमांक | एकूण कर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २२६८ | ३१४०७<br>१०.९.२००७ | ५०७०<br>२००६-०९ | निवासेत्तर<br>पावती द्वारे ४२९६९<br>भरणा |
| २ | २१४६ | २२१२<br>३१.१०.२०११ | २०६९<br>१.४.२००६ | निवासेत्तर नोटीस |
| ३ | ५७४९ | १४६१३८<br>१७.६.२०१२ | २९७२८<br>१७.६.२०१२<br>(थकबाकीसह) | निवासी २०१२-१३<br>मा.क्र.B०० २९४५९ |

असे असतांना एकूण क्षेत्रफळ १४.२४ चौ.मी.दर्शवून

१४.२४ x १४ = १९९.३६

२०० x १२ = २४००

१०% सुट = २४०, निवासेत्तर = १.४.२००६ पासून

ह्या तिन्ही करयोग्य मूल्य रद्द करुन मालमत्ता कर आकारण्यात आला आहे. तर येथील निवासी वापराचा मालमत्ता कर संचिकेत लावलेला दिसत नाही.

३. संचिकेत मुंबई प्रांतिक महानगरपालिका,अधिनियम १९४९ मधील प्रकरण - (८) नियम-(८) अन्वये माहिती ३ वेगवेगळे माहिती पत्रकाद्वारे मालमत्ताची नोंद दर्शविली आहे.

| अ.क्र. | प्रकार | मजला | लांबी x रुंदी | क्षेत्रफळ / प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | स्वत: व्यावसायिक | G.F. | ३.३५X ४.२५ | १४.२४ m२ C |
| २ | सिमेंट गोडाऊन शॉप | G.F. | ४.२५ ३.३५ | १४.२४ m२ C |
| ३ | मानसी फुट वेअर | -- | ६.५०X३.९० | २५.३५ |

असे माहितीपत्रक मोजमापासह दर्शविले आहे. तर यावर मालमत्ता कर (व्यावसायिक) आकारलेला नाही.

४. पान क्रमांक N-५ दिनांक ३०.१०.२०१३ रोजी समिती निर्णय नुसार फेर आकारणी करुन जा.क्र.मनपा/वि.क्र./करआ/३६४९/२०१४, दिनांक ६.३.२०१४ अन्वये सुधारित व्यावसायिक मूल्य रु.२१६०/- दिनांक १.४.२००६ पासून कायम करण्यात येते असा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

५. सदरील मालमत्तेची मालकी हक्काबाबतचे कागदपत्र संचिकेत दिसून आले नाही. खुलासा सादर करतांना मालकी हक्कांचे कागदपत्रे सादर करावी.

**तरी याबाबत विभागास उक्त प्रकरणी खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मालमत्ता कराची कर आकारणी करतांना झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन महापालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३३ : मालमत्ता कर आकारणी करतांना आढळलेल्या अनियमिततेबाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र.C०००५२७४ घर क्र. ४-११-४४/२३/P, करीम कॉलनी, रोशनगेट येथील मालमत्तेस दिनांक ११.४.२०१३ पासून कर आकारणी केलेली असून कर योग्य मूल्य रु.२२,३४५/- दर्शविलेले आहे. जूनी कर आकारणी दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत कायम करुन पुढे बंद केली आहे. प्रकरणांत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कर आकारणी संदर्भ क्र.९६३/२०१३-१४ , दिनांक २७.९.२०१३ यास मान्यता देतांना करयोग्य मूल्यामध्ये जुने कर योग्य मूल्य समाविष्ट केलेले नाही.

२. नविन मोजामापाचा नकाशा, बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे संचिकेत नाही.

३. निवासी वापर क्षेत्र १८८.०७ चौ.मी. असूनही मोठे निवासी कराची आकारणी केलेली नाही.

४. हिशेब तक्त्यामध्ये मोजमापानुसार कर आकारणी केलेली असून कागदपत्रे दाखविलेले नाही असे संबंधित कर्मचा-याने टीपणी दर्शविलेले आहे. परंतू नगररचना विभागाशी समन्वय साधून झालेले बांधकाम, बांधकाम परवानगी घेवूनच झालेले आहे किंवा कसे याची खात्री विभागाने केलेली नाही. विना परवानगी बांधकाम असल्यास अधिनियमातील तरतूदीनुसार शास्ती लावणे आवश्यक आहे.

**विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. सदरील प्रकरणात नगररचना विभाग यांच्याशी समन्वय साधून मालमत्ता कर आकारणी केलेल्या मालमत्तेचे बांधकाम हे वैध आहे की अवैध याची खात्री करुन अवैध बांधकाम असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार शास्ती आकारुन मालमत्ताच्या कराची वसूली होणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३४ : व्यावसायिक मालमत्ता कराची आकारणी भोगवटयाच्या तारखेपासून न केल्याबाबत.**

कर आकारणी क्र.अमिनिटी बिल्डींग (सी.टी.एस.नं.१९०४८ व १९०४८/१ जालान नगर) दिनांक १६.४.२०१३ मालमत्ता संगणक क्र. D००२३७१५, जालाननगर यांची संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मोकळ्या जागेचा कर लावलेला नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. भोगवटा प्रमाणपत्र ११.८.२०१० रोजी दिलेले असतांना कर आकारणी ३०.४.२०१२ पासून केलेली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

३. सोबत पूर्वीच्या टॅक्सची काहीही कागदपत्रे जोडलेली नाही. त्यामुळे पूर्वीच्या टॅक्स बाबत बोध होत नाही.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मालमत्ता कर आकारणी करतांना संबंधित मालमत्तेच्या वापर करण्यासाठी इमारत योग्य आहे याचे भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेने निर्गमित केलेले असतांनाही भोगवटयाच्या प्रमाणपत्राच्या तारखेपासून कराची आकारणी केलेली नसल्याने मालमत्ता कराचे आर्थिक नुकसान झालेले आहे. या संबंधी जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांचे विरूध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच संबंधित मालमत्ता धारकाकडून भोगवटा प्रमाणपत्राच्या तारखेपासून मालमत्ता कराच्या वसूली अंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३५ : बांधकाम परवानगी क्र.७११/२००६-०७, दिनांक २६.२.२००७ अन्वये बांधकाम परवानगी गृहीत धरून मालमत्ता कराची आकारणी करणे बाबत.**

कर आकारणी क्र.१८/२०१३-१४, दिनांक १७.४.२०१३ संगणकीय मालमत्ता क्र.A००२६६३५, घर क्र.१-३-६०/१ सीटी सर्व्हे नंबर १७१२/१०, १७१३/१, बेगमपुरा या मालमत्तेस जुनी कर आकारणी दिनांक २८.२.२०१३ पर्यंत व पुढे नविन करयोग्य मूल्य क्र. ११६३२/- अन्वये मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे. झालेल्या कर आकारणी संदर्भाने खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. बांधकाम परवानगी क्र.७११/२००६-०७ दिनांक २६.२.२००७ यास एक वर्षापर्यंत मुदत आहे. नगररचना विभागाने सदरील परवानगीस मुदतवाढ किती वेळा दिली याची कागदपत्रे नाहीत.

२. भोगवटा प्रमाणपत्र नसतांना दिनांक १.३.२०१३ पासून मालमत्ता कराची आकारणीची तारीख कोणत्या आधारे नक्की केली याचा बोध होत नाही.

३. बांधकाम परवानगी सोबत नकाशाची प्रत नसल्यामुळे झालेले बांधकाम व आकारणी केलेले क्षेत्र याचा ताळमेळ साधता आला नाही.

४. जूनी कर आकारणी संदर्भाने कर वसूलीचे कागदपत्रे संचिकेत नाही.

५. जुने बांधकाम पूर्णपणे पाडूनच नविन बांधकाम केल्याचे कागदपत्रे संचिकेत नाही.

६. उपरोक्त मुद्दा क्र. ५ प्रमाणे जुने बांधकाम तसेच ठेवून कर आकारणी केलेली असल्यास नविन कर योग्य मूल्य ठरवितांना जुने कर योग्य मूल्य समाविष्ट करणे अपेक्षित आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. सदरील मुद्येनिहाय खुलासा विभागाने करणे आवश्यक आहे. मालमत्ता कराची आकारणी करतांना महानगरपालिकेचे नुकसान झालेले नाही याची खात्री लेखापरीक्षणास झालेली नाही. याबाबत कागदपत्रासह सविस्तर अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३६ : भोगवटा प्रमाणपत्रातील एकूण क्षेत्रफळ व प्रत्यक्ष मोजमापातील क्षेत्रामध्ये असलेल्या तफावतीबाबत.**

कर आकारणी विभागाचे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असून लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, कर आकारणी क्र.८७१/२०१३-१४, दिनांक ३१.८.२०१३ अन्वये सिटी सर्व्हे क्र.२०४९८, प्लॉट क्र.१४७, समर्थनगर, संगणकीय क्र. D०० २४०६४ या मालमत्तेस कर आकारणी केलेली आहे. दिनांक १०.६.२०१३ पासून करयोग्य मूल्य, रू.२,१७,५४४/- निश्चित केले आहे. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. जा.क्र.मनपा/नरवि/भो.प्र./२२/१७/२०१३-१४, दिनांक १०.६.२०१३ अन्वये एकूण बांधकाम क्षेत्र ४६१.५३ चौ.मी. करीता भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केलेले असतांना प्रत्यक्षात माहिती पत्रकातील मोजमापानुसार ७१९.४१ चौ.मी.क्षेत्र दर्शविलेले आहे. २५७.७८ चौ.मी.क्षेत्राचे अवैध बांधकाम झाल्याचे संचिकेतील प्राप्त अभिलेख्यानुसार निदर्शनास येते. अवैध बांधकाम क्षेत्रास अधिनियमातील कलम २६७/ अ नुसार दुप्पट मालमत्ता कर आकारणी शास्ती म्हणून करणे अपेक्षित आहे.

२. माहिती पत्रकावर घरमालक / भोगवटा करणा-याची स्वाक्षरी नाही.

३. भोगवटा प्रमाणपत्रासोबत नकाशा जोडलेला नाही.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. तसेच अवैध बांधकामाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३७ : महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ प्रमाणे अवैध बांधकामास बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील त्याबाबत सन २००८ मधील अधिनियमातील दुरूस्ती प्रमाणे कर वसूली झालेली नसल्याबाबत.**

कर आकारणी संदर्भ क्र.१३७७/२०१३-१४ दिनांक २१.१.२०१४ अन्वये सीटी सर्व्हे नंबर १२१६९ कपास गिरणी समोर बायजीपुरा मुख्य रस्ता येथील मालमत्तेस दिनांक १.४.२०१३ पासून कर योग्य मूल्य रू.२,२९,४०३/- या रकमेवर व्यावसायीक दराने मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे. सदरील जागेवर झालेले बांधकाम अनधिकृत बांधकाम दर्शवून मालमत्ता कर शास्ती म्हणून दुप्पट आकारण्यात आलेला आहे.

अधिनियमात अनाधिकृत बांधकामास शास्ती म्हणून मालमत्ता कर दुप्पट दराने आकारण्याची तरतूद कलम २६७ (अ) ही सन २००८ पासून लागू करण्यात आलेली आहे. प्रत्यक्षात कर आकारणी दिनांक १.४.२०१३ पासून केलेली आहे. बांधकाम केव्हा झाले याबाबत संचिकेत कागदपत्रे नसल्यामुळे खात्री झालेली नाही. तसेच सदरील जमिनीचे खरेदी खत प्रत सुध्दा उपलब्ध नाही. सन २००८ ते २०१३ पर्यंत मनपाचे आर्थिक नुकसान प्रती वर्ष रक्कम रू.४,३३,५६८/- प्रमाणे रू.२१,६७,८४०/- रकमेचे झालेले आहे. तसेच आकारलेला मालमत्ता कराची नोंद संगणकात झाली याची खात्री झालेली नाही.

उपरोक्त मुद्यांवर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) प्रमाणे अवैध बांधकामास बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील त्याबाबत सन २००८ मध्ये अधिनियमात झालेल्या दुरुस्ती प्रमाणे कर वसूली झालेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

**उक्त प्रकरणासोबत औरंगाबाद शहरातील इतरही सन २००८ नंतरच्या झालेल्या अवैध बांधकामास आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या प्रकरणाचे पुर्नर्विलोकन करून अधिनियमातील तरतूदीनुसार दुप्पट शास्ती आकारुन, संबंधितांकडून मालमत्ता कर + शास्तीच्या वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३८ : मालमत्ता कर आकारणी करीत असतांना सोबत मालकी हक्काचे कागदपत्रे न जोडल्याबाबत.**

कमल सुगंध अपार्टमेंट, खाराकुऑ,औरंगाबाद येथील फ्लॅट धारकांना मालमत्ता कर लावण्यात आलेला असतांना खालील आक्षेपार्ह बाबी आढळून आल्या.

फ्लॅट नं.२, ६, ५ आणि फ्लॅट नं.७ व ८ यांचे मालकी हक्काचे कागदपत्रे जोडलेली नाहीत. त्यामुळे किती जागेवर मालमत्ता कर आकारावयास पाहिजे होता व खरेदी खत कधी झाले याचा बोध होत नाही. हि बाब आक्षेपार्ह व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

**उपरोक्त बाबत विभागास खुलासा सादर करण्यास कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. सदरील इमारतीस मालमत्ता कराची आकारणी झालेली आहे. कुठलाही भाग सुटलेला नाही याची खात्री विभागाने करून कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३९ : मालमत्ता कर कमी दर्शविल्याबाबत.**

कमल सुगंध अपार्टमेंट, खाराकुऑ, औरंगाबाद येथील फ्लॅट क्र.३ ला मालमत्ता कर आकारण्यात आलेला असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदर अपार्टमेंटचे खरेदी खत २७.६.२०११ vide Registration No. ३५९०-२०११ चे असतांना मालमत्ता कर १.४.२०१३ पासून आकारण्यात आला. त्यामुळे मनपाचे २ वर्षाचे आर्थिक नुकसान झालेले दिसून येते.

२. खरेदी खतात वापरातील जागेचे क्षेत्रफळ ६७.५१ चौ.मी.असतांना मालमत्ता कर ४०.२१ चौ.मी. आकारण्यात आला. ही बाब आक्षेपार्ह व मनपाचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. तसेच अवैध बांधकामाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४० : Indus Tower Ltd. च्या मालमत्ता कर आकारणी बाबत.**

विशेष कक्ष विभागात लेखापरीक्षण करीत असतांना लेखापरीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की , गट नं.१५०, नित्यानंद पार्क, मिटमिटा या टॉवरला मालमत्ता कर आकारणी करण्यात आली असून करयोग्य मूल्य रू.९७२००/-, दिनांक २६.०७.२००९ पासून कर आकारणी करण्यात आली आहे. (९००० प्रति महिन्याप्रमाणे) मालमत्ता आकारणी तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. टॉवरला मालमत्ता टॅक्स लावण्यात आला आहे. परंतू जागेबाबत घरमालकाचे दस्ताऐवज संचिकेत दिसून आलेले नाही.

२. सदरील मोकळी जागा अथवा इमारत आहे याबाबत संचिकेत कोणतेही दस्ताऐवज नाही.

**उपरोक्त बाबत अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मोबाईल टॉवरच्या भाडे करारासंबंधी संचिकेत कागदपत्रे उपलब्ध नाहीत, आकारण्यात आलेला कर योग्य असल्याची खात्री झालेली नाही. करिता विभागाने मोबाईल टॉवरला आकारलेला कर योग्य असल्याबाबत कागदपत्रासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४१ : मालमत्ता कर आकारणी बाबत.**

कर आकारणी संदर्भ ७६४४/२०१२-१३ ची संचिका तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. करयोग्य मूल्य ५४४३/- अन्वये संबंधिताला कर आकारणी करण्यात आली आहे. संबंधिताने जुन्या कर आकारणी नुसार मालमत्ता बुक पावती क्रमांक १२९००L अन्वये दिनांक ०३.०२.२०१२ रोजी सन २०११-१२ पर्यंत भरणा केला आहे. परंतू मालमत्ता कर आकारणी खास नोटीस आकारणी क्रमांक ७६४४/१२-१३, दिनांक ३.२.२०१२ रोजी देवून करयोग्य मूल्य ८२७३/- दिनांक ४.१२.२०१२ रोजी सहाय्यक संचालक नगररचना यांनी रू.७८१७/- दिनांक१.४.२००६ पासून आकारण्यात आले आहे.

२. संबंधिताच्या दिनांक ३१.१२.२०१२ रोजी विनंती अर्ज करुन आक्षेप नोंदविला असून वाढीव मालमत्ता कर मान्य नाही, जुन्या दरानेच कर आकारणी यावी असे नमूद केले आहे. तर संबंधिताने १५ दिवसात आक्षेप नोंदविणे आवश्यक होते.

३. विनंती अर्जानुसार जा.क्र./करआ/७२४/२०१३, दिनांक ५.१.२०१३ रोजी तक्रार सुनावणी नोटीस देण्यात येवून दिनांक ०७.०१.२०१३ रोजी ३.०० वाजता कागदपत्रांसह हजर राहावे असे असतांना संबंधित सुनावणीस हजर झालेले नाही. त्यामुळे समितीने कर आकारणी संदर्भ ७६४४/१२-१३ व्यवसायिक NRV ८२७३/- दिनांक १.४.२०१२ पासून कायम व जुनी ५४४३ दिनांक ३१.३.१२ पर्यंत पुढे बंद असा निर्णय दिला आहे. जर क्षेत्रफळामध्ये बदल (वाढ) झाला असल्याचे संचिकेत निर्णय घेतांना नमूद नाही. फक्त आदेशात नमूद आहे. आदेश क्र. (जा.क्र.मनपा/करआ/वि.क./२३३२, दिनांक १६.९.२०१३) समिती निर्णय घेतांना फक्त ३ सदस्यांची स्वाक्षरी आहे.

४. बांधकामात वाढ असल्याने सन १.४.२०१२ पासून वाढीव कर आकारणी करण्यात आली आहे तर १.४.२००६ पासून लावणे आवश्यक होते. वाढीव बांधकाम कधी झाले याबाबत दिनांक दर्शविलेली नाही.

५. आवश्यक कागदपत्रे व माहितीपत्रके, हिशोब तक्ता संचिकेत नाही.

**तरी याबाबत विभागाने खातरजमा करून कागदपत्रासह अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतूदीनुसार प्रकरणात कार्यवाही झालेली नाही. वाढीव बांधकामाबाबत कागदपत्रे संचिकेत उपलब्ध नाही. प्रत्यक्ष मोजमाप घेवून आकारण्यात आलेला कर योग्य असल्याची खातरजमा करून कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४२ : थकित मालमत्ता कर रू.१,४३,३८८/- वसूल न करता मालमत्ता दुरूस्ती करणे बाबत. (मालमत्ता संगणक क्र.D०००२७८३)**

कर आकारणी क्र.१९९९/१३, दिनांक २५.७.२०१३, प्लॉट नं.२२ एस.बी.एच. कॉलनी,उस्मानपुरा पिर बाजार औरंगाबाद येथे भाडेकरू,उस्मानपुरा पोलिस स्टेशन यांनी सदरील इमारत दिनांक १.४.२०१३ पासून मिळकतधारकाच्या ताब्यात दिल्यामुळे इमारतीचा मालमत्ता कर दुरुस्ती अर्ज व सुनावणी नुसार मालमत्ता कर तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयाप्रमाणे कर दुरुस्ती करण्यात आली.

सदरील प्रकरणी खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कराची फेर आकारणी करतांना संबंधित मालमत्तेवर थकित असलेली रक्कम वसूल करणे आवश्यक आहे. परंतू प्रकरणी संबंधिताकडे दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत कर रु.१,४३,३८८/- थकित असतांना सुध्दा कराचा भरणा न करताच फेर आकारणी बाबत निर्णय घेणे ही बाब महाराष्ट्र अधिनियम १९४९ चे कलम ४०६ मधील तरतूदीच्या विरूध्द आहे. अधिनियमातील तरतूदीचे पालन न केल्याने महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. फेर आकारणी प्रकरणाबाबत कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वि.क./कर/आ/९९९/२०१३ दिनांक २०.२.२०१३ अन्वये गठीत समितीतील सर्व सदस्यांनी सदरचे कर आकारणीस मान्यता प्रदान केल्याचे संचिकेमध्ये नमूद केलेले नाही.

**वरील बाबत विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी व खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त प्रकरणी करात दुरूस्ती करण्यापूर्वी संबंधितांकडे थकीत असलेला मालमत्ता कर वसूल करणेची तरतूद अधिनियमात आहे. त्याप्रमाणे विभागाने वसूली केलेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. कर आकारणी प्रकरणात गठीत समितीची मान्यता संचिकेत नाही. या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४३ : फेर कर आकारणी करतांना मालमत्तेच्या कर आकारणी दिनांक १.४.२००५ ऐवजी १.४.२००९ पासून मंजूर करून मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.**

ऑफिस क्र.१३, पहिला मजला, निराला बाजार, समर्थनगर,औरंगाबाद या मालमत्तेस कर आकारणी क्र.६१५/२०१०-११ नुसार व्यावसायिक वापरानुसार कर आकारणी करण्यात आली होती. संबंधित कर आकारणी दिनांक १.४.२००५ पासून केलेली होती. अर्जदार भोगवटाधारक यांना वॉर्ड कार्यालयाने मालमत्ता कराची कारवाईपूर्व अंतीम नोटीस दिनांक ३०.६.२०१२ रोजी दिलेली आहे. तद्नंतर अर्जदाराने सदरील कराची नोटीस मान्य नसून भाडेतत्वावर घेतलेल्या जागेचा कर दिनांक १.४.२००९ पासून आकारण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे. सदरील प्रकरणी खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. कर आकारणी क्र.६१५/२०१०-११ अन्वये दिनांक १.४.२००५ पासून कर आकारणी करण्यात आली होती. परंतू अर्जदाराचे विनंती नुसार Lease Deed च्या आधारे दिनांक १.४.२००९ पासून कर आकारणी करून मनपाचे चार वर्षाचे नुकसान झालेले आहे.

२. सुनावणी दरम्यान भोगवटाधारक यांनी लीजडीड होण्यापूर्वी कर आकारणी मधील मिळकत रिकामी होती व एम.पी.लॉ कॉलेजच्या ताब्यात होती.

३. कर कमी करण्यापूर्वी जागेचे बांधकाम तथा भोगवटा कोणत्या वर्षी प्रत्यक्षात झालेला आहे याची कागदपत्रे तपासून विभागाने खातरजमा न करताच भोगवटाधारक / अर्जदार यांच्या विनंती नुसार कराची तारीख निश्चीत करणे नियमबाह्य आहे.

४. केलेली कर आकारणी तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार असल्याचे नमूद आहे. तथापि कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वि.क./करआ/९९९/२०१३, दिनांक २०.२.२०१३ अन्वये गठीत समितीतील सदस्यांनी सदरील कर आकारणीस मान्यता प्रदान केल्याचे संचिकेत उल्लेख केलेला नाही.

**वरील बाबत विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी व खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त प्रकरणात आवश्यक ते कागदपत्रे न तपासताच फेर आकारणी झालेली आहे. करात दुरूस्ती करण्यापूर्वी कर आकारणी प्रकरणात गठीत समितीची मान्यता संचिकेत नाही. या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४४ : फेर कर आकारणी करतांना जूनी कर आकारणी रद्द केल्यानंतर त्यामध्ये नमूद क्षेत्रांचा विचार न केल्याबाबत.**

शॉप क्र.३,४,५ धनलक्ष्मी कॉम्प्लेक्स, उस्मानपुरा येथील मालमत्तेस जूनी कर आकारणी क्र. ३१९३/१९९९-२००० अन्वये कर आकारणी केलेली असून कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/कर.आ./वि.क./२१२१/२०१३, दिनांक १९.८.२०१३ अन्वये जूनी कर आकारणी दिनांक ३१.३.२००९ पर्यंत व पुढे बंद असा पत्रात उल्लेख आहे. कर आकारणीच्या संचिकेत पुढील बाबी जोडलेल्या नाहीत.

१. सदरील दिनांक १९.८.२०१३ अन्वये निर्गमित पत्रात संदर्भ क्र.२ नुसार कर आकारणी क्र.२५४६,२५४७,२५४८ व २५५०/२०११-१२ हे विभाजनानुसार झालेले असल्याचे नमूद आहे. प्रत्यक्षात संबंधित मालमत्ता धारकाने स्वयंमूल्यांकन सादर केल्यानुसार कर आकारणी झालेली आहे. त्यामधील मालमत्ता मध्ये फेर आकारणी केलेल्या मालमत्तांचाही समावेश आहे. ही बाब परस्पर भिन्न वाटते.

२. फेर आकारणी केलेला कर दिनांक १.४.२००९ पासून आकारण्याचे प्रयोजन संयुक्तिक नाही. समितीने २०१३-१४ मध्ये निर्णय घेतल्यानंतर मागील वर्षापासून कर कमी करून मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. केलेली कर आकारणी तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार असल्याचे नमूद आहे. तथापि कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वि.क./करआ/९९९/२०१३, दिनांक २०.२.२०१३ अन्वये गठीत समितीतील सदस्यांनी सदरील कर आकारणीस मान्यता प्रदान केल्याचे संचिकेत उल्लेख केलेला नाही.

**वरील बाबत विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी व खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त प्रकरणात आवश्यक ते कागदपत्रे न तपासताच फेर आकारणी झालेली आहे. करात दुरूस्ती करण्यापूर्वी कर आकारणी प्रकरणात गठीत समितीची मान्यता संचिकेत नाही. या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४५ : कर आकारणी संदर्भ क्र.९५२/२०१३-१४ अन्वये केलेली कर आकारणी अंतीम करतांना संचिकेत पूर्वीच्या कर आकारणीचे अभिलेखे नसल्याबाबत व इतर अनियमिततेबाबत.**

जा.क्र.मनपा / वि.क./कर.आ./ २४०७ /२०१३ दिनांक २६.९.२०१३ अन्वये घर क्र.५-५-११० /A, सीटीएस क्र.१७३७५/३, क्रांतीचौक औरंगाबाद या मालमत्तेतील भाडेकरूने घर रिकामे केल्यामुळे फेर आकारणी करण्यात आलेली आहे. फेर आकारणी करतांना खालील बाबींची पूर्तता केलेली नाही.

१. संगणकीय मालमत्ता क्र.D००१९४३७ यास सदरील फेर आकारणी करण्यापूर्वी अस्तीत्वात असलेल्या कर आकारणीचे कागदपत्रे संचिकेत उपलब्ध नाही.

२. सन २०१२-१३ पर्यंत भरणा केलेल्या कराच्या पावत्यांच्या प्रती संचिकेत नाहीत.

३. केलेली कर आकारणी तक्रार निवारण समितीने दिलेल्या निर्णयानुसार असल्याचे नमूद आहे. तथापि कार्यालयीन आदेश क्र.मनपा/वि.क./करआ/९९९/२०१३ दिनांक २०.२.२०१३ अन्वये गठीत समितीतील सदस्यांनी सदरील कर आकारणीस मान्यता प्रदान केल्याचे संचिकेत उल्लेख केलेला नाही.

**वरील बाबत विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी व खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त प्रकरणात आवश्यक ते कागदपत्रे न तपासताच फेर आकारणी झालेली आहे. करात दुरूस्ती करण्यापूर्वी कर आकारणी प्रकरणात गठीत समितीची मान्यता संचिकेत नाही. या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४६ : फेर कर आकारणी करतांना मालमत्ता करात केलेल्या दुरूस्ती बाबत. कर आकारणी क्र.५-२-१९/१, सिटी सर्व्हे नं.१७००७**

घर क्र.५-२-१९/१, उस्मानपुरा (वॉर्ड-ड) येथील मालमत्तेस कर आकारणी क्र.१९१६९२/१२-१३ नुसार व्यावसायिक वापरानुसार कर आकारणी करण्यात आलेली होती.

अर्जदार भोगवटाधारक यांना वॉर्ड कार्यालयाने मालमत्ता कराची खास नोटीस अनुक्रमे १६/१२/११ व ०७/११/१२ दिलेली आहे. तद्नंतर सदरील अर्जदाराने २१/१२/२०१२ रोजी बाहेरगावी असल्याकारणाने विलंबाने आक्षेप दाखल केल्याबाबत कळविले आहे व चालू वर्षापासून टॅक्स आकारण्याची विनंती केली आहे.

सुनावणी दरम्यान भोगवटाधारक यांनी एकूण क्षेत्र ५.३x२.३ चौ.मी. = १२.१९$m^2$ क वर्ग बांधकाम आहे.दुकान नवीन रस्ता ,रुंदीकरणामध्ये घराचा भाग संपादित झाल्यानंतर समोरील भागास शटर लावून दुकानात रूपांतर केले आहे. पूर्वी घर निवासी होते. कर आकारण्यापूर्वी घराचा भाग कधी संपादित झाला याची कागदपत्रे तपासून विभागाने खातरजमा न करताच भोगवटाधारक अर्जदार यांच्या

विनंती नुसार कराची तारीख निश्चित करणे नियमबाह्य आहे. तसेच दिनांक निश्चित करतांना संबंधित जागेत कधी बदल झाला याबाबतची योग्य ती कागदपत्रे सादर केलेली नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मालमत्ता कराची कर आकारणी कागदपत्राच्या आधारे करणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागाने सदरील कर आकारणी योग्य आहे याची खातरजमा करुन आवश्यक त्या कागदपत्रासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४७ : कर कमी करतांना गुंठेवारी क्षेत्र पुंडलिकनगर या भागास कराची आकारणी वर्ष विनापरवाना बांधकाम शास्ती इत्यादी बाबी अधिनियमातील तरतूदींचा विचार न करता अंमलात आणल्याबाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र.E००३०८७०, प्लॉट क्र.१९,२०,२१,२२ स.नं.१६/२, पुंडलिकनगर, गारखेडा या मालमत्तेस कार्यालयीन पत्र क्र. मनपा/प्र.अधिई/६७०/२०१४, दिनांक २८.३.२०१४ अन्वये फेर आकारणी केलेली असून खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) अधिनियमात २००८ पासून समाविष्ट केले असतांना शास्ती २०१२ पासून कोणत्या आधारे केली याचा बोध होत नाही. त्यामुळे मनपाचे४ वर्षाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. मोकळ्या जागेचा कर दिनांक १.४.२०१२ पासून आकारावयाचे प्रयोजन समजले नाही. इमारतीस कर दिनांक १.४.२००६ पासून आकारलेला आहे.

३. कर आकारणी क्र.७०७०/१२-१३ चे अभिलेखे लेखापरीक्षणा करीता उपलब्ध झालेले नाही.

४. सदरील मालमत्तेचे खरेदी खत (नोटरीकृत) दिनांक १०.०८.९८ रोजी झालेले असतांना बांधकाम दिनांक १.४.२००१ रोजी झाले असे कोणत्या कागदपत्राआधारे अंतीम केले याबाबत कागदपत्रासह माहिती आवश्यक आहे.

**उपरोक्त मुद्यांवर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) प्रमाणे अवैध बांधकामास बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील त्याबाबत सन २००८ मध्ये अधिनियमात झालेल्या दुरुस्ती प्रमाणे कर वसूली झालेली नसल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. उक्त प्रकरणासोबत औरंगाबाद शहरातील इतरही सन २००८ नंतरच्या झालेल्या अवैध बांधकामास आकारण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या प्रकरणाचे पुर्नर्विलोकन करुन अधिनियमातील तरतूदीनुसार दुप्पट शास्ती आकारुन, संबंधितांकडून मालमत्ता कर + शास्तीच्या वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४८ : मालमत्ता कर कमी करणे बाबत.**

प्लॉट क्र.८, दुकान क्र.८ श्रीराम हरी अपार्टमेंट, कामगार चौक या मालमत्तेस पूर्वी आकारण्यात आलेला कर व्यावसायिक वापराचे जुने करयोग्य मूल्य रु.९०५१/- दिनांक १.४.२००६ पासून रद्द करणेत येवून क्षेत्रफळ- ५.८०x४.४०= २५.५२m² दर्शवून नविन कर योग्य मूल्य ५७८८/- इतके कमी करण्यात आलेले आहे.

वरील बाबत खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास येते.

१. प्रकरणी प्रस्तावित मालमत्ता ही एन-२ सिडको, प्लॉट नं ८ मधील दुकान क्र.८ म्हणजे अधिकृत मालमत्ता आहे. याबाबतची प्रत्यक्ष अभिलेखे तपासून / स्थळपाहणी अहवाल इ. खात्री करून त्या प्रती संचिकामध्ये संलग्न करणे गरजेचे होते. मात्र संचिकेमध्ये मालमत्ता हक्काचे लेखे दिसून आले नाही.

२. मालमत्तेचे संगणकीकरण झालेले नाही.

**उपरोक्त बाबत विभागाने खुलासा अहवाल अंतीम होईपर्यंत सादर केलेला नाही. उक्त मुद्यात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र. ४९: जावक रजिस्टर मध्ये आढळून आलेल्या त्रुटयांबाबत.

जावक रजिस्टर ३९५६ ते ४६५०, दिनांक १२.३.२०१४ ते ३१.०३.२०१४ सन २०१३-१४ ची तपासणी केली असता त्यात खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या -

१ . जावक रजिस्टरला पेज नंबर दिलेले नाहीत.

२. सक्षम अधिका-यांनी जावक रजिस्टर प्रमाणित केलेले नाही.

३. जावक क्र.४३६८ वर दिनांक २९.३.२०१४ टाकलेली असतांना जा.क्र.४३९९ वर दिनांक १८.३.२०१४ टाकण्यात आलेली आहे याचा बोध होत नाही.

४. जा.क्र.४२१६ ते ४२२५ दिनांक १४.३.२०१४ येथे शहापुरवाड नाव टाकून इतर सर्व संचिका बाबतचा तपशिल अपूर्ण आहे.

५. ३९५६ ते ४२१६ पर्यंत कृषी उत्पादन बाजार समितीच्या संचिका उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत.

६. मालमत्तांचे सगणकीकरण झालेले नाही.

**उधरोक्त बाबींचा खुलासा विभागाने लेखापरीक्षण विभागास अहवाल अंतीम होईपर्यंत सादर केलेला नाही. जावक रजिस्टरमधील जावक क्रमांक व दिनांक याचा ताळमेळ लागलेला नाही. जावक रजिस्टरमधील नोंदी अपूर्ण आहेत. विभागाने उक्त अनियमिततेबाबत कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५० : मालमत्तेस दोनवेळा कर आकारणी केल्याबाबत.**

१) संबंधित मालमत्तेस व्यावसायिक कर E००१७२३५ हा फेरआकारणी कर रद्य करतांना तो कोणत्या बाबींमुळे रद्य केला याबाबत स्पष्टीकरण नाही.

२) दुकानाची कागदपत्रे सोबतच्या संचिकेत जोडलेली नाहीत.

३) प्रकरणांत समितीची मान्यता नाही. असे असतांना कुठल्या माहितीच्या आधारे E००१७२३५ हा फेर आकारणी रद्य करुन जुना E००२७८८२ कायम करण्यात आला याचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले होते.

**विभागाने उक्त बाबींची तपासणी करून करण्यात आलेली कार्यवाही योग्य असल्याचे खातरजमा करून अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. एकाच मालमत्तेचे दोन संगणकीय क्रमांक आहे काय ? पूर्वीचा संगणकीय क्रमांक रद्य करण्याचे प्रयोजन काय होते.तसेच उक्त मुद्यांबाबत कागदपत्रासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५१ : गट क्र. ७०८ मध्ये क्षेत्र ९०० स्क्वे. फुट प्लॉट जालना रोडलगत चिकलठाणा. मालमत्ता कर कमी करणे बाबत.**

मालमत्ता गट क्र.७०८ मधील क्षेत्र ९०० स्क्वे.फुट प्लॉट जालना रोड लगत चिकलठाणा, या ठिकाणी गॅरेज शॉप आहे. या संचिकेचे अवलोकन केले असता मालमत्ताधारकाने दिनांक १३.१२.२०१२ रोजी अर्ज देवून लेखी दिलेले आहे की, त्यांनी सदरचे प्लॉटवर २५% पत्र्याचे शेड मध्ये बांधकाम करुन त्यामध्ये गॅरेजचा व्यवसाय करत आहे.

विभागाने पूर्वीचा कर योग्य मूल्य रु.११,७०८/-, दिनांक १.४.२००७ पासून रद्य केलेले आहे. (कर आ.क्र.६२९२/२०१२-१३ व्यावसायिक) व सुधारित करयोग्य मूल्य रु.६९९९/- मोकळ्या जागेचा कर योग्य मूल्य रु.५१५६/- दिनांक १.४.२००७ पासून पुढे कायम करणेत आलेला आहे.

खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) मालमत्ता कर आकारणी करतांना माहितीपत्रकावर प्रत्यक्ष प्लॉटचे क्षेत्रफळ ङ्म

१) ४० -५० m² पत्र्याचे शेड अशी नोंद

२) ५३.०४ m² मोकळी जागा क्षेत्र नोंद

एकूण ९३.५४m² क्षेत्रफळ

मात्र संबंधिताचे प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ - ९०० स्क्वे. फूट असून, मालमत्ता धारकाने स्वत: अर्जामध्ये २५% म्हणजे २२५ m² बांधकाम / पत्र्याचे शेड बांधलेले असल्याचे लेखी दिलेले आहे.

म्हणून २२५ m² शेड

(-) ४०.५० m² शेड

१८४ - ५० m² पत्र्याचे शेड क्षेत्र कमी दर्शविलेले आहे. तसेच ९०० m² एकूण प्लॉट क्षेत्र पैकी १८४ - ५० m² शेड वजा जाता उर्वरीत मोकळी जागा ६७५. m² इतके क्षेत्रासह कर आकारणी केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले दिसून येते.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. कार्यवाहीअंती फरकाची रक्कम वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५२ : गुंठेवारी कक्ष, औरंगाबाद मनपा यांनी भूखंडाचे दर्शविलेले क्षेत्र व प्रत्यक्ष कर आकारणी क्षेत्रात तफावत असल्याबाबत.**

स.न.४७, प्लॉट क्र.५४, गारखेडा संगणकीय क्र. E००१९७२९ गजानन नगर या मालमत्तेस जा.क्र./मनपा/गुं.क्र./५९/W-E/२०१०, दिनांक २५.३.२०११ अन्वये नियमित करण्याचा दाखला दिलेला आहे. सदरील नियमितीकरण करतांना भूखंडाचे क्षेत्र ५५.७६ चौ.मी. दर्शविलेले आहे. जा.क्र./मनपा/वि.क. /करआ /३३४२ / २०१४, दिनांक २४.११.२०१४ अन्वये करात सुधारणा केलेली आहे. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१) कर आकारणी क्र.१२२४४३/२००५-०६ चे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाहीत.
२) जमिनीस आकारलेला कर ५५.७६ चौ.मी. क्षेत्रा ऐवजी केवळ ३०.२९ चौ.मी. वर आहे. त्यामुळे कमी क्षेत्रावर कर आकारणी केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.
३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) नुसार विना परवाना बांधकामास बांधकाम नियमित होईपर्यंत शास्ती लावण्याची तरतूद असतांना शास्ती लावलेली नाही.
४) दिनांक २३.१.२०१४ च्या मालमत्ता कर सुधारित करणे करीताच्या पत्रात संदर्भ क्र. (४) अन्वये मालमत्ता तक्रार निवारण समितीचा निर्णय दिनांक २०.९.२०१४ असल्याचे नमूद आहे. प्रत्यक्षात समितीचा निर्णय संचिकेत संलग्न नाही.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. तसेच अवैध बांधकामाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५३ : मालमत्तेचे मालकी हक्क कागदपत्रे संचिकेत जोडलेली दर्शवून कागदपत्रे उपलब्ध नसल्याबाबत तसेच कराची आकारणी अधिनियमातील तरतूदीप्रमाणे शास्ती न आकारणे बाबत.**

संगणकीय मालमत्ता क्र.E००३१०८३ गट क्र.४२१, चिकलठाणा जालना रोड, औरंगाबाद या मालमत्तेस आकारलेला कर जा.क्र.मनपा/ प्र.अधिई/६७६/२०१४, दिनांक २८.३.२०१४ अन्वये कमी करण्यात आला. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. अर्जात नमूद क्षेत्र २८०.५९ चौ.मी. असतांना केवळ ८८.९१ चौ.मी. क्षेत्रावर आकारणी केलेली आहे. कमी क्षेत्रावर आकारणी केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. अर्जासोबत खरेदीखत ७/१२ ची प्रत जोडली असे नमूद आहे. प्रत्यक्षात कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

३. विनापरवाना बांधकामास शास्ती चे कलम अधिनियमात सन २००८ पासून समाविष्ट झालेले आहे. परंतू प्रकरणात सन २०११ पासून शास्तीसह आकारणी करण्याचे प्रयोजन समजू शकले नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले दिसून येते.

४. कर कमी करतांना तक्रार निवारण समितीच्या समोर प्रकरण सादर केलेले नाही.

**विभागाने उक्त बाबतीत खुलासा सादर केलेला नाही. मालमत्तेचे क्षेत्र कर आकारणीत कमी दर्शविले असे प्रथम दर्शनी दिसून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रकरणात फेर तपासणी करून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे खातरजमा करून मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार कराची आकारणी करण्यात यावी. तसेच अवैध बांधकामाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ (अ) नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. फरकाची रक्कम वसूलीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५४ : मालमत्ता कर कमी करणे बाबत. (मालमत्ता कर सन २०१० ऐवजी सन २०१३ पासून वसूल करणे बाबत.)**

सपना मार्केट पुंडलिकनगर रोड येथील दुकान क्र.१०, या मालमत्तेस क.आ.क्र.२५८१/१३-१४, अन्वये दिनांक १.४.२००७ पासून कर आकारणी केलेली असून वार्षिक रू.१२,४५३/- इतकी कर आकारणी केलेली आहे. मालमत्ता क्र.E००३१६५५ या बाबत भाडे करारनामा प्रतीचे अवलोकन केले असता, दिनांक ०१.०७.२०१० पासून करारनामा आहे. मालमत्ता धारकाने दिनांक १४.३.२०१४ रोजी विनंती अर्ज देवून चालू वर्षापासून कर आकारणी करण्याची विनंती केली आहे. विभागाने पत्र क्र./मनपा/प्र.अधि-ई/६७३/२०१४, दिनांक २८.३.२०१४ अन्वये दिनांक १.४.२०१३ पासून करयोग्य मूल्य रू.६५८८/- कायम करण्यात आलेले आहे. मालमत्ता हक्काबाबतचे मूळ कागदपत्र संचिकेत संलग्न नाही.

**विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. प्रकरणाची तपासणी करून महानगरपालिकेचे होत असलेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करण्यात यावे. तद्नंतरच लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५५ : दुकान क्र.जी-५, तिरुमला आर्केड, एन-२, सिडको औरंगाबाद या मालमत्तेस दोन वेळेस कर आकारणी झालेली दर्शवून एक रद्य केल्याबाबत.**

जा.क्र./मनपा/वि.क./करआ/३३३८ / २०१४, दिनांक २४.१.२०१४ अन्वये मालमत्ता कर सुधारीत करण्यात आलेला आहे. दुकान क्र.जी-५, तिरुमला आर्केड एन-२, सिडको, औरंगाबाद या मालमत्तेस कर आकारणी क्र.६३६२, दिनांक २०.११.२०१२ रोजी कर आकारणी झालेली आहे. याच दुकानास कर आकारणी क्र.३४५९, दिनांक १२.१०.२०१२ रोजी झालेली आहे. दोन्ही कर आकारणी एकाच मालमत्तेची दर्शवून एक रद्य केलेली आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कर आकारणी क्र.३४५९ ही शॉप क्र. जी-२, तिरुपती आर्केड एन-२, सिडको येथील दुकानाची असून कर आकारणी रद्य करणे उचित नाही. त्यामुळे एकाच दुकानास दोनदा कर आकारणी झाल्याचे म्हणणे संयुक्तिक नाही. रद्य केलेल्या कर आकारणी प्रकरणाचे कर योग्य मूल्य रू.४३८५/- असून दिनांक १.४.२००६ पासून वसूली पात्र.

२. कर रद्य केलेल्या पत्रात नमूद संदर्भ क्र.४ नुसार मालमत्ता तक्रार निवारण समितीचा दिनांक २०.१.२०१४ चा निर्णय संचिकेत नाही. त्यामुळे रद्य केलेली कर आकारणी नियमबाह्य ठरते.

३. कर आकारणी रद्य करतांना वेगवेगळ्या मालमत्ता असल्याचे निदर्शनास येते. त्यानुसार कर आकारणी न तपासता एक रद्य केलेली असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. दुकान क्र.२, तिरुपती आर्केड, एन-२ याचे खरेदी खत संचिकेत नाही.

**विभागाने उक्त बाबींची तपासणी करून करण्यात आलेली कार्यवाही योग्य असल्याचे खातरजमा करून अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. एकाच मालमत्तेचे दोन कर आकारणी क्रमांक आहे काय ? पूर्वीचा कर आकारणी क्रमांक रद्य करण्याचे प्रयोजन काय होते.तसेच उक्त मुद्यांबाबत कागदपत्रासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५६ : व्यावसायिक मालमत्तेची कर आकारणी रद्य करून निवासी वापर दर्शविणे बाबत.**

कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वि.क./करआ / ३३३९/२०१४, दिनांक २०.१.२०१४ अन्वये मालमत्ता करात सुधारणा करतांना प्लॉट क्र.७, एन-४ एनएस-३, सिडको या मालमत्तेचा वापरातील काही भाग व्यावसायिक वापर व काही निवासी वापर आहे. संचिकेची तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कर आकारणी क्र.७०६४ व ७०६५ अन्वये केलेली कर आकारणी याच इमारतीतील भाग व्यावसायिक वापरासाठी असल्याने कर आकारणी झालेली आहे. परंतू अर्जदाराच्या विनंती नुसार संदर्भिय पत्राचे अनुषंगाने पुन:श्च तपासणी करून कर आकारणी पूर्णत: निवासी दर्शवून मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. पूर्वीची कर आकारणी करतांना प्रत्यक्ष जागेवरील वापरानुसारच कर आकारणी केल्यानंतरच संबंधितांना नोटीस अदा होते ही बाब विभागाला चांगली ज्ञात असूनही कर कमी केलेला आहे.

२. कर आकारणी कमी करतांना दिनांक २४.७.२०१४ चे पत्रात अ.क्र.५ मध्ये मालमत्ता तक्रार निवारण समितीचा दिनांक २०.१.२०१४ चा निर्णय दर्शविला प्रत्यक्ष तसा निर्णय संचिकेत उपलब्ध नाही. त्यामुळे केलेली फेर आकारणी नियमबाह्य आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर तपासणी करावी. मनपाचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून खुलाशासह अनुपालन लेखापरीक्षण विभागास दर्शवावे असे कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**विभागाने मालमत्तेच्या वापरानुसार कराची आकारणी केलेली आहे याची खात्री करावी. तद्नंतरच आवश्यक त्या कागदपत्रासह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ५७ : औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मिळकतींना करणेत आलेली कर आकारणी व मालमत्ता कर वसूली संदर्भाने प्राप्त आक्षेप अर्जावर गठीत समितीने निर्णय न घेताच प्रकरणे अंतिम करणे बाबत.**

मालमत्ता कराचे संदर्भात प्राप्त आक्षेपावर कार्यालयीन आदेश क्रमांक /मनपा/वि.क./करआ/९९९/२०१३, दिनांक २०.२.२०१३ अन्वये समितीची स्थापना करणेत आलेली आहे. या समिती मध्ये कर निर्धारक व संकलक, विधी सल्लागार, विशेष कक्ष प्रमुख, कर आकारणी विभाग व संबंधित वॉर्ड अधिकारी यांची सदस्य म्हणून नेमणूक केलेली आहे. मालमत्ता कर वसूलीच्या दृष्टीने मालमत्ता कर आक्षेप अर्ज व वादग्रस्त प्रकरणांमध्ये या समितीचा निर्णय अंतिम राहिला असे सदरचे कार्यालयीन आदेशात नमूद आहे.

कर आकारणी विभागातील नाममात्र प्रकरणे तपासली असतांना खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कर आकारणी विभागात प्राप्त झालेल्या आक्षेप अर्जावर समितीने निर्णय देतांना समितीतील सदस्य विधी सल्लागार यांची मान्यता संचिकेमध्ये नाही. विधी सल्लागार यांचा सदरचे प्रकरणांमध्ये कायदेशीर दृष्ट्या मत नोंदवून प्रकरणे अंतिम करणे करीता सहभाग आवश्यक ठरतो.

२. तसेच अंतिम केलेल्या प्रकरणांचे आदेशात तक्रार निवारण समितीचा संदर्भ दर्शविलेला आहे. परंतू संचिकेत समितीचा निर्णय लेखा परीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेला नाही. अशा प्रकरणांची यादी अर्धसमासा सोबत जोडण्यात आलेली आहे.

३. त्याच प्रमाणे समितीची मान्यता न घेताच संबंधित प्रकरणे विभाग प्रमुख यांचे मान्यतेनेच अंतिम करणे ही बाब नियम बाह्य आहे, अशा प्रकरणांची यादी या सोबत जोडण्यात आलेली आहे.

**विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. मालमत्ता कराच्या वादग्रस्त प्रकरणांमध्ये सुनावणी देण्याकरीता समिती गठीत केलेली होती. या समितीचे सदस्य विधी सल्लागार तसेच कर आकारणी विभागाचे विभाग प्रमुख यांच्या मान्यतेविनाच प्रकरणे अंतीम करण्यात आलेली आहेत. अशा सर्व प्रकरणांचे पुनर्विलोकन करून झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## *लेखापरीक्षण अहवाल*
## *स्थानिक संस्था कर विभाग*
## *सन २०१२ ते २०१५*

**प्रस्तावना :**

मा.मुख्य लेखापरीक्षक यांच्या आदेशान्वये स्थानिक संस्था कर या विभागाचे सन १ जुलै २०१२ ते ३१ डिसेंबर २०१५ या आर्थिक वर्षातील उपलब्ध अभिलेखे लेखापरीक्षणास्तव तपासण्यता आले. त्यानुषंगाने संबंधित विभागातील भरणा केलेल्या विविध रकमा,न वटलेल्या धनादेशाची यादी, बांधकाम परवाना, निर्धारण संचिका, ना हरकत प्रमाणपत्र संचिका, व्यावसायिक निर्धारण संचिका लेखापरीक्षणा दरम्यान चाचणी स्वरूपात उपलब्धतेनुसार तपासण्यात आल्या.

स्थानिक संस्था कर विविध विभागात नोंदणीकृत व्यावसायिक यांची वर्गीकृत वॉर्डनिहाय माहिती, बँक स्क्रोल, परतावा संचिका, विभागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची पगारपत्रके, खरेदी अथवा विक्रीची उलाढाल वर्षामध्ये ५० कोटीपेक्षा कमी नसणा-या नोंदणीकृत व्यापा-यांची संचिका, जॉबचार्ट व इतर विविध संचिका वारंवार लेखी व तोंडी सूचना देवूनही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत ही बाब गंभीर स्वरूपाची व संशयास्पद आहे.

त्या दरम्यान स्थानिक संस्था कर विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **१२** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**स्थानिक संस्था कर विभागात दिनांक १ जुलै २०१२ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीत कार्यरत अधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत.**

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | पदनाम | कार्यकाळ |
|---|---|---|---|
| १ | श्री.अजय चारठाणकर | उपआयुक्त (म) | दिनांक १.७.२०११ ते २९.८.२०१२ |
| २ | श्री.अय्युब खान नुर खान | प्र.उपआयुक्त (म) | दिनांक ३१.८.२०१२ ते २८.२.२०१३ |
| ३ | श्री.एम.डी.सोनवणे (शहर अभियंता) | उपआयुक्त (म) या पदाचा अतिरिक्त कार्यभार | दिनांक १.३.२०१३ ते २९.४.२०१३ |
| ४ | श्री.सु.अ.पेडगांवकर | उपआयुक्त (म) | दिनांक ३०.४.२०१३ ते |
| ५ | श्री.संजय पवार (लेखाधिकारी) | स्थानिक संस्था कर अधिकारी अतिरिक्त कार्यभार | दिनांक ११.७.२०११ ते ५.११.२०११ |
| ६ | श्री.महावीर पाटणी | स्थानिक संस्था कर अधिकारी अतिरिक्त कार्यभार | दिनांक ११.७.२०११ ते २३.१०.२०१३ |
| ७ | कु.शुभांगी आंधळे | स्थानिक संस्था कर अधिकारी | दिनांक ६.८.२०११ ते २२.२.२०१३ |
| ८ | श्री.संजय पवार (लेखाधिकारी) | स्थानिक संस्था कर अधिकारी अतिरिक्त कार्यभार | दिनांक २३.१०.२०१३ ते १३.७.२०१५ |
| ९ | श्री.अय्युब खान नुर खान | स्थानिक संस्था कर अधिकारी अतिरिक्त कार्यभार | दिनांक ३०.८.२०१३ ते २३.६.२०१५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री.किशोर बोर्डे | उपायुक्त (महसूल) | |
| ११ | श्री.अय्युब खान नुर खान | उपायुक्त | दिनांक १.७.२०१५ पासून |
| १२ | श्री.मनोहर सुरे (कार्यालयीन अधिक्षक) | स्थानिक संस्था कर अधिकारी अतिरिक्त कार्यभार | दिनांक १३.७.२०१५ पासून |

**लेखापरिक्षण पथकातील कर्मचाऱ्यांची नांवे :**

१. श्री. नासेर लईख, (वरिष्ठ लिपीक ) (पथक प्रमुख )
२. श्री. चंद्रशेखर मराठे, ( कनिष्ठ लिपिक )
३. श्रीमती शिल्पा जोशी ( कनिष्ठ लिपीक )

**परिच्छेद क्र.०१ : आर्थिक वर्ष २०१२ ते २०१५ या कालावधीतील अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

स्थानिक संस्था कर विभागातील खालील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून द्यावे.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | स्थानिक संस्था कराची रक्कम स्विकारण्यासाठी प्राधिकृत केलेल्या बँका व एकूण जमा रक्कम बाबतचा बँक स्क्रोल उपलब करून देणे बाबत. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| २ | स्थानिक संस्था कर नोंदणीसाठी ५ विभागात वर्गीकरण केलेल्या नोंदणी धारकांची वॉर्ड निहाय यादी मिळणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| | व्हॅट नोंदणीकृत असलेले नोंदणीधारक. | |
| | व्हॅट नोंदणीकृत नसलेले नोंदणीधारक. | |
| | अनिवासी नोंदणी केलेले नोंदणीधारक. | |
| | तात्पुरते नोंदणी केलेले नोंदणीधारक. | |
| | बांधकाम परवानगीसाठी नोंदणी केलेले नोंदणीधारक. | |
| ३ | स्थानिक संस्था कर विभागाने विशेष तपासणी मोहीमे अंतर्गत स्थानिक संस्था कराचे निर्धारण करून त्या अन्वये वसूल केलेल्या रकमेची माहिती मिळणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| ४ | औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात विक्री, देणगी किंवा फलोभाग गहाणाच्या संलेखावर बसवायच्या मुद्रांक शुल्कासोबत १% रक्कम औरंगाबाद महानगरपालिकेस वितरण करण्याबाबतची माहिती. | उपलब्ध नाही. |
| ५ | स्थानिक संस्था कराचा परतावा देण्यात आलेल्या संचिका उपलब्ध करून देण्याबाबत. | उपलब्ध नाही. |
| ६ | जिल्हा पुरवठा अधिकारी (शहर विभाग) ने स्थानिक संस्था कर नोंदणी केल्याबाबतची माहिती मिळणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| ७ | स्थानिक संस्था करापोटी राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाची माहिती मिळणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| ८ | स्थानिक संस्था कर आर्थिक वर्षामध्ये खरेदी अथवा विक्रीची उलाढाल वर्षामध्ये ५० कोटीपेक्षा कमी नसणा-या नोंदणीकृत व्यापा-यांची संचिका यादीसह उपलब्ध करून देणे बाबत. (नियम २०१० च्या नियम ३ मधील ३५ नियम १ नुसार ) | उपलब्ध नाही. |

| | | |
|---|---|---|
| ९ | आर्थिक वर्ष २०१२ ते २०१५ मध्ये स्थानिक संस्था कर विभागात विविध कामाकरीता केलेल्या खर्चाच्या संचिका उपलब्ध करून देणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| १० | स्थानिक संस्था कर विभागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचा जॉबचार्ट उपलब्ध करून देणे बाबत. | उपलब्ध नाही. |

**विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०२ : आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये स्थानिक संस्था कर विभाग येथे जनरल पावतीवर जास्तीची रक्कम दर्शवून कमी भरण केल्याबाबत.**

जनरल पावती पुस्तक तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. जनरल पावती पुस्तकाद्वारे वसूल रक्कम जास्तीची असतांना एकूण रक्कम वेगळी व अक्षरी रक्कम वेगळी दर्शविली आहे.

२. जनरल पावतीवर दर्शविलेली अक्षरी रक्कम कॅश रजिस्टरवर दर्शवून कमी भरणा केल्याचे दिसून येते.

३. जनरल पावतीवर रक्कम कोणत्या दिवशी वसूल केली याबाबत दिनांक व स्वाक्षरी दर्शविलेली नाही.

४. जनरल पावतीद्वारे वसूल केलेली रक्कम संबंधिताने अदा केलेली नाही.

याबाबतचे सविस्तर विवरण अर्धसमास पत्र क्र.३ अन्वये यापूर्वीच देण्यात आलेले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष खातरजमा करून याबाबतचा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.०३ : हॉटेल दर्शन यांची निर्धारण करतांना रक्कम कमी दर्शविणे बाबत.**

हॉटेल दर्शन, टि.व्ही.सेंटर, हडको नविन औरंगाबाद स्थानिक संस्था कर रजिस्टर क्रमांक १२०७११५३४१ यांची निर्धारण केलेली संचिकांची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. नमुना ड -२(नियम २९(२)(ख) नुसार वार्षिक विवरण दाखल केले आहे. मात्र विवरण पत्र १.४.२०१२ ते ३१.३.२०१३ पर्यंत दाखल केलेले आहे.

२. दाखल केलेले चलन सुध्दा ३० जून २०१५ पर्यंत आहे. मात्र निर्धारण जुलै २०१५ पर्यंत झाल्याचे नमूद आहे.

३. माहे एप्रिल २०१४ मध्ये बाहेरून माल खरेदी २८९४४५ एवढी असतांना एकूण खरेदी किंमत १३५८१५/- एवढी दर्शविली आहे. म्हणजेच ७% प्रमाणे २०२६१/- एवढी रक्कम वसूल करणे आवश्यक होते. मात्र ९५०८ एवढी रक्कम वसूल केली आहे. म्हणजेच १०७५३/- एवढी रक्कम कमी वसूल करण्यात आली आहे.

४. हॉटेल दर्शन यांनी वेगवेगळ्या बाहेरील, लोकल एजन्सी कडून माल खरेदी केला आहे. त्यापैकीच एक एजन्सी कपिल स्पिरिट प्रा.लि. हे असून यांच्या कडून माल खरेदी करण्यात आला आहे. निर्धारण करतांना बाहेरील एजन्सी असलेले माहेवार निर्धारण करतांना करांचा भरणा केला आहे.

मात्र फेब्रुवारी २०१४ पासून लोकल खरेदी दर्शवून स्थानिक संस्था कर रक्कम वसूल केलेली नाही. त्या बाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे -

| अ.क्र. | महिना | Total Amount | ८७२० | |
|---|---|---|---|---|
| १ | फेब्रुवारी -२०१४ | C.D.Amount | १३३ | |
| | | Trade Discount | २१० | |
| | | | **९०६३** | **७% = ६३४** |
| | | | ७०७७८ | |
| २ | डिसेंबर -२०१४ | C.D.Amount | ११०५ | |
| | | Trade Discount | ११०० | |
| | | | **७२९८३** | **१०% = ७२९८** |
| | | | | |
| ३ | जानेवारी -२०१५ | **Total Amount** | ४७०६० | |
| | | C.D.Amount | ७३८ | |
| | | | **४७७९८** | **१०% = ४७८०** |
| | | | | |
| 4 | फेब्रुवारी -२०१५ | **Total Amount** | 81597 | |
| | | C.D.Amount | 1257 | |
| | | Trade Discount | 5030 | **10% = 8788** |
| | | | **87884** | |
| | | | | |
| 5 | मार्च -२०१५ | **Total Amount** | 55759 | |
| | | C.D.Amount | 870 | |
| | | Trade Discount | 990 | **10% = 5762** |
| | | | **57619** | |
| | | | | |
| 6 | एप्रिल -२०१५ | **Total Amount** | 38245 | |
| | | C.D.Amount | 600 | |
| | | | **38845** | **10% = 3885** |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **7** | **मे -२०१५** | **Total Amount** | 60124 | |
| | | C.D.Amount | 934 | |
| | | Trade Discount | 2100 | **10% = 6316** |
| | | | **63158** | |
| | | | | |
| **8** | **जून -२०१५** | **Total Amount** | 121312 | |
| | | C.D.Amount | 1888 | |
| | | Trade Discount | 3120 | **10% = 12632** |
| | | | **126320** | |
| | | | **एकूण** | **५००९५** |

उक्त रकमेवर दर्शविल्याप्रमाणे स्थानिक संस्था कर रक्कम घेणे आवश्यक आहे.

**तरी याबाबत विभागाने संबंधित एजन्सी बाहेरील आहे किंवा लोकल आहे याची खातरजमा करून सविस्तर अहवाल व महानगरपालिका क्षेत्रातील असेल तर त्याची स्थानिक संस्था कर नोंद असलेली संचिका लेखापरीक्षण विभागास सादर करावी.**

**परिच्छेद क्र.०४ : मे.बाबा ट्रेडर्स, यांची निर्धारण करतांना रक्कम रूपये १६१६१७/- वसूल करणे बाबत.**

मे.बाबा ट्रेडर्स, शहाबाजार औरंगाबाद स्थानिक संस्था कर क्र.१३१४१३०७६३ यांची निर्धारण केलेली संचिका तपासणी केली असता खालील बाब निदर्शनास आली.

निर्धारण आदेश क्र.३३७७/१४, दिनांक ७.१२.२०१४ नुसार सन २०१३-१४ साठी येणे स्थानिक संस्था कर रक्कम रू.७१०५१ व सन २०११-१२ ते सन २०१३-१४ साठी व्याज रक्कम रू.८५५६६/- तसेच विवरणपत्रा करता सन २०११-२०१२ साठी २०००/- २०१३-१४ साठी रू.३०००/- असे एकूण ५०००/- कायम केलेले असतांना सर्व रक्कम रूपये १६१६१७/- सात दिवसात भरणा करावी मागणी नोटीस दिली. **सदरील रकमेचे चालन संचिकांमध्ये दिसून आले नाही. संबंधित एजन्सीकडून स्थानिक संस्था कर व व्याजाची रक्कम वसूल करून व खातरजमा करून खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा.**

**परिच्छेद क्र.०५ : मे.चौहान ॲण्ड सन्स, मदनी चौक,औरंगाबाद यांचे निर्धारण आदेश सुनावणी अंती रक्कम रूपये ५००/- कमी भरणा करण्याबाबत.**

मे.चौहान ॲण्ड सन्स, मदनीचौक औरंगाबाद स्थानिक संस्था कर नोंदणी क्रमांक २३१३१३१२४३ यांचे सन २०११-१२, २०१२-१३ व सन २०१३-१४ या कालावधीचे अभिलेख्यांची तपासणी करून निर्धारत रकमे संदर्भाने सुनावणी घेवून स्थानिक संस्था कर व्याज व शास्ती असे एकूण १८४५०+७३९३+५५००=३१३४३ /- रूपये वसूल करणे आवश्यक होते. मात्र रक्कम रूपये ३०८४३ एवढीच रक्कम वसूल करण्यात आली आहे म्हणजेच ५००/- चा कमी भरणा केला आहे. तरी रक्कम वसूल करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०६ : एकाच दुकानास दोन स्थानिक संस्था कर क्रमांक देण्यात आल्याबाबत.**

मे.दिगंबर नंदराम ऑईल शॉप, जुना मोंढा, औरंगाबाद यांची संचिका तपासण्यात आली. तपासणीत असे आढळून आले की, मे.दिगंबर नंदराम ऑईल शॉप प्रोपरायटर यांना सुनावणीस बोलाविले असता संबंधिताने असे स्पष्टीकरण केले की, मे.दिगंबर नंदराम ऑईल शॉप हे ऑगस्ट २०१३ मध्ये बंद झाले. त्याचे प्रो.श्री.दिगंबर नंदराम कौशल्ये हे होते. परंतू ते व्यवसायातून बाजूला झाल्याने दुकान बंद करण्यात आले. त्यानंतर ४ महिन्यांनी म्हणजेच नोव्हेंबर २०१४ पासून श्री.उमेश दिगंबर कौशल्ये यांनी प्रोपरायटर म्हणून नविन रजिस्ट्रेशन नंबर २३१४४३१७८९ घेवून व्यवसाय सुरू केला. दाखल स्थानिक संस्था कर विवरण, व्हॅट रिटर्न व खरेदी स्टेटमेंट नुसार खरेदी रकमा सारख्याच आहेत व सर्व खरेदी स्थानिक बाजार पेठेतील आढळून येते. त्यामुळे निर्धारण आदेश जा.क्र.मनपा/स्थासंक/८५६, दिनांक ८.५.२०१५ नुसार मे.दिगंबर नंदराम ऑईल शॉप हे स्थानिक संस्था कर भरण्यास पात्र नसल्याने सन २०११-१२ व सन २०१२-१३ चे विवरण पत्र निर्धारित मुदतीत सादर न केल्याने रू.२०००/- शास्ती निर्धारित करून ७ दिवसाच्या आत सदर रक्कम भरण्यास आदेशित करण्यात आले.

संचिका तपासणीत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. सन २०११-१२ व सन २०१२-१३ चे विवरणपत्र उशिरा दाखल करण्याकरीता रू.२०००/- शास्ती निर्धारण आदेश जा.क्र.मनपा/स्थासंक/१५/८५८, दिनांक ८.५.२०१५ पासून ७ दिवसाच्या आत अथवा त्यापूर्वी मागणी नोटीस नुसार भरणे बंधनकारक होते. तथापि संचिका तपासणीत रक्कम रू.२०००/- चा भरणा केल्याचा कुठलाही पुरावा आढळून आलेला नाही. करिता स्थानिक संस्था कर नियम ४० अन्वये मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे थकबाकी म्हणून वसूली योग्य तसेच विर्निदिष्ट तारखेपर्यंत रक्कम न भरल्यामुळे स्थानिक संस्था कर नियम ४९ अन्वये संबंधित शास्तीस पात्र. करिता संबंधितांकडून शास्तीसह रक्कम वसूल करून अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग - अ मध्ये उपविभाग मार्च २५/१०, नियम १७ (क) नुसार नियम -९ च्या पोटनियम -३ अन्वये नोंदणीकृत व्यापारी म्हणून नोंदणी झाल्याचे मानण्यात आलेल्या व्यापा-याच्या धंद्यासह कोणत्याही धंद्याच्या बाबतीत या नियमान्वये नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. असा कोणताही धंदा बंद झाला आहे किंवा हस्तांतरीत झालेला आहे किंवा निकालात काढण्यात आलेला आहे.आणि उपरोक्तनुसार नोंदणी व्यापा-याने आपले नोंदणीप्रमाणपत्र रद्द करण्यासाठी अर्ज केलेला नाही. याबाबत आयुक्तांची खात्री झाली असेल त्याबबतीत धंदा ज्या दिनांकास बंद करावयाचा किंवा हस्तांतरीत करावयाचा तो जो दिनांक निश्चित करेल त्या दिनांकापासून प्रथमतः नोंदणी प्रमाणपत्र रद्द करेल. तथापि उक्त प्रकरणात संचिका पाहणीत पूर्वीचा स्थानिक संस्था कर क्रमांक १३१४१३०१९२ रद्द न करताच नविन स्थानिक संस्था कर क्र.२३१४४३१७८९ देण्यात आलेला आहे. ही बाब नियमबाह्य आहे. भविष्यात यामुळे थकीत रकमा व वसूली यांचा ताळमेळ घालणे शक्य होणार नाही.

३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग - अ मध्ये उपविभाग मार्च २५/१०नियम १६ (ग) नुसार विश्वस्तामध्ये बदल झाला असेल तर अशा बाबतीत नव्या नोंदणी प्रमाणपत्रासाठी आवश्यकता असणार नाही. आणि नियम १४ अन्वये आवश्यक असल्यास अशा रितीने माहिती पुरविण्यात आल्यावर तद्नुसार नोंदणी प्रमाणपत्रात सुधारणा करण्यात येईल. अशी नियमात तरतूद असतांना केवळ विश्वस्त बदल झाल्यामुळे नविन स्थानिक संस्था कर देणे नियमबाह्य आहे.

**करिता, मुद्या क्र. १ ते ३ बाबत विभागाने प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.**

**परिच्छेद क्र.०७ : स्थानिक संस्था कर विभागातील वसूल, रकमेचे धनादेश न वटले बाबत.**

विभागाने स्थानिक संस्था कर वसूल केला आहे. मात्र वसूल रकमेपैकी काही व्यावसायीकाचे धनादेश वटलेले नाही. अशा न वटलेल्या धनादेशाबाबत विभागाने इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ नुसार वसूली बाबत काय कार्यवाही केली. याचा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा. असे सूचित केले असता न वटलेल्या धनादेशाची एकूण रक्कम रू. १७,९२,२१४/- रकमेपैकी फक्त १,६६,०८०/- चा भरणा करून घेण्यात आला. तथापि उर्वरीत रक्कम रू. १६,२६,१३४/- बाबत विभागाने काय कार्यवाही केली याबाबत लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत कुठलाही खुलासा सादर करण्यात आलेला नाही. न वटलेल्या धनादेशाचे विवरण अर्धसमास पत्र क्र.१२ सोबत यापूर्वीच देण्यात आलेले आहे.

**तरी विभागाने संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती खुलासा सादर करावा.**

**परिच्छेद क्र.०८ :स्थानिक संस्था करांच्या रकमेचा भरणा न केल्याबाबत.**

१)सजावट फर्निचर रक्कम रू.४०००=०० (सन २०१२-१३)
२) स्टार हार्ड वेअर रक्कम रू. २०००=०० (सन २०१३-२०१४)

ठोस रकमेचा पर्याय सन २०१२-१३ व सन २०१३-१४ अंतर्गत संचिका तपासणीत असे आढळून आले की, प्रभाग - क कार्यक्षेत्रांतर्गत मदनी चौक, रोशनगेट या परिसरात फर्निचर विक्रीची दुकाने आहेत. सदर व्यावसायिक हे मोठ्या प्रमाणावर स्थानिक बाजारपेठेतून मालाची खरेदी करून फर्निचर विक्रीचा व्यवसाय करतात. पैकी काही व्यासायिकच क्वचित लग्न सराईचा हंगामा वेळी केवळ कच्चे सोफे हा माल शहर हद्यीबाहेरून आयात करतात. त्यापैकी बरेच व्यावसायिक हे फर्निचर उत्पादक आहेत. म्हणजेच सदर फर्निचर तयार करण्यासाठी लागणारे लाकूड, प्लायवूड सनमायका व हार्डवेअर हे स्थानिक बाजार पेठेतील खरेदी असते. मुळतः सदर ठिकाणच्या व्यावसायिकांचा व्यवसाय हा माहे डिसेंबर ते जून या कालावधीत लग्न सराईच्या हंगामात"ा असतो.तर काही व्यावसायिकांची फर्निचर विक्रीची पध्दतही कमिशन बेसीसवर आहे. शासन अधिपत्र दिनांक २५ मार्च २०१० नुसार नियम २७ अंतर्गत शासन निर्णय दिनांक ६ ऑगस्ट २०१२ नुसार बदल करून नविन खरेदी मर्यादा व ठोस रकमेची मर्यादेत बदल करण्यात आला. करिता सदर व्यावसायिकांकडून दिनांक १ जुलै २०११ ते ३० जून २०१२ पावेतो कराची रक्कम वसूल करण्यात आली.

परिशिष्ठ ३ नुसार उक्त व्यावसायिकांकडून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ साठी रक्कम वसूल करणे असल्याने व स्थानिक संस्था कर (सुधारणा) नियम २०१२ नुसान नियम २७ अन्वये नमुना - द अंतर्गत प्रतिज्ञापत्र सादर करून सन २०१२-१३ व सन २०१३-१४ ची व्यावसायिक उलाढाल जाहिर केल्याचे नमूद आहे. परिशिष्ट -९ नुसार संबंधित सर्व १८ व्यापा-यांना ठोस रक्कम भरण्यासाठी मा.उपायुक्त (म) यांची मान्यता मिळाल्यानंतर आदेश देण्यात आल्याचे आढळून येते.

संचिकेतची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सजावट फर्निचर (स्थानिक संस्था कर क्र.२३१३१३०८०४) यांनी सन १.७.२०१२ ते ३१.३.२०१३ या कालावधीतील मुंबई प्रांतिक महानगरपालिका कर नियम -१० च्या नियम -२७ अन्वये असाधारण नियम १०७ दिनांक ६.२.२०१२ च्या अधिसूचना प्रमाणे स्थानिक संस्था कराची ठोक रक्कम भरण्यासाठीच्या परवानगीचे रक्कम रू.४००० भरण्याची परवानगी मिळण्यासाठी प्रतिज्ञापत्र भरून दिल्याचे संचिकेत आढळून येते.

तथापि संबंधिताने रक्कम रू.४०००/- चा भरणा केल्याचे चालान संचिकेत नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. करिता संबंधिताकडून रक्कम वसूल करणे योग्य.

२. स्टार हार्डवेअर (स्थानिक संस्था कर क्रमांक २१०५१००५८४) यांना जा.क्र.मनपा/स्थासंक/१४/१५७० दिनांक १७.६.२०१४ अन्वये १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ साठी रू.८०००/- भरण्याचे आदेश मा.उपआयुक्त यांच्या मान्यतेने व स्थानिक संस्था कर अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले. तथापि संबंधिताने चालान क्र.८३०२२ दिनांक १८.६.२०१४ अन्वये सारस्वत बँकेत रक्कम रू.६०००=०० चाच भरणा केल्याचे चालान तपासणीत आढळून आले. संबंधिताने रक्कम रू.२०००.०० कमी भरणा केल्यामुळे मनपाचे रक्कम रू.२०००=०० चे आर्थिक नुकसान झालेले आहे. संबंधिताकडून रक्कम वसूलीस पात्र.

**करिता उपरोक्त मुद्या क्र. १ ते २ बाबत विभागाने प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करून व संबंधित व्यापा-याकडून रकमेचा भरणा करून घेवून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.**

**परिच्छेद क्र.०९ : निर्धारण रकमेपेक्षा स्थानिक संस्था कराचा कमी भरणा केल्याबाबत.**

१) मे.ताज फर्निचर रक्कम रू. १०००=००
२) मे.किफायत फर्निचर रक्कम रू.१०००=००

वॉर्ड - सी अंतर्गत ठोस रकमेचा पर्याय संचिका तपासण्यात आली. संचिकेत नमूद बाबी नुसार असे निदर्शनास आले की, रॉयल फर्निचर व इतर २७ व्यावसायिक, मदनी चौक, रोशनगेट, सेन्ट्रल नाका रोड परिसर यांनी प्रतिज्ञापत्रक दाखल करून ठोस रकमेची स्लीप देणे बाबत विनंती केल्यानुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून स्थानिक संस्था कर -२०१० नियम २७ (३) अन्वये वर्षभरातील उलाढाली तपासून स्थानिक संस्था कराची ठोक रक्कम निश्चित करण्यात आली व व्यावसायिकांनी दिनांक १.७.२०११ ते ३०.६.२०१२ या कालावधीतील सर्व

विक्रीची उलाढाल अणि मालाच्या एकूण सर्व खरेदीची उलाढाल मान्य करून चलनाद्वारे ठोक रकमेचा भरणा केल्याचे उपलब्ध लेख्यांवरून स्पष्ट होते.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.ताज फर्निचर, स्थानिक संस्था कर क्र.२३१३१३०६२६ यांनी दाखल केलेल्या स्टॉक वार्षिक उलाढाल यांच्या लेखी अहवालानुसार संबंधिताची वार्षिक उलाढाल रक्कम रू.१,९२,८८० ची स्पष्ट होते. करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका पालिका कर नियम १० च्या नियम २७ अन्वये १.७.२०११ ते ३०.६.२०१२ या कालावधीतील सर्व विक्रीची उलाढाल आणि मालाच्या एकूण सर्व खरेदीची उलाढाल लक्षात घेवून अ.क्र.१८ नुसार पर्याय नं.२ अन्वये रक्कम रू.२०००/-ठोस रकमेचे मा.उपआयुक्तांच्या मान्यतेने निर्धारण करण्यात आले.

तथापि संचिकेत उपलब्ध स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शहागंज दिनांक ३०.१०.२०१२ च्या चालन नुसार फक्त १००० रू. चाच भरणा केलेला आहे. परिणामी मनपाचे रक्कम रू.१०००/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. संबंधिताकडून रक्कम वसूलीस पात्र.

२. मे.किफायत फर्निचर स्थानिक संस्था कर क्र.२३१३१३०८०३ यांनी दाखल केलेल्या स्टॉक वार्षिक उलाढाल यांचा लेखी अहवालानुसार संबंधिताची वार्षिक उलाढाल २.५ कोटी असल्याचे स्पष्ट होते. करिता संबंधिताकडून प्रतिज्ञापत्र भरून घेवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका नियम १० च्या नियम २७ अन्वये दिनांक १.७.२०११ ते ३०.६.२०१२ या कालावधीतील सर्व विक्रीची उलाढाल आणि मालाच्या एकूण खरेदीची उलाढाल लक्षात घेवून अनुक्रमांक १९ नुसार पर्याय नं.२ अन्वये रक्कम रू.२०००/- ठोस रकमेचे मा.उपायुक्त यांच्या मान्यतेने निर्धारण करण्यात आले.

तथापि संचिकेत उपलब्ध स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शहागंज दिनांक ३०.१०.२०१२ च्या चालननुसार संबंधिताने रक्कम रू. २०००/- पैकी रू.१०००/- चाच भरणा केलेला असल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. संबंधिताकडून रक्कम वसूलीस पात्र.

करिता, उपरोक्त मुद्दा क्र. १ व २ बाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून उक्त रक्कम संबंधिताकडून वसूल करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.१० : स्थानिक संस्था कर विभागाचे ना देय प्रमाणपत्र देतांना बांधकाम क्षेत्रफळ कमी दर्शविले बाबत.**

श्री.नितीन वेणु प्रसादजी बगाडीया गट क्रमांक ८१ पैकी ईटखेडा, औरंगाबाद स्थानिक संस्था कर क्र. २६२९१७८१२१ यांनी बांधकाम परवाना क्र.४५६/२०१२-१३ दिनांक २७.७.२०१२ रोजी बांधकाम परवाना घेतला असून दिनांक २५.११.२०१४ रोजी अर्ज देवून बांधकाम संपूर्ण झालेले असून भोगवटा प्रमाणपत्र मिळवण्याकरीता स्थानिक संस्था कर विभागाचे ना देय प्रमाणपत्र आवश्यक असल्याने ते देण्याची विनंती केली आहे. त्यानुसार संबंधितांनी कागदपत्र दाखल केले आहे.

संचिकाची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संबंधित बांधकामधारक यांनी बांधकामाचा नकाशा संचिकेत जोडला असून त्यामध्ये (एकत्रित नकाशा ) plot no.१ १२६१.७५ sq.m plot no.२ - १८०१.५६ sq.m असल्याचे दिसून येते. मात्र स्थानिक संस्था ना देय प्रमाणपत्र देतांना संचिकावर खालील प्रमाणे क्षेत्रफळ दर्शवून रक्कम वसूल करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण बांधकाम | - | २३६५.३२X१०.७६ = २५४५१ चौ.फुट |
| बाजारभाव किंमत | - | २५४५१X१५१३=३,८५,०७,३६३ |
| ३०% लेबर चार्जेस - | = | १,१५,५२,२०९ |
| | | २,६९,५५,१५४ |
| स्थानिक व बाहेरील (१०११९६३०+ ७७४३३२८) | - | १,७८,६२,९५८ |
| | | ९०,९२,१९६ |
| यावर ३% L.B.T. | | २,७२,७६६/- |

एवढी L.B.T. असल्याचे दर्शविले आहे. L.B.T. रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूची आधारे काढण्यात आली असून त्यामध्ये लेबर चार्ज व इतर रक्कम वजावट करण्यात आली आहे. मात्र वजावट करण्याबाबत सादरीकरणात उल्लेख नाही.

२. संचिकेतील बांधकाम नकाशा मधील plot no १ एकूण क्षेत्रफळ १२५८.०३ sq.m एवढे दर्शविली आहे. मात्र ना देय प्रमाणपत्र देतांना या क्षेत्रफळावर स्थानिक संस्था कर वसूल करण्यात आलेला नाही. ही बाब आक्षेपार्ह असून रक्कम वसूलीस पात्र आहे. रक्कम वसूल करून या बाबतचा लेखी अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

मुद्दा क्र. १ व २ बाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा करून रक्कम वसूल करावी तसा अहवाल ३ दिवसात लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

**परिच्छेद क्र.११ : स्थानिक संस्था कर विभागाचे ना देय प्रमाणपत्र वितरण करतांना असलेल्या दराबाबत.**

महानगरपालिकेच्या हद्दीत बांधकाम करतांना स्थानिक संस्था कर विभागाचे ना देय प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. मात्र विभागाने रक्कम वसूल करतांना नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक ६ ऑगस्ट २०१२ रोजी काढलेल्या अधिसूचने नुसार प्रति चौ.मी. दिलेल्या मानंकानुसार रक्कम वसूल केली आहे तर काही वॉर्डमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसूची (२०११-२०१२) नुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी १५१३/- रूपये प्रमाणे प्रति चौ.फुट या प्रमाणे आकारणी केली आहे. त्या रकमेतून Labour charges ३०%, स्थानिक खरेदी, बाहेरील खरेदी रक्कम वजावट करून त्यावर ३% प्रमाणे स्थानिक संस्था कर आकारणी केली आहे.

तरी याबाबत विभागाने कोणता दर निश्चित केला आहे त्यास सभागृहाची , मा.आयुक्त यांची मान्यता घेवून प्रशासकीय ठराव ठेवून मा.सर्वसाधारण सभा, मा.स्थायी समिती यांचे मंजूरीचे आदेश लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून द्यावे व याबाबत स्पष्ट लेखी खुलासा सादर करावा.

**परिच्छेद क्र.१२ : व्यावसायिक निर्धारणाबाबत.**

१ जुलै २०१२ ते डिसेंबर -२०१५ या कालावधीचे व्यावसायिक अभिलेख्यांचे निर्धारण करून उपरोक्त संदर्भ क्र.९ नुसार सुनावणीसाठी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान प्रशासनातर्फे उपस्थित मुद्दे व त्यावर संबंधिताचे म्हणणे ऐकूण नियम ३३ (११) अन्वये अंतीम नोटीस देण्यात आली. तरीही संबंधिताने रकमेचा भरणा केलेल्या चलनाच्या प्रती संचिकेत आढळून न आल्याने स्थानिक संस्था कर नियम ४० अन्वये मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे थकीत रक्कम रू.१,९४,५३०/- वसूलीबाबतचे सविस्तर विवरण अर्धसमास पत्र क्र.२२ अन्वये विभागास देण्यात आलेले आहे. त्यापैकी रक्कम रू.१,२४,७१७/- संबंधितांकडून वसूल करण्यात आली. तथापि उर्वरीत रक्क्म रू. ६९,८९३/- बाबत विभागाने लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

संचिकेच्या तपासणी मध्ये दिलेल्या नोटीस नुसार रक्कम भरणा केल्याची चलन संचिकेमध्ये दिसून आले नाही. संबंधिताकडून रक्कम वसूल करून खातरजमा करून संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**विशेष बाब:** **लेखापरीक्षणा दरम्यान लेखापरीक्षण पथकाने आक्षेपित केलेल्या अर्धसमास पत्र क्र. १२ व अर्धसमास पत्र क्र. २२ अन्वये थकीत रक्कम रू.२,९०,७९७/- चा भरणा संबंधित व्यावसायिकांकडून करून घेण्यात आला.**

# लेखापरीक्षण अहवाल.
# स्लम विभाग
# सन २०१३-२०१४

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका स्लम विभागा अंतर्गत बी.ओ.टी. विभागाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा अंतर्गत खर्च बाजूचे लेखापरीक्षण करण्यात आले.

त्यानुषंगाने बी.ओ.टी.विभागाच्या बी.ओ.टी. तत्वावरील प्रकल्पांच्या संचिका जसे - पर्यटन मेगा सर्कीट अंतर्गतचे विकास कामे, डॉ.सलीम अली सरोवर विकास प्रकल्प, नविन कचरा डेपोसाठी जागेचा शोध घेणे, डी.पी.डी.सी. प्रकल्प, आय.एच.एस.डी.पी. योजना, सफाई कामगारांना सदनिका बांधून देणे, दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक वसाहतीत सुविधा उपलब्ध करून देणे , राजीव गांधी आवास योजना, रमाई आवास योजना बाबतच्या संचिका व इतर अनुषंगिक अभिलेख्यांची चाचणी स्वरुपात तपासणी करण्यात आली.

त्या दरम्यान स्लम विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **१५** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

## उपअभियंता / कार्यकारी अभियंता यांच्या कार्यकाळाबाबत.

सन २०१३-२०१४ या कालावधीत **श्री.सय्यद सिकंदर अली** यांनी कार्यकारी अभियंता व **श्री.एस.डी.काकडे** यांनी उपअभियंता म्हणून काम पाहिले.

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :**

१. श्री.संजय जक्कल, कार्यालयीन अधिक्षक (पथक प्रमुख)

२. श्री.नासेर लईख, वरीष्ठ लिपीक.

३. श्री.चंद्रशेखर मराठे, कनिष्ठ लिपीक.

४. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक.

**परिच्छेद क्र.१ : अभिलेखे उपलब्ध करून न देणे बाबत.**

१. रमाई आवास योजने अंतर्गत सन २००९-२०१० पासून ते आजपर्यंत प्राप्त शासन निधी. (केंद्रशासन महाराष्ट्र शासन)

२. बी.पी.एल./ए.पी.एल.धारकांना दिलेले घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची यादी.
३. विभागाने ठेवलेले कॅश रजिस्टर, डिमांड रजिस्टर.

३. बँक खाते क्रमांक व संचित निधी ठेवण्यात आलेल्या बँकेचे नांव.
४. वाटप करण्यात आलेले धनादेश बाबतचे लेखे.

**सहा.प्रकल्प अधिकारी व बी.ओ.टी. कक्षप्रमुख यांच्या विभागामार्फत लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत उक्त माहिती लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजाबाबत निष्क्रियता निर्माण होते. अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२ :ज्योतीनगर येथील मंजूर रेखांकनाच्या खुल्या जागेत (न.भू.क्र./१६२६१) स्विमिंग पुल बांधणे बाबत.**

बी.ओ.टी. तत्वावर ज्योतीनगर येथील मंजूर रेखांकनाच्या ४२२९ चौ.मी.पैकी ५०% २११४.७५ चौ.मी.जागेत स्वीमिंग पुल बांधण्याबाबत तसेच त्या क्षेत्रामध्ये हेल्थ क्लब, स्नॅक बार, कॉफी शॉप, पार्किंग चे बांधकामासाठी ३० वर्षाच्या भाडेतत्वावर देण्याबाबत व तो करार ९९ वर्षापर्यंत नुतनीकरण करण्याच्या अटीवर करारनामा करण्यात आला. त्या अन्वये निविदा मागविण्यात आल्या.

दरम्यान दोन निविदा प्राप्त झाल्या. १)एम.एस.शलाका इंजिनियरिंग ॲण्ड जे.व्ही. ऑफिस ८ एच आर्केड, उस्मानपुरा औरंगाबाद २) राठी कन्स्ट्रक्शन औरंगाबाद, दिनांक २८.२.२००७ रोजी निविदा उघडण्यात आल्या असून निविदेत प्राप्त दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) शलाका इंजिनियरिंग | - | १७५०००/- |
| २) राठी कन्स्ट्रक्शन | - | २५०००/- |

मा.आयुक्त यांनी दोन्ही निविदाधारकांना वाटाघाटीसाठी बोलावले. वाटाघाटीअंती मा.आयुक्त यांनी विकासकांना रू.४,०००००/- प्रिमियम ऑफर स्वीकारणे बाबत सुनावल्यानंतर विकासक मे.शलाका इंजिनियर्स यांनी प्रिमियम ऑफर बाबत मान्यता दिल्यानंतर भूखंड भाडेतत्वावर देण्याबाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.३०३, दिनांक २०.३.२००४ व मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.७९०/१०, दिनांक २९.३.२०१० अन्वये मान्यता घेण्यात आली. दरम्यान संचिकेच्या तपासणीअंती खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पूर्ण जागेची नाममात्र रू.१/- दराने किंमत गृहीत धरली आहे. वास्तविक त्यावेळचा रेडीरेकनर नुसार जमिनीची किंमत रू.१,०५,७३,०००/- एवढी असतांना व प्रोजेक्ट कन्सेशनर जमिनीचा वापर पूर्णपणे व्यापारी तत्वावर करणार असून त्यातून संबंधित व्यक्ती उत्पन्न मिळविणार आहे. त्यामुळे नाममात्र दराने प्रिमियम घेणे ही बाब अनाकलनीय आहे.

२. एनएस-३३ मुद्या क्र.१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे आखीव पत्रिकेवर प्रथम मालकी हक्काबाबत नोंद घेणे आवश्यक आहे. विकासकाच्या नावाची नोंद आखीव पत्रिकेवर महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय कनसेशन ॲग्रीमेन्ट नुसार घेण्यात आली. ही नोंद रद्य करून संबंधित ले-आऊट मधील मोकळ्या जागेवर महानगरपालिकेस हस्तांतरण केलेल्या जागेचे संबंधित प्राधिका-याशी संपर्क साधून आखीव पत्रिकेवर महानगरपालिकेचे नांव लावून अनुपालन दर्शवावे. ज्यामुळे जागेच्या मालकी हक्काबाबत नोंद नसल्याने भविष्यात अडचण निर्माण होवून आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. मे.शलाका इंजिनियरिंग जे.व्ही.विकासक यांचेकडून महनगरपालिकेने रू.१०,०००००/- बँक गॅरेन्टी सुरक्षा ठेव म्हणून दिनांक ४.८.२००९ रोजी पाच वर्षाकरीता घेण्यात आलेली आहे. मात्र सदरची बँक गॅरेन्टी दिनांक ३१.७.२०१४ रोजी संपलेली आहे. त्यामुळे ज्या कारणासाठी बँक गॅरेन्टी घेण्यात आलेली आहे त्याचा पूर्णपणे उद्येश असफल झाला असून संबंधितांनी बँक गॅरेन्टी चे नुतनीकरण न केल्यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होवून आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. महानगरपालिकेने बी.ओ.टी. तत्वावर मे.शलाका इंजिनियर्स जे.व्ही.विकासक यांना ज्योतीनगर येथील रेखांकनातील ४२२९.७५ पैकी २११४.७५ एवढी मालमत्ता विकसीत करण्याकरीता प्रति रू.५/- प्रति चौ.मी.ने देण्यात आली आहे. सदरचे देण्यात आलेले दर असून कोणत्या आधारे / कोणत्या निकषाद्वारे देण्यात आले याचा बोध होत नाही. सदर मालमत्ता बी.ओ.टी. वर अति अल्प दराने विकासकांना दिल्यामुळे मनपाचे नुकसान झालेले आहे. याबाबत प्रथमदर्शनी खुलासा व्हावा. तसेच दर तीन वर्षांनी भाडेपट्टयात वाढ होणा-या अटीचा निविदेत समावेश नसल्याने महानगरपालिकेच आर्थिक नुकसान झालेले आहे.

५. एनएस-३७ परिच्छेद क्र.७१ अन्वये सदर प्रकल्प पूर्ण झाला असून विकासक यांच्याकडून भाडेपट्टा सुरू असल्याने सदरील प्रकल्पाची कागदपत्रे व पुढील भाडे पट्टा वसूलीसाठी मालमत्ता विभागाकडे पाठविणे असे जा.क्र.बी.ओ.टी./३६१, दिनांक १९.७.२०१० रोजी विभागाने कळविले आहे. महानगरपालिकेने बी.ओ.टी. तत्वावर मे.शलाका इंजिनियर्स जे.व्ही. विकासक यांना ज्योतीनगर येथील रेखांकनातील ४२२९.७५ पैकी २११४.७५ एवढी मालमत्ता विकसीत करण्याकरीता प्रति रू.५/- चौ.मी. ने देण्यात आली आहे. जागेचे भाडे वसूल करतांना फक्त ८०४.०० चौ.मी.जागेचे भाडे प्रति रू.५/- चौ.मी.प्रमाणे रू.४८,२४०/- प्रतिवर्ष १.४.२००९ ते ३१.३.२०१२ पर्यंत एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. सदरील वसूल रक्कम ही करारनाम्यानुसार वसूल झालेली आहे. प्रत्यक्षात करारनाम्यात Terms of Lease मुद्या ४.१ मध्ये एकूण विकासकाला दिलेल्या क्षेत्र २११४.७५ बी एवढ्या जागेवर भाडे न आकारता केवळ ८०४.०० चौ.मी. जागेवर भाडे आकारण्याची तरतूद केल्याने मनपाचे प्रतीवर्ष रू.७८६४५/- प्रमाणे व वर्षाचे रू.७,०७,८०५/- चे नुकसान झालेले आहे. आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून मनपा फंडात भरणा करून अनुपालन दर्शवावे.

**विभागाने मुद्या क्र.१ ते ६ नुसार संबंधितांकडून रक्क्म वसूल करून इतर अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३ : नगर भूमापन क्र.१९१४९ रेल्वे स्टेशन येथील प्रशासकीय ईमारत व्यापारी संकूल व अनुषंगिक प्रकल्प विकास कामे करणे बाबत.**

रेल्वेस्टेशन येथील महानगरपालिकेच्या मालकीची न.भू.क्र.१९१४९ या जागेवर प्रशासकीय ईमारत मध्ये शॉपींग मॉल व विश्रामगृह, अनुषंगिक विकास कामे बोल्ट तत्वावर हाती घ्यावयाची आहे. ह्या प्रकल्पासाठी नियुक्त केलेले सल्लागार यांनी प्रकल्प अहवाल ड्रॉप्ट टेंडर, दस्ताऐवजी, ड्रॉफ्ट टेंडर नोटीस, कार्यालयात दाखल केले आहे. त्याचं संक्षिप्त विवरण पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| एकूण भूखंड क्षेत्र | - | ११०५९.५१ चौ.मी. |
| रस्ता (डीपी) बाधित क्षेत्र | - | ८६६.२६ चौ.मी. |
| निव्वळ क्षेत्रफळ | - | १०१९३.२५ चौ.मी. |
| अनुज्ञेय चटई क्षेत्र | | -निर्देशांक ०.७५% अनुसार |

(अनुज्ञेय बाधित क्षेत्र) बी/व्हीएआर ७६४४.९४ चौ.मी.
अस्तित्वातील Ratainabe क्षेत्र - ११०=०० चौ.मी.
प्रस्तावित बांधिव क्षेत्र -
(Shoping mal officable)- ६३३२.६२ चौ.मी.
Resthome)
एकूण बांधिव क्षेत्र - ७४४२=६२ चौ.मी.

वरील प्रमाणे मा.आयुक्त व शहर अभियंता (बी.ओ.टी.) प्रमुख यांची संचिका पृ.क्र.एनएस/०२ मध्ये प्रकरणी मान्यता दिसते. संबंधित विकास कामाकरीता दिनांक ४.२.२००६ रोजी राष्ट्रीय पातळीवर प्रसिध्दी देवून निविदा मागविण्यात आल्या. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक ७.३.२००६ अशी होती. यामध्ये एकूण तीन (३) निविदा प्राप्त झाल्या.

१. मे.औरंगाबाद बिल्डर्स व डेव्हलपर्स
२. मे.तेजस कन्स्ट्रक्शन व (जे.व्ही)
३. मे.शलाका इंजिनियर्स

छाननी अंती पात्र असलेल्या लिफाफा क्र.३ उघडण्यात येवून त्यांचे दर खालीलप्रमाणे -

१) मे.औरंगाबाद बिल्डर्स व डेव्हलपर्स प्रियम रू. १,७१,१७,११७=११
२) मे.तेजस कन्स्ट्रक्शन (जेव्ही) २,७०,९२,०९२=००

वरील प्रमाणे तुलनात्मक दर अ.क्र. (२) यांचे असल्याने प्रकल्प भूखंड क्षेत्र ११०५९.५१ चौ.मी. असून देय चटाई क्षेत्र ७६४४.९४ चौ.मी.एवढे आहे.

त्यापैकी विकासक यांना ९९ वर्षाचे भाडे तत्वावर देण्यात येणारे बांधिव क्षेत्र -५७९२ = ६२ चौ.मी.इतके आहे. सदर बांधीव क्षेत्रासाठी ९९ वर्षाकरीता भाडेपट्टा दर रू.१०=०० प्र.चौ.मी. प्रति महा इतका असेल व विकासकाकडून मनपास बांधून द्यावयाचे क्षेत्र ५४०=०० चौ.मी. (Stilt -२६५=०० चौ.मी.इतके आहे.) यामध्ये भूखंड विकासाधिन रस्ते, पथदिवे, जलवाहिनी, जलनिस्सारण वाहिनी, खुलीजागा विकास पार्कींग विकास, ही कामे विकासक यांचे खर्चाने करणे बंधनकारक राहणार आहे आहे.

विषय क्र.२३२/१५ दिनांक २८.३.२००६ रोजीची स्थायी समिती सभा विषय क्र.२९६ अनव्ये मंजूर दिनांक १३.४.२००६ रोजी सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त -

**<u>मुद्या क्र.</u>**

१. आखीव पत्रिका १९१४९ विश्राम गृह नगरपरिषद यांचे नावाने नोंद आहे. महानगरपालिकेच्या नावाने मालकी हक्काबाबत नोंद घेण्यात आलेली नाही. जे की आवश्यक आहे.

२. करारनामा मधील अटी/शर्ती मधील मुद्या क्र. ई मध्ये सुरक्षा अनामत रक्म रू.१०,००,०००/- देण्याचे पालन करावे व डिमांड ड्राफ्ट किंवा समतुल्य (समकक्ष) बँक गॅरेन्टी रक्कम बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ५ वर्षापर्यंतचे वैध असे असतांना विभागाने सुरक्षा अनामत रक्कम रू.१०,००,०००/- ची बँक गॅरेन्टी घेतलेली दिसून येत नाही. यामुळे अटी / शर्तीचा भंग होवून मनपाचे परिणामी आर्थिक नुकसान झालेले आहे.

विकासक यांना देण्यात येणा-या क्षेत्र ५७९२.६२ चौ.मी. वर ९९ वर्षासाठी रू.१०% चौ.मी.प्रति महिन्याप्रमाणे २ Lease Rent आकारण्यात येत आहे. विकासक यांचे बांधाव्याचे क्षेत्र ५७९२.६२ चौ.मी. क्षेत्राच्या जमिनीची किंमत प्रोव्हायडिंग मेल रू. ५०००/- प्रमाणे रू.२,८९,६३१००/- रूपये होत आहे. विकासक यांचेकडून मिळणारी रक्कम खालील प्रमाणे आहे.

१) Non Refundable Amount - २,७०.९२,०९२=००
२) Builtup Area to be given to amc
   a) Stilt Floor २६५ x ३०५० $m^२$ = ८०८२५० = ००
   b) G.F.+F.F. ५४० $m^२$ x ७००० = ३७,८०,००० = ००

३) Development of Land Closing Road parking area open space land scaping etc <u>११०००=००</u>

३,२७,८०.३४२

तसेच ५७९२.६२ चौ.मी. क्षेत्रासाठी ९९ वर्षासाठी लिज रेन्ट रू.१०% प्रमाणे चौ.मी. प्रती महिना प्रमाणे दरवर्षी रू.६,९५,११५/- मनपास मिळणार आहे.

सुरक्षा ठेव - ५०००००/-

<u>Ch ०८५९९३/-</u>

३.८.२००६

प्रोजेक्ट डेव्हलपमेंट फीस

२५% ३०००/-

१२०००००/- <u>C ०८५९९४६</u>

३.८.२००६

(एनएस -१२ वर दर्शविले प्रमाणे मा.आयुक्त यांचे चर्चेनुसार ४ हप्ते घेण्याचे मा.आयुक्तांनी मान्य केले. यावर स्वाक्षरी नाही. मान्यता नाही. )

सदरील रक्कम बी.ओ.टी. सेल च्या हेड मध्ये ठेवण्याचे मा.आयुक्त यांनी सांगितले.

न.भू.क्र.१९१४९ बी.ओ.टी. विकास करण्यासाठी निविदा ४.२.२००६ रोजी मागविण्यात आल्या.

कन्सेशन ॲग्रीमेन्ट ७ th २००६

२,७०,९२,०९२/- भरणा केला आहे. परंतू यात उल्लेख नाही. ईमारत हस्तांतर केलेला नाही. ५४० चौ.मी.काम पूर्ण केले आहे. मात्र भोगवटा प्रमाणपत्र घेवून सदरील हस्तांतर केलेले नाही.

**उक्त मुद्यांबाबत खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आलेले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमर्थनीय असून आक्षेप कायम करण्यात येतो. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४ : दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत वॉर्ड क्र.८१,जयभवानीनगर येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे बाबत.**

वॉर्ड क्र.८१, जय भवानी नगर येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करण्यासाठी मे.युनायटेड कन्स्ट्रक्शन, यांची १९.९९ कमी दराने निविदा मान्य करण्यात आली. त्यांना कार्यादेश क्र.मनपा/प्र.अभि-ई/१३८/२०१३, दिनांक १८.१२.२०१३ अन्वये कार्यादेश देवून सदर कामाची मुदत ३ महिने देण्यात आली. म्हणजेच दिनांक १८.१२.२०१३ ते दिनांक १७.०३.२०१४ पर्यंत मुदत होती. मात्र सदरचे काम दिनांक ३.११.२०१४ रोजी काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्रावरून दिसते. सदरचे कामास मुदतवाढीस सक्षम अधिकारी यांची मान्यता नाही. त्यामुळे कार्यादेश / निविदांमधील अटी / शर्ती प्रमाणे एकूण २३१ दिवसाच्या कालावधीत दंडात्मक कार्यवाही केलेली दिसून येत नाही. प्रकरण तपासून खात्री करावी व दंडात्मक कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेल्या खुलाशात असे नमूद केले आहे की, मा.जिल्हाधिकारी यांनी सदरील कामास प्रशासकीय मान्यता दिनांक १३.२.२०१४ रोजी प्रदान केली आहे. प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर सदरील काम पुढील ४ महिन्याचा कालावधी गृहीत धरून पूर्ण केले आहे.

**विभागाने सादर केलेल्या खुलाशानुसार मा.जिल्हा अधिकारी यांची प्रशासकीय मान्यता होण्यापूर्वीच सदरील निधी प्राप्त न होताच कार्यादेश निर्गमित करणे ही बाब नियमबाह्य असून उपरोक्त अनियमितते बाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.५ : दलित वस्ती सुधार योजना प्र.क्र.०९ भुजबळ नगर येथे कॉंक्रीट रस्ता बांधणी करणे बाबत. अं.प.रक्कम रू.९,७०,०००/-**

दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेस ८० लक्षचा निधी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

प्राप्त निधीच्या अनुषंगाने सहा कामांसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी आदेश जा.क्र./२०१३/नपाप्र/कावी,दिनांक २८.०८.२०१३ अन्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान केलेली आहे.

उक्त विषयांकित कामाची निविदा सूचना काढण्यात आली असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. ई- निविदा पध्दतीने दिनांक ११.११.२०१३ रोजी निविदा उघडण्यात आली असून त्या नुसार एकूण ८ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यात सर्वात कमी दर २५.२% एशियन कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

सदर प्रभागाचे स.नगरसेवक यांनी त्यांचे पत्र दिनांक १४.२.२०१४ अन्वये सदरचे वसाहतीमधील लगतचे काम निविदा दर २५.२०% कमी देणारे बचतीमधून वाढीवकाम करून घेण्यासाठी कळविले आहे. त्यामुळे सुधारित प्रस्तावित अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,१४,०००/- झाले आहे. त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. संचिकांची पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील कामास जा.क्र.मनपा/स्लम/२०१३/४८८, दिनांक ३०.१२.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत ४ महिने देण्यात आली आहे. परंतू निविदा नियम ५४ क्र./विमास/१०९८/प्र.क्र./२८/९८ शासन हमी मंत्रालय मुंबई दिनांक १९.८.१९९८ अन्वये कामाचा विमा कामाच्या कालावधीत असणे अपेक्षित होते. मात्र विम्याचा कालावधी ५.३.२०१४/४.९.२०१४ काम संपल्यानंतरचा आहे. तरी विभागाने याबाबतचा लेखी खुलासा सादर करावा.

२. Item No-०३ DETAIL Estimate Form चे मोजमाप

| Length | Breadth | Depth | Total Quantity |
|---|---|---|---|
| १७४.०० | ४.०० | ०.१५ | १०४.४० |

असतांना ११८.९४ हे चूकीचे मोजमाप दर्शविले आहे.

३. देयक तपासतांना खालील बाबी निदर्शनास आल्या.

| **Item No** | Measurment | **Item of work** | **Rate** | **दर्श रक्कम** | **पाहिजे असलेली रक्कम** | **फरक रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ७४.७६ | Prov and laying १०० mm thick cost in Situ Cement concrete m-१० etc comp. | ३१९९.८६ cum | २४३४१३.०० | २३९२२२.०० | ४१९१/- |
| ३ | १५७.४४ | Construction funre inforced /reinforced cement concrete payment etc complete | ५६३२.७९ Cum | ८८८५७३.०० | ८८६८२६.०० | १७४७/- |
| | | | | | | **५९३८/-** |

जास्तीची अदा रक्कम रू. ५९३८/- वसूल करून तसा अहवाल सादर करावा.

५. एकूण Net payble amount रक्कम रू.७३०००७/- एवढे देणे आवश्यक असतांना ७,४१,३६२/- एवढी देण्यात आली आहे. म्हणजेच रक्कम रू.११,३५५/- एवढी जास्त अदा करण्यात आली आहे.

**विभागाने मुद्या क्र.१ ते ५ बाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमर्थनीय आहे. आक्षेप कायम करण्यात येतो. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.६ : दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.८० संतोषी माता नगर मध्ये कॉंक्रीट रस्ते बांधणी करणे बाबत. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४,२८,२००/-)**

दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरीता औरंगाबाद महानगरपालिकेस रू.८० लक्ष निधी प्राप्त झालेला आहे.

प्रस्तावित निधीच्या अनुषंगाने प्रस्तावित जा.क्र.मनपा/स्लम/ द.व.सु.यो./२०१३/ १४७ ,दिनांक ३१.५.२०१३ च्या पत्रान्वये प्रस्तावित एकूण ६ कामांसाठी प्रशासकीय मान्यता मिळणे करीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता, त्यानुसार मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी जा.क्र.मनपा /२०१३ / नपाप्र/कावि-- दिनांक २८.८.२०१३ (प्राप्त दिनांक १२.९.२०१३) अन्वये प्रशासकीय मंजूर दिलेली आहे. उक्त विषयांकीत कामाची निविदा सूचना व परिसूची - ब तपासण्यात आलेली असून त्यास मा.आयुक्त, यांनी मंजूरी दिलेली आहे. ई--निविदा पध्दतीने दिनांक ११.११.२०१३ रोजी निविदा उघडण्यात आली असून, त्यानुसार एकूण (९) नऊ निविदा प्राप्त झाल्या आहे. त्यात सर्वात कमी दराची निविदा २५.३०% कमी दर - ॲशियन कन्स्ट्रक्शन यांची असून त्यांना निविदा दिलेली आहे.

सदर प्रभागाचे स.नगरसेवक यांनी त्यांचे पत्र दिनांक ३.५.२०१४ अन्वये सदरचे वसाहतीमधील लगतचे काम निविदा दर २५.३०% कमी दराने दिले होते. त्यातील ऊरलेले बचतीमधून वाढीव काम करून घेण्यासाठी कळविले आहे. त्यानुसार सुधारित प्रस्तावित अं.प.रक्कम रू.१८,८४,१४१/- झाले आहे. त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदरचे कामाच्या संचिकेची पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास येतात.

१. सदरील कामास जा.क्र.मनपा/स्लम/२०१४/५५४, दिनांक ३०.१.२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत ४ महिने देण्यात आली आहे. परंतू निविदा नियम ५४,क्र./विमास/१०९८/प्र.क्र./२८/९८ शासन हमी मंत्रालय मुंबई दिनांक १९.८.१९९८ अन्वये कामाचा विमा हा कामाच्या कालावधीत असणे आवश्यक होते. मात्र विम्याचा कालावधी दिनांक २३.४.२०१४ ते २२.८.२०१४ या कालावधीचा आहे. म्हणजेच विमा हा काम संपल्यानंतरचा आहे.

२. मोजमाप पुस्तिका क्र.२६३३ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

३. निविदा नियम - ५४(२) अन्वये संचिकेतील निविदा दर २५.३०% कमी असल्याने, ५% सुरक्षा ठेव म्हणून रक्कम वसूल करणे आवश्यक होते. मात्र तसे न करता संबंधिताचे काम झाल्यानंतरच्या देयकातून सुरक्षा रक्कम ५% वजावट करण्यात आली आहे.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत सादर केलेला खुलासा असमर्थनीय असून मुद्यांशी विसंगत आहे. मुद्या क्र.१ नुसार विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही. मुद्या क्र.२ नुसार मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. तसेच मुद्या क्र.३ नुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव ही कामाच्या performance शी निगडीत असते. या बाबींचा विचार विभागाने केलेला नाही. अतिरिक्त सुरक्षा ठेव कार्यादेश देण्यापूर्वीच संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक असते. या सारख्या अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र .७ : प्रभाग क्र.४ अंतर्गत एकतानगर येथे काँक्रीट रस्ते तयार करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.१४२८०५०/-)**

दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात औरंगाबाद महानगरपालिकेस ८० लक्षचा निधी प्राप्त झालेला आहे.

प्राप्त निधीच्या अनुषंगाने सहा कामांसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी जा.क्र./२०१३/नपाप्र/कावी दिनांक २८.८.२०१३ अन्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान केलेली आहे.

उक्त विषयांकित कामाची निविदा सूचना काढण्यात आली असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. ई- निविदा पध्दतीने दिनांक ११.११.२०१३ रोजी निविदा उघडण्यात आली असून त्या नुसार एकूण ९ निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यात सर्वात कमी दर २५.१% Below ASIAN Construction यांचे असून त्यांना निविदा देण्यात आली असून कार्यादेश जा.क्र.मनपा/स्लम/२०१४/५५५, दिनांक ३०.१.२०१४ रोजी देण्यात आला असून कामाचा कालावधी ४ महिन्याचाच आहे.

संचिकांची पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. जा.क्र.मनपा/स्लम/२०१४/५५५, दिनांक ३०.१.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत ४ महिने देण्यात आली असतांना निविदा नियम ५४ क्र./विमास/१०९८/प्र.क्र./२८/९८, शासन हमी मंत्रालय मुंबई दिनांक १९.८.१९९८ अन्वये कामाचा विमा कामाच्या कालावधीत असणे अपेक्षित होते.मात्र विम्याचा कालावधी काम संपल्यानंतर दिनांक २३.४.२०१४/ २२.८.२०१४ या कालावधीचा आहे. ही बाब आक्षेपार्ह असून विभागाने काम देतांना ही बाब दुर्लक्षित केल्याचे स्पष्ट होते.

२. निविदा नियम ५४ अन्वये ५% सुरक्षा अनामत रक्कम निविदा मंजूर झाल्यानंतर घेणे आवश्यक असतांना सुरक्षा अनामत रक्कम घेतलेली नाही. काम झाल्यानंतर देयकातून ५% सुरक्षा अनामत २१६९६/- वजा करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

३. कार्यादेश दिनांक ३०.१.२०१४ ते ३०.५.२०१४ पर्यंत कामाचा कालावधी ४ महिन्याचा होता. परंतू काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देतांना ३०.७.२०१४ रोजी काम पूर्ण झालेले दर्शविले आहे. मात्र यावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही केली नाही.

४. सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.१४२८०५०/- एवढे आहे. त्यानुसार काम करून प्रथम व अंतीम देयक रू.९,७८,७७१/- संबंधितास अदा करण्यात आले आहे. परंतू वाढीव काम रक्कम रू.४३३९१६/- अदा करण्यात आले अहे. मात्र त्या बाबतचे अंदाजपत्रक न/ परिशिष्ट-B दर्शविता सदरील रक्कम खर्च करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

**विभागाने मुद्या क्र.१ ते ४ बाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमर्थनीय आहे. आक्षेप कायम करण्यात येतो. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.८ : त्रिंबक अर्जून साबळे, (बेपत्ता)सुशिलाबाई त्रिंबक साबळे,चिकलठाणा MIDC (ब्रिजवाडी) यांना रमाई आवास योजने अंतर्गत लाभार्थी म्हणून अनुदान देण्याबाबत. (दा.रे.क्र.१/२४३/१०५२४,चिकलठाणा MIDC)**

रमाई आवास योजने अंतर्गत गुंठेवारी भागातील पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी रमाई आवास योजना सुरू करण्यात आली आहे. परंतू सदर योजना ही सद्यस्थितीमध्ये केवळ घोषित स्लम वसाहतीमध्ये लागू करण्यात आलेली असून औरंगाबाद शहरामध्ये जवळपास ११७ गुंठेवारी वसाहती असून या गुंठेवारी वसाहतीमधील नागरीक या योजनेच्या लाभापासून वंचित असून अशा नागरीकांवर अन्याय होत आहे. शासन निर्णयामध्ये गुंठेवारी वसाहतीसाठी पी.आर.कार्ड व सातबाराची अट नमूद करण्यात आलेली आहे. सदर अट शिथिल करण्यात यावी तसेच या नागरीकांनी आपली मालमत्ता गुंठेवारी कायद्या अंतर्गत नियमित केली आहे अशा नागरीकांना योजनेचा लाभ देण्यात यावा. असे असतांना योजना ही सद्यस्थिती मध्ये केवळ घोषित स्लम वसाहतीमध्ये राबविण्यात येत आहे. शासन निर्णय ०९ मार्च २०१० च्या निर्णयानुसार सदरील लाभार्थ्यांना महानगरपालिका क्षेत्र २.०० लक्ष अनुदान देण्यात येईल. संचिका तपासतांना खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. लाभार्थ्यांना मनपा टॅक्स भरणा केलेली पावती क्रमांक F१०४/४३५५५, दिनांक १५.०९.२०१२ रक्कम रू.६६१/- २००२-२०१३ भरणा केला आहे. तसेच मालमत्ता कर आकारणी झाल्याबाबत कर आकारणी क्रमांक ७१६६/२००४-२००५, दिनांक ६.१२.२००५ अन्वये ८.१२ चौ.मी.करयोग्य मूल्य ५५१ एकूण कर २१८, अनाधिकृत बांधकामासाठी अतिरिक्त जमिनीचा कर रू.९७४.४ एकूण ११९२ रू.मालमत्त कर लागलेला आहे. म्हणजेच संबंधिताचे पक्के घर असतांना संबंधिताला २.०० लक्ष रूपये लाभ कसा देण्यात आला याचा लेखी खुलासा व्हावा.

२. महानगरपालिका मालमत्ता कर, पाणीपट्टी भरणा पावती पैकी मालमत्ता कर पावती लावलेली आहे. परंतू सन २०१२-१३ पर्यंतची पावती द्वारे भरणा केलेली रक्कम चूकीची आहे. कमी भरणा यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. मालकी हक्काचा पुरावा नाही.

४. जा.क्र.मनपा/स्लम/र.जा.यो./४००/२०१२,दि.२.०१.२०१३ रोजी जुने कच्चे घर तोडून देणे बाबत पत्र देण्यात आले असून तीन दिवसात घर तोडून देणे बाबत सांगितले आहे. परंतू त्याबाबतचा फोटो नाही. अथवा नविन बांधकाम केव्हा सुरू करण्यात आले आहे याचा उल्लेख नाही.

५. करार नाम्यात दर्शविलेले अ.क्र.८ नुसार घराचे बांधकाम तीन महिन्यात करावयाचे आहे असे नमूद असतांना ताबा पावती दिनांक २४.०९.२०१४ रोजी देण्यात आली आहे.

६. संचिका सादर करतांना त्यावर दिनांक दर्शविलेला नाही. त्यामुळे खर्च कोणत्या वर्षात करण्यात आला याचा बोध होत नाही.

७. घरकुल योजनेकरीता सर्वेक्षण प्रपत्र-२ भरणा करतांना पूर्ण माहिती भरलेली नाही. कुटुंब प्रमुख व सर्वेक्षकाची स्वाक्षरी करण्यात आलेली नाही.

८. शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२३(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करून घरकुलाच्या प्रवेश द्वारावर लावणे बाबत निर्देश आहेत. सदरील कोनशिला बसविणेसाठी रू.७००/- चा खर्च अपेक्षित आहे. कोनशिला कार्यालया मार्फत बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानातून कपात करून घ्यावी असे असतांना कोणत्याही लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल केलेली नाही. यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

९. दिनांक २२.८.२०१२ रोजी आयोजित रमाई आवास योजनेच्या अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना राबविणे बाबतच्या बैठकीच्या इतिवृत्त अ.क्र.५ मध्ये दर्शविले प्रमाणे शासन निर्णय दिनांक ९ मार्च २०१० मधील तरतूद क्रमांक १९ (क) नुसार घरकुल किंमतीच्या १०% म्हणजेच २०,०००/- राखीव ठेवून पाचवा व अंतिम टप्प्याचे देयक वितरीत करावे व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त झाल्यानंतर उर्वरीत रक्कम वितरीत करावी असे असतांना रक्कम वसूल केलेली नाही.

**विभागाने मुद्या क्र.१ ते ९ बाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ९ : अशोक आनंद येवले, यांना रमाई आवास योजने बाबत घरकुल वाटपाबाबत.(लाभार्थी क्र.१००५)**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा तर्फे रमाई आवास योजना राबविण्यात आली असून, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील घटकांसाठी ही योजना राबविण्यात आली आहे.

या योजने नुसार घराच्या बांधकामासाठी, महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी खर्चाची कमाल मर्यादा २.०० लक्ष रू. निश्चित करण्यात आली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, मंत्रालय विस्तार भवन मुंबई - ४०००३२, दिनांक २ मार्च २०१० अन्वये लाभार्थ्यांना खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१. सातबाराचा उतारा. मालमत्ता नोंदपत्र (Property Registered card) ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक.
२. घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बिल या कागदपत्रापैकी एक.
३. सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
४. सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या उत्पन्नाचा दाखला.
५. अतिरिक्त दाखले : खाली नमूद केलेली कागदपत्रे / दाखले पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात येतील.

अ. १.१.१९९५ च्या किंवा मतदार यादीतील नावांचा उतारा.

ब. निवडणूक मतदार ओळखपत्र.

क. रेशनकार्ड.

ङ सरपंच / तलाठ्याचा दाखला.

इ. महानगरपालिका / नगरपालिकेतील मालमत्ता कर भरल्याच्या पावतीची प्रत.

दरम्यान अशोक आनंद येवले, यांच्या रमाई आवास योजनेच्य घरकुलाची संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

संबंधित लाभ धारकाचे मिळकत / जागे बाबतचे संमतीपत्र, दिनांक १८.१२.२०१३ चे व जागेचे खरेदीखत क्र.२४४२, दिनांक २१.७.२०१२ चे असून आकाश किसनराव साळवे व चंदन कुंदनलाल पडेवाल यांनी लाभधारक श्री.अशोक येवले यांच्या नावावर केलेले आहे. त्यामुळे संबंधिताचे राहण्याचे वास्तव्य १.१.१९९५ चे आहे असे सिध्द होत नसूनही लाभधारकाला घरकुलासाठी रू.२.०० लक्षची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र / गरजू लाभार्थ्यांला याचा फायदा झालेला नसून तो लाभापासून वंचित राहिलेला आहे.

शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२३(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करून घरकुलाच्या प्रवेश द्वारावर लावणे बाबत निर्देश आहेत. सदरील कोनशिला बसविणेसाठी रू.७००/- चा खर्च अपेक्षित आहे.

कोनशिला कार्यालया मार्फत बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानातून कपात करून घ्यावी असे असतांना कोणत्याही लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल केल्याचे दिसून येत नाही.

विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१० : श्री.गोविंद संभाजी खंदारे यांना रमाई आवास योजने बाबत घरकुल वाटपाबाबत.(लाभार्थी क्र.९२६)**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा तर्फे रमाई आवास योजना राबविण्यात आली असून, महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील घटकांसाठी ही योजना राबविण्यात आली आहे. या योजने नुसार घराच्या बांधकामासाठी, महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी खर्चाची कमाल मर्यादा २.०० लक्ष रू. निश्चित करण्यात आली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, मंत्रालय विस्तार भवन मुंबई - ४०००३२, दिनांक २ मार्च २०१० अन्वये लाभार्थ्यांना खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१. सातबारा चा उतारा. मालमत्ता नोंदपत्र (Property Registered card) ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक.
२. घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बिल या कागदपत्रापैकी एक.
३. सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
४. सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या उत्पन्नाचा दाखला.
५. अतिरिक्त दाखले : खाली नमूद केलेली कागदपत्रे / दाखले पुरावे म्हणून ग्राह्य धरण्यात येतील.
   अ. १.१.१९९५ च्या किंवा मतदार यादीतील नावांचा उतारा.
   ब. निवडणूक मतदार ओळखपत्र.
   क. रेशनकार्ड.
   ङ सरपंच / तलाठ्याचा दाखला.
   इ. महानगरपालिका / नगरपालिकेतील मालमत्ता कर भरल्याच्या पावतीची प्रत.

दरम्यान श्री.गोविंद संभाजी खंदारे, यांच्या रमाई आवास योजनेच्य घरकुलाची संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

संबंधित लाभ धारकाचे मिळकत / जागे बाबतचे संमतीपत्र,/खरेदीखत दिनांक १३.२.२००४ चे असून सौ.सरीता गोविंदराव खंदारे यांच्या नावावर केलेले आहे. वॉर्ड - ई मधील मालमत्ता क्र. ई०००६२२३ सन २०१२-१३ हे सौ.सरीता गोविंदराव खंदारे यांचे नावाने आहे.

तसेच संबंधिताचे राहण्याचे वास्तव्य १.१.१९९५ चे आहे असे सिध्द होत नसूनही लाभधारकाला घरकुलासाठी रू.२.०० लक्षची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. त्यामुळे पात्र / गरजू लाभार्थ्यांला याचा लाभ मिळालेला नाही.

शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२३(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करून घरकुलाच्या प्रवेश द्वारावर लावणे बाबत निर्देश आहेत. सदरील कोनशिला बसविणेसाठी रू.७००/- चा खर्च अपेक्षित आहे. कोनशिला कार्यालया मार्फत बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानातून कपात करून घ्यावी असे असतांना कोणत्याही लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल केल्याचे दिसून येत नाही.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र ११ : रमाई आवास योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी बांधण्यात घरकुलाची दिलेल्या रकमेबाबत. श्री.अन्ना कचरू बनसोडे, सिध्दार्थनगर लाभार्थी क्र.२३५, रक्कम रू.२,००,०००/- अदा केले.**

विषयांकीत संचिकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. शासनाचे ज्ञापन, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस- ५९-७८-२०७९२०-म.३ कार्यासन दिनांक ३१ जानेवारी १९७९ नुसार श्री.कचरू किसन रा.आपेगाव ता.गंगापुर जि. औरंगाबाद एम-१२ नविन औरंगाबाद मध्ये बांधलेल्या घरासह भूखंड क्र.२५ दिले आहे.

२. अटी क्र.३ जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय हा भूखंड आणि घर किंवा कोणताही भाग विक्री, गहण, बक्षीस दान किंवा अन्य मार्गाने वर्ग करता येणार नाही असे असतांना श्री.अन्ना कचरू बनसोडे यांच्या नावाची मालमत्ता कर व लाईट बिल जोडलेले आहे. संबंधितांना घरकुलाची रक्कम २,००,०००/-अदा केली.

३. तसेच मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी श्री.कचरू किसन,रा.आपेगांव तालुका गंगापूर,जि.औरंगाबाद यांना सदरचे घर हे तात्पुरता हक्कात दिलेले असून - सदरचे पत्रामध्ये घालून दिलेलया अटी /शर्तीचे उल्लंघन झाल्यास हे प्रदान रद्य करणेत येईल असे अट क्र.४ मध्ये म्हटले आहे. अट क्र.५ मध्ये असे ही नमूद आहे की, सदरचे प्रदान निवासस्थानामध्ये काही बदल करायचे असल्यास त्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत. म्हणजेच त्यांचे पूर्व परवानगी शिवाय करू नये. मात्र तशी परवानगी घेतल्याचे प्रकरणामध्ये दिसून येत नाही.

   सदरील प्रकरणाचे शहानिशा न करताच शासनाचा निधी वापरण्यात आल्याने शासनाचे २ लक्ष रूपयाचे आर्थिक नुकसान झाले असून पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिला आहे. यामुळे शासनाची दिशाभूल केल्याचे दिसून येते.

४. शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२३ (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करून घरकुलाच्या प्रवेश द्वारावर लावणे बाबत निर्देश आहेत. सदरील कोनशिला बसविणेसाठी रू.७००/- चा खर्च अपेक्षित आहे. कोनशिला कार्यालया मार्फत बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानातून कपात करून घ्यावी असे असतांना कोणत्याही लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल केल्याचे दिसून येत नाही.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२ : रमाई आवास योजना मालमत्ता कराचा भरणा न करणे बाबत.**

रमाई आवास योजनेचे लाभार्थीची प्राप्त लेख्यांची पाहणी केली असता -

१. लाभार्थी श्री.दिवेकर जनार्धन त्रिंबक, रा.आबेंडकरनगर, लाभार्थी क्र.एपीएल - ४०० . संबंधिताकडून मनपाचा मालमत्ता कर सन २०१३-१४ पर्यंत एकूण रक्कम रू.११४८६=०० बाकी भरून घेतलेली नाही.ताबा दिनांक निरंक.

२. संबंधितास उक्त योजने अंतर्गत लाभ प्रदान केल्याने संबंधितास तात्काळ मालमत्ता कर आकारणी आवश्यक आहे. तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

३. शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२३(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करून घरकुलाच्या प्रवेश द्वारावर लावणे बाबत निर्देश आहेत. सदरील कोनशिला बसविणेसाठी रू.७००/- चा खर्च अपेक्षित आहे. कोनशिला कार्यालया मार्फत बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानातून कपात करून घ्यावी असे असतांना कोणत्याही लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल केल्याचे दिसून येत नाही.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१३: रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल बांधकामाचे अनुदानाबाबत श्री.भानुदास जयराम खरात, रा.मसनतपुर लाभार्थी क्र.(९८)**

रमाई आवास योजने अंतर्गत घरकुल बांधकामापोटी प्रदान अनुदानाबाबत खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास येतात.

१. सदरची योजना ही अनुसूचित जाती व नवबौध्द या घटकांसाठीची असून , या योजनेकरीता सर्वेक्षण प्रपत्र -२ भरणा केलेले नाही.

२. योजने करीता पात्र लाभ धारका करीता दिनांक १.१.१९९५ च्या मतदार यादीतील असावे, पुरावा दाखल लाईट बील ग्राहक क्र.४९००१२३३२९१, सन २०१० श्रीमती अंजनाबाई भानुदास खरात यांचे नावाचे दाखल केलेले आहे.

३. लाभधारक श्री.भानुदास जयराम खरात हे असून त्यांचे नावाने खरेदीखत / करारनामा असे कोणतेही कागदपत्र पुरावा म्हणून दिसून येत नाही. लाभ प्राप्ती करीता श्रीमती अंजनाबाई खरात यंचे नावाने असलेला खरेदीखत / करारनामा क्र.५०५/२०१०, दिनांक ६.९.२०१० या वर्षाचा रू.१००/- मुद्रांकावरील सादर केल्याचे दिसून येते.

४. वरील प्रकरणी प्रत्यक्ष लाभधारक श्री.भानुदास जयराम खरात, रा.मसनतपुर यांनी योजनेचे पात्र लाभधारक म्हणून उक्त मुद्या क्र.२ प्रमाणे तसेच शासन निर्णय क्र./बीसीएच-२००९/प्र.क्र.१५९/माबक-२, दिनांक ९.३.२०१० मधील परि.क्र.४ चे ब नुसार कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही.

५. शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२३(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करून घरकुलाच्या प्रवेश द्वारावर लावणे बाबत निर्देश आहेत. सदरील कोनशिला बसविणेसाठी रू.७००/- चा खर्च अपेक्षित आहे. कोनशिला कार्यालया मार्फत बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानातून कपात करून घ्यावी असे असतांना कोणत्याही लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल केल्याचे दिसून येत नाही.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१४ : रमाई आवास योजना बाबत.(श्री.बापु सर्जेराव पोटफोडे, संजयनगर मुकुंदवाडी) गल्ली नं.४, लाभार्थी क्र.९४४.**

रमाई आवास योजने अंतर्गत लाभार्थी यांच्या संचिकेचे अवलोकन केले असता, शासन निर्णय क्र./बीसीएच/२००९/प्र.क्र.१५९/मावक-२, दिनांक ०९ मार्च २०१० प्रमाणे पात्र लाभार्थी हे शासनाचे धोरणानुसार संबंधित लाभार्थी हे दिनांक १.१.१९९५ पासून त्यांचे घरकुल / निवासस्थान असणे आवश्यक आहे. मात्र संबंधिताचे विजबिल व मनपा मालमत्ता कर पावती किंवा घराचे मालकी हक्काचे कागदपत्र दिनांक १.१.१९९५ चे किंवा त्यापूर्वीचे दिसून येत नाही.

शासन निर्णयाचे निकषा प्रमाणे खात्री न करताच रमाई आवास योजनेचा लाभ प्रदान केलेला आहे. यामुळे इतर पात्र लाभार्थी या योजने पासून वंचित राहू शकतात.

शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२३(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे घर पूर्ण झाल्यानंतर त्या घरावर सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसहाय्यातून घर बांधण्यात आले असे स्पष्ट नांव व वर्ष असलेली कोरीव कोनशीला तयार करून घरकुलाच्या प्रवेश द्वारावर लावणे बाबत निर्देश आहेत. सदरील कोनशिला बसविणेसाठी रू.७००/- चा खर्च अपेक्षित आहे. कोनशिला कार्यालया मार्फत बसविण्यात येणार असून त्यासाठी लागणारा खर्च लाभार्थ्यांना देण्यात येणा-या अनुदानातून कपात करून घ्यावी असे असतांना कोणत्याही लाभार्थ्यांकडून रक्कम वसूल केल्याचे दिसून येत नाही.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आलेले होते. परंतू लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१५ : एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत घरकुल बांधणे व इतर कामे करणे बाबत. (I.H.S.D.P.)**

केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम या योजने अंतर्गत मोहल्ला आंबेडकरनगर, ब्रिजवाडी व राहुलनगर या स्लम भागातील एकूण ६१७ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या योजनेस केंद्र शासनाने मंजूरी देवून त्यासाठी शासनाने रू.११.८३ कोटीची तरतूद करून रू.१.७१ कोटीचा पहिला हप्ता महानगरपालिकेस देण्यात आला. सदर योजने अंतर्गत लाभार्थ्यांच्या हिस्स्याचे पैसे लाभार्थी बँकेत जमा करत असून लाभार्थ्यांचा हिस्सा व शासनाचा पहिला हप्ता याचा विनियोग झाल्याशिवाय दुसरा हप्ता शासनाकडून दिला जाणार नाही अशी नोंद संचिकेत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) आंबेडकरनगर | - | ३५१ लाभार्थी |
| २) ब्रिजवाडी | - | २१३ लाभार्थी |
| ३) राहुलनगर | - | ५३ लाभार्थी |
| एकूण | - | **६१७ लाभार्थी** |

मुख्य अभियंता म्हाडा मुंबई यंचे जा.क्र./५७५/२००७, दिनांक ७.५.२००७ व जा.क्र.७८४/२००७, दिनांक २५.६.२००७ रोजी पत्र दिले असून त्यामध्ये योजनेचा कोनशिला समारंभ जून, जुलै, ऑगस्ट -२००७ मध्ये करणे बाबत नमूद केले आहे. सदर योजने मध्ये मागासवर्ग संवर्गाच्या लाभार्थी यांच्या घरकुलाच्या किंमतीच्या १०% व सर्वसाधारण संवर्गाच्या लाभार्थी यांच्यासाठी घरकुल किंमतीच्या १२% हिस्सा भरणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांनी त्यांच्या हिस्स्याची रक्कम बँकेमध्ये जमा करणे बाबत सर्व संबंधितांना नोटीसा देण्यात आलेल्या आहे. त्यांना पैसे भरणे बाबत वेळोवेळी बैठका घेवून प्रोत्साहीत करण्यात येत आहे. लाभार्थ्यांना घर बांधून, संपूर्ण भाग विकसीत करून मुलभूत सुखसोयी द्यावयाच्या आहे असे संचिकेतील सादरीकरणात नमूद आहे.

**आंबेडकरनगर**

| | | |
|---|---|---|
| १ | घरकुले बांधण्यासाठी | २,८०,८०७३४=११ |
| २ | सिमेंट रस्ते | ६८,०३,६१७=४५ |
| ३ | जलनिःसारण वाहिनीसाठी | ६१,४७,२९४=६१ |
| ४ | पाणीपुरवठा वाहिनीसाठी | ६८,५०,०००= |
| ५ | पूर्वरचित अर्धगोलाकार गटार | ६२,७६,३२४=७४ |
| ६ | विद्युत (रस्त्यावरील लाईट्स) | १९,९९,८३०=०० |
| | **एकूण** | **५,६१,५७,८००.९१** |

**ब्रिजवाडी**

| | | |
|---|---|---|
| १ | घरकुले बांधण्यासाठी | १७०४०४४५=४९ |
| २ | सिमेंट रस्ते | ४२,६८,१०४=७१ |
| ३ | जलनिःसारण वाहिनीसाठी | ३९,५२,६७७=१४ |
| ४ | पाणीपुरवठा वाहिनीसाठी | ४२,१९,०२३=२३ |
| ५ | पूर्वरचित अर्धगोलाकार गटार | ४०८०६४७=४२ |
| ६ | विद्युत (रस्त्यावरील लाईट्स) | १२८७१०८=०० |
| | **एकूण** | **३४८४८००५=९९** |

**<u>ब्रिजवाडी :</u>**

२) दिनांक १.२.२००८ रोजी निविदा उघडण्यात आली.(चौथी वेळ) त्यानुसार एक निविदा प्राप्त झाली आहे. घर बांधकामासाठी ३४८४८००५ आहे. ४४.४४% above एवढा प्राप्त झाला होता. परंतू वाटाघाटी अंती ४०% above दर प्राप्त झालेला आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/स्लम/२००८/२२७, दिनांक १५.४.२००८ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत २४ महिन्याची आहे.

**<u>राहुलनगरः</u>**

दिनांक १५.१०.२००७ रोजी निविदा उघडण्यात आली. (तिसरी वेळ) त्यानुसार एल.के.कन्स्ट्रक्शन घर बांधकामासाठी रक्कम ४२,४०,१७८ सुविधा रक्कम रू.३६,८०,५३१/- एकूण ७९,२०,७०९/- आहे. ३८.७८ above दर प्राप्त झाला आहे. वाटाघाटी अंती ३५.७८ दरानुसार काम करण्यास तयार आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/स्लम/२००७/३८४, दिनांक २७.१२.२००७ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत १८ महिन्याची आहे.

**राहुलनगर**

| | | |
|---|---|---|
| १ | घरकुले बांधण्यासाठी | ४४५२१८६=७७ |
| २ | सिमेंट रस्ते | १३८३८२७=८४ |
| ३ | जलनिःसारण वाहिनीसाठी | ६७२७३८=६३ |
| ४ | पाणीपुरवठा वाहिनीसाठी | ६०८,९८४=५२ |
| ५ | पूर्वरचित अर्धगोलाकार गटार | १०२६६७५=१४ |
| ६ | विद्युत (रस्त्यावरील लाईट्स) | १७२३३१=२५ |
| | **एकूण** | **८३,१६,७४४=१७** |

उपरोक्त तीन झोपडपट्टया मध्ये ९९३२२५५१.०७ रूपये च्या निविदा काढावयाच्या आहे. (९.९३) कोटी सदर कामाच्या निविदा काढण्यासाठी मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. (पान क्रमांक एनएस-४) सदर योजनेस केंद्र शासनाने ११.८३ कोटीची मंजूरी दिली आहे. त्याचा पहिला हप्ता रू.१.७१ कोटी महानगरपालिका कार्यालयास देण्यात आला असून ती रक्कम स्टेट बँक ऑफ इंडिया खाता क्र.३०१५४७३७२८४ या खात्यावर जमा करण्यात आली आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम अंतर्गत खालील तीन स्लमसाठी निविदा मागविण्यात आली आहे. असे पान क्रमांक एनएस-१० परिच्छेद क्रमांक ३५ नुसार नमूद आहे.

१) दिनांक १५.१०.२००७ रोजी निविदा उघडण्यात आली. (तिसरी वेळ) त्यानुसार एक निविदा प्राप्त झाली आहे. त्यानुसार घरबांधकामासाठी अं.प.रक्कम २,८०,८०,७३४ सुविधा अं.प.रक्कम २,८०,७७,०६७/- असे एकूण रू.५६१५७८००.९१ रू. आहे. ४०.१९ above दर प्राप्त झालेला आहे. वाटाघाटी अंती ३५.७८% जास्त त्यानुसार जा.क्र.मनपा/स्लम/२००८/६५, दिनांक ४.२.२००८ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत २४ महिन्याची आहे. सदरील काम ललीत अधाने या कंत्राटदारास देण्याबाबत मान्यता प्राप्त आहे.

संबंधित कंत्राटदाराने २.१% एफडीआर क्र.५११८०३, दिनांक २४.१.२००८, रू.११,२५,०००/- भरला असल्याचे संचिकेत नमूद आहे परंतू एफडीआर ची प्रत संचिकेत नाही.

२) मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांना मोहल्ला ब्रिजवाडी येथे एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत घर बांधणे व इतर विकास कामे करण्यासंबंधी ४४.४४% जास्त दराने निविदा प्राप्त झाली. वाटाघाटी अंती ४०% जास्त दराची निविदा स्विकारण्यात येवून संबंधित कंत्राटदारास मनपा/अतिशहर अभि/ स्लम / २२७ /०२, दिनांक १५.४.२००८ अन्वये कार्यादेश देण्यात येवून कामाची मुदत २४ महिने ठेवण्यात आली.

२.१% अनामत रकमेची रू.९,७५,७४४ ची बँक ऑफ महाराष्ट्रची बँक गॅरेन्टी क्र.१/०८/०९, दिनांक ३.४.२००८ अन्वये बँक गॅरेन्टीची मुदत २/४/२०१० पर्यंत आहे. सदरील काम अद्यापही चालू असून बँक गॅरेन्टीची मुदतवाढ संचिकेत उपलब्ध नाही.

३. मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांना मो.राहुलनगर येथील एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधारयोजने अंतर्गत घरबांधणे व इतर विकास कामे करण्यासंबंधी मनपा/अतिशहर/स्लम ३८०/०८ दिनांक १८.७.२००८ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदर कामाची मुदत दिनांक २६.६.२००९ पर्यंत होती व निविदा दर ३७.७८% जास्त दराने स्विकारण्यात आली.
संबंधित कंत्राटदाराने २% एफडीआर क्र.४२८२०, दिनांक १७/१२/२००७ रू.१,६०,०००/- भरला असल्याची नोंद संचिकेत आहे पण एफडीआर ची प्रत संचिकेत नाही.

उपरोक्त तिन्ही विविध ठिकाणी सुरू असलेल्या घरकुल योजनेबाबत पुढील बाबींची माहितीची आवश्यकता आहे.

१. २% अनामत रक्कम एफडीआर बँक गॅरेन्टीच्या माध्यमातून स्विकारली परंतू संचिकेत उपलब्ध नाही. ती उपलब्ध करून देण्यात यावी.

२. शासनाकडून उपरोक्त योजनेसाठी एकूण किती रक्कम प्राप्त झाली त्याचा तपशिल देण्यात यावा.

३. मनपा सर्वसाधारण सभेने दिलेल्या मान्यतेनुसार उपरोक्त योजनेवर कोणत्या लेखाशिर्षा अंतर्गत, किती रक्कम खर्च केली याचे सविस्तर विवरण द्यावे.

४. I.H.S.D.P. घरकुल योजनेच्या अंमल बजावणीसाठी मागविण्यात आलेल्या निविदेतील कंत्राटदाराची वर्गवारी नुसार त्यांचेकडे कामाचे लायसन्सची प्रत संचिकेत नाही.

५. जी घरे पूर्ण झालेली आहेत त्याचा लाभार्थींना ताबा दिल्याबाबत ताबा पावती संचिकेत नाही.

६. I.H.S.D.P. या योजनेतील ज्या लाभार्थींनी त्यांचा हिस्सा मनपाकडे जमा केलेला नाही अशा लाभार्थींना रमाई आवास योजनेत सहभागी करता येते काय ? याचा खुलासा व्हावा.

७. I.H.S.D.P. व रमाई आवास योजना या स्वतंत्र आहेत की एकच याचाही खुलासा व्हावा.

८. निविदा मागविल्यानंतर कार्यादेशात कामाची मुदत दर्शविलेली आहे काय ? काम मुदतीत झालेले नाही. वर्षानुवर्ष विविध कारणे सांगून काम पुढे ढकलण्यात येत आहे. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्येश सफल होत नाही.

९. या योजने अंतर्गत विविध ३ ठिकाणी कार्यरत असलेल्या कामासंबंधीच्या नकाशाची प्रत संचिकेत नाही.

१०. कंत्राटी कामाचा विमा अटी व शर्ती क्र.५४ नुसार काम सुरू होण्यापूर्वी उतरविणे बंधनकारक आहे. परंतू सदरील तिन्ही कामाचा विमा उरतविलेला नाही. त्यामुळे शासनाचा विमा काढण्यामागचा हेतू साध्य न झाल्याचे दिसून येते.

**विभागाने उक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष, शहानिशा /खातरजमा करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे कळविण्यात आले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमर्थनीय आहे. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**लेखापरीक्षण अहवाल.**
**नगररचना विभाग**
**सन २०१३-२०१४**

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका लेखापरीक्षण विभागाच्या वार्षिक कार्यक्रमानुसार नगररचना विभागाचे सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले होते. नगररचना विभागामार्फत मोबाईल टॉवर परवाने, बांधकाम परवाने, भोगवटा प्रमाणपत्र, भूसंपादन , विकास योजना आरक्षण, रेखांकन इत्यादी प्रकारची कामे होत असतात. त्यानुसार विविध कामाच्या संचिकांपैकी विभागाने उपलब्ध करून दिलेल्या प्रकरणांचे लेखापरीक्षण करण्यात आले. लेखापरीक्षण पथकाने मागणी केलेले सर्वच अभिलेखे विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही. उपलब्ध अभिलेख्यानुसार झालेले लेखापरीक्षण चाचणी स्वरूपात करण्यात आलेले आहे.

त्या दरम्यान नगररचना विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **१६** परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**सहाय्यक संचालक यांच्या कार्यकाळाबाबत.**

सन २०१३-२०१४ या कालावधीत **श्री.डी.पी.कुलकर्णी** यांनी सहाय्यक संचालक, नगररचना म्हणून काम पाहिले.

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे :

१. श्री.संजय जक्कल, कार्यालयीन अधिक्षक (पथक प्रमुख)
२. श्री.नासेर लईख, वरीष्ठ लिपीक.
३. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक.
४. श्री.विष्णु ओळेकर, कनिष्ठ लिपीक.

**परिच्छेद क्र १. : लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

१. मोबाईल टॉवर संचिका.
२. सन २००१-०२ ते सन २००९-१० या आर्थिक वर्षातील बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्राची यादी.
३. नगररचना विभागास भांडार विभागामार्फत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या चलन पुस्तकाची माहिती उपलब्ध करून देणे बाबत.

४. स्टॉक रजिस्टर क्र.१०९,११० व १११ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.

५. गुंठेवारी विभागा अंतर्गत नियमित करण्यात आलेले भूखंड/ अनाधिकृत बांधकाम इ.लेखे, शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या प्रती व मनपा हद्दीतील अनाधिकृत वसाहतीचे सर्वेक्षण करून त्यास मंजूरी दिलेल्या वसाहतीचा नकाशासहीत माहिती.

६. गुंठेवारी कायद्या अंतर्गत शासन मंजूर दर / मनपा हद्दीतील वसाहती / नियमितीकरणासाठी प्राप्त गुंठेवारीच्या संचिका इत्यादी बाबतची माहिती जसे

  १. सरळ फॉर्म स्टॉक रजिस्टर.

  २. चालन दिल्याबबात रजिस्टर.

  ३. मनपा हद्यीतील अनधिकृत वसाहतीची यादी.(शासना मार्फत मंजूर असलेली)

  ४. गुंठेवारी अंतर्गत संचिका तयार करणे करीता नियुक्त केलेली एजन्सी- करारनामा /शर्ती व अटी तपशिल.

  ५. अनाधिकृत भूखंड/ वसाहत इ.नियमित करणे बाबतचे शासनाने मंजूरी केलेले दर, याबाबतचे आदेश.

  ६. गुंठेवारी - यापोटी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये एकूण किती विकास निधी प्राप्त झाला याबाबतची माहेवार माहिती.

७. सन २०१३ -२०१४ या वर्षात बांधकाम परवाना दिनांकापासून तीन वर्षापर्यंत दिलेले भोगवटा प्रमाणपत्र किती व न घेतलेले एकूण प्रकरण किती याबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे बाबत.

**लेखापरीक्षणा दरम्यान नगररचना विभागाने उक्त अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही. अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न देण्याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. विभागाने उक्त नुसार कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. २ : बांधकाम परवाना क्र.०८/२०१३-१४ फाईल क्र.८०५/१७/१२-१३ दिनांक ४.४.२०१३ नगरभूमापन क्र.१७१९० मोहल्ला उस्मानपुरा या बांधकाम परवानगी संचिकेतील अनियमिततेबाबत.**

१. सी.टी.नं.१६३२१/१, १६३२१/२ व १६३२१/३ औरंगाबाद मनपाने गार्डन -३०१ ब साठी आरक्षित केलेली आहे. यामध्ये दिनांक ४.७.२०१२ रोजी २२२.९७ चौ.मी. (२४०० चौ.फूट चे) T.D.R. सर्टिफिकेट क्र. Amc/TP/DRC/B/५५/२०१२ अन्वये बी - झोन नुसार देण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने श्री.जुगलकिशोर छगनलाल तापडिया, यांनी एकूण क्षेत्रफळ ७७६३.२० चौ.मी. गार्डन ३०१ हे मनपास हस्तांतरीत केलेले असल्याचे दर्शविलेले आहे.

सदरचे क्षेत्र नियमाप्रमाणे मनपास हस्तांतरीत बाबत कार्यवाही करून अधिग्रहीत केलेले सर्व कागदपत्र / संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी करूनही अभिलेखे उपलब्ध करून दिले नाहीत.

२. मालमत्ता पत्रकामध्ये वर्ष १९७१ प्रमाणे सदर मालमत्तेचे मूळ मालक सौ.लिलावती भ्र.जयसिंग हे आहेत व त्यांनी सदरील मालमत्ता ओंकार बिल्डर्स, नरेंद्र तारासिंग जाबिंदा व राजेंद्र तारासिंग जाबिंदा यांना विकल्यामुळे त्यांच्या नावाने महानगरपालिकेचा संपूर्ण कर भरल्याबाबतचे नामांतराअंती बे-बाकी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. मात्र संचिकेच्या तपासणीत असे आढळून आलेले नाही.

३. बांधकाम परवाना क्र.०८/२०१३-१४ दिनांक ४.४.२०१३ यांना बांधकाम परवानगी देतांना अटी / शर्ती क्र. (५) मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर भूखंडास / मिळकतीस मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत म.ज.म.अधि १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषीक वापराचा आदेश / परवाना व अकृषी सारा अद्ययावत भरणा पावती ६० दिवसाचे आत प्राप्त करून या कार्यालयात दाखल करावे अशी तरतूद आहे. मात्र सदर बाबत पूर्तता / कार्यवाही झाल्याचे संचिकेमध्ये दिसून येत नाही.

४. बांधकाम परवाना मधील अटी / शर्ती मधील अ - ६ व ८ प्रमाणे - विभागाने वेळोवेळी पाहणी /तपासणी केल्याचे संचिकेमध्ये नमूद नाही. नगररचना अधिनियम १९६६ चे कलम -४३ सह ५२ कलम ५४ व ५३ नुसार कार्यवाही केल्याचेही संचिकेमध्ये नमूद केलेले नाही.

**मुद्या क. १ ते ४ बाबत विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. करिता, बांधकाम परवानगी संचिकेतील अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ३ : बांधकाम परवाना क्र.४१/२०१३-१४ फाईल क्र.९३९/१७/११-१२ दिनांक १७.४.२०१२ सि.नं.५२५४ टिळकपथ या बांधकाम परवानगी संचिकेतील शुल्क वसूलीच्या तफावतीबाबत.**

बांधकाम परवानगी करीता विविध शुल्क वसूल करतांना नियमाप्रमाणे सन २०१३-१४ या वर्षाचे R.R. प्रमाणे दर - ४३७०० इतके आहेत. बांधकाम प्रस्ताव क्षेत्र - १५५ $m^2$ इतके आहे. येणे प्रमाणे -

१५५ x ४३७०० = २% = १,३५,४७० = ००

परिगणना करून शुल्क वसूल करणे आवश्यक होते.

मात्र विभागाने १५५ x ६० $m^2$ = ९३०० /- या दराने परिगणना करून शुल्क वसूल केल्याचे संचिकेमध्ये दिसून येते. तथापि विभागाने प्रकरण प्रत्यक्ष तपासून शहानिशा करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा, असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही.

**विभागाने सदरील प्रकरणी सन २०१३-१४ मध्ये प्राप्त रेडीरेकनर मधील दरानुसार परिगणना करून कमी वसूल केलेले शुल्क संबंधिताकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ४ : बांधकाम परवाना क्र.४७४/२०१३-१४ दिनांक १.१०.२०१३ सि.नं.२७/१ या संचिकेत कमी आकारलेल्या दंड फी वसूलीबाबत.**

बांधकाम परवानगी करीता विविध शुल्क वसूल करतांना नियमाप्रमाणे सन २०१३-१४ या बांधकाम परवाना क्र. ४७४/१३-१४, दिनांक १.१०.२०१३ नुसार देण्यात आले आहे. त्या मध्ये बाल्कनीची वाढीव परवानगी मागितली असून बाल्कनीचे क्षेत्र १६.८८ चौ.मी. आहे.

१६.८८ x १९४० = ३२७४७/- दंड फी वसूल न करता रक्कम रू.३१८२०/- वसूल करण्यात आली होती. फरकाची रक्कम ९२७/- रूपये कमी भरणा केली आहे.

सदरील रक्कम मनपा फंडात भरणा करून विभागाने प्रकरण प्रत्यक्ष तपासून शहानिशा करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त प्रकरणी कमी वसूल केलेली दंड फी संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शविण्यात यावे.**

**परिच्छेद क्र. ५ : बांधकाम परवाना क्र.७५/२०१३-१४ दिनांक २९.४.२०१३ सि.नं.१६०२९/२५ विकास खर्च रक्कम रू.३,१३,१२६/- च्या वसूलीबाबत.**

बांधकाम संचिका लेखापरीक्षण करीत असतांना खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

१. बांधकाम संचिका क्र.७५/१३-१४ दिनांक २९.४.२०१३ सि.स.नं.१६०२९/२५, प्रकरणी बांधकाम परवानगी देतांना संचिका पृ.क्र. (४) मध्ये संबंधिताकडून विकास खर्चापोटी ६६२x४७३=३१३१२६ शुल्क रक्कम रू.३,१३,१२६/- इतके सादरीकरण प्रस्ताव आहे. मात्र विकास खर्च वसूली केल्याची नोंद/ तसे बँक चलन इ. संचिकेमध्ये दिसून आले नाही.

२. नगररचना विभागाने विकास खर्चापोटी चलन क्र.१०९०२ ,दिनांक २.४.२०१३ रोजी रू.३,४४,९१०/- चलनवर बँक मध्ये प्रत्यक्ष जमा / भरणा केल्याची बँक सिक्का / स्वाक्षरी दिसून येत नाही.

उक्त बाबत (R.R.) नुसार विकास खर्चाची फी प्रकरण प्रत्यक्ष खात्री करून विभागाने सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमर्थनीय आहे.

**विभागाने उक्त क्रमांकाची बांधकाम परवानगी निर्गमित करण्यापूर्वी संबंधितानी बांधकाम परवानगीसाठी आवश्यक असलेले सर्व शुल्क महापालिका फंडात भरणा न केल्यामुळे संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ६ : बांधकाम परवाना क्र.५१०, दिनांक ११.१०.२०१३ फाईल क्र.४४२ मिटमिटा या प्रकरणातील अनामत रकमेबाबत.**

बांधकाम परवाना क्र.५१०, दिनांक ११.१०.२०१३ या बांधकाम परवानगी प्रकरणामध्ये उपविधी क्र.६.२.११ नुसार अनामत रक्कम रू.१०,०००/- वसूल केल्याचे संचिकेमध्ये दिसून आलेले नाही.

अनामत रक्कम वसूली बाबत विभागाने आपल्या स्तरावर शहानिशा करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे संबंधित विभागास कळविण्यात आले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून अनामत रक्कम वसूलीबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ७ : बांधकाम परवाना क्र.१००७/२०१३-१४,दिनांक ४.३.२०१४ सी . स . नं . १५७३१/१९, श्रीरामनगर गारखेडा बांधकाम संचिकेबाबत.**

विषयांकित बांधकाम परवानगी संचिका तपासली असता खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१) Proposed balcony area per floor ८८.०९ $m^2$ असे असतांना सदरील संचिकेमध्ये ७७.६८ X २१३५= १,६५,८५०=०० इतकीच रक्कम वसूल केल्याचे दिसून येते. प्रस्तावित ८८.०९ चौ.मी. प्रमाणे रक्कम रू.१,८८,०७२/- प्रत्यक्षात वसूल रू.१,६५,८००/-= रू.२२२७२/- कमी वसूल केले आहेत.

२) मंजूर नकाशापेक्षा - Excess Balcony Area (Total) ४४.६१$m^2$ इतक्या जास्तीच्या बांधकामावर नियमाप्रमाणे दंड / शुल्क आकारणेत आलेला / वसूल करणेत आलेला नाही.

उक्त प्रकरणी विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, तसा स्पष्ट खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा समर्थनीय आहे.

**विभागाने वाढीव बांधकामाबाबत खात्री करून त्यानुसार संबंधितांवर MRTP Act मधील तरतूदीनुसार दंड वसूल करून, जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ८ : बांधकाम परवाना क्र.१०४२/२०१३-१४,दिनांक १२.३.२०१४ प्लॉट नं.२० सी.स.नं.१७५२७, देवगिरी कॉलनी समता नगर मालमत्ता नामांतर न करणे बाबत.**

उक्त विषयांकीत प्रकरणी खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली आहे.

मालमत्ताधारक श्री.शंकर राजेश्वर भाकरे यांनी मालमत्ता /पाणीपट्टी बेबाकी प्रमाणपत्र जा.क्र./मनपा/वॉर्ड-ड/२४५८/१३, दिनांक २६.११.२०१३ अन्वये सादर केलेली आहे व त्यांनी मालमत्ता श्री.तन्वीर खान खलील खान यांना कायमची विक्री केलेली असून त्यांच्या नावाचा बांधकाम परवाना संचिकेत दिसून येतो. विभागाने बांधकाम परवानगी देण्यापूर्वी मालमत्तेचे नामांतर केलेले नसतांनाही संबंधितांना बांधकाम परवाना देण्यात आलेला आहे. ही बाब योग्य नाही.

**वरील बाबत विभागाने खात्री करून लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. शासन व मनपा मधील अभिलेखे तपासून दिलेली बांधकाम परवानगी योग्य असल्याची खात्री करून उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. ९ : बांधकाम परवाना क्र.१०५०/२०१३-१४ दिनांक १८.०३.२०१४ सि.स.नं.७७२४ चेलीपुरा बांधकाम संचिकेबाबत.**

बांधकाम परवानगी देतांना विषयांकित मिळकती मधून १५.०० मीटर रूंद विकास योजना रस्त्याने बाधीत होत असून एकुण बाधीत क्षेत्र ४.७५ चौ.मी. आहे. उक्त बाधीत क्षेत्र चटई क्षेत्राच्या बदल्यात नोंदणीकृत दस्तऐवज करून मनपाच्या ताब्यात द्यावे. तसेच मनपास हस्तांतरीत केलेली जागा नगरभूमापन अभिलेख्यात नोंद करून बाधीत क्षेत्र मालकी हक्कातून कमी करून महानगरपालिकेच्या नांवे रस्त्याचे क्षेत्र म्हणून लावून द्यावे व अद्ययावत आखीव पत्रिका नगररचना विभागास सादर करावे या अटीवर बांधकाम परवाना दिलेला आहे. मात्र सदर संचिकेमध्ये आखीव पत्रिका (P.R.कार्ड) सादर केल्याचे दिसून येत नाही.

तरी विभागाने प्रकरण तपासून खात्री करावी व तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

विभागाने बांधकाम परवानगी देतांना दिलेल्या अटी/शर्तीची पूर्तता संबंधित बांधकामधारकांना केलेली आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या मत्तेमध्ये होणा-या वाढीबाबत आवश्यक त्या नोंदी सरकारी दप्तरी नोंदविल्या गेल्याची खात्री विभागाने करावी. आवश्यक त्या अभिलेख्यासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१० : बांधकाम परवाना क्र.११०२/२०१३-१४,दिनांक २९.३.२०१४ सी.स.नं.१०२८१/३, शहाबाजार.**

वरील बांधकाम परवाना बाबतचा मंजूर नकाशाचे अवलोकन केले असता -

बांधकाम परवाना देतांना DP Road बाधित क्षेत्र - ३.६० m२ पी.आर.कार्ड १ महिन्याच्या आत करून देणे बाबत दिनांक २९.३.२०१४ चे पत्र निर्गमित आहे. मात्र सदर संचिकेमध्ये पी.आर.कार्ड प्रत व टोच नकाशा प्रत दिसून आले नाही.

**विभागाने बांधकाम परवानगी देतांना दिलेल्या अटी/शर्तीची पूर्तता संबंधित बांधकामधारकांनी केलेली आहे किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या मत्तेमध्ये होणा-या वाढीबाबत आवश्यक त्या नोंदी सरकारी दप्तरी नोंदविल्या गेल्याची खात्री विभागाने करावी, जास्तीच्या बांधकामाबाबत आकारण्यात आलेले दंडनिय शुल्क वसूलीअंती आवश्यक त्या अभिलेख्यासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११: विकास योजना अंमलबजावणी (भूसंपादन) निधी राखीव करणे बाबत.**

महानगरपालिके अंतर्गत नगररचना विभागामार्फत भूसंपादना बाबत कार्यवाही करण्यात येते. त्यानुषंगाने सदर कायद्याचे कलम १२४ (त्र) (सेक्शन १२४ - जे) नुसार विकास आकार (Development charges) वसूल करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई-३२, दिनांक २१.९.२०१३ चे आदेश तसेच निदेश क्रमांक १/२०१३ अन्वये राज्यातील प्रत्येक नियोजन प्राधिकरणाने व विकास प्राधिकरणाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील भूसंपादनासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम क ते १२४ ठ (सेक्शन १२४ A - १२४ L) मधील तरतूदीनुसार वसूल केलेला विकास आकार (Development charges)"विकास निधी " म्हणून ठेवणे कलम १२४ (त्र) (सेक्शन १२४ J) अन्वये अनिवार्य असून सदर निधीचा वापर त्यांच्या क्षेत्रासाठी विकास योजनेचे विविध प्रयोजनासाठी आरक्षित केलेले जमिनीचे भूसंपादन व विकसन यांचेसाठी सर्वोच्च प्राधान्याने करण्यात यावा आणि या दृष्टीने सर्व नियोजन प्राधिकरणे / विकास प्राधिकरणे यांनी विकास निधी रकमेएवढी तरतूद अर्थसंकल्पात दरवर्षी करावी असे सुस्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत.

सन २०१३-२०१४ चे सुधारित अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता "ब महानगरपालिका कर व दर - नगररचना विभाग (२) विकास निधी " या लेखा शिर्षांतर्गत रक्कम रु.५,५०,००,०००/- एवढी रक्कम दर्शविली आहे, व त्यातून "क.६/१ इतर भांडवली व विकास कामे (२) विकास निधी (भूसंपादन व विकास कामे)" या लेखा शिर्षांतर्गत रक्कम रु.५,००,००,०००/- एवढा सुधारित खर्चाचा अंदाज दर्शविला आहे. या संदर्भात खालील मुद्यांवर लेखापरीक्षणा करीता माहिती त्वरीत उपलब्ध करून द्यावी असे लेखापरीक्षणा दरम्यान विभागास कळविण्यात आले होते.

१. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात कलम १२४ (जे) नुसार प्रत्यक्ष वसूली केलेली विकास आकाराची (Development charges) रक्कम.

२. सन २०१३-१४ ची विकास निधीची प्रारंभीची शिल्लक.

३. विकास निधी मधून ज्या बाबींवर प्रत्यक्ष खर्च केला त्याचा प्रमाणक निहाय तपशिल.

४. विकास निधीची सन २०१३-१४ ची अखेर शिल्लक.

५. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे शेवटी म्हणजे दिनांक ३१.३.२०१४ मंजूर विकास योजने मधील विविध प्रयोजनांसाठी आरक्षित केलेल्या जमिनींचे भू-संपादन व विकसन या बाबींची प्रलंबित देणी याची तपशिलवार माहिती (देयक निहाय).

**विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. तसेच लेखापरीक्षण कामी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदी तसेच दिनांक २९.९.२०१३ चे शासन आदेशामधील निर्देशानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने विभागाने उक्त मुद्यांबाबत अनुपालन दर्शवावे या संदर्भात मनपाच्या लेखा विभागास देखील उपरोक्त माहिती पुरविणे बाबत कळविण्यात आले होते. परंतू त्याही विभागाने ही माहिती लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १२ : बांधकाम परवाना क्र.१०८०/१३-१४, दिनांक २१.३.२०१४ सि.सि.नं./१८३४९/११६/ रेल्वेस्टेशन रोड बांधकाम परवानगी देतांना कमी शूल्क वसूल झाल्याने महानगरपालिकेच्या आर्थिक नुकसानीसंबंधी.**

श्री.अनिल लिला CTS No - १८३४९/१/६ वेदांत नगर रेल्वेस्टेशन यांचे बांधकाम परवानगी संचिकेची तपासणीअंती खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

१) नगररचना विभागाने बांधकाम परवाना देण्याकरीता संचिका पृ.क्र. NS/५ व Ns/६ नुसार उपअभियंता सहाय्यक संचालक नगररचना तसेच मा.आयुक्त यांचे मंजूरी अन्वये १७.४.२०१२ जमिन विकास शुल्क, शहर विकास निधी प्रिमियम व इतर शुल्क खालील प्रमाणे वसूल केलेली आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शहर विकास निधी | २,४३,६००/- | च.क्र. | ३९०७ | ३१.५.२०१२ |
| प्रिमियम रक्कम रू. | ४६,०२,०००/- | च.क्र. | ३९१० | ३१.५.२०१२ |
| बाल्कणी दंड इ. | ४,५७,६००/- | च.क्र. | ३९०८ | ३१.५.२०१२ |
| जमिन विकास शुल्क | १,७३,८००/- | च.क्र. | ३९०९ | ३१.५.२०१२ |
| | **५४,७७,०००/-** | | | |

संबंधिताने सुधारित प्रस्ताव दाखल केल्याने प्रत्यक्षात पृष्ठ क्र. Ns-७ ते Ns-९ प्रमाणे मा.आयुक्त यांचे दिनांक २१.६.२०१३ चे मान्यते नुसार सुधारित प्रस्तावास खालील प्रमाणे जमिन विकास शुल्क व इतर शुल्क आकारणे आवश्यक आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जमिन विकास शुल्क | | १,७३,७६०/- |
| २ | शहर विकास निधी | १९८७X२७३००X४% | २,१६,९८,०४/- |
| ३ | प्रिमियम रक्कम रू. | ५५०X२७३००X४०% | ६०,०६,०००/- |
| ४ | बाल्कणी दंड व इतर | ९०X३८७५ | ३,४८,५००/- |
| | | **एकूण** | **८६,९८,०६४/-** |

उक्त रक्कम रू.८६,९८,०६४/- मधून रक्कम रू. ५४,७७,०००/- वजा जाता ३२,२१,०६४/- वसूल न केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तथापि विभागाने प्रकरण प्रत्यक्ष तपासून / खातरजमा करून सन २०१४ प्रमाणे रेडीरेकनर नुसार सदरची रक्कम व्याजासह वसूल करून कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन दर्शविलेले नाही. संचिकेतील नोंदीनुसार महानगरपालिकेचे रक्कम रू.३२,२१,०६४/- चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमर्थनीय आहे.**

**करिता, उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती पुनश्च अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १३ : रेखांकन संचिकेतील विकास खर्च कमी दराने वसूल करणे बाबत. (रक्कम रू.२,२४,९००/-)**

मौजे मिटमिटा येथील गट क्र.१४६/ पैकी मधील रेखांकनाची संचिका श्री.जोसेफ लुईस सेन्टॉन बॉसिवर डिसुझा तर्फे, जी.पी.ए.धारक श्री.स्टिफन लुईस डिसुझा, मौजे मिटमिटा,औरंगाबाद प्रकरणी खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात जमिन विकास खर्च दर रू. प्रति.चौ.मी. ४३२५ x ५२१ = २२,५३,३२५/- या प्रमाणे चलन क्र.१२८३७, दिनांक ४.९.२०१३ द्वारे बांधकाम परवानगी धारकाने भरणा केलेला आहे. प्रत्यक्षात बांधकाम परवाना धारकाने आर्थिक वर्ष सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचा जमिन विकास शुल्क दर रू.५७३/- नुसार भरणा करणे आवश्क आहे. त्याप्रमाणे रू. ४३२५ x ५७३ = २४,७८,२२५ वजावट रक्कम रू. २२,५३,३२५ = २,२४,९००/- इतकी रक्कम कमी वसूल झालेली असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

तरी विभागाने वास्तविकता पडताळून व शहानिशा करून संबंधिताकडून रक्कम रू.२,२४,९००/- वसूलीअंती तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून, जबाबदारी निश्चित करून तसा अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.**

**परिच्छेद क्र. १४ : महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम (५२) व (५३) अन्वये असलेल्या तरतूदीनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

नगररचना विभागाने कार्यालयीन पत्र क्र.मनपा/नरवि/ससंनर/२०१४/१८४७, दिनांक १७.१२.२०१४ अन्वये सन २००४-२००५ ते २०१३-२०१४ या कालावधीत आपल्या विभागाने निर्गमित केलेल्या बांधकाम परवानगी व भोगवटा प्रमाणपत्र याबाबतची माहिती सिडी स्वरुपात प्राप्त झालेली आहे.

आपल्या विभागाकडून प्राप्त माहितीनुसार विभागाने सन २००४-०५ ते २०१३-१४ या वर्षात एकूण १०७४६ बांधकाम परवानग्या व २६६४ भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे दिसून येते. बांधकाम परवानगी देतांना संबंधितांनी बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आपणाकडे भोगवटा प्रमाणपत्रासाठी विनंती करणे व भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच संबंधितांनी इमारतींचा वापर सुरू करणे अभिप्रेत आहे. परंतू आपण दिलेल्या बांधकाम परवानग्या व भोगवटा प्रमाणपत्र याचे सरासरी प्रमाण १/३ असून साधारणपणे २/३ बांधकाम परवानगी धारकांनी महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र न घेता संबंधित इमारतींमध्ये वापर करीत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

१. अशा इमारतींमध्ये अनधिकृत वापर करणा-या जमिन मालक व विकासक यांचेविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम (५२) व (५३) अन्वये कार्यवाही करण्याची तरतूद नमूद आहे. त्यानुसार आपल्या विभागाने सन २००४-०५ ते २०१३-१४ या कालावधीत अनधिकृत वापर करणा-या जमिन मालक व विकासक यांचेविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर तपशिल संचिकांसह सादर करावा.

२. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १५१ नुसार अधिनियम / नियमाच्या विविध तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या नियुक्ती आदेशाची प्रत लेखापरीक्षणा कामी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी.

३. नगररचना विभागाने दिलेल्या विकासासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये विकासासाठी कलम ४५ अन्वये दिलेली परवानगी ही एक वर्षाच्या कालावधीकरीता अंमलात राहील त्यानंतर ती संपुष्टात येईल. परंतू नियोजन प्राधिकरणास संबंधितांनी अर्ज केल्यावर असा कालावधी दरवर्षी वाढविता येतो. परंतू तो कालावधी तीन वर्षापेक्षा जास्त असणार नाही अशी तरतूद आहे.

आपल्या विभागाने सन २००४-०५ पासून पुढील तीन वर्षाच्या कालावधीतपर्यंत नुतनीकरण न केलेल्या बांधकाम परवानग्यांच्या प्रकरणांतील अनामत रकमा जप्त करण्यासंबंधी लेखापरीक्षण विभागास कळविलेले आहे काय ? असल्यास त्याचा वर्षनिहाय सविस्तर तपशिल लेखापरीक्षण कामी सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ व ५३ अन्वये विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच याच अधिनियमातील कलम १५१ नुसार प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या नियुक्तीच्या आदेशाच्या प्रती उपलब्ध झालेल्या नाहीत.

त्यामुळे नगररचना विभागाचे कामकाज अधिनियमातील तरतूदीनुसार होत आहे किंवा कसे याबाबत साशंकता निर्माण होते. महानगरपालिका क्षेत्राचे नियोजन योग्य रितीने होण्यासाठी नगररचना विभागाने कार्य करणे आवश्यक आहे.

**विभागाने उक्त बाबींसंबंधी केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १५ : नगर भुमापन क्र.१२८७९/१ जालना रोड येथील आरक्षण क्र. Scp २१८ समावेशक आरक्षण पध्दतीने विकसित करण्यात आलेल्या इमारती मधील मनपाचे २५% बांधकामाबाबत.**

श्री.भरत नानकराम परसवानी यांचे जालना रोड येथील नगर भूमापन क्र.१२८७९ या मिळकतीवर बांधलेला इमारतीमधील २५% बांधकाम हस्तांतरीत झालेले आहे. सदर बांधीव जागेचे क्षेत्रफळ ५६ चौ.मी.आहे. सदर गाळा भाडेतत्वावर देण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच दिनांक ३.१.२००९ च्या मा.स्थायी समिती सभेमधील ठराव क्र.१५३, दिनांक ३.११.२००९ व ठराव क्र.२२८ दिनांक ५.३.२०१४ अन्वये झालेल्या मान्यतेनुसार मागील चार वर्षाचे भाड्यापोटी रू.६८११२० व सेवाकर (१२.३६%) अशी एकूण रक्कम रू.७,६५,३०६/- मनपा फंडात जमा केलेला आहे. संचिकेची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. परि.क्र.५ अन्वये दिनांक १७.१२.२००९ ते ३१.१२.२०१३ या आर्थिक वर्षाचे भाड्यापोटी रक्कम रू.६,८१,१२०/- व सेवाकर (१२.३६%) रक्कम रू.८४१८६/- अशी ७६५३०६/- एवढी रक्कम मनपा फंडात संबंधितांनी जमा केलेली आहे. परंतू अटी शर्तीनुसार व्याज अद्यापपावेतो भरणा केलेले नाही. नसल्याने मनपाचे आर्थिक नुकसान प्रथम दर्शनी झालेले आहे. विभागाने वसूलीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.

२. करारनामा न केल्यामुळे संबंधितांकडून थकबाकीवर व्याज किती आकारले जाईल व किती कालावधीसाठी गाळा भाड्याने देण्यात येत आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत असून विकासकाने गाळा धारकाला एकतर्फी फायदा पोहचवायचे दिसून येते.

३. रॅम्प तयार करण्यासाठी गाळा धारकाकडून रू.१ लक्षची बँक गॅरेन्टी घेण्यात आलेली आहे. सदर क्षेत्रातील डि.पी.रोड विकसित न झाल्यामुळे संबंधिताकडून Bank Guarantee घेण्यात आलेली आहे. मात्र सदरची Bank Gurantee दिनांक १३.९.२०१२ रोजी संपली आहे. त्यामुळे ज्या कारणासाठी Bank Gurantee घेण्यात आलेली आहे त्याचा उद्येश असफल झाला असून संबंधितांनी Bank Guarantee चे नुतनीकरण न केल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या बाबी बाबत विभागाने जबाबदारी निश्चित करून अनुपालन दर्शवावे.

४. भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापूर्वीच निवासेत्तर वापर सुरु केलेला असल्यामुळे दंड रक्कम दुप्पट करण्यात यावी असे मा.आयुक्त यांचे दिनांक २८.६.२०१३ रोजीचे मान्यतेने आदेश देण्यात आलेले आहे व याबाबत रक्कम रू.७०,९२०/- च्या दुप्पट दंड रक्कम रू.१,४१,८४०/- वसूल करणे आवश्यक होते. मात्र विभागाने धनादेश क्र.१२११३, दिनांक ३.७.२०१३ रोजी दंड वसूल करून रक्कम रू.१,१४,८४०/- एवढीच भरलेली असल्याने कमी भरणा केलेली रक्कम रू.२७,०००/- वसूल करून जबाबदारी निश्चित करून अनुपालन लेखापरीक्षण विभागास लेखी स्वरुपात दर्शवावे.

५. महानगरपालिके तर्फे गाळे भाड्याने देतांना भाड्यापोटी १०% व्याज वसूल करण्यात येते व भाड्याच्या रकमेवर १२ पट अनामत रक्कम ठेवण्यात येते. ही अनामत रक्कम न ठेवल्यामुळे अनामत रक्कम ज्या उद्येशाने घेतली जाते तो सफल होणार नाही. जर मनपाला काही नुकसान झाले तर ते वसूल करणे शक्य होणार नाही, त्यामुळे तात्काळ भाड्याच्या १२ पट अनामत रक्कम वसूल करण्यात यावी व कसूरदारावर जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करून अनुपालन दर्शवावे. व्याजाचा दर ठरविण्याबाबत सक्षम प्राधिकरणाचे आदेश लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करून देण्यात आले नाहीत. व्याजाचा दर सक्षम प्राधिका-याकडूनच निश्चित करून घेणे आवश्यक असल्याने त्याला कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी. या पुढील प्रकरणांकरीता दर निश्चित करून घेवून अनुपालन दर्शवावे.

६. श्री.भारत नानकराम पारसवाणी यांना न.भू.क्र.१२८७९/१ क्षेत्रफळ ४१८.०० चौ.मी. पैकी १९४ चौ.मी.विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र भाडेतत्वावर मागणी केल्यानुसार, सदरील जागा मनपाच्या कोणत्याही उपयोगात येत नाही तो पर्यंत संबंधितास मनपाचे २५% जागा म्हणजे ५६ चौ.मी. बाधीत क्षेत्र व उर्वरीत जागा १३८ चौ.मी.संरक्षित भिंत बांधण्यासह भाडे तत्वावर देण्यात आली. परंतू उर्वरीत जागा १३८ चौ.मी. क्षेत्रावर मनपाने किती भाडे वसूल केले व संबंधिताने त्यावर संरक्षित भिंत बांधण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबत लेखी खुलासा व्हावा.

७. नगर भूमापन क्र.१२८७९/१ क्षेत्रफळ ४१८ चौ.मी.पैकी १९४ चौ.मी. श्री.परसवानी यांना मनपाच्या कोणत्याही उपयोगात येत नाही तोपर्यंत संबंधितावर २५% जागा म्हणजे ५६ चौ.मी.बाधीत क्षेत्र व उर्वरीत १३८ चौ.मी. क्षेत्रावर किती मालमत्ता कर आकारण्यात आला याबाबत लेखी खुलासा व्हावा.

**उपरोक्त मुद्या क्र. १ ते ७ बाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा / शहानिशा करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती व महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १६ : औरंगाबाद महानगरपालिका मे.तेजस कन्स्ट्रक्शन ॲण्ड जे.व्ही.न.भु.क्र. १९१४९ मो.(मनपाची जागा) रेल्वेस्टेशन औरंगाबद यांच्या बांधकाम / भोगवटा प्रमाणपत्राबाबत.**

नगर भूमापन क्र.१९१४९ रेल्वेस्टेशन या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर कार्यालया तर्फे बी.ओ.टी. तत्वावर प्रकल्प विकसित करणे करीता बी.ओ.टी. कक्षामार्फत विकासकास परवानगी देण्यात आलेली आहे. मे.तेजस कन्स्ट्रक्शन यास multiplex ची बांधकाम परवानगी क्रमांक ३०५/०६-०७ दिनांक १६.०९.२००६ अन्वये नियोजन प्रस्तावित केले होते. तथापि आता सुधारित बांधकाम परवाना क्र.६८६/११-१२ दिनांक १४.११.२०११ अन्वये शॉप/ऑफिस साठी देण्यात आले. त्याप्रमाणे संबंधित विकासकांनी बी.ओ.टी. कक्ष प्रमुख यांचे मार्फत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास मा.कार्यकारी अभियंता यांनी मा.आयुक्त महोदय यांचे मंजूरीनुसार भोगवटा प्रमाणपत्र, नगररचना विभागाने जा.क्र.मनपा/नरवि/भो.प्र./२२७/१७/२०१३-१४ दिनांक १४.३.२०१४ अन्वये भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले.

संचिकेची तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.तेजस कन्स्ट्रक्शन यांना महानगरपालिकेची जागा कॉम्प्लेक्स साठी एकूण क्षेत्रफळ ५७९२.६२ स्क्वे.मी. जागा ही ३० वर्षाचे मुदतीने भाडेतत्वावर देण्याचे करारनाम्यानुसार ठरलेले आहे.
मात्र तेजस कन्स्ट्रक्शन यांना न.भू.क्र.१९१४९ पी.आर.कार्ड मध्ये भाडेतत्वावर नो.भा.प.क्रा ४३४३, दिनांक ७.९.२००६अन्वये महानगरपालिका औरंगाबाद यांनी ५७९२.६२ चौ.मी.द.म.रु.१०/-प्रति चौ.मी.भाड्याने ९९ वर्षाकरीता दिले अशी नोंद केलेली आहे. करारनाम्या अन्वये सदरील जागा ही ३० वर्षाकरीता देण्यात आल्याचे नमूद असतांना पी.आर.कार्ड वर आलेल्या नोंदीबाबत विभागाने तपासणी न करताच त्यांना बांधकाम परवाना व भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले ही बाब आक्षेपार्ह आहे. वास्तविक मनपाच्या हिताच्या दृष्टीने करारनाम्यातील अटीनुसार नसलेल्या नोंदीबाबत हरकत घेवून आवश्यक दुरुस्त्या करुन घेणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही. या बाबत त्वरीत नोंद दुरुस्तीची कार्यवाही करुन घेण्यात यावी व दुर्लक्ष्याबद्दल जबाबदारी निश्चित करून कार्यवाहीअंती अनुपालन करावे.

२. मे.तेजस कन्स्ट्रक्शन यांच्याकडून करण्यात आलेल्या करारनाम्यातील मुद्दा क्र.१ प्रमाणे संबंधिताने बिल्ट अप एरिया ५४० स्वे.मि.व २६५ स्वे.मि.हा पार्कींग एरिया भोगवटा प्रमाणपत्र घेवून करारनाम्यानुसार सदरील बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदरची जागा मनपास हस्तांतर करणे आवश्यक होते. परंतू ती मनपास हस्तांतरीत करण्यात आली किंवा नाही याचा संचिकेवरुन बोध होत नाही. हस्तांतरीत झालेली असल्यास ती केव्हा हस्तांतरीत झाली व त्याचा वापर कसा व कधीपासून करण्यात येत आहे. याबाबत लेखा परीक्षणास संबंधित संचिका/ अभिलेख्यासह अवगत करावे.

३. मे.तेजस कन्स्ट्रक्शन ॲण्ड जे.व्ही.न.भू.क्र.१९१४९ याची सुधारित बांधकाम परवाना संचिका क्र.१२६२/१७/२०१०-११ व परवाना क्रमांक ६८६/११-१२ मध्ये पृष्ट क्र.एनएस/५, परिच्छेद क्र.६ व मुद्दा क्र.६ मध्ये जमिन विकास शुल्क व शहर विकास निधी व बांधकाम परवाना अ.क्र.७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा.आयुक्तांनी निविदा पूर्व बैठकीत मान्यता दिल्याप्रमाणे जमिन विकास शुल्क व शहर विकास निधीस माफी देण्यात आली असे नमूद आहे. त्यामुळे सदर रक्कम हिशोबित करण्यात आली नाही.

महाराष्ट्र प्रांतिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४(च) नुसार केवळ नियंत्रणाखाली अथवा ताब्यात असलेल्या कोणत्याही जमिनीवर विकास आकार बनवण्यापासून सूट असल्याचे नमूद आहे. प्रस्तुत प्रकरणी जमिन, विकास काम प्रदीर्घ मुदती करीता लीज वर दिलेली आहे व परिणामत: सदर जमिन आता मनपाचे ताब्यात नाही अथवा नियंत्रणाखाली देखील नाही. एकूण ५७९२.६२ वर्ग मिटर पैकी केवळ ५४० वर्ग मिटर बांधकाम महानगरपालिकेस हस्तांतरीत होवून ते ताब्यात राहू शकेल. त्यामुळे उर्वरीत ५२५२.६२ वर्गमिटर क्षेत्राचे विकासा करीता विकास शुल्क भरण्यापासून सूट देण्याची कार्यवाही अधिनियमास अनुसरून अनुज्ञेय ठरत नाही. या निर्णयामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. सदर रक्कम परिगणित करून वसूल होणे क्रमप्राप्त आहे. विभागाने अभिप्राय द्यावेत.

४. करारनाम्यातील अट क्र.६ मधील मुद्या क्र.E मध्ये सुरक्षा अनामत रक्कम रू.१०,००,०००/- देण्याचे पालन करावे व डिमांड ड्राफ्ट किंवा समतुल्य (समकक्ष) बँक गॅरेन्टी रक्कम बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ५ वर्षापर्यंतचे वैध असेल असे असतांना विभागाने सुरक्षा अनामत रक्कम रू.१०,००,०००/- ची बँक गॅरेन्टी न घेतल्याने मनपाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून अनुपालन अहवाल दर्शवावा.

५. मे.तेजस कन्स्ट्रक्शन नगर भुमापन क्रमांक १९१४९/Part संबंधितास भोगवटा प्रमाणपत्र क्रमांक २२७/१७,२०१३-१४ दिनांक १४.३.२०१४ अन्वये देण्यात आले आहे. मात्र भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर विशेष कक्ष प्रमुख यांच्या विभागामार्फत अद्यापपर्यंत सदरील शॉप मॉल यास मालमत्ता कर लावण्यात आलेला नसल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले असून व्याजासह रक्कम वसूल करून अनुपालन दर्शवावे.

**उपरोक्त मुद्या क्र. १ ते ५ बाबत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा / शहानिशा करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती व महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.**

**लेखापरीक्षण अहवाल**
**विद्युत विभाग (अ / ड)**
**सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५**

**<u>प्रस्तावना :</u>**

लेखापरीक्षण विभागाच्या वार्षिक कार्यक्रमानुसार विद्युत विभागाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले होते. विद्युत विभागातील कामकाजासंबंधी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित विभागास लेखापरीक्षण पथकामार्फत अर्धसमास पत्रे देण्यात आली. लेखापरीक्षण विभागातील कर्मचा-यांचे पथक कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१५/६०, दिनांक १६.५.२०१५ अन्वये स्थापन करण्यात आले. विद्युत विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यानुसार निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबींचे परिच्छेद या सोबत सादर करण्यात येत आहे. विद्युत विभागाने उपलब्ध करुन न दिलेल्या अभिलेख्यांचे स्वतंत्र परिच्छेद असून याबाबत गंभीर दखल घेण्याची आवश्यकता आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान विद्युत विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण <u>२४</u> परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**विद्युत विभागात ( विद्युत पथदिवे अ/ड) सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या कालावधीत कार्यरत अभियंता, उपअभियंता यांच्या यांच्या कार्यकाळाबाबत.**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | कार्यभार | कार्यकाळ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.मोहम्मद शाकेर (सेवानिवृत्त) | शाखा अभियंता | प्र.उपअभियंता (वॉर्ड अ/ड) | दिनांक १.४.२०१३ ते दिनांक ३१.१०.२०१४ |
| २ | श्री.हेमंत कोल्हे | कार्यकारी अभियंता | विद्युत पथदिवे (वॉर्ड अ/ड) | दिनांक १.६.२०१३ ते दिनांक ३.६.२०१४ |
| ३ | श्री.पी.आर.बनसोडे (सेवानिवृत्त) | कार्यकारी अभियंता | विभाग प्रमुख | दिनांक ४.६.२०१४ ते दि. ३१.३.२०१५ |

**<u>लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :</u>**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे :

१. श्री. अनंत सोनटक्के, (पथक प्रमुख )

२. श्री. चंद्रशेखर मराठे, ( कनिष्ठ लिपिक )

३. श्रीमती पंचशिला खरात, ( कनिष्ठ लिपीक )

**परिच्छेद क्र. १ : विद्युत विभागातील अभिलेख्रे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन न देणे बाबत.**

उपअभियंता -विद्युत, वॉर्ड (अ व ड) या विभागास लेखापरीक्षणासाठी खालील अभिलेख्यांची विनाविलंब उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत खालील अभिलेखे विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

सन २०१३-२०१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील आवक -जावक नोंदवही.

१. प्रोव्हीजन रजिस्टर.

२. विद्युत देयके रजिस्टर.

३. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधील खर्चाच्या संपूर्ण संचिका , मोजमाप पुस्तिकेसह.

४. नॅशनल म्युनिसिपल अकाऊन्ट कोड अन्वये आपल्या विभागाशी संबंधित विविध परिशिष्टानुसार ठेवावयाच्या नोंदवह्या .

५. विद्युत विभागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचा जॉबचार्ट.

६. नॅशनल म्युनिसिपल अकाऊन्ट कोड मधील विविध विवरण तक्त्यात माहिती उपलब्ध करुन देणे बाबत.

७. विद्युत विभाग वॉर्ड अ व ड अंतर्गत असलेल्या वॉर्डनिहाय विद्युत पोल व त्यावर लावण्यात आलेल्या फिटींग्सची माहिती मिळणे बाबत.

८. औरंगाबाद शहरातील आपल्या कार्यकक्षेत येणा-या सार्वजनिक विहिरी ,बोरवेल यावर बसविण्यात आलेल्या विद्युत मोटारींची माहिती मिळणे बाबत.

९. बी.ओ.टी. व कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने विद्युत देखभालीची कामे संबंधितांनी वेळेत न केल्यास Risk & cost वर उपलब्ध एजन्सीकडून केलेल्या कामाबाबतचे नोंदवही उपलब्ध करुन देणेबाबत.

१०. महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकरी यांच्या दालनात व निवासस्थानी बसविलेल्या वातानुकुलित यंत्राबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

११. विद्युत विभागातील (Scrap) भंगार साहित्याच्या लिलावाबाबतची माहिती मिळणे संबंधी.

१२. मनपा शाळा, उद्याने येथे नियुक्त चौकीदार यांना निवासासाठी दिलेल्या निवासस्थानाच्या विज बिलासंबंधीची माहिती मिळणे बाबत.

विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब गंभीर स्वरुपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याबाबत संबंधितांविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.२ : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अभिलेख विभाग मनपा विद्युत वायरिंग खराब व जूनी झाल्याने नविन करणे बाबत.**

**(अं.प.रक्कम रू. ३,२६,४४१=००)(खर्च रू.३,२५,६७४=००)**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात अभिलेख विभागाचे खराब व जूनी विद्युत वायरिंग झाल्याने नविन करणे बाबतचे कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आली. निविदा विक्री व स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ४ निविदा विक्री होवून ४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.स्टँडर्ड इलेक्ट्रीकल्स यांची आहे. ०.१७% Below दराची निविदा प्राप्त आहे. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयाने पत्र क्र.३७, दिनांक २८/९/२०१३ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. कामाची मुदत नमूद नाही. संचिकेच्या सविस्तर तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतरचा असल्याने विमा काढण्याचा हेतू सफल झाला नाही.
२. कार्यादेशात कामाची मुदत नमूद नाही. त्यामुळे काम मुदतीत पूर्ण झाले याची खात्री करता आली नाही.
३. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत-अ/ड/१३२३/१३,दि. १६/१२ /२०१३ अन्वये सहाय्यक विद्युत निरिक्षक विद्युत निरीक्षण विभाग यांना दिलेल्या पत्रात अ.क्र.४ नुसार ३ दिवसात विद्युत संच मांडणीच्या ठिकाणी फायर एक्स्टींग विशद बसविण्यात येईल असे नमूद आहे. प्रत्यक्षात सदरील बाबीची पूर्तता विभागाने केली किंवा नाही याबाबत संचिकेत अभिलेखे नाहीत.
४. मोजमाप पुस्तीका क्र.३०५३ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.
५. ॲटम क्र.५ अन्वये १३ सीलींग फॅन लावण्यात आले. परंतू ॲटम क्र.५ अन्वये १८ रेग्युलेटर खरेदी केले. ५ रेग्युलेटरवर जास्तीचा अदा केलेला खर्च रू.१७७५/- वसूलीस पात्र आहे.
६. ॲटम क्र.८ मधील modular switch १६/६ चे प्रमाणक शेड्यूल्ड B मध्ये १० दर्शविले. देयक अदा करतांना १४ प्रमाणक दर्शविले आहे. निविदा पुस्तीका अट क्र.३८ नुसार सदरील ॲटमची प्रमाणके २५% वाढ अपेक्षित आहे. त्यापेक्षा जास्तीची वाढ झाल्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता असणे आवश्यक आहे. जास्तीचा झालेला खच्र रू.६९२/- अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा व्हावा.
७. सदरील कामासाठी वापरलेले नविन साहित्य व पूर्वीचे खराब झालेले साहित्य याबाबतच्या नोंदी असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. ५ प्रमाणे जास्तीचा खर्च रू.१७७५/- व मुद्या क्र. ६ प्रमाणे रू.६९२/- असा एकूण रू.२४६७/- खर्च संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ३ : सन २०१३-१४ या वर्षात मनपा मुख्य कार्यालय टप्पा क्र.१ व पदाधिकारी इमारतीतील A/c चे सर्कीट वेगळे करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.१,६९,०२०/-)(खर्च रक्कम रू. १,८२,४२१/-)**

सन २०१३-१४ या वर्षात मनपा मुख्य कार्यालय टप्पा क्र.१ व पदाधिकारी इमारतीतील A/c चे सर्कीट वेगळे करणे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. ४ निविदांची विक्री झाली. ४ निविदा प्राप्त झाल्या. पैकी एक निविदा तांत्रिक दृष्ट्या नाकारली. उघडलेल्या तीन निविदांपैकी सर्वात कमी ०.१५% Below दर मे.न्यू इरा इलेक्ट्रीकल्स, यांचे होते. एजन्सीने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर संबंधित कंत्राटदार यांना कार्यालयीन पत्र क्र.३६, दिनांक २८/९/२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशात कामाची मुदत नमूद नाही. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. कार्यादेशात कामाची मुदत नमूद नसल्याने काम मुदतीत झाले या बाबत खात्री करता आली नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतरचा आहे. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

३. नविन व जुन्या साहित्याची नोंद असलेले स्टॉक बुक लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेले नाही.

४. कार्यालयीन पत्र क्र.मनपा विद्युत वॉर्ड अ व ड/१३२३/१३, दिनांक १६/१२/२०१३ अन्वये सहाय्यक विद्युत निरिक्षक, विद्युत निरीक्षण विभाग यांना दिलेल्या पत्रातील अ.क्र.४ प्रमाणे ३ दिवसात फायर एक्स्टींगविशर बसविण्यात येतील असे कळविलेले आहे. प्रत्यक्षात सदरील बाबींची पूर्तता केल्याबाबत अभिलेखे संचिकेत नाही.

५. मोजमाप पुस्तिका क्र.३०५३ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

७. निविदा पुस्तिकेतील अट क्र.३८ नुसार ॲटम निहाय प्रमाणकामध्ये २५% पर्यंत वाढ अपेक्षित आहे. परंतू खालील ॲटम मध्ये त्यापेक्षा जास्तीचे प्रमाणकावर खर्च झालेला आहे. त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसल्याने झालेला जास्तीचा खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा व्हावा.

| अ.क्र. | ॲटमचा तपशील | शेडयूल्ड B नुसार प्रमाणक | देयकातील प्रमाणके | जास्तीची टक्केवारी | दर | जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | TPN DB | २ | ५ | १५०% | ७३४७/- | २२०४१/- |
| ८ | DP MCB | ८ | १३ | ६३% | ७९४/- | ३९७०/- |
| ११ | FP MCB ६३ A | ३ | ५ | ६७% | १५८२/- | ३१६४/- |
| | | | | | **एकूण** | **२९१७५/-** |

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. ७ प्रमाणे जास्तीचा खर्च रू.२९,१७५/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ४ : वॉर्ड क्र.७ येथे उर्जा बचत दिवे पोलसह लावणे बाबत.**

वॉर्ड क्र.०७ भीमनगर भावसिंगपुरा येथे उर्जा बचत दिवे पोलसह लावणे बाबत कोटेशन मागविण्यात आले असून तीन कोटेशन प्राप्त झाले आहे. प्राप्त कोटेशन नुसार मे. जयदिप इले.वर्क्स ०.५०% कमी दराचे दरपत्रक असल्याने गुत्तेदार यांना करारनामा सादर करण्यात सांगितले असता संबंधिताने करारनामा सादर केला असून त्या अन्वये जा.क्र.मनपा/Light/५००, दिनांक १३.२.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला असून आदेशामध्ये कामांचा कालावधी दर्शविलेला नाही. काम करण्यासाठी ४९५९५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. संचिकाची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ नुसार कंत्राटी कामाचा विमा काढणे आवश्यक असतांना विमा उतरविलेला नाही. तसेच देयकात १% प्रमाणे रू.४९६/- कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

२. संचिकातील देयकांची तपासणी करतांना अ.क्र.५ quantity ४ नग S/E Energy saving fitting Rate रू.५३१७/- प्रमाणे रू.२१२६८/- खर्च करण्यात आला आहे. प्रत्यक्षात ३ नगासाठी खरेदी करणे आवश्यक असतांना ४ नगासाठी खर्च करण्यात आला आहे. म्हणजेच १ नग जास्तीचा दर्शवून रक्कम रू.५३१७/- वसूलीस पात्र आहे.

३. देयकातील अ.क्र.६ Quantity १६ नग ३ S/E Energy saving fitting lamp Rate रू.१८०/- प्रमाणे रक्कम रूपये २८८०/- खर्च करण्यात आला आहे. प्रत्यक्षात १२ नग खरेदी करणे आवश्यक होते. जास्तीचे ४ नग खरेदी केले आहे. म्हणजेच प्रति नग रू.१८०/- प्रमाणे रू.७२०/- जास्तीचा खर्च करण्यात आला आहे. झालेला जास्तीचा खर्च संबंधिताकडून वसूल करावा.

४. संचिकेत अंदाजपत्रक बसवितांना अ.क्र.२ s & E streat light bracket--- quantity ३ rate रू.५३३/- each रक्कम रू.१५९९/- येत असतांना रू.२६६५/- एवढी दर्शविलेली आहे म्हणजेच अंदाजपत्रक चूकीचे झालेले आहे. रू.१०६६/- रक्कम जास्तीचे अंदाजपत्रक असल्याने वसूलीस पात्र.

५. मोजमाप पुस्तिका ३०१३ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

६. दरपत्रक फीची वजावट केलेली नाही. (रक्कम रू.२६०/-)

७. नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर  अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही.  मुद्या क्र. १ नुसार शासनाचे रू.४९६/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. मुद्या क्र. २, ३, ४ व ६ वरील जास्तीचा खर्च ७३६३/- व असा एकूण रू.७८५९/- संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ५   : वॉर्ड क्र.८ पडेगांव हनुमान मंदिराजवळील चौकात हायमास्ट बसविणे.**
**(अं.प.रक्कम रू.४,९०,२५३/-)**

वॉर्ड क्रमांक ८ पडेगांव हनुमान मंदिराजवळील चौकात हायमास्ट बसविणे बाबत स.नगरसेवक यांनी पत्राद्वारे कळविले असून दिनांक १८.१०.२०१२ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ९१९ अन्वये आर्थिक तरतूद वळती करुन उपलब्ध तरतूदी रक्कम ०५.०० लाख मधून काम प्रस्तावित आहे. कामाचे अंदाजपत्रक सा.बा.सूचि सन २०११-१२ नुसार रक्कम रू.४९०२५३/- चे बनविण्यात आले असून खर्चाचा प्रस्ताव सन २०१२-१३ नविन पथदिवे पोलसह या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित असून उक्त दर्शविलेल्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव पारीत करुन रक्कम वळती करण्यात आलेली आहे.

वर्तमान पत्रात प्रसिध्दी देवून निविदा मागविल्या असता निविदा स्विकृतीच्या एकूण ५ निविदा विक्री झाल्या दिनांक २६/०२/२०१३ रोजी निविदा उघडल्या असता ५ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दर M.Y.Electricals यांचे  असून १७.९९% Below दरानी निविदा प्राप्त झाली आहे. संबंधितास अनामत रक्कम व करारनामा करण्यास पत्र दिले असता संबंधिताने करारनामा व अनामत रकमेचा भरणा केला आहे त्या अन्वये जा.क्र./Amc/Light/०४/ दिनांक २-५-१३ रोजी संबंधितास कार्यादेश देण्यात आलेला आहे. कामाची मुदत १ महिना आहे.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ (२) अन्वये अतिरिक्त सुरक्षा रक्कम रू.५% रक्कम रू.२४५१३/- घेणे आवश्यक असतांना अनामत सुरक्षा रक्कम घेतलेली नाही.

२. निविदा नियम ५४ क्र./विमास/१०९८/प्र.क्र./२८/९८ शासन हमी मंत्रालय मुंबई दिनांक १९/८/९८ अन्वये विमा काढणे आवश्यक असतांना विमा काम झाल्यानंतर दिनांक ५.८.२०१३ / ४.९.२०१३ या कालावधीत काढलेला आहे, त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

३. कामाचा कालावधी १ महिन्याचा असतांना संबंधिताने १४.८.२०१३ रोजी काम पूर्ण केले आहे. म्हणजेच १ १/२ महिना उशिरा काम पूर्ण केले असतांना कोणतीही दंडात्मक कार्यवाही झालेली नाही.

४. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४०८५ (३ to ७) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही, त्याकारण संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

५. निविदा सूचना व प्रभाग समितीकडे पाठविण्याचा प्रस्ताव मसुदा संचिकेत दिसून आलेल्या नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ६ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.१३ किलेअर्क येथे गौतम बुध्दाच्या मंदिराजवळ सामाजिक सभागह व ग्रंथालय बांधकामास अडथळा निर्माण होत असलेले विद्युत खांब हटविणे बाबत.**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.१३ किलेअर्क येथे गौतम बुध्दाच्या मंदिराजवळ सामाजिक सभागृह व ग्रंथालय बांधकामास अडथळा निर्माण होत असलेल्या विद्युत खांब हटविणेच्या कामासाठी कामाची तातडी दर्शवून उपलब्ध ठेकेदाराकडून काम करुन घेण्यास कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे. २% कमी दराने काम पुजा इलेक्ट्रीकल यांना कार्यादेश क्र.मनपा/विद्युत/४९४/२०१४, दिनांक ६.२.२०१४ अन्वये देण्यात आले. कामाचे अंदाजपत्रक व संचिकेतील इतर आवश्यक बाबी तपासल्या असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत -

१. कंत्राटी कामाचा विमा पत्र संचिकेत नाही तथापि शासकीय विमा निधी कार्यालयास पाठवावयाच्या १% विमा निधी रक्कम रू.५१५/- देयकातून कपात केलेली नाही.

२. मोजमाप पुस्तीका क्र.२८६७ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झाली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. GTL कार्यालयाने त्यांचे पत्रातील अट क्र.१२ प्रमाणे जुने साहित्य त्यांचे भांडार विभागात चिकलठाणा येथे जमा करण्याचे कळविलेले आहे. साहित्य जमा झाल्याची पोच संचिकेत नाही.

४. सदरील कामाची नोंद पीटी वर्क्स रजिस्टर मध्ये घेतलेली नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. १ नुसार शासनाचे रू.५१५/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ७ :सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.७ अंतर्गत कत्तलखाना रोडवर पथदिवे लावणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४९,८९६/-) (खर्च रक्कम रू.४९,६९६/-)**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.७ अंतर्गत कत्तलखाना रोडवर पथदिवे लावणेचे रू.४९,८९६/- चे कामाकरीता कार्यालयीन पत्र क्र.मनपा/वि/३५१/२०१३, दिनांक ३१.१२.२०१३ अन्वये कोटेशन नोटीस काढण्यात आली. दिनांक ६.१.२०१४ रोजी दुपारी २ पर्यंत बंद लिफाफ्यात कोटेशन मागविले. सर्वात कमी दराचे कोटेशन मे.जयदीप इले.वर्क्स यांचे होते. प्राप्त दर ०.४०% Below असे आहेत. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कोटेशनसाठी काढलेली दिनांक ३१.१२.२०१३ च्या नोटीसीवर संबंधित अधिका-याची स्वाक्षरी नाही.

२. प्राप्त कोटेशन उपअभियंता व लेखाधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने उघडून त्यावर दोन्ही अधिका-यांच्या स्वाक्ष-या असणे आवश्यक आहे. परंतू प्राप्त कोटेशन सदर केलेल्या एजन्सीचे असल्याचा व बंद लिफाफ्यात प्राप्त असल्याची स्वाक्षरी दोन्हीवर नाही.

३. प्राप्त कोटेशन मध्ये एजन्सीने कोणत्या तारखेस दर नमूद केले ती तारीख नाही.

४. नविन साहित्य प्राप्त झाल्याचे स्टॉक बुक नोंदवही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही.

५. कंत्राटी कामाचे विमा पत्र संचिकेत नाही. तसेच देयकातून १% रक्कम रू.४९७/- कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. मोजमाप पुस्तीका क्र.४१५३ लेखापरीक्षण पथकास विभागाकडून उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

७. दरपत्रकाची फी कपात केलेली नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. ५ नुसार शासनाचे रू.४९७/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. मुद्या क्र. ७ नुसार २६०/- असे एकूण ७५७/- रूपयाचे नुकसान झालेले आहे. झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ८ :वॉर्ड क्र. ७ अंतर्गत नागसेन कॉलनी येथे पथदिवे बसविणे बाबत.
(अं.प.रक्कम रू.४७९५३/-) (खर्च ४७,८८१/-)**

वॉर्ड क्र.७ नागसेन कॉलनी येथे अंतर्गत पथदिवे बसविणे बाबत अं.प.रक्कम रू.४७९५३/- (सन २०१३-१४) अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून कोटेशन पध्दतीने दरपत्रक मागविले असता ३ कोटेशन प्राप्त झाले असून सर्वात कमी दर मे.जयदिप इले.वर्क्स - ०.१५% कमी दराने असून त्यास मान्यता देण्यात आली असून संबंधिताने करारनामा सादर केला आहे. जा.क्र./विद्युत/४००/, दिनांक ८.१.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला असून यावर कामाचा कालावधी दर्शविलेला नाही.

संचिकाची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. अ.क्र.२ S&E st.light bracket देयकात दर्शवितांना Quantity ५ Rate ४८४ Total/२४२० चे देयक अदा करण्यात आले म्हणजेच फक्त २ नग आवश्यक असतांना ३ जास्तीचे ३x४८४ = १४५२ जास्तीचा खर्च करण्यात आला आहे.

२.	अ.क्र.५ S&E Energy saving Fitting ४ x२४ watt quantity-५ Rate ५३१७ Total २६५८५ चे देयक अदा करण्यात आले म्हणजेच फक्त २ नग आवश्यक असतांना ३x५३१७ = १५९५१ जास्तीचा खर्च दाखविला आहे.

३.	अ.क्र.६ S&E Energy saving lamp २४ watt, Quantity २० Rate १८० Total ३६०० चे देयक अदा करण्यात आले म्हणजेच ८ नग आवश्यक असतांना १२x१८०=२१६० जास्तीचा खर्च करण्यात आला आहे.

मुद्या क्रमांक १,२,३ वर झालेला खर्च पाहता विभागाने कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने कामे दिलेली असतांनाही अशा प्रकारे खर्च करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. जास्तीचा खर्च रक्कम रूपये १९,५६३/- संबंधिताकडून वसूल करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

४.	मोजमाप पुस्तिका ४१५३(१०२-१०३) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

५.	कोटेशन फी रक्कम वसूल केल्याचे दिसून आलेले नाही. (रक्कम रू.२६०/-)

६.	नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षाणास विभागाकडून उपलब्ध झालेले नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. १, २, ३,व ५ वरील जास्तीचा व वसूलपात्र खर्च रक्कम रू. १९,८२३/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र. ९ : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात हर्सूल सर्व्हे नं.२१६, २१७ येथे पथदिव्यांची व्यवस्था करणे बाबत. अं.प.रक्कम रू.४,९९,२८०/- (खर्च रक्कम रू.४,८७,२९५/-)**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात हर्सूल सर्व्हे नं.२१६,२१७ येथे पथ दिव्यांची व्यवस्था करणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) अन्वये मा.आयुक्त यांना प्राप्त असलेल्या अधिकारातून उपलब्ध ठेकेदार मे.स्टॅण्डर्ड इलेक्ट्रीक वर्क्स यांचे कडून २% कमी दराने करणे बाबत मान्यता प्राप्त आहे. कार्यालयीन पत्र क्र.३९/२०१३ दिनांक १०.६.२०१३ अन्वये संबंधितांा कार्यादेश देण्यात आले आहे. सदरील काम दिनांक १७/६/२०१३ रोजी पूर्ण झालेले आहे. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१ .	सदरील कामाचे बाबत निविदा रक्कम रू.८६५/- वसूल केलेली नाही.

२.	नविन साहित्याच्या नोंदीचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

३. शेड्यूल्ड B मध्ये ॲटम क्र.६,१०,११ च्या रकमा अनुक्रमे रू.१२२१६/-, रू.८७८४/-, रू.४२००/- दर्शविलेल्या आहेत. प्रत्यक्षात उपरोक्त रकमा रू.११,१९८/-, रू.८०५२/-, रू.३८५०/- अशा यावयास पाहिजे. जादा रकमा दर्शवून सदरील ॲटम मध्ये रू.१०१८/-+रू.७३२/-रू.+३५०/- एकूण रू.२१००/- जादा रकमेचे अंदाजपत्रक तयार केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतर उतरविलेला असल्याने विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

५. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे विद्युत निरिक्षक यांचे कार्यालयाचे पत्र क्र.विनिऔ/स्वीस/२१४८/२१३, दिनांक १६/११/२०१३ अन्वये सर्व्हे नं.२१६,२१७ हर्सूल येथील street light बाबतच्या विद्युत संच मांडणी कार्यान्वीत करण्याच्या परवानगी बाबतच्या पत्रात २४ पोल बसविले असल्याचे दिसून येते. प्रत्यक्षात देयकात ॲटम क्र.१ नुसार २५ बसविले असल्याचे नमूद आहे. शासनाच्या कार्यालयाच्या अभिप्रायानुसार २४पोल बाबतचे खर्च अनुज्ञेय आहे. ॲटम क्र.१,२ व ३ वरील २५ प्रमाणकाऐवजी २४ प्रमाणकानुसार खर्च मान्यता व्हावयास पाहिजे. जास्तीचे प्रमाणके दर्शवून अनुक्रमे रू.३९९२/- + रू.१०२१/-+ रू.७८८/- एकूण रू.५८०१/- रकमेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. सदरील कामाची तातडी असल्याने अधिनियमातील तरतूदीनुसार ६७ (३)(क) अंतर्गत काम उपलब्ध ठेकेदारा मार्फत करून घेण्यात आले. परंतू प्रत्यक्ष विद्युत संच मांडणी कार्यान्वीत करणेसाठी उक्त मुद्यांतील शासनाचे पत्रानंतरच प्रत्यक्षात संबंधित वस्तीतील नागरीकांना दिवाबत्तीची सोय झाली आहे, त्यामुळे कामाची निकडीबाबत साशंकता निर्माण होते.

७. सदरील कामाची मोजमाप पुस्तीका क्र.४०८३ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेली नाही. त्याकारणे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

८. सदरील कामाची नोंद पीटी वर्क्स रजिस्टर मध्ये नविन पथदिवे बसविणे पोलसह या लेखाशिर्षा अंतर्गत दर्शविली. वास्तविक पाहता सदरील काम विकास निधी (भूसंपादन व विकास कामे) या लेखाशिर्षातून झालेले असल्याने त्याच लेखाशिर्षात कामाची नोंद होणे आवश्यक आहे.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. १ , ३, व ५ वरील जास्तीचा व वसूलपात्र खर्च एकूण रू.८७६६/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१० :वॉर्ड क्र.७ भिमनगर, भावसिंगपुरा येथील कत्तलखाना रोडवरील स्मशान भूमीच्या प्रवेशद्वारा समोर पोलसह पथदिवे व्यवस्था करणेबाबत.**
**अं.प.रक्कम रू.४७,९५३/- (खर्च रक्कम रू.४७,८३३/-)**

वॉर्ड क्र.७, भिमनगर, भावसिंगपुरा येथील कत्तलखाना रोडवरील स्मशान भूमीच्या प्रवेश दारासमोर पोलसह पथदिवे व्यवस्था करणेचे कामाकरीता दरपत्रके मागविण्यात आली. ३ दरपत्रके प्राप्त झाली, त्यामध्ये मे.जयदीप इले.वर्क्स यांचे दरपत्रकाचे दर अं.प.रकमेपेक्षा ०.२५% Below चे आहेत. संबंधितांनी मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.३९९/२०१४, दिनांक ८.१.२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत कार्यादेशात नमूद नाही. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. दरपत्रक नोटीस क्र.३५३/२०१४ दिनांक ३१.१२.२०१४ वर संबंधित उप अभियंत्याची स्वाक्षरी नाही.

२. दरपत्रकावर दिनांक नमूद नाही. दरपत्रके उघडतांना संबंधित उपअभियंता व लेखाधिकारी यांची संयुक्त स्वाक्षरी नाही.

३. मोजमाप पुस्तीका क्र.४१५३ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करुन दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

४. संचिकेतील देयकाची एकूण बेरीज रू.२१३६८/- येते. प्रत्यक्षात रू.४७९५३/- दर्शविली आहे. म्हणजेच रू.२६५८५/- जास्तीची दर्शवून संबंधित कंत्राटदारास रक्कम अदा केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५. नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

६. ॲटम क्र.१ प्रमाणे GI पोल प्रमाणके २ दर्शविले आहे. परंतू ॲटम क्र.२ S/E light bkt चे दर्शवून ॲटम क्र.२ मधील ३ प्रमाणकावर रू.४८४/- प्रती प्रमाणे रू.१४५२/- जास्तीचा खर्च झालेला आहे.

७. ॲटम क्र.५ s/E Energy saving lamp २० बसविले असल्याचे नमूद आहे. प्रत्यक्षात दोन पोलसाठी ८ lamp आवश्यक होते. १२ lamp वरील प्रति रू.१८०/- प्रमाणे रू.२१६०/- जास्तीचा खर्च झालेला आहे.

८. सदरील कामाची नोंद पीटी वर्क्स रजिस्टरमध्ये घेतलेली नाही.

९. दरपत्रकाची फी रू.२६०/- संबंधिताकडून वसूल केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. ४,६,७ व ९ वरील जास्तीचा खर्च व वसूलपात्र असा एकूण खर्च रू.३०,४५७/- संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.११ : सर्व्हे क्रमांक २१६,२१७ हर्सूलगांव येथे विद्युत व्यवस्था करणे.**
**अं.प.रक्कम रू.४,९९,९७५/- (खर्च रक्कम रू.४,८९,९७५/-)**

हर्सूल येथील सर्व्हे क्रमांक २१६,२१७ मध्ये घाटी / फुले नगर भागातील रस्त्यामध्ये बाधीत होणा-या नागरीकांचे पुर्नवसन करण्यात येत आहे. त्याठिकाणी नागरीकांना तात्काळ सुविधा देणे आवश्यक आहे. येथे २५ पोल लावण्याचे अंदाजपत्रकीय रक्कम ४,९९,९७५/- चे तयार करण्यात आले. काम तातडीचे असून उपलब्ध एजन्सी तर्फे २% कमी दराने कलम ६७ ३(c) मध्ये काम करणेस्तव उपलब्ध गुत्तेदार मे.मातोश्री इले.तर्फे काम करण्यात आले. खर्चाचा प्रस्ताव सन २०१३-१४ वर्षातील विकास निधी (भूसंपादन विकास कामे) या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित असून जा.क्र.मनपा/विद्युत/४०, दिनांक १०.६.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ नुसार विमा काढणे आवश्यक असतांना विमा हा काम संपल्यानंतर काढलेला आहे. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.
२. schedule -B वर उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांची स्वाक्षरी नाही.
३. निविदा फी रक्कम रू.८६५/- वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेली नाही.
४. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४१५३(३२-३५ ) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.
५. सदरील कामाची नोंद पी.टी.वर्क्स रजिस्टर मध्ये दर्शवितांना नविन पथदिवे लावणे (पोलसह) या लेखाशिर्षात दर्शविले आहे.प्रत्यक्षात सदरील काम हे विकास निधी (भूसंपादन व विकास कामे) या लेखाशिर्षातून झालेले असल्याने त्याच लेखाशिर्षात नोंदविणे आवश्यक आहे.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. ३ नुसार निविदा फी रक्कम रू. ८६५/- वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१२ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.७ भिमनगर भावसिंगपुरा येथील मुख्य रस्त्यावरील पथदिवे बदलणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.७६,९६०/- )(खर्च रक्कम रू. ७६,६९१/-)**

वॉर्ड क्र.७ भिमनगर भावसिंगपुरा येथील मुख्य रस्त्यावरील पथदिवे बदलण्याच्या कामाबाबत Risk & cost basis वर करून घेण्याकरीता दरपत्रके मागविण्यात आली. तीन दरपत्रके प्राप्त झाली. सर्वात कमी दराचे दरपत्रक ०.३५ below चे मे.जयदिप इलेक्ट्रीकल यांचे होते. संबंधितांनी सदरील काम पूर्ण केलेले आहे. उपरोक्त काम बी.ओ.टी. तत्वावरील काम करणा-या एजन्सीने केलेले नसल्याने दरपत्रक मागवून काम करून घेण्यात आले. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. दरपत्रके मागवितांना प्राप्त दरपत्रकावर संबंधितांनी तारीख नमूद केलेली नाही. तसेच दरपत्रके उघडतांना संबंधित उपअभियंता व लेखाधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने दरपत्रके उघडलेली नाहीत.

२. सदरील काम बी.ओ.टी. तत्वावरील काम दिलेल्या कंत्राटदाराने करणे आवश्यक असतांना त्यांनी काम न केल्यामुळे दुस-या एजन्सीकडून काम करून घेण्यात आले. Risk & cost basis वर काम झालेले असल्याने झालेला खर्च संबंधित नोंदवहीत नोंदवून बी.ओ.टी. तत्वावरील काम करणा-या एजन्सीच्या देयकातून कपात करणे आवश्यक आहे. परंतू लेखापरीक्षणास Risk & cost रजिस्टर व झालेली कपात इ.अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे महानगरपालिकेचे रक्कम रु.७६,६९१/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

३. लेखा शाखेने सदरील कामाचे देयक पारीत करतांना रु.७६,६९१/- ऐवजी रु.९६,६९१/- एवढ्या रकमेचे देयक पारीत केले. तसेच संबंधित मोजमाप पुस्तीका क्र.४१५३ पान क्र.६० व ६१ वर सुध्दा उपरोक्त प्रमाणेच देयक पारीत केलेले आहे. रक्कम रु.२०,०००/- जास्तीचे देयक पारीत करण्याचा लेखा शाखेचा हेतू काय होता याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

४. जुने व नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्दा क्र. २ व ३ वरील जास्तीचा व वसूलपात्र असा एकूण खर्च रु.९६,६९१/- संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१३ : सन २०१३-१४ या वर्षात मा.महापौर निवासस्थान, रेल्वेस्टेशन येथे नविन A/C बसविणे बाबत.**

मा.महापौर निवासस्थान, रेल्वेस्टेशन येथे नविन वातानुकूल यंत्र (A.C.) बसविणे बाबतच्या कामासाठी दरपत्रके मागविण्यात आली होती. ३ दरपत्रके प्राप्त झाली, त्यापैकी शावरी मल्टी सर्व्हीसेस यांचे रु.४४०५०/- सर्वात कमी दर प्राप्त झाले. एजन्सीला कार्यालयीन पत्र क्र.०६/२०१३, दिनांक ९.५.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आले. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात काम केव्हा पूर्ण झाले याची तारीख नमूद नाही. संचिकेच्या तपासणीअंती खालील इतर बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. मा.महापौर यांच्या निवासस्थानी वातानुकुलीत यंत्र बसविण्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने A.C बसविण्याबाबत मंजूर केलेल्या धोरणाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

२. मा.महापौर निवासस्थानी यापूर्वी कोणत्या वर्षी A.C बसविण्यात आला होता, त्याच्या कार्यक्षमतेसह खुलासा व्हावा.

३. दरपत्रक फी रु.२६०/- वसूल केलेली नाही.

४. नविन व जूने साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

५. कंत्राटी कामाचा विमा रक्कम रु.४४१/- देयकातून कपात झालेली नसल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

६. मोजमाप पुस्तिका क्र.४०२४ लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

७. काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात काम पूर्ण झाल्याचा दिनांक नमूद नसल्याने काम झाले किंवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. ३ अन्वये रु.२६०/- निविदा फी व मुद्या क्र. ५ अन्वये शासनाचे रु.४४१/- असा एकूण रक्कम रु. ७०१/- संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१४ :सन २०१३-१४ या वर्षात मुख्य कार्यालयातील जनरेटरची दुरुस्ती करणे बाबत.**

सन २०१३-१४ या वर्षात मुख्य कार्यालयातील जनरेटरची दुरुस्ती करणेचे काम मे.ट्रिनीटी महालसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस यांचे कडून दरपत्रक मागवून केलेले आहे. रु.१४३४६४/- सदरील कामावर खर्च झालेला आहे. संचिकेत खालील बाबी स्पष्ट झालेल्या नाहीत.

१. दरपत्रके मागवून काम करतांना कमीत कमी ३ दरपत्रके मागविलेली नाही.

२. मुख्य कार्यालयातील जनरेटर कोणत्या वर्षी खरेदी केलेले आहे ? त्याचा वॉरन्टी कालावधी किती ? याबाबत संचिकेत नोंद नाही.

३. देयकावर M & R Light व Street light असे दोन्ही लेखाशिर्ष नोंदविले आहेत. प्रत्यक्ष खर्च कोणत्या लेखाशिर्षा अंतर्गत झाला याचा बोध होत नाही.

४. सदरील खर्चाची नोंदी मोजमाप पुस्तीकेवर न घेता voucher payment करण्याचे प्रयोजन समजले नाही.

५. जनरेटरची दुरुस्ती करतांना त्यात वापरल्या गेलेल्या नविन साहित्याची तसेच खराब झालेल्या जुन्या साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर विभागाने लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेले नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१५ : सन २०१३-१४ या हर्सूल स.न.२१६,२१७ मधील पथदिव्यांचे ओव्हर हेड वायर जळाल्यामुळे नविन टाकणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.१,६९,१२९/-) (खर्च रक्कम रू.१,६६,४७२/-)**

हर्सूल स.नं.२१६,२१७ मधील पथदिव्यांचे ओव्हर हेड वायर जळाल्यामुळे नविन टाकणेचे कामास उपलब्ध ठेकेदार मे.स्टँडर्ड इलेक्ट्रीकल यांचे कडून २% कमी दराने काम करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरील काम कार्योत्तर मंजूर झालेले आहे. संचिकेची तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील कामासाठी निविदा फी रक्कम रू.५२०/- वसूल केलेली नाही.

२. सदरील कामाचे अं.प.तयार करतांना केवळ वायर जळाल्यामुळे नविन वायर बदलण्याचे काम विचारात न घेता त्यासोबत इतरही ॲटम समाविष्ट करण्यात आले. त्याबाबतची आवश्यकता होती का ही बाब टीपणीत नमूद नाही.

३. सदरील ठिकाणी यापूर्वी झालेले काम करणा-या एजन्सीची जबाबदारी पुढे किती कालावधीची होती ही बाब नमूद नाही. तसेच सदरील ठिकाणचे काम विद्युत निरिक्षक महाराष्ट्र शासन यांनी तपासून कोणत्या तारखेस कार्यान्वीत करण्याची परवानगी दिली होती याबाबी सुध्दा स्पष्ट नाहीत.

४. सदरील कामाची मोजमाप पुस्तीका क्र.४०२५ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

५. नविन व जूने साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झाले नाही.

६. पी.टी.वर्क्स रजिस्टर मध्ये सदरील काम नविन पथदिवे बसविणे (पोलसह) या लेखाशिर्षातर्गत नोंदविलेले आहे. प्रत्यक्षात विकास योजना भूसंपादन व विकास कामे या लेखाशिर्षातून खर्च झालेला असल्याने तशी नोंद करणे आवश्यक होते.

७. आवश्यकता नसलेल्या ॲटमचा अंदाजपत्रकात समावेश केल्याने खालील ॲटमवर झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

| अ.क्र. | ॲटमचा तपशील | दर | प्रमाणक | खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| ४ | S/E FRP Box with pole clamp | ३६६/- | २० | ७३२०/- |
| ५ | S/E SPMCB ६A to ३२ Amp | १७५/- | ३० | ५२५०/- |
| ६ | S/E GI Pipe Pole ७५ mm via with bass plate | ३९९२/- | ०३ | ११९७६/- |
| ७ | Pro.c.c.foundation for bmtr.long pole | १०२१/- | ०४ | ४०८४/- |
| ८ | S/E pipe type earthing with ४० mm via pipe | ७८८/- | ०५ | ३९४०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | S/E CRCA sheet १६ guage for panel board | १५६८/- | ०२ | ३१३६/- |
| १० | S/E programmable Digital Timer Micro contractor | ८१५५/- | ०१ | ८१५५/- |
| ११ | S/E Power contractor ४० Amp | ४७२४/- | ०१ | ४७२४/- |
| १२ | S/E SPMCB ४० A to ६३ Amp | १५८२/- | ०१ | १५८२/- |
| १३ | S/E str.light fitting suitable ४x२४ watt | ५३१७/- | ०६ | ३१९०२/- |
| १४ | S/E T.S EE Fluo tube २४ W | १८०/- | २४ | ४३२०/- |
| १६ | S/E st.light bkt.४० mm via | ५०९/- | ०४ | २०३६/- |
| | | | | **८८४२५/-** |

करीता उपरोक्त मुद्यांवर  अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही.  मुद्या क्र. १  व ७ अन्वये निविदा फी  आणि  जास्तीचा खर्च असा एकूण खर्च रू.८८,९४५/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१६   : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.३१, लोटाकारंजा ते   मंजूरपुरा रोडवर पथदिव्यांची व्यवस्था करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२,७५,४५४/-)(खर्च रक्कम रू.२,७५,१३४/-)**

क्र.३१ लोटाकारंजा ते मंजूरपुरा रोडवर पथदिव्यांची व्यवस्था करणेच्या कामास मा.आयुक्त यांनी कार्योत्तर मान्यता प्रदान केलेली आहे. सदरील काम विकास योजने अंतर्गत असलेल्या निधीतून करण्यात आले. सदरील काम मे.आयकॉन इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अं.प.दराने करण्यात आलेले आहे. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१. रू.२,७५,४५४/- रकमेच्या कामास कार्योत्तर मान्यता प्रदान करतांना अधिनियमातील तरतूदी नमूद नाही.

२. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्णत्वानंतर उतरविलेला असल्याने विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

३. नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

४. सदरील कामाचा खर्च पीटी वर्क्स नोंदवहीत विकास निधी लेखाशिर्षाअंतर्गत नोंदविलेला नाही. नविन पथदिवे लावणे (पोलसह) या लेखाशिर्षात नोंदविलेला आहे.

५. मोजमाप पुस्तीका क्र.३०५२ लेखापरीक्षणास विभागाने उपलब्ध करून दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

६. सदरील कामाचे देयकात अ.क्र.१ नुसार ७ पोल बसविले आहेत. तर अ.क्र.२ नुसार ७ ब्रॅकेट (२ सेटचे) लावलेले आहेत. त्यावर ॲटम क्र.५ प्रमाणे S/E EER ४x२४ चे प्रमाणक १४ असावयास पाहिजे. प्रत्यक्षात २५ प्रमाणक दर्शविले आहे. ११ प्रमाणकाचे प्रती प्रमाणक रू.५३१७/- प्रमाणे रू.५८४८७/- जादा अदा केले आहे. तसेच ॲटम क्र.६ चे प्रमाणक ५६ ऐवजी १०० दर्शविले. ४४ प्रमाणक (S/E TS २४ W light) जास्तीचे दर्शवून प्रती प्रमाणक रू.१८०/- प्रमाणे रू.७९२०/- जास्तीचा खर्च झालेला आहे. एकूण रक्कम रू.६६४०७/- जास्तीचा खर्च वसूलीस पात्र आहे.

७. निविदा फी रू.५२०/- चा भरणा मनपा फंडात करण्यात आलेला नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. ६ व ७ वरील जास्तीचा खर्च व वसूलपात्र असा एकूण खर्च रु.६६,९२७/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१७ : हर्सूल सर्वे नं.२१६ येथे पथ दिव्यांची व्यवस्था करणेच्या कामाबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४,९९,९७५/-)(खर्च रक्कम रू.४,८९,४२७/-)**

सन २०१३-१४ मध्ये हर्सूल सर्वे नं.२१६,२१७ येथे घाटी व फुले नगर येथील नागरीकांना स्थलांतरीत केले असून येथे जागा देण्यात आली आहे. ८०% नागरीकांनी घरे बांधण्यास सुरूवात केली असून काम तात्काळ करणे आवश्यक आहे. तातडीच्या कामामुळे या ठिकाणी विजेची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तातडीच्या कामामुळे उपलब्ध एजन्सी मे.पुजा इलेक्ट्रीक तर्फे अं.प.दरापेक्षा २% कमी दरास ६७ (३)(C) अन्वये काम करण्यात येत असून कामाची अं.प.रक्कम ४,९९,९७५/- तयार करण्यात आले. सन २०१३-१४ वर्षातील विकास निधी भूसंपादन व विकास कामे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित असून जा.क्र.मनपा/विद्युत/४१, दिनांक १०.६.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आले . कामाचा कालावधी दर्शविलेला नाही.

संचिकांची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ नुसार विमा काढणे आवश्यक असतांना विमा काढला. परंतू काम संपल्यानंतर विमा काढलेला असून त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

२. निविदा फी रक्कम रुपये ८६५/- वसूल केलेले नाही.

३. मोजमाप पुस्तिका ४०८३(१३-१६) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

४. P.T. रजिस्टरला नोंद दर्शवितांना नविन पथदिवे लावणे (पोलसह) या शिर्षकात नोंद दर्शविली आहे. प्रत्यक्षात काम विकास निधी भूसंपादन व विकास कामे या लेखाशिर्षकात नोंद घेणे आवश्यक होते.

५. अंदाजपत्रक बनवितांना एकूण २५ पोल बसवून त्यावर दिवे लावण्याचे असतांना २१ पोलवर दिवे लावण्यात आले म्हणजेच अ.क्र.१,२,७,८,११, जास्तीची Qty. दर्शवून जास्तीचा खर्च केल्याचे दिसून येते.

| Sr.No. | Item work | Quty | Rate | Diff. Amount |
|---|---|---|---|---|
| १ | S & E GI Pole | ४ x ३९९२ | | १५९६८/- |
| २ | Providing cc foundation | ४ x १०२१ | | ४०८४/- |
| ७ | S & E F.R.P.Box | ४ x ५९९ | | २३९६/- |
| ८ | S & E Pipe type | ४ x ७८८ | | ३१५२/- |
| ११ | S & E st.light bracket | ४ x ५०९ | | २०३६/- |
| | | Total | | २७६३६/- |

तरी जास्तीचा खर्च रक्कम रू.२७,६३६/- अमान्य का करण्यात येवू नये या बाबत खुलासा व्हावा.

६. देयकातील Item No. ४ S& E Pvc २x६ आणि Item No.१३ S&E Pvc २x६ हे एकच असून दोन ठिकाणी वेगवेगळी Quty.दर्शवून एकच Item वर दोन वेळा रक्कम अदा केलेली आहे. Item No.४ कायम ठेवल्यास Item No.१३ वरील पुनश्च दर्शविलेला खर्च ४८२४०/- वसूलीस पात्र आहे.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. २,५ व ६ वरील जास्तीचा खर्च व वसूलपात्र असा एकूण खर्च रू.७६,७४१/- संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१८ : हज हाऊस व वंदेमातरम सभागृह बांधणे् बाबत. पुर्नवसनासाठी निश्चित केलेली पडेगांव (गट नं.६९) ता.जि.औरंगाबाद येथे पुर्नवसन करावयाच्या जागे अंतर्गत पथदिवे व्यवस्था करणे.**
**(अं.प.रक्कम रू.३,००,०००/-)(खर्च रक्कम रू.२,२५,२८८/-)**

हज हाऊस व वंदेमातरम सभागृह बांधणे बाबत चा जागेवरील नागरीकांचे पुर्नवसनासाठी निश्चित केलेली पडेगांव (गट नं.६९) येथे पुर्नवसन करावयाच्या जागेत अंतर्गत पथदिवे व्यवस्था करणे बाबत अं.प.रक्कम ३०००००/- सन २०१३-१४ मध्ये तयार करण्यात आले असून कामासाठी रू. १ कोटी चे शासकीय अनुदान प्राप्त होणार आहे. त्यामधून हा खर्च करता येईल असे संचिकेत नमूद करण्यात आले आहे. त्या अटीवर संचिका मंजूर करण्यात आली असून कामाची निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई.निविदा/७५/२०१३ अन्वये प्रसिध्दीस देण्यात आली. निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत ६ निविदांची विक्री झाली असून स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत (४) निविदा प्राप्त झाल्या आहे.

दिनांक २६.०९.२०१३ रोजी निविदा उघडल्या असता तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३९.७% कमी दराने मे.सोनु इलेक्ट्रीकल यांची निविदा आहे. जा.क्र.मनपा/विद्युत/अ/ड/७१, दिनांक ३.१.२०१४ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला असून कामाचा कालावधी नमूद केलेला नाही.

संचिकांची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ (२) नुसार ३९.७% कमी दराने असल्याने अतिरिक्त सुरक्षा रक्कम रू. १५०००/- कार्यादेश देण्याचे अगोदर वसूल करणे आवश्यक होते. परंतू तसे न करता देयकातून वजावट केल्याचे दिसून येते. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव कामाचे performance साठी असते.

२. निविदा नियम ५४ अन्वये १% विमा रक्कम रू.३०००/- वसूल करणे आवश्यक होते. विमा रक्कम वसूल केलेला नाही,त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

३. रक्कम रुपये १ कोटी शासकीय अनुदान प्राप्त होणार आहे व यातून हा खर्च करता येईल असे संचिकेत नमूद आहे. निधी प्राप्त होण्याच्या अटीवर संचिका मंजूर करण्यात आली आहे. परि.४ मधील टिपणीच्या बाबत लेखा विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक असतांना लेखा विभागाचा अभिप्राय घेतलेला नाही. त्यामुळे झालेला खर्च कोणत्या लेखा शिर्षकातून करण्यात आला याबाबत लेखा शाखेचा अहवाल नाही. विभागाने हा खर्च कोणत्या लेखाशिर्षकातून केला व उक्त दर्शविलेले अनुदान प्राप्त झाले आहे का त्याची नोंद अर्थसंकल्पात दर्शवून त्यातून हा खर्च केला आहे का याबाबत खातरजमा करून अहवाल सादर करावा.

४. निविदा रक्कम रू.६९०/- वसूल केलेली नाही.

५. मोजमाप पुस्तीका क्र.३०५१ (३८-४०) लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही.

६. अंदाजपत्रक तयार करतांना हे चूकीचे तयार करण्यात आले आहे.

७. स्थळप्रत नकाशामध्ये एकूण संख्या १५ दर्शविले आहे.

८. काम पूर्ण झाल्यानंतर विद्युत निरीक्षण कार्यालय सा.बा.विभाग यांचे संच तपासणीचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक असतांना संच तपासणीचे प्रमाणपत्र संचिकेत नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. २ अन्वये शासनाचे रक्कम रू. ३०००/-, मुद्या क्र. ४ अन्वये मनपाची निविदा फी रक्कम रू. ६९०/- अशी एकूण रक्कम रू.३६९०/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१९ : सन २०१४-१५ या वर्षात वॉर्ड क्र.७ भिमनगर, भावसिंगपुरा येथे प्रवेशद्वार बांधकामात अडथळा करणारी L.T विद्युत तार काढून केबल टाकणे बाबत. (अं.प.रक्कम रू.८३,५६९/-)(खर्च रक्कम रू.८३,५६९/-)**

वॉर्ड क्र.७, भिमनगर भावसिंगपुरा येथे प्रवेशद्वार बांधकामात अडथळा करणारी L.T. विद्युत तार काढून केबल टाकणे बाबतचे काम उपलब्ध ठेकेदार मे.पुजा इलेक्ट्रीकल यांचे कडून करुन घेण्यात आलेले आहे. सदरील कामासाठी संबंधितांनी मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र. मनपा/विद्युत अ/ड/२५/२०१४, दिनांक ९.९.२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले. संचिकेची तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना ॲटम क्र. १ ते ६ चे दर बाजार भावाने अंतीम केलेले आहे. ॲटम क्र.१ ते ६ करीता D.S.R. दर उपलब्ध नव्हते काय ?

२. सदरील काम तातडीने करणे आवश्यक होते तर अधिनियमातील तरतूदी नमूद करुन कामास मंजूरी का घेण्यात आली नाही.

३. जुने व नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखा परीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करुन दिले नाही.

४. मोजमाप पुस्तीका क्र.२८६७ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

५. पी.टी.वर्क्स रजिस्टर मध्ये सदरील कामाची तपासण्यासाठी नोंदवही उपलब्ध झालेली नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२० : दिवाण देवडी ते औरंगपुरा रोडवरील जी.टी.एल कंपनीचे पोल स्थलांतरीत करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२,७२,१४५/-)(खर्च रक्कम रू.३,०२,४३६/-)**

दिवान देवडी ते औरंगपुरा रोडवरील जी.टी.एल. कंपनीचे पोल स्थलांतरीत करणेचे कामा करीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. ३ निविदा विक्री झाल्या. ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.पुजा इलेक्ट्रीकल वर्क्स यांची २७.८% Above दराची आहे. लेखा शाखेने संचिकेतील परिच्छेद (२१) प्रमाणे संबंधितास वाटाघाटीस बोलावण्याची शिफारस केली होती. परिच्छेद क्र. (२३) प्रमाणे परिच्छेद (२१) अवलोकन व्हावे व प्रकरण निर्णयास्तव तांत्रिक कक्ष प्रमुख्यांनी प्रस्तावित केले. यानंतर मा.आयुक्तांची स्वाक्षरी आहे. विभागाने संबंधित एजन्सीला करारनामा करणेसाठी व २% सुरक्षा अनामत भरणे बाबत कळविले नंतर संबंधितांनी पूर्तता केली. कार्यालयीन पत्र क्र. मनपा/विद्युत अ व ड /१२६/२०१४, दिनांक ९.९.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आले. काम दिनांक ९.९.२०१४ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत उपलब्ध आहे. संचिकेची तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. लेखाशाखेने परिच्छेद (२१) वरील केलेल्या शिफारशीनुसार संबंधित एजन्सीला वाटाघाटी साठी बोलावण्याचे बाबत मा.आयुक्तांनी साक्षांकन केलेले असतांना सुध्दा वाटाघाटीस न बोलावता २% सुरक्षा अनामत भरणा करणे व करारनामा करणेचे पत्र निर्गमित केले. वाटाघाटी झाल्या नसल्याने २७.८% जास्त दराची निविदा सक्षम प्राधिकरणाच्या मान्यते विना स्वीकारली त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. सदरील काम GTL कंपनीने दिलेल्या कोटेशन नुसारच मर्यादित रकमेत होणे अपेक्षित असतांना २७.८% जास्त दर रू.६५,७८८/- अदा करणे म्हणजे GTL कंपनीने दिलेले दर सदोष आहेत असे होते.

३. मोजमाप पुस्तीका क्र.२८६७ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

४. नविन व जुने साहित्य जमा असल्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. २ नुसार जास्त अदा दर रक्कम रू. ६५,७८८/- संबंधितांकडून वसूल करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२१ : प्रभाग - ड भाग-१ मधील वॉर्ड क्र.३३,३६,३७,३८,३९,५८,५९,६० येथील पथदिव्यांची वार्षीक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२६,०१,१९०/-)(खर्च प्रथम व दरम्यानचे रक्कम रू.७,१४,९६३/-)**

विभागाने उपलब्ध करुन दिलेली संचिका प्रभाग - ड भाग -१ मधील वॉर्ड क्र.३३,३६,३७,३८,३९,५८,५९ व ६० येथील पथदिव्यांची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्तीचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ७ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची ८.३८% below ची निविदा मे.आदित्य इलेक्ट्रीकल्स यांची होती. संबंधितांनी मनपा सोबत करारनामा केल्यानंतर त्यांना कार्यालयीन पत्र क्रमांक मनपा/विद्युत-१/४८/२०१३ दिनांक १२.६.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशात दहा महिन्याचा कालावधी नमूद होता. संबंधित एजन्सीला पहिले व दरम्यानचे देयक रू.७,१४,९६३/-(जुलै, ऑगस्ट,सप्टेंबर -२०१३) चे अदा करण्यात आले आहे. सन २०१४-१५ मध्ये एप्रिल ते डिसेंबर २०१४ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित केलेली होती. परंतू त्यास मान्यता नाही. मा.सर्वोच्च न्यायालयातील दावा क्र.SLP No ३४/२९१३१३०/२०१४ प्रलंबित आहे. तोवर दिनांक ३० जून २०१५ पर्यंत याच एजन्सीस मुदत वाढीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवलेला आहे. संचिकेत खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. प्रथम व दरम्यानच्या देयकात विमा रक्कम रू.७१५०/- ची कपात विभागाने दर्शविली होती. परंतू लेखा शाखेने संबंधितास कपातीची देयकातून कपात न करता रक्कम अदा केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. कंत्राटी कामाचा विमा केवळ १० महिने कालावधीचा उतरविलेला आहे. परंतू प्रथम व दरम्यानचे देयकाच्या कालावधीचा नाही. त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

३. प्रथम व दरम्यानच्या देयकातून रू.२०००/- नाममात्र दंड कपात केलेला आहे. दंड कोणत्या आधारे आकारला याबाबत स्पष्टता नाही.

४. संबंधित एजन्सीच्या कामास एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०१४ पर्यंत मुदतवाढ दर्शवून १ जानेवारी २०१५ ते जून २०१५ पर्यंत मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव मांडला आहे. प्रत्यक्षात संचिकेत एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०१४ पर्यंतच्या खर्चास तथा मुदतवाढीस मान्यता प्राप्त नाही.

५. मा.स्थायी समितीने पारीत केलेल्या मुदतवाढीच्या ठरावाची प्रत संचिकेत उपलब्ध नाही.

६. कार्यादेशातील अट क्र.२३ नुसार जुने साहित्य कार्यालयात एजन्सीने जमा न केल्यास २% रक्कम देयकातून कपात होणे आवश्यक आहे. परंतू रू.७,१४,९६३/- च्या देयकातून २% रू.१४२९९/- कपात केलेली नसल्याने संबंधितांकडून वसूलीस पात्र आहे. तसेच पुढील देयकातून सुध्दा साहित्य जमा न केल्यास २% रक्कम कपात करणे विभागास बंधनकारक आहे.

७. कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल करण्याचा एजन्सीचा दैनंदिन अहवालाच्या नोंदीचे तक्रार नोंदवही, तक्रार निवारण नोंद वहीचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

८. कार्यादेशातील अट क्र.१४ प्रमाणे दंडाची रक्कम specific न आकारता Lumsupn पध्दतीने दंडाची आकारणी केलेली आहे.

९. कार्यादेश अट क्र.१६ प्रमाणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील पथदिव्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी कळविले आहे. परंतू सर्वेक्षण झाल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

१०. अट क्र.१६ प्रमाणे कार्यादेश दिल्यानंतर सर्वेक्षण करण्याची पध्दत चूकीची असून कामाच्या अंदाजपत्रक तयार करण्यापूर्वीचे सर्वेक्षण होणे आवश्यक होते. तयार केलेले अंदाजपत्रक सदोष आहे.

११. मोजमाप पुस्तीका क्र.४०२२ लेखापरीक्षण उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. १ अन्वये शासनाचे रक्कम रू. ७१५०/-, मुद्या क्र. ६ अन्वये जुने साहित्य जमा न केल्याबाबत देयकाच्या २% रक्कम रू. १४,२९९/- अशी एकूण रक्कम रू.२१,४४९/- संबंधितांकडून वसूल करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२२ : प्रभाग - ड भाग -२ मधील वॉर्ड क्र.६१,६२,६३,६४,६५,९१,९४, ९५, येथील पथदिव्याची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.२५,९३,८९०/-) (खर्च रक्कम रू.४७,४५,९१२/-)**

सन २०१३-१४ या वर्षासाठी प्रभाग - ड, भाग-२ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल व दुरुस्तीचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविल्या होत्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत १० निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेस ८ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची मे.ए.जी.इलेक्ट्रीकल यांची निविदा २०.४५% Below ची होती. एजन्सीचे दरांस मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना कार्यालयाने २% सुरक्षा अनामत व ५% अतिसुरक्षा अनामत भरणा करणे तसेच मनपासोबत करारनामा करणे बाबत पत्र देण्यात आले. एजन्सीने २% रकमेचा FDR व करारनामा मनपाचे नांवे केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत -१/२४/२०१३ दिनांक ३०.५.२०१३ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाचा कालावधी दहा महिनेचा आहे. सदरील कामास वेळोवेळी मुदतवाढ जून २०१४ पर्यंत दिलेली आहे. प्रत्यक्षात डिसेंबर २०१४ पर्यंत मुदतवाढ दिल्याचे मा.स्थायी समिती समोर प्रस्तावात नमूद करून कार्योत्तर मान्यता झ ालेली आहे. जानेवारी २०१५ ते जून २०१५ पर्यंत सदरील कामास मा.स्थायी समितीने ठराव क्र.१२४ दिनांक २७.२.२०१५ अन्वये मुदतवाढीचा ठराव पारीत केलेला आहे. संचिकेची तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. मा.स्थायी समितीने डिसेंबर २०१४ पर्यंतच्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता प्रदान केलेली आहे. परंतू विभागाने जून २०१४ पर्यंतच मा.आयुक्तांची मान्यता घेतली. डिसेंबर २०१४ पर्यंत प्रथमतः मा.आयुक्तांची मुदतवाढ घेणे आवश्यक होते.

२. कार्यादेशातील अट क्र.२३ प्रमाणे जूने साहित्य जमा न केल्यास २% रक्कम संबंधिताच्या देयकातून कपात होणे आवश्यक आहे. जुने साहित्य जमा केल्याच्या नोंदीचे रजिस्टर लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही. संबंधित एजन्सीस एकूण अदा केलेली रक्कम रू.४७,४५,९१२/- च्या २% रक्कम रू.९४,९१८/- संबंधिताचे देयकातून कपात केलेली नाही. तसेच उर्वरीत देयकातून सुध्दा संबंधित कंत्राटदाराने जुने साहित्य कार्यालयाने जमा न केल्यास त्या प्रमाणे कपाती करणेची कार्यवाही व्हावी.

३. सदरील काम २०.४५% Below दराचे असल्याने ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव कार्यादेश देण्यापूर्वी संबंधितांनी मनपाकडे जमा करावयास पाहिजे. अतिरिक्त सुरक्षा अनामत कंत्राटदाराचे कामाचे performance शी निगडीत आहे. त्यामुळे देयकातून अतिरिक्त सुरक्षा ठेव कपात करणे ही बाब संयुक्तिक नाही. B१ निविदा पुस्तीकेतील अटी शर्तीचा भंग झाला आहे.

४. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव भरणा करणे बाबत मा.आयुकत यांनी दिनांक ३०.४.२०१३ रोजी मान्यता दिल्यानंतर कंत्राटदाराची विनंती पुनश्च मा.आयुक्त यांचे समक्ष सादर करण्यात आलेली नाही.

५. कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल व दुरुस्ती करणा-या एजन्सीच्या अहवालानुसार तक्रार नोंदवही, तक्रार निवारण नोंदवही इत्यादी अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

६. कार्यादेशातील अट क्र.१४ नुसार बंद दिव्यांचा दंड Lumsump आकारलेला आहे. दंड आकारतांना specific बंद दिव्यावर दंड आकारलेला नाही.

७. कार्यादेशातील अट क्र.१६ प्रमाणे संबंधित कंत्राटदाराने स्वखर्चाने सर्व्हेक्षण करुन पोल क्रमांक टाकून विहीत नमुन्यात अहवाल १५ दिवसात कार्यालयात सादर न केल्यास देयके देण्यात येणार नाही असे नमूद आहे. संचिकेत अहवाल प्राप्त नाही.

८. कार्यादेशात नमूद अट क्र.१६ ही कार्यादेशानंतर सर्वेक्षणा बाबतची आहे. प्रत्यक्षात सर्वेक्षण प्रथम होणे अभिप्रेत आहे, त्यानुसारच अं.प.तयार केले जाते. तयार केलेले अंदाजपत्रकास आधार नाही असे दिसून येते.

९. कंत्राटी कामाचा विमा कामाच्या पूर्ण कालावधीसाठी नसल्याने विमा काढण्याचा हेतू सफल झालेला नाही. विमा रकमेबाबत मो.पु.क्र.४०८५ पान क्र.६२ ते ६४ वर कपात दर्शविली प्रत्यक्षात कपात झाल्याची खात्री झालेली नाही.

१०. लेखा शाखेने संचिकेतील परिच्छेद (१४४) प्रमाणे १,१६,५८०/- बंद पथदिव्याचा दंड withheld केल्याचे नमूद आहे. मोजमाप पुस्तीका क्र.४०८५ पान क्र.१०६-१०८ मध्ये दंड कपात दर्शविली. नेमकी दंडाची रक्कम कपात केली की withheld याबाबत खुलासा अपेक्षित आहे.

करीता उपरोक्त मुद्यांवर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून विभागाने त्यांच्या खुलाशात केलेल्या निवेदनानुसार सर्व अभिलेखे दिल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात लेखापरीक्षण पथकास अशी माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्या क्र. २ अन्वये जुने साहित्य जमा न केल्यामुळे देयकाच्या २% रक्कम रु. ९४,९१८/- वसूलीस पात्र आहे. तसेच मुद्या क्र. १० अन्वये बंद पथदिवे दंडाची withheld केलेली रक्कम रु. १,१६,५८०/- जप्त करुन महापालिका फंडात भरणा करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आणि उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२३ :सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात M & R Light या लेखाशिर्षाअंतर्गत झालेल्या खर्चाबाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्युत दिव्यांची देखभाल करणेकरीता comprehensive पध्दतीने खाजगी कंत्राटदारास कंत्राटे वॉर्ड निहाय देण्यात आलेली आहेत. संबंधित कंत्राटदारास साधारणपणे ८/९ वॉर्डाचे देखभाल करणे करीता कंत्राटे दिलेली आहेत. संबंधित कंत्राटदारांनी त्यांचे भागातील दिवे सुरू ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचा पुरवठा करणे, दिवे बंद असल्यास तात्काळ सुरु करणे इत्यादी बाबींचा निविदेत समावेश आहे. एकंदरीत देखभाल व दुरुस्ती संदर्भाने सर्व कामे संबंधित कंत्राटदारांनी करणे अभिप्रेत आहे. संबंधित कंत्राटदारांनी निविदा दर वेगवेगळ्या भागांसाठी वेगवेगळी दर्शविलेली आहे. संबंधितांनी केलेल्या कामाचे कंत्राटदाराने देयके सुध्दा अदा केलेली आहेत.

उक्त लेखाशिर्षा अंतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी नियुक्त कंत्राटदाराच्या व्यतीरीक्त इतरही कंत्राटदारांकरवी देखभाल व दुरुस्तीचे कामे केलेले असल्याचे लेखा शाखेतील प्राप्त अभिलेख्यावरुन स्पष्ट होते. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात comprehensive पध्दतीने कामे केलेल्या कंत्राटदारा व्यतीरीक्त इतर कंत्राटदारांनी केलेल्या कामांची रक्कम खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | वर्ष व वॉर्ड क्रमांक | M & R Light या लेखाशिर्षा अंतर्गत एकूण खर्च रक्कम रू. | Comprehansive पध्दतीने कामे केलेल्या कंत्राटदारांच्या देयकाचा खर्च रक्कम रू. | इतर कंत्राटदारांकरवी देखभाल / दुरुस्तीच्या कामांवर झालेला खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | २०१३-१४ A | १,३७,७२,७०६/- | ६२,६४,०८४/- | ७५,०८,६२२/- |
| २ | २०१३-१४ D | १,१९,९५,४२८/- | ६७,६६,४६६/- | ५२,२८,९६२/- |
| ३ | २०१४-१५ A | १,२२,१६,४६७/- | २७,२८,५९४/- | ९४,८७,८७३/- |
| ४ | २०१४-१५ D | ७४,६९,९०९/- | १२,४३,०५६/- | ६२,२६,८५३/- |
| | **एकूण** | **४,५४,५४,५१०/-** | **१,७०,०२,२००/-** | **२,८४,५२,३१०/-** |

उक्त तक्त्यातील खर्चाचा आढावा घेता सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील एकूण M & R Light लेखा शिर्षातील खर्चापैकी comprehensive पध्दतीने वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या खर्चापेक्षा जास्तीची रक्कम याच लेखाशिर्षा अंतर्गत इतर कंत्राटदारा मार्फत कामे करुन खर्च झालेली आहे. वास्तविक पहाता वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा अंतीम होवून कार्यादेश दिल्यानंतरच त्याच कंत्राटदाराकरवी कामे होणे अभिप्रेत आहे, त्या व्यतीरीक्त इतर कंत्राटदारा मार्फत केलेल्या कामांबाबत, झालेल्या खर्चाबाबत समर्थनीय खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे कळविण्यात आले होते.

विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून रू.२,८४,५२,३१०/- या रकमेची कामे इतर कंत्राटदारामार्फत केलेली आहेत या बाबत विभागाने पुनश्च समर्थनीय खुलासा सादर करणे आवश्यक आहे. कॉम्प्रेसिव्ह कंत्राटदाराला दिलेल्या भागात पुन्हा पुन्हा इतर कंत्राटदाराची कामे करणे ही बाब अयोग्य आहे. करिता संबंधितावर जबाबदारी निश्चित करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२४ : महावितरण कंपनीचे विद्युत देयकातील थकबाकी रकमामुळे मनपाच्या विज बीलाच्या दायीत्वात वाढ होत असल्याबाबत.**

विद्युत विभागाचे वॉर्ड अ/ड अंतर्गत प्राप्त विद्युत देयके तपासणी करण्याकरीता मागविण्यात आली. सन २०१३ मधील एप्रिल महिना व सन २०१४ मधील भरणा केलेल्या महिन्याचे देयक लेखापरीक्षण पथकास विद्युत विभागाने उपलब्ध करून दिले. विभागास एप्रिल २०१३ प्रमाणे एप्रिल २०१४ चे देयके तपासणीसाठी उपलब्ध करून देण्याचे वारंवार सूचित केले. प्राप्त अभिलेखे तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. विभागा अंतर्गत असलेल्या क्रांतीचौक, मेनपॉवर हाऊस व छावणी या तीन युनिट अंतर्गत असलेल्या मनपाच्या विद्युत मीटरची नोंद व युनिटचे नोंद असलेले रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.

२. अदा केलेली विद्युत देयकांचे मीटर रिडींग योग्य असल्याचे संबंधित नियंत्रण / तपासणी करणा-या अधिकारी / कर्मचा-याचे अहवाल प्राप्त झालेले नाही, त्यामुळे MSEB मार्फत मनपास प्राप्त बीले योग्य आहेत याची खात्री झाली नाही.

३. विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या देयकांची तपासणी अंती असे निदर्शनास आले की, विद्युत देयकाच्या चालू महिन्याचीच रक्कम अदा केलेली आहे. थकबाकीच्या रकमा का अदा केल्या नाहीत याची माहिती विभागाकडून प्राप्त झालेली नाही. MSEB ने थकबाकी रकमा भरणा न करण्याची मुभा दिलेली असल्यास लेखापरीक्षण विभागास त्याप्रमाणे अवगत केलेले नाही.

४. विद्युत विभागाचे खालील युनिटने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्या नुसार विद्युत देयकाची रक्कम, भरणा रक्कम व थकबाकीचा तपशिल इत्यादी विवरण खालील तक्त्यात नमूद आहे. त्यापैकी थकीत रकमेची दिवसेंदिवस वाढ होत असून मनपाच्या विद्युत देयकाच्या दायीत्वात वाढ होत आहे. वाढीव दायीत्वाची कारणे व जबाबदार कर्मचारी यांच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही अपेक्षित आहे.

| अ.क्र. | युनिटचे नांव | देकाचा महिना भरणा केलेला महिना | एकूण रक्कम रु. | भरणा रक्कम रु. | थकीत रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | क्रांतीचौक | सप्टेंबर -१३<br>मार्च -२०१४ | २१,७४,५३०/- | ७,३४,२०९/- | १४,४०,३२१/- |
| २ | मेनपॉवर हाऊस | जाने -२०१४<br>मार्च -२०१४ | ३९,७०,७५०/- | ८,१९,५३४/- | ३१,५१,२१६/- |
| ३ | छावणी | जाने -२०१४<br>एप्रिल -२०१४ | ७,६६,१३१/- | १,१३,३०२/- | ६,५२,८२९/- |
| | | **एकूण** | **६९,११,४११/-** | **१६,६७,०४५/-** | **५२,४४,३६६/-** |

करिता, मुद्या क्र. १ ते ४ बाबत विद्युत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा / शहानिशा करुन लेखापरीक्षण विभागास अनुपाल अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. महानगरपालिकेच्या दायित्वात झालेल्या वाढीबाबत जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**लेखापरीक्षण अहवाल**
**विद्युत विभाग (ब / क)**
**सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५**

**प्रस्तावना :**

लेखापरीक्षण विभागाच्या वार्षिक कार्यक्रमानुसार विद्युत विभागाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले होते. विद्युत विभागातील कामकाजासंबंधी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित विभागास लेखापरीक्षण पथकामार्फत अर्धसमास पत्रे देण्यात आली. लेखापरीक्षण विभागातील कर्मचा-यांचे पथक कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१५/६०, दिनांक १६.५.२०१५ अन्वये स्थापन करण्यात आले. विद्युत विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यानुसार निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबींचे परिच्छेद या सोबत सादर करण्यात येत आहे. विद्युत विभागाने उपलब्ध करुन न दिलेल्या अभिलेख्यांचे स्वतंत्र परिच्छेद असून याबाबत गंभीर दखल घेण्याची आवश्यकता आहे.

त्या दरम्यान विद्युत विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण २० परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**विद्युत विभागात सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या कालावधीत कार्यरत अभियंता, उपअभियंता यांच्या यांच्या कार्यकाळाबाबत.**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | कार्यभार | कार्यकाळ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.एस.डी.पानझडे | कार्यकारी अभियंता | विद्युत पथदिवे (वॉर्ड ब / क) | दि.१.४.२०१३ ते दिनांक १३.८.२०१३ |
| २ | श्री.पी.आर.बनसोडे (सेवानिवृत्त) | उपअभियंता | विद्युत (वॉर्ड ब/क) | दि.१.४.२०१३ ते दि.३१.१०.२०१४ |
| ३ | श्री.अफसर सिद्दीकी | उपअभियंता | कार्यकारी अभियंता विद्युत पथदिवे (वॉर्ड ब/क) (अ.का.) | दि.१.४.२०१३ ते दिनांक ३१.३.२०१५ |

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे :

४. श्री. अनंत सोनटक्के, (पथक प्रमुख)
५. श्री. चंद्रशेखर मराठे, ( कनिष्ठ लिपिक )
६. श्रीमती पंचशिला खरात, ( कनिष्ठ लिपीक )

**परिच्छेद क्र.०१ :विद्युत विभागातील अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

लेखापरीक्षणासाठी खालील अभिलेख्यांची तात्काळ आवश्यकता आहे. करिता अभिलेखे विना विलंब लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात यावे.

१. सन २०१३-२०१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील आवक -जावक नोंदवही.

२. प्रोव्हीजन रजिस्टर.

३. विद्युत देयके रजिस्टर.

४. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधील खर्चाच्या संपूर्ण संचिका , मोजमाप पुस्तिकेसह.

५. नॅशनल म्युनिसिपल अकाऊन्ट कोड अन्वये आपल्या विभागाशी संबंधित विविध परिशिष्टानुसार ठेवावयाच्या नोंदवह्या .

६. विद्युत विभागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचा जॉबचार्ट.

७. औरंगाबाद शहरात वॉर्ड - ब/क अंतर्गत सार्वजनिक विहिरी, बोअरवेल यावर बसविण्यात आलेल्या विद्युत मोटारींची माहिती.

८. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील विद्युत मीटर, विद्युत देयके, अनुषंगीक अभिलेख्यांची माहिती.

९. वॉर्ड ब व क अंतर्गत असलेल्या वॉर्डनिहाय विद्युत पोल व त्यावर लावण्यात आलेल्या फिटींग्सची माहिती.

१०. बी.ओ.टी. व कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने विद्युत देखभालीची कामे संबंधितांनी वेळेत न केल्यास Risk & cost वर उपलब्ध एजन्सीकडून केलेल्या कामाबाबतचे नोंदवही उपलब्ध करुन देणेबाबत.

११. महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकारी यांच्या दालनात व निवासस्थानी बसविलेल्या वातानुकुलित यंत्राबाबतची माहिती.

१२. विद्युत विभागातील (Scrap) भंगार साहित्याच्या लिलावाबाबतची माहिती.

१३. मनपा शाळा, उद्याने येथे नियुक्त चौकीदार यांना निवासासाठी दिलेल्या निवासस्थानाच विज बिलाबाबतची माहिती.

विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरुपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत संबंधितांविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.०२ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.२९ येथे नविन पथदिवे पोलसह बसविणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४,४९,९९८/-) (खर्च रक्कम रू.४,४७,४९८/-)**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.२९ येथे नविन पथदिवे पोलसह बसविणे बाबतच्या कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. २ निविदा विक्री झाल्या. २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची ०.५% below दराची निविदा स्टरलिंग इलेक्ट्रीकल्स वर्क्स, यांची होती. संबंधित कंत्राटदाराने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयातर्फे संबंधितांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत/०६/२०१३, दिनांक १०.६.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशात नमूद कालावधीनुसार काम मुदतीत पूर्ण झालेले आहे. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कंत्राटी कामाचा विमा, विमा कंपनीकडे काम पूर्ण झाल्यानंतर उतरविला. त्यामुळे विमा उतरवयाचा हेतू सफल झालेला नाही.
2. साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणा साठी उपलब्ध झालेले नाही.
३. खालील विवरण पत्रातील झालेला खर्च वार्षिक देखभाल दुरुस्ती मधून व्हावयास पाहिजे होता. जास्तीचे ॲटमनिहाय साहित्य कोठे बसविले याचा बोध होत नाही. नविन काम नसल्यामुळे देखभाल दुरुस्तीची स्वतंत्र निविदा असल्याने झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलास व्हावा.

| ॲटम क्र. | तपशिल | प्रत्यक्ष संख्या | बसविणे योग्य संख्या | जास्तीची संख्या | दर | फरक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | S & E St.light Bkt. | ५८ | १० | ४८ | ४८४ | २३२३२/- |
| ५ | S & E energy saving fiting T-५ type ४x२४ Wt | ५८ | १० | ४८ | ५३१७ | २५५२१६ |
| ६ | S & E energy saving fiting lamp T-५ २४ Wt | २३२ | ४० | १९२ | १८० | ३४५६०/- |
| | | | | | **एकूण** | **३,१३,००८/-** |

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास करावा असे कळविण्यात आले होते. अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही.

उक्त अनियमिततेबाबत तसेच जास्तीचा झालेला खर्च रक्कम रू.३,१३,००८/- याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.३ : वॉर्ड क्र.२ मयुरपार्क येथे उर्जाबचत दिवे लावणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४,९७,०००/-) (खर्च रक्कम रू.४,०६,३२६/-)**

मयूरपार्क येथे उर्जा बचत दिवे लावणे बाबत अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,९७,०००/- प्रस्ताव सादर करण्यात आला असून खर्चाचा प्रस्ताव सन २०१२-१३ वर्षातील नविन पथदिवे बसविणे पोल सहीत या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित आहे. कामाची निविदा सूचना प्रसिध्दी वर्तमानपत्रात देण्यात आली. त्यानुसार दिनांक १९.१.२०१३ रोजी निविदा उघडण्यात आली असता एकूण तीन निविदा विक्री होवून दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत.

त्यापैकी S P.Electrical & Enterprises यांची निविदा १% above जास्त दराची असून दुसरी निविदा Rahul Electricals यांची असून ती तांत्रिक कारणामुळे रद्य करण्यात आली आहे. एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे पुन्हा फेर निविदा दिनांक ६.३.२०१३ रोजी काढण्यात येवून त्यामध्ये तीन निविदा विक्री झाल्या असून तीन निविदा प्राप्त झाल्या आहे. त्यामध्ये Seemani Electrical and Engineering यांची निविदा सर्वात कमी दर १८.१८% below असून त्यास मंजूरी देण्यात आली आहे. कामाचा आदेश No AMC/Light/०३, दिनांक २.५.२०१३ अन्वये देण्यात आला असून कालावधी २ महिने देण्यात आला आहे.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहे.

१. मे.सिमानी इलेक्ट्रीकल यांची निविदा (१८.१८%) below कमी दराची असतांना अतिरिक्त सुरक्षा रक्कम ५% निविदा नियम ५४ (२) नुसार घेणे आवश्यक असतांना अतिरिक्त सुरक्षा रक्कम भरणा करणे बाबत पत्र दिलेले नाही. रक्कम रू.२४,८५०/- अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा न केल्यामुळे निविदा अटी शर्तीचा भंग झालेला आहे. अतिरिक्त सुरक्षा ठेव कामाच्या performance करीता असते याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करणे योग्य.

2. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४०२४ (१०३-१०४) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

3. नविन साहित्य खरेदीची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

परिच्छेद क्र.०४ : **सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वॉर्ड क्र.४२ येथे विविध ठिकाणी जी.आय.पोल लावणे बाबत.(अं.प.रक्कम रू. १,९९,९२२/-) (खर्च रक्कम रू.१,९९,४२२/-)**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.४२ येथे विविध ठिकाणी जी.आय.पोल लावणे बाबतचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. ३ निविदा विक्री होवून निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची ०.२५% Below निविदा मे.फेअरडील इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर आणि इंजिनियर्स यांची होती. एजन्सीने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर संबंधित एजन्सीस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत/०८ / २०१३, दिनांक १०.६.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशात कामाची मुदत २ महिने ठेवण्यात आली. काम विहित मुदतीत पूर्ण झालेले आहे. संचिकेच्या सविस्तर तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतरच्या कालावधीचा असल्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

2. साहित्याची नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये नोंदविलेली नाही. तथापि स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून दिलेले नाही.

3. ॲटम क्र.५ ची संख्या १६ दर्शविली. प्रत्यक्षात पोलची संख्या १५ आहे. १ फिटींग साठी रू.५३१७/- खर्च जास्तीचा अदा केला आहे. वसूलीस पात्र.

4. ॲटम क्र.६ नुसार quantity ६४ दर्शविली. पोल १५ प्रमाणे quantity ६० असावयास पाहिजे. जास्तीच्या ४ lamp वर रू.१८० प्रमाणे रू.७२०/- जास्तीचा खर्च अदा केला आहे जो की वसूलीस पात्र आहे.

विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करुन तसेच जास्तीचा झालेला खर्च रक्कम रू. मुद्या क्र.३ प्रमाणे ५३१७/- आणि मुद्या क्र. ४ प्रमाणे रक्कम रू. ७२०/- असा एकूण रुपये ६०३७/- संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.०५ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.४२ मक्सूद कॉलनी येथे उर्जा बचत दिवे लावणेबाबत.(अं.प.रक्कम रू.१,९९,९५०/-) (खर्च रक्कम रू.१,९९,०५६/-)**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.४२ मक्सूद कॉलनी येथे उर्जा बचत दिवे लावण्याचे कामा करीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा फेअरडील इलेक्ट्रीकल यांची ०.४५% Below दराची प्राप्त झाली. एजन्सीने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्यूत/७ / २०१३, दिनांक १०.६.२०१३ अन्वये कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आले. काम मुदतीत पूर्ण झालेले आहे. संचिकेच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेच परिच्छेद क्र.(४) प्रमाणे जूने ट्यूब फिक्चर काढून त्याऐवजी उर्जा बचतीचे दिवे लावणेच्या काम प्रस्तावित आहे असे असतांना सदरील खर्च नविन पथदिवे लावणे या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित करण्याचे प्रयोजन काय होते ही बाब स्पष्ट होत नाही.
2. जून साहित्य कार्यालयाचे भांडारात जमा केल्याबाबत संचिकेत नोंद नाही तसेच त्याची नोंद असलेली नोंदवही सुध्दा लेखा परीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेली नाही.
3. नविन साहित्याच्या नोंदीचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध झालेले नाही.
4. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतर उतरविल्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल झालेला नाही.
5. दिवे बदलण्याचे काम देखभाल दुरुस्ती करणा-या एजन्सी मार्फत करणे अभिप्रेत आहे. त्या एजन्सी कडून काम का करण्यात आले नाही याबाबत खुलासा व्हावा. नसता सदरील कामी झालेला खर्च रू.१,९९,०५६/- अमान्य का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा करण्यात यावा.

विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत मुद्या क्र.५ प्रमाणे झालेला खर्च रक्कम रू. १,९९,०५६/- याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.०६ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.५५ मध्ये विद्युत देखभाल व दुरुस्तीच्या कामाबाबत. (अं.प.रक्कम रू.४,९९,१३४/-) (खर्च रक्कम रू.४,७१,९२९/-)**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.५५ मध्ये विद्युत देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत कामे करण्यासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ४ निविदांची विक्री झाली आणि ४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.रोहीत इलेक्ट्रीकल यांची आहे. निविदा दर ४.९९% Below असे आहेत. निविदा धारकाने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयाने संबंधित एजन्सीस कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत/४/२०१३, दिनांक १३.५.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. काम मुदतीत पूर्ण झालेले आहे. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. प्रस्तावित काम संचिकेतील सादरीकरणा प्रमाणे परिच्छेद (८) नुसार नविन पोल लावणे या लेखाशिर्षातून प्रस्तावित आहे. परंतू लेखा शाखेने सदरील कामाचे अंदाजपत्रक मंजूर करतांना परिच्छेद (१०) प्रमाणे विद्युत देखभाल / दुरूस्ती या लेखा शिर्षाअंतर्गत नोदं घेवून कामास लेखाशाखेची सहमती दर्शविली.

2. औरंगाबाद मनपा क्षेत्रात देखभाल दुरूस्तीचे काम compressive tender अंतर्गत केल्या जाते. हे काम त्या अंतर्गत होत नाही का ? असे मत शहर अभियंता यांनी परिच्छेद (१६) मध्ये नोंदविले. परंतू विभागाने खुलासा न करताच त्यावर शहर अभियंता यांनीच परिच्छेद (१७) प्रमाणे वार्षिक देखभाल दुरूस्ती पेक्षा वेगळ्या स्वरूपाचे काम आहे असे दर्शवून निविदा दर मान्य केले. झालेले काम हे देखभाल दुरूस्तीचेच आहे व त्याच लेखाशिर्षांतर्गत मंजूर झालेले असतांना परिच्छेद (१६) व (१५) मधील टिपणी परस्पर भिन्न आहे.

3. संचिकेतील परिच्छेद (२६) नुसार जूने फिक्चर कार्यालयात जमा केलेले आहेत असे नमूद आहे. परंतू त्याची नोंदवही लेखापरीक्षणा दरम्यान तपासावयास मिळाली नाही.

4. कंत्राटी कामाचा विमा हा काम पूर्ण झाल्यानंतर उतरविलेला आहे. त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

5. मोजमाप पुस्तिका क्र.२९०९ लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करुन दिलेले नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

6. वॉर्ड क्र.५५ मध्ये कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल व दुरूस्तीचे काम दिलेली आहेत काय ? तसेच BOT च्या कामामध्ये संबंधित वॉर्डाचा भाग येतो काय ? दोन्ही निविदात कामे समाविष्ठ असल्यास सदरील वॉर्डात झालेला खर्च रू.४,७१,९२९ /- अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा व्हावा.

विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत मुद्या क्र.६ प्रमाणे झालेला खर्च रक्कम रु. ४,७१,९२९/- बाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.०७ : सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सिडको स्मशान भूमी एन-६ ते आझाद चौक रस्त्यावरील विद्यूत दुरुस्तीबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.१,००,०००/-)(खर्च रक्कम रू.१,००,०००/- )**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात सिडको स्मशान भूमी एन-६ ते आझाद चौक रस्त्यावरील विद्यूत दुरुस्तीबाबत ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. २ निविदा विक्री होवून निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत एकच निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा मे.स्टरलिंग इलेक्ट्रीकल वर्क्स यांची असून अंदाजपत्रकीय दराची आहे. एजन्सीने मनपा सोबत करारनामा झाल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत/९२२/२०१३, दिनांक २६.३.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. कार्यादेशात काम किती दिवसात पूर्ण करावे याचा कालावधी नमूद नाही. त्यामुळे कामाची आवश्यकता होती का याचा बोध होत नाही.

2. देयकात ॲटम क्र.३ चे प्रमाणक २० मीटर दर्शविले  व दर रू.१७५/- प्रती मीटर प्रमाणे रू.३५०० ऐवजी रू.३५,०००/- रक्कम अदा केली. रू.३१५००/- जादा रक्कम अदा केलेली असून सदरील रक्कम संबंधितांकडून वसूल करणे आवश्यक आहे. यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे.

3. देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी वार्षिक कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल दुरूस्तीची कामे करणे करीता कार्यादेश दिलेले असतांनाही उपरोक्त प्रमाणे खर्च होणे ही बाब नियमबाह्य असून झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा व्हावा.

4. साहित्याची नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये घेतलेली नाही. तसेच जून्या साहित्याची नोंद सुध्दा घेतल्याचे अभिलेखे लेखापरीक्षण पथकास प्राप्त झालेले नाहीत.

5. मोजमाप पुस्तिका क्र. ४२४४ लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेल्या नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

6. प्रशासकीय कामाकाजचे सुसूत्रीकरणासाठी उपअभियंता निहाय कामे विभागांना दिलेली आहे व त्यानुसार मान्यता प्रदान करणे अपेक्षित आहे. उक्त प्रकरणात ज्या भागाचे काम आहे त्याच भागाच्या सक्षम प्राधिकरणाने मान्यता प्रदान करणे ऐवजी इतर अधिका-याने मान्यता प्रदान करणे ही बाब नियमबाह्य आहे.

विभागाकडून  लेखापरीक्षण  अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत, मुद्या क्र.२ प्रमाणे जास्तीचा झालेला खर्च रक्कम रू. ३१,५००/- वसूलीअंती,संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून  प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.०८ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.१६ अंतर्गत विद्युत व्यवस्था करणेबाबत. (अं.प.रक्कम रू.४,९७,३८५/-) (खर्च रक्कम रू.४,९४,१४२/-)**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.१६, मध्ये विद्युत व्यवस्था करणे बाबत या लेखाशिर्षा अंतर्गत कामे करण्यासाठी  खर्चाचा प्रस्ताव सन २०१२-१३ नविन पथदिवे बसविणे पोलसहीत या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित असून या कामासाठी ई- निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.सिमानी इलेक्ट्रीकल ॲण्ड इंजिनियरींग यांची होती. निविदा दर ०.२५% below असे आहे. निविदाधारकाने मनपा सोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयाने संबंधित एजन्सीस कार्यालयीन पत्र /मनपा/विद्युत ब/क/५३/२०१२, दिनांक १८.१.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आला. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१ . मे.सिमानी  इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजिनियरींग यांचे काम करण्यासंबंधी प्रमाणपत्र  संचिकेत दिसून आलेले नाही.

२. वॉर्ड अंतर्गत केलेल्या विद्युत व्यवस्थेचा स्थळ दर्शक नकाशा संचिकेत दिसून आलेला नाही.

3. काम केलेल्या स्थळांची यादी संचिकेत नाही.

4. नविन साहित्य व जुने साहित्याबाबतचे स्टॉक रजिस्टर, वितरण रजिस्टर, ताळेबंद रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

५. मोजमाप पुस्तिका क्रमांक २९०८ (१४२-१४३) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

६. शेड्यूल्ड बी ॲटम ७ वरील खर्च ७५X५३१७ प्रमाणे ३,९८,७७५/- खर्च देखभाल व दुरूस्ती करणा-या एजन्सी कडून करणे अभिप्रेत आहे. तसेच ॲटम ८ वरील खर्च रू.३००X१८० प्रमाणे ५४०००/- देखभाल दुरूस्ती करणा-या एजन्सीनेच करणे आवश्यक आहे. तसे न झाल्याने मनपाचे रू.४,५२,७७५/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा व्हावा.

विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत, मुद्या क्र.२ प्रमाणे जास्तीचा झालेला खर्च रक्कम रू. ४,५२,७७५/- बाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.०९ : सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.४४ किराडपुरा येथे लाईट व्यवस्था करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.९,९९,८३५/-)(खर्च रक्कम रू. ९,८९,८३७/-)**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.४४, किराडपुरा येथे लाईट व्यवस्था करणेबाबत या लेखाशिर्षा अंतर्गत कामे करण्यासाठी ई- निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा मे.स्टर्लिंग इलेक्ट्रीकल वर्क्स यांची होती. निविदा दर १% below असे आहे. निविदा धारकाने मनपासोबत करारनामा केल्यानंतर कार्यालयाने संबंधित एजन्सीस कार्यालयीन पत्र मनपा/विद्युत/४५/२०१२, दिनांक २६.१२.२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आला. संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. कार्यादेशात कामाची मुदत नमूद केलेली नाही.

2. शेड्यूल बी मध्ये अ.क्र.१ मध्ये संख्या ४८ नमूद आहे. अ.क्र.४ अन्वये ४५ संख्या नमूद आहे. प्रत्यक्षात किती पोल बसविले याबाबत साशंकता आहे. पोल बसविण्यासाठी खोदकामाचे प्रमाणक ४५ असल्याने ३ पोल खरेदी साठी झालेला खर्च रू.११९७६/- निष्फळ टरतो. वसूलीस पात्र.

3. जुने व नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर विभागात उपलब्ध नाही.

4. शेड्यूल्ड बी ॲटम क्र.६ मधील नविन पोल वरील फीटींग वगळता उर्वरीत खर्च ६०X५३१७ प्रमाणे रू.३,१९,०२०/- खर्च देखभाल व दुरुस्ती करणा-या एजन्सीकडून करणे अभिप्रेत आहे.

5. ॲटम क्र.२ ची संख्या ७५ आहे. पोल ४५ बसविले. ४५ पोलवर ४५ ब्रॅकेटची संख्या वजा जाता ३० ब्रॅकेट वरील रू.४८४/- दराने १४५२०/- झालेला खर्च अयोग्य आहे.

6. ॲटम क्र.३ प्रमाणे ४ street light bkt ६ set वरील खर्च रू.१२९८४/- अयोग्य असून वसूलीस पात्र.

7. ॲटम क्र.७ मधील प्रमाणक ४२० आहे. पोलवरील फीटींग लक्षात घेता १८० असणे आवश्यक होते. २४० प्रमाणकावर झालेला खर्च रू.१८०X२४० एकूण रू.४३२००/- अमान्य करण्यात का येवू नये याचा खुलासा व्हावा.

विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत, मुद्या क्र.२ प्रमाणे जास्तीचा झालेला खर्च रक्कम रु. ११,९७६/-, मुद्या क्र.५ प्रमाणे १४,५२०/- आणि मुद्या क्र.६ प्रमाणे १२,९८४/- असे एकूण ३९,४८०/- च्या वसूलीअंती तसेच मुद्या क्र.४ अन्वये ३,१९,०२०/- व मुद्या क्र.७ अन्वये ४३,२००/- बाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१० : आझाद चौक ते पोलिस मेस रस्त्यावरील विद्युत दुरूस्ती बाबत.**
**(अं.प.रक्कम रु.१,००,०००/-) (खर्च रक्कम रु.९९,८०२/-)**

आझाद चौक ते पोलिस मेस रस्त्यावरील विद्युत दुरूस्ती बाबत अं.प.रक्कम १०००००/- ची निविदा काढण्यात आली असून सदरील खर्चाचा प्रस्ताव सन २०१२-१३ वर्षातील विद्युत देखभाल व दुरूस्ती शहर व उद्याने या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित केली असून या कामाच्या दोन निविदा विक्री झाल्या असून दिनांक १२/०३/२०१३ रोजी निविदा उघडली असता १ निविदा प्राप्त झाली आहे. त्यात sterling Electrical work यांची निविदा असून निविदा दराने निविदा प्राप्त झाली आहे. कार्यालयीन पत्र क्र.amc/light/९२१, दि.२६.३.२०१३ अन्वये कामाचे आदेश देण्यात आले आहे.

संचिका तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. विद्युत विभागामार्फत उक्त दर्शविलेले दुरुस्तीचे काम हे खाजगी गुत्तेदाराकडून करण्यात आले आहे ही बाब आक्षेपार्ह असून आपल्या विभागातील कामे वार्षिक कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने करणे आवश्यक असतांना तसे केल्याचे दिसून येत नाही. तरी झालेला खर्च अमान्य करण्यात का येवू नये याचा खुलासा व्हावा.

2. देयकावरील अ.क्र.३ S&E PVC amored cable ४x१० ३९mm ३६४m व अंदाजपत्रकात २०० m दर्शविलेले आहे. म्हणजेच निविदा नियम ३८ अन्वये २५% पर्यंत वाढ होणे अनुज्ञेय आहे. प्रत्यक्षात ८२% वाढ झालेली आहे. त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता प्रदान नाही. त्यामुळे जास्तीचा खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा व्हावा.

3. देयकातील अ.क्र.४ making trench २६०m दर्शविले आहे. (schedule B) मध्ये quantity १५०m दाखविले असतांना निविदा नियमानुसार ७३% वाढ दर्शविली आहे. म्हणजेच अतिरिक्त झालेला खर्च सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसल्याने अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा व्हावा.

4. संचिका मंजूर करतांना व देयक पारीत करतांना ज्या अधिका-यांच्या कार्यक्षेत्रात भाग आहे व तेथील कामे करण्यास अधिका-यास जे अधिकार प्रदान केलेले आहे त्याऐवजी इतर अधिका-याने खर्चास मान्यता प्रदान केल्यामुळे झालेला खर्च रक्कम रु.१,००,०००/- अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा व्हावा.

5. मोजमाप पुस्तिका क्र.४२४४ (५.६) लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत, व जास्तीच्या झालेल्या खर्चाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.११ : वॉर्ड क्रमांक २२ नारेगांव येथे उर्ज बचत दिवे लावणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२,९८,७९२/-) (खर्च रक्कम रू.२,१८,११८/-)**

वॉर्ड क्रमांक २२ नारेगांव येथे उर्जा बचत दिवे लावणेसाठी अंदाजपत्रक रक्कम रूपये २,९८,७९२/- चे तयार करण्यात आले असून खर्चाचा प्रस्ताव सन २०११-१२ वर्षातील नविन पथदिवे बसविणे व पोलसहीत या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित केला आहे. मा.सर्वसाधारण समिती ठराव क्रमांक २२८ दिनांक १७.२.२०११ नुसार रू.३.०० लक्ष वळती करण्यात आले असून वॉर्ड क्रमांक २२ विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणेसाठी अर्थसंकल्पात पान क्र.GBK - B-९ भांडवली कामे या शिर्षकाखाली रू.६०.०० लक्ष तरतूद ठेवण्यात आलेली होती. त्या रकमेमधून सुधारित विकास कामासाठी रक्कम वळती करण्यात आलेली आहे. सदरील कामासाठी १ निविदा विक्री झाली असून दिनांक ३.२.२०१२ रोजी निविदा उघडल्या असता १ निविदा प्राप्त झाली असून m/s osama Electricals aurangabad यांची निविदा असून २७% below कमी दराने आहे. मे.ओसामा इलेक्ट्रीकल यांना काम करण्यासाठी amc/light/१९/२०१२, दिनांक २३.७.२०१२ रोजी कार्यादेश देण्यात आला असून संचिका पाहणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिका पान क्रमांक एनएस/६ परिच्छेद २७ मध्ये ५% अतिरिक्त सुरक्षा रक्कम देयकातून वजावट करण्यास विनंती अर्ज केला आहे असे नमूद असतांना अतिरिक्त सुरक्षा रक्कम वजावट केलेली नाही. निविदा नियम ५४ (२) नुसार रक्कम प्रथम भरणा करणे आवश्यक होते. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव कामाचे performance साठी असते ही बाब विभागाने लक्षात घेतलेली नाही. रक्कम रू.१४९४०/- चे आर्थिक नुकसान व त्यावरील व्याजाचे नुकसानीबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

२. काम पूर्ण झालेले प्रमाणपत्र हे दुस-याच कामाचे लावण्यात आले असून ह्या कामाबातचे काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिसून आलेले नाही. त्यामुळे काम केले की नाही याबाबत साशंकता आहे.

३. कामाचा आदेश amc/light/१९/२०१२, दिनांक २३.७.२०१२ रोजी देण्यात आले असून कामाचा विमा दिनांक २९.३.२०१३/ ते २८.०६.२०१३ या कालावधीचा काढण्यात आला आहे. म्हणजेच कामाच्या कालावधीत काढलेला नाही. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

४. इलेक्ट्रीक ठेकेदाराचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आलेले नाही.

५. मोजमाप पुस्तिका ४१५४ (५-६) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

६. सदरील काम वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणा-या एजन्सीने करणे आवश्यक होते. लेखा शाखेने कामाचे अंदाजपत्रकास मान्यता देतांना देखभाल दुरूस्तीचे कामाऐवजी नविन पथदिवे बसविणे पोलसहीत असे लेखाशिर्ष नमूद केले जे की अयोग्य आहे. वार्षिक देखभालीचे काम असल्याने झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याचा खुलासा करावा असे सूचित केले असता विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही.

उक्त अनियमिततेबाबत, व जास्तीच्या झालेल्या खर्चाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१२ : वॉर्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर येथे उर्जा बचत दिवे लावणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.६,९९,९९५/-) (खर्च रक्कम रू.६,००,२४६/-)**

वॉर्ड क्रमांक १७ श्रीकृष्णनगर येथे उर्जा बचत दिवे लावणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,९९,९९५/- तयार करण्यात आले असून खर्चाचा प्रस्ताव २०११-१२ वर्षातील नविन पथदिवे बसविणे पोलसहीत या लेखाशिर्षा अंतर्गत असून या कामासाठी तीन निविदा विक्री झाल्या असून एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या आहे.

दिनांक २७.३.२०१२ रोजी निविदा उघडल्या असता सर्वात कमी दराची निविदा मे. ओसामा इलेक्ट्रीकल्स यांची प्राप्त झाली असून १४.२५% below (कमी) दराची आहे.

मे.ओसामा इलेक्ट्रीकल्स यांना कार्यादेश Amc/light/१८/२०१२, दिनांक २३.७.२०१२ रोजी देण्यात आला आहे. कामाचे देयक रक्कम रु.६,००,२४६/- हे दिनांक १०.७.२०१३ रोजी म्हणजेच आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये अदा करण्यात आले आहे.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिका पान क्रमांक Ns/९ परिच्छेद क्रमांक ३० मध्ये कामाची मुदत दिनांक २३.९.२०१२ रोजी संपुष्टात आली असून अद्याप एजन्सीने काम सुरु केलेले नाही. एजन्सीला दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी मंजूरीस्तव सादर असे दिनांक ५.१०.२०१२ रोजी नमूद असतांना काय दंडात्मक कार्यवाही केली किंवा काम कधी केले याचा बोध होत नाही. याबाबत संचिकेत अभिलेखे नाहीत. काम दिनांक २१.३.२०१३ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आहे. विलंबाने काम पूर्ण केल्याबद्यल संबंधितांना दंड आकारावा या बाबत कार्यादेशात दंड नमूद नाही. याबाबत विभागाने खुलासा करावा.

२. स.नगरसेवक यांनी पत्रावर दिनांक न दर्शविता काम समाधानकारक झाल्याचे पत्र दिले आहे. तसेच विभागातील विद्युत लाईनमन यांनी सुध्दा काम समाधानकारक असल्याचे पत्र (c/२७) संचिकेत आहे. परंतू काम केव्हा केले याबाबतचा उल्लेख अथवा दिनांक नाही.

३. नविन व जुने साहित्य प्राप्त झाल्याबाबतचे स्टॉक, वितरण, ताळमेळ रजिस्टर विभागाकडून प्राप्त झालेले नाही.

४. ठेकेदाराचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आलेले नाही.

५. कार्यादेश amc/light/१८, दिनांक २३.७.२०१२ / २३.९.२०१२ या दोन महिन्याचा असतांना विमा कालावधी २९.३.२०१३ / २८.६.२०१३ या कालावधीचा आहे. काम पूर्ण झाल्यानंतर विमा उतरविलेला असल्याने विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

६. मोजमाप पुस्तिका ४१५४ (०८-०९) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

७. सदरील काम उर्जा बचत दिवे बसविणेबाबतचे असून यापूर्वी संबंधित वॉर्डात दिवे बसविलेले होते काय? केवळ दिवे बदलणे हे काम वार्षिक देखभाल दुरूस्ती करणा-या एजन्सीचे आहे. त्यामुळे झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा व्हावा असे सूचितकेले असता विभागाकडून लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही.

उक्त अनियमिततेबाबत, व जास्तीच्या झालेल्या खर्चाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र.१३ : प्रभाग क भाग -१ मधील वॉर्ड क्र .२७,२८ ,२९,४२, ४३,४४, ४५, ४६ येथील पथदिव्याची वार्षिक कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करणे.अं.प. रक्कम रू.२४,९७,९१०/-**

सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील वॉर्ड क्र.२७,२८,२९,४२,४३,४४,४५ , ४६ येथील पथदिव्यांची वार्षिक कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने देखभाल दुरूस्ती करण्यासाठी निविदा पध्दतीने निविदा काढण्यात आल्या असून सन २०१३-१४ मधील MxR Light (Ward-c) या लेखाशिर्षका अंतर्गत काम प्रस्तावित केले असून अं.प.रक्कम रू.२४,९७,९१०/- एवढा खर्च प्रस्तावित केला आहे. या कामासाठी एकूण ४ निविदा विक्री झाल्या. २ निविदा प्राप्त झाल्या, दिनांक २६.४.२०१३ रोजी निविदा उघडण्यात आल्या असता सर्वात कमी दराची निविदा shree Electrical and Refrigeration यांची १४.९९% Below या दराची निविदा असून त्यास मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली असून जा.क्र.मनपा/विद्युत/१४/२०१३, दिनांक ३०.५.२०१३/ २९.३.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामाचा कालावधी दहा महिने एवढा आहे. तद्नंतर सन (२०१४-१५) साठी sept.२०१४ पर्यंत कामास मुदतवाढ देण्यात आली व नंतर ३० जून पर्यंत व मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यास मा.आयुक्त व स्थायी समिती सभा ठराव क्र.१२, दिनांक २७.२.२०१५ मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

१. विभागाने तक्रार रजिस्टर व तक्रार निवारण रजि.ठेवलेले नाही.

२. सदरील कामाप्रमाणे इतरही कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने वार्षिक दर करारावर कामे करणा-या सर्व प्रकरणांबाबत मुदतवाढ देण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

३. कार्यादेशातील अट क्र.२३ प्रमाणे संबंधित एजन्सीने जुने साहित्य भांडार विभागात जमा करणे आवश्यक आहे. तसेच साहित्य जमा केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

४. संचिकेतील प.क्र.१५३ नुसार माहे १००० प्रमाणे ५ महिन्याचे रक्कम रु.५०००/- दंड कपात केला असे नमूद आहे. परंतू मोजमाप पुस्तिका पाहिले असता रक्कम कपात केलेली नाही.

५. जुने साहित्य जमा न केल्यास अट क्र.२३ अन्वये २% रक्कम रु.८९,१३४/- संबंधिताच्या देयकातून वजावट करण्यात येईल असे असतांना रक्कम वजा केलेली नाही.

६. कार्यादेशातील अट क्रमांक १४ अन्वये नेमूण दिलेले भागातील बंद पथदिवे तीन दिवसाच्या आत दुरुस्त न झाल्यास ठेकेदाराच्या प्रति दिवस प्रति पोल १० रु. प्रमाणे दंड असे नमूद आहे. या प्रमाणे दंड आकारणी न होता लमसम दंड काही महिन्यात आकारलेला आहे.

विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत आणि मुद्या क्र.५ नुसार जुने साहित्य जमा न केल्याने रु.८९,१३४/- संबंधितांच्या देयकातून वजावट केलेली नसल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१४ : प्रभाग -क (भाग -२) वॉर्ड क्र.४०,४१,५१,५२,५३,५४,५५,५६ व ५७ येथील पथ दिव्याची कॉम्प्रेसिव्ह वार्षिक पध्दतीने देखभाल व दुरूस्ती करणे बाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.२४,९३,०६०/-**

सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेतील पथदिव्याची देखभाल दुरूस्ती करण्याचे काम वार्षिक कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने करण्यासाठी रू.२४,९३,०६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून खर्च हा सन २०१३-१४ वर्षातील MxR light (ward-c) या लेखाशिर्षाअंतर्गत असून मा.आयुक्त यांनी दिनांक १२.४.२०१३ रोजी खर्चास मंजूरी दिली आहे. या कामासाठी एकूण -४ निविदा विक्री झाल्या. तीन निविदा प्राप्त झाल्या आहे. त्यापैकी Eagle Electricals यांची निविदा १.८२ (Below) कमी दराची असून संबंधिता सोबत वाटाघाटी करून ५% कमी दराने काम करण्यास संमती दिली. त्यास मा.आयुक्त यांची मान्यता झालेली आहे.

संबंधिताने करारनामा सादर केला असून जा.क्र.मनपा/विद्युत-१/२१, दिनांक १४.६.२०१३ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. सदरील कामास टप्प्या-टप्प्याने जून -२०१५ पर्यंत मुदतवाढ.

संचिका तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कार्यादेश अटी व शर्ती क्र.१ नुसार कंत्राटी कामाचा व कंत्राटी कामे पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणा-या कामगारांचा विमा शासकीय विमा निधी किंवा शासकीय निधीच्या अनुमतीने अन्य विमा कंपनीकडे प्रत्यक्षात काम सुरू करणे पूर्वी करणे आवश्यक असतांना शासकीय विमा काढलेला नाही. संबंधिताचे देयकातून कपात न झाल्यामुळे १% प्रमाणे रू.५२३५३/- चे नुकसान केलेले आहे.

२. विभागाने तक्रार रजिस्टर, तक्रार निवारण रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही.

३. अटी व शर्ती १४ दिलेल्या भागातील बंद पथदिवे तीन दिवसात अथवा ७२ तासाचे आत दुरूस्तीचे कार्यवाही न झाल्यास प्रती दिवस रू. १०/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे असतांना या पध्दतीने माहिती घेवून प्रति दंड आकारणी झालेली नाही.

४. अटी व शर्ती क्र.२३ जुने साहित्य विद्युत भांडार विभागात जमा न केल्यास जुन्या साहित्याच्या पोटी (भंगार / scrap) २% रक्कम संबंधित ठेकेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल असे असतांना जुने साहित्य जमा झालेले नाही. २% प्रमाणे रू.१,०४,७०६/- वसूलीस पात्र राहील.

५. विभागाने जुने साहित्य व नविन साहित्याबाबत स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून दिलेले नाही.

६. तिसरे देयक अदा केल्याबाबतची C.C. संचिकेत नाही.

७. मोजमाप पुस्तिका क्रमांक ३०७०,२९१२ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत आणि मुद्या क्र.४ नुसार जुने साहित्य जमा न केल्याने रू.१,०४,७०६/- संबंधितांच्या देयकातून वजावट केलेली नसल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१५ : प्रभाग ब, भाग -२ मधील वॉर्ड क्र.१७,१८,१९,२५,२६,४७,४८,४९ हर्सूल टी पॉईन्ट ते सिडको बसस्टॅण्ड जळगांव रोड पथदिव्यांची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.३५.८८ लक्ष.)**

सन २०१३-१४ या वर्षासाठी प्रभाग - ब भाग -२ मधील पथदिव्यांची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणेचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागण्यिात आल्या. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत ५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ४ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा श्री.इलेक्ट्रीकल ॲन्ड रेफ्रीजरेशन यांची २२.२३% Below दराची होती. एजन्सीला २% सुरक्षा अनामत व ५% अतिरीक्त सुरक्षा अनामत भरणा करणे बाबत व मनपा सोबत करारनामा करणेचे पत्र विभागाने दिले. संबंधित एजन्सीने करारनामा केल्यानंतर व २% सुरक्षा ठेव भरणा केली. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव देयकातून कपात करण्याची विनंती केली. संबंधितांची विनंती कार्यालयाने मान्य करून त्यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/विद्युत-११/१३/२०१३, दिनांक ३०.५.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. कामाचा कालावधी दहा महिने ठेवण्यात आला. तद्नंतर एप्रिल २०१४ पासून जून २०१४ पर्यंत कामास मुदतवाढ देण्यात आली. नविन निविदा प्रक्रीयेस आचारसंहितेमुळे विलंब झाल्याने सप्टेंबर २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. परिच्छेद (१२६) मध्ये सदरील कामास दिनांक ३१.१२.२०१४ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे, असे नमूद आहे. परंतू संचिकेत तशी मुदतवाढ मंजूर झालेली नाही. तद्नंतर विभागाने सदरील कामास दिनांक ३० जून २०१५ पर्यंत मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवला त्यास मा.आयुक्त व मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१२० दिनांक २७.२.२०१५ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. रक्कम रू.५३,८१,४३०/- अंदाजपत्रकीय रकमेतून २२.२३% Below रू.११,९६,२९२ वजा जाता रू.४१,८५,१३८/- रकमेस मुदतवाढ देतांना सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही. संचिकेची सविस्तर तपासणी केली असतांना खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. स्थायी समिती ठराव क्र.१२०, दिनांक २७.२.२०१५ मध्ये सदरील कामास दिनांक ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत दिलेल्या कामास मुदतवाढ दिलेली आहे असे दर्शवून कार्योत्तर मान्यता मा.स्थायी समिती समोर प्रस्तावित केलेली आहे. परंतू संचिकेत सप्टेंबर २०१४ पर्यंतच मुदतवाढ मा.आयुक्त यांनी मंजूर केलेली आहे.

२. कार्यादेशातील अट क्र.२३ प्रमाणे संबंधित एजन्सीने जूने साहित्य भांडार विभागात जमा करणे बंधनकारक आहे. तसे साहित्य जमा केल्याचे अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाहीत.

३. कार्यादेशातील अट क्र.२३ मध्येच असेही नमूद आहे की, जूने साहित्य जमा न केल्यास त्यापोटी २% रक्कम संबंधित ठेकेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल. त्याप्रमाणे २१ महिन्याचे अदा केलेली रक्कम रू.५८,६०,६२७/- चे २% रक्कम रू.१,१७,२१३/- संबंधित गुत्तेदाराकडून वसूलीस पात्र आहे. तसेच पुढील देयके अदा करण्यापूर्वी बदललेले जूने साहित्य संबंधितांनी मनपाकडे जमा न केल्यास देयकातून कपात करणे योग्य राहील.

४. सदरील काम करणा-या एजन्सीने २२.२३% Below दराने निविदा दर नोंदविलेले आहेत. बी-१ निविदा पुस्तीकेतील अटी शर्ती नुसार संबंधित एजन्सीने ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम भरणा केल्याशिवाय कार्यादेश देणे संयुक्तीक नाही. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव ही

संबंधित  कामाच्या performance शी निगडीत असते. विभागाने ठेकेदाराच्या विनंती नुसार देयकातून ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव कपात करणेच्या अटीवर कार्यादेश निर्गमित करुन मनपाचे आर्थिक नुकसान केलेले आहे. तसेच निविदा पुस्तिकेतील अटी शर्तीचा भंग केला आहे.

५. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव देयकातून कपात करण्याच्या विनंती प्रमाणे पहिल्या देयकातून रु.१,३९,५०५/- कपात केलेली नाही. लेखा शाखेनेही अंतर्गत लेखापरीक्षण दरम्यान ही बाब लक्षात घेणे आवश्यक होते. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव कपात न केल्यामुळे मनपाचे झालेले आर्थिक नुकसान व व्याजाचे नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित करणे योग्य राहील.

६. कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल करणा-या एजन्सीच्या देनंदिन अहवालानुसार तक्रार नोंदवही, तक्रार निवारण नोंदीचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

७. कार्यादेशातील अट क्र.१४ प्रमाणे नेमूण दिलेल्या भागातील बंद पथदिवे तीन दिवसात आत दुरुस्त न झाल्यास ठेकेदारास प्रती दिवस प्रती पोल रु.१०/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे नमूद असतांनाही specific दंडाची आकारणी न होता lums unmp दंड काही महिन्याचा आकारलेला आहे. दंड आकारतांना कोणता आधार घेतला याचे अभिलेखे उपलब्ध झालेली नाहीत.

८. संचिकेतील परिच्छेद (१६५)  मध्ये बंद पथदिवे बाबत सरासरी टक्केवारी नमूद केलेली आहे. परिच्छेद (१६९) मध्ये बंद टक्केवारीची नोंद ७.७% ऐवजी २.७%  दर्शवून रु.६७४३/- दंड कपात करण्याबाबत परिच्छेद (१७४) मध्ये प्रस्तावित आहे. आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम बंद दिव्याची कमी टक्केवारी दर्शवून नमूद केलेले आहे. त्यामुळे दंड कमी आकारला असे स्पष्ट होते. तसेच आकारलेला दंड सुध्दा कंत्राटदाराच्या देयकातून वसूल केलेला नाही.

९. कार्यादेशातील अट क्र. १६ प्रमाणे कार्यादेशाच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत ठेकेदाराने स्वखर्चाने त्यांना देण्यात आलेल्या नमुन्यात सर्व पथदिव्याचें सर्वेक्षण करुन त्यानुसार पोल क्रमांक टाकून अहवाल विहीत नमुन्यात सादर करणे बंधनकारक आहे. माहिती दिल्याशिवाय देयक देण्यात येणार नाही असे नमूद आहे. परंतू संचिकेत सर्वेक्षण अहवाल उपलब्ध नाही व देयके अदा करुन कार्यादेशातील अटी शर्तीचा भंग केलेला आहे.

१०. कार्यादेशातील अट क्र.१६ प्रमाणे सर्वेक्षण करण्याचे काम कार्यादेशानंतर करणे चूकीचे आहे. अंदाजपत्रक तयार करणे पूर्वीच सर्वेक्षण करणे आवश्यक होते.  सदरील कामाचे अंदाजपत्रक उपरोक्त बाबी विचारात घेवून तयार केलेले नसल्याने सदोष आहे.

विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत आणि मुद्या क्र.३ नुसार जुने साहित्य जमा न केल्याने रु.१,१७,२१३/-  व मुद्या क्र.८ नुसार ६,७४३/- संबंधितांच्या देयकातून वजावट केलेली नसल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१६ : प्रभाग - ब (भाग -१) मधील वॉर्ड क्र.२, ३,१४,१५,१६,२०,२१, २२,२४(M.I.D.C. चिकलठाणा वगळून) पथदिव्याची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.(अंदाजपत्रकीय रक्कम रू.३१,६३,७२०/-)**

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये विद्युत विभागाचे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत आहे. लेखापरीक्षणा दरम्यान औरंगाबाद महानगरपालिकेत पथदिव्यांची देखभाल दुरूस्ती करण्याचे काम वार्षिक कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने करण्यासाठी सन २०१३-१४ मधील देखभाल दुरूस्ती (पथदिवे) या शिर्षका अंतर्गत अं.प.रक्कम ३१,६३,७२०/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास दिनांक १६.४.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.२०१ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे.

सदरील कामासाठी निविदा काढण्यात आली असून कामासाठी ७ निविदा विक्री झाल्या आहे. त्यापैकी ४ निविदा प्राप्त झाल्या. दिनांक २७.४.२०१३ रोजी निविदा उघडल्या असता प्राप्त झालेल्या निविदांपैकी सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७.८९% कमी दराने मे.आदित्य इलेक्ट्रीकल यांची निविदा प्राप्त झाली आहे.

संचिका पान क्रमांक ११ परिच्छेद क्रमांक ३१ जा.क्र.मनपा/विद्युत -ई व फ /१०, दिनांक २२.५.२०१३ नुसार २% सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा सादर करणेस्तव कळविले आहे. परंतू संबंधिताने अद्याप पूर्तता केली नाही असे संचिकेत नमूद आहे. पान क्रमांक १२ परिच्छेद क्रमांक ३३ नुसार पुन्हा स्मरणपत्र देवूनही पूर्तता केलेली नाही.

तद्‌नंतर IInd lowest ला Ist lowest च्या दरात काम करणे बाबत विचारणा करण्याचे पत्र देण्यात आले असता गुत्तेदार मे.आकाश इलेक्ट्रीकल यांना पत्र जा.क्र./मनपा/विद्युत-१/५८/२०१३, दिनांक २४.६.२०१३ अन्वये सदरचे काम प्रथम निविदाधारकाचे दरानुसार म्हणजेच १७.८९% कमी दराने करण्याबाबत विचारणा केली असता संबंधिताने सदरचे काम करण्याची लेखी संमती दर्शविली आहे. संचिकेत पत्र जोडण्यात आले आहे.

दिनांक २९.६.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.०१ नुसार मे.आकाश इलेक्ट्रीक यांना काम देण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला असून जा.क्र.मनपा/विद्युत -१/४८/२०१३, दिनांक २.७.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामाचा कालावधी नऊ महिने आहे. सदरील कामास टप्याटप्याने मुदतवाढ जून २०१५ पर्यंत दिलेली आहे.

संचिकाची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. ५% अति सुरक्षा अनामत रक्कम रू.१,५८,१८६/- कार्यादेश देण्यापूर्वी तसेच देयकातून कपात केलेली नाही. ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव कामाच्या performance शी निगडीत आहे.

२. कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल करणा-या एजन्सीचे तक्रार रजिस्टर नोंदवही आणि तक्रार निवारण नोंदीचे नोंदवही लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

३. शासनाचे पत्र क्र. G.E.N.-१०९८/१३५/७/प्र.क्र./१६६-९८ नवि -२४ मुंबई दिनांक १.२.१९९९ अन्वये कामाचा विमा काढणे आवश्यक असतांना विमा हा एकच महिन्याचा काढलेला दिसून येतो. (दिनांक २५.३.१४ ते २४.४.२०१४.) संबंधिताला २१ महिन्याचे देयक अदा करण्यात आले असून देयकातून १% विमा रक्कम रू.६६,४३८/- कपात करणे आवश्यक होते. परंतू कपात झालेली नाही. त्यामुळे शासनाचे रक्कम रुपये ६६४३८/- चे नुकसान झाले आहे.

४. कार्यादेश अटी शर्ती क्रमांक १४,१ नेमून दिलेल्या भागातील बंद पथदिवे तीन दिवसाच्या आत (७२ तास) दुरुस्त न झाल्यास ठेकेदारास प्रती दिवस प्रती पोल रु.१०% प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे असतांना दंडात्मक आकारणी झालेली दिसत नाही.

५. अटी शर्ती क्रमांक १६ नुसार पथदिव्याचे सर्वेक्षण करुन त्यानुसार पोल क्रमांक टाकून अहवाल विहीत नमुन्यात स्वखर्चाने कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर करावा असे असतांना असा अहवाल कोणत्याही संचिकेत दिसून आलेला नाही अशी अट टाकून कार्यालयाची दिशाभूल करण्यात आली असून बनवलेले अंदाजपत्रक हे चूकीचे आहे. त्यामुळे झालेला खर्च योग्य आहे का नाही याबाबत साशंकता निर्माण होते.

६. अटी व शर्ती क्रमांक २३ जुने साहित्य विद्युत भांडार विभागात जमा न केल्यास जुन्या साहित्याच्या पोटी (भंगार / scrap) २% रक्कम १,३२,८७६/- वसूलीस पात्र आहे.

७. जुन्या व नविन साहित्याचे नोंद असलेले स्टॉक रजिस्टर विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाही.

८. लेखा शाखेचे सहावे व सातवे दरम्यानच्या देयकास मोजमाप पुस्तिकेत स्वतंत्र pay order मंजूर केली. परंतू संचिकेत एकाच ठिकाणी pay order पास केली दोन देयके वेगळे असतांना संचिकेत एकच passing order करण्याचे प्रयोजन काय होते याचा खुलासा व्हावा.

विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत आणि मुद्या क्र.३ प्रमाणे शासनाचे रु.६६,४३८/- तसेच मुद्या क्र.६ नुसार जुने साहित्य जमा न केल्याने रु.१,३२,८७६/- संबंधितांच्या देयकातून वजावट केलेली नसल्याने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करावे. तसेच प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१७ : वॉर्ड क्र.५१, इंदिरानगर, बायजीपुरा येथे बुध्दविहारा जवळ हायमास्ट लावणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४,९९,१५७/-)(खर्च रक्कम रू. ४,७३,५७६/-)**

वॉर्ड क्र.५१, इंदिरानगर, बायजीपुरा येथे बुध्दविहारा जवळ हायमास्ट लावणे बाबतचे कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. तीन निविदांची विक्री होवून ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी ३.१२% Below दराची निविदा मे.एस.पी.इलेक्ट्रीकल ॲन्ड इंटरप्रायजेस यांची होती. संबंधित कंत्राटदारास कार्यालयीन पत्र क्र.४६७/२०१४, दिनांक ४/४/२०१४ अन्वये कार्यादेश निर्गमित केले.कामाची मुदत परिच्छेद (३१) मध्ये नमूद प्रमाणे दिनांक ३/५/२०१४ पर्यंतची होती. सचिकेत काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रावर संबंधित अधिका-याचे साक्षांकन नाही. तसेच काम पूर्ण झाल्याची तारखेची नोंद नाही. सदरील कामाचे देयक दिनांक १९/८/२०१४ रोजी अदायीसाठी प्रस्तावित बाबत परिच्छेद (३०) मध्ये नोंद आहे. संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील काम एक महिन्यात पूर्ण करण्याची मुदत असतांना काम मुदतीत पूर्ण झाले का ? याबाबत काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रात तारीख नमूद नसल्याने त्याबाबत खात्री झाली नाही.

2. सदरील कामाची मोजमाप पुस्तीका क्र.४२७९ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

3. नविन साहित्याची नोंद असलेले stock Register लेखा परीक्षणास विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाही.

4. कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण झाल्यानंतर उतरविला आहे, त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल झालेला नाही.

5. सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना सन २०११-१२ चा वार्षिक दरसूची प्रमाणे केलेले आहे. प्रत्यक्षात सदरील कामासाठी सन २०१३-१४ या वर्षाचे दर उपलब्ध नव्हते का

विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१८ : सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात M & R Light या लेखाशिर्षाअंतर्गत झालेल्या खर्चाबाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्युत दिव्यांची देखभाल करणेकरीता comprehensive पध्दतीने खाजगी कंत्राटदारास कंत्राटे वॉर्ड निहाय देण्यात आलेली आहेत. संबंधित कंत्राटदारास साधारणपणे ८/९ वॉर्डाचे देखभाल करणे करीता कंत्राटे दिलेली आहेत. संबंधित कंत्राटदारांनी त्यांचे भागातील दिवे सुरु ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचा पुरवठा करणे, दिवे बंद असल्यास तात्काळ सुरु करणे इत्यादी बाबींचा निविदेत समावेश आहे. एकंदरीत देखभाल व दुरुस्ती संदर्भाने सर्व कामे संबंधित कंत्राटदारांनी करणे अभिप्रेत आहे. संबंधित कंत्राटदारांनी निविदा दर वेगवेगळ्या भागांसाठी वेगवेगळी दर्शविलेली आहे. संबंधितांनी केलेल्या कामाचे कंत्राटदाराने देयके सुध्दा अदा केलेली आहेत.

उक्त लेखाशिर्षा अंतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी नियुक्त कंत्राटदाराच्या व्यतीरीक्त इतरही कंत्राटदारांकरवी देखभाल व दुरुस्तीचे कामे केलेले असल्याचे लेखा शाखेतील प्राप्त अभिलेख्यावरुन स्पष्ट होते. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात comprehensive पध्दतीने कामे केलेल्या कंत्राटदारा व्यतीरीक्त इतर कंत्राटदारांनी केलेल्या कामांची रक्कम खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | वर्ष व वॉर्ड क्रमांक | M & R Light या लेखाशिर्षा अंतर्गत एकूण खर्च रक्कम रू. | Comprehansive पध्दतीने कामे केलेल्या कंत्राटदारांच्या देयकाचा खर्च रक्कम रू. | इतर कंत्राटदारांकरवी देखभाल / दुरुस्तीच्या कामांवर झालेला खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | २०१३-१४ C | ६२,८६,८५५/- | १८,८९,४७९/- | ४३,९७,३७६/- |
| २ | २०१३-१४ B | १,०३,४४,३९५/- | ७४,१८,१४०/- | २९,२६,२५५/- |
| ३ | २०१४-१५ B | ४७,६४,६८६/- | २३,१९,९५०/- | २४,४४,७३६/- |
| ४ | २०१४-१५ C | २३,१८,९६३/- | ४,२४,६९५/- | १८,९४,२६८/- |
| | **एकूण** | **२,३७,१४,८९९/-** | **१,२०,५२,२६४/-** | **१,१६,६२,६३५/-** |

उक्त तक्त्यातील खर्चाचा आढावा घेता सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील एकूण M & R Light लेखा शिर्षातील खर्चापैकी comprehensive पध्दतीने वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या खर्चापेक्षा जास्तीची रक्कम याच लेखाशिर्षा अंतर्गत इतर कंत्राटदारा मार्फत कामे करुन खर्च झालेली आहे. वास्तविक पहाता वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा अंतीम होवून कार्यादेश दिल्यानंतरच त्याच कंत्राटदाराकरवी कामे होणे अभिप्रेत आहे, त्या व्यतीरीक्त इतर कंत्राटदारा मार्फत केलेल्या कामांबाबत, झालेल्या खर्चाबाबत समर्थनीय खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

रु.१,१६,६२,६३५/- या रकमेची कामे इतर कंत्राटदारामार्फत केलेली आहेत या बाबत विभागाने पुनश्च समर्थनीय खुलासा सादर करणे आवश्यक आहे. कॉम्प्रेसिव्ह कंत्राटदाराला दिलेल्या भागात पुन्हा पुन्हा इतर कंत्राटदाराची कामे करणे ही बाब अयोग्य आहे. करिता संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१९ : वॉर्ड क्र. ४३ शरीफ कॉलनी येथे जी.आय.पोल व उर्जा बचत दिवे लावणे.**
**अं.प.रक्कम रू.४,९९,८७०/-(अदा रक्कम रू.४,०७,१४४/-)**

वॉर्ड क्र.४३ अंतर्गत शरीफ कॉलनी येथे जी.आय.पोल व उर्जा बचत दिवे लावणेसाठी अंदाज पत्रकीय रक्कम रु.४,९९,८७०/- चे सन २०११-१२ च्या वार्षिक दरसूची प्रमाणे तयार करण्यात आले आहे.

खर्चाचा प्रस्ताव सन २०१३-१४ वर्षातील पोलसह नविन पथदिवे बसविणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित असून मा.आयुक्त यांनी यास मान्यता दिलेली आहे. कामाचा प्रस्ताव मा.प्रभाग समिती क यांचेकडे सादर करुन निविदा प्रसिध्दी करण्यासाठी देण्यात आली आहे.

दिनांक १/३/२०१४ रोजी निविदा उघडल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या.तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची मे. स्टर्लिंग इलेक्ट्रीकल वर्क्स यांची १८.५५% कमी दराची निविदा असून त्यास मान्यता देण्यात आली आहे. जा.क्र.मनपा/विद्युत-२/०१/२०१४, दिनांक १५/७/२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला असून कामाची मुदत १ महिना आहे.

संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ (२) नुसार ५% सुरक्षा रक्कम २४९९४/- करारनामा करतांना घेणे आवश्यक असतांना देयकातून वजावट करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. ५% सुरक्षा ठेव ही कामाच्या परफॉर्मन्ससाठी असते याबाबत विभागाने दक्षता घेतलेली नाही. त्यामुळे संबंधितावर जबाबदारी निश्चित करणे योग्य राहील.

२. निविदा नियम ५४ अन्वये कामाचा विमा हा कामाच्या कार्यादेशाच्या दिनांकापासून काढणे आवश्यक असतांना कामाचा विमा दिनांक २२/८/२०१४ ते २१/९/२०१४ या कालावधीत काढलेला आहे. म्हणजेच विमा हा काम संपल्यानंतर उतरविल्याने विम्याचा हेतू सफल झालेला नाही.

३. विभागाने नविन / जुने साहित्य बाबतचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन दिलेले नाही.

४. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४३७२/(१३६-१३७) लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही, त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

५. संचिकेतील परिच्छेद क्रमांक २८ नुसार जुने निघालेले साहित्य जमा न केल्यास १% रक्कम रू. ४०७१/- कमी करून बिल सादर करा असे नमूद केले आहे. परंतू देयकात २% रक्कम रू.८१४२/- withheld केलेली आहे. जर जुने साहित्य जमा केले नाही तर रक्कम withheld न करता कपात करणे आवश्यक आहे. Withheld रक्कम संबंधितांना अदा केलेली असल्यास आणि कंत्राटदाराने जुने साहित्य जमा केले नसेल तर रू.८१४२/- संबंधिताकडून वसूलीस पात्र आहे.

६. जुने fitting,bracket जमा केल्याचे दिसून आलेले नाही. विद्युत निरिक्षक, विद्युत निरिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अहवाल संचिकेत नाही.

७. पोलबाबत M.S.E.B. चा तांत्रिक अहवाल संचिकेत नाही.

८. वॉर्डामध्ये काम करतांना एकूण १५ नग GI Pipe लावणे बाबत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्याच प्रमाणात इतर साहित्य , जसे Bracket T.S.street light (४x२४), T.S. Energy Tube घेणे आवश्यक असतांना जास्तीची खरेदी करण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे.

जास्तीचे खरेदी केलेले साहित्य खालील प्रमाणे -

| अ.क्र. | नांव | एकूण खरेदी साहित्य | पाहिजे असलेले साहित्य | जास्तीचे खरेदी साहित्य | दर | जास्तीचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | SXE St.light bracket | ७५ | १५ | ६० | ४८४ | २९,०४०/- |
| ५ | S&E Energy saving fitting T.S.(४x२४०) | ६० | १५ | ४५ | ५३१७ | २,३९,२६५/- |
| ६ | S&E Energy saving lamp T-५ (२४w) | २४० | ६० | १८० | १८० | ३२,४००/- |
| | | | | | एकूण | ३,००,७०५/- |

देयकातील अ.क्र.२,५,६ वर झालेला खर्च रक्कम रू.३,००,७०५/- हा जास्तीचा झालेला असून याबाबत विभागाने खुलासा करावा.

करीता,उक्त मुद्या क.१ ते ८ बाबत सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्यात यावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

उक्त अनियमिततेबाबत व जास्तीच्या झालेल्या खर्चाबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.२० : महावितरण कंपनीचे विद्युत देयकातील थकबाकी रकमामुळे मनपाच्या विज बीलाच्या दायीत्वात वाढ होत असल्याबाबत.**

विद्युत विभागाचे वॉर्ड ब / क अंतर्गत प्राप्त विद्युत देयके तपासणी करण्याकरीता मागविण्यात आली. सन २०१३ मधील एप्रिल महिना व सन २०१४ मधील भरणा केलेल्या महिन्याचे देयक लेखापरीक्षण पथकास विद्युत विभागाने उपलब्ध करुन दिले. विभागास एप्रिल २०१३ प्रमाणे एप्रिल २०१४ चे देयके तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे वारंवार सूचित केले. प्राप्त अभिलेखे तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. विभागा अंतर्गत असलेल्या क्रांतीचौक, मेनपॉवर हाऊस व छावणी या तीन युनिट अंतर्गत असलेल्या मनपाच्या विद्युत मीटरची नोंद व युनिटचे नोंद असलेले रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.

२. अदा केलेली विद्युत देयकांचे मीटर रिडींग योग्य असल्याचे संबंधित नियंत्रण / तपासणी करणा-या अधिकारी / कर्मचा-याचे अहवाल प्राप्त झालेले नाही, त्यामुळे MSEB मार्फत मनपास प्राप्त बीले योग्य आहेत याची खात्री झाली नाही.

३. विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या देयकांची तपासणी अंती असे निदर्शनास आले की, विद्युत देयकाच्या चालू महिन्याचीच रक्कम अदा केलेली आहे. थकबाकीच्या रकमा का अदा केल्या नाहीत याची माहिती विभागाकडून प्राप्त झालेली नाही. MSEB ने थकबाकी रकमा भरणा न करण्याची मुभा दिलेली असल्यास लेखापरीक्षण विभागास त्याप्रमाणे अवगत केलेले नाही.

४. विद्युत विभागाचे खालील युनिटने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्या नुसार विद्युत देयकाची रक्कम, भरणा रक्कम व थकबाकीचा तपशिल इत्यादी विवरण खालील तक्त्यात नमूद आहे. त्यापैकी थकीत रकमेची दिवसेंदिवस वाढ होत असून मनपाच्या विद्युत देयकाच्या दायीत्वात वाढ होत आहे. वाढीव दायीत्वाची कारणे व जबाबदार कर्मचारी यांच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही अपेक्षित आहे.

| अ.क्र. | युनिटचे नांव | देकाचा महिना भरणा केलेला महिना | एकूण रक्कम रू. | भरणा रक्कम रू. | थकीत रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | शहागंज बिल्डींग | मार्च -२०१४<br>जुलै -२०१४ | ४,२१,९४०/- | १,१४,७०२/- | ३,०७,२३८/- |
| २ | शहागंज स्ट्रीट लाईट | मार्च/एप्रिल -१४<br>जुलै -२०१४ | ४०,६१,७२१/- | ७,८०,०९०/- | ३२,८१,६३१/- |
| ३ | सिडको स्ट्रीट लाईट | फेब्रुवारी -१४<br>एप्रिल -२०१४ | ४९,२८,५९०/- | ६,८२,५८६/- | ४२,४६,००४/- |
| | | **एकूण** | **९४,१२,२५१/-** | **१५,७७,३७८/-** | **७८,३४,८७३/-** |

करिता, मुद्या क्र. १ ते ४ बाबत विद्युत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा / शहानिशा करुन लेखापरीक्षण विभागास अनुपाल अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर केलेले नाही. महानगरपालिकेच्या दायित्वात झालेल्या वाढीबाबत जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

# लेखापरीक्षण अहवाल
## विद्युत विभाग (ई / फ)
## सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५

**प्रस्तावना :**

लेखापरीक्षण विभागाच्या वार्षिक कार्यक्रमानुसार विद्युत विभागाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले होते. विद्युत विभागातील कामकाजासंबंधी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधित विभागास लेखापरीक्षण पथकामार्फत अर्धसमास पत्रे देण्यात आली. लेखापरीक्षण विभागातील कर्मचा-यांचे पथक कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मुलेप/२०१५/६०, दिनांक १६.५.२०१५ अन्वये स्थापन करण्यात आले. विद्युत विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्यानुसार निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबींचे परिच्छेद या सोबत सादर करण्यात येत आहे. विद्युत विभागाने उपलब्ध करुन न दिलेल्या अभिलेख्यांचे स्वतंत्र परिच्छेद असून याबाबत गंभीर दखल घेण्याची आवश्यकता आहे.

लेखापरीक्षणा दरम्यान विद्युत विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण १९ परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

**विद्युत विभागात सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या कालावधीत कार्यरत अभियंता, उपअभियंता यांच्या यांच्या कार्यकाळाबाबत.**

| अ.क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | कार्यभार | कार्यकाळ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.सय्यद सिकंदर अली | कार्यकारी अभियंता | विद्युत (बी.ओ.टी.सह पथदिवे वॉर्ड ई / फ ) | दि.१.४.२०१३ ते दिनांक ३.६.२०१४ |
| २ | श्री.आर.एस.बनकर (सेवानिवृत्त) | शाखा अभियंता | प्र.उपअभियंता विद्युत पथदिवे बीओटीसह (ई/फ) | दि.१.४.२०१३ ते दिनांक ३१.३.२०१५ |
| ३ | श्री.पी.आर.बनसोडे (सेवानिवृत्त) | कार्यकारी अभियंता | विभाग प्रमुख (विद्युत) | दि.४.६.२०१४ ते दि.३१.३.२०१५ |

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे :

१. श्री. अनंत सोनटक्के, (पथक प्रमुख )
२. श्री. चंद्रशेखर मराठे, ( कनिष्ठ लिपिक )
३. श्रीमती पंचशिला खरात, ( कनिष्ठ लिपीक )

**परिच्छेद क्र.०१: विद्युत विभागातील अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन देणे बाबत.**

खलील अभिलेखे विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

१. सन २०१३-२०१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील आवक -जावक नोंदवही.

२. विद्युत देयके रजिस्टर.

३. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधील खर्चाच्या संपूर्ण संचिका , मोजमाप पुस्तिकेसह.

४. नॅशनल म्युनिसिपल अकाऊन्ट कोड अन्वये आपल्या विभागाशी संबंधित विविध परिशिष्टानुसार ठेवावयाच्या नोंदवह्या .

५. विद्युत विभागात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचा जॉबचार्ट.

६. विद्युत विभाग वॉर्ड ई व फ अंतर्गत असलेल्या वॉर्डनिहाय विद्युत पोल व त्यावर लावण्यात आलेल्या फिटींग्सची माहिती मिळणे बाबत.

७. औरंगाबाद शहरातील आपल्या कार्यकक्षेत येणा-या सार्वजनिक विहिरी ,बोरवेल यावर बसविण्यात आलेल्या विद्युत मोटारींची माहिती मिळणे बाबत.

८. बी.ओ.टी. व कॉम्प्रेसिव्ह पध्दतीने विद्युत देखभालीची कामे संबंधितांनी वेळेत न केल्यास Risk & cost वर उपलब्ध एजन्सीकडून केलेल्या कामाबाबतचे नोंदवही उपलब्ध करुन देणेबाबत.

९. महानगरपालिकेतील पदाधिकारी व अधिकरी यांच्या दालनात व निवासस्थानी बसविलेल्या वातानुकुलित यंत्राबाबतची माहिती.

१०. विद्युत विभागातील (Scrap) भंगार साहित्याच्या लिलावाबाबतची माहिती.

११. मनपा शाळा, उद्याने येथे नियुक्त चौकीदार यांच्या निवासस्थानाच्या विजबिलाबाबतची माहिती.

**विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करुन न देणे ही बाब गंभीर स्वरुपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याबाबत संबंधितांविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०२ : औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड (ई) भाग-१ मधील पथदिव्याची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे. (वॉर्ड क्र.२३,७४,७५,७६,७७,७८,७९,८०) (अं.प.रक्कम रू.२५,६७,५००/-)(खर्च रक्कम रू.३९,५९,७४४/-)**

विद्युत विभाग - ई भाग -१ मधील पथदिव्याची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणे साठी अंदाज पत्रकीय रक्कम रू.२५,६७,५००/- सन २०१३-१४ या वर्षामधील अर्थसंकल्प तरतूदी मधून खर्च करण्यात येणार आहे.

लेखाशिर्ष MxR लाईट या लेखाशिर्षामधून सदरील खर्च प्रस्तावित आहे. मा.आयुक्त यांनी दिनांक १२.४.२०१३ रोजी मंजूरी दिली आहे. कामाच्या अंदाजपत्रकास दिनांक १६.४.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये विषय क्र.२०१ नुसार मंजूरी प्राप्त झाली आहे.

कामासाठी एकूण १० निविदा विक्री झाल्या असून त्यापैकी ८ निविदा प्राप्त झाल्या आहे. दिनांक २९.४.२०१३ रोजी निविदा उघडल्या असता तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.१२% कमी दराने Baneshwar Electrical and Electronics/ Audyogic sahkari sanstha Ltd.Aurangabad. यांची असून संबंधितास करारनामा सादर करणेस्तव मंजूरी देण्यात आली. जा.क्र.मनपा/विद्युत/१५/२०१३, दिनांक ३०.५.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला. कामाचा कालावधी दहा महिने आहे. कामाचा कालावधी दिनांक २९.३.२०१४ पर्यंतचा होता. परंतू कामाचा कालावधी टप्प्याटप्प्याने वाढवून ३०.६.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ नुसार विमा काढणे आवश्यक असतांना कामाचा कार्यादेश ३०.५.२०१३ / २९.३.२०१४ असा दहा महिन्यांऐवजी विमा हा ५.९.२०१३/४.७.२०१४ या कालावधीचा काढला आहे. व त्यानंतर मुदतवाढ दिलेली असतांना त्या कालावधीचा विमा काढलेला नाही.

२. ५% सुरक्षा अनामत रक्कम देयकातून वजावट केली आहे ही बाब आक्षेपार्ह असून सुरक्षा अनामत ही निविदा नियम ५४ अन्वये ५% अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम कामाच्या performance संदर्भाने असल्याने देयकातून कपात करणे ही बाब नियमबाह्य आहे. ती कार्यादेश देण्यापूर्वी भरणे आवश्यक आहे.

३. कार्यादेशातील अटी व शर्ती २३ नुसार जुने साहित्य विद्युत भांडार विभागात जमा न केल्यास जुन्या साहित्याच्या पोटी (भंगार / scrap) २% रक्कम ७९,१९५/- संबंधित ठेकेदाराच्या देयकातून वसूल केलेली नाही.

४. कार्यादेशातील अटी शर्ती १६ कामाचा आदेश मिळताच पंधरा दिवसाच्या आत ठेकेदाराने स्वखर्चाने त्यांना देण्यात आलेल्या नमुन्यात सर्व पथदिव्यांचे सर्वेक्षण करून त्यानुसार पोल क्रमांक टाकून अहवाल देणे आवश्यक असतांना असा अहवाल दिलेला नाही. कार्यादेशात अशा प्रकारची अट नमूद करणे ही बाब अयोग्य आहे. अंदाजपत्रक तयार करतांना संबंधित भागातील पोलची संख्या कार्यालयाकडे असणे गरजेचे असते.

५.	नेमूण दिलेल्या भागात पथदिवे तीन दिवसाच्या आत दुरुस्त न झाल्यास (७२ तास) ठेकेदारास प्रति दिवस प्रति पोल १० रु. प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे असतांना कोठेही त्या पध्दतीने आकारणी झालेली नाही.

६.	विभागाने तक्रार व तक्रार निवारण रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना असे रजिस्टर विभागाने ठेवलेले नाही.

७.	नविन व जुने साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर उपलब्ध करुन दिलेले नाही.

**उपरोक्त मुद्यांबाबत सविस्तर खुलासा लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्यावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत तसेच मुद्या क्र.३ बाबत जुने साहित्य विद्युत भांडार विभागात जमा न केल्याने त्यांच्या देयकातून रक्कम रू. ७९,१९५/- कपात केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. संबंधितांकडून रक्कम वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०३ : वॉर्ड क्र.६६ मध्ये ओंकारेश्वर मंदिर व मुक्तेश्वर महादेव मंदिर येथे पोल व फिटींग्जचे काम करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४,९९,५००/-)(खर्च रक्कम रू.४,६३,३७४/-)**

वॉर्ड क्र.६६ मध्ये ओंकारेश्वर मंदिर व मुक्तेश्वर महादेव मंदिर येथे पोल व फिटींगचे काम करणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम ४,९९,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. खर्चाचा प्रस्ताव नविन पथदिवे बसविणे पोलसहित या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित असून सर्वसाधारण सभा विषय क्र.४३४ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

कामाची निविदा सूचना ई निविदा विभागामार्फत प्रसिध्दीस देण्यात आली आहे. त्यानुसार एकूण ३ निविदा विक्री झाल्या असून ३ निविदा प्राप्त झाल्या. दिनांक ५.३.२०१४ रोजी निविदा उघडल्या असता तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.५% कमी दराने मे.आर.ई.इलेक्ट्रीकल यांची निविदा आहे. पान क्रमांक एनएस/१३ व ४० अन्वये मा.आयुक्त यांनी ५% कमी दराने मान्य केले आहे. जा.क्र.मनपा/विद्युत/१६४,दिनांक १३.८.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. कामाचा कालावधी दर्शविलेला नाही.

संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. विभागाने जुन्या व नविन साहित्याबाबत स्टॉक रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना स्टॉक रजिस्टर ठेवलेले नाही.

२. स्थळप्रत नकाशा मध्ये दोन ९ setmini hi mast दर्शविले आहे. परंतू काम करतांना जास्तीचे pole दर्शवून खर्च केल्याचे दिसून येते.

३. ९ set MINI HI MAST लावण्यासाठी, (दोन) ९ MTR Pole म्हणजेच यासाठी (दोन) ९X२= १८ Fitings लावण्यात आल्या. अ.क्र.११ अन्वये ६ MTR GI Pole एकूण ८ Pole वर ८ FITINGS लावण्यात आल्या. म्हणजेच एकूण २६ FITINGS दर्शविण्यात आल्या आहे तर बाकी ४ FITINGS कोठे लावण्यात आल्या. त्यावर ४X५३६४= २१४५६ चा खर्च करण्यात आला आहे. या बाबत विभागाने खुलासा सादर करावा.

४. देयकातील अ.क्र.९ S/E street light junction box एकूण २० Nos ५८६ प्रमाणे एकूण ११७२०/- एवढा खर्च करण्यात आला आहे. देयकात एकूण १० पोल असतांना २० junction box कोठे लावण्यात आले याबाबत खुलासा सादर करावा.

५. देयकातील अ.क्र.८ prov- pipe type earing job for s.T.light एकूण २० Nos १५३६ प्रमाणे एकूण ३०७२०/- एवढा खर्च करण्यात आला आहे. देयकात एकूण १० पोल असतांना २० pipe type earting job कोठे लावण्यात आले.

**उपरोक्त मुद्यांबाबत सविस्तर खुलासा लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्यावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उपरोक्त अनियमिततेबाबत व महानगरपालिकेचे झालेल्या जास्तीच्या खर्चासंबंधी जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०४ : मनपाच्या सिडको एन-२ येथील कम्युनिटी हॉल मध्ये विद्युतीकरण करणे, दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम करणे.**
**(अं.प.रक्कम रू.१,०९,०००/-)(खर्च रक्कम रू.९९,९९२/-)**

सन २०१४-१५ मध्ये मनपाचे सिडको एन-२ येथील कम्युनिटी हॉल मध्ये विद्युतीकरण दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम करणेसाठी अं.प.रक्कम १०९०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्या ठिकाणी community Hall, Badmention Hall, Health club मध्ये विद्युतीकरण दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम करावयाचे आहे . कामाचे लेखाशिर्ष M x R Building या शिर्षाअंतर्गत प्रस्तावित केली. या कामासाठी ४निविदा विक्री झाल्या असून ३ निविदा प्राप्त झाल्या.

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.१८% कमी दराने मे.पुजा इलेक्ट्रीकल वर्क्स यांची निविदा आहे. जा.क्र.मनपा/विद्युत/३४३, दिनांक १०.९.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला. संचिका तपासतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ नुसार १% विमा रक्कम रू.१०९०/- वसूल करणे आवश्यक असतांना वसूल केलेली नाही.
२. जुने साहित्य जमा केल्याबाबत संचिकेत नोंद नाही.
३. जुने व नविन साहित्या बाबतचे स्टॉक रजिस्टर विभागाने लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही.
४. जुने साहित्याची२% प्रमाणे रक्कम रुपये २१८०/- वसूलीस पात्र आहे.

**उपरोक्त मुद्यांबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करण्यात यावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र.१ प्रमाणे रू.१०९०/- शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. मुद्या क्र.४ प्रमाणे रू.२१८०/- वसूलपात्र रक्कम असून दोन्ही रकमा संबंधितांकडून वसूल करून महानगरपालिका फंडात भरणा करण्यात यावे. तसेच उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०५ : सन २०१३-१४ या वर्षात मसनतपुर वॉर्ड क्र.२३, चिकलठाणा वॉर्डात विविध ठिकाणी नविन जी.आय.पोल, सोडीयम फीटींग, उर्जा बचत फीटींग ब्रॅकेट, केबलचे काम करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२४,९९,९९५/-)(खर्च रक्कम रू.२१,७१,४८७/-)**

सन २०१३-१४ या वर्षात वॉर्ड क्र.२३ मसनतपुर, चिकलठाणा वॉर्डात विविध ठिकाणी नविन जी.आय.पोल सोडीयम फीटींग, उर्जा बचत फीटींग, ब्रॅकेट, केबलचे काम करणे करीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. दोन निविदा विक्री झाल्या. त्यातून दोन निविदा प्राप्त झाल्या. मे.श्री.इलेक्ट्रीकल्स ॲन्ड रेफ्रीजरेशन यांचे ४.४५% Below चे दर दोन्ही निविदा धारकाच्या तुलनेत कमी आहेत. संबंधित एजन्सीने मनपासोबत करारनामा केल्यानंतर संबंधितांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/काअ/विद्युत/१०२/२०१३, दिनांक २३.८.२०१३ अन्वये कार्यादेश निर्गमित करण्यात आले. कामाची मुदत तीन महिने ठेवण्यात आली. काम मुदतीत पूर्ण होत नसल्याने दिनांक ३१.३.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. कामास दिनांक २६.१२.२०१४ पर्यंत मुदतवाढ मिळावी म्हणून दुस-या व अंतीम देयकात विनंती केलेली आहे. संचिकेच्या तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१. सदरील काम दिनांक २३.८.२०१३ रोजी ३ महिनेत दिनांक २३.११.२०१३ पर्यंत पूर्ण करण्यासाठी कार्यादेश दिलेले आहे. दिनांक ३१.३.२०१४ पर्यंत प्रथम व दरम्यानचे देयक मंजूर करतांना मुदतवाढ दिलेली आहे. तथापि दुस-या व अंतीम देयकाचे अदाईपूर्वी दिनांक २६.१२.२०१४ च्या विभागाने मागितलेल्या मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही. तसेच संबंधित कंत्राटदाराचे विनंती पत्र सुध्दा संचिकेत नाही.

२. दिनांक ७.३.२०१४ रोजी कार्यकारी अभियंता यांनी G.I.pole च्या संख्येत वाढ करण्यात येवू नये. शेड्यूल्ड B मध्ये दर्शविलेली प्रमाणके विचारात घेवूनच काम पूर्ण करण्याचे विभागास निर्देश दिलेले असतांनाही सदरील ॲटमची प्रमाणके वाढलेली आहेत. का.अ.यांनी निर्देशित केल्यानंतरही वाढीव खर्च होतो याबाबत जबाबदारी निश्चित करून खर्चाबाबत खुलासा अपेक्षित आहे.

३. कंत्राटी कामाचा विमा केवळ ३ महिन्याच्या कालावधीचा आहे. सदरील काम जवळपास १६ महिन्याचे कालावधीचे आहे. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

४. दिनांक २६.१२.२०१४ च्या संबंधित शाखा अभियंता यांचे सादरी करणात जूने साहित्य मिळाल्याचे नमूद आहे. परंतू जूने साहित्य प्राप्त झाल्याचे व भांडार विभागात जमा असल्याची नोंद असलेली नोंदवही लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नाही. संचिकेत जोडलेल्या झेरॉक्स प्रतीमध्ये सदरील कामाच्या ठिकाणचे साहित्य प्राप्त झाल्याची नोंद नाही.

५. निविदा पुस्तिकेतील अट क्र.३८ प्रमाणे कामाच्या ॲटम निहाय quantity मध्ये २५% पर्यंत वाढ अपेक्षित आहे. त्यापेक्षा जास्तीची वाढ झाल्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे आवश्यक आहे. खालील ॲटमवर जास्तीचा झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा करण्यात यावा.

| ॲटम क्र. | तपशील | देयकातील प्रमाणक | शेड्यूल्ड B मधील प्रमाणक | फरक प्रमाणक | दर रक्कम रु. | जास्तीचा खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | S/E ६mtr ७५/८० mm GI pole for st.light | १९ | ०५ | १४ | ३९९२ | ५५८८८ |
| १० | Prov.c.c.foundation with excavation for G.I. pole | १९ | ०५ | १४ | १०५० | १४७०० |
| ११ | S/E pvc armoured ४ core १० sq.mm cable | ८९५ | ६५० | २४५ | १७५ | ४२८७५ |
| १४ | s/E st.light junction box with clamps | २० | १० | १० | ५९९ | ५९९० |
| २१ | S/E pole clamps with nut bolt connected comp. | ३१० | ११० | २०० | १७६ | ३५२०० |
| | | | | | **एकूण** | **१,५४,६५३/-** |

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत तसेच मुद्या क्र.५ अन्वये झालेला जास्तीचा खर्च सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेविनाच झालेला असल्याने तो अमान्य का करण्यात येवू नये याबाबत समर्थनीय खुलासा सादर केलेला नाही. याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०६ : सिंधी कॉलनी गुरुद्धारा हायमास्ट व गजानन मंदीर येथील हायमास्टमध्ये केबल व पॅनल बोर्डचे काम करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रु.१,४५,०००/-)(खर्च रक्कम रु.९६,८०६/-)**

सिंधी कॉलनी गुरुद्धारा हायमास्ट व गजानन मंदीर येथील हायमास्टचे केबल व पॅनल बोर्डचे काम करणे करीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ४ निविदा विक्री झ्ााल्या. स्वीकृतीच्या मुदतीत ४ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी मे.सोनु इलेक्ट्रीकल यांची निविदा तांत्रिक दृष्ट्या रद्य करण्यात आली. उर्वरीत ३ निविदा पैकी मे.पुजा इलेक्ट्रीकल्स यांचे दर सर्वात कमी २७.८% Below प्राप्त झाले. संबंधितांना २% सुरक्षा अनामत व ५% अतिरिक्त सुरक्षा अनामत भरणा करणेबाबत कळविले. संबंधित एजन्सीने २% सुरक्षा अनामतचा भरणा कार्यालयाकडे डीमांड ड्राफ्ट द्वारा केला. ५% अतिरिक्त सुरक्षा अनामत देयकातून कपातीचा विनंती अर्ज सादर केला. संबंधितांची विनंती कार्यालयाने मान्य केली. एजन्सीने मनपा सोबत कामाचा करारनामा केल्यानंतर कार्यालयीन पत्र क्र.८२/२०१३, दिनांक १२.७.२०१३ अन्वये कार्यादेश देण्यात आले. सदरील कामास ३१.८.२०१४ पर्यंत मुदतवाढ प्रस्तावित करण्यात आली. दिनांक १३.५.२०१५ रोजी मा.आयुक्त यांनी देयक अदायगीसाठी मंजूरी प्रदान केली. संचिकेत पुढील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहेत.

१ .	सदरील कामाचे निविदा दर स्वीकारणेस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

२.	दिनांक ३१.८.२०१४ पर्यंतच्या विभागाने प्रस्तावित केलेल्या मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाने मान्यता दिलेली नाही. देयक अदायगीसाठीच मान्यता आहे.

३.	५% अतिरिक्त सुरक्षा ठेव कार्यादेश देण्यापूर्वी स्वीकारावयास पाहिजे. अतिरिक्त सुरक्षा ठेव कामाचे performance शी निगडीत आहे. परंतू विभागाने सदरील ठेवीची रक्कम देयकातून कपात केली. त्यामुळे ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव स्वीकारण्याचा हेतू सफल झालेला नाही.

४.	जुने व नविन साहित्याची नोंद असलेले स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०७ : वॉर्ड क्र.८८ अंतर्गत विश्वभारती कॉलनी, सेनानगर येथे विद्युत व्यवस्था करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४,९९,९९१/-) (३,३५,८९४/-)**

वॉर्ड क्र.८८ अंतर्गत विश्वभारती कॉलनी सेनानगर येथे विद्युत व्यवस्था करणेचे कामाकरीता ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या होत्या. ५ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या तारखेपर्यंत ५ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची ३२.८२% Below निविदा मे.इगल इलेक्ट्रीकल्स यांची होती. एजन्सीला २% व १०% सुरक्षा ठेव भरणा करणे आणि करारनामा करणेस्तव ५.२.२०१४ रोजी कार्यालयाने पत्र दिले. संबंधित कंत्राटदाराने २% अनामत भरणा केली व मनपा सोबत कामाचा करार केला. तसेच १०% अति.सुरक्षा ठेव देयकातून कपातीची विनंती केली. कार्यालयाने त्यांची विनंती मान्य करून पत्र क्र.५१४/२०१४ दिनांक २६.२.२०१४ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. कामाची मुदत २ महिने होती. सदरील काम दिनांक ३०.३.२०१४ रोजी पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत आहे. संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या.

१.	कंत्राटी कामाचा विमा काम पूर्ण होण्याच्या ९ दिवस अगोदर उतरविला. त्यामुळे विमा काढण्याचा हेतू सफल झाला नाही.

२.	१०% अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम कामाच्या performance शी निगडीत असते. कंत्राटदाराच्या विनंती वरून सदरील रक्कम देयकातून कपात केल्यामुळे निविदा नियमांचा भंग झाला आहे.

३.	देयकाची एकूण रक्कम रू.४,९९,४५१/- येते. प्रत्यक्षात रू.४,९९,९९१/- अदा करून रू.५४०/- जास्त अदा केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. जादा अदा रक्कम संबंधिताकडून वसूलीस पात्र आहे.

४. ॲटम क्र.९ व १० प्रमाणके ही शेड्यूल्ड B मध्ये सुध्दा जास्तीची दर्शविली आहे. २४ GI pipe उभारणी, २४ Bkt असतांना २५ फीटींग लावल्याचे दर्शविले. एक फीटींग वरील रू.५३१७/- आणि ४ Energy saving fitting lamp वरील खर्च रू.७२०/- असे एकूण रू.६०३७/- बाबत विभागाने खुलासा करावा नसता सदरील खर्च अमान्य करण्यात येईल.

५. नविन साहित्याचे stock Register लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करुन दिलेले नाही.

**करीता उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. मुद्या क्र.३ प्रमाणे रू.५४०/- जास्तीची अदा रक्कम व मुद्या क्र.४ अन्वये रू.६०३७/- असा एकूण रू.६५७७/- जास्तीचा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात यावा तसेच उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०८ : वॉर्ड क्र.६६ चेतक घोडा चौकात मीनी हायमास्ट (उर्जाबचत फिटींग लावणे व वॉर्डात विविध ठिकाणी जी.आय.पोल लावणे बाबत.)**
**(अं.प.रक्कम रू.३,००,०००/-)(खर्च रक्कम रू. २,८१,१२५/-)**

सन २०१४-१५ या वर्षात वॉर्ड क्र.६६ येथे चेतक घोडा चौकात मीनी हायमास्ट उर्जाबचत फिटींग लावणे व वॉर्डात विविध ठिकाणी जी.आय.पोलचे कामे करणे करीता ई - निविदा विभागामार्फत निविदा मागविल्या. ३ निविदा विक्री झाल्या. निविदा स्वीकृतीच्या दिनांकापर्यंत ३ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेमध्ये सर्वात कमी २% Below दराची निविदा मे.श्री.इलेक्ट्रीकल ॲन्ड रेफ्रीजरेशन यांची आहे. निविदेतील दर मान्य झाले. निविदा धारकाने २% अनामत रक्कम व करारनामा मनपा सोबत केला. कार्यालयाने पत्र क्र.१६५/२०१४, दिनांक १३.८.२०१४ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. काम दिनांक ३१.१२.२०१४ रोजी पूर्ण झाले.

संचिकेची तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. कार्यादेशात कामाची मुदत नमूद नाही. काम मुदतीत होत नसल्याने मुदतवाढ प्रस्तावित आहे. प्रथम व अंतीम देयकात मुदतवाढीची विभागाने मागणी केली.

२. प्रस्तावित मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाने मान्यता दिलेली नाही.

३. मुदतवाढीसह मान्यता प्राप्त न होताच देयक अदा करण्यात आले.

४. नविन व जुने साहित्याचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

५. मोजमाप पुस्तीका क्र.४२८३ लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

६. २% अनामत रकमेचा F.D.R. क्र.०४२३८८, दिनांक १३.८.२०१५ मनपा फंडात जमा केल्याचे नोंद संचिकेत नाही. F.D.R. ची तारीख १३.८.२०१५ दर्शविली. कार्यादेश दिनांक १३.८.२०१४ रोजी निर्गमित झाले ही बाब शंकास्पद वाटते.

७. सदरील कामाची नोंद पी.टी.वर्क्स नोंदवहीत घेतलेली नाही.

**करीता उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०९ : वॉर्ड क्र.७३, एस.टी.कॉलनी वॉर्डातील उद्यान व पाणीपुरवठा करीता गार्डन फीटींग पॅनलचे कामे करणेबाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२,४४,१४५/-) (खर्च रक्कम रू.१,८७,४७७/-)**

वॉर्ड क्र.७३, एस.टी.कॉलनी वॉर्डातील उद्यान व पाणी पुरवठा करीता गार्डन फीटींग पॅनलचे कामे करण्याकरीता ई निविदा विभागातर्फे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील कामाच्या ६ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत ६ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची २३.४५% Below निविदा मे.आकाश इलेक्ट्रीकल्स यांची होती. संबंधितांना कार्यालयाने २% सुरक्षा ठेव व ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव भरणा करून मनपा सोबत करारनामा करण्यासाठी पत्र दिले. परिच्छेद (२३) मधील संचिकेत प्रस्तावित केल्याप्रमाणे संबंधित कंत्राटदाराने F.D.R.No ३७४८४०२, दिनांक २७/७/२०१३ अन्वये सुरक्षा ठेव २% व ५% चा भरणा व करारनामा सादर केल्याचे नमूद आहे. कार्यालयाने संबंधितांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा का/अ/विद्युत-१/११५/२०१३, दिनांक ३१.८.२०१३ अन्वये कार्यादेश दिले. कामाची मुदत एक महिना होती. काम दिनांक ११.११.२०१३ रोजी पूर्ण झाले आहे. संचिकेची सविस्तर तपासणी अंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. संचिकेतील परिच्छेद (२३) मधील प्रस्तावित नुसार संबंधित कंत्राटदाराने २% व ५% सुरक्षा अनामत बाबतच्या FDR क्र. ३७४८४०२, दिनांक २७.३.२०१३.१७५००/- (आय.डी.बी.आय.बँक) जर जमा केलेला आहे , तर देयकातून पुनश्च ५% अति.सुरक्षा कपात करण्याचे प्रयोजन काय होते.
२. सदरील कामाची मुदत दिनांक ३०.९.२०१३ रोजी पूर्ण झाली. तेव्हाच मुदत वाढीचा प्रस्ताव का सादर केला नाही.
३. मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता नसतांनाही देयक अदायगी करण्यात आली आहे.
४. निविदा दुरुस्तीतील अट क्र.३८ नुसार ॲटम मध्ये सरासरी २५% प्रमाणकात वाढ अभिप्रेत आहे. तथापि खालील तक्त्यात नमूद ॲटमवर त्यापेक्षा जास्त वाढ झालेली आहे. त्यावर झालेल्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही, त्यामुळे जास्तीचा झालेला खर्च अमान्य का करण्यात येवू नये याबाबत खुलासा व्हावा.

| ॲटम क्रमांक | ॲटमचा तपशिल | देयकातील प्रमाणक | शेड्यूल्ड बी मधील प्रमाणक | फरक प्रमाणक | दर रक्कम रूपये | जास्तीचा खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | Pro.c.c.foundation | ०६ | ०४ | ०२ | १०२१ | २०४२ |
| ४ | Pipe type earning | ०६ | ०४ | ०२ | ७८८ | १५७६ |
| ५ | S/E providing ७५ mm dia GI pipe pole | ०४ | ०२ | ०२ | ३९९२ | ७९८४ |
| ६ | S/E st.light bracket single | ०४ | ०२ | ०२ | ५०९ | १०१८ |
| | | | | | **एकूण** | **१२६२०/-** |

५) नविन साहित्याची नोंद असलेले stock Register लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेले नाही.

६) मोजमाप पुस्तीका क्र.२२६६ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करून दिलेली नसल्याने संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

**करीता उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून मुद्या क्र.४ अन्वये झालेला खर्च हा सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेविनाच झालेला असल्यामुळे अमान्य करण्यात येतो. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.१० : वॉर्ड क्र.८१ मध्ये पथदिव्या करीता रिकाम्या पोलवर उर्जा बचत फिटींग लावणे. (अं.प.रक्कम रू.२,३१,०००/- ) (खर्च रक्कम रू.१,६५,४४४/-)**

वॉर्ड क्र.८१ मध्ये पथदिव्याकरीता रिकाम्या पोलवर उर्जा बचत फिटींग लावणेसाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले . ई - निविदा विभागामार्फत निविदा मागविल्या. २ निविदा विक्री झाल्या असून २ निविदा प्राप्त झाल्या आहे. Decent Electricals यांची निविदा २७.९९% Below दराची असून त्यास मान्यता देण्यात आली आहे.जा.क्र.मनपा/काअ/विद्युत-१/५००/२०१४, दिनांक १७.२.२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. कामाचा कालावधी १ महिना आहे. संचिकांची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ नुसार ५% सुरक्षा रक्कम कामाचा करारनामा करणे आवश्यक असतांना काम झाल्यानंतर कपात केली आहे. अति सुरक्षा ठेव ही कामाच्या परफार्मन्सशी निगडीत आहे. देयकातून कपात केल्याने बी-१ मधील निविदा अटी शर्तीचा भंग झाला आहे.

२. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४३२६(५४-५५) लेखापरीक्षणास्तव उपलब्ध झालेली नाही.

३. संचिकेत स्थळप्रत नकाशा दर्शविलेला आहे. त्यामध्ये लाईट कोठे बसविणार आहे याबाबत दर्शविलेले नाही.

४. काम पूर्ण झाल्याबाबत संचिकेत विद्युत निरिक्षकांचे प्रमाणपत्र नाही.

५. नविन पोल व नविन मिटर बसविण्यात आले असतांना नविन जॅक्शन बॉक्स लावलेले दिसत नाही.

**करीता उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.११ : औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड (फ) भाग-१ मधील पथदिव्याची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल दुरूस्ती करणे. (वॉर्ड क्र.८८,८९,९०,९२,९३,९६,९७,९८) (अं.प.रक्कम रू.२६,०७,५००/-)**

वॉर्ड - फ भाग -१ मधील उक्त दर्शविलेल्या वॉर्डा मध्ये पथदिव्यांची कॉम्प्रेसीव्ह पध्दतीने देखभाल दुरूस्तीचे कामा करीता रू.२६,०७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. कामासाठी होणारा खर्च सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात करण्यात येणार असून लेखाशिर्षक MxR Light या लेखा शिर्षाअंतर्गत प्रस्तावित केला. अंदाजपत्रकास दिनांक १६.४.२०१३ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.२०१ नुसार मान्यता प्राप्त झाली त्या अन्वये निविदा नोटीस काढून निविदा मागविण्यात आल्या असता ८ निविदा विक्री झाल्या. त्यापैकी ६ निविदा प्राप्त झाल्या आहे.

त्यापैकी Matoshree Electrical and winding works यांचे दर १९.४५ Below कमी असल्याने मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली असून जा.क्र.मनपा/विद्युत-१/२५, दिनांक ३०.५.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला. कामाचा कालावधी दहा महिने आहे. सदरील कामास टप्प्या- टप्प्याने जून २०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

संचिकाची तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. विभागाने तक्रार वही, तक्रार निवारण वही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिली नाही.

२. अटी शर्ती क्रमांक १४ नेमून दिलेल्या भागातील बंद पथदिवे तीन दिवसाच्या आत दुरूस्त न झाल्यास ठेकेदारास प्रति दिवस प्रती पोल रू.१०/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल असे असतांना याप्रमाणे दैनंदिन माहिती संचिकेत असल्याचे दिसून आलेले नाही व तसा अहवाल देवून दंड आकारलेला नाही.

३. जुने साहित्य विद्युत भांडार विभागात जमा न केल्यास, जुन्या साहित्याच्या पोटी (भंगार /scrap) २% रक्कम रू.८५,७५२/- संबंधित ठेकेदाराच्या देयकातून वसूलीस पात्र राहील.

४. अटी शर्ती क्र.१६ कामाचा आदेश मिळताच पंधरा दिवसाच्या आत ठेकेदाराने स्वखर्चाने त्यांना देण्यात आलेल्या नमुन्यात सर्व दिव्यांचे सर्वेक्षण करून त्यानुसार पोल क्रमांक टाकून अहवाल विभागास सादर करावा असे असतांना संचिकेत पोल क्रमांकाचा अहवाल दिसून आलेला नाही. प्रत्यक्षात सर्वेक्षण निविदेपूर्वी होणे अभिप्रेत आहे. त्यानुसार अंदाजपत्रक तयार केले जाते. प्रकरणातील अंदाजपत्रकास आधार नाही असे दिसून येते.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून मुद्या क्र.३ प्रमाणे जुने साहित्य जमा न केल्यास ८५,७५२/- संबंधितांच्या देयकातून कपात करणे आवश्यक होते. प्रत्यक्षात तसे निदर्शनास आलेले नाही. करिता महानगरपालिकेचे झालेले नुकसान संबंधिताकडून वसूल करून उक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.१२ : वॉर्ड क्र.७४, ज्ञानेश्वर कॉलनी, मुकुंदवाडी वॉर्डातील जे-सेक्टर मधील वाहतुकीस अडथळा आणणारे पोल शिफ्ट करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.२५,६२५/-) (३५,७३८/-)**

वॉर्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी,मुकुंदवाडी वॉर्डातील जे सेक्टर मधील वाहतुकीस अडथळा आणणारे पोल शिफ्ट करणे बाबतचे कामासाठी ई निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या. प्रथम वेळा प्रतिसाद मिळाला नाही. दुस-या वेळी एकच निविदा विक्री झाली व प्राप्त झाली. विभागाने निविदा उघडली नाही. तिस-यांदा निविदा मागविली असतांना २ निविदा विक्री झाल्या, २ निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची ६८% Above दराची निविदा मे.पुजा इलेक्ट्रीकल्स वर्क यांची होती. संबंधिताची निविदा ५०% जास्त दराने मान्य करण्यात आली. निविदा दर स्विकारतांना विभागाच्या जबाबदारीवर मान्य केले. संबंधितांना २% अनामत रक्कम भरणा करणे व करारनामा करणे बाबत पत्र दिले. संबंधित कंत्राटदाराने २% अनामत रक्कम देयकातून कपात करण्याची विनंती केली. त्यांची विनंती विभागाने मान्य केली. संबंधितांना कार्यालयीन आदेश क्र.०९/२०१४, दिनांक २८/६/२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले. काम दिनांक ३०/७/२०१४ रोजी पूर्ण झाले. संचिकेची तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. सदरील काम GTL च्या कोटेशन नुसार प्रस्तावित होते. तर कोटेशन मधील दरापेक्षा ५०% Above स्विकारतांना दर पृथकरण केलेले नाही.

2. १५% पेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त झाल्याने विभागाने निविदा नियम ५४ (२) नुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव कार्यादेश देण्यापूर्वी संबंधितांना भरणा करणे बाबत कळविणे आवश्यक होते.

3. कार्यादेश देण्यापूर्वी २% रक्कम भरणा करण्याचे पत्र विभागाने दिले असतांना कंत्राटदाराचे विनंती प्रमाणे देयकातून रक्कम कपात करण्याचे अधिन राहून कार्यादेश निर्गमित झालेले आहे.

4. कंत्राटदाराचे देयकातून २% रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले. तसेच निविदा नियमाचा भंग झालेला आहे.

5. GTL कडून प्राप्त कोटेशन नुसार मनपाने अंदाजपत्रक बनविले. ॲटम क्र.९,१०,१७ वरील Item execute झालेले नाही. तांत्रिक दृष्ट्या ॲटम क्र. ९ व १० वरील Item execute होणे आवश्यक होते.

6. कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नाही. तसेच देयकात सुध्दा १% रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे शासनाचे रू.३५७/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

7. नविन साहित्याची नोंद असलेले stock Register लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही.

8. GTL चे कोटेशन मधील अटी शर्ती नुसार अट क्र.१२ प्रमाणे जुने साहित्य GTL च्या चिकलठाणा स्टोअर्स मध्ये जमा करण्याची अट आहे. त्यानुसार साहित्य कंत्राटदाराने जमा केल्याची पोच संचिकेत नाही.

9. मोजमाप पुस्तीका क्र.४२८१ लेखापरीक्षण पथकास विभागाने उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून मुद्या क्र.६ अन्वये कंत्राटी कामाचा विमा उतरविलेला नसल्याने रू.३५७/- चे शासनाचे नुकसान झालेले आहे. वसूलीअंती तसेच उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.१३ : वॉर्ड क्र. ८८ मध्ये जी.आय.पोल व उर्जा बचत दिवे लावणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.७,९९,९७८/-) (खर्च रक्कम रू.७,९३,६९७/-)**

वॉर्ड क्रमांक ८८ मध्ये जी.आय.पोल व उर्जा बचत दिवे लावणेसाठी रक्कम रुपये. ७,९९,९७८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. खर्चाचा प्रस्ताव सन २०१२-१३ वर्षातील पोलसहित नविन पथदिवे बसविणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित असून दिनांक १७.१२.२०१२ रोजी निविदा उघडल्या असता एकूण ३ निविदा विक्री झाल्या असून त्यापैकी २ निविदा प्राप्त झाल्या आहे.

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.४५% कमी दराने मे.मातोश्री इलेक्ट्रीक ॲण्ड वर्क्स यांची निविदा आहे. वाटाघाटी अंती०.४५% कमी दरा ऐवजी १% कमी दराने काम करण्यास संबंधित एजन्सीने संमती दिली आहे. मा.आयुक्त यांनी कामास मंजूरी दिली असून कामाचा करारनामा करण्यात आला आहे. काम करण्यासाठी कार्यादेश जा.क्र.मनपा/विद्युत/६०५/२०१२, दिनांक १०.१०.२०१३ रोजी देण्यात आला आहे. कामाचा कालावधी दर्शविलेला नाही.

संचिकांची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मोजमाप पुस्तिका क्रमांक ३०१३ (४२-४५) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

2. निविदा नियम ५४ नुसार विमा रकमेचा भरणा करणे आवश्यक असतांना विमा रक्कम रू.७९९९/- चा भरणा केलेला नाही, त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

3. उद्योग उर्जा व कामगार विभाग (महाराष्ट्र शासन) यांनी विद्युत संच तपासणी बाबत दिनांक ९.५.२०१३ रोजी निरिक्षण केल्याबाबतचे जा.क्र.सविनिऔ/निरीक्षक/८१२/२०१३, दिनांक १३.४.२०१३ रोजी विभागास प्रमाणपत्र देवून कळविले आहे. परंतू त्यामध्ये किती पोल बसविले याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही.

4. देयकातील अ.क्र.११ S & E Solar street Light Fitting २ x ३४२१७ =६८४३४/- देयक अदा करण्यात आले आहे. परंतू संचिकेतील नकाशामध्ये कोठे बसविण्यात आला याचा उल्लेख नाही व तशी मा.आयुक्तांची मंजूरी घेतलेली दिसून येत नाही. करीता सदरील खर्च अमान्य करण्यात यावा.

5. जी.आय.पोल. एकूण २५ असतांना street Light Fitting २५ बसविणे आवश्यक आहे. ६२ street Light Fitting दाखविण्यात आले आहे. म्हणजेच ३७ street Light Fitting जास्तीचे दर्शविण्यात आले आहे. ३७x५३१७=१९६७२९/- खर्च अमान्य करण्यात यावा.

6. जी.आय.पोल एकूण २५ असतांना त्यामध्ये Energyefficie Fluorescet tube २५x४=१०० आवश्यक असतांना २४८ tube खरेदी करण्यात आली आहे. म्हणजेच १४८x१८० =२६६४०/- जास्तीचा खर्च करण्यात आला आहे. झालेला खर्च अमान्य करण्यात येवून संबंधिताकडून वसूलीस पात्र आहे.

7. जी.आय.पोल एकूण २५ असतांना त्यास एकूण २५ street light bracket (single fitting) लावणे आवश्यक असतांना एकूण ५० खरेदी करण्यात आले. म्हणजेच २५ जास्तीचे खरेदी करुन २५x५०९=१२७२५/- जास्तीचा खर्च करण्यात आला आहे. झालेला जास्तीचा खर्च वसूलीस पात्र आहे.

8. नविन साहित्य खरेदी केल्यानंतर त्याबाबतची नोंद विभागाने स्टॉक रजिस्टरला घेणे आवश्यक असतांना नोंद असलेले स्टॉक रजिस्टर विभागाने लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन दिलेले नाही.

9. जुने साहित्य जमा झाल्याबाबत विभागाने रजिस्टर उपलब्ध करुन दिलेले नाही.

10. देयक अदा करतांना १% कमी दराने असतांना ०.४५- कमी दराने वजावट करण्यात आली आहे. म्हणजेच (७९९९७८) या रकमेवर १% प्रमाणे ८०००/- रुपये वजावट करणे आवश्यक असतांना ०.४५% प्रमाणे ३६००/- रुपये वजावट केले आहे. ४४००/- रुपये वसूलीस पात्र आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा समथर्नीय नाही. मुद्या क्र.२ अन्वये शासनाचे ७९९९/- चे विमा न उतरविल्याने आर्थिक नुकसान झालेले आहे. मुद्या क्र. ५ अन्वये जास्तीचा झालेला खर्च रू.१,९६,७२९/- आणि मुद्या क्र. ६ अन्वये जास्तीचा झालेला खर्च रू.२६,६४०/- तसेच मुद्या क्र.७ अन्वये जास्तीचा झालेला खर्च १२,७२५/- मुद्या क्र.१० अन्वये जास्तीची अदा केलेली रक्कम रू.४४००/- अशी एकूण रक्कम रू. २,४०,४९४/- चे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्यात यावे. तसेच उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.१४ : वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणे.**
**(अं.प.रक्कम रू.४,९९,६८१/-)(अदा रक्कम रू.४,३३,४७३/-)**

वॉर्ड क्र.९९ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत व्यवस्था करणेसाठी रक्कम रू. ४,९९,६८१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. स्पिल ओव्हर मध्ये काम प्रस्तावित असून दरसूची २०११-१२ च्या दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले. खर्चाचा प्रस्ताव सन २०१२-१३ वर्षातील पोलसहित नविन पथदिवे बसविणे या लेखाशिर्षाअंतर्गत प्रस्तावित आहे. दिनांक ०३.०१.२०१३ रोजी निविदा उघडल्या असता एकूण ३ निविदा विक्री होवून ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. तुलनात्मक दृष्ट्या सवात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.२५% Below (कमी) मे.आर.ई.इलेक्ट्रीकल यांची निविदा आहे. परंतू संचिकेत मा.आयुक्त, तांत्रिक कक्ष यांची मान्यता दिसून आलेली नाही. जा.क्र.मनपा/विद्युत/७२४/२०१३, दिनांक १५.२.२०१३ रोजी कार्यादेश देण्यात आला. कार्यादेश देतांना कामाचा कालावधी नमूद केलेला नाही.

संचिकेची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ नुसार कामाचा विमा कामाच्या कालावधीत उतरविणे आवश्यक असतांना विमा दिनांक १५.३.२०१३/ १४.४.२०१३ या कालावधीचा काढण्यात आला आहे. काम सुरु असतांना विमा उतरविलेला नाही. त्यामुळे कामाचा हेतू सफल झालेला नाही.

2. मोजमाप पुस्तिका क्रमांक २२६५ (१७०-१७१) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही, त्याकारणे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

3. नविन / जुने साहित्याबाबतचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करुन दिलेले नाही.

4. स्थळप्रत नकाशा संचिकेत दिसून आलेला नाही.

5. देयकाच्या ५% रक्कम रू.२१६६९/- with held for old material म्हणून वजावट करण्यात आली आहे. परंतू संबंधिताच्या दिनांक ८.१०.२०१३ च्या विनंती अर्जानंतर ५% रक्कम परत करण्यात आली. गुत्तेदाराने जुने साहित्य जमा केल्याबाबत संचिकेत नोंद नाही. तरी सुध्दा withheld रकमेचा परतावा करणे हे नियमबाह्य आहे. याबाबत विभागाने सविस्तर खुलासा सादर करावा.

6. संचिकेत एकूण १६० फिटींग लावले बाबतची यादी जोडण्यात आली आहे. त्यामध्ये मोकळा पोल (५०) व त्यावर फिटींग लावले बाबत दर्शविले आहे. तर सदरील पोल कधी लावण्यात आले होते. खर्च कोणत्या शिर्षकानुसार करण्यात आला होता. कोणत्या वर्षी करण्यात आला. याबाबतची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

7. देयकात १८० फिटींग लावल्याबाबतचे देयक तयार करण्यात आले. परंतू संचिकेतील यादी नुसार १६० फिटींग लावले आहे. तर २० फिटींग जास्तीचे दर्शविले आहे. म्हणजेच २०x२२४९ =४४९८०, तसेच जास्तीचे खरेदी करीता lamp ४०x१८०=७२०० इतका खर्च झालेला आहे. उपरोक्त प्रमाणे एकूण खर्च ५२१८०/- वसूलीस पात्र आहे.

8. देयकात अ.क्र.४ वर ३GI` st.light bracket एकूण ३७ नग x४७३ = १७५०१ एवढा खर्च दर्शविला आहे व अ.क्र.१ SUE २ x २४ Watt Energy saving Fitting १८० x २२४९ = ४०४८२६ खर्च दर्शविला आहे. म्हणजेच १८० फिटींग असतांना फक्त ३७ bracket दर्शविले आहे. तर १४३ फिटींग कसे बसविले याबाबत विभागाने खुलासा सादर करावा.

९. प्रत्यक्षात संचिकेत दर्शविलेली यादी देण्यात आलेले देयक यामध्ये ताळेबंद दिसत नाही. करण्यात आलेले काम संशयास्पद असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून मुद्या क्र.७ अन्वये जास्तीचा झालेला खर्च रू.५२,१८०/- संबंधिताकडून वसूल करून महापालिका फंडात भरणा करण्यात यावे. तसेच उक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.१५ : वॉर्ड क्र. ८८ अंतर्गत सेनानगर, टिळकनगर, येथे विद्युत व्यवस्था करणे .**
**(अं.प.रक्कम रू.४,९९,९५१/-) (खर्च रक्कम रू.३,३५,८६७/-)**

वॉर्ड क्र.८८ अंतर्गत सेनानगर, टिळकनगर येथे विद्युत व्यवस्था करण्यासाठी जी.आय.पोल लावणे बाबत प्रस्तावित असून ह्या कामाचे अंदाजपत्रक सन २०११-१२ या वार्षिक दरसूची प्रमाणे रू.४,९९,९५१/- चे तयार करण्यात आले आहे. खर्चाचा प्रस्ताव सन २०१३-१४ वर्षातील पोलसहित नविन पथदिवे बसविणे या लेखाशिर्षा अंतर्गत प्रस्तावित केला. निविदा सूचना ई - निविदा विभागामार्फत प्रसिध्दीस देण्यात आली असता दिनांक २७/१२/२०१३ रोजी निविदा उघडल्या . एकूण ५ निविदा विक्री झाल्या. ५ निविदा स्विकृत झाल्या. त्यापैकी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.८२% कमी Below दराने मे.ईगल इलेक्ट्रीकल Eagle Electricals यांची निविदा आहे. त्यास १०% सुरक्षा ठेव ठेवणेच्या अटीसह मान्यता देण्यात आली आहे. जा.क्र.मना/काअ/विद्युत-१/५१३, दिनांक २६/२/२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आले असून कामाची मुदतठेव दोन महिने देण्यात आली आहे.

संचिकेची पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा नियम ५४ (२) नुसार करारनामा करतांना ५% सुरक्षा रक्कम घेणे आवश्यक असतांना सुरक्षा रक्कम देयकातून १०% वजावट केली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. सुरक्षा ठेव ही कामाच्या परफॉर्मन्स म्हणून कामाच्या अगोदर घ्यावयास पाहिजे होती.

२. निविदा नियम ५४ नुसार कामाचा विमा हा कामाचे कार्यादेश दिल्याचे दिनांकापासून घेणे आवश्यक असतांना दिनांक २१.३.२०१४ (२०.६.२०१४) या कालावधीत घेतला आहे. त्यामुळे विमा उतरविण्याचा हेतू सफल होत नाही.

३. मोजमाप पुस्तिका क्रमांक ४१५३ लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही, त्याकारणे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

४. देयकातील अ.क्र.९ S & E Energy saving fitting ४ x २४०० एकूण २५ नग घेण्यात आले. परंतू G.I.pole ची संख्या २४ असतांना एक फीटींग जास्तीची दशविली आहे. म्हणजेच १ x५३१७ =५३१७ रु. वसूलीस पात्र आहे.

५. देयकातील अ.क्र.१० S & E Energy saving lamp T.-५. एकूण २४ x ४ = ९६ एवढे आवश्यक असतांना २५x ४ = १०० नग घेण्यात आले म्हणजेच ४ x १८० = ७२०/- रु. संबंधिताकडून वसूलीस पात्र आहे.

**उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून मुद्या क्र.४ नुसार ५३१७/- व मुद्या क्र.५ प्रमाणे रू.७२०/- असा एकूण रू.६०३७/- जास्तीचा खर्च संबंधिताकडून वसूल करून महापालिका फंडात भरणा करण्यात यावे. तसेच उक्त अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.१६ : सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात M & R Light या लेखाशिर्षाअंतर्गत झालेल्या खर्चाबाबत.**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील विद्युत दिव्यांची देखभाल करणेकरीता comprehensive पध्दतीने खाजगी कंत्राटदारास कंत्राटे वॉर्ड निहाय देण्यात आलेली आहेत. संबंधित कंत्राटदारास साधारणपणे ८/९ वॉर्डाचे देखभाल करणे करीता कंत्राटे दिलेली आहेत. संबंधित कंत्राटदारांनी त्यांचे भागातील दिवे सुरु ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचा पुरवठा करणे, दिवे बंद असल्यास तात्काळ सुरु करणे इत्यादी बाबींचा निविदेत समावेश आहे. एकंदरीत देखभाल व दुरुस्ती संदर्भाने सर्व कामे संबंधित कंत्राटदारांनी करणे अभिप्रेत आहे. संबंधित कंत्राटदारांनी निविदा दर वेगवेगळ्या भागांसाठी वेगवेगळी दर्शविलेली आहे. संबंधितांनी केलेल्या कामाचे कंत्राटदाराने देयके सुध्दा अदा केलेली आहेत.

उक्त लेखाशिर्षा अंतर्गत देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी नियुक्त कंत्राटदाराच्या व्यतीरीक्त इतरही कंत्राटदारांकरवी देखभाल व दुरुस्तीचे कामे केलेले असल्याचे लेखा शाखेतील प्राप्त अभिलेख्यावरुन स्पष्ट होते. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षात comprehensive पध्दतीने कामे केलेल्या कंत्राटदारा व्यतीरीक्त इतर कंत्राटदारांनी केलेल्या कामांची रक्कम खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | वर्ष व वॉर्ड क्रमांक | M & R Light या लेखाशिर्षा अंतर्गत एकूण खर्च रक्कम रू. | Comprehansive पध्दतीने कामे केलेल्या कंत्राटदारांच्या देयकाचा खर्च रक्कम रू. | इतर कंत्राटदारांकरवी देखभाल / दुरुस्तीच्या कामांवर झालेला खर्च रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | २०१३-१४ E | ६७,१२,८४०/- | ४५,४८,०८४/- | २१,६४,७५६/- |
| २ | २०१३-१४ F | ६८,८५,७६६/- | ३९,८३,४७४/- | २९,०२,२९२/- |
| ३ | २०१४-१५ E | २३,६३,९७०/- | ९,०७,३४०/- | १४,५६,६३०/- |
| ४ | २०१४-१५ F | ९८,८२,९८४/- | २५,३९,५७१/- | ७३,४३,४१३/- |
| | **एकूण** | **२,५८,४५,५६०/-** | **१,१९,७८,४६९/-** | **१,३८,६७,०९१/-** |

उक्त तक्त्यातील खर्चाचा आढावा घेता सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील एकूण M & R Light लेखा शिर्षातील खर्चापैकी comprehensive पध्दतीने वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या खर्चापेक्षा जास्तीची रक्कम याच लेखाशिर्षा अंतर्गत इतर कंत्राटदारा मार्फत कामे करून खर्च झालेली आहे. वास्तविक पहाता वार्षिक देखभाल दुरुस्तीची निविदा अंतीम होवून कार्यादेश दिल्यानंतरच त्याच कंत्राटदाराकरवी कामे होणे अभिप्रेत आहे, त्या व्यतीरीक्त इतर कंत्राटदारा मार्फत केलेल्या कामांबाबत झालेल्या खर्चाबाबत समर्थनीय खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा. असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**रक्कम रू.१,३८,६७,०९१/- या रकमेची कामे इतर कंत्राटदारामार्फत केलेली आहेत या बाबत विभागाने पुनश्च समर्थनीय खुलासा सादर करणे आवश्यक आहे. कॉम्प्रेसिव्ह कंत्राटदाराला दिलेल्या भागात पुन्हा पुन्हा इतर कंत्राटदाराची कामे करणे ही बाब अयोग्य आहे. करिता संबंधितावर जबाबदारी निश्चित करून उपरोक्त अनियमिततेबाबत प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१७ : बी.ओ.टी.तत्वावर औरंगाबाद शहरातील पथदिव्यांची देखभाल दुरूस्ती करणे करीता खाजगी अभिकर्ता नेमणे बाबत.**

बी.ओ.टी.तत्वावर औरंगाबाद शहरातील पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणेच्या कामा करीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण ४ निविदा विक्री झाल्या. ४ निविदा प्राप्त झाल्या.त्यातील ०२ निविदा निविदा त्रुटींमुळे उघडल्या नाहीत. उर्वरीत दोन निविदेपैकी सर्वात कमी दर मे.विनवॉक सिस्टीम नाशिक यांचे होते. संबंधित एजन्सीने निविदेमध्ये नमूद केलेले दर विद्युत देयकाच्या बचतीतून ७७% हिस्सा हा कंपनीचा राहील व २३% हिस्सा मनपाचा राहील. एजन्सीने महानगरपालिके सोबत दिनांक ५.५.२००६ रोजी कारारनामा केला. कार्यालयाने पत्र क्र.मनपा/काअ/विद्युत-१/७२/२००६, दिनांक ५.५.२००६ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. सदरील कार्यादेशात कामाची मुदत एनर्जी सेव्हींग फिटींग लावणे करीता चार महिन्याची देण्यात आली होती. संबंधित एजन्सीला दिनांक ३०.४.२००७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. परंतू त्यास आयुक्तांची मान्यता विभागाने घेतलेली नाही. संपूर्ण शहरात ५००० एनर्जी सेव्हींग फिटींग नव्याने लावणे, त्याची सात वर्ष देखभाल करणे व नंतर सुस्थितीत सर्व फिटींग्ज दिव्यासह मनपाकडे हस्तांतरीत करणे असे कामाचे स्वरुप आहे. दिनांक ३०.४.२००७ पर्यंत संबंधित एजन्सीने उक्त फिटींग्ज लावल्या नंतर दिनांक १.५.२००७ ते ३०.४.२०१४ हा देखभालीचा कालावधी निश्चित झालेला आहे.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कार्यादेशातील अट क्र.१ नुसार कंपनीने Lux Level, गुणवत्ता व दर्जा राखावा लागेल व या दिव्यांच्या प्रकाशाची प्रत (Light Illumination quality) व विज बिलात होणारी बचत तपासली जाईल. होणारी बचत ४०% असल्यास समाधानकारक समजण्यात येईल असे नमूद असतांनाही देयके अदा करतांना ESF लावण्यापूर्वीचे देयक व नंतरचे देयक याची पडताळणी केलेली नाही. याबाबत संचिकेतील परिच्छेद १२७ नुसार आयुक्त यांनी प्रस्तावित बेंच मार्कचा फॉर्मुला हा प्रत्यक्ष बिलाशी निगडीत नाही असे नमूद केलेले आहे. इत:पर बचतीचा बेंच मार्क निश्चित करतांना पूर्वीचे २५० Watt च्या दिव्याचे consumption आणि नव्याने लावलेले ESF ९६ Watt दिव्याचे consumption याचे युनिट काढून ते पूर्वीच्या consumption मधून वजा करून होणा-या बचतीबाबत बेंच मार्क ठरविण्यात आला आणि त्यानुसार देयके MSEB च्या युनिट च्या दरानुसार अदा करण्यात आलेली आहेत.

आयुक्तांनी नमूद केलेली बाब व कार्यादेशातून अटी/ शर्तीचा देयक अदाई करतांना विचार झालेला नाही. तसेच प्रत्यक्षात विद्युत देयकात बचत झाली का? याची खात्री न करताच देयके अदा केलेली आहेत. त्यामुळे या प्रकल्पावर झालेला संपूर्ण खर्च रु.७,९९,३५,०६१/- अमान्य का करण्यात येवू नये ? याचा विभागाने पुराव्यासह खुलासा करावा.

२. कार्यादशातील अट क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे हायड्रोलीक लॅडरचा पुरवठा करण्यात येणार नाही असे नमूद असतांनाही महानगरपालिके तर्फे हायड्रोलिक लॅडरचा पुरवठा केलेला आहे. कंपनीने हायड्रोलिक लॅडरचा वापर केल्याने त्यांच्या देयकातून नाममात्र शुल्क वसूल केलेले आहे. वसूल केलेले शुल्काबाबत संचिकेत हायड्रोलिक वापराची दरसूचि उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे हायड्रोलिक लॅडरसाठी लागणारे इंधन, हायड्रोलिक लॅडरचा घसारा, वाहनचालक व मनपाचे लाईनमनचे वेतन या बाबी विचारात न घेता नाममात्र शुल्क आकारले गेल्याचे दिसून येते. हायड्रोलिक लॅडरचा वापर केल्याबाबतचे लॉगबुक लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात किती वापर झाला याची खात्री करता आली नाही. मशिनरी वापरास द्यावयाची असेल तर त्याचा उल्लेख निविदेमध्ये असणे व त्याचा प्रतितास दर नमूद असणे आवश्यक असते. परंतू अशी कार्यवाही न करता नाममात्र दराने, सक्षम अधिका-याची मान्यता न घेता मशिनरी वापरास देणे हे अधिकाराचे अतिक्रमण ठरते.

३. कार्यादेशातील अट क्र.३ प्रमाणे संबंधित कंत्राटदाराने औरंगाबाद शहरात स्वत:चे कार्यालय उघडणे, आवश्यक तो तांत्रिक / अतांत्रिक कर्मचारी वर्ग नियुक्त करणे , दूरध्वनी व्यवस्था करणे, २४ तास तक्रार ऐकून घेण्यासाठी कर्मचा-याची नेमणूक करणे इत्यादी बाबी कंपनीने केलेल्या नाहीत, असे विद्युत विभागाने संबंधितांना दिलेल्या नोटीसीच्या पत्रव्यवहारावरुन दिसून येते. त्यामुळे या अटीचा भंग झाल्याचे दिसून येते. अट क्र.४ नुसार ४८ तासात प्राप्त तक्रारीचे निवारण आणि तसा अहवाल दररोज महानगरपालिकेकडे संबंधित कंत्राटदाराने सादर केलेला नाही. करार उल्लंघनाबद्यल कोणतीही दंडात्मक कार्यवाही केलेली नाही, तसेच तक्रार निवारणाची व्यवस्था नसल्याने ठेकेदाराने देखभाल दुरुस्तीची कामे तक्रारीनुरुप वेळेत केली किंवा नाही याचे संनियंत्रण झालेले नाही.

४. अट क्र.१३ प्रमाणे बी.ओ.टी.कंत्राटदाराने १२० दिवसात सर्व दिवे लावणे बंधनकारक असतांना तसे न होता दिनांक ५.५.२००६ ते ३०.४.२००७ पर्यंत कामास मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे कराराच्या कालावधीत पुढे वाढ केली ही बाब अयोग्य आहे. तसेच दिलेल्या मुदतवाढीस सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेतलेली नाही.

५. अट क्र.१४ मध्ये नमूद प्रमाणे बी.ओ.टी.पध्दतीने पथदिवे देखभाल कामाचा योग्य परिणाम साधला जात नसेल, मनपाचा आर्थिक तोटा होत असेल त्याचप्रमाणे करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग होत आहे असे निदर्शनास आल्यास करारनामा रद्य करण्याचा अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना असेल असे नमूद आहे. सदरील प्रकरणी संचिकेतील एनएस-२५५ वर स्वत: मा.आयुक्तांनी नमूद केलेल्या टिपणीत " आयुक्त म्हणून बी.ओ.टी.कामाबद्यल मी समाधानी नाही "असे नमूद केलेले आहे. तरीही कार्यादेशातील अटी/ शर्ती प्रमाणे संबंधित एजन्सीसोबत झालेला करार रद्य केलेला नाही.

६. अट क्र.१५ नुसार बी.ओ.टी कंत्राटदाराने संपूर्ण शहराच्या दिव्यांच्या खांबाचे सर्वेक्षण करुन सर्व खांबावर ऑईल पेन्टने क्रमांक द्यावे लागतील असे नमूद आहे. विद्युत विभागाने उक्त बाबींची पूर्तता संबंधित कंत्राटदाराने केली किंवा नाही याची खातरजमा केलेली नाही. तसेच संचिकेत याबाबत अहवाल उपलब्ध नाही. तरीही देयकांचे प्रदान केलेले आहे.

७. अट क्र.१७ प्रमाणे कंपनीने कार्यवाही करुन उर्जा परिक्षण केले किंवा नाही याबाबत संचिकेत अभिलेखे नाहीत. त्यामुळे प्राप्त होणारे विद्युत देयके योग्य असल्याबाबत खात्री झालेली नाही. कंत्राटदारास होणारे प्रदान हे विद्युत देयक बचतीच्या आधारे करावयाचे असल्याने ही बाब गांभिर्यपूर्वक पूर्ण करणे आवश्यक होते. तशी पूर्तता न होता देखिल देयकांचे प्रदान करणे ही बाब अनाकलनीय आहे.

८. अट क्र.१८ नुसार प्रत्येक महिन्यात विजेचे consumpition ची नोंद कंपनीकडे ठेवावी असे नमूद आहे. विभागाने कंत्राटदार सदरील अटीची पूर्तता करतो की नाही याबाबत वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक होते. परंतू consumpition बद्यल तपासणीची खातरजमा केलेली नसल्याचे दिसून येते. कारण एकदा बेंच मार्क ठरल्यानंतर त्याच प्रमाणात (Ratio) सात वर्ष consumpition मध्ये बचत दर्शवून M.S.E.B. च्या वेळोवेळी वाढीव युनिट दराने देयके अदा केलेली आहेत.

९. अट क्र.१९ नुसार कंपनी एनर्जी सेव्हींग कॉन्ट्रॅक्ट अंतर्गतची कामे करण्याकरीता वापरण्यात येणा-या साहित्यावर नियमाप्रमाणे जकात कर महानगरपालिकेकडे नियमित भरणा करील असे नमूद आहे.तथापि संचिकेतील पृष्ठ क्र. सी-५७ प्रमाणे तत्कालीन जकात अधिक्षक यांनी त्यांचे पत्र क्र.मनपा/जकात /२००९/५२, दिनांक २.२.२००९ अन्वये मे.विनवॉक सिस्टीम (I.N.C.)यांनी दिनांक २६.१.२००८ ते १२.३.२००८ दरम्यान आयात केलेल्या रुपये ९५,२५,०००/- किंमतीच्या स्ट्रीटलाईट या मालावरील जकात रक्कम रु.२,३८,१२५/- संबंधितांच्या देयकातून कपात करुन मे.सहकार एजन्सी प्रायव्हेट लि. (जकात संकलन अधिकर्ता) यांच्या नावाने धनादेश देण्यात यावा असे कळविले होते. देयकातून जकात कराची रक्कम कपात करुन अदा केल्याची खात्री झालेली नाही. तसेच संबंधितांनी जकातीची रक्कम भरणा केलेली नसल्याने दंडनिय कार्यवाहीसुध्दा झालेली नसल्याचे दिसून येते.

१०. अट क्र.२१ नुसार ४८ तासात तक्रार निवारण केली नाही तर प्रतिदिन प्रतिखांब रु.१००/- दंड आकारावयाची तरतूद आहे. प्रकरणात विद्युत विभागाने उपरोक्त नुसार बंद दिवे व दिवस याप्रमाणे दंड न आकारता नाममात्र दंड आकारलेला आहे.

११. अट क्र.२३ नुसार एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्यापूर्वीची अस्तित्वात असलेली स्ट्रीट लाईट फिटींग, ट्यूब, दिवे इत्यादी महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे. असे साहित्य बी.ओ.टी.कंत्राटदाराने जमा केल्याबाबत विद्युत विभागाने लेखापरीक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्याचप्रमाणे जर असे साहित्य प्रत्यक्षात जमा केले असेल तर त्याचा विनियोग कसा केला हे देखिल तपासता आलेले नाही.

१२. अट क्र.२७ नुसार टाईमर स्विच बसविले असल्याचा अहवाल संचिकेत नाही. सदरचे टाईमर स्विच एमएसईबी व विद्युत निरिक्षक, पीडब्ल्यूडी, औरंगाबाद यांचेकडून प्रमाणित करुन घेवून बसविणे बंधनकारक आहे. अशा पध्दतीने कार्यवाही संबंधितानी केलेली आहे किंवा नाही याची विद्युत विभागाने खातरजमा करणे आवश्यक होते.

विद्युत निरिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग व म.रा.वि.मं. यांची प्रमाणपत्रे संचिकेत नसल्याने असे टाईमर बसविलेच नाहीत असा निष्कर्ष काढण्यास वाव आहे. याबाबत संबंधित विभागाने एजन्सीला नाममात्र दंड आकारला आहे. परंतू एजन्सीने ऑटोटाईमर बसविले नसल्याने महानगरपालिकेस विद्युत देयकावर अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

१३. अट क्र.२९ नुसार कराराची मुदत संपल्यानंतर कंपनीने बसविलेले सर्व ट्यूब लाईट, दिवे व इतर युनिट महानगरपालिकेकडे विनामूल्य हस्तांतर करणे कंपनीस बंधनकारक आहे. विद्यूत विभागाने उक्त नुसार साहित्य प्राप्त झाल्याचा अहवाल संचिकेत जोडलेला नाही. तसेच कंपनीकडून प्राप्त साहित्याची नोंद नोंदवहीत नोंदविल्याबद्यल अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

१४. अट क.३१ नुसार संबंधित एजन्सीला महानगरपालिके तर्फे देण्यात आलेली बँक गॅरेन्टी कराराची मुदत संपल्यानंतर महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे. विद्युत विभागाने संबंधितांकडून बँक गॅरेन्टी हस्तगत केल्याची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्यामुळे अशी बँक गॅरेन्टी प्राप्त करुन घेण्याकरीता जी व्यवस्था केली असेल त्याचे पुढे काय झाले, ही बाब पडताळ्ता आलेली नाही.

१५. कंत्राटदाराच्या दरम्यानच्या देयकातील एफएसडीच्या कपात करण्यात आलेल्या रकमा संबंधितांना कार्यादेशातील कामाचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच परत केलेल्या आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे तातपुरते आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच कामाच्या सुरक्षेसाठी ठेवण्यात आलेली रक्कम परत केल्यामुळे देयकातील कपात केलेली एफएसडी चा हेतू सफल झालेला नाही.

१६. एजन्सीने कंत्राटी कामाचा विमा कामाच्या पूर्ण कालावधीसाठी न उतरविता केवळ एक वर्षाच्या कालावधीसाठी उतरविलेला आहे. कामाचा कालावधी सात वर्षाचा आहे. पूर्ण कालावधीसाठी विमा उतरविला नसल्याने तसेच संबंधिताच्या देयकातून कंत्राटी कामाच्या विम्याची १% रक्कम कपात केलेली नसल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

१७. मोजमाप पुस्तिका १८७८ मधील पान क्र. १,२,३,४ वरील पहिले व दुसरे दरम्यानचे देयकाची मोजमाप पुस्तिकेत नोंद आहे. परंतू लेखा शाखेने मोजमाप पुस्तिकेत देयक अदायगी बाबत "Pay order" केलेली नाही. तरीसुध्दा देयके अदा झालेली आहेत.

१८. संबंधित एजन्सीच्या पहिल्या ते नवव्या दरम्यानच्या देयकातून withheld केलेली रक्कम नवव्या देयकात रिलीज केलेली आहे. प्रथमत: पारीत झालेल्या देयकातून withheld रक्कम कॅशबुक मध्ये त्या त्या वेळी जमा ठेवलेली असते. अशा रकमांचे रिफंड होणे क्रमप्राप्त आहे. तथापि पुनश्च नवव्या देयकात withheld रकमा अदा केल्याचे निदर्शनास येते. सदरील प्रकरणी संबंधित एजन्सीला दोन वेळेस रक्कम अदा केल्याचे नसल्याबाबत विद्युत विभाग व लेखा विभाग यांनी संयुक्त पणे खात्री करणे आवश्यक आहे.

१९. मे-२००७ ते मार्च २००८ या कालावधीतील देयकातून आयकर, व्यवसाय कर, सुरक्षा ठेवी इत्यादी कपाती वेळोवेळी न करता मार्च -२००८ च्या देयकातून केलेल्या आहे. त्या कारणे शासनाचे व महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

२०. जून -२००८ ते एप्रिल २०१४ पर्यंतच्या देयकात संबंधित एजन्सीकडून प्राप्त होणारी ३% एफएसडीची रक्कम कपात केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे तात्पुरते आर्थिक नुकसान झालेले आहे.

२१. सदरील कामाच्या संचिकेतील पृष्ठ एनएस-१४५ परिच्छेद ३६३ वर उल्लेख केल्याप्रमाणे शहरातील रस्ते, विकास कामात पथदिव्याचे पोल शिफ्ट करणे, धोकादायक पोल, अपघात पोल शिफ्टींगच्या कामात १०० नग उर्जा बचत दिवे कमी झाल्याची नोंद टिपणीत आहे. डिसेंबर २००८ पासून ४९०० दिव्यांचे देयक अदा केले आहे. तद्नंतर जानेवारी २०१० पासून पुनश्च ५००० दिव्यांचे देयक अदा केले जात आहे. जेव्हा की उक्त नुसार १०० दिवे कमी झाले आहेत, त्याप्रमाणे १०० दिव्यावरील खर्च देणे अनुज्ञेय होत नाही. १०० दिव्यांवर जानेवारी -२०१० ते एप्रिल २०१२ पर्यंत झालेल्या फरकाची रक्कम वसूलीस पात्र आहे. १०० दिव्यांवरील विजवापराबाबत एकूण युनिट ६०३० असून सरासरी बल्ब रू.४.८२ पैसे आहे. याची एकूण रक्कम रू.२९०६५/- येते. त्यापैकी कंपनीचा ७७% हिस्सा रू.२२,३८०/- हा एका महिन्यासाठी असून २८ महिन्याच्या कालावधीसाठी रू.६,२६,६४०/- इतका जास्तीचा अदा केलेला खर्च वसूलीस पात्र आहे.

२२. सदरील कामाच्या संचिकेतील पान क्र.एनएस-१९१ , परिच्छेद ४७९ वर लेखा शाखेने ऑक्टोबर -२००९ ते फेब्रुवारी २०१० पर्यंतचे देयक रू.४२,००,२६१/- पारीत केलेले आहेत. मोजमाप पुस्तिकेतील पान क्र.१२१,१२३,१२५,१२७,१३० वरील पारीत रकमेची एकूण बेरीज रू.४१,९८,२६१/- येते. फरक रक्कम रू.२०००/- संचिकेत पारीत केल्याप्रमाणे संबंधितांना अदा केलेली नसल्याबाबत विद्युत विभाग व लेखा विभाग यांनी खातरजमा करणे आवश्यक आहे.

२३. सदरील कामाच्या संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-२३६ परिच्छेद क्र.६२७ प्रमाणे मा.आयुक्त यांनी दिनांक ३.९.२०११ रोजी संचिकेत नोंदविलेल्या अभिप्रायामध्ये असे नमूद केले आहे की, "अनेक महिन्यांपासून काम अत्यंत असमाधानकारक आहे. सतत आंदोलने होत आहेत. रोज तक्रारी आलेल्या आहेत. हे सर्व लक्षात घेता प्रत्येक महिन्याचे फक्त ५०% बिल अदा करावे. उर्वरीत रक्कम देता येणार नाही" असे नमूद असून सुध्दा संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी ५०% रक्कम withheld करून ठेवली. सदरील रक्कम संबंधित एजन्सीला अदा केलेली नाही याची विद्युत विभाग व लेखाविभाग यांनी खातरजमा करणे आवश्यक आहे.

२४. संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-२५५ वर मा.आयुक्त , महानगरपालिका , औरंगाबाद यांनी दिलेल्या अभिप्रायात बी.ओ.टी.कामाबाबत स्वत: आयुक्त म्हणून समाधानी नसल्याचे नमूद आहे. परिच्छेद ६८० नुसार बिलाच्या रकमेच्या २५% दंड आकारावा आणि दुर्लक्ष करणा-या अधिकारी आणि कर्मचारी यांचे विरूध्दही कार्यवाही करावी. (DMC-) ,CE,CA,LA,Ex.Engg.(EF) यांनी एकत्रितपणे तपासणी करून कार्यवाहीसाठी सादर करण्याचे आदेशित केले. प्रत्यक्षात काय कार्यवाही झाली यासंबंधी तपासणी होणे आवश्यक आहे. संचिकेत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उपलब्ध नाही.

२५. पृष्ट क्र.२९१, परिच्छेद ७५२ मध्ये अ.क्र.३ नुसार इतर ठेकेदाराकडून Risk & cost वर पथदिवे दुरुस्तीचे कामे करून घेण्यात आल्याचे नमूद आहे. तथापि त्या कामावर किती खर्च झाला याबाबत खर्चाची नोंद असलेले रजिस्टर व बी.ओ.टी.कंत्राटदाराच्या देयकातून वसूल केलेल्या नोंदी याबाबतचा ताळमेळ साधण्यासाठी अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

२६. संचिकेत एकूण ५००० दिवे लावल्याबाबत बी.ओ.टी.कंत्राटदारास देयके वेळोवेळी अदा केलेली आहेत. परंतू शहरात लावण्यात आलेल्या एकूण ४७१० दिव्यांची यादी उपलब्ध आहे. उर्वरीत २९० दिव्यांची कोणत्या ठिकाणी उभारणी केली याचा बोध झालेला नाही. त्यामुळे कंत्राटदारास २९० फिटींग न लावताच रक्कम अदा केल्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात विभागाने खात्री करून अनुपालन दर्शवावे.

२७. बी.ओ.टी.कंत्राटदारासोबत झालेला करार व कार्यादेशातील अटी / शर्तीची पूर्तता कंत्राटदाराने केलेली नसल्याने महानगरपालिकेच्या वतीने नागरीकांना दिवाबत्तीसारखी मूलभूत सेवा-सुविधा पुरविण्याकरीता अनंत अडचणी निर्माण झालेल्या होत्या. नागरीक, लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारी वारंवार प्राप्त झाल्या. या तक्रारींबाबत वेळोवेळी महानगरपालिकेस नागरीकांचा व लोकप्रतिनिधींचा रोष पत्कारावा लागला. एकूणच महानगरपालिकेची प्रतिमा जनमानसात मलिन झाली. कंत्राटदारास याबाबत नाममात्र दंड आकारुन त्यांची देयके अदा केलेली आहेत.मा. आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी आदेशित केल्याप्रमाणे दुर्लक्ष करणारे अधिकारी व कर्मचारी यांचे विरूध्द कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते.

२८. मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.७५५, दिनांक २१.२.२०१५ अन्वये ऑक्टोबर २०१४ ते जून -२०१५ पर्यंत पथदिवे देखभाल दुरुस्ती करणा-या बी.ओ.टी.कंत्राटदारास मुदतवाढ दिलेली आहे. मे -२०१४ ते ऑक्टोबर -२०१४ पर्यंत सहा महिने कालावधीत पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम कोणत्या एजन्सीकरवी करून घेतले याबाबत संचिकेत अभिलेखे उपलब्ध नाहीत. प्रस्तावात नमूद कालावधी ऑक्टोबर २०१४ ते जून -२०१५ या कालावधीत देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्च रू.१,१२,५०,०००/- यास मान्यता प्रदान केली आहे. या संदर्भात असे नमूद करण्यात येते की,बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर केलेला करार एप्रिल -२०१४ ला पूर्ण झाला. त्यानंतरच्या कालावधीत हस्तांतरीत केलेल्या ५००० दिव्यांची केवळ देखभाल दुरुस्ती करणे अपेक्षित आहे. त्यात “बांधा” ही बाब समाविष्ट असणे अपेक्षित नाही. सबब सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करतांना याचे स्वतंत्र अंदाजपत्रक सादर करून त्यास मान्यता घेणे अपेक्षित होते. तसे न करता व कोणतीही निविदा प्रक्रिया पार न पाडता विद्युत विभागाने रू.१,१२,५०,०००/- रकमेचे काम बी.ओ.टी.कंत्राटदारास विनानिविदा मंजूर करण्याचा प्रस्ताव मुदतवाढीचे कारण दर्शवून महापालिका सर्वसाधारण सभेसमोर ठेवून त्यास मान्यता प्राप्त केली आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

**उक्त मुद्या क्र. १ ते २८ बाबत विभागाने संचिकेची सविस्तर तपासणी करून शहानिशा करून / खातरजमा करून सविस्तर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक व उक्त मुद्यांशी सुसंगत नाही. सदरील प्रकल्पावर महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसान व इतर अनियमिततेबाबत संबंधितवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१८ : बी.ओ.टी.तत्वावर औरंगाबाद शहरातील सिडको व उर्वरीत शहरात पथदिव्यांची देखभाल दुरूस्ती करणे करीता खाजगी अभिकर्ता नेमणे बाबत.**

बी.ओ.टी.तत्वावर औरंगाबाद शहरातील उर्वरीत भाग व सिडको परिसर येथील पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती करणेच्या कामा करीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ७८१/१, दिनांक २९.३.२००७ अन्वये मे.विनवॉक सिस्टीम नाशिक यांच्याशी यापूर्वीच झालेल्या करारानुसार त्याच दराने उक्त भागातील पथदिवे देखभाल दुरुस्तीची कामे करण्यासाठी नेमण्यात आलेले आहे. संबंधितांना कामाचा कार्यादेश क्र. .मनपा/काअ/विद्युत-१/५६९/२००८, दिनांक ११.१.२००८ अन्वये कार्यादेश निर्गमित केले. सदरील कार्यादेशात कामाची मुदत एनर्जी सेव्हींग फिटींग लावणे करीता चार महिन्याची देण्यात आली होती. संबंधित एजन्सीला दिनांक ३०.४.२००९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. औरंगाबाद शहरातील उर्वरीत भाग व सिडको परिसर येथे ५००० एनर्जी सेव्हींग फिटींग नव्याने लावणे, त्याची सात वर्ष देखभाल करणे व नंतर सुस्थितीत सर्व फिटींग्ज दिव्यासह मनपाकडे हस्तांतरीत करणे असे कामाचे स्वरुप आहे.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. कार्यादेशातील अट क्र.१ नुसार कंपनीने Lux Level, गुणवत्ता व दर्जा राखावा लागेल व या दिव्यांच्या प्रकाशाची प्रत (Light Illumination quality) व विज बिलात होणारी बचत तपासली जाईल. होणारी बचत ४०% असल्यास समाधानकारक समजण्यात येईल असे नमूद असतांनाही देयके अदा करतांना ESF लावण्यापूर्वीचे देयक व नंतरचे देयक याची पडताळणी केलेली नाही. याबाबत संचिकेतील परिच्छेद १२७ नुसार आयुक्त यांनी प्रस्तावित बेंच मार्कचा फॉर्मुला हा प्रत्यक्ष बिलाशी निगडीत नाही असे नमूद केलेले आहे. इत:पर बचतीचा बेंच मार्क निश्चित करतांना पूर्वीचे २५० watt च्या दिव्याचे consumption आणि नव्याने लावलेले ESF ९६ watt दिव्याचे consumption याचे युनिट काढून ते पूर्वीच्या consumption मधून वजा करून होणा-या बचतीबाबत बेंच मार्क ठरविण्यात आला आणि त्यानुसार देयके MSEB च्या युनिट च्या दरानुसार अदा करण्यात आलेली आहेत. आयुक्तांनी नमूद केलेली बाब व कार्यादेशातून अटी/ शर्तीचा देयक अदाई करतांना विचार झालेला नाही. तसेच प्रत्यक्षात विद्युत देयकात बचत झाली का? याची खात्री न करताच देयके अदा केलेली आहेत. त्यामुळे या प्रकल्पावर झालेला संपूर्ण खर्च रू.७,१०,९०,४०३/- अमान्य का करण्यात येवू नये याचा विभागाने पुराव्यासह खुलासा करावा.

२. कार्यादशातील अट क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे हायड्रोलीक लॅडरचा पुरवठा करण्यात येणार नाही असे नमूद असतांनाही महानगरपालिके तर्फे हायड्रोलिक लॅडरचा पुरवठा केलेला आहे. कंपनीने हायडोलिक लॅडरचा वापर केल्याने त्यांच्या देयकातून नाममात्र शुल्क वसूल केलेले आहे. वसूल केलेले शुल्काबाबत संचिकेत हायड्रोलिक वापराची दरसूचि उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे हायड्रोलिक लॅडरसाठी लागणारे इंधन, हायड्रोलिक लॅडरचा घसारा, वाहनचालक व मनपाचे लाईनमनचे वेतन या बाबी विचारात न घेता नाममात्र शुल्क आकारले गेल्याचे दिसून येते. हायड्रोलिक लॅडरचा वापर केल्याबाबतचे लॉगबुक लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात किती वापर झाला याची खात्री करता आली नाही. मशिनरी वापरास द्यावयाची असेल तर त्याचा उल्लेख निविदेमध्ये असणे व त्याचा प्रतितास दर नमूद असणे आवश्यक असते, परंतू अशी कार्यवाही न करता नाममात्र दराने, सक्षम अधिका-याची मान्यता न घेता मशिनरी वापरास देणे हे अधिकाराचे अतिक्रमण ठरते.

३. कार्यादेशातील अट क्र.३ प्रमाणे संबंधित कंत्राटदाराने औरंगाबाद शहरात स्वत:चे कार्यालय उघडणे, आवश्यक तो तांत्रिक / अतांत्रिक कर्मचारी वर्ग नियुक्त करणे , दूरध्वनी व्यवस्था करणे, २४ तास तक्रार ऐकून घेण्यासाठी कर्मचा-याची नेमणूक करणे इत्यादी बाबी कंपनीने केलेल्या नाहीत, असे विद्युत विभागाने संबंधितांना दिलेल्या नोटीसीच्या पत्रव्यवहारावरुन दिसून येते. त्यामुळे या अटीचा भंग झाल्याचे दिसून येते. अट क्र.४ नुसार ४८ तासात प्राप्त तक्रारीचे निवारण आणि तसा अहवाल दररोज महानगरपालिकेकडे संबंधित कंत्राटदाराने सादर केलेला नाही. करार उल्लंघनाबाबत कोणतीही दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. तसेच तक्रार निवारणाची व्यवस्था नसल्याने ठेकेदाराने देखभाल दुरुस्तीची कामे तक्रारनुरुप वेळेत केली किंवा नाही याचे संनियंत्रण झालेले नाही.

४. अट क्र.१४ मध्ये नमूद प्रमाणे बी.ओ.टी.पध्दतीने पथदिवे देखभाल कामाचा योग्य परिणाम साधला जात नसेल, मनपाचा आर्थिक तोटा होत असेल त्याचप्रमाणे करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग होत आहे असे निदर्शनास आल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना असेल असे नमूद आहे. सदरील प्रकरणी संचिकेतील एनएस-१७८, १७९ वर स्वत: मा.आयुक्तांनी नमूद केलेल्या टिपणीत " आयुक्त म्हणून बी.ओ.टी.कामाबद्दल मी समाधानी नाही "असे नमूद केलेले आहे. तरीही कार्यादेशातील अटी/ शर्ती प्रमाणे संबंधित एजन्सीसोबत झालेला करार रद्द केलेला नाही.

५. अट क्र.१५ नुसार बी.ओ.टी कंत्राटदाराने संपूर्ण शहराच्या दिव्यांच्या खांबाचे सर्वेक्षण करून सर्व खांबावर ऑईल पेन्टने क्रमांक द्यावे लागतील असे नमूद आहे. विद्युत विभागाने उक्त बाबींची पूर्तता संबंधित कंत्राटदाराने केली किंवा नाही याची खातरजमा केलेली नाही. तसेच संचिकेत याबाबत अहवाल उपलब्ध नाही. तरीही देयकांचे प्रदान केलेले आहे.

६. अट क्र.१७ प्रमाणे कंपनीने कार्यवाही करुन उर्जा परिक्षण केले किंवा नाही याबाबत संचिकेत अभिलेखे नाहीत. त्यामुळे प्राप्त होणारे विद्युत देयके योग्य असल्याबाबत खात्री झालेली नाही. कंत्राटदारास होणारे प्रदान हे विद्युत देयक बचतीच्या आधारे द्यावयाचे असल्याने ही बाब गांभिर्यपूर्वक पूर्ण करणे आवश्यक होते. तशी पूर्तता न होता देखिल देयकांचे प्रदान करणे ही बाब अनाकलनीय आहे.

७. अट क्र.१८ नुसार प्रत्येक महिन्यात विजेचे consumpition ची नोंद कंपनीकडे ठेवावी असे नमूद आहे. विभागाने कंत्राटदार सदरील अटीची पूर्तता करतो की नाही याबाबत वेळोवेळी तपासणी करणे आवश्यक होते. परंतू consumpition बद्यल तपासणीची खातरजमा केलेली नसल्याचे दिसून येते. कारण एकदा बेंच मार्क ठरल्यानंतर त्याच प्रमाणात (Ratio) सात वर्ष consumpition मध्ये बचत दर्शवून M.S.E.B. च्या वेळोवेळी वाढीव युनिट दराने देयके अदा केलेली आहेत.

८. अट क्र.२१ नुसार ४८ तासात तक्रार निवारण केली नाही तर प्रतिदिन प्रतिखांब रू.१००/- दंड आकारावयाची तरतूद आहे. प्रकरणात विद्युत विभागाने उपरोक्त नुसार बंद दिवे व दिवस याप्रमाणे दंड न आकारता नाममात्र दंड आकारलेला आहे.

९. अट क्र.२३ नुसार एनर्जी सेव्हींग फिटींग लावण्यापूर्वीची अस्तित्वात असलेली स्ट्रीट लाईट फिटींग, ट्यूब, दिवे इत्यादी महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे. असे साहित्य बी.ओ.टी.कंत्राटदाराने जमा केल्याबाबत विद्युत विभागाने लेखापरीक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत. त्याचप्रमाणे जर असे साहित्य प्रत्यक्षात जमा केले असेल तर त्याचा विनीयोग कसा केला हे देखिल तपासता आलेले नाही.

१०. अट क्र.२७ नुसार टाईमर स्विच बसविले असल्याचा अहवाल संचिकेत नाही. सदरचे टाईमर स्विच एमएसईबी व विद्युत निरिक्षक, पीडब्ल्यूडी, औरंगाबाद यांचेकडून प्रमाणित करुन घेवून बसविणे बंधनकारक आहे. अशा पध्दतीने कार्यवाही संबंधितानी केलेली आहे किंवा नाही याची विद्युत विभागाने खातरजमा करणे आवश्यक होते. विद्युत निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग व म.रा.वि.मं. यांची प्रमाणपत्रे संचिकेत नसल्याने असे टाईमर बसविलेच नाहीत असा निष्कर्ष काढण्यास वाव आहे. याबाबत संबंधित विभागाने एजन्सीला नाममात्र दंड आकारला आहे. परंतू एजन्सीने ऑटोटाईमर बसविले नसल्याने महानगरपालिकेस विद्युत देयकावर अतिरिक्त खर्च करावा लागत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

११. अट क्र.२९ नुसार कराराची मुदत संपल्यानंतर कंपनीने बसविलेले सर्व ट्यूब लाईट, दिवे व इतर युनिट महानगरपालिकेकडे विनामूल्य हस्तांतर करणे कंपनीस बंधनकारक आहे. विद्यूत विभागाने उक्त नुसार साहित्य प्राप्त झाल्याचा अहवाल संचिकेत जोडलेला नाही. तसेच कंपनीकडून प्राप्त साहित्याची नोंद नोंदवहीत नोंदविल्याबद्यल अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेले नाहीत.

१२. अट क्र.३१ नुसार शहरात पूर्वी लावलेले ५००० दिवे व या करारनाम्यानुसार लावण्यात येणारे ५००० दिवे असे एकूण १०००० दिव्यांकरीता कार्बन क्रेडीट असेल. कार्बन क्रेडीट विकून होणाऱ्या उत्पन्नातून मनपास ५०% व संबधित कंत्राटदारास ५०% हिस्सा देण्यात येईल. कार्बन क्रेडीटचे उत्पन्न मिळविण्यासाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदार करेल असे नमूद आहे. सदरील बाबतीत एकूण किती उत्पन्न कार्बन क्रेडीट विकून मिळाले त्यातील ५०% मनपा फंडात किती जमा झाले याची माहिती लेखापरीक्षण पथकास दिलेली नाही.

१३. अट क.३२ नुसार संबंधित एजन्सीला महानगरपालिके तर्फे देण्यात आलेली बँक गॅरेन्टी कराराची मुदत संपल्यानंतर महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे. विद्युत विभागाने संबंधितांकडून बँक गॅरेन्टी हस्तगत केल्याची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्यामुळे अशी बँक गॅरेन्टी प्राप्त करुन घेण्याकरीता जी व्यवस्था केली असेल त्याचे पुढे काय झाले ही बाब पडताळता आलेली नाही.

१४. बी.ओ.टी.कंत्राटदारास सिडको व उर्वरीत शहरात ५००० दिवे बसविणे बाबत कार्यादेश दिलेले आहेत. त्यापैकी संबंधित एजन्सीने ४५०० दिवे टप्प्याटप्प्याने बसविले. विद्युत विभागाने उक्त भागातील सर्व दिवे बसविल्यानंतर देयके अदा करणे आवश्यक होते. तसे न करता टप्प्या-टप्प्याने दिवे बसविल्याप्रमाणे देयके अदा केलेली आहेत.

१५. सिडको भागातील २५० watt व १५० watt दिव्याच्या ठिकाणी ९६ watt उर्जाबचत दिवे लावण्यात आलेले आहेत. सिडको भागात ४२०० दिवे १५० watt व २००० दिवे २५० watt चे आहेत, असे टिपणी वरुन दिसून येते. परंतू सिडको भागात २५० watt चे किती व १५० watt चे किती दिवे बदलले याची सविस्तर माहिती संचिकेत नाही. बेंचमार्क ठरवितांना दोघांचा वेग-वेगळा बेंचमार्क ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे महानगरपालिकेचा फायदा झाला असता. तसे न करता एकच २५० watt चा बेंचमार्क ठरविण्यात आला. ही बाब आक्षेपार्ह असून रक्कम वसूलीस पात्र आहे.

१६. संचिकेतील पान क्र.१३, परिच्छेद क्र.४३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे २५० watt चे जुने दिवे उरलेले नाहीत. अशा आशयाचे प्रमाणपत्र घेतल्यानंतर बी.ओ.टी.च्या ५००० दिव्यांपैकी उरलेली quantity १५० watt चे दिवे change करण्यासाठी वापरावी. असे असतांना उपअभियंता विद्युत यांचे असे प्रमाणपत्र घेतल्याचे दिसून आलेले नाही.

१७. संचिकेतील पान क्र.१३७, परिच्छेद क्र.३५८ दिनांक ३०.११.२०१० नुसार सिडको विभागात ४५०० नग उर्जा बचत फिटींग लावण्याचे काम पूर्ण झालेले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. ४५०० दिवे टप्प्या-टप्प्याने लावले होते. त्या प्रमाणात देयकही अदा केले होते. मात्र नियमित देयक अदा करतांना माहे एप्रिल २००९ ते नोव्हेंबर २०१० पासून दिवे लावलेले नसतांनाही देयक अदा करण्यात आले आहे. ही बाब आक्षेपार्ह असून ज्या दिवशी उर्जाबचत दिवे कार्यान्वित करण्यात आले त्या दिवसापासून देयक द्यावयास पाहिजे होते. दिवे न लावताच मागील कालावधी दर्शवून अदा केलेली रक्कम रू. ४७,०८,६८७/- वसूलीस पात्र आहे. याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कंत्राटदारास अदा केलेली रक्कम वसूल करण्यात यावी.

१८. संचिकेतील पान क्र.१५९, परिच्छेद क्र.४३६ मध्ये मा.आयुक्त यांनी काम अत्यंत असमाधानकारक केले आहे प्रत्येक महिन्याच्या फक्त ५०% रक्कम मान्य. उर्वरीत रक्कम देता येणार नाही असे स्पष्ट शे-यामध्ये नमूद केले असतांनाही माहे डिसेंबर २०१० ते माहे मे -२०११ पर्यंतचे एकूण देयक रक्कम रू. ४६,११,८७०/- अदा करण्यात आले आहे. त्यामधून ५०% रक्कम रू.२३,०५,९३५/- वजावट करुन रक्कम अदा करावयास पाहिजे होती. परंतू का.अ. यांनी ५०% रक्कम withheld करुन ठेवली. सदरील रक्कम संबंधित एजन्सीला अदा केलेली नाही. याची विद्युत व लेखा विभाग यांनी खातरजमा करणे आवश्यक आहे.

१९. संचिकेतील पान क्र.१६८, परिच्छेद क्र.४५७ मध्ये माहे ऑगस्ट २०११ चे देयक अदा करतांना RISK @ COST च्या कामाकरीता रक्कम रु.२ लक्ष WITHHELD केलेली आहे. RISK @ COST चे काम करण्यात आले असेल तर त्यावर किती रक्कम खर्च करण्यात आली याबाबत संचिकेत उल्लेख नाही. सदरील कामी खर्च झालेली रक्कम संबंधिताच्या देयकातून वजावट केलेली नाही. Withheld रक्कम परस्पर संबंधित एजन्सीला अदा केली किंवा कसे याची विद्युत व लेखा विभागाने प्रत्यक्ष तपासणी करुन खर्च केलेल्या रकमेबाबत अहवाल सादर करावा.

२०. संचिकेतील पान क्र.१८७, परिच्छेद क्र.४९० मध्ये RISK @ COST वर रु.५ लक्षची कामे करुन घेण्यात आली आहे. मात्र RISK @ COST वर केलेल्या कामाची यादी अथवा काम करुन घेण्यात आल्याबाबतची माहिती संचिकेत नाही. त्यामुळे प्रत्यक्षात रु.५ लक्षची कामे केली किंवा त्यापेक्षा जास्तीची कामे करण्यात आली याबाबत बोध होत नाही. देयकातून रक्कम वजावट केलेली नाही.

२१. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.७५६, दिनांक २१.२.२०१५ अन्वये जून -२०१५ पर्यंत पथदिवे देखभाल दुरुस्ती करणा-या बी.ओ.टी.कंत्राटदारास मुदतवाढ दिलेली आहे. जून -२०१५ पर्यंत कालावधीत देखभाल दुरुस्तीवर होणारा खर्च रु.६१,५२,५००/-यास मान्यता प्रदान केली आहे. या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर केलेला करार ३१ जानेवारी २०१५ ला पूर्ण झालेला आहे. या नंतरच्या कालावधीत हस्तांतरीत केलेल्या ४५०० दिव्यांची केवळ देखभाल दुरुस्ती करणे अपेक्षित आहे, त्यात "बांधा" ही बाब समाविष्ट असणे अपेक्षित नाही. सबब मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करतांना याचे स्वतंत्र अंदाजपत्रक सादर करुन त्यास मान्यता घेणे अपेक्षित होते. तसे न करता व कोणतीही निविदा प्रक्रिया पार न पाडता विद्युत विभागाने रु.६१,५२,५००/- रकमेचे काम बी.ओ.टी.कंत्राटदारास विनानिविदा मंजूर करण्याचा प्रस्ताव मुदतवाढीचे कारण दर्शवून महापालिका सर्वसाधारण सभेसमोर ठेवला व त्यास मान्यता प्राप्त केली आहे, ही बाब आक्षेपार्ह आहे.

**उक्त मुद्या क्र. १ ते २१ बाबत विभागाने संचिकेची सविस्तर तपासणी करुन शहानिशा करुन / खातरजमा करुन सविस्तर अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक व उक्त मुद्यांशी सुसंगत नाही. सदरील प्रकल्पावर महानगरपालिकेचे झालेल्या आर्थिक नुकसान व इतर अनियमिततेबाबत संबंधितवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१९ : महावितरण कंपनीचे विद्युत देयकातील थकबाकी रकमामुळे मनपाच्या विज बीलाच्या दायीत्वात वाढ होत असल्याबाबत.**

विद्युत विभागाचे वॉर्ड ई / फ अंतर्गत प्राप्त विद्युत देयके तपासणी करण्याकरीता मागविण्यात आली. सन २०१३ मधील एप्रिल महिना व सन २०१४ मधील भरणा केलेल्या महिन्याचे देयक लेखापरीक्षण पथकास विद्युत विभागाने उपलब्ध करुन दिले. विभागास एप्रिल २०१३ प्रमाणे एप्रिल २०१४ चे देयके तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे वारंवार सूचित केले. प्राप्त अभिलेखे तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. विभागा अंतर्गत असलेल्या क्रांतीचौक, मेनपॉवर हाऊस व छावणी या तीन युनिट अंतर्गत असलेल्या मनपाच्या विद्युत मीटरची नोंद व युनिटचे नोंद असलेले रजिस्टर उपलब्ध झालेले नाही.

२. अदा केलेली विद्युत देयकांचे मीटर रिडींग योग्य असल्याचे संबंधित नियंत्रण / तपासणी करणा-या अधिकारी / कर्मचा-याचे अहवाल प्राप्त झालेले नाही, त्यामुळे MSEB मार्फत मनपास प्राप्त बीले योग्य आहेत याची खात्री झाली नाही.

३. विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या देयकांची तपासणी अंती असे निदर्शनास आले की, विद्युत देयकाच्या चालू महिन्याचीच रक्कम अदा केलेली आहे. थकबाकीच्या रकमा का अदा केल्या नाहीत याची माहिती विभागाकडून प्राप्त झालेली नाही. MSEB ने थकबाकी रकमा भरणा न करण्याची मुभा दिलेली असल्यास लेखापरीक्षण विभागास त्याप्रमाणे अवगत केलेले नाही.

४. विद्युत विभागाचे खालील युनिटने उपलब्ध करुन दिलेल्या अभिलेख्या नुसार विद्युत देयकाची रक्कम, भरणा रक्कम व थकबाकीचा तपशिल इत्यादी विवरण खालील तक्त्यात नमूद आहे. त्यापैकी थकीत रकमेची दिवसेंदिवस वाढ होत असून मनपाच्या विद्युत देयकाच्या दायीत्वात वाढ होत आहे. वाढीव दायीत्वाची कारणे व जबाबदार कर्मचारी यांच्या विरुध्द प्रशासकीय कार्यवाही अपेक्षित आहे.

| अ.क्र. | युनिटचे नांव | देकाचा महिना भरणा केलेला महिना | एकूण रक्कम रू. | भरणा रक्कम रू. | थकीत रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | गारखेडा स्ट्रीट लाईट उपविभाग | एप्रिल -१४<br>जुलै -२०१४ | २७,५९,८९५/- | २२,३०,९६१/- | ५,२८,९३४/- |
| २ | चिकलठाणा ईमारत | एप्रिल -२०१४<br>जुलै -२०१४ | ३६,५५,०१४/- | २०,१६,३७९/- | १६,३८,६३५/- |
| ३ | चिकलठाणा सब डिव्हीजन | एप्रिल -२०१४<br>जुलै -२०१४ | ३,६७,३३०/- | २,४५,१५१/- | १,२२,१७९/- |
| | | **एकूण** | **६७,८२,२३९** | **४४,९२,४९१/-** | **२२,८९,७४८/-** |

**करिता, मुद्या क्र. १ ते ४ बाबत विद्युत विभागाने प्रत्यक्ष खातरजमा / शहानिशा करून लेखापरीक्षण विभागास अनुपाल अहवाल सादर करावा असे कळविण्यात आले होते. विभागाने सादर केलेला खुलासा समर्थनीय नाही. महानगरपालिकेच्या दायित्वात झालेल्या वाढीबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

# लेखापरीक्षण अहवाल.
# शिक्षण विभाग
# सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५

**<u>प्रस्तावना :</u>**

मा. मुख्य लेखापरीक्षक यांच्या आदेशान्वये सन २०१३-१४ व सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करण्यात आले. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील सार्वजनिक बांधकाम खात्याकडून भाडे मुल्यांकन करुन देण्याबाबतचे अभिलेखे, विविध केंद्राअंतर्गत कार्यरत शिक्षक कर्मचारी, शिपाई, मजूर, चौकीदार यांचे केंद्रनिहाय ठेवलेले सेवापुस्तक व सेवापट इ., कर्मचारी वेतन अनुदान अभिलेखे, संगणक साहित्य खरेदी अभिलेखे, भाडेतत्वावर देण्यात आलेल्या इमारतीच्या संचिका, अनुदान संचिका, विविध केंद्रांअंतर्गत अस्वच्छ काम करणा-या कामगारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती वाटप बाबतचे नोंदणी रजिस्टर, शालेय साहित्य खरेदी बाबतची देयके, गणवेश/दप्तर/फर्निचर बाबतचे अभिलेखे, वैद्यकीय परिपूर्ती अनुदानाबाबतच्या संचिका, मासिक देयके, दैनिक वेतन/ घड्याळी तासिकेवर काम करणा-या वर्ग -३ कर्मचारी यांच्या संचिका व इतर अभिलेखे चाचणी स्वरुपात उपलब्धतेनुसार तपासण्यात आले. लेखापरीक्षणा दरम्यान काही अभिलेखे विभागाने अपूर्ण स्वरुपात उपलब्ध करुन दिले आहेत.

शिक्षण विभागास लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण <u>४७</u> परिच्छेद समाविष्ट करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे -

## शिक्षणाधिकारी यांच्या कार्यकाळाबाबत.

सन २०१३-२०१४ व सन २०१४-२०१५ या कालावधीत शिक्षण अधिकारी म्हणून उपायुक्त (सिडको) श्री.जाधव बी.एल. यांनी काम पाहिले.

**<u>लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे :</u>**

सदरचे लेखापरीक्षण हे मुख्य लेखापरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आले असून प्रत्यक्ष लेखापरीक्षण करणा-या कर्मचा-यांचा तपशिल पुढील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.नासेर लईख | - | वरीष्ठ लिपीक (पथक प्रमुख) |
| २. | श्री.ईश्वरचंद्र कामेकर | - | कनिष्ठ लिपीक |
| ३. | श्री.विष्णु ओळेकर | - | कनिष्ठ लिपीक |
| ४. | सौ. शिल्पा जोशी | - | कनिष्ठ लिपीक |

**परिच्छेद क्र. ०१ : लेखापरीक्षण कामी लेखे उपलब्ध करून देणे बाबत.**

विभागा अंतर्गत ठेवण्यात येत असलेले खालील तक्त्यात दर्शविलेले अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाहीत.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | शासनाकडून भाडे अनुदान मिळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडून भाडे मुल्यांकन करून देणे बाबतचे अभिलेखे. | |
| २ | आस्थापना विषयक सर्व अभिलेखे. | |
| ३ | शिक्षण विभागास प्राप्त कर्मचारी वेतन अनुदान अभिलेखे. | |
| ४ | शिक्षण विभागातील मंजूर पदे अभिलेखे. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ५ | मे.इस्कॉन फुड रिलिफ फाऊन्डेशन, मुंबई या संस्थेमार्फत मध्यान्ह भोजन पुरवठा करणे बाबतचे अभिलेखे. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ६ | शिक्षण विभागात कार्यरत अनुदानित व विनाअनुदानित वर्ग-३, वर्ग-४ कर्मचा-यांच्या नावासहीत केंद्रनिहाय यादी. | |
| ७ | शिक्षण विभागात कार्यरत दैनिक वेतन कर्मचारी /बालवाडी शिक्षिका यांच्या नावासहीत केंद्रनिहाय / अंतर्गत केंद्रनिहाय यादी. | |
| ८ | विद्यार्थ्यांची केंद्र / अंतर्गत केंद्रनिहाय यादी. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |
| ९ | लेखासाहित्य / संगणक साहित्य खरेदी अभिलेखे / संचिका. | |
| १० | भविष्य निर्वाह निधी लेखे. | |
| ११ | शाळेचे मैदान / बिल्डिंग समारंभासाठी भाडे तत्वावर देण्यासाठीच्या संचिका. | |
| १२ | साठा नोंदवही ,वितरण व ताळमेळ नोंदीचे रजिस्टर , डेड स्टॉक रजिस्टर. | |
| १३ | मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय बन्सीलालनगर येथील वॉचमन यांच्या पगारातून दरमहा घरभाडे कपातीबाबतची माहिती मिळणे बाबत. | अपूर्ण स्वरूपात उपलब्ध |

**विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत संबंधितांविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र. ०२ : महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळांना संगणक उपलब्ध करून देणे बाबत.**

महानगरपालिका अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळांना संगणक प्रयोगशाळे करीता व शालार्थ वेतन प्रणालीच्या कार्यासाठी संगणक खरेदीसाठी दरपत्रक मागविले असता स्टर्लिंग कॉम्प्युटर्स व मे.भक्ती कॉम्प्युटर्स यांचे दरपत्रक विभागास प्राप्त झाले. प्राप्त दरपत्रकापैकी मे.भक्ती कॉम्प्युटर्स यांचे कमी दराचे दरपत्रक आहे. त्यांना जा.क्र.मनपा/शिक्षण/१४/२०४, दिनांक २४.२.२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

सदरील संचिकेत आढळलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी येथे डी.सी.क्र. -३५८, अनुक्रमांक २ वर टिव्ही SEMSP डॉट मॅट्रीक्स प्रिन्टर १ नग प्राप्त नाही असे लाल शाहीच्या पेनाने लिहून त्यावर मुख्याध्यापक यांची सही आहे. तथापि संगणक तपासणी स्पेसीफिकेशन अहवालात जा.क्र.मनपा/संगणक /१९५/१४, दिनांक १२/०५/२०१४ यामध्ये अनुक्रमांक -३ वर केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी रकाना क्रमांक २ आदेशाप्रमाणे प्रिन्टर बरोबर आहे असा उल्लेख असून त्यावर सिस्टीम मॅनेजर यांची स्वाक्षरी आहे. (परिच्छेद क्र.-९३ नुसार).

उपरोक्त दोन्ही अहवालात तफावत निर्माण होत आहे. जर संबंधित शाळेला प्रिन्टर न मिळाल्याचा मुख्याध्यापकांचा अहवाल असतांना सिस्टीम मॅनेजर यांच्या आदेशाप्रमाणे प्रिन्टर बरोबर आहे असा अहवाल देवून महापालिकेची दिशाभूल केलेली आहे. सदरील बाबीनुसार इन्व्हॉईस नं. ०२०, दिनांक ३०/३/२०१४ अदा केलेल्या देयकातील अनुक्रमांक ३ वर प्रिन्टर चे प्रतिनग १५,३०० प्रमाणे प्रिन्टरचे चे (डिस्काऊन्ट ४.७६२% रक्कम रू.७२८=००) वजा जाता १४,५७२/- इतकी रक्कम संबंधितास अदा करण्यात आलेली आहे.

प्रिन्टर प्राप्त नसतांना अदा केलेली एका प्रिन्टर ची किंमत रक्कम रू. १४,५७२=०० वसूलीस पात्र आहे.

२. संचिकेतील परिच्छेद क्र.१५नुसार शाळांमधून संगणक प्रयोग शाळांची उभारणी करण्यासाठी शासनाने आयसीटी हा एक विषय इ.९ ते १० वी साठी अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्यासाठी ही खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीला मनपा शाळेत आयसीटी प्रशिक्षणासाठी कोणते प्रशिक्षक आहेत या बाबत खुलासा व्हावा.

३. शिक्षण विभागासाठी पूर्वीची वेतन प्रणाली चालू असतांना नविन शालार्थ वेतन प्रणालीसाठी नविन खरेदी करण्यात आली. पूर्वीची वेतन प्रणाली सध्या लागू आहे की शालार्थ वेतन प्रणाली याबाबत खुलासा व्हावा. संपूर्ण शिक्षण विभागात एवढ्या मोठ्या प्रमाणात म्हणजे ५ संगणक, ५ प्रिन्टर, ५ युपीएस, ५ स्पिकर खरेदी करण्यात आले याबाबत खुलासा अप्राप्त आहे.

४. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१४२ (२) अन्वये स्टॉक रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. परंतू लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षण कामी स्टॉक रजिस्टर १०९,११०,१११ उपलब्ध न करुन दिल्याने त्याबाबतच नोंदीची शहानिशा करता आलेली नाही.

५. पुरवठा आदेश क्र.मनपा/सशिअ/१३-१४/०८,दिनांक ९.२.२०१४ नुसार अट क्रमांक २ नुसार ७ दिवसाच्या आत संगणक साहित्य पुरवठा करावा असा उल्लेख असतांना पुरवठा दिनांक २७.३.२०१४ (डी.सी.वरील दिनांकानुसार ) रोजी झाल्याचे निदर्शनास येते. झालेल्या विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित होते पण ते झाल्याचे आढळून येत नाही.

उपरोक्त अनियमिततेबाबत खुलासा मागविण्यात आला होता. लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाकडून खुलासा प्राप्त झालेला नाही. महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करावे. तसेच उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा.

**परिच्छेद क्र.०३ : महानगरपालिकेच्या शालेय इमारत भाडे बाबत. (रक्कम रू.८३,१७,३०,६८४/-)**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांना राज्य शासनामार्फत इमारत भाडे अनुदान प्राप्त होत असते. महानगरपालिका मालकीचे शालेय इमारतीच्या थकीत भाड्याबाबतचा प्रस्ताव संचालनालय, शिक्षण विभाग,औरंगाबाद यांचेकडे सादर करण्यात आला होता. तथापि संचालनालया मार्फत दिल्या गेलेल्या सुचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत भाडेनिश्चितीचे मुल्यांकन व प्रमाणित करुन सादर करण्यास कळविले होते.

त्या अनुषंगाने महानगरपालिके मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे भाडे निश्चितीचे मूल्यांकनाची कार्यवाही संदर्भात पाठपुरावा करुन, महानगरपालिकेचे मालकी हक्क असलेल्या शाळांच्या भाडेनिश्चिती व मुल्यांकन प्रमाणपत्र दिनांक ७/३/१४ रोजी हस्तगत करुन घेण्यात आले. शाळा सुरु झाल्यापासून (महिना व वर्षापासून) ते मार्च २००४ पर्यंत प्रत्येक इमारतीचे स्वतंत्र भाडे असे एकूण ५१ शाळा इमारतीचे, इमारत भाडे मागणी रक्कम रु.(८३,१७,३०,६८४/-) अनुदान मागणीचा प्रस्ताव जा.क्र.मनपा/१४/२९२, दिनांक २०/४/२०१४ रोजी शिक्षण उपसंचालक यांना मा.आयुक्त व शिक्षणाधिकारी महानगरपालिका यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आल्याचे आढळून आले.

उपरोक्त अनुदानाच्या मागणी प्रस्तावाचे संदर्भाने व प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यापासून आज तारखे पावेतो किती कोटी रकमेचे व संदर्भिय अनुदानाबाबतच्या प्राप्तीसाठी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. प्रतिवर्षानुसार अनुदानाची मागणी केली असता मनपाचे आर्थिक नुकसान वाचविता आले असते. या अनियमिततेबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने संबंधित विभागाकडे पाठपुरावा करुन इमारत भाडे अनुदान प्राप्त करुन घ्यावे. तसेच उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०४ : महानगरपालिका शाळेतील इयत्ता १० वीतील विद्यार्थ्यांसाठी प्रश्न संच पुस्तीका खरेदीबाबत. (रक्कम रू.१,७९,६१०=००)**

महानगरपालिकेच्या शाळेतील इयत्ता १० वीतील विद्यार्थ्यांना प्रश्नसंच पुस्तके खरेदीबाबत रक्कम रु.१,७९,६१०=०० खर्च झालेला आहे. माहे सप्टेंबर -२०१३ मध्ये इयत्ता १० वीतील एकूण ४४० विद्यार्थी (पटसंख्या नुसार) मराठी माध्यम -३४१ व उर्दू माध्यमाचे ९९ इतके आहे. यामध्ये नवनित प्रकाशनाचे मार्गदर्शक व प्रश्नसंच पुस्तीका बाजारात उपलब्ध असलेले त्यांचे दर प्रमाणे खरेदी करणे करीता दिनांक १८.१२.२०१३ रोजी सादर केलेले आहे. याची मान्यता दिनांक ३.१.२०१४ रोजी मा.आयुक्त यांनी दिलेली आहे. सदरची पुस्तके खरेदी करीता बाजारभाव दर दरपत्रका मागणी पूर्वीच कशा आधारे निश्चित केले याचा बोध होत नाही.

**सदरची खरेदी करीता पुरवठाधारक मे.अदित्य इंटरप्रायजेस यांना आदेश क्र.मनपा/शिक्षण/१७०/१४, दिनांक १२.२.२०१४, अन्वये देण्यात आले. उक्त प्रकरणी शिक्षण विभागाने विना निविदा खरेदी केलेली आहे. याबाबत विभागाकडून खुलासा मागविण्यात आला असता लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा प्राप्त झालेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०५ : स्वच्छता साहित्य (फिनाईल कॅन) खरेदी बाबत. (रक्कम रू.३५,४६०)**

औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागातील एकूण ७७ शाळेस स्वच्छता साहित्य (फिनाईल कॅन) ५ किंवा १० लिटर नामांकित कंपनीचे असलेले फिनाईल खरेदीसाठी दरपत्रके मागविण्यात आले असता मे.राज ट्रेडर्स, मे.यश ट्रेडिंग, मे.स्टार ट्रेडर्स अशी एकूण तीन दरपत्रके प्राप्त झ ाली. त्यामध्ये तुलनात्मक दृष्ट्या मे.यश ट्रेडींग यांचे सर्वात कमी दर रू.४५/- प्रति (१ लिटर) आहे. दरपत्रकामध्ये पुरवठा धारकाचे नमूद केल्याप्रमाणे ५ लिटर पॅकींग कॅन असून त्याची किंमत रू.२२५/- होणार आहे. संचिकेतील परिच्छेद क्र.१३ मा.आयुक्त महोदय तसेच परिच्छेद क्र.२८ मा.मुख्य लेखाअधिकारी यांचे मान्यतेनुसार मे.यश ट्रेडिंग औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात आले. एकूण ७८५ लिटर इतक्या साहित्याची प्रतिलिटर प्रमाणे १५७ फिनाईल कॅन खरेदी केल्या. फिनायल कॅन १५७ X २२५ = ३५,३२५ व तीन लिटर सुट्टी पॅकींग रू.४५X३=१३५ असा एकूण रू.३५,४६०/- चे देयक अदा करण्यात आले. संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.यश ट्रेडिंग यास मालाचा / साहित्य पुरवठा आदेश देण्यात आले याची प्रत संचिकेत दिसून आली नाही.
२. मागणी केलेले साहित्य प्राप्त झाल्याबाबत (डी.सी.वर) कोणत्याही कर्मचा-यांची स्वाक्षरी नाही.
३. मे.यश ट्रेडींग यांचे मार्फत ७८५ लिटर फिनेल पुरवठा झालेला असून सदरचे फिनेल एकूण १० केंद्र व त्याचे अंतर्गत शाळा यांना एकूण ७४६ लिटर फिनेल वितरीत केल्याचे त्यांचे मागणी पत्रावरुन दिसून आले. एकूण ७८५ लिटर फिनेल पैकी वितरीत केलेले एकूण ७४६ लिटर फिनेल वजा जाता शिल्लक - ३९ लिटर फिनेल व ३ लिटर सुट्टे फिनेल असे एकूण ४२ लिटर फिनेल शिल्लक बाबतचे स्टॉक रजिस्टर वितरीत केलेले रजिस्टर तपासणी करीता उपलब्ध झालेले नाही.
४. मे.यश ट्रेडिंग कंपनी यांचे देयक क्र.३१५, दिनांक निरंक. रक्कम रू.३५,४६०/- मधून एल.बी.टी. नोंद व एल.बी.टी. क्रमांक असल्याचे दिसून आले नाही आणि एल.बी.टी.ची नियमाप्रमाणे लेखा विभागाने रक्कम कपात केलेली नाही.

**लेखापरीक्षण कामी अपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून देणे ही बाब संशयास्पद आहे. उपरोक्त बाबत विभागाने जबाबदारी निश्चित करून कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०६ : दिलासा मनोविकास फाऊंडेशन मार्फत अभ्यास कौशल्य हा उपक्रम राबविणे बाबत.**

दिलासा मनोविकास फाऊंडेशन (दिलासा जनविकास प्रतिष्ठाण) औरंगाबाद यांचे दिनांक १९.३.२०१४ च्या पत्रानुसार उपक्रम राबविण्याबाबत तयारी दर्शविली होती. सदरील उपक्रम हा ९ वी मधून १० वीत प्रविष्ठ होणा-या १२ शाळेतील ६०० विद्यार्थ्यांसाठी प्रती शाळा ८०००, आठवड्यातून २ दिवस याप्रमाणे एकूण खर्च रक्कम रू.९६,०००=०० असे प्रस्तावित केलेले होते.

सदरील खर्च शिक्षणाचा मुलभूत हक्क योजना -२००९ आरटीई ॲक्ट -२००९ अंतर्गत करण्यात आला.

उक्त संचिका तपासली असता त्यात आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे

१.(अ) दिलासा मनोविकास फाऊंडेनशन यांचे पत्र दिलासा /जा.क्र./१६७/१४, दिनांक ०३.०१.२०१४ नुसार दिलासा जनविकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा यांनी मा.शिक्षणाधिकारी यांना उपक्रम राबविण्यासाठी विनंती केली असल्याचे आढळून आले. तद्नंतर दिलासा जनविकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा यांनी मा.आयुक्त यांना दिलासा जा.क्र./१६७२५, दिनांक ९.१.२०१४ अन्वये परत विनंती करून महापालिकेच्या अंतर्गत १० शाळांना प्रत्येकी ६००० यानुसार ६०,००० एकूण खर्च येईल असे कळविले होते.

(ब ) यानंतर दिलासा जा.क्र./१६७७२, दिनांक १८.३.२०१४ अन्वये मा.शिक्षणाधिकारी यांना पत्र लिहून योजना राबविण्यासंबंधी पत्रव्यवहार करण्यात आला.

(क) तद्नंतर दिनांक १९.३.२०१४ रोजी मा.आयुक्त यांना योजना राबविण्यासंबंधी परत प्रस्तावित करून सदरील योजना राबविण्यासाठी प्रत्येकी ८००० यानुसार १० शाळांना प्रत्येकी ८००० यानुसार ८०,००० असे कळविले होते.

उक्त संचिका तपासली असता वरील मुद्दा अ व मुद्दा ब मध्ये तफावत आढळून येते. प्रत्यक्षात सदरील योजना १२ शाळांसाठी राबविण्यात येवून ९६,००० एवढा खर्च दाखविण्यात आला.

मुद्दा क्र.अ नुसार जर कार्यवाही झाली असती तर दिलासा जनविकास प्रतिष्ठानच्या दिनांक ०९.०१.२०१४ च्या प्रस्तावित दराप्रमाणे १२ शाळांसाठी प्रत्येकी ६००० असा एकूण ७२,०००=०० इतका खर्च आला असता आणि रू.२४,०००/- ची महानगरपालिकेची बचत झाली असती पण असे झालेले प्राप्त संचिकेनुसार आढळून येत नाही. जास्तीची अदा केलेली रक्कम रू.२४,०००=०० वसूलीस पात्र.

१. सदरील कार्यक्रम हा ६०० विद्यार्थ्यांसाठी करण्याचे प्रस्तावित होते. तथापि प्रत्यक्षात फक्त ४०८ विद्यार्थी ह्या कार्यक्रमात सहभागी झालेले होते. या ठिकाणी देखील झालेल्या खर्चात वाटाघाटी करण्यास वाव होता. परंतू तसे झालेले आढळून आले नाही ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. संचिकेत प्रस्तावित केल्याप्रमाणे दिलासा जनविकास प्रतिष्ठान तर्फे १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास कौशल्य कार्यक्रम प्रत्येक शाळेत २ दिवस असे दिनांक ४ जुलै २०१४ पासून ते २ सप्टेंबर २०१४ पर्यंत राबविण्यात आला. प्रत्येक शाळेसाठी हा उपक्रम २ दिवस स्वतंत्रपणे राबविण्यात आला. केंद्रीय प्राथमिक शाळेच्या अंतर्गत येणा-या शाळा यात एकत्रितपणे समाविष्ठ करून झालेल्या खर्चात बचत करता आली असती.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.०७ : स्वच्छता साहित्य (झाडू, कुंचे) खरेदी बाबत. (रक्कम रू.४९,९५०/-)**

महानगरपालिका शिक्षण विभागा अंतर्गत ७७ शाळेस स्वच्छता साहित्य (झाडू, कुंचे) नामांकित कंपनीचे असलेले साहित्य पुरविण्याचे दरपत्रके मागविण्यात आले असता त्या दरम्यान मे.राज ट्रेडर्स, मे.स्टार ट्रेडर्स, मे.यश ट्रेडिंग कंपनी अशी एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली. त्यामध्ये तुलनात्मक दृष्ट्या मे.राज ट्रेडर्स यांचे रू.७५/- प्रति नग सर्वात कमी दर प्राप्त झाले. संचिकेतील परिच्छेद क्र.११ नुसार मा.आयुक्त महोदय तसेच परिच्छेद क्र.२६ मा.मुख्य लेखा अधिकारी यांचे मान्यतेनुसार मे.राज ट्रेडर्स औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात आले. मे.राज ट्रेडर्स यांनी (झाडू, कुंचे) एकूण ६६६ साहित्याचा पुरवठा करून देयक क्र.१६९ दिनांक ७.३.२०१४ रक्कम रू.४९,९५०/- चे देयक अदा करण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.राज ट्रेडींग यास साहित्य (झाडू, कुंचे) पुरवठा आदेश देण्यात आले याची प्रत संचिकेत दिसून आली नाही. तसेच मागणी केलेले साहित्य प्राप्त झाल्याबाबत (डी.सी.) वर कोणत्याही कर्मचा-याची स्वाक्षरी व दिनांक नाही, त्यामुळे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री होत नाही.

२. मे.राज ट्रेडींग यांचे एकुण १० केंद्र व त्यांचे अंतर्गत शाळा यांना एकूण ६६६ झाडू, कुंचे वितरीत केलेले स्टॉक रजिस्टर तपासणी करीता उपलब्ध झालेले नाही.

३. मे.राज ट्रेडर्स यांचे देयक क्र.१६९, दिनांक ७.३.२०१४ रक्कम रू.४९,९५०/- मधून एल.बी.टी नोंद व एल.बी.टी. क्रमांक असल्याचे दिसून आलेले नाही आणि एल.बी.टी. ची नियमाप्रमाणे लेखा विभागाने रक्कम कपात केलेली नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०८ : लेखा विभागाचा अभिप्राय न घेता व अंतर्गत लेखापरीक्षकाकडून तपासणी न करताच अदा करण्यात आलेल्या देयकाबाबत.**

शिक्षण विभागाकडून होत असलेल्या खर्चाच्या संदर्भात ब-याच अंशी संचिका ह्या लेखा विभागातील कार्यरत अंतर्गत लेखापरीक्षकाकडून तपासणी न करताच अदा करण्यात येतात. यापूर्वी विभागास निर्गमित करण्यात आलेल्या अर्धसमासा सोबत नमुन्यादाखल लक्षात आणून दिलेली आहेत. त्याबाबतचा विभागाने खुलासा केलेला नाही.

**तसेच लेखापरीक्षण अहवाल अंतीम होईपर्यंत माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.०९ : महानगरपालिका अंतर्गत इयत्ता १० वी तील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नसंच पुस्तिका खरेदी करणे बाबत.**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील महानगरपालिका एकूण १२ माध्यमिक शाळेतील इ.१० वीतील माहे सप्टेंबर २०१३ च्या पटसंख्या नुसार ज्यात मराठी माध्यमाचे ३४१ व उर्दू माध्यमाचे ९९ या विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे प्रश्नसंच व मार्गदर्शक पुस्तिका नवनित प्रकाशनाचे मार्गदर्शक व प्रश्नसंच पुस्तिका देण्याच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांची मंजूरी दिनांक ३.१.२०१४ अन्वये देण्यात आली. त्याप्रमाणे जाहिर दरपत्रक सूचना अन्वये मे.आदित्य एन्टरप्राईजेस मे.मारूती एंटरप्रायजेस, मे.सेल वेल अशी एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली. दरपत्रके उघडण्यात आली असता तुलनात्मक दृष्ट्या कमी दराचे मे.आदित्य एंटरप्रायजेस यांचे दर दरपत्रकात नमूद केल्याप्रमाणे प्राप्त झाले. त्यास मा.आयुक्त यांनी दिनांक २०.०२.२०१४ अन्वये खरेदी करण्यासाठी आदेश देण्यात आले त्या अन्वये संबंधिताला जा.क्र./मनपा/शिक्षण /२०१४ /१७०, दिनांक १२/०२/२०१४ पुरवठा आदेश निर्गमित करून देयक क्र.०९, दिनांक १४.०२.२०१४ रक्कम रू.१,७९,६१०/- देयक अदा करण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. प्रश्नसंच पुस्तिका खरेदीसाठी जाहिर दरपत्रक सूचना कोणकोणत्या वर्तमानपत्रात देण्यात आले त्यांची कात्रण संचिकेत दिसून आलेली नाही.

२. मे.आदित्य एंटरप्रायजेस यांना पुरवठा आदेश दिल्यानंतर संचिकेतील छायांकित प्रत डीसी नं. १२४ दिनांक १४/०२/२०१४वर माल प्राप्त झाल्याबाबतची स्वाक्षरी / पोच नाही. तसेच डीसी वर बी.एस.टी. व सी.एस.टी.नंबर नाही.

३. मे.आदित्य एंटरप्रायजेस यांचे देयक क.०९, दिनांक १४.०२.२०१४ असून ते छायांकित प्रतित असून त्यावर एल.बी.टी. नोंदणी क्रमांक नसल्याने सदरील देयकातून नियमाप्रमाणे एल.बी.टी.कपात होणे आवश्यक होते ते कपात करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

४. मे.आदित्य एंटरप्रायजेस यांच्याकडून आदेशान्वये प्रश्नसंच पुस्तिकेचा पुरवठा झाल्याचे संचिकेवरुन दिसून येते. परंतू एकूण १२ शाळांना वितरीत केल्याबाबतचे स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणास लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१० : महानगरपालिका अंतर्गत इयत्ता १० वी च्या परिक्षेसाठी उत्तरपत्रिका पुरवणी पेपर इत्यादी बाबी पुरविणे बाबत. (रक्कम रू.३३,३१७/-)**

सन २०१३-१४ या वर्षातील महानगरपालिका अंतर्गत एकूण १२ माध्यमिक शाळेतील इ.१० वी च्या मासिक सरावाच्या परिक्षेसाठी शाळांना उत्तरपत्रिका , पुरवणी पेपर बास्कोड होलोग्राम / स्टीकर सह, नकाशे पेपर, आलेख, पेपर इत्यादी साहित्य पुरविण्याबाबत स्थानिक पुरवठाधारकाकडून दरपत्रिका मागविण्यात आल्या असता मे.राहुल ट्रेडर्स, मे.साईकृपा एंटरप्रायजेस, के.महाराष्ट्र एंटरप्रायजेस अशी एकूण तीन दरपत्रके प्राप्त झाली. दरपत्रके उघडण्यात आली असता तुलनात्मक दृष्ट्या कमी दर मे.साईकृपा एंटरप्रायजेस औरंगाबाद यांचे आहे. मा.शिक्षणाधिकारी यांच्या आदेशान्वये वाजवी दराप्रमाणे खरेदी करण्यासाठी मा.उ.आ.(म) व मा.आयुक्त यांची मंजूरी दिनांक ३१.३.२०१४ रोजी देण्यात आली.

त्याप्रमाणे संबंधित एजन्सीधारकास जा.क्र.मनपा/शिक्षण/३१६/१/२०१४, दिनांक ३१.३.२०१४ द्वारे पुरवठा आदेशित निर्गमित करण्यात आले. संबंधित एजन्सीधारकाचे देयक क्र.६८५ दिनांक ३१.३.२०१४ सादर केले. त्याप्रमाणे रक्कम रू.३३,३१७/- अदा करण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. मे.साईकृपा इंटरप्रायजेस यांना दिनांक ३१.३.२०१४ ला संचिकेतील प्रत डीसी नं. ९०४ ते ९१२ व ९१५ व ९१८ दिनांक ७.२.२०१४ वर माल प्राप्त झाल्याबाबत डीसी वर दिनांकाचा उल्लेख केलेला नाही. तसेच डीसी वर वी.एस.टी. व सी.एस.टी. नंबर नाही.

२. मे.साईकृपा इंटरप्रायजेस यांचे देयक क्र.६८५ दिनांक ३१.३.२०१४ असून त्यावर एल.बी.टी. नोंदणी क्रमांक नसल्याने सदरील देयकातून नियमाप्रमाणे एल.बी.टी कपात होणे आवश्यक होते ते कपात करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

३. मे.साईकृपा इंटरप्रायजेस एकूण १३ शाळेत उत्तरपत्रिका पुरवठा ३६०० डीसी प्रमाणे ३९२१, पुरवणी पेपर पुरवठा आदेशाप्रमाणे ७९०० डीसी प्रमाणे २८५० बास्कोट होलीग्राम / स्टीकर पुरवठा आदेशा प्रमाणे ३६०० डीसी प्रमाणे ७०६२ आलेख पेपर / नकाशे पेपर पुरवठा आदेशा प्रमाणे ८०० याप्रमाणे प्रत्येक शाळेस वाटप करण्यात आले मात्र साहित्य जास्त वाटप करण्यात आले व काही साहित्य कमी वाटप झाले कमी वाटप झाल्याबाबत व जास्त वाटप झाल्याबाबत स्टॉक रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही.

४. संबंधित साहित्य दिनांक ७.२.२०१४ ला प्राप्त झाल्याबाबत डीसी वरून दिसून येते. तसेच देयक दिनांक ३१.३.२०१४ लाच देण्यात आले. म्हणजेच साहित्य अगोदर प्राप्त करून घेण्यात आले व पुरवठा आदेश देयक एकच तारखेस देण्यात आले याबाबत बोध होत नाही.

**विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.११ : भविष्य निर्वाह निधी लेखे लेखापरीक्षणा करीता सादर न केल्याने अपूर्णतेबाबत.

शिक्षण विभागातील भविष्य निर्वाह निधीचे ब्रॉडसिट, खाते नोंदवही इत्यादी लेखे उपविधी १० (३) नुसार अद्ययावत ठेवणे बंधनकारक असतांना त्याची अंमलबजावणी होत नाही.

सन २०१३-१४ व सन २०१४-१५ चे अभिलेख्यांची मागणी केली असता सदर वर्षातील ब्रॉडसिट अपूर्ण असून जमा व खर्चाचा मेळ घेतलेला नाही. तसेच भविष्य निर्वाह निधीचे खाते नोंदवहीसुध्दा अपूर्ण असल्याने उपविधी क्र. १० (३) चा भंग होत आहे. त्यामुळे सदर अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

कर्मचा-यांच्या खात्यावर जमा होत असलेले व्याज योग्य प्रमाणात आहे काय याची लेखापरीक्षणात खात्री करता आलेली नाही. अनेक कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अग्रिम घेतात व त्याची परतफेड करतात किंवा नाही याची खात्री लेखापरीक्षणात करता आलेली नाही. अद्ययावत लेख्या अभावी या संपूर्ण प्रक्रियेत कशा प्रकारे नियंत्रण ठेवले जाते हे स्पष्ट होवू शकले नाही.

सदर बाब ही गंभीर स्वरुपाची व नुकसान करणारी आहे. त्रुटी व वसूलपात्र रक्कम निघण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१२ : दिनांक १.११.२००५ व तद्नंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांना नविन अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू करणे बाबत.**

दिनांक १.११.२००५ व तद्नंतर मनपाच्या सेवेत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांची नियुक्ती आदेशात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ लागू होणार नसल्याबाबत अट स्पष्टपणे नमूद आहे. असे कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर / सेवेत असतांना मृत झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतन मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारची योजना लागू केली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

अस्तित्वात असलेले निवृत्ती वेतन १.११.२००५ रोजी किंवा तद्नंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना लागू नसल्याने व इतर पर्यायी योजना लागू न केल्याने दिनांक १.११.२००५ व तद्नंतर नियुक्त कर्मचा-यांना कोणतेही निवृत्ती वेतन मिळणार नाही.

करिता, दिनांक १.११.२००५ व त्यानंतर नियुक्त झालेल्या / होणा-या शिक्षण विभागातील महानगरपालिका सेवेतील कर्मचारी यांचेकरीता त्वरीत निवृत्ती वेतन योजना तयार करून लेखापरीक्षण विभागास त्या योजनेचे स्वरूप, राबविण्याची कार्यपध्दती, लेखांकन पध्दती इ.बाबत अनुषंगिक कार्यवाही करून लेखापरीक्षण विभागास अवगत करावे असे कळविले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१३ : लेखन, स्वच्छता व छपाई साहित्य खरेदी संचिकेबाबत.**

**१) लेखन, साहित्य खरेदी रक्कम रू. १,६६,०३२/-**
**२) स्वच्छता साहित्य खरेदी रक्कम रू.१,७८,२६९/-**

शिक्षण विभागाचे स्वतंत्र भांडार विभाग असून शिक्षण विभागासाठीच्या साहित्याची खरेदी त्यांच्या विभागामार्फतच होते.

तथापि शिक्षण विभागात नियम १४२ (२) अन्वये स्टॉक रजिस्टर नमुना १०९,११० १५२(१),१११ ठेवणे आवश्यक असून त्यास सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित करणे आवश्यक असतांना त्याचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. अर्धसमासा सोबत नमुन्या दाखल साहित्य खरेदी संबंधी तक्ते दिलेली आहेत. लेखापरीक्षण तपासणी दरम्यान नमुना ११०,१११,११२ रजिस्टर तपासणीस उपलब्ध न झाल्यामुळे भांडार खातेवहीत जमेच्या बाजूस साहित्य किती आहे. किती वितरीत झाले व किती शिल्लक आहे याबाबत खातरजमा झालेली नाही.

उपरोक्त साहित्य खरेदी ही महानगरपालिकेच्या मुख्य भांडार विभागाकडून दिनांक १७.१०.२०१३ रोजी मान्य केलेल्या दरपत्रकानुसार करण्यात आलेली असल्याचे आढळून आलेले आहे. शासन निर्णय २ जानेवारी १९९२ मधील परिशिष्ठ-७, परिच्छेद ८.३ (ह) नुसार पुर्नप्रत्ययी आदेश देतांना मूळ आदेशातील दरापेक्षा बाजारातील दर कमी झाले नसल्याबाबत खात्री करण्यात येण्याबाबत स्पष्ट मार्गदर्शन आहे. परंतू संचिकेत असे कुठलेही अवलोकन झाल्याचे निदर्शनास आलेले नाही ही बाब नियमबाह्य आहे. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१४ : भविष्य निर्वाह निधीचे वर्गणीदाराला लेखा विवरणपत्र पाठविणे बाबत.**

महाराष्ट्र शासन राजपत्र १९९९ नियम ३५ अन्वये लेखाधिकारी यांनी प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चनंतर शक्य तितक्या लवकर प्रत्येक वर्गणीदाराला निधीतील त्यांच्या लेख्यांचे विवरणपत्र पाठविणे आवश्यक आहे अशा विवरण पत्रात वर्षातील १ एप्रिल रोजीची प्रारंभीची शिल्लक, वर्षात जमा केलेली किंवा काढलेली एकूण रक्कम आर्थिक वर्षाच्या ३१ मार्च रोजी जमा केलेली व्याजाची रक्कम आणि त्या दिनांकाची अखेरची शिल्लक नमूद करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र १९९९ भाग ४ (अ) नुसार लेखाधिका-याकडून वार्षिक लेखा विवरणपत्र प्राप्त झाल्यावर विभाग प्रमुख तो संबंधित वर्गणी दारामध्ये वितरण करावे आणि मान्यता घ्यावी असा नियम आहे.

तथापि शिक्षण विभागातील लेखे व संचिका तपासणी केली असता उपरोक्त नियमांचे उल्लंघन होत आहे. वर्गणीदाराला त्यांचे विवरणपत्र देणे आवश्यक असतांना विवरणपत्र निर्गमित केलेली नाहीत.

उक्त संचिका वगळता इतर भविष्य निर्वाहनिधीचे अभिलेखे अद्ययावत नसल्याने वर्गणीदाराला विवरणपत्र देण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. वर्गणीदाराच्या वेतनातून कपात झालेली रक्कम त्याच्या खात्यात संदर्भ वर्षात जमा झाल्याची खात्री वर्गणीदाराला होणे आवश्यक आहे.

**विवरणपत्र कर्मचारी यांना उपलब्ध करून न देणे ही बाब संशयास्पद आहे. त्यामुळे जमा व वाटप रकमेचा ताळमेळ लेखापरीक्षणात पडताळता आलेला नाही. भविष्य निर्वाह निधीचें अभिलेखे अद्ययावत करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १५ : सन २०१४-१५ या वर्षासाठी शालेय विद्यार्थ्यांना गणवेश खरेदीसाठी अनुदान वाटप रक्कम रू.३४,८२,४००/-(स.शि.अ.लाभार्थी विद्यार्थी व्यतिरिक्त)**

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मनपाच्या शिक्षण विभागाकडून दरवर्षी प्रमाणे मनपाच्या एकूण ७८ शाळेतील वंचित विद्यार्थ्यांना सर्व बालवाडी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १ ली ते ८ वी व इयत्ता ९ वी व १० वीतील विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश खरेदीसाठी एकूण ७८ शाळेतील विद्यार्थ्यांना प्रती विद्यार्थी रू.४००/- प्रमाणे एकूण ८७०६/- विद्यार्थ्यांना एकूण रक्कम रू.३४,८२,४००/- खर्च अपेक्षित होता. सदर खर्च हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेच्या अंतर्गत तरतूदीतून खर्चास मा.आयुक्त यांच्या मंजूरी अन्वये मा.सभापती, स्थायी समिती यांचेकडे ठराव पाठविण्यात आला असता दिनांक ८.८.२०१४ विषय क्र.३८ अन्वये सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. त्याप्रमाणे सदरील शाळांना व्यवस्थापन समिती सचिव मुख्याध्यापकांच्या नांवे धनादेशाद्वारे गणवेश खरेदी अनुदान वितरीत करण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस-१७, परि.क्र.५५ वर धनादेश क्र.२३३८२९, २३३८३८,२३३८४६,२३३८५०,२३३८५९,२३३८७८, दिनांक १५.९.२०१४ चे एकूण ६ धनादेश रद्द करण्याबाबत मंजूरी घेण्यात आलेली आहे.

यापैकी दोन धनादेश क्र. २३३८४६,२३३८७८, संचिकेत संलग्न असून अद्यापपावेतो रद्द करण्यात आलेले नाही. उर्वरीत रद्द झालेले धनादेश संचिकेत दिसून आलेले नाही म्हणजेच उक्त चार धनादेश वटलेले आहे किंवा नाही याची खात्री करता आलेली नाही.

२) संचिकेतील पृष्ठ क्र.१८, परिच्छेद क्र.५६,५७ मध्ये लेखापाल यांनी सादर केलेले जास्तीच्या रकमेबाबतचे धनादेश रद्द करून त्याची नोंद Receipt side वर write back entry घेणे विभागास बंधनकारक असतांना विभागाने सदरील धनादेश रद्द करण्यात आलेले रजिस्टर लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

३) संचिकेतील पत्र जा.क्र.मनपा/शिक्षण-२०१५/३७, दिनांक २३/१/२०१५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मोफत गणवेश वाटप अंतर्गत के.प्रा.शाळा सिडको एन-९ बालवाडी, आंबेडकरनगर, फुलेनगर, गौतमनगर, सिध्दार्थनगर शाळेमधील एकूण विद्यार्थी संख्या २५४ होती. प्रत्येकी रु.४००/- प्रमाणे एकूण रु.१,०१,६००/- च्या खर्चाचे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

मात्र खर्चाबाबत लेखा विभागाची मंजूरी घेण्यात आली होती काय ? व मंजूरी घेतली असल्यास कोणत्या क्रमांकाचे धनादेश संबंधित शाळांना वाटप करण्यात आले याची खात्री करता आली नाही. विभागाने याबाबत खुलासा करावा.

४) सदरील संचिकेवरुन दिसून आले की, धनादेश क्र.२३३८२८ व २३३८१६, दिनांक १५/९/२०१४ संबंधित शाळेस धनादेश वाटप केलेले नसून ते अद्यापही संचिकेमध्ये आजपावेतो संलग्न केलेले आहेत. याबाबत अद्यापही कार्यवाही केलेली नाही याचा खुलासा विभागाने करावा.

५) शिक्षण विभागाने गणवेश वाटप अनुदान दिलेल्या शाळेकडून शाळा स्तरावर दिनांक निहाय संपूर्ण हिशोब ठेवण्यात यावा. गणवेश शिवून झाल्यानंतर त्यांची तांत्रिक समितीद्वारे तपासणी करून घेण्यात यावी. सर्व कार्य उपरोक्त निर्देशानुसार पूर्ण झाल्यावर विनियोग प्रमाणपत्र १५ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.अन्यथा योग्य ती कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे मा.आयुक्त यांचे आदेश असतांना कार्यवाही प्रस्तावित आजपर्यंत करण्यात आली नाही असे संचिका तपासणी मध्ये दिसून आले आहे.

६) गणवेश प्रित्यर्थ प्रती विद्यार्थी रु.४००/- प्रमाणे शाळांना वाटप केलेले अनुदान रक्कम वाटप झाल्यानंतर काही रक्कम शिल्लक राहिली असल्याने संचिका मधील काही शाळाच्या विनियोग प्रमाणपत्रावरुन दिसून आले. सदरील शिल्लक अनुदान रक्कम तात्काळ मनपा फंडामध्ये जमा करणे आवश्यक आहे. ती अद्यापही शाळेच्या बँक खात्यावरच जमा / शिल्लक असल्याचे नमूद आहे.

**तरी वरील मुद्या क्र.१ ते ६ बाबतचे विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी व तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असेसूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.१६ : महानगरपालिका माध्यमिक शाळेसाठी घड्याळी तासिकेवर शिक्षक नेमणूकीबाबत.**

शाळेसाठी घड्याळी तासिके तत्वावर शिक्षण भरती बाबतची संचिका तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. शासन निर्णय क्र. (ए.एम.मसी) १४२०००/२२०३/ (प्र.क्र.१३८ /२००० / नवि-२४) मंत्रालय मुंबई दिनांक १० नोव्हेंबर २००३ अट क्र.१ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने यापुढे शासनाच्या मान्यतेशिवाय रोजंदारीवर, ठराविक वेतनावर अथवा अन्य मार्गाने कर्मचारी नियुक्त करु नये. असे असतांना नियुक्ती करण्यात आल्याचे आढळून येते. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

२. परिच्छेद क्र.३४, टिपणी पृष्ठ क्र.-९ नुसार मनपा शिक्षकापैकी ४० शिक्षक बी.ए.बी.एड शैक्षणिक अर्हता धारण करणारे होते. या शिक्षकांमधून नविन माध्यमिक वर्गाची गरज भागवून नविन केवळ १२ शिक्षक भरती करणे बाबत उल्लेख असतांना करण्यात आलेली ४७ शिक्षकांची भरती का अमान्य करण्यात येवू नये ? याचा खुलासा व्हावा.

३. परिच्छेद क्र.११३ नुसार माध्यमिक शाळांतील शिक्षकांच्या तासिका तत्वावरील मानधनात रु.५४ ऐवजी रु.७५/- प्रति घड्याळी तास या प्रमाणे वाढ करण्यास प्रस्तावित आहे.ती मंजूर करुन परत परि.क्र.२४५ अन्वये रु.७५/- ऐवजी रु.९०/- वाढ प्रस्तावित करुन तीस विशेष बाब म्हणून मान्यता देवून ज्या विषयातील निकाल चांगला नाही त्यांना समज देण्यात यावी तसेच दर महिन्याला अभ्यासक्रमावर परिक्षा घेण्यात यावी असे मा.आयुक्त यांनी उल्लेखित केलेले आहे.

उपरोक्त मानधन वाढीस शासनाची मान्यता नसल्याचे आढळून येते. तासिका तत्वावरील शिक्षकांवर किती खर्च झाला व कोणत्या लेखाशिर्षा अंतर्गत झाला आणि दर महिन्याला अभ्यासक्रमावर परिक्षा घेतल्या गेल्या का ? ते स्पष्ट करावे. वाढीव खर्च वसूलीस पात्र आहे.

४. माध्यमिक शाळा संहिता अधिनियम ५.१ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार कोणत्याही माध्यमिक शाळेला ३.१ व ३.२ ची मान्यता मा.शिक्षण उप-संचालक मार्फत प्रदान केल्या जाते. ती मान्यता खालील शाळांना दिली नसल्याचे संचिके वरुन निदर्शनास येते. फक्त (२) शाळा अनुक्रमे के.प्रा.शा. मुकुंदवाडी व प्रा.शा. मिटमिटा यांनाच संच मान्यता घेण्यात आली असल्याचे आढळून येते.

१. के.प्रा.शा. बेगमपुरा.
२. किराडपुरा नं. -१
३. शहाबाजार
४. हर्सूल
५. सिडको एन-७
६. नारेगांव
७. प्रियदर्शनी इंदिरानगर बायजीपुरा
८. बन्सीलालनगर
९. बनेवाडी
१०. इंदिरानगर बायजीपुरा.

३.१ ची मान्यता म्हणजेच शासन मान्यतेनंतर त्या शाळेचे अस्तित्व, ठिकाण, इमारत, शिक्षक, विद्यार्थी इ.आहेत किंवा नाही याची खात्री देणारे प्रमाणपत्र होय. सदरील मान्यता नसतांना केलेली भरती नियमबाह्य आहे.

५. परिच्छेद क्र.११३ विषय क्र.७ नुसार १६ अतिरिक्त शिक्षकांची तातडीने नियुक्ती करण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यासही कृपया मंजूरी देण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे. मान्य झाल्यास या संदर्भातील पुढील आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात येईलअसे उपआयुक्त (म) यांनी प्रस्तावित केले आहे. त्यास परि.क्र.११४ अन्वये मा.आयुक्तयांनी दिनांक २.५.२०१३ रोजी मान्यता दिल्याचे संचिकेत आढळून येते. तथापि कोणतीही जाहिरात प्रसिध्द न करता कार्यालयीन आदेश क्र. ७३४/१३, दिनांक ३.९.२०१३ अन्वये १६ शिक्षकांची अतिरिक्त भरती करण्यात आली. मा.उपआयुक्त व मा.आयुक्तांचे जाहिरात देवून भरती करण्याचे आदेश असतांना जाहिरात का देण्यात आली नाही याबाबत विभागास अवगत करावे.

६. १६ माध्यमिक शाळेसाठी घड्याळी तासिका तत्वावर - गणित, विज्ञान, इंग्रजी इ. भरती करण्यासाठी संचिकेत प्रस्तावित होते. पहिल्यांदा २४ शिक्षकांची भरती करण्यात आल्याचे आढळून येते. तद्नंतर करण्यात आलेल्या जादा तासिका तत्वावरील भरती मागचे कारण काय होते याबाबतचा खुलासा करावा.

७. परिच्छेद क्र.२४४ अन्वये सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात ज्या शिक्षकांचे काम समाधानकारक नव्हते अशा शिक्षकांना काढून टाकून नव्याने भरती करावी असे मा.उपआयुक्तांनी प्रस्तावित केले आहे त्यास मा.आयुक्तांची मान्यता आहे. याबाबत विभागाने काय कार्यवाही केली. शाळेत जावून पाहणी करण्यात आली का ? मुख्याध्यापकाकडून वेळोवेळी अहवाल प्राप्त झाल्याची नोंद नाही. याबाबत खुलासा व्हावा.

करिता, उपरोक्त बाबींचा विचार करता माध्यमिक शाळेसाठी घड्याळी तासिका तत्वावर करण्यात आलेल्या भरती संदर्भात अनियमितता व नियमबाह्यता आढळून येत आहे.

**विभागाने प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्‍चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.१७ :शिक्षण विभागातील अंतीम विवरणपत्र व भविष्य निर्वाह निधी कर्ज यादीतील फरकामुळे जास्तीच्या जमा झालेल्या रकमेबाबत.

भविष्य निर्वाह निधीचे लेखे व संचिका नमुना दाखल तपासल्या असता माहे एप्रिल २०१३ च्या अंतीम विवरण पत्रामध्ये भविष्य निर्वाह निधी कर्ज रक्कम १,८६,०५०/- दर्शविण्यात आलेली असून त्याचप्रमाणे इतर रकमांचे चेक देण्यात आलेले आहेत.

तथापि, भविष्य निर्वाह निधी कर्जाचा चेकनंबर १७८०२९ दिनांक ३०.६.२०१३ अन्वये १,८८,०५०/- रक्कम अदा करण्यत आलेली आहे. जेव्हा की अंतीम विवरण पत्रानुसार रक्कम रू.१,८६,०५०/- चा चेक अदा करणे अपेक्षित होते. जास्तीची अदा केलेली रक्कम २०००/- कोणत्या खात्यात जमा केली याबाबत बोध होत नाही.

करिता, उक्त प्रकरणाबाबत लेखापरीक्षण विभागास अवगत करावे व असे किती प्रकरणात झालेले आहे याबाबत प्रत्यक्ष शहानिशा व खात्री करावी असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**वरील अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून जास्तीचे अदा केलेली रक्कम रू.२०००/- च्या वसूलीअंती प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.१८ : शिक्षण विभागात कार्यरत वर्ग -३ व वर्ग-४ कायमस्वरूपी कर्मचा-यांच्या संच मान्यतेबाबत.

शिक्षण विभागात वर्ग -३ व वर्ग-४ च्या फक्त प्रत्येकी एकाच पदास अनुदान प्राप्त आहे. प्रत्यक्षात मात्र विभागात एकापेक्षा जास्त लिपीक व वर्ग-४ कर्मचारी कार्यरत आहे.

जर संबंधित विभागास लिपीक व वर्ग-४ कर्मचारी यांची आवश्यकता होती तर नियमानुसार संच मान्यता न घेणे ही बाब आक्षेपार्ह व मनपाचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

संबंधित कर्मचारी हे इतर विभागात वर्गीकृत करण्यात आले असते तर ज्या ठिकाणी कर्मचारी कमी पडत आहे त्या ठिकाणी त्यांचा कामाचा सद्उपयोग करता आला असता.

संच मान्यतेनुसार प्रत्येक शाळेत लिपीक व शिपाई पद मान्य असतांना त्यांचे मासिक वेतन मनपा फंडातून करून मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

करिता उक्त बाबींचा गंभीरपूर्वक विचार करून सदरील पदे अद्याप मान्य का करून घेण्यात आली नाही याबाबतचा लेखी अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र. १९ : औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागा मध्ये जिल्हा बदली व पती /पत्नी एकत्रीकरण जिल्हा अंतर्गत शिक्षक / शिक्षकांची बदली बाबत.

औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या कार्यरत असलेल्या शिक्षक / शिक्षिका यांच्या पती / पत्नी मनपा बाहेरील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत शिक्षक / शिक्षिका म्हणून सेवेत आहेत अशा शिक्षक / शिक्षिकेची पती /पत्नी एकत्रीकरण अंतर्गत महानगरपालिकेकडे त्यांच्या सेवा वर्ग होण्यासाठी विनंती अर्ज सादर केले आहे. सध्या मनपा शाळेतील दिनांक ३०.९.२००७ नुसार विद्यार्थी संख्या व उपस्थितीच्या निकषानुसार आणि शिक्षक सेवानिवृत्त झाले आहे अशा विविध कारणाने काही शिक्षकांना सेवामुक्त करण्यात आले त्यामुळे महानगरपालिका आस्थापनेवरील ३० ते ४० शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे नमूद करून शिक्षण समितीमध्ये प्रस्ताव ठेवणेस्तव सादर केला आहे. संचिकांची तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या .

१. संचिकेतील पान क्रमांक ०२ परिच्छेद क्र.९,१० अन्वये शिक्षकांची किती पदे रिक्त आहे व बिंदू नामावलीसह सादर करा असे उपायुक्त यांनी नमूद केले असता परिच्छेद १५ नुसार कार्यरत शिक्षक ४७० प्रत्यक्षात भरलेली पदे ४७० आवश्यक पदे ५०२ शिल्लक अनुशेष - ३२ असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने २१- मराठी , ०४ - उर्दू च्या जागा रिक्त आहे. असे असतांना पती - पत्नी एकत्रीकरण अंतर्गत ११ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ६ प्रस्ताव अपूर्ण व पाच पूर्ण निकषानुसार प्राप्त झाले आहे. त्यापैकी ०३ प्रस्ताव बिंदू नामावली प्रमाणे योग्य आहेत. असे असतांना एक प्रस्ताव बिंदू नामावलीच्या संवर्ग इतर मागास संवर्गातील असून ही पदे अतिरिक्त भरली असतांना त्या शिक्षिकेला खुल्या संवर्गातून घ्यावे म्हणजेच अतिरिक्त असतांना संवर्ग बदलणे ही बाब नियम बाह्य आहे. याबाबत विभागाने जबाबदारी निश्चित करुन खुलासा सादर करावा.

२. संचिकेतील पान क्रमांक ०८ परिच्छेद क्रमांक ३१ नुसार आजच्या स्थितीप्रमाणे (शिक्षक संस्थेच्या) इतर मागास संवर्गात १८ पदे जास्त आहेत. संचिकेतील परि.क्र.३० प्रमाणे कार्यवाहीच्या आदेशास्तव तथा शिक्षण समितीच्या बैठकीस प्रस्ताव ठेवण्यास्तव सादर असे असतांना मा.आयुक्त यांनी त्यास मंजूरी दिली आहे. नगरसचिव विभागात प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. परंतू परि.क्र.३१ मध्ये नमूद केलेल्या जास्त पदाच्या प्रस्तावाबाबत संचिकेत प्रस्ताव दिसून आलेला नाही.

३. संचिकेतील परि.क्र.३३ प्रमाणे दिनांक १४.५.२००८ रोजी शिक्षण समितीच्या संपन्न झालेल्या बैठकीत ८ शिक्षकांचे जिल्हांतर्गत बदलीचे प्रस्ताव मान्य करण्यात आले असून १ जुलै २००६ च्या G.R नुसार प्रकरणे तपासून नियमाप्रमाणे योग्य असल्यास संबंधिताचे C.R. मागवून त्याप्रमाणे कार्यवाही करणे योग्य राहील असे असतांना G.R. जोडलेला नाही. मा.शिक्षण अधिकारी यांनी परि.क्र.३६ मध्ये प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवून मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे योग्य राहील असे नमूद असतांना सर्वसाधारण सभेची मान्यता घेतलेली दिसत नाही.

४. संचिकेतील पान क्रमांक १४ परिच्छेद क्र.४३ अन्वये शिक्षणाधिकारी यांच्याशी परिच्छेद क्रमांक ४२ नुसार चर्चा करून चर्चेप्रमाणे शासन निर्णय २००४,१९९८,२००१ व मा.सर्वसाधारण सभेचा इ.स.१९९९ च्या निर्णयाच्या अधिन राहून प्रस्तावित आंतरजिल्हा बदल्यास मान्यता देण्यात आली आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. सदरील प्रस्ताव ठेवतांना मा.आयुक्त यांच्या मार्फत प्रशासकीय ठराव प्रस्तावित करून याच कालावधीतील सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक होते. तसे न करता मागील ठराव व रद्द झालेल्या G.R. चा आधार घेवून त्यांना सामावून घेत मनपाच्या आस्थापनेवर सामावून घेण्यात आल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५. पती - पत्नी एकतर्फी आंतर जिल्हा बदली करतांना जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र./जिपऔ/शिक्षण/प्र.वि/०२/०८/५९५/०१, दिनांक १६.०२.२००८ अन्वये १ ते १३ पर्यंतच्या मुद्यांची पूर्तता होणे आवश्यक असतांना पूर्ण मुद्यांची पूर्तता न करता आंतरजिल्हा बदली अंतर्गत मनपाकडे सामावून घेण्यात आल्याचे दिसून येते.

६. जिल्हा अंतर बदली पती-पत्नी या सदराखाली संपूर्ण अटी व शर्तीची पूर्तता करणारे शिक्षक यांचे सेवा मनपाकडे वर्ग करतांना त्यांचे भविष्य निर्वाह निधीची जमा असलेली रक्कम ही स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये जमा करणे असे आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तसेच पेन्शन कॉन्ट्रीब्युशन व रजा वेतन इ. निश्चित करुन संबंधिताकडून भरणा करून घेतल्याचेही दिसून येत नाही.

**वरील सर्व मुद्दा क्र.१ ते ६ बाबत विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करून सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२०: केंद्रीय प्राथमिक शाळा व अंतर्गत शाळा येथील मनपाच्या निवासस्थानाच्या वापराबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत १) कें.प्रा.शा.बेगमपुरा २) कें.प्रा.शा.किराडपुरा नं.१ ३) कें.प्रा.शा.मुकुंदवाडी आणि ४) कें.प्रा.शा.इंदिरानगर बायजीपुरा येथील काही मासिक देयके नमुना मात्र तपासण्यात आली.

तपासणीत महानगरपालिके अंतर्गत विविध विभागातील कर्मचारी निवासस्थानाचा वापर ब-याच वर्षापासून करीत आहे. तर काही शाळामंध्ये वॉचमनच नसल्याचे आढळून आले.

लेखापरीक्षणा दरम्यान आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालीलप्रमाणे -

१. केंद्रीय प्रा.शा.मुकुंदवाडी या ठिकाणी १) दिलीप पंडीत जाधव २) श्री.आनंद वाघमारे हे दोन्हीही वॉचमन म्हणून शाळेच्या हद्दीत निवास करतात. परंतू दोघांना HRA दिला जातो. संबंधिताच्या वेतनातून नळ पट्टी, विद्युत कर आणि निवासस्थानाच्या वापरासाठी कपात होणे आवश्यक असतांना ती कपात होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. ही बाब नियमबाह्य आहे. एका शाळेसाठी एक सुरक्षा रक्षकाची आवश्यकता असतांना दोन वॉचमन का आहेत ? याचा बोध होत नाही. तसेच एका शाळेसाठी दोन सुरक्षा रक्षक ठेवण्याची परवानगी घेण्यात आल्या बाबतचा पुरावा संचिकेत आढळून आलेला नाही. महानगरपालिकेच्या निवासस्थानाचा वापर करीत असतांना नियमानुसार वेतनातून कपात न करणे ही बाब महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

२. कें.प्रा.शा.इंदिरानगर बायजीपुरा येथील मनपाच्या निवास स्थानामध्ये महानगरपालिकेचा कर्मचारी न राहता बाहेरील व्यक्तीचे वास्तव्य असल्याचे मुख्याध्यापक यांनी सांगितले. त्यामुळे अशा निवासस्थानांच्या वापरापासून कार्यरत कर्मचारी वंचीत राहत आहे.मनपाचा कर्मचारी जर तेथे राहत असते तर त्यांच्या मासिक वेतनातून घरभाडे, पाणीपट्टी, विद्युत कर वसूल करता आला असता आणि भविष्यात जरी काही समस्या उद्‌भवली तर महानगरपालिकेस प्रशासकीय कार्यवाही करणे शक्य असते. बाहेरील व्यक्तीस सुरक्षा रक्षक म्हणून ठेवल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान तर होत आहे तथापि, पाणीपट्टी कर, विद्युत कर इ.विनामूल्य सदरील व्यक्ती वापरत आहे. तसेच भविष्यात ती व्यक्ती सदरील जागेवर आपला हक्क सांगू शकते. ही बाब नियमबाह्य आहे.

वरील प्रकरणे ही नमुना दाखल असली तरी कित्येक कर्मचा-याकडून निवासस्थान भाड्यापोटी रक्कम वसूल करण्यात येत नसल्याने महानगरपालिकेचे अत्यंत मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. पुरविलेली निवासस्थानेही कोण वापरत आहे याची सविस्तर माहिती देखील विभागाकडे आढळून आलेली नाही ही बाब गंभीर आहे.

**करीता उक्त वसूलीबाबत विभागाने गांभीर्याने विचार केलेला नाही. लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत अहवाल सादर केलेला नाही. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.२१ : शालेय विद्यार्थ्यांना गणवेश खरेदीसाठी वाटप झालेल्या अनुदानांच्या शिल्लक रकमांबाबत.

महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेच्या अंतर्गत तरतूदीवरुन व सर्व शिक्षा अभियानाच्या प्राप्त अनुदानातून ७८ शाळेतील वंचित विद्यार्थ्यांना प्रत्येकी ४००/- रु.प्रमाणे २ गणवेशांचे प्रतीवर्षी वाटप करण्यात येते.

गणवेश खरेदीच्या खर्चास मा.आयुक्तांच्या मंजूरी अन्वये मा.सभापती , स्थायी समिती यांच्या सर्वानुमते मंजूरीअंती शाळांना व्यवस्थापन समिती सचिव व मुख्याध्यापकांच्या नावे धनादेशाद्वारे गणवेश खरेदी अनुदान वितरीत केले जाते.

उपरोक्त अनुदान वाटपानंतर खात्यावर शिल्लक असलेल्या रकमांच्या बाबतीत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे.

१. शासन निर्णय क.संकीर्ण १००२/प्र.क्र.१२८/आर्थोपाय, दिनांक १० ऑक्टोबर २००२ अखर्चित निधी खर्च करण्याबाबत कार्यप्रणाली ठरविण्यात आलेल्या आहेत. अट क्र.१ (ब) नुसार मागील वर्षातील अखर्चित निधीची माहिती घेवून तो निधी खर्च करण्यास वित्त विभागाची ३० जून पूर्वी अनुमती घेण्यात यावी, जेणेकरून अखर्चित निधी खर्च करण्यास पुरेसा कालावधी मिळू शकेल. यापैकी काही निधी त्याच वर्षी खर्च झाला नाही तर तो शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावा. अट क.१ (३) नुसार एक वर्ष किंवा त्यापूर्वीचा अखर्चित निधी कोणत्याही परिस्थितीत खर्च करण्यास अनुमती देण्यात येणार नाही असा निधी शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावा असे स्पष्ट नमूद असतांना आजतागायत रकमा खात्यांवर शिल्लक आहे, ही बाब नियमबाह्य आहे.

२. शासन परिपत्रक क्र.संकीर्ण १००२/प्र.क्र.१२८/आर्थोपाय/मंत्रालय, दिनांक ३१/८/२००७ अट क्र. २ (अ) नुसार विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालये व जिल्हा परिषद इ.संबंधित यंत्रणांना सदर कार्यप्रणालीची आगाऊ सूचना घ्यावी. अट क्र.२(ब) नुसार मार्च अखेर विभागांनी मुक्त केलेल्या निधीच्या संदर्भात वर्ष संपल्या नंतर लगेच खर्च झालेल्या निधीचा व अखर्चित निधीच्या रकमांचा एप्रिल पंधरवाड्यातच आढावा घ्यावा व मे महिन्याच्या सुरुवातील अखर्चित रकमेचा प्रस्ताव संबंधित विभागामार्फत वित्त विभागाकडे पाठवावा जेणेकरुन जून अखेर अखर्चित रकमेच्या प्रस्तावास वित्त विभागाची मान्यता प्राप्त होवू शकेल.
तथापि शिक्षण विभागाचे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ पर्यंतचे प्राप्त लेखे तपासणीअंती असा कुठलाही अहवाल शासनास पाठविलेला आढळून आलेला नाही. त्यामुळे खात्यावर शिल्लक असलेल्या रकमांचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे.

शासनाने उपरोक्त शासन निर्णया खेरीज वेळोवळी शासन निर्णय आदेशाद्धारे विहित वेळेत महानगरपालिका,नगरपरिषद जिल्हा परिषद यांनी माहिती घेवून अखर्चित निधी खर्च करण्यास अनुमती घेतली नाही तर सदर निधी ३० जून पूर्वी शासनाच्या तिजोरीत जमा करावा लागेल असे आदेशित केलेले असतांना निधीचे समायोजन करता निधी खात्यावर शिल्लक ठेवणे ही बाब नियमबाह्य व शासनाच्या अनुदानाचा गैरवापर करण्यास वाव देणारी आहे. शासनाच्या निर्णयानुसर मनपाने विविध शाळांना वितरीत केलेले गणवेश अनुदान अखर्चीत रक्कम मनपा फंडात जमा होणे आवश्यक आहे.

**करिता विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२२ : एकतर्फी अंतर जिल्हा बदली करणे बाबतची संचिका.**

**(श्रीमती साळवे सिमा उत्तमराव)**

जिल्हा अंतर्गत बदली करणे बाबतची प्रकरणे तपासत असतांना श्रीमती साळवे स्मिता उत्तमराव यांची कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/ शिक्षण/७८२ / १२ , दिनांक २०/६/२०१२ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ चे कलम ६ (८) मधील नियम व अटीनुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन संदर्भ क्र.४ च्या अनुषंगाने पती - पत्नी एकत्रिकरण अंतर्गत अंतरजिल्हा बदली जिल्हा सेवा वर्ग-३ भजब संवर्गात एकतर्फी प्रा.शा.कैलासनगर, केंद्र इंदिरानगर बायजीपुरा, मनपा औरंगाबाद येथे केल्याचे आढळून आले.

संचिकेत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालीलप्रमाणे -

१. शासन निर्णय परिपत्रक क्र.जिपब/२६००/प्रक्र./६९४०/१४, मंत्रालय, मुंबई दिनांक २९ मार्च २००१ नुसार सर्वसाधारण मार्गदर्शक तत्व क -७ नुसार पती-पत्नी दोघांपैकी एक जिल्हा परिषद कर्मचारी व दुसरा खाजगी संस्थेतील कर्मचारी असेल तर कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात याव्यात. उपरोक्त मार्गदर्शन तत्वात जर एक कर्मचारी खाजगी संस्थेतील असेल तर तो स्थायी / कायम स्वरूपी, अस्थायी, कंत्राटी पध्दतीने दैनिक वेतनावर असला तर या सर्वांनाच ही बाब लागू आहेत का याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

२. सदरील प्रकरण हे अंतर जिल्हा बदलीचे नसून पती /पत्नी एकत्रीकरण जिल्हा अंतर्गत बदलीचे आहे.

३. पती -पत्नी एकत्रीकरण प्रकरण जिल्हा अंतर्गत बदली प्रकरणात मनपा शिक्षण विभागात परिशिष्ठ क्रमांक १४ नुसार सद्यस्थितीत शिक्षण सेवकांची भरती प्रक्रिया चालू आहे ती प्रक्रिया पूर्ण झाल्याखेरीज अशा स्वरूपात बदल्या करता येणार नाही असे मत आहे. तसेच परिशिष्ठ २२ नुसार NTB या संवर्गातील पद रिक्त नसल्याचे नमूद आहे. त्याला मा.उपआयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.तद्‌नंतर सर्वसाधारण सभा दिनांक १७.७.२०१२ विषय क्र.८१८ नुसार पती-पत्नी एकत्रिकरण या ध्येय धोरणानुसार सामावून घेण्याबाबत

नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी असे स्पष्ट नमूद आहे. असे असतांना जर मनपा आस्थापनेवर NTB या संवर्गातील पद रिक्त नव्हते तर सौ.सिमा साळवे यांना मनपा सेवेत का सामावून घेण्यात आले याचे स्पष्टीकरण व्हावे.

४. मनपा आस्थापनेवर पती -पत्नी एकत्रिकरण / जिल्हा अंतर्गत बदलीचे असे किती प्रकरण आहेत आणि त्यांचे अंशराशीकरण जमा होत आहे का ? त्यांच्या रकमा मनपात स्वतंत्र भविष्य निर्वाह निधी खाते उघडून वर्ग करण्यात आलेल्या आहेत काय ? याचा खुलासा व्हावा.

**करिता, विभागाने प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करुन लेखापरीक्षण विभागास अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२३ : केंद्रीय प्रा.शाळा बेगमपुरा येथील शिक्षक / शिक्षिका /सेवक / चौकीदार मजूर/ यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत विविध शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्री.शिवाजी तुकाराम सोनवणे - सहशिक्षक, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता
   अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
   ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

२. श्री.रतन कचरु मोरे - सहशिक्षक, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -
   अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
   ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

३. श्रीमती जिजाबाई हरिचंद्र लोंढे - सहशिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -
   अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
   ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
   क) संबंधित शिक्षिका यांचे आदेश क्र.मनपा/शिक्षण/२००३/२००६, दिनांक १४.२.२००६ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी पुढील वेतनावर परिणाम न होता रोखण्यात आली असे असतांना दिनांक १.१२.२००६ रोजीची वार्षिक वेतनवाढ थांबवलेली सेवापुस्तकावरुन दिसून येत नाही. विभागाने प्रत्यक्ष तपासून अतिप्रदान वेतन इ. कार्यवाही करणे योग्य.

४. श्रीमती सुरेखा सांडुजी पाटील - सहशिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता
   अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
   ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

५. श्रीमती लता मोरोपंत खंदारे - मुख्याध्यापिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

६. श्रीमती उषा वसंतराव काळवे- मुख्याध्यापिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) प्रथम नियुक्ती आदेशाची नोंद मूळ सेवापुस्तकामध्ये घेतलेली नाही.

७. श्री.कैलास एकनाथ टेकाळे - सहशिक्षक, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

८. कु.शिल्पा भगवानराव दंडे - सहशिक्षक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

९. श्री.हुसेन नजीर तडवी - सहशिक्षक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) आदेश क्र.मनपा/शिक्षण/१०३/२००६, दिनांक १४.२.२००६ नुसार एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरीता तात्पुरती बंद केली आहे मात्र त्यानुसार एक वेतनवाढ थांबविल्याची नोंद सेवापुस्तकात घेतलेली नाही.

१०. श्री.प्रविण प्रेमसुख लोहवे - सहशिक्षक, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) संबंधित सहशिक्षक यांनी सेवाअंतर्गत प्रशिक्षण घेतल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

११. श्री.शेख रब्बानी शेख कादर - चौकीदार यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) संबंधित कर्मचारी दिनांक ५.४.१९९७ ते दिनांक १४.५.२००१ पर्यंत विनापरवानगी गैरहजर असल्याची नोंद मूळ सेवापटामध्ये दिसून आली. मात्र विनापरवानगी गैरहजर कालावधी बाबत विभागाने नियमाप्रमाणे कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.याबाबत विभागाने तपासून खात्री करावी व त्यानुसार कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

१२. श्री.मेहबूब बेग मेहमूद बेग - स्वीपर यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) मूळ सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील महत्वाच्या नोंदी सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत.

ब) प्रथम नियुक्ती दिनांक ११.३.१९९९ पासून स्वीपर म्हणून नेमणूक. मात्र शाळेवर शिपाई/ सेवक म्हणून कार्यरत आहेत.

क) सहाव्या वेतन आयोगाची वेतननिश्चिीतीची नोंद सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेली नाही. तसेच दिनांक १.७.२०११ रोजीची वार्षिक वेतनवाढ रू.२५०/- अशी दर्शविलेली आहे. मात्र सदरची वेतनवाढ रू. २४०/- इतकी निश्चित करावी. अतिप्रदान झालेली रक्कम वसूलीची कार्यवाही करावी.

ड) शारीरीक वैद्यकीय पडताळणी / पोलिस चारित्र्य पडताळणी / एकूण सेवानोंद सेवापटामध्ये घेतलेल्या नाहीत.

१३. श्रीमती द्वारकाबाई खंडू रगडे - सेविका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

१४. श्री.राजेंद्र रुपलाल जैस्वाल - चौकीदार यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) मूळ सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील नोंद अपूर्ण स्वरूपाच्या घेतलेल्या असून त्या सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत.

**करीता, विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२४ : केंद्रीय प्राथमिक शाळा बेगमपुरा येथील श्रीमती एस.आर.कोरे शिक्षण सेवक दिनांक ४.१०.२०१२ पासून वैद्यकीय रजेवर असल्याबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत केंद्रीय प्राथमिक शाळा बेगमपुरा येथील लेखापरीक्षणा दरम्यान प्राप्त लेखे तपासणी केली असता केंद्रीय प्राथमिक शाळा बेगमपुरा यांचे अंतर्गत प्राथमिक शाळा पडेगांव, येथे कार्यरत असलेल्या श्रीमती एस.आर.कोरे - शिक्षण सेवक ह्या दिनांक ४.१०.२०१२ पासून अद्यापपर्यंत वैद्यकीय रजेवर गेलेल्या असल्याचे मुख्याध्यापक यांनी एकूण शिक्षक/ सेवक / चौकीदार / मजूर या यादीमध्ये नमूद केलेले आहे. संबंधित शिक्षण सेवक दिनांक ४.१०.२०१२ पासून आजपर्यंत वैद्यकीय रजेवर असल्याने याबाबत संबंधित विभागाने प्रशासकीय स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२५ : राजीव गांधी योजने अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाच्या विनियोगाबाबत.**
**(रक्कम रू.५०,०००/-)**

राजीव गांधी विमा योजने अंतर्गत प्राथमिक शाळा मिटमिटा, औरंगाबाद या शाळेतील विद्यार्थी कोमल उध्दव भवाळे हीचा अपघातात एक हात व एक पाय गेल्यामुळे जिल्हा परिषद औरंगाबाद येथून चेक नं.३११०८४, दिनांक ८.११.२०१३ अन्वये रू.५०,०००/- चा धनादेश देण्यात आलेला होता.

सदरील शाळेचे लेखे तपासले असता आजपावेतो मुख्याध्यापक, महानगरपालिका यांच्या खात्यावर रक्कम जमा आहे.

उपरोक्त रकमेचा विनियोग हा त्या विद्यार्थ्यांसाठी होणे अपेक्षित होते किंवा ती रक्कम परत विभागास पाठविणे आवश्यक होते. परंतु त्याबाबत कसलाही पत्रव्यवहार संचिकेत झालेला आढळून आलेला नाही. ही बाब नियमबाह्य आहे व सरकारी योजनांचा अपव्यय करणारी आहे.

**उपरोक्त बाबींचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**वरील अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.२६ : शालेय विद्यार्थ्यांना गणवेश खरेदीसाठी अनुदान वाटपाबाबत.**

केंद्रीय प्रा.शा. बेगमपुरा अंतर्गत ६ (प्रा.शा.पहाडसिंगपुरा व प्रा.शा. घाटी यांचे अभिलेखे तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाही. ) १)प्रा.शा.भावसिंगपुरा, २) प्रा.शा.पडेगाव, ३) प्रा.शा.पडेगाव कॉलनी, ४) प्रा.शा.मिटमिटा, ५) प्रा.शा.आरेफ कॉलनी इ. शाळांचे अभिलेखे लेखापरीक्षणा दरम्यान तपासण्यात आले.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत सर्व शाळेतील इ.बालवाडी ते इ.१० वीतील विद्यार्थ्यांना (सर्व शिक्षा अभियान योजनेतील लाभार्थी विद्यार्थी व्यतिरिक्त) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून प्रति विद्यार्थी रू.४००/- याप्रमाणे ज्यात दोन गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ असेल. जा.क्र.मनपा/शिक्षण/२०१३/६३७, दिनांक ०२.०८.२०१३ च्या आदेशात संदर्भ मा.स्थायी समिती ठराव क्र.२० दिनांक ०६.०७.२०१३ निधीच्या विनियोगाकरीता काही निर्देश दिलेले आहेत व त्यानुसार खरेदी करण्याचे सूचित केल्याचे आढळते.

लेखापरीक्षणा दरम्यान काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

१. निर्देश क्रमांक ३ नुसार गणवेश शिवून झाल्यानंतर त्याची तांत्रिक समितीद्वारे तपासणी करुन घेण्यात यावी अशी बाब नमूद असतांना तांत्रिक अहवाल तपासणीस उपलबध झालेला नाही.

२. बेगमपुरा व अंतर्गत सर्व शाळांना मनपा शालेय गणवेश अनुदान वाटप सन २०१३-१४ व सन २०१४-१५ अंतर्गत स्वतंत्र करण्यात आल्याचे आढळून येते. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या दोन्ही आर्थिक वर्षात महानगरपालिकेस गणवेश खरेदीसाठी शाळानिहाय प्राप्त झालेले अनुदान व खर्च यामध्ये तफावत असल्याचे आढळून येते. महाराष्ट्र

नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र. १४० अन्वये प्रत्येक अग्रीम धारकाने ते प्रथमत: मिळाल्यावर व त्यानंतर प्रत्येक वर्षी १ एप्रिल रोजी पोचपावतीवर स्वाक्षरी करून त्याचा हिशोब दिला पाहिजे. सन २०१४-१५ चे गणवेश अनुदान वाटप करतांना मागील जास्तीचे अनुदान कमी करून उर्वरीत रक्कम वाटप करणे अनिवार्य होते पण तसे झालेले नाही. सन २०१३-१४ व सन २०१४-१५ चे जास्तीचे अनुदान आजही खात्यावर जमा आहे. त्यामुळे खर्चाचा ताळमेळ नसल्याचे दिसून येते ही बाब गंभीर व नियमबाह्य आहे असे किती वर्षापासून अनुदान खात्यावर जमा आहे याबाबत शिक्षण विभागाने दिलेले अनुदान शिल्लक रक्कम मनपा फंडात जमा करणे बाबत पाठपुरावा केल्याचे दिसून येत नाही. याची प्रत्यक्ष शहानिशा करणे आवश्यक आहे. सदरील रक्कम त्वरीत समायोजन करण्यात यावी.

३. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता,१९७१ मधील नियम क्रमांक १४१ अन्वये जेव्हा अग्रीम धनाची रक्कम कमी होत जाईल तेव्हा व किती हाती शिल्लक असेल त्यावेळी अग्रीमधनाची प्रतीपूर्ती / भरपाई नमुना क्र.१०७ प्रमाणे असलेल्या पावतीसह आधारभूत उपप्रमाणक जोडून केली पाहिजे. गणवेश खरेदीसाठी संबंधित मुख्याध्यापकांच्या खात्यावर जमा होणा-या रकमांची प्रतिपूर्ती / भरपाई संबंधित आर्थिक वर्षात न करणे नियमबाह्य आहे.

४. प्रा.शा.पहाडसिंगपुरा व प्रा.शा.घाटी येथील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ चे अभिलेखे लेखापरीक्षण कामी तपासणीस उपलब्ध करून देण्यात आलेले नसल्यामुळे त्यांचे लेखापरीक्षण होवू शकलेले नाही.

५. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१४२ (२) अन्वये भांडार जमा रोजकिर्द रजिस्टर (नमुना क्र.१०९) भांडार रोजकिर्द (नमुना क्र.४०) भांडार खातेवही (नमुना क्र.१११) याबाबतचे रजिस्टर लेखापरीक्षणा करीता उपलब्ध झालेले नाही. गणवेश वाटपाबाबतचा शाळानिहाय अनुदान प्राप्त व शिल्लकच्या तपशिलाबाबत सविस्तर विवरण अर्धसमास पत्र क्र.३९ सोबत सादर करण्यात आलेले आहे.

**मुद्या क्र. १ ते ५ बाबत खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. वरील अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.२७ : केंद्रीय प्रा.शा.किराडपुरा (उर्दु) येथील शाळेतून करण्यात आलेल्या भंगार विक्री बाबत.

केंद्रीय प्रा.शा. किराडपुरा (उर्दु) येथील शाळेकडून भंगार विक्रीसाठी दरपत्रके मागविण्यात आली असता १) क्लासिक ट्रेडिंग कंपनी यांचे रू.९८००/- दिनांक १९.८.२०१४ २) साईबाबा crap centre चे रू.९३००/- ,दिनांक १९.८.२०१४ ३) रॉयल स्क्रॅप मर्चन्ट चे रू.९२००/- दिनांक २०.८.२०१४ ४) साई स्क्रॅप मर्चन्टचे रू.८४००/-, दिनांक २०.८.२०१४ प्राप्त झाले.

प्राप्त दरपत्रकापैकी सर्वात जास्त दराचे क्लासिक ट्रेडिंग कंपनी यांचे दरपत्रक रू.९८००/- चे मंजूर करण्यात आले. आणि भंगार विक्रीनंतर रक्कम रू.९८००/- कें.प्रा.शा. किराडपुरा (उर्दू) ,मनपा मुख्याध्यापक यांच्या खात्यावर दिनांक ०१.०९.२०१४ रोजी जमा करण्यात आलेले आहे.

उपरोक्त विक्रीत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. महानगरपालिकेच्या शाळांना फर्निचर व इतर डेड स्टॉक शिक्षण विभागाच्या एकत्रित खरेदीतून पुरवठा केला जातो. फर्निचर खराब झाल्यास शिक्षण विभागाच्या मुख्य भांडारमध्ये जमा करणे आवश्यक होते, तसे न करता शाळांनी परस्पर साहित्याची विक्री करुन मुख्याध्यापकाच्या खात्यात रकमा जमा करणे ही बाब आक्षेपार्ह आहे.

२. भंगार विक्री करीत असतांना जर ती किलोने करण्यात आलेली असती तर मनपाचा आर्थिक फायदा झाला असता. परंतू तसे न करता एकत्रित विक्री करुन मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

३. दरपत्रके मागवित असतांना तुटके साहित्य, खराब बेन्च व इतर साहित्य असे वेगवेगळे दर मागविणे अपेक्षित होते पण तसे न करता सरसकट विक्री केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

**करिता, उपरोक्त बाबींचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर करण्यात आला नाही. वरील अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.२८ : केंद्रीय प्रा.शाळा किराडपुरा येथील शिक्षक / शिक्षिका /सेवक / चौकीदार/ मजूर / यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.

शिक्षण विभागा अंतर्गत विविध शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्रीमती शहाबानो शे.अब्दुल्ला - सहशिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याची नोंद सेवापटात घेण्यात आलेली नाही.

२. श्रीमती शहेनाज बेगम मिर्झा महंमद बेग - सहशिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याची नोंद सेवापटात घेण्यात आलेली नाही.

ड) संबंधित शिक्षिका यांनी वेळोवेळी उपभोगलेल्या रजा-नोंदी रजा खात्यामध्ये घेतलेल्या नाहीत. (आदेश क्र.MCA/EDN/९२/५७७ , दिनांक २४.७.१९९२ अन्वये दिनांक १७.६.१९९२ ते २८.६.१९९२(१२) दिवस आणि २०.७.१९९२ ते १७.१०.९२ (९० दिवस) दिनांक २१.९.९७ ते ४.९.९७ - ३ दिवस, ४.३.९९ ते ११.३.९९ ७ दिवस ,१५.१.२००२ ते १०.३.२००२ (५५ दिवस) ९.७.२००३ ते १५.८.२००३(३८ दिवस) )

३. श्रीमती जाकिया अजहर मो.अब्दुल - सहशिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ ) परिविक्षाधिन कालावधी खुला करण्याची नोंद सेवापटात घेण्यात आलेली नाही.

ब) शारीरीक वैद्यकीय पडताळणी / पोलिस चारित्र्य पडताळणी / एकूण सेवानोंद सेवापटामध्ये घेतलेल्या नाहीत.

४. श्रीमती देशमुख शगफ जरीन खलील - सहशिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) संबंधिताने वेळोवेळी उपभोगलेल्या रजा नोंदी रजा खात्यामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. (दिनांक ५.२.२०१४ ते ११.२.२०१४ (७ दिवस)दिनांक १३.१.२०१४ ते २५.१.२०१४(१३ दिवस)३.११.२०१४ ते २९.४.२०१५(१७८ दिवस)प्रथम प्रसुती रजा)

५. श्रीमती रशिदुन्नीसा मोहमद युसुफ - सहशिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) संबंधिताने वेळोवेळी उपभोगलेल्या रजा नोंदी रजा खात्यामध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. (दिनांक ६.२.२०१२ ते २५.२.२०१२ (२० दिवस)दिनांक २.४.२०१२ ते ११.४.२०१२ (१० दिवस)

६. श्री.शेख अब्दुल लतिफ - सहशिक्षक, यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

७ श्रीमती तहसिन अब्दुल हमीद खान- सहशिक्षिक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

८. श्रीमती शेख शकिला जुबेर- सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) संबंधिताची दिनांक २०.४.२००६ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरीता तात्पुरती थांबवलेली आहे. मात्र सहावा वेतन आयोग / चट्टोपाध्याय आयोगाची वेतन निश्चिती करतांना एक वर्षाकरीता एक वार्षिक वेतनवाढ थांबविल्याची नोंद घेतलेली नाही. विभागाने तपासून दुरुस्ती / पुर्तता इ.कार्यवाही करावी.

९. श्रीमती सरोज भिमराव शुक्ला - मुख्याध्यापक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

१०. श्री.सय्यद अबरार अहेमद स.निसार अहेमद- सह.शिक्षक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद सेवापुस्तकात नाही.

ड) संबंधिताने वेळोवेळी उपभोगलेल्या रजा नोंदी सेवापुस्तकामध्ये घेण्यात आलेल्या नाही.

११. श्री.साहेब खान समशेर खान पठाण - शिपाई यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

१२. श्रीमती गिताबाई गजानन नाडे -स्त्री मजूर यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता संबंधितास दिनांक ९.४.१९९४ पासून (विकल्प दि.९.४.१९९५) निवड श्रेणीचा लाभ प्रदान आहे. सदरची वेतननिश्चिती वेतन नियम ११(४) प्रमाणे सुधारित करण्यात यावी.

१३. श्री.इलियास खान अमिर खान -शिपाई यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) श्री.अकबर खान अमिरखान (मयत) हे कर्मचारी मनपा कार्यालयात कार्यरत असतांना मयत झाल्याने त्यांचे जागी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणे करीता (मयत) कर्मचा-याची पत्नी श्रीमती बिल्कीस बानो अकबर खान यांनी विनंती अर्ज दिलेला आहे.

ब) शासन निर्णय दिनांक १२ मार्च १९९७ मध्ये स्पष्ट सूचित केल्याप्रमाणे अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची वैशिष्ट्चे नुसार अनुक्रमांक १) उद्येश : मृत्य शासकीय / वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबियांना त्वरीत आर्थिक आधार मिळणे असे आहे. अ.क्र.२) पात्र नातेवाईक:

अ) पती / पत्नी, मुलगा, अविवाहीत मुलगी,

ब) अविवाहीत शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत सर्वस्वी अवलंबून असणारा अविवाहीत भाऊ अथवा बहिण.

क) मृत शासकीय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल तर त्याची सून. ह्या पात्र नातेवाईकांनाच नियुक्ती देणे अनुज्ञेय ठरते. मात्र मयत कर्मचारी यांचे वारस पत्नी यांना नियुक्ती दिलेली नाही.

ड) शासन निर्णय दिनांक १२ मार्च १९९७ चा विचार न करता मृत कर्मचारी यांचे भावास नियुक्ती आदेश क्र.जा.क्र.मनपा/आस्था-२/२०१०/१४३४, दिनांक ८.१२.२०१० अन्वये मृत कर्मचारी यांचा भाऊ श्री.इंलियास खान, अमिर खान यांना शिपाई म्हणून नियमबाह्य नियुक्ती दिलेली दिसून आली. तसेच नियुक्तीचे आदेशामध्ये मृत कर्मचारी यांचेशी असलेले नाते भाऊ असतांना मुलगा असे दर्शविलेले आहे.

याबाबत विभागाने प्रकरण प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, व याबाबतचा अहवाल ७ दिवसामध्ये लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

१४. श्रीमती सय्यदा बेग मेहमूद बेग -सेविका /मजूर यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) संबंधिताच्या मूळ सेवापटामध्ये पद सेविका / मजूर अशी नोंद दिसून येते.

ब) परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

क) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ड) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

१५. श्रीमती विमल पांडुरंग नरवडे - मजूरीन यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) उपभोगलेल्या विविध रजा - रजा खात्यात नोंदविलेल्या नाहीत.

ड) संबंधिताचे मूळ सेवापटासोबत वैयक्तिक संचिका यांचे अवलोकन केले असता,प्रथम नियुक्ती दिनांक ३.९.१९९३ अशी असून संबंधितास दिनांक ३.९.२००५ रोजी बारा वर्ष सतत एकाच पदावर कार्यरत आहे. त्यानुसार आश्वासित प्रगती योजने करीता प्रकरण शाळेमार्फत सादर करणेत आलेले नसल्याने लाभापासून वंचित आहे.

**करीता, विभागाने प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.२९ : प्रा.शा. शहाबाजार येथील सन २०१३-१४ व सन २०१४-१५ च्या गणवेश खरेदी व वाटपाबाबत.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत सर्व शाळेतील बालवाडी ते इ.१० वीतील विद्यार्थ्यांना (सर्व शिक्षा अभियान योजनेतील लाभार्थी विद्यार्थी व्यतिरिक्त) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेतून प्रति विद्यार्थी ४००/- या प्रमाणे ज्यात २ गणवेश खरेदी व शिलाई समाविष्ठ असेल असे जा.क्र.मनपा/शिक्षण/ २०१३/ ६३७, दिनांक ०२.०८.२०१३ च्या आदेशात संदर्भ मा.स्थायी समिती विषय ठराव क्र.२०, दिनांक ६.७.२०१३ निधीचा विनियोग बाबत निर्देश दिलेले आहेत, त्यानुसार खरेदी करण्याचे सूचित केल्याचे आढळते. अभिलेखे तपासणी केले असता त्यात आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. प्रा.शा.शहाबाजार येथील लेखे तपासले असता सन २०१३-१४ या आर्थिक वर्षासाठी ३१२ विद्यार्थ्यांना रू.१,२४,८००/- प्रति विद्यार्थी २ गणवेशासाठी रू.४००/- चेकनंबर १८४८०३ एकूण रक्कम रू.३,७१३,२००/- अन्वये मनपा फंडातून वितरीत करण्यात आले.

शहाबाजार प्रा.शा.चे लेखे तपासले असता बील क्र.१०१३ अन्वये १,२४,८००/- अदा केलेले आहे. तथापि वाटप रजिस्टरवर फक्त २४७+३६ बालवाडी एकूण = २८३ विद्यार्थ्यांच्या गणवेश मिळाल्याच्या स्वाक्षरी आहेत. एकूण ३१२ गणवेशातून २८३ गणवेश वजा जाता एकूण २९ गणवेश शिल्लक राहिले. विद्यार्थी संख्येनुसार गणवेश तयार केलेले नाही. जास्तीचे गणवेश खरेदी झाल्याने संबंधितांवर जबाबदारी निश्चीत करणे योग्य.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४० व १४१ अन्वये जेव्हा अग्रीम धनाची रक्कम कमीत कमी होत जाईल तेव्हा व किती हाती शिल्लक असेल त्यावेळी अग्रीमधनाची प्रतिपूर्ती / भरपाई नमुना क्र.१०७ प्रमाणे असलेल्या पावतीसह आधारभूत उपप्रमाणक जोडून केली पाहिजे. गणवेश खरेदीसाठी संबंधित मुख्याध्यापकांच्या खात्यावर जमा होणा-या रकमांची प्रतिपूर्ती / भरपाई त्या - त्या वर्षात न करणे नियम बाह्य आहे.

**करिता, उपरोक्त बाबींची विभागाने प्रत्यक्ष शहानिशा करून खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३० : केंद्रीय प्रा.शाळा इंदिरानगर बायजीपुरा येथील शिक्षक / शिक्षिका /सेवक चौकीदार/ मजूर /यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत विविध शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्रीमती एम.एन.एलकटवाड - मुख्याध्यापक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

२. श्री.विशाल गंगाधर बाविस्कर - सह.शिक्षक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

क) सेवांतर्गत प्रशिक्षण केल्याबाबतची नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

३. श्रीमती कल्पना बारीकराव पाटील - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

४ श्रीमती सुरेखा बनाजी कर्वे - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

क) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

५. श्रीमती अनिता बन्सीदास भगुरे - सह.शिक्षिक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) संबंधित सहशिक्षिका ह्या जिल्हापरिषद जालना यांचे कार्यालयाकडून आदेश क्र.जिपजा/शिक्षण/प्रा-१/आंजिब-काबी -२०११,दिनांक ८.१२.२०११ अन्वये दिनांक १५.१२.२०११ अन्वये मनपाकडे वर्ग केल्याचे दिसून येते. साधारणतः संबंधितांना जिल्हा अंतर्गत बदली जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे वर्ग करणे अपेक्षित होते. महानगरपालिका औरंगाबाद या कार्यालयात वर्ग करण्याचे प्रयोजना बाबत बोध होत नाही.

ब) संबंधित शिक्षिका वर्ग झाल्याच्या तारखेपर्यंत त्यांचे रजा खाते वर २२ दिवस रजा शिल्लक बाबतची नोंद दर्शविलेली आहे. २२ दिवसाचे रजा वेतन वसूल करणे आवश्यक होते पण तसे केल्याचे दिसून येत नाही.

६. श्रीमती साजेदा बेगम हमीदोद्दीन - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

क) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

७. श्रीमती नर्गीस फातेमा सय्यद रजा अली - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

८. श्रीमती शकूंतलाबाई काथार- सेविका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

क) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

ड) संबंधिता दिनांक १.९.१९९४ पासून निवडश्रेणीचा लाभ प्रदान केलेला आहे. सदर निवडश्रेणीची वेतननिश्चिती वेतननियम ११ (४) प्रमाणे सुधारित करून दरम्यानच्या कालात अतिप्रदान झालेले वेतन वसूली करण्यात यावे.

९. श्रीमती ज्योती सुनिल शिंदे - माळी /सेविका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) संबंधिताचे सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील महत्वाच्या नोंदी सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत.

ब) प्रथम नियुक्ती दिनांक २७.१.२००४ अशी आहे. त्यानुसार संबंधिताचा परिविक्षाधीन कालावधी हा १ वर्ष म्हणजेच दिनांक २७.१.२००५ पासून खुला करणे नियमान्वये ठरते. मात्र संबंधिताचा परिविक्षाधिन कालावधी दिनांक ३१.१.२००८ पासून खुला केल्याची नोंद आहे. इतक्या विलंबाने परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याचे कारण त्यामध्ये नमूद नाही. प्रकरणाचे अवलोकन केले असता संबंधितास दिनांक २७.१.२००४ नियुक्तीपासून संपूर्ण वर्षाचे नियमित वार्षिक वेतनवाढी दिल्याच्या नोंदी आहेत. याबाबत विभागाने प्रकरण तपासून वेतननियम १९८१ चे ३९ मधील तरतूदीप्रमाणे कार्यवाही करावी किंवा सुधारित परिविक्षाधिन कालावधीचे आदेश निर्गमित करावे. तथापि प्रकरण तपासून प्रत्यक्ष खात्री करून कार्यवाही करावी.

**करीता, विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३१ : मनपा केंद्रीय प्रा.शा.इंदिरानगर, बायजीपुरा अंतर्गत जयभवानी नगर, औरंगाबाद येथील उपलब्ध शिक्षक संख्येबाबत.**

केंद्रीय प्राथमिक शाळा इंदिरानगर बायजीपुरा औरंगाबाद यांच्या अंतर्गत प्रा.शा.जयभवानीनगर येथील उपलब्ध अभिलेखे तपासले असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

प्रा.शा.जयभवानीनगर औरंगाबाद येथे १ ते ४ थी व बालवाडी पटावरील सर्व मिळून एकूण १६ विद्यार्थी संख्या आहे. १६ विद्यार्थ्यांकरीता (बीए, डी.एड) (एस.एस.सी. डी.एड) बी.ए.मॉन्टेसरी) असे ३ शिक्षक आहेत.

जा.क्र.प्रावी/१२-१३/२०३२८/३२ शिक्षण उपसंचालक कार्यालय औरंगाबाद दिनांक १.१२.२०१२ रोजीच्या पत्रानुसार कोणत्याही शाळेवर अतिरिक्त शिक्षक राहणार नाही व कोणतीही शाळा शिक्षकाविना / एक शिक्षिका राहणार नाही याची दक्षता घ्यावी. अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन तात्काळ करण्यात यावे. विलंब झाल्यास अतिरिक्त शिक्षकाचे वेतनाची जबाबदारी शिक्षणाधिकारी महानगरपालिका यांची वैयक्तिक राहील याची जाणीव करुन देण्यात आलेली होती.

उपरोक्त आदेशाचे देखील पालन होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. विद्यार्थी कमी आणि शिक्षक जास्त त्यामुळे महानगरपालिकेवर खर्चाचा अतिरिक्त बोजा पडून मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

**करिता उक्त बाबींची प्रत्यक्ष शहानिशा व पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास कळवावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र. ३२: केंद्रीय प्रा.शाळा मुकुंदवाडी येथील शिक्षक / शिक्षिका/सेवक /चौकीदार/ मजूर /यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.

शिक्षण विभागा अंतर्गत विविध शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्रीमती ज्योती सुधाकर काथार - सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता - सर्व नोंदी बरोबर असल्याचे निदर्शनास आले.

२. श्रीमती अंजली नामदेवराव चिंचोलीकर- सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक संचिका तपासली असता -

अ. पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

३. श्रीमती वर्षा वसंतराव जोशी - सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) परिविक्षाधीन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

४. श्रीमती बेबी पुंडलिक मालोदे - सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता
अ) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.

५. श्रीमती अर्चना दामोधर पंडीत - सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता

अ) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
ब) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

६. श्री.देवेंद्र रुपरावजी सोळंके - मुख्याध्यापक यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता - सर्व नोंदी बरोबर आहे.

७. श्रीमती ऊर्मिला मंगेश लोहार - मुख्याध्यापिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिकचे अवलोकन केले असता - देय वार्षिक वेतनवाढ दिनांक १.७.२००८ रू.५१०/- अशी परिगणित न करता ५२०/- अशी दर्शविलेली आहे. तसेच दिनांक १.७.२००९ रोजीची वार्षिक वेतनवाढ ५३०/- ऐवजी ५१०/- अशी दर्शविलेली आहे. तसेच पुढील वार्षिक वेतनवाढी प्रदान केल्याच्या नोंदी सेवापुस्तकात दिसून आल्या नाही. प्रकरण तपासून/ खात्री करुन अनुषंगिक कार्यवाही / पूर्तता करणेत यावी.

८. श्रीमती सुलताना बेगम शेख्र बशीर - सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
ब) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
क) वैद्यकीय तपासणी अहवालाची नोंद नाही.

९. श्रीमती ज्योती अशोक कुलकर्णी - सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
ब) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
क) वैद्यकीय तपासणी अहवालाची नोंद नाही.

१०. श्रीमती धनश्री धनंजय मिरखेलकर - सहशिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
ब) संबंधित शिक्षिका ह्या जालना पंचायत समिती यांचे कार्यालयाकडून महानगरपालिका,औरंगाबाद या कार्यालयाकडे दिनांक ७.३.१९९४ रोजी वर्ग झालेले आहेत . साधारणत: संबंधितांना जिल्हा अंतर्गत बदली जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे वर्ग करणे अपेक्षित होते. महानगरपालिका औरंगाबाद या कार्यालयात वर्ग करण्याचे प्रयोजना बाबत बोध होत नाही. तसेच संबंधिताचे पेन्शन कॉन्ट्रीब्युशन + रजा खातेवर शिल्लक रजा बाबतचे रजावेतन वसूल केल्याचे दिसून येत नाही. तथापि प्रकरण तपासून विभागाने खात्री करुन अहवाल सादर करावा.

११. श्री.गजानन जानकीराम शिरसाठ - सहशिक्षका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
ब) एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

१२. श्री.विलास शंकर धोत्रे - शिपाई यांचे मूळ सेवापट / संचिका तपासली असता

अ) पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
ब) वैद्यकीय तपासणी अहवालाची नोंद नाही.

क)	संबंधित कर्मचारी दारू पिवून शाळेत येतो व मोठ्या मुलींना अश्लील बोलतो. तसेच दारू पिवून शाळेत झोपतो. शाळेचे मुख्याध्यापक यांना अरेरावी करतो. सांगितलेले काम करत नाही. इ. बाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याची प्रत वैयक्तिक संचिकेत निदर्शनास आली. मात्र याबाबत संबंधित कर्मचा-याने आजपर्यंत कोणतेही उत्तर दिल्याचे दिसून येत नाही. याबाबत कोणतीही कार्यवाही प्रस्तावित केल्याचेही दिसून येत नाही.

१३.	श्रीमती सुलोचना दामु खेडकर - सेविका यांचे मूळ सेवापुस्तक / संचिका तपासली असता -

अ)	पोलिस - चारित्र्य पडताळणी अहवालाची नोंद नाही.
ब)	एकूण सेवा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.
क)	वैद्यकीय तपासणी अहवालाची नोंद नाही.

**करीता, विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**संबंधितांवर जबाबदारी निश्‍चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.३३ : केंद्रीय मा.शाळा मुकुंदवाडी अंतर्गत प्रा.शा.चिकलठाणा शाळेचे संरक्षक गेट, भिंत बांधणे व साहित्य खेरदी बाबत.

केंद्रीय मा.शाळा मुकुंदवाडी अंतर्गत प्रा.शा. चिकलठाणा या शाळेचे अभिलेखे तपासले असता संरक्षक गेट भिंत बांधणे व त्यासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविले, प्राप्त दरपत्रकात १) विष्णु फॅब्रीकेशन यांचे ५७,०००, दिनांक १४.३.२०१५ २) न्यू जगदंबा फॅब्रीकेशन यांचे ५९,०००/- दिनांक १४.३.२०१५ ३) नवनाथ फॅब्रीकेशन यांचे ६४,२००/- चे १४.३.२०१५ रोजी ३ दरपत्रके प्राप्त झाल्याचे आढळून आले.

प्राप्त दरपत्रकांपैकी सर्वात कमी दराचे विष्णु फॅब्रीकेशन यांचे कडून काम करुन घेण्यात आल्याचे नमूद आहे.

उक्त प्रकरणात आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालील प्रमाणे -

१.	न्यु जगदंबा फॅब्रीकेशन व नवनाथ फॅब्रीकेशन यांचे कोटेशन नाही. डायरेक्ट Invoice आहे ही बाब आक्षेपार्ह आहे. तिन्ही पुरवठाधारकाकडून दरपत्रके मागवून वाटाघाटी अंती कामाचे कंत्राट देणे अपेक्षित असतांना नियमांची पायमल्ली करण्यात आलेली आहे.

२.	शाळेच्या संरक्षक गेटची भिंत बांधून घेत असतांना मनपाचा इमारती व बांधकामाचा स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. त्या विभागाचा अभिप्राय न घेताच परस्पर बांधकाम केल्याचे तपासणीत आढळून आले. तसेच उक्त कामाची मागणी संबंधित विभागाकडे दिलेली नाही.

३.	सदरील खर्च हा कोणत्या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात आला याचा बोध होत नाही.

४.	परिपूर्ती प्रतीवृत्त व परिपूर्ती प्रमाणपत्र सादर केल्याविना कोणत्याही कंत्राटदारास अंतीम रक्कम प्रदान करता येणार नाही. असे असतांना रकमेची अदायगी करण्यात आलेली आहे. झालेला संपूर्ण खर्च वसूलीस पात्र.

५. संरक्षित भिंतीचे बांधकाम कंत्राटदार विष्णु फॅब्रीकेशन यांनी केल्याचे नमूद असून त्यांना ५७,०००/- रकमेचा धनादेश खात्यावर वटवल्याची नोंद आहे. फाईल सोबत जोडलेल्या साध्या कागदावर खालीलप्रमाणे रकमांचा गोषवारा दिलेला आहे. त्यावर कोणत्याही पुरवठाधारकाची सही व शिक्का नाही.

करिता, झालेला खर्च का अमान्य करण्यात येवू नये.

सिमेंट = ३०००/-

रेती = ६०००/-

विट = ५०००/-

डब्बर = ४०००/-

भारत इलेक्ट्रीकल =२०००/-

कलरींग=२०००/-

Ms Sheet = ९५००/-

Ms pipe = ७५००/-

Ms Bar = ८०००/-

४७,०००/-

वरील तपशिलवार बिलाची एकूण रक्कम ४७,०००/- होत असतांना ५७,०००/- का अदा करण्यात आले याचा बोध होत नाही.

८. काम करुन घेतले अथवा नाही याचा कुठलाही पुरावा संचिकेत आढळून आलेला नाही.

**मुद्या क्र. १ ते ५ बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन रक्कम रू.५७,०००/- वसूलीअंती प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.३४ : केंद्रीय प्रा.शा.बन्सीलालनगर येथे सी.सी.टिव्ही कॅमरे खरेदी करणे व बसविणे बाबत.

केंद्रीय प्रा.शाळा बन्सीलालनगर या शाळेत सन २०१४-१५ या वर्षात सी.सी.टिव्ही. कॅमेरे खरेदी करण्यासाठी तीन दरपत्रके मागविण्यात आली असता श्रीपाद इन्टरप्राईजेस एस.के.इन्टरप्रायजेस, इंगल कॉम्प्युटर्स यांची दरपत्रके दिनांक ५.४.२०१४ रोजी प्राप्त झाली. सदरील दरपत्रके उघडण्यात आली असता सर्वात कमी दराची श्रीपाद इन्टरप्रायजेस यांचे दर कमी असल्याने त्यांच्याकडून कॅमेरे खरेदी करून त्याच्याकडूनच बसवून घेण्यात आले व त्यास एकूण रक्कम रू.५४,५००/- अदा करण्यात आले व शाळेत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आल्याबाबत शिक्षण विभागास पत्र क.१५२/२०१४ दिनांक २.५.२०१४ अन्वये कळविण्यात आले. सदरची तपासणी केली असता पुढील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सी.सी.टिव्ही कॅमेरे खरेदी करणे व बसविणे बाबत जाहिरात देण्यात आलेली संचिकेत दिसून आली नाही.

२. सदरील कॅमेरे खरेदी व बसविण्याबाबत प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्यात आली नाही.

३. श्रीपाद इन्टरप्राईजेस यास सी.सी.टी.व्ही.कॅमेरे खरेदी करुन बसविणे बाबत कार्यालयीन आदेश व पुरवठा आदेश संचिकेत दिसून आले नाही.

४. श्रीपाद इन्टरप्राईजेस यांनी सादर केलेल्या देयकावर देयक क्रमांक, दिनांक, सी.एस.टी., बी एस.टी. व एल.बी.टी क्रमांक नसून सुध्दा त्यास देयक अदा करण्यात आले.

५. श्रीपाद इन्टरप्राईजेस यांच्याकडून रक्कम रू.१०० /- च्या मुद्रांकावर करारनामा करुन घेण्यात आलेला नाही.

६. सि.सि.टी.व्ही.कॅमेरे खरेदी करणे व बसविणे बाबत खर्च रक्कम रू.५४,५००/- श्रीपाद इन्टरप्रायजेस यांना अदा करण्यात आले. मग सदरील रक्कम सर्व शिक्षा अभियान व मनपा यांच्या प्राप्त अनुदानातून खर्च करण्यात आलेली आहे का याचा खुलासा व्हावा.

**तरी विभागाने मुद्या क.१ ते ६ बाबतची तपासणी करुन त्याचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३५ : केंद्रीय प्रा.शाळा बन्सीलालनगर येथील शिक्षक / शिक्षिका/सेवक चौकीदार/ मजूर /यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत बन्सीलालनगर येथील प्रा.शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्रीमती अलका जनार्धन भडके -मुख्याध्यापक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

    १. संबंधितास दिनांक १.७.२००९ रोजी वार्षिक वेतनवाढ ५१०+ मूळ वेतन १२७१० = १३२२०/- ऐवजी १३,३२०/- म्हणजेच रू.१००/- जास्तीचे दर्शवून प्रदान झालेले आहे.
    २. चारित्र्य पडताळणी / एकूण सेवा नोंदी सेवापुस्तकात नोंदविलेल्या नाहीत.

२. श्रीमती रिजवाना बेगम हैदरयार खान - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

    १. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.
    २. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.
    ३. एकूण सेवा नोंदी नोंदविलेल्या नाहीत.

३. श्रीमती सुनिता अण्णासाहेब तनपुरे - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. श्रीमती लईख्रा अजगर अ.अब्दुल हक मुसा - मुख्याध्यापक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

२. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

३. एकूण सेवा नोंदी नोंदविलेल्या नाहीत.

५. श्री.सुनिलकुमार सुखदेव नरवडे - सह.शिक्षिक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

६. श्रीमती गटकळ नंदा राम- सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

७. श्रीमती सुलभा सतिशचंद्र राणेकर सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

२. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

३. एकूण सेवा नोंदी नोंदविलेल्या नाहीत.

८. श्री.जाफर खान अजिज खान, चौकीदार यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. प्रथम नियुक्ती दिनांक १.६.१९८५ , पद सफाई मजूर असे आहे. मात्र संबंधित कर्मचारी यांनी आस्थापना -२ कार्यालयात १९९५ पर्यंत कार्यरत असल्याचे नोंदीवरून दिसून आले.

२. सन १९९५ पासून शिक्षण विभागामध्ये बन्सीलालनगर येथील प्राथमिक शाळेत चौकीदार म्हणून कार्यरत असल्याचे सेवापटावरुन स्पष्ट होते.

३. संबंधितांनी वेळोवेळी उपभोगलेल्या विविध रजा रजाखात्यामध्ये नोंदविलेल्या नाहीत.

४. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

५. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

६. एकूण सेवा नोंदी नोंदविलेल्या नाहीत.

९. श्रीमती शकुंतला काथार, सेविका यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

२. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.

३. संबंधितास दिनांक ९.६.१९९४ पासून (७७५-११५०) ही निवडश्रेणी प्रदान करण्यात आलेली आहे.सदरची वेतननिश्चिती वेतननियम ११(४) प्रमाणे सुधारित करण्यात यावी.

१०. श्री. शाम लक्ष्मीकांत दहीवाल, शिपाई यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. सेवापटाच्या प्रथम पृष्ठावरील महत्वाच्या नोंदी सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेल्या नाहीत.

२. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

११. श्रीमती लक्ष्मी लक्ष्मण नागुल्ला, सेविका, यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

२. एकूण सेवा नोंदी नोंदविलेल्या नाहीत.

**करीता, विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.३६ : प्रा.शा.एन-६ येथे स्वच्छतागृह वाढीव अनुदान सन २०१४-१५ रक्कम रू.२६४५१/- बाबत.

केंद्रीय प्रा.शा.एन-२ अंतर्गत प्रा.शा.एन-६ या शाळेचे अभिलेखे तपासले असता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत रक्कम रुपये २६४५१/- स्वच्छता गृह सुधारसाठी रक्कम प्राप्त झाली. ही रक्कम धनादेश क्र.१५४४२ दिनांक १९.६.२०१४ द्वारे व्हाऊचर क्र.५१ प्रमाणे गुत्तेदार श्री.एम.ए.काझी यांना कोरे कागदावर लिहिलेले देयकान्वये रक्कम अदा करण्यात आली.

मात्र सदरील गुत्तेदाराची निविदा केव्हा प्राप्त झाली व त्यास कोणत्या कामासाठी कार्यालयीन आदेश देण्यात आले. सदरील कामासाठी किती रक्कम प्राप्त झाली याची कागदपत्रे संबंधित शाळेत लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

करिता, विभागाने सर्व शिक्षा अभियानाकडून केलेल्या निविदा व कार्यालयीन आदेश प्राप्त करून व केलेल्या कामांची M.B. संपूर्ण संचिका लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात यावी असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उक्त अनियमिततेबबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.३७ :शिक्षण विभागातील खालील दर्शविलेल्या केंद्रीय प्राथमिक शाळा व अंतर्गत शाळा यांचे लेखापरीक्षणा दरम्यान खालील आक्षेपार्ह बाबी आढळून आल्या.

केंद्रीय प्राथमिक शाळा व अंतर्गत शाळा येथे अनुक्रमे आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालील प्रमाणे

१. केंद्रीय प्रा.शाळा एन-१२ येथील अंतर्गत प्राथमिक शाळा एन-११ येथील शाळेचे लेखे, लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन न दिल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

२. केंद्रीय प्रा.शाळा एन-७ येथील अंतर्गत प्रा.शाळा नारेगांव येथील मनपाच्या पासबुकवर दिनांक ४.४.२०१३ रोजी रक्कम रू.७,३३,८०७/- रक्कम दर्शविली असतांना रोजकिर्दवर खर्च बाजूस ७,२८,८०७/- इतकी रक्कम दर्शविली आहे. रक्कम रू.५०००/- ची तफावत असल्याकारणाने खर्च वजा जाता शिल्लक रकमेचा रोजकिर्द व खाते पुस्तक यांचा ताळमेळ बसत नसल्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आले नाही.

३. केंद्रीय प्रा.शाळा एन-७ येथील अंतर्गत प्रा.शा.नारेगांव येथील सर्व शिक्षा अभियान येथील रोजकिर्द व खाते पुस्तक प्रा.शा.नारेगाव येथील सर्व शिक्षा अभियान येथील रोजकिर्द व खातेपुस्तक यात तफावत असल्याकारणाने लेखापरीक्षण करता आले नाही.

४. केंद्रीय प्रा.शा.एन-७ येथील अंतर्गत शाळा अशोकनगर येथे अल्पसंख्याक पालक प्रोत्साहनपर भत्ता प्रती विद्यार्थी रू. १९२/- प्रमाणे १४६ विद्यार्थ्यांचे चेक नंबर ५६४०२ अन्वये रू. २८०३२/- प्राप्त झालेले होते. संबंधित मुख्याध्यापक यांनी रक्कम रू.२८०३२/- वाटपासाठी खात्यातून काढले. प्राप्त लेखे तपासणीअंती असे निदर्शनास आले की, १४६ विद्यार्थी ऐवजी १४३ विद्यार्थ्यांच्या पालकांना भत्ता वाटप करण्यात आला. संबंधिताकडून उर्वरीत रक्कम ५७६/- वसूलीस पात्र.

५. केंद्रीय प्रा.शा.एन-७ येथील अंतर्गत शाळा अशोकनगर येथे दिनांक १२/८/२०१४ रोजी अभ्यासिका वर्ग खर्चासाठी प्राप्त अनुदानातून रू.२०,०००/- काढण्यात आले. यामध्ये खालील प्रमाणे खर्च दाखविण्यात आला.

| बील नंबर | दिनांक | पुरवठाधारकाचे नांव | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| ५७ | २४/१२/२०१४ | यश इंटरप्रायजेस | ३५००/- |
| ४४२ | -- | श्रध्दा महिला विकास मंडळ | ११२००/- |
| -- | १२/८/२०१४ | श्रीनाथ इलेक्ट्रीकल | १५००/- |
| | | **एकूण खर्च** | **१६,२००/-** |

उपरोक्त प्रकरण १ व २ मध्ये संबंधित मुख्याध्यापक यांनी खर्च वजा जाता उर्वरीत रक्कम अनुक्रमे रू.५७६/- व ३८००/- रू.आजतागायत खात्यात जमा केलेले नाही ही बाब नियमबाह्य आहे.

६. गणवेश वाटपासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ साठी सर्व शाळांना मनपा व सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत निधी प्राप्त झालेला असून खात्यांवर निधी शिल्लक आहे. दिवसेंदिवस त्या रकमा व्याजासहीत वाढत असल्या कारणाने त्याचे समायोजन झालेले नाही. अनुदान वाटपानंतर खात्यांवर शिल्लक असलेल्या रकमेचा शाळानिहाय तक्ता अर्धसमास पत्र क्र.५८ सोबत देण्यात आलेला आहे.

**करिता, उक्त बाबींची विभागाने प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करुन तसा अनुपालन अहवाल लेखाविभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.३८ : केंद्रीय मा.विद्यालय प्रियदर्शनी इंदिरानगर येथील शिक्षक / शिक्षिका/सेवक चौकीदार/ मजूर /यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.

शिक्षण विभागा अंतर्गत प्रियदर्शनी इंदिरानगर येथील मा.शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्रीमती विद्या एस.बुलबुले -सह.शिक्षिका, यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

   १. संबंधिताचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता संबंधितास जालना जिल्हा परिषद यांचे कडून आदेश क्र.पसजा/शिक्षण /आस्था/कावि/२००६,कार्यालय पंचायत समिती , जालना, दिनांक २१.३.२००६ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ दोन वर्षाकरीता पुढील वेतनावर परिणाम न होता थांबविलेली आहे. नियमित वेतनवाढ (दिनांक १ जून ) तसेच दिनांक १३.६.२००६ रोजीपासून चटोपाध्याय वेतनश्रेणी (५०००-८०००) लागू. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे ग्रेड पे -४२०० लागू केलेला असून यामध्ये वेतननिश्चिती करतांना विकल्प न घेता दिनांक १.७.२००६ रोजी पासून वार्षिक वेतनवाढ प्रदान केलेली दिसून आली.

   २. संबंधित शिक्षिका यांचे प्रथम नियुक्तीपासून ते मनपाकडे वर्ग होण्याचे कालावधी पर्यंत पेन्शन कॉन्ट्रीब्युशन व रजावेतन इ.भरणा केल्याची नोंद दिसून आली नाही.

२. श्रीमती तेजस्विनी धनंजय देसले - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

   १. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे केलेली वेतननिश्चिती तपासली असता दिनांक १.७.२००९ रोजीची वार्षिक वेतनवाढ ३४०/- ऐवजी ३५०/- म्हणजेच रु.१०/- जास्तीचे निश्चित करण्यात आलेले आहे.

   २. जिल्हा परिषद उस्मानाबाद या कार्यालयाकडून मनपा औरंगाबाद कडे वर्ग दिनांक ५.१२.२००९ पर्यंतचे रजावेतन / DCPS योजने अंतर्गत रक्कम भरणा केल्याची नोंद दिसून आली नाही.

३. श्री.जारवाल चैनसिंग, सह.शिक्षक यांचे मूळसेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे निदर्शनास आले.

४. श्री.संजिव लक्ष्मण सोनार, सह.शिक्षक यांचे मूळसेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे निदर्शनास आले.

५. श्री.लक्ष्मण रंगनाथ महालकर, सह.शिक्षक यांचे मूळसेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे निदर्शनास आले.

६. श्रीमती आशा भास्करराव सिंदखेडकर सह.शिक्षिका यांचे मूळसेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे निदर्शनास आले.

७. श्रीमती सखु बंडूजी दिवेकर सह.शिक्षिका यांचे मूळसेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे निदर्शनास आले.

**करीता, विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करुन तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र. ३९: केंद्रीय प्रा.शा.प्रियदर्शनी इंदिरानगर प्रा.शा.आणि अंतर्गत शाळा येथे आढळून आलेल्या अनियमितता व आक्षेपाबाबत.

केंद्रीय प्राथमिक शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर व अंतर्गत ६ शाळा अनुक्रमे

१. प्रा.शा.प्रियदर्शनी इंदिरानगर (उर्दू)
२. प्रा.शा.एकनाथनगर
३. प्रा.शा.गारखेडा
४. प्रा.शा.जवाहर कॉलनी
५. प्रा.शा.शहानूरवाडी यांचे लेखे तपासण्यात आले.

प्रा.शा.विष्णुनगर व प्रा.शा.मुलींची उस्मानपुरा येथील लेखे तपासणीस उपलब्ध करुन देण्याबाबत कें.प्रा.शाळेचे मुख्याध्यापक यांना वारंवार सूचना देवूनही लेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही.

उपलब्ध लेखे तपासत असतांना आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. प्रा.शा.एकनाथनगर येथील लेखे तपासले असता दिनांक २७/११/२०१३ रोजी धनादेश क्र.२४६८ अन्वये शालेय देखभाल दुरुस्तीसाठी रु.७५००/- अनिल आर्टस यांच्या नांवे अदा करण्यात आलेली आहे. तथापि बील नं. -६३ दिनांक २७/११/२०१३ रोजी अनिल आर्टस यांना बोर्ड कलरिंग आणि इतर कामासाठी रु.५५००/- दिल्याचे नमूद आहे. दरपत्रक खोडून देयक असे पेनाने लिहिलेले आहे. सदरील बिलावर विक्रेत्याचा शिक्का नाही. काम करुन घेण्यासाठी शालेय समिती कमिटीची मान्यता घेण्यात आलेली नाही. प्रकरणात काम करुन घेतले अथवा नाही याचा बोध होत नाही. बीलावर रक्कम रु.५५००/- असतांना जास्तीची रक्कम अदा करण्यात आलेली आहे. ही बाब आक्षेपार्ह व नियमबाह्य आहे.

२. प्रा.शा.एकनाथनगर येथील जयभद्रा साहित्य भांडार यांना साहित्य खरेदीसाठी चेक नं.८५८२२ नुसार रू. ९९१२/- रूपये अदा करण्यात आलेले आहे. तपासणीत जयभद्रा साहित्य भांडार, बील नं.५१०, दिनांक २१/१/२०१४ जोडलेले आढळून आलेले असले तरी तपशिलात पेन, पेन्सिल, वही, लिहिलेले आहे. तथापि नग, भाव/ प्रती रक्कम येथे काहीही नमूद केलेले नाही. शेवटी एकूणच्या ठिकाणी रू. ९९१२ /- असे नमूद आहे. नोंदविलेली एकूण रक्कम कशी आली याचा बोध होत नाही. ही बाब आक्षेपार्ह व नियमबाह्य आहे.

३. प्रा.शा.एकनाथनगर येथे बील नं.१६८३९ व्हाऊचर नंबर १२, दिनांक २३/१/२०१४ अन्वये मुख्याध्यापक यांनी कॅश काढून घेवून सोनपापडी व फरसाण इत्यादीसाठी रू. २८,०००/- इतकी रक्कम गुरुकृपा फरसाण मार्ट यांना अदा करण्यात आलेली आहे.बीलावर प्रत्येक दिवसासाठी रू.१६०/- .प्रमाणे १७५ दिवसाकरीता रू.२८,०००/- असे लिहिलेले आहे. तथापि एकूण रकमेच्या ठिकाणी whitener लावून रक्कम रू.२८०००/- लिहिलेले आहे. १७५ दिवसासाठी खाऊ अदा करण्यात आल्याचे नमूद असले तरी त्यांचा दैनंदिन हिशोब नाही. किती विद्यार्थ्यांना खाऊ वाटप झाला याचाही उल्लेख नाही.

४. अर्धसमास क्र.५२ सोबत जोडलेल्या यादीनुसार संबंधित विभागाकडे गणवेश अनुदान वाटपानंतर सन २०१३-१४ व सन २०१४-१५ प्रमाणे रकमा अर्धसमास पत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार आजतागायत खात्यावर शिल्लक आहे.

**करिता, उपरोक्त प्रकरणात झालेल्या खर्चाबाबत विभागाने प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४० : केंद्रीय प्रा.शाळा हर्सूल येथील शिक्षक / शिक्षिका/सेवक /चौकीदार/ मजूर /यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत बन्सीलालनगर येथील प्रा.शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्रीमती मिना उमाकांत भिलेगांवकर , सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

पेन्शन कॉन्ट्रीब्युशन रजा वेतन भरणा केल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

२. श्रीमती कल्पना भगवान जोशी , सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.
२. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.
३. पेन्शन कॉन्ट्रीब्युशन रजा वेतन भरणा केल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

३. श्रीमती रोहिणी सोमीनाथ रोकडे , सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

४. श्रीमती नुतन भाऊसाहेब दांडगे, सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

५. श्रीमती संगिता भानुदास कुंटे, सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.

६. श्री.सुधाकर बाळा वानखेडे,सह.शिक्षक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे आढळून आल्या.

७. श्री.रामभाऊ सोनाजीराव सावंत ,सह.शिक्षक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे आढळून आल्या.

८. श्रीमती रिता गोपीनाथ श्रेष्ठा, सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता सर्व नोंदी बरोबर असल्याचे आढळून आल्या.

**करीता, विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करुन तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

## परिच्छेद क्र.४१ : केंद्रीय प्रा.शा. हर्सूल गांव , (मराठी) येथे स्वच्छतागृह वाढीव अनुदान सन २०१३-१४ सन २०१४-१५ रक्कम रू.१,३२,०००/- बाबत.

केंद्रीय प्रा.शा. मराठी, हर्सूल गांव या शाळेचे अभिलेखे तपासले असता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत रक्कम रुपये ६०,०००/- स्वच्छता गृह सुधारसाठी रक्कम प्राप्त झाली. ही रक्कम चेक क्र.४०४२ दिनांक निरंक द्वारे गुत्तेदार श्री.रियाजोद्दीन यांना रक्कम अदा करण्यात आली.

तसेच रक्कम रुपये ७२,०००/- स्वच्छता गृह सुधारसाठी ही रक्कम चेक क्र.४४८६३ दिनांक १७.४.२०१४ द्वारे गुत्तेदार श्री.सय्यद मजहर अली यांना रक्कम अदा करण्यात आली.

**उक्त दोन्ही रकमांचे धनादेश संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी वितरीत केलेले आहेत. धनादेश वितरीत करणा-या संबंधितांकडे धनादेशाच्या रकमेची प्रमाणके जतन करणेची जबाबदारी असते. प्रकरणात अशा प्रकारची प्रमाणके शाळेच्या मुख्याध्यापकांनी ठेवलेली नाहीत.**

**करिता, उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४२ : केंद्रीय प्रा.शा.ज्युब्लीपार्क आणि अंतर्गत शाळा येथे लेखापरीक्षणा दरम्यान आढळून आलेल्या अनियमितता व आक्षेपाबाबत.**

केंद्रीय प्राथमिक शाळा ज्युब्लीपार्क व अंतर्गत ४ शाळांचे अनुक्रमे

१. प्रा.शा.बडी गिरणी
२. प्रा.शा.मंजुरपुरा
३. प्रा.शा.जुनाबाजार
४. प्रा.शा.नागेश्वरवाडी

कें.प्रा.शा. ज्युब्ली पार्क व अंतर्गत ४ शाळांच्या लेखातपासणीत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी पुढील प्रमाणे -

१. प्रा.शा.बडी गिरणी येथील सन २०१३-१४ गणवेश वाटपाचे रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे झालेल्या गणवेश खरेदीच्या वाटपाबाबत शहानिशा करता आलेली नाही.

२. प्रा.शा.बडी गिरणी येथे लेबर कॉन्ट्रॅक्टर यांना दिनांक २९/४/२०१४ रोजी अपंग विद्यार्थ्यांकरीता रॅम्प बांधकामासाठी व्हाऊचर नंबर ७३ अन्वये १५,०००/- खर्च करण्यात आले. सदरील प्रकरणात कोटेशन मागविण्यात आलेले नाही. संपूर्ण खर्च रू.१५,०००/- नगदी करण्यात आलेला आहे.काम झाल्यानंतरचे completion certificate , मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे काम करून घेतले अथवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते.

३. प्रा.शा.बडी गिरणी येथे मनपा गणवेश खरेदी सन २०१४-१५ अंतर्गत एकूण रक्कम रू.५६,८००/- ची खरेदी करण्यात आलेली आहे. तथापि संचिकेत मातोश्री महिला बचत गटाचे देयक क्र.११२६,दिनांक १०/१२/२०१४ रक्कम रू. १२७८०/- आणि श्री.गारमेन्ट्स यांचे देयक क्र. १५१० दिनांक १०/१२/२०१४ रक्कम रू.४४,०२०/- अशी दोन वेगवेगळी देयके जोडलेली आहेत. २ वेगवेगळ्या पुरवठा धारकाकडून खरेदी करण्यात आलेली असतांना मातोश्री महिला बचत गटाला रक्कम रू.५६,८००/- चा चेक का अदा करण्यात आला आहे याचा बोध होत नाही.

४. अर्धसमास पत्र क्र.५९ सोबत जोडलेल्या यादीनुसार संबंधित विभागाकडे गणवेश अनुदान वाटपानंतर सन २०१३-१४ व सन २०१४-१५ प्रमाणे मनपा व सर्व शिक्षा अभियानाच्या रकमा आजतागायत खात्यावर शिल्लक आहे.

५. प्रा.शा.वसंतभुवन, प्रा.शा.लेबर कॉलनी, प्रा.शा.पोलिस हेडक्वॉर्टर्स येथील लेखे तपासणीस वारंवार सुचना देवूनही उपलब्ध झालेले नसल्यामुळे लेखापरीक्षण करता आले नाही.

**याबाबत विभागाने प्रत्यक्ष शहानिशा व खातरजमा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४३ : भविष्य निर्वाह निधीची रक्कम कपाती बाबत.**

श्रीमती आर्शिया तस्निम अब्दुल हमीद ह्या मुंबई येथून जिल्हा बदली होवून मनपा सेवेत रूजू झालेल्या आहेत.

त्यांचे ज्युब्लीपार्क येथील लेखे तपासणीसाठी मागितले असता संबंधिताचे मूळ सेवापट, बदलीसाठीची मा.आयुक्त यांची मान्यता तसेच सर्वसाधारण सभेचा ठराव तपासणीस उपलब्ध झालेला नाही. मनपा आदेश क्र.मनपा/शिक्षण/१८३/१०, दिनांक १०.२.२०१० अन्वये दिनांक १०.१०.२०११ रोजी मा.मुख्याध्यापक यांनी कामावर रूजू करून घेतल्याचे नमूद आहे.

संबंधिताचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे पाहिले असता भविष्य निर्वाह निधी रकमेची जून -२०१२ पासून कपात होत असल्याचे निदर्शनास आले.

मागील कपातीचे अथवा इतर लेखे काहीही उपलब्ध नसतांना जून -२०१२ पासून भविष्य निर्वाह निधीची कपात कोणत्या आधारे सुरू करण्यात आली ? याबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून द्यावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.४४: केंद्रीय प्रा.शाळा एन-१२ शाळेच्या लेखापरीक्षणाबाबत.**

केंद्रीय प्राथमिक शाळा एन-१२ या शाळेचे उक्त वर्षाचे किर्द रजिस्टर व बँकेचे पासबुक आणि चिकटबुकचे तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सदरील शाळेने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रक्कम रु.४०००/- ची भंगार विकी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता न घेताच सदरील विक्री करण्यात आली. भंगार विक्री करीत असतांना ती किलोने विक्री करणे आवश्यक होते ते न करता होलसेल विक्री करण्यात आली आणि दरपत्रके मागवितांना तुटके साहित्य, तुटलेले लोखंडी बेंचेस व इतर साहित्य ह्याचे वेगवेगळे दर मागविणे अपेक्षित होते तसे न करता सरसकट विक्री केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

२. सदरील शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी दिनांक १४.३.२०१४ रोजी रक्कम रु.५९,५००/- बँकेतून काढण्यात आले होते आणि दिनांक ३१.७.२०१४ रोजी उरलेली रक्कम रु.९७६४/- सेन्ट्रल बँकेत जमा केली होती. म्हणजेच संबंधित मुख्याध्यापिकेने रक्कम रु.४९७३६/- कोणत्या कामासाठी खर्च केले व काढण्यात आलेल्या रकमेची आवश्यकता होती का ? शाळा व्यस्थापन समिती कडून मान्यता घेण्यात आली नाही. सदरील खर्च संबंधित दुकानदार किंवा एजन्सीच्या नावाने चेक द्वारे रक्कम अदा केलेली नाही.

३.	महानगरपालिकेच्या शाळांना फर्निचर व इतर डेड स्टॉक शिक्षण विभागाच्या एकत्रित खरेदीतून पुरवठा केला जातो. फर्निचर खराब झाल्यास शिक्षण विभागाच्या मुख्य भांडारमध्ये जमा करणे आवश्यक होते, तसे न करता शाळांनी परस्पर साहित्याची विक्री करुन मुख्याध्यापकाच्या खात्यात रकमा जमा करणे ही बाब आक्षेपार्ह आहे.

**मुद्या क्र. १ व ३ बाबत लेखापरीक्षण विभागास खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४५ : प्रा.शाळा सिडको एन-१२ येथील शिक्षक / शिक्षिका/सेवक/ चौकीदार/ मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत सिडको एन-१२ येथील प्रा.शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१.	श्रीमती निशा देवराव कुलकर्णी - मुख्याध्यापक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१.	संबंधित शिक्षका ह्या आदेश क्र.जिपऔ/शिक्षण/प्रावि-०२/२००९/६५४/९२, दिनांक १८.२.२००९ अन्वये मनपाकडे सेवा वर्ग झाल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून आली. सेवा वर्ग झाल्याबाबत जिल्हा अंतर्गत बदली करीता मा.सर्वसाधारण सभेचा ठराव व अनुषंगिक कार्यवाहीची कागदपत्रे संचिकेत वा सेवापुस्तिकेत दिसून आल्या नाही. तसेच स्वतंत्र संचिकेत सुध्दा उक्त कर्मचा-यांचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

२.	पेन्शन कॉन्ट्रीब्युशन रजा वेतन भरणा केल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

२.	श्रीमती समिना मुस्तफा शेख - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुसतकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदशनास आल्या.

१.	संबंधित शिक्षका ह्या आदेश क्र.जिपऔ/शिक्षण/प्रावि-०२/२००९/६२४/९०, दिनांक १८.२.२००९ अन्वये मनपाकडे सेवा वर्ग झाल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून आली. सेवा वर्ग झाल्याबाबत जिल्हा अंतर्गत बदली करीता मा.सर्वसाधारण सभेचा ठराव व अनुषंगिक कार्यवाहीची कागदपत्रे संचिकेत वा सेवापुस्तिकेत दिसून आल्या नाही. तसेच स्वतंत्र संचिकेत सुध्दा उक्त कर्मचा-याचे अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

२.	पेन्शन कॉन्ट्रीब्युशन रजा वेतन भरणा केल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

३.	श्रीमती तौफिका जहॉ शेख महम्मद गयास - सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

संबंधित शिक्षिका ह्या आदेश क्र.मनपा/शिक्षण/२७९/२००६, दिनांक २०.४.२००६ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपाची गोठविण्यात आली आहे. मात्र

सेवापुस्तकाचे वेतन नोंदी प्रमाणे एक वेतनवाढ न थांबवता नियमित वेतनवाढ दिल्याचे नोंदीवरुन आढळून आले. तसेच सहाव्या वेतन आयोगाचे वेतननिश्चिती मध्ये एक वार्षिक वेतनवाढ थांबविल्याबाबत परिणाम दर्शविलेला नाही. विभागाने प्रकरण तपासून / खात्रीअंती अतिप्रदान रक्कम वसूलीअंती वेतन निश्चित करुन सेवापुस्तकामध्ये लाल शाईने नोंद घ्यावी.

४. श्री.रामदास माधव मालहणकर, सह.शिक्षक यांचे मूळ सेवापुसतकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदशनास आल्या.

संबंधित शिक्षक हे आदेश क्र.मनपा/शिक्षण/२७९/२००६, दिनांक २०.४.२००६ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ एका वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरुपाची गोठविण्यात आली आहे. मात्र सेवापुस्तकाचे वेतन नोंदी प्रमाणे एक वेतनवाढ न थांबवता नियमित वेतनवाढ दिल्याचे नोंदीवरुन आढळून आले. तसेच सहाव्या वेतन आयोगाचे वेतननिश्चिती मध्ये एक वार्षिक वेतनवाढ थांबविल्याबाबत परिणाम दर्शविलेला नाही. विभागाने प्रकरण तपासून / खात्रीअंती अतिप्रदान रक्कम वसूलीअंती वेतन निश्चित करुन सेवापुस्तकामध्ये लाल शाईने नोंद घ्यावी.

५. श्रीमती चंद्रकलाबाई एफ म्हस्के, सेविका यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.
२. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.
३. एकूण सेवा नोंदी सेवापुस्तकात घेतल्याचे दिसून येत नाही.

६. श्रीमती तमीजा बी.शे.जानु पटेल, सेविका यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.
२. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.
३. एकूण सेवा नोंदी सेवापुस्तकात घेतल्याचे दिसून येत नाही.

७. श्रीमती शारदाबाई केशवराव कुलकर्णी- सेविका यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. चारित्र्य / वैद्यकीय पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.
२. परिविक्षाधिन कालावधी खुला केल्याची नोंद नाही.
३. एकूण सेवा नोंदी सेवापुस्तकात घेतल्याचे दिसून येत नाही.

८. श्रीमती विद्या प्रविण ढेकळे - सेविका यांचे मूळ सेवापटाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. संबंधिताच्या मूळ सेवापटाचे प्रथम पृष्ठावरील नोंदी प्रमाणित केलेल्या नाहीत.
२. चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्राची नोंद नाही.
३. एकूण सेवा नोंदी सेवापुस्तकात घेतल्याचे दिसून येत नाही.

**करीता, विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करुन तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४६ : केंद्रीय प्रा.शाळा सिडको एन-७ येथील शिक्षक / शिक्षिका/सेवक/चौकीदार/ मजूर /यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासणीबाबत.**

शिक्षण विभागा अंतर्गत सिडको एन-७ येथील प्रा.शाळेचे कार्यरत शिक्षक / सेवक / चौकीदार / मजूर यांचे सेवापुस्तक / सेवापट तपासले असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या.

१. श्री.माणिक रामराव निंबाळकर, सह.शिक्षक यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.



१. संबंधित शिक्षक हे जिल्हा परिषद कार्यालय,औरंगाबाद यांचेकडून आदेश क्र.जि.प.औ/शिक्षण/प्रा.वि/५/८६,दिनांक १.९.१९८६ पासून महानगरपालिकेकडे वर्ग झालेले असून संबंधिताने पेन्शन कॉन्ट्रीब्युशन व रजा वेतन अंशदान भरणा केल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून आली नाही.

२. संबंधिताची वार्षिक वेतनवाढ दिनांक १.१२.१९८३ अशी असल्याची नोंद सेवापुस्तकामध्ये दिसून येते. मात्र दिनांक १.१२.१९८३ पासूनच्या नियमित वार्षिक वेतनवाढीच्या नोंदी सेवापुस्तकामध्ये आढळून आल्या नाहीत.

२. श्रीमती शंकुतलाबाई विठ्ठलराव गरसोळे- सह.शिक्षिका यांचे मूळ सेवापुस्तकाचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. संबंधित शिक्षिका ह्या आदेश क्र.जिपऔ/शिक्षण/पा.वि./५/८६, दिनांक खाडाखोड केल्याचे दिसून आले. दिनांक १.९.१९८६ पासून मनपाकडे सेवा वर्ग.

२. पेन्शन कॉन्ट्रीब्युशन रजा वेतन भरणा केल्याची नोंद सेवापुस्तकात दिसून येत नाही.

३. श्री.प्रशांत आसाराम छडीदार, सह.शिक्षक, श्रीमती शितल नारायण आव्हाड, सह.शिक्षिका, श्रीमती सुनिता पंडीत जोगदंडे, सह.शिक्षिका , श्री.शेख अब्दुल रहिम शेख मजिद सह.शिक्षक यांचे सेवापुस्तक तपासले असता सेवापुस्तकात नोंदी बरोबर घेतल्याच्या दिसून आल्या.

**करीता, विभागाने उपरोक्त मुद्यांबाबत प्रत्यक्ष तपासून खात्री करावी, प्रकरणी पूर्तता / कार्यवाही करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

# लेखापरीक्षण अहवाल

## *जायकवाडी स्थापत्य विभाग*
## *सन २०१०-११ ते सन २०१४-२०१५*

**जमा बाजु :**

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत जायकवाडी स्थापत्य या विभागाचे सन २०१०-११ ते सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे जमा बाजूचे व खर्च बाजूचे चाचणी स्वरूपात लेखापरीक्षण करण्यात आले. लेखापरीक्षणा दरम्यान जमा बाजूमध्ये मार्गस्थ ग्राहकांकडून एकूण १८ नळ कनेक्शन व चार ग्रामपंचायत अशी एकूण २२ नळधारकांची माहेवार देयकांची रिडींगची तपासणी जनरल पावती पुस्तकाद्वारे करण्यात आली. तसेच खर्च बाजूच्या उपलब्ध करून देण्यात आलेल्या संचिकांची चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली. प्राप्त अनुदानाची संचिकाची तपासणी करण्यात आली.

त्या दरम्यान जायकवाडी स्थापत्य विभागाच्या जमा बाजूच्या लेखापरीक्षणा अंतर्गत एकूण **१६** परिच्छेद व खर्च बाजूचे एकूण **१२** असे एकूण २८ परिच्छेद समाविष्ठ करण्यात आले असून त्याचा अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**उपअभियंता जायकवाडी स्थापत्य विभाग यांच्या कार्यकाळाबाबत :**

**सन २०१०-२०११ ते सन २०१४-१५ या कालावधीत उपअभियंता म्हणून श्री.फालक के.एम. यांनी काम पाहिले.**

**लेखापरीक्षण पथकातील कर्मचा-यांची नांवे -**

१. श्री.अनंत सोनटक्के, वरीष्ठ लिपीक.

२. श्री.ईश्वरचंद्र कामेकर, कनिष्ठ लिपीक.

३. सौ.शिल्पा जोशी, कनिष्ठ लिपीक.

**परिच्छेद क्र.०१ : आर्थिक वर्ष २०१०-२०११ ते २०१४-१५ या कालावधीतील अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

जायकवाडी स्थापत्य विभागातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यात दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | मनपा जायकवाडी अंतर्गत मार्गस्थ ग्राहक यांचे नळ कनेक्शनचे डिमांड रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| २ | जायकवाडी अंतर्गत येणा-या मार्गस्थ ग्राहकांचे एकूण नळ कनेक्शन व दराबाबतची माहिती. | उपलब्ध नाही. |
| ३ | धनादेश पावती पुस्तके, कॅश रजिस्टर, इत्यादी | उपलब्ध नाही. |
| ४ | मासिक वेतनात दरमहा other allowances आढळून आलेल्या रकमांबाबत. | उपलब्ध नाही. |
| ५ | सन २०१०-११ ते २०१३-१४ या कालावधीत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांचा जॉबचार्ट बाबत. | उपलब्ध नाही. |
| ६ | हर्सूल जलशुध्दीकरण केंद्र येथील २०१०-२०१५ या आर्थिक वर्षातील लेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| ७ | मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४२१, दिनांक ७.९.२०११ अन्वये पारीत झालेल्या ठरावानुसार कार्यवाही संबंधीचे अभिलेखे. | उपलब्ध नाही. |
| ८ | जायकवाडी स्थापत्य विभागाने जनरल पावती पुस्तकाद्वारे वसूल केलेल्या रकमेबाबत (रक्कम रू.१४,८५,०४४/-) च्या तपशिलासह अभिलेखे उपलब्ध करून न देणे बाबत. | उपलब्ध नाही. |

**विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.२: जायकवाडी स्थापत्य विभागा अंतर्गत एकूण ४ ग्रामपंचायतीचे देयकाचे थकबाकीबाबत.**

ग्रामपंचायत बिडकीन, ग्रामपंचायत इसारवाडी, ग्रामपंचायत ढोरकीन, ग्रामपंचायत धनगांव या चार ग्रामपंचायतीचे पाणी देयक माहे एप्रिल २०१० ते माहे जुलै २०१४ च्या विविध व्यासाच्या पाईपवरील पाणी पुरवठा देयकात रिडींगची तपासणी करतांना संबंधित ग्रामपंचायतीकडे थकबाकी आहे. ती खालील प्रमाणे.

| अ.क्र. | नांव | एकूण व्यास | थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत बिडकीन | २०० MNQ | ९,७५,१९,१९५/- |
| २ | ग्रामपंचायत इसारवाडी | १०० MNQ | ७५,६६,२३५/- |
| ३ | ग्रामपंचायत ढोरकीन | १५० MNQ | १,६८,७७,२८३/- |
| ४ | ग्रामपंचायत धनगांव | १५० MNQ | १,४२,१३,८१०/- |
| | | **एकूण थकबाकी रक्कम रू.** | **१३,६१,७६,५२३/-** |

**उक्त रक्कम रू.१३,६१,७६,५२३/- संबंधित ग्रामपंचायतीकडून वसूली करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.३ : व्हिडीओकॉन इंटरनॅशनल कंपनी चित्तेगांव यांचे पाणी देयकाबाबत. (रक्कम रू.५०,८००/-)**

व्हिडीओकॉन इंटरनॅशनल कंपनी चितेगाव यांच्या पाणी देयक माहे नोव्हेंबर २०११ चालू रिडींग १४९०८८ व मागील रिडींग १४८२६१ वजा जाता एकुण रिडींग ८२७ दर्शविण्यात आली. त्यांचा ठरलेला दर ५०.८० प्रति युनिट असा आहे. एकूण युनिट ८२७ x ५०.८० रक्कम रूपये ४२,०१२/- चे देयक देण्यात आले व त्यांची वसूली धनादेश क्र.६६६८१३, दिनांक १७/१२/२०११ जनरल पावती पुस्तक क्र.३९२४ पावती क्र.३९२३३१ दिनांक १९/१२/२०११ अन्वये रक्कम रू.४२,०१२/- वसूल करण्यात आले.

मात्र माहे नोव्हेंबर २०११ देयकाचे चालू रिडींग १४१०८८ व मागील रिडींग १४७२६१ वजा जाता एकूण रिडींग १८२७ युनिट दर्शविणे आवश्यक असतांना विभागाने संबंधिताकडून एकूण रिडींग ८२७ युनिट ऐवजी रिडींग १८२७ युनिट वसूली करावयास पाहिजे होती. १८२७ युनिट चे देयकाच्या एकूण रक्कम रू. ९२,८१२/- होती. विभागाने संबंधिताकडून रू.४२,०१२/- वसूल केलेले असल्याने रक्कम रू.५०,८००/- हे कमी वसूल झालेले आहे.

करिता, विभागाने संबंधिताकडून रक्कम रू.५०,८००/- वसूल करून तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त नुकसानीबाबत विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.५०,८००/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४: व्हिडीओकॉन Industries compressor डिविजन चित्तेगांव यांच्या पाणी देयका बाबत. (रक्कम रू.५८,६२०/-)**

व्हिडीओकॉन Industries Compressor डिवीजन चित्तेगांव यांच्या पाणी देयक माहे जून २०१३ चालू रिडींग ५३९५ व मागील रिडींग ३५२१ वजा जाता एकूण रिडींग १८७४ दर्शविण्यात आली असून ठरलेला दर प्रति युनिट रू.६०/- (१८७४ x६०) आहे. रक्कम रू.१,१२,४४०/- चे देयक देण्यात आले व त्यांची वसूली धनादेश क्र.०२४९७१ दिनांक २४/७/२०१३ जनरल पावती पुस्तक क्र.५४७६ पावती क्र.५४७५५० दिनांक २९/७/२०१३ अन्वये रक्कम रू.१,१२,४४०/- वसूल करण्यात आले.

संचिकेच्या देयकाची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. माहे एप्रिल २०१३ चे चालू रिडींग २५४४ व मागील रिडींग १२२८ दर्शविण्यात आली. दर्शविलेली रिडींग चूकीची आहे. मागील माहे मार्च रिडींग १२४१७८ ही दर्शवून संबंधिताला सरासरी देयक देण्यात आले. मात्र माहे एप्रिल २०१३ मध्ये १२२८ रिडींग दर्शविले आहे. सदरील रिडींग कोणत्या आधारे देण्यात आले याबाबत खुलासा व्हावा.

२. माहे जून २०१३ देयकाचे चालू रिडींग ५३९५ व मागील रिडींग २५४४ वजा जाता एकुण रिडींग २८५१ दर्शविणे आवश्यक असतांना विभागाने संबंधिताकडून एकूण रिडींग १८७४ ऐवजी रिडींग २८५१ वसूली करावयास पाहिजे होती त्यांची एकूण रक्कम रू.१,७१,०६०/- (२८५१x६०) होती. विभागाने संबंधिताकडून रक्कम रू.१,१२,४४०/- वसूल केलेले असल्याने रक्कम रू.५८,६२०/- हे कमी वसूल झालेले आहे.

करीता, विभागाने मुद्या क्र.१ व २ बाबत संबंधिताकडून रक्कम रू.५८,६२०/- वसूल करून तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.५८,६२०/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.५ : व्हिडीओकॉन अप्लायन्सेस (रेफ्रीजरेटर युनिट)(Value Industries Ltd) चित्तेगांव यांच्या पाणी देयकाबाबत.**

व्हिडीओकॉन अप्लायन्सेस (Value Industries Ltd) चित्तेगांव यांचे पाणी देयक माहे एप्रिल २०१३ चालू रिडींग १८७७०७ व मागील रिडींग १८३३९९ वजा जाता एकूण रिडींग ४३०८ दर्शविण्यात आली. त्यांचा ठरलेला दर ६०/- (४३०८X६०) रक्कम रू.२,५८,४८०/- चे देयक देण्यात आले.

मात्र सदरील रक्कम वसूल करतांना धनादेश क्र.३७५८६९ दिनांक २५/५/२०१३ जनरल पावती पुस्तक क्र.५४७६ पावती क्रमांक ५४७५२७ दिनांक ३०/५/२०१३ अन्वये रक्कम रू.२,५६,४८०/- वसूल करण्यात आले. म्हणजेच विभागाने देयक रक्कम रू.२,५८,४८०/- वसूल न करता रक्कम रू.२,५६,४८०/- वसूल केल्याने रक्कम रू.२०००/- कमी वसूल करण्यात आले.

करिता, विभागाने संबंधिताकडून रक्कम रू.२०००/- वसूल करून खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.२०००/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.६ : खुराकीवाला होल्डींग ॲन्ड इन्व्हेस्टमेंट लि.पैठण रोड, यांच्या पाणी देयकाबाबत.(रक्कम रू.३०००/-)**

खुराकीवाला होल्डींग ॲन्ड इन्व्हेसमेंट लि.पैठण रोड यांचे पाणी देयक माहे मे २०१४ चालू रिडींग १३७२२ व मागील रिडींग १३१७५ वजा जाता एकूण रिडींग ५४७ दर्शविण्यात आली. त्यांचा ठरलेला दर ६७/- (५४७X६७) रक्कम रू.३६६४९/- चे देयक देण्यात आले.

परंतू सदरील रक्कम वसूल करतांना धनादेश क्र.८००१३८ दिनांक २६/६/२०१४ जनरल पावती क्रमांक ५८१३, पावती क्रमांक ५८१२४४, दिनांक ३०/६/२०१४ अन्वये रक्कम रू.३३,६४९/- वसूल करण्यात आले. म्हणजेच विभागाने देयक रक्कम रू.३६,६४९/- वसूल न करता रक्कम रू.३३,६४९/- वसूल केल्याने रक्कम रू.३०००/- ची कमी वसूली करण्यात आली.

करिता विभागाने संबंधिताकडून रक्कम रू.३०००/- वसूल करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही. उक्त वसूल पात्र रक्कम संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्र. ७: कन्सेप्ट लॅबोरेटरी प्रा.लि.पैठणरोड, औरंगाबाद यांच्या पाणी देयकाबाबत. (रक्कम रू.५३२०/-)**

कन्सेप्ट लॅबोरेटरी प्रा.लि.पैठण रोड,औरंगाबाद यांचे पाणी देयक माहे जानेवारी २०१२ व माहे फेब्रुवारी २०१२ च्या २५ mm व्यासाचे पाईपवरील पाणी पुरवठा देयकात रिडींग मध्ये सरासरी देयक वसूल करण्यात आले.

संचिकेची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. माहे जानेवारी २०१२ २५mm व्यासाचे पाणी पुरवठा देयकाचे चालू रिडींग ९६९५ व मागील रिडींग ८५०७ वजा जाता एकूण रिडींग १८८ युनिट दर्शविण्यात आली असून ठरलेला दर रू.५०.८० एवढा आहे. त्यानुसार र.९५५०/- एवढी देयकाची रक्कम येते. तथापि, रक्कम रू.५३४१/- सरासरी देयक देण्यात आले व वसूल केले आहे. मात्र रिडींग १८८ मि.दर्शविलेली असून ठरलेला दर रू.५०.८०(१८८X५०.८०) रक्कम रू.९५५०/- वसूल करावयास पाहिजे असतांना विभागाने सरासरी देयक देवून वसूल केलेली रक्कम रू.४२०९/- (९५५०-५३४१=४२०९) कमी वसूल केलेले आहे.

२. माहे फेब्रुवारी २०१२ चे २५mm व्यासाचे पाणी पुरवठा देयकाचे चालू रिडींग ८८२२ व मागील रिडींग ८६९५ वजा जाता एकूण रिडींग १२७ मि. दर्शविण्यात आली असून ठरलेला दर रू.५०.८० एवढा आहे. त्यानुसार ६४५२/- एवढी देयकाची रक्कम येते. तथापि रक्कम रू.५३४१/- सरासरी देयक देण्यात आले व वसूल केलेले आहे. मात्र रिडींग १२७ मि.दर्शविलेली असून ठरलेला दर रू.५०.८० (१२७X५०.८०) रक्कम रू.६४५२/- वसूल करणे आवश्यक असतांना विभागाने सरासरी देयक देवून रक्कम रू.१११९/- (६४५२-५३४१=१११९/-) च्या पाणी देयकात कमी वसूली करण्यात आली.

करिता, विभागाने मुद्या क्र.१ व २ ची एकत्रित रक्कम रू.५३२०/- वसूल करून तसा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.५३२०/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.८ : धुत कॉम्पॅक, पैठण रोड, यांच्या पाणी देयकाबाबत. (रक्कम रू.३८१०/-)**

धुत कॉम्पॅक पैठण रोड यांचे पाणी देयक माहे सप्टेंबर २०११ मागील रिडींग ६८७७ व चालु रिडींग ७०७८ वजा जाता एकूण रिडींग २०१ दर्शविण्यात आली. त्याचा ठरलेला दर ५०.८० (२०१X५०.८०) रक्कम रू.१०११२/- चे देयक देण्यात आले. प्रत्यक्षात रू.१०,२११/- चे देयक देणे आवश्यक होते. रू.९९/- चे कमी देयक दिल्याने मनपाच्या खाती रू.९९/- कमी जमा झाले.

सदरील रक्कम वसूल करतांना धनादेश क्र.०६६०३३, दिनांक १९/१०/२०११ जनरल पावती पुस्तक क्र.३९२४ पावती क्रमांक ३९२३११, दिनांक ३१/१०/२०११ अन्वये रक्कम रू.६४०१/- वसूल करण्यात आले. प्रत्यक्षात विभागाने रक्कम रू.१०,२११/- वसूल न करता रक्कम रू.६४०१/- वसूल केल्याने रक्कम रू.३८१०/- ची कमी वसूली करण्यात आली.

विभागाने संबंधिताकडून रक्कम रू.३८१०/- वसूल करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.३८१०/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.९ : ग्लोबल ट्रोटर्स पैठण रोड यांच्या पाणी देयकाबाबत.**

ग्लोबल ट्रोटर्स पैठण रोड यांच्या पाणी देयक २५mm व्यासाच्या नळ कनेक्शनवर विभागाने सरासरी रिडींग दर्शवून संबंधिताकडून पाणीपट्टीची वसूली केलेली आहे.

१. पाणीपट्टी रक्कम वसूलीचे दर निश्चित असून त्यानुसार वसूली होणे क्रमप्राप्त होते. विभागाने कमी वसूली केल्याने मनपाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. आर्थिक नुकसान झालेल्या महिन्याचा विवरण तक्ता खालील प्रमाणे-

| अ.क्र. | महिना व वर्ष | वसूलीस पात्र असलेली २५mm व्यासाची रक्कम | | | वसूली करण्यात आलेली २५mm व्यासाची रक्कम | एकूण फरक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वापर युनिट संख्या | युनिट दर | एकूण रक्कम रू. | | |
| १ | मार्च -२०११ | १३७ | ५०.८० | ६९६०/- | ५३४१/- | १६१९/- |
| २ | एप्रिल-२०११ | १८० | ५०.८० | ९१४४/- | ५३४१/- | ३८०३/- |
| ३ | मे -२०११ | १७३ | ५०.८० | ८७८८/- | ५३४१/- | ३४४७/- |
| ४ | जून -२०११ | १६६ | ५०.८० | ८४३३/- | ५३४१/- | ३०९२/- |
| ५ | जुलै-२०११ | ११६ | ५०.८० | ५८९३/- | ५३४१/- | ५५२/- |
| ६ | ऑग-२०११ | १२३ | ५०.८० | ६२४८/- | ५३४१/- | ९०७/- |
| ७ | जाने-२०१२ | ११८ | ५०.८० | ५९९४/- | ५३४१/- | ६५३/- |
| ८ | फेब्रु-२०१२ | ११६ | ५०.८० | ५८९२/- | ५३४१/- | ५५१/- |
| ९ | मार्च-२०१२ | १४९ | ५०.८० | ७५६९/- | ५३४१/- | २२२८/- |
| | | | | | **एकूण** | **१६८५२/-** |

करीता, वरील तक्त्याप्रमाणे फरक रक्कम वसूलीस पात्र आहे.

२. माहे जून -२०१२ मध्ये २५mm व्यासावरील चालू रिडींग १८५७४ व मागील रिडींग १८५५६ वजा जाता १८ युनिट रिडींग दर्शविण्यात आली. ठरलेला दर रू.५५/- (१८x५५=९९०/-) व ५०mm व्यासाची एकूण रक्कम रू.६२७०/-अशी एकत्रित रक्कम रू.७२६०/- चे देयक देण्यात आले व त्याची वसूली धनादेश क्र.०७७६८८, दिनांक ३०.७.२०१२ जनरल पावती पुस्तक क्र.३९२५, पावती क्र.३९२४५५ अन्वये वसूली

करण्यात आली. मात्र २५mm व्यासावरील मिटर रिडींग १८ मि. असतांना विभागाने करारनाम्यातील अट क्र.२ अन्वये प्रतिमाह १०० घनमिटर या प्रमाणे परिमाण मंजूर करण्यात आले असतांना माहे जून -२०१२ च्या रिडींग १००x५५=५५००/- वसूल करावयास पाहिजे असतांना विभागाने रक्कम रू.९९०/- वसूल करण्यात आले, म्हणजेच रक्कम रू.४५१०/- कमी वसूल करण्यात आले.

करीता, उक्त मुद्या क्र.१ व २ प्रमाणे कमी वसूल रक्कम संबंधिताकडून वसूल करून अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.४५१०/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१०: Frigorfico allana कंपनी पैठण रोड यांना देण्यात आलेल्या पावती क्र.३९२११८, दिनांक २९/११/२०१० रक्कम रू.८,८७,०१०/- रकमेची पावती धनादेश रक्कम रू.८,५७,०१०/- ऐवजी रू.३०,०००/- ने जास्त रकमेची दिल्याबाबत.**

Frigorfico allana कंपनी पैठण रोड, यांनी दिनांक ०१.१०.२०१० ते ३१.१०.२०१० दरम्यानच्या काळातील पाणी वापराचा धनादेश क्र.५७४६२३ अन्वये दिनांक २६/११/२०१० रोजी रक्कम रू.८,५७,०१०/- चा भरणा केला. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| Sr.No | Period | Starting Reading | Reading at the end of month | Difference m३ | Rate for cum M३ | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १.१०.२०१० ते ३१.१०.२०१० | ११३०६२० | ११४९१७० | १८५५० | ४६.२० | ८५७०१० |
| | | | | | **एकूण** | **८५७०१०** |

धनादेशाद्वारे संबंधितास पावती क्र. ३९२११८ दिनांक २६/११/२०१० अन्वये रक्कम रू.८,८७,०१०/- ची पावती देण्यात आली.

प्रकरणात अभिलेखे तपासले असता धनादेश क्र.५७४६२३ अन्वये रक्कम रू.८५७०१०/- चा भरणा केला होता. तर संबंधितास ८,८७,०१०/- ची पावती कोणत्या आधारे देण्यात आली. रक्कम रू.३०,०००/- जास्तीचा दाखविलेला भरणा दर्शविलेली पावती संबंधितांना दिलेली असल्याने जास्तीची रक्कम वसूलीस पात्र ठरू शकते.

विभागाने उक्त बाबतीत सविस्तर तपासणीअंती खुलासा करणे आवश्यक आहे. धनादेशातील रक्कम व पावतीची रक्कम यामधील फरक संबंधिताकडून वसूलीअंती अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.३०,०००/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११: दक्षिण मध्य रेल्वेस्टेशन औरंगाबाद व परिसरातील निवासस्थाने यांना पुरविण्यात येत असलेल्या पाण्याबाबतच्या थकबाकीबाबत.**

दक्षिण मध्य रेल्वेस्टेशन औरंगाबाद व परिसरातील निवासस्थाने यांना पुरविण्यात आलेल्या माहे जानेवारी २०१० ते जुलै २०१२ च्या माहेवार देयकाची रक्कम रेल्वे विभागाने दिलेले पत्र क्र.NW/२७७/w.v./Land/AwB/०७, दिनांक ८.४.२००८ अन्वये पत्र देवून ३४६० चौ.मी.जागेची किंमत रू.२,७६,८०,०००/- पैकी रक्कम रू.५०,००,०००/- नगररचना विभागाने भूसंपादनापोटी दक्षिण मध्य रेल्वेस्टेशन.औरंगाबाद यांना देण्यात आलेली आहे. जायकवाडी स्थापत्य विभागामार्फत द.म.रेल्वेस्टेशन यांस नळकनेक्शन मार्गस्थ ग्राहकांना देण्यात आले आहे. त्यांची माहे जानेवारी २०१० ते माहे ऑगस्ट २०१२ इतक्या महिन्याची रक्कम रू.२,३४,४६,७०१/- थकबाकी होती. त्या रकमेतून जायकवाडी स्थापत्य विभागाने रू.२,२६,८०,०००/- रक्कम वळती करण्यात आली.

संचिकेच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. भूसंपादना पोटी वळती करण्यात आलेले रू.२,२६,८०,०००/- रकमे अंतर्गत समायोजन केल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाहीत.

२. भूसंपादन केलेल्या न.भू.क्र.२०२४५ हा मनपाच्या मालकीच्या झालेल्या असल्याचे कागदपत्रे संचिकेत नाहीत.

३. नगररचना विभाग व पाणी पुरवठा विभाग यांनी संबंधित भूसंपादन मालमत्तेबाबत करावयाच्या कार्यवाहीची अभिलेखे (संचिका) लेखापरीक्षणास उपलब्ध झालेले नाही. तसेच भूसंपादन केल्याबाबतचे दस्ताऐवज पाणीपुरवठा विभागास communicate केलेले नाही.

४. भूसंपादनाची रक्कम पाणी पट्टीत समाविष्ट करतांना संबंधित लेखाशिर्षातून खर्च व पाणीपट्टी लेखाशिर्षात जमा केल्याबाबतचे पत्रव्यवहार संचिकेत नाही.

५. अद्यापही भूसंपादन झालेले नसल्यास संबंधित प्राधिकरणाकडून मनपाचे थकीत रकमेचे दंडनिहाय व्याजासह वसूली करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मुद्यांसह खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**वरील अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र. १२: जल व भुमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) यांच्या देयकाबाबत.**

जल व भुमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) पैठण रोड यांच्या पाणी देयकाची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. २५mm व ५०mm नळ कनेक्शनवर विभागाने माहे सप्टेंबर २०१२ मध्ये एकुण बिलाचे रक्कम रू.९,२०,६९०/- अन्वये वसूली करण्यात आली. मात्र त्याची एकूण बेरीज रक्कम रू.९,२१,४८५/- वसूल करणे आवश्यक होते. म्हणजेच विभागाने रक्कम रू.७९५/- कमी वसूल केले आहे.

२. २५ mm व्यासाच्या नळ कनेक्शनवर विभागाने माहे डिसेंबर २०१२ ते ऑगस्ट २०१३ पर्यंत चालू रिडींग ७४९७८ व मागील रिडींग ७२४६९ अन्वये एकूण रिडींग २५०९ युनिट नुसार आहे. मिटर रिडींग सप्टेंबर २०१३ महिन्यात चालू रिडींग व मागील रिडींग दर्शवितांना ऑगस्ट - २०१३ च्या चालु रिडींग दर्शवून देयक तयार करण्यात आले. दर्शविलेली रिडींग ७४४१५ (मागील) व रिडींग ७४४५१ (चालु) अशी आहे. प्रत्यक्षात मीटर रिडींग ७४९७८ असतांना मीटर रिडींगचे आकडे तेच तेच दर्शवून कमी वसूली केली. सरासरी रिडींग २७८ युनिट मागील सरासरी रीडींग नुसार दर्शविणे आवश्यक होते. सप्टेंबर २०१३ महिन्याचे २७८ युनिट रिडींगचे रू.६२.८० प्रमाणे रू.१७४५८/- वसूल न करता रू. ६९१/- वसूल करून मनपाचे रू.१६७६७/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

३. ५० mm व्यासांच्या नळ कनेक्शनवर विभागाने माहे नोव्हेंबर - २०१३ मध्ये चालू रिडींग ११५६०३ व मागील रिडींग १०८६०७ अन्वये एकुण रिडींग ६९९६ युनिट नुसार होती. मिटर रिडींग नोव्हेंबर -२०१३ महिन्यात चालु रिडींग व मागील रिडींग दर्शवितांना माहे ऑक्टोबर २०१३ च्या चालु व मागील रिडींग दर्शवून देयक तयार करण्यात आले. दर्शविलेली रिडींग माहे ऑक्टोबर २०१३ व माहे नोव्हेंबर २०१३ मध्ये मीटर रिडींगचे आकडे तेच दर्शवून कमी वसूली केली. सरासरी ८२४७ युनिट रिडींग दर्शविणे आवश्यक होते. नोव्हेंबर -२०१३ महिन्याचे ८२४७ मी.रिडींगचे रू.६२.८० प्रमाणे रू.५,१७,९१२/- वसूल न करता रू.४,३७,७७९/- वसूल करून मनपाचे रक्कम रू.८०१३३/- चे नुकसान करण्यात आले.

४. १५० mm व्यासाच्या नळ कनेक्शनवर विभागाने माहे डिसेंबर २०१३ मध्ये चालू रिडींग १२०२७३ व मागील रिडींग १२०२७३ अन्वये एकूण ७७०९ युनिट रिडींग अन्वये रक्कम रू.४,८२,५५५/- वसूल करण्यात आले.

   मात्र विभागाने डिसेंबर २०१३ मध्ये मीटर रिडींगचे आकडे तेच दर्शवून कमी वसूली केली. मीटर बंद असल्याने मागील महिन्याचे सरासरी ८२४७ युनिट रिडींग दर्शविणे आवश्यक होते. डिसेंबर २०१३ महिन्याचे ८२४७ मी.रिडींगचे रू.६२.८० प्रमाणे रू.५१७९१२/- वसूल न करता रू.४,८२,५५५/- वसूल करून मनपाचे रक्कम रू.३५३५७/- चे आर्थिक नुकसान झाले आहे.

करिता, मुद्या क्र.१ ते ४ ची एकत्रित रक्कम रू.१,३३,०५२/- विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.१,३३,०५२/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१३: छावणी,परिषद,औरंगाबाद यांना करण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा देयकाच्या थकबाकीबाबत. थकीत रक्कम रू.४,६३,२९,७३७/- (As per Letter No. मनपा उअ / पापु/जास्था/१३५२/२०१५, दिनांक १०.८.२०१५**

औरंगाबाद मनपा तर्फे शहरातील ग्राहकांसोबतच जायकवाडी पासून औरंगाबाद पर्यंत असलेल्या विविध संस्था सुध्दा मनपाचे मार्गस्थ ग्राहक आहेत. या मार्गस्थ ग्राहकांमध्ये छावणी परिषद ही सुध्दा एक संस्था समाविष्ट आहे. छावणी परिषद व मिलिटरी इंजिनियरींग सर्व्हीसेस यांना मनपा तर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दर पत्रकानुसार पाणीपट्टी दरमहा आकारणी करून देयके देण्यात येतात. छावणी परिषदेने छावणी अधिनियम २००६ चे प्रकरण ३ चा संदर्भ देवून छावणी परिषद ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने (Municipality ) त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरपत्रका नुसार Bulk Supply अंतर्गत पाणीपट्टीचे दर आकारण्याची विनंती केली होती. छावणी परिषद व MES या एकच संस्था असून या दोन्ही संस्थांना Bulk Supply अंतर्गत दराप्रमाणे पाणीपट्टी आकारावी अशी आग्रही भूमिका मा.विभागीय आयुक्त यांनी संयुक्त बैठकीत मांडलेली आहे. मनपास त्यानुसार सूचना दिल्या व सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवावा असे नमूद आहे. मा.सर्वसाधारण सभेसमोर विषय क्र.२६९ नुसार छावणी परिषद व MES यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरपत्रकानुसार पाणीपट्टी उक्त दोन्ही संस्था एकच असून स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने Bulk Supply चे दराने पाणीपट्टी आकारणी करावी असे प्रस्तावित केलेले आहे. प्रस्तावात असेही नमूद आहे की, छावणी परिषदेने मार्च २०११ पर्यंत पाणीपट्टी रक्कम भरणा केलेली असल्याने एप्रिल २०११ पासून पुढे सुधारित देयके देण्यात येतील. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २७.४.२०१० च्या दरपत्रकानुसार पाणीपट्टी आकारणी केली जात असून यापुढे वेळोवेळी निर्गमित केल्या जाणा-या दरपत्रकानुसार पाणीपट्टी आकारणी दर पत्रक नमूद तारखेपासून व पूर्वलक्षी प्रभावाने किंवा मनपाच्या सर्वसाधारण सभेने मान्य केलेल्या दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल असे प्रस्तावात नमूद आहे. तसेच सुधारित दराने थकीत पाणीपट्टीची रक्कम एक रकमी औरंगाबाद मनपाकडे जमा करणे, जलमापक यंत्र बसविणे व करारनामा करणे इत्यादी बाबीची पूर्तता करणे संबंधितांना बंधनकारक राहील असेही प्रस्तावात नमूद आहे.

पाणीपट्टीचे दर सुधारित करण्याचा निर्णय झाल्यास MES संस्थेला यापुढे Bulk Domestic Supply या दराने आकारणी करावी लागेल.

मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२६९ दिनांक ४.७.२०१३ रोजी पारीत केलेल्या ठरावात छावणी परिषदेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरपत्रकातील ध्A ड Bulk Supply (i) Bulk Domestic (II) Bulk Supply to other municipal councils/ corporations/Local Bodies मध्ये नमूद दर किंवा मनपाच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले दर यापैकी जे दर जास्त असतील त्या दराने पाणीपट्टीची आकारणी करण्यास मंजूरी दिलेली आहे. सुधारित दराने पाणीपट्टीची रक्कम एक रकमी औरंगाबाद मनपाकडे जमा करणे, जलमापक यंत्र बसविणे व करारनामा करणे इत्यादी बाबींची पूर्तता करणे संबंधितांना बंधनकारक राहील असे नमूद आहे. सदरील प्रकरणी खालील बाबींचा खुलासा विभागाकडून आवश्यक आहे.

१. पाणी पुरवठा किती व्यासाच्या पाईप मधून केल्या जातो? छावणी परिषद ३५० मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीचा उल्लेख त्यांच्या पत्र व्यवहारातून येतो. तर मनपाच्या

पत्रव्यवहारात ३०० मी.मी. व्यासाचा उल्लेख आहे? नेमके किती व्यासाच्या पाईप मधून पुरवठा होतो याचा बोध झालेला नाही.

२. छावणी परिषदेकडे दर्शविण्यात आलेली थकबाकी बाबतचे सविस्तर विवरण संचिकेत उपलब्ध नाही.

३. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६९ दिनांक ४.७.२०१३ अन्वये सुधारित दर आकारणी करतांना ठरावात नमूद बाबींची छावणी परिषदेने पूर्तता केलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

४. उक्त ठरावात नमूद प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाचे दरपत्रक व सर्वसाधारण सभेने वेळोवेळी वाढ केलेले पाणीपट्टीचेदर यामध्ये जे दर जास्त असतील ते छावणी परिषदेस लागू राहतील असे असतांना त्यानुसार देयके अदा केली काय ?

५. छावणी परिषदेकडे थकबाकी असलेली वर्षनिहाय चालू मागणी, थकबाकी, वसूली व शिल्लक रक्कम याबाबत मागणी रजिस्टर (डिमांड रजिस्टर ) लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाही.

उपरोक्त मुद्यांवर सविस्तर खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत विभागाने अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याने प्रकरणाची शहानिशा/ खातरजमा करता आलेली नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.१४: दक्षिण मध्ये रेल्वेस्टेशन, औरंगाबाद यांच्या पाणी देयकाबाबत.**

दक्षिण मध्य रेल्वेस्टेशन औरंगाबाद यांना १५०mm व्यासाचे नळ कनेक्शन असून त्यांचे पाणी देयक माहे मे -२०१२ ते एप्रिल २०१३ पर्यंत देयकाची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. औरंगाबाद मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.४२१, अन्वये दिनांक १.४.२०१२ पासून सर्व मार्गस्थ ग्राहकांना महाराष्ट्र जिवन प्राधिकरणातर्फे वेळोवेळी निघणा-या परिपत्रकानुसार ठरविण्यात आलेले दर आणि महानगरपालिकेने ठरविलेले दर यापैकी जे दर जास्त असतील त्या दराने मार्गस्थ ग्राहकांकडून पाणीपट्टी आकारण्याची मंजूरी देण्यात आली असता विभागाने खालील तक्त्यात दर्शविलेले महिन्यात रू.५५/- प्रमाणे वसूली करणे आवश्यक असतांना रू.५०.८० प्रमाणे वसूली करण्यात आली.

| अ.क्र. | महिना | दर्शविलेली मी.रिडींग | घेण्यात आलेला दर रू.५०.८० | घ्यावयास पाहिजे असलेला दर रू. ५५ | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे -२०१२ | १४८१८ | ७,५२,७५४/- | ८,१४,९९०/- | ६२,२३६/- |
| २ | जून -२०१२ | १४३९९ | ७,३१,४६९/- | ७,९१,९४५/- | ६०,४७६/- |
| ३ | जुलै -२०१२ | १३६४० | ६,९२,९१२/- | ७,५०,२००/- | ५७,२८८/- |
| ४ | सप्टें-२०१२ | १५१३६ | ७,६८,९०९/- | ८,३२,४८०/- | ६३,५७१/- |
| ५ | ऑक्टो-२०१२ | १२७७४ | ६,४८,९१९/- | ७,०२,५७०/- | ५३,६५१/- |
| ६ | नोव्हे -२०१२ | ९८८४ | ५,०२,१०७/- | ५,४३,६२०/- | ४१,५१३/- |
| ७ | डिसें- २०१२ | १०६१० | ५,३८,९८८/- | ५,८३,५५०/- | ४४,५६२/- |
| ८ | जाने -२०१३ | १४८३९ | ७,५३,८२१/- | ८,१६,१४५/- | ६२,३२४/- |
| ९ | फेब्रु -२०१३ | ११७६३ | ५,९७,५६०/- | ६,४६,९६५/- | ४९,४०५/- |
| १० | मार्च -२०१३ | १२१७३ | ६,१८,३८८/- | ६,६९,५१५/- | ५१,१२७/- |
|  |  |  | **६६,०५,८२७/-** | **७१,५१,९८०/-** | **५,४६,१५३/-** |

करिता, विभागाने वाढवण्यात आलेले दर रू.५५ प्रमाणे रक्कम रू.७,१५,९८०/- अन्वये रक्कम वसूल करावयास पाहिजे असतांना विभागाने रक्कम रू.६६,०५,८२७/- वसूल करण्यात आल्याने मनपाचे रक्कम रू.५,४६,१५३/- चे आर्थिक नुकसान झाले.

2. माहे ऑगस्ट -२०१२ चालू रिडींग २४३२८७ व मागील रिडींग २२६५५२ वजा जाता एकूण रिडींग १३६४० - (१६७३५-३०९५) दर्शविण्यात आली. त्याचा ठरलेला दर ५०.८ (१३६४०x५०.८) रक्कम रू.६९२९१२/- चे देयक तयार करण्यात आले. मात्र विभागाने माहे ऑगस्ट २०१२ मध्ये मिटर रिडींगचे आकडे जुलै २०१२ चे दर्शवून तिच रक्कम वसूल केली. माहे ऑगस्ट मध्ये मागील रिडींग २४३२८७ व चालु रिडींग २६२७१० वजा जाता एकूण रिडींग १६३५३ (१९४२३-३०७०) दर्शविण्यात आली. त्याचा ठरलेला नविन दर ५५ (१६३५३x५५) रक्कम रू.८,९९,४१५/- चे देयक तयार करून वसूली करावयास पाहिजे होते. म्हणजेच विभागाने रक्कम रू.२,०६,५०३/- ची कमी वसूली केलेली आहे.

3. माहे एप्रिल २०१३ मध्ये चालू रिडींग ३८४४१० व मागील रिडींग ३७१५५४ वजा जाता एकूण रिडींग ९७८६ (१२८५६-३०७०) दर्शविण्यात आली. त्याचा ठरलेला दर ५५ (९७८६-२५=९७६१) ९७६१x५५ चे ५,३६,८५५/- वसूल करण्यात आले. मात्र विभागाने संबंधित देयकाची रक्कम वसूल करतांना ठरलेला दर हा रू.६०/- ऐवजी रू.५५ ची वसूली करण्यात आली. म्हणजेच नविन दरा अन्वये रक्कम रू.५,८५,६६०/- वसूल करणे आवश्यक होते. म्हणजेच विभागाने रक्कम रू.४८,८०५/- कमी वसूल केलेले आहे.

करिता विभागाने मुद्या क्र. १ ते ३ ची एकत्रित रक्कम रू.८,०१,४६१/- वसूल करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू. ८,०१,४६१/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

***लेखापरीक्षण अहवाल***
***जायकवाडी स्थापत्य विभाग***
***सन २०१०-११ ते सन २०१४-२०१५***

**खर्च बाजु :**

जायकवाडी स्थापत्य विभागातील अनुषंगिक लेखे आवश्यक असल्याने पुढील तक्त्यातील दर्शविलेले संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत.

| अ.क्र. | अभिलेखे | शेरा |
|---|---|---|
| १ | जायकवाडी स्थापत्य विभागाअंतर्गत भांडार विभागातील जुने सामान जमा केल्याबाबतचे डेड स्टॉक रजिस्टर, साठा रजिस्टर, इंडेन्ट, मत्ता रजिस्टर, उपलब्ध करून देणे बाबत. | उपलब्ध नाही. |
| २ | माहेवार खर्चाचा तपशिल, प्रोव्हिजन रजिस्टर, पिटी वर्क रजिस्टर. | उपलब्ध नाही. |
| ३ | केंद्र शासन व राज्य शासनाकडून जायकवाडी स्थापत्य विभागास प्राप्त अनुदानाची माहिती. | अपूर्ण स्वरूपात. |

**विभागाने लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर स्वरूपाची असून साशंकता निर्माण करणारी आहे. अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत संबंधितांविरूध्द जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.**

**परिच्छेद क्र.२: फारोळा येथील दोन्ही जलशुध्दीकरण केंद्रामध्ये क्लोरीनडाय ऑक्साईड ट्रिटमेंट देणे बाबत (सन २०१४-१५.)**

कार्यादेश क्र.मनपा /उआ /पापु / जास्था /२०५/१४, दिनांक ०३.७.२०१४ अन्वये एस.व्ही.ॲक्का टेक्नॉलॉजीस, पुणे या पुरवठाधारकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) (क) अन्वये एकूण २० किलो दररोज प्रमाणे ३०.०६.२०१४ पर्यंत एकूण ११५० किलोग्रॅम क्लोरीनडाय ऑक्साईडची खरेदी करण्यात आली.

संचिकेत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालीलप्रमाणे ः

१. svs ॲक्वा टेक्नॉलॉजीस यांचे dccum performa Invoice दिनांक २८/५/२०१४ च्या Dc No ७९ वर ६० kg Buckets साठी प्रती पॅक १०,०००/- रू. प्रमाणे रू.६,००,०००/- Fright actual ३०,००० असे एकूण रक्कम रू.६,३०,०००/- चे Invoice आहे. मात्र Tax Invoice दिनांक ४/७/२०१४ Invoice No.-८० आधारे ११५ Qty साठी ९५२४ प्रती दराने १०,९५,२६०+vat ५% एकूण रक्कम रू.११,५०,०२३/- चे आहे. Dc वर Loory No अथवा Tranpotation चा उल्लेख नाही. जर Dc रक्कम रू.६,३०,०००/- चे असतांना ११,५०,०००/- चे देयक का अदा करण्यात आले याचा बोध होत नाही. जास्तीची रक्कम अदा करून मनपाचे नुकसान झालेले असल्याचे आढळून येते. रक्कम वसूलीस पात्र.

२. दिनांक ०२/०५/२०१४ रोजीच्या svs Aqua Technologies यांच्या पत्रात
CDD ५०००-२५० Ltr component A x ६० No
CDD ५०००-२५० Ltr component B x ६० No
Above material for Testing purpose and its no commercial value असे नमूद आहे.

उपरोक्त पत्रावरुन अशी शंका येते की रसायन Developed नव्हते तर ते Trial and Testing अवस्थेतील होते असे असतांना त्याची खरेदी का करण्यात आली. तसेच No commercial value असे नमूद असतांना देयक कोणत्या आधारे अदा केले .

३. करारनाम्यावर कोठेही गुत्तेदाराच्या स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाही. काम सुरू करण्यापूर्वी निविदा पुस्तिका नियम (५४) अन्वये कंत्राटी कामाचा विमा १% कपात करणे आवश्यक असतांना विमा काढण्यात आलेला नाही. शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

४. जा.क्र.मनपा/उआ/पापु/जास्था/४२९/१४, दिनांक ११/९/२०१४ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या फारोळ्या जलशुध्दीकरण केंद्र येथे दिनांक १.९.२०१४ रोजी शिल्लक असलेल्या रसायनसाठा रक्कम रू.२४,९८,२३३/- चा औरंगाबाद सिटी वॉटर युटीलिटी कंपनीला हस्तांतरीत करण्यात आल्याचे नमूद आहे. रक्कम रू.२४,९८,२३३/- चे समायोजन कसे करण्यात आले याचा खुलासा करण्यात यावा.

उपरोक्त मुद्या क्र.१ ते ४ चा विभागाने प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**उपरोक्त मुद्या क्र.३ अन्वये जास्तीची अदा केलेली रक्कम वसूल करून वरील अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

### परिच्छेद क्र.३: औरंगाबाद पा.पु.योजना फारोळा जलशुध्दीकरण केंद्रात साहित्याची वाहतुक करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.४५,०००/-)

फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे साहित्याचे भांडार असून योजनेवर आवश्यक साहित्य तसेच भंगार साहित्य फारोळा जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात ठेवलेले होते. यात प्रामुख्याने ७०० व १००० मी.मी. व्यासाचे एम.एस.पाईप्स, वापरलेले व्हॉल्व व इतर साहित्याचा समावेश होता. संचिकेत नमूद केल्याप्रमाणे हस्तांतर होण्यापूर्वी सर्व साहित्याची वर्गवारी करून एकत्रितरित्या गोदामात ठेवण्यासाठी मर्यादित मजुर संख्या असल्याने ६७ (३)(क) अंतर्गत गुत्तेदाराकडून काम करून घेण्यात आले.

संचिकेत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालील प्रमाणे -

१. जायकवाडी यांत्रिकी विभागात व मनपाच्या इतर विभागात JCB मशिन असतांना बाहेरून ९९८/- रू.प्रती तासाप्रमाणे का घेण्यात आली याचा बोध होत नाही. २० तासासाठी x ९९८ रू.प्रमाणे १९९६०/- झालेला खर्च का अमान्य करण्यात येवू नये.

२. फारोळा येथे भंगार साहित्य विभाग असतांना साहित्य विभागात जमा न करता इतरत्र का विखरण्यात आले याचा बोध होत नाही. जर वेळोवेळी साहित्य विभागात जमा करण्यात आले असते तर ४४,३४४/- रू. इतका खर्च वाचविता आला असता. असे किती साहित्य आजतागायत बाहेर पडलेले आहे आणि भंगार साहित्य भांडार विभागात जमा न करता इतरत्र टाकण्यात आल्याबाबत विभागाने काय कार्यवाही केली याबाबत खुलासा करावा.

३. संचिकेत जुन्या गोडावूनची किरकोळ दुरूस्ती करावी लागणार आहे असा उल्लेख आहे. परंतू बील अंतीम होईपर्यंत अशी कोणतीही दुरूस्ती न करता साहित्य का हलवण्यात आले ? याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

४. औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेचे दिनांक १.९.२०१४ रोजी कन्सेशनरकडे हस्तांतर होण्यापूर्वी फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथील किती साहित्य भंगार विभागात हलविण्यात आले व त्याची विल्हेवाट बाबतचा तपशिला सहित खुलासा करावा.

**उपरोक्त बाबींची विभागाने प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही्.**

**वरील बाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.४ : औरंगाबाद शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत जायकवाडी उद्‌भव व परिसरात करावयाची आपत्कालीन कामे.**
**अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,५०,०००/-**

जायकवाडी येथील पाणी पातळी कमी झाल्यामुळे दिनांक १५ एप्रिल २०१० पासून २१/६/२०१० पर्यंत श्री.अजितसिंग शिलेदार यांना जा.क्र.मनपा/पापु/जास्था/११४/१०, दिनांक २५/८/२०१० अन्वये कार्योत्तर मान्यता देवून काम करून घेण्यात आले.

उपरोक्त संचिकेत आढळून आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालील प्रमाणे -

१. निविदा पुस्तिका नियम क्रमांक ५४ नुसार कुठल्याही पुरवठाधारकाने कंत्राटी कामाचा विमा काम सुरू करण्यापूर्वी काढणे बंधनकारक आहे. तथापि सदरील प्रकरणात विमा काम सुरू होण्यापूर्वी काढण्यात आलेला नसून तो देयकातून कपात केलेला आहे. त्यामुळे विमा काढण्यामागचा हेतू सफल होत नाही.

२. दिनांक २१/६/२०१० रोजी काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र संचिकेत जोडण्यात आलेले आहे. परंतू कार्यादेशावर तारीख २५/८/२०१० ची आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदारास कुठल्या कामाचे आदेश दिले याबाबत बोध होत नाही.

३. परिशिष्ठ क्र.७ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(C) अंतर्गत मान्यता प्राप्त असल्याने लेखा नोंद न करता विभागाने देयक अदायगीसाठी प्रस्तावित करावे अशा सूचना मा.मुख्य लेखा अधिकारी यांनी चर्चेमध्ये दिल्या असे नमूद आहे.

संचिका तपासली असता संचिकेत सदरील खर्च रक्कम रू.२,४०,३३७/- कोणत्या लेखाशिर्षा अंतर्गत केलेला आहे याचा उल्लेख नाही. लेंखाशिर्षाची योग्य नोंद न करता देयकाची अदायगी करून जमा खर्चाचा ताळमेळ कसा घातला याचा खुलासा व्हावा. लेखाशिर्षा अंतर्गत लेखानोंद न घेता झालेला खर्च का अमान्य करण्यात येवू नये.

करिता उपरोक्त बाबींची विभागाने प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून तसेच अशी किती प्रकरणे हाताळण्यात आली याचा खुलासा करून प्रकरणी काय कार्यवाही केली याचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

उक्त बाबीसंबंधी संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.५ : औरंगाबाद पाणी पुरवठा योजना देखभाल दुरूस्ती अंतर्गत जायकवाडी ते बी.पी.टी. पर्यंत ७००mm व्यासाच्या अशुध्द जलवाहिनी वरील गळत्या दुरूस्ती करीता पोलादी पाईपचा पुरवठा होणेबाबत. (अं.प.रक्कम रू.२,१०,२३४/-)**

खर्चाचे प्राप्त अभिलेखे तपासले असता ७०० मी.मी. व्यासाचे १० मी.मी. जाडीचे साधारणतः १८ मी.लांब पोलादी पाईपसाठी मनपाच्या भांडार विभागाकडून देखभाल दुरूस्ती अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सन २०११-१२ नुसार रक्कम रू.२,१०,२३४/- इतक्या किंमतीच्या निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत १ निविदा विक्री होवून अंतीम तारखेनंतर श्री.अनिरूध्द अरूणराव काळे यांची ११.११% जास्त दराची १ निविदा प्राप्त झाली.

कंत्राटदारास वाटाघाटी करीता बोलाविले असता कंत्राटदाराने अंदाजपत्रकीय दराने पुरवठा करण्याचे मान्य करून जा.क्र.मनपा/उआ/पापु/जास्था/१०३४, दिनांक १२/३/२०१२ अन्वये कामाचे कार्यादेश देण्यात आले. संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पाईपचा पुरवठा दिनांक २६.३.२०१२ रोजी फारोळा येथे झाला व काम पूर्ण झाल्याने श्री.ए.ए.काळे यांचे देयक मोजमाप पुस्तिका क्रमांक २२५३ पान क्रमांक १४६ वर रू.२,१०,२३४/- चे देयक अदा करणेत आले. सदरील पाईपचा पुरवठा केल्याचा भांडार विभागाचे स्टॉक रजिस्टर मध्ये नोंद घेणे आवश्यक असतांना तशी नोंद केल्याची दिसून आलेली नाही.

२. सदरचा पुरवठा केल्याबाबत डिलीव्हरी चलन, कोणत्या कंपनीचे, कोणत्या वाहना मध्ये आणले त्याचे वाहन क्रमांक pipe चा दर्जा प्रत्यक्ष माल प्राप्त झाल्याची नोंद इ.आवश्यक कागदपत्र संचिकेमध्ये दिसून आले नाही. विषयांकित पुरवठा झालेला आहे किंवा नाही याची साशंकता निर्माण होते. त्यामुळे रक्कम रू.२,१०,२३४/- खर्च का अमान्य करण्यात येवू नये.

३. भांडार विभागात भविष्यकालीन तरतूदीचा विचार करून अशा किती व कोणकोणत्या साहित्याची खरेदी करण्यात आली व असे साहित्य कोठे वापरण्यात आले का ? याबाबत विभागास अवगत करावे.

४. संचिका तपासणीअंती लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध साहित्य उपयोगात आणल्याची कोठेही नोंद आढळून आलेली नाही.

उपरोक्त बाबत विभागाने प्रत्यक्ष तपासणी व खातरजमा करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**वरील अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.६ : रेल्वेस्टेशन उड्डाणपुलाजवळ, सिल्कमिल कॉलनी येथे ७०० मि.मि.व्यासाची मुख्य गुरूत्व जलवाहिनीची दुरूस्ती करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.१,२८,७१०/-)**

जायकवाडी स्थापत्य पा.पु.उपअभियंता विभागाने सन २०१०-१५ या वर्षात विषयांकित कामासाठी कामाची तातडी लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अंतर्गत उपलब्ध ठेकेदार श्री.अजितसिंग शिलेदार यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने जा.क्र.मनपा/उआ/पापु/जास्था/८२२/१२, दिनांक १९.१२.२०१२ कार्यादेशान्वये काम करून घेण्यात आले.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) अंतर्गत काम मंजूर झालेले असतांना कार्यादेश देण्यापूर्वी कंत्राटदाराकडून २% सुरक्षा ठेव व निविदा रक्कम देयक अदायगी पूर्वी करणे आवश्यक आहे. सुरक्षा ठेव रक्कम नंतर देयकातून कपात केल्याने सुरक्षा ठेव ठेवण्यामागचा हेतू साध्य होत नाही.

२. परिशिष्ट क्र.२ नुसार कामाची तातडी लक्षात घेता दिनांक १८/९/२०१२ रोजी प्रत्यक्ष कामास सुरूवात करून त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता सिल्कमिल्क कॉलनी येथील पाईप लाईन गळतीचे काम बंद करण्यात आले. हाती घेण्यात आलेल्या कामाची छायाचित्रे संचिकेसोबत जोडण्यात आलेली आहेत असे संचिकेत नमूद आहे.

संचिकेतील लेखा नोंदी तपासल्यानंतर व छायाचित्रान्वये कोठेही Airvalve Ball बसविण्यात आल्याचे आढळून आलेले नाही. तथापि देयकात Airvalve Ball साठी खालील प्रमाणे ३८,५२०/- चा खर्च झाल्याचे दाखवून प्रथमदर्शनी मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे आढळून येतो. देयकात काम न करता दाखविलेला खर्च वसूलीस पात्र.

| **ॲटम क्रमांक** | **ॲटमचा तपशीलवार** | **शेड्यूल्ड - B मधील परिमाण** | **जादा अदा रक्कम रू.** |
|---|---|---|---|
| ०५ | Item No - ०५,providing supplying fixing etc coup<br>१)Air valve Ball station , kanchanwadi,Nakshtrawadi<br>दर रक्कम रू.४२००=०० | ४ | १६८००=०० |
| | २) Nut Bolt<br>दर रक्कम रू. ९०=०० | ४७.५० | ४२७५=०० |
| | ३) Rubber packing<br>दर रक्कम रू. १२०=०० | ६७ | ८०४०=०० |
| | ४) M- Seal<br>दर रक्कम रू. २५०=०० | ३० | ७५००=०० |
| | ५) Hard crete solution<br>दर रक्कम रू.९५२.५० | २ | १९०५=०० |
| | **एकूण रक्कम रू.** | | **३८,५२०=००** |

३) निविदा पुस्तिका अट क्र. ५४ नुसार कंत्राटी कामाचा विमा हा काम सुरू होण्यापूर्वी काढणे आवश्यक आहे. तथापि काम पूर्ण झाल्यावर देयकातून १% विम्याची रक्कम कपात केल्यामुळे विमा काढण्यामागचा हेतू सफल होत नाही.

करीता उपरोक्त मुद्या क्र.१ ते ३ विषयी विभागाने आपल्या स्तरावर प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून त्याबाबतचा खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**वरील अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.७ : फारोळा जलशुध्दीकरण केंद्र प्री क्लोरीनेशन करिता क्लोरीनेटर संयंत्राची उभारणी करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२,५९,०००/-) प्रत्यक्ष खर्च रक्कम रू.२,७९,७२०/-**

फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे ५६ व १०० दश लक्ष लीटर प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्राकरीता ब्लिचिंग पावडर ऐवजी Pre-chlorinator करिता स्वतंत्र क्लोरिनेटरची व्यवस्था करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,५९,०००/- ची निविदा मागविण्यात आली. निविदा विक्रीपासून स्वीकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत २ निविदा अनुक्रमे (१) श्री.दिलीप उत्तम जोशी यांचे अंदाजपत्रकीय दराच्या ११.११% जास्त दराचे व (२) श्री.एकनाथ सखारामपंत भाले यांचे अंदाजपत्रकीय दराच्या २१% जास्त दराने प्राप्त झाली.

पैकी श्री.दिलीप जोशी यांना वाटाघाटीसाठी बोलाविले असता संबंधितानी ८% जास्तीच्या दराने काम करण्यास संमती दर्शविल्यानंतर जा.क्र.मनपा /उआ /पापु / १४१९/२०१२, दिनांक ३/९/२०१२ अन्वये कार्यादेश देण्यात आले.

कंत्राटदार यांच्या सोबत करारनामा केल्यानंतर संबंधितास रक्कम रू.२,७९,५२०/- चे देयक अदा करण्यात आले.

संचिकेची सविस्तर तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. निविदा पुस्तिका अट क्र.५४ नुसार कंत्राटी कामाचा विमा हा काम सुरू होण्यापूर्वी व काम संपेपर्यंत काढणे बंधनकारक आहे . कंत्राटदाराने सादर केलेले विमापत्र दुस-या कामाचे जोडले आहे. लेखा शाखेने विमा पत्राची खात्री करून संबंधिताच्या देयकातून रक्कम कपात करणे आवश्यक होते. तसे न होता कंत्राटदाराने विमापत्र सादर केले असे समजून कोणतीही शहानिशा केलेली नाही. त्यामुळे शासनाचे १% रक्कम रू.२७९७/- चे आर्थिक नुकसान झालेले असून वसूलीस पात्र आहे.

२. परिशिष्ठ क्र.१ व २९ नुसार फारोळा जलशुध्दीकरण येथे ५६ व १०० दश लक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र आहेत. केंद्राच्या Aeration fountain जवळ किग्रॅम प्रतीतास क्षमतेच्या क्लोरीनेटरची उभारणी करून घेण्यात आलेली आहे. जर फारोळा जलशुध्दीकरण येथे दोन वेगवेगळ्या क्षमतेचे क्लोरीनेटर होते तर खरेदी करतांना दोन वेगवेगळ्या MLD ची दरपत्रके का मागविण्यात आली नाही? कोणत्या make चे असावेत याबाबत उल्लेख नाही.

३. schedule-B प्रमाणे vacume type chlorinator of capacity १० kg/ur comprising of chlorine monitor,boro silicate chlorine gas flow indicator बसविण्यात येवून संबंधित कंत्राटदारास खालील प्रमाणे रकमेची अदायगी करण्यात आली.

| **अ.क्र.** | **नग** | **प्रती नग रक्कम रू.** | **रक्कम रू.** |
|---|---|---|---|
| १ | २ | १,२९,५००/- | २,५९,०००/- |
| | | | Above ८% २०७२०/- |
| | | **एकूण रक्कम रू.** | **२,७९,७२०/-** |

तथापि सदरील क्लोरीनेटर चा पुरवठा कोणत्या पंप हाऊसला झाला? कोणत्या Lorry ने झाला. त्याबाबतचा वाहन क्रमांक, किंवा संबंधित कर्मचारी यांना साहित्य मिळाल्याबाबतचा कुठलाही पुरावा संचिकेत आढळून आलेला नाही.

४. साहित्य खरेदी करीत असतांनाचे Invoice, Make,Guarantee card अथवा Delivery Challen संचिकेत आढळून आलेले नाही.

५. लेखापरीक्षण कामी stock Register उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे संयत्राचा पुरवठा झालेला असल्याची खात्री होवू शकली नाही.

करिता, विभागाने मुद्या क्र. १ ते ५ बाबत प्रत्यक्ष खातरजमा व शहानिशा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**वरील अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.८: मासिक देयक तपासणीअंती आढळून आलेल्या त्रुट्यांबाबत.**

माहे सप्टेंबर २०१४ ते मार्च - २०१५ पर्यंतच्या मासिक देयकाची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. श्री.शिंदे कौतिक तुकाराम यांना जा.क्र.मनपा/४८३/ १४, दिनांक १९.०९.२०१४ अन्वये सेवानिवृत्त करण्यात आले व माहे डिसेंबर २०१४ पर्यंतचा नियमित मासिक पगार व इतर देयक जसे की, overtime Bill इ. दरमहा मासिक देयकात दिल्याचे निदर्शनास आले. संबंधित कर्मचारी डिसेंबर -२०१४ मध्ये सेवानिवृत्त झालेला असतांना मासिक देयकात other Allowances मध्ये रक्कम टाकणे ही बाब नियमबाह्य आहे.

२. श्री.शेख फरीद शेख हमीद यांच्या वेतनाची मासिक देयके तपासले असता असे निदर्शनास आले की, संबंधितास घरभाड्यापोटी दरमहा रू. ५७४/- माहे डिसेंबर २०१४ पर्यंत कपात करण्यात आले. तथापि जानेवारी २०१५ पासून संबंधिताला घरभाडे रक्कम दरमहा पगारात अदा करण्यात येत आहे. जर एखाद्या कर्मचा-यास घरभाडे भत्ता देण्यात येत नसेल तर तो कर्मचारी मनपाचे निवासस्थानाचा वापर करतो असे असते. घरभाडे भत्ता मध्येच पुनश्च संबंधीतांना अदा केल्याने त्यांनी शासकीय निवासस्थान रिक्त केले असल्यास देयकासोबत मनपास निवासस्थानाचा ताबा दिल्याची ताबा पावती असणे आवश्यक आहे.

करिता, उपरोक्त मुद्या क्र. २ विषयी लेखापरीक्षण विभागास अवगत करून त्याबाबतचे लेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून द्यावे असे सूचित केले असता लेखापरीक्षण अंतीम होईपर्यंत लेखे सादर केलेले नसल्याने प्रकरणाची शहानिशा / खातरजमा करता आलेली नाही.

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.९ : औरंगाबाद वॉटर युटिलीटी कंपनीकडे प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांपैकी महानगरपालिकेच्या निवासस्थानात निवास करीत असलेल्या कर्मचा-यांच्या घरभाडे भत्त्यासंबंधी.**

औरंगाबाद महानगरपालिकेने शहरातील पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांपैकी २९६ कर्मचा-यांना प्रतिनियुक्तीने औरंगाबाद वॉटर युटिलिटी कंपनीकडे नियुक्ती दिलेली आहे. अशी प्रतिनियुक्ती देतांना संबंधित कर्मचा-यांच्या वेतन व भत्त्यांमध्ये कोणतीही बाधा न येता प्रतिमाह वेतन अदा करण्यास कंपनी बांधील आहे. औरंगाबाद महानगरपालिकेकडून उक्त कर्मचा-यांचे मासिक वेतन व भत्त्यांचे देयक तयार करण्यात येते. अशा देयकाच्या एकूण रकमेची (Gross Pay) संबंधित कंपनीकडे मागणी केली जाते. त्यानुसार कंपनीकडून धनादेश महानगरपालिकेडे प्राप्त होत असल्याचे उपलब्ध अभिलेख्यानुसार दिसून आलेले आहे.

प्रकरणात प्रतिनियुक्तीने औरंगाबाद वॉटर युटिलिटीकडे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांपैकी सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये उल्लेखिलेल्या कर्मचा-यांच्या वेतनातून घरभाडे भत्ता मनपाच्या निवासस्थानाचा वापर करीत असल्यामुळे कपात करण्यात येतो अशी दरमहा कपात करण्यात येणारी घरभाडे भत्त्याची रक्कम एकूण रकमेत समाविष्ट केल्या जात नाही. महानगरपालिकेकडून देयके तयार करतांना संबंधित कर्मचारी हा महानगरपालिकेच्या निवासस्थानात रहात असल्यामुळे संबंधितांच्या देयकात रक्कम न दर्शविता कपात केलेली रक्कम मालमत्ता विभागाच्या कर्मचारी निवासभाडे या लेखाशिर्षात (Book Adjustment) नुसार वसूली म्हणून दर्शविण्यात येते. औरंगाबाद वॉटर युटिलिटी कंपनीकडे निवासस्थानात राहणा-या कर्मचा-यांच्या घरभाडे भत्त्याची रक्कम महानगरपालिकेकडून स्वतंत्रपणे मागणी करणे आवश्यक ठरते.

अशा प्रकारची मागणी महानगरपालिकेने संबंधित कंपनीकडे केलेली आहे किंवा नाही याबाबत लेखापरीक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

उक्तनुसार ज्या कर्मचा-यांच्या वेतनातून घरभाडे भत्ता कपात झालेला आहे. परंतू संबंधित कर्मचारी प्रतिनियुक्तीवर असल्याने प्रतिनियुक्ती असलेल्या कंपनीकडून एकूण रकमेत सदरील रक्कम समाविष्ट नसल्याने मनपाचे सप्टेंबर २०१४ ते मार्च २०१५ पर्यंत रक्कम **रू. ४,६८,१०७** /- चे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच या कालावधीनंतरही होत आहे. उपलब्ध अभिलेख्यानुसार उक्त रक्कम निदर्शनास आली असून त्याचा विवरण तक्ता यासोबत जोडण्यात येत आहे.

घरभाडे भत्ता रक्कम औरंगाबाद वॉटर युटिलिटी कंपनीकडे स्वतंत्र मागणी करून वसूल करणे आवश्यक आहे.

करीता उक्त नुसार मनपाचे होत असलेले आर्थिक नुकसान संबंधिताकडून वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे असे सूचित केले असता विभागाने दिनांक १३.५.२०१६ च्या पत्रात खुलासा केला आहे की, निवास भाडे रक्कम संबंधित औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लिमिटेड यांना देय असलेल्या AOSG च्या रकमेतून कपात केल्याचे कळविले आहे. तथापि रक्कम कपात झालेल्या पुराव्यासोबत जोडले नाही. AOSG च्या देयकातून कपात करणे म्हणजे लेखाशिर्षनिहाय खर्च झालेला नाही. कारण सदरील कर्मचा-यांचे वेतन व भत्ते हा खर्च कराराम्यानुसार झालेला नाही. कारण सदरील कर्मचा-यांचे वेतन व भत्ते हा खर्च करारनाम्यानुसार कलेक्शन अकाऊन्ट मधून करावयाचा आहे.

कारण उक्त वसूली करतांना योग्य त्या लेखाशिर्षातून खर्च झालेला नाही. तसेच झालेल्या खर्चाचे पुरावे लेखापरीक्षण विभागास प्राप्त झालेला नसल्याने लेखापरीक्षण पथकाची खात्री होवू शकली नाही.

उक्त प्रकरणी जायकवाडी स्थापत्य यांनी लेखा विभागाशी समन्वय साधून सविस्तर खुलासा करावा. केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर अहवालासह लेखापरीक्षण विभागास अनुपालन दर्शवावे.

**परिच्छेद क्र.१०: औरंगाबाद पाणीपुरवठा योजने अंतर्गत नक्षत्रवाडी संतुलन जलकुंभ ते रेल्वेस्टेशन औरंगाबाद पर्यंत १४०० मि.मी.व्यासाची अस्तित्वातील पी.एस.सी.गुरूत्ववाहिनी बदलण्यासाठी नविन पोलादी गुरूत्ववाहिनी पुरविणे, अंथरणे, जोडणे व आडव्या जोडणीसह जलदान चाचणी देणे आणि तद्नुषंगीक कामे करणे बाबत. अं.प.रक्कम रू.३९,९३,००,०००/- तेराव्या व दरम्यानच्या देयकापर्यंत झालेला खर्च रू.४०,२२,६७,४६१/-**

औरंगाबाद पाणीपुरवठा योजने अंतर्गत दिनांक १७ व १८ सप्टेंबर २००८ रोजी औरंगाबाद शहरात झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत औरंगाबाद मनपाच्या नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून शहरापर्यंत असलेल्या ७०० मीमी व १४०० मीमी व्यासाच्या P.S.C.जलवाहिन्या बदलणेच्या कामी रू. ४० कोटी तसेच शहर वितरण वाहिनीतील जास्त खराब झालेल्या जलवाहिन्या बदलण्यासाठी रू. ३० कोटी मंजूर झाले. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास मा.सर्वसाधारण सभा यांनी दिनांक २०.९.२००८ रोजी ठराव क्र. ३०० अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. ठरावात नक्षत्रवाडी संतुलन टाकी ते शहरापर्यंत ७०० मी.मी.व १४०० मी.मी.व्यासाच्या जलवाहिन्या बदलून त्याऐवजी एम.एस.जलवाहिन्या टाकण्याच्या कामांचे एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रू. ४० कोटी तसेच औरंगाबाद शहराचा पुढील ३० वर्षाचा सर्वसमावेशक विचार करून वितरण प्रणालीचे Re-engineering करून Hydraulic model तयार करून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यास व DPR नुसार वितरण प्रणालीमध्ये प्राधान्य क्रमाणे ज्या वितरण वाहिन्या बदलावयाच्या आहेत त्या बदलण्यासाठीचे तयार केलेली रक्कम रू. ३० कोटीचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने तद्नुषंगाने सदरील कामाचे अंदाजपत्रक तयार करून कार्यालयीन पत्र क्र.मनपा/कार्यकारी अभियंता/पापु/४५९/२००८, दिनांक ११.११.२००८ अन्वये निविदा सूचना ई निविदा विभागाकडे प्रसिध्दीस दिली. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात सुध्दा निविदा प्रसिध्द केली निविदेमध्ये अ.क्र.१ नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून क्रांतीचौक पर्यंत अस्तित्वात असलेली PSC गुरूत्व वाहिनी Replace करण्यासाठी व नविन ७०० मी.मी. व्यासाची पोलादी गुरूत्व वाहिनी टाकणे, अनुषंगिक कामे करणे, आडव्या जोडण्या करणे व चाचणी देणे इ.कामासाठी रू.१८,४६,५०,०००/- आणि अ.क्र.२ मध्ये नक्षत्रवाडी संतुलन टाकीपासून रेल्वेस्टेशन पर्यत अस्तित्वात असलेली १४०० मी.मी.व्यासाची पी.एस.सी. गुरूत्व वाहिनी Replace करण्यासाठी व नविन १४०० मी.मी. व्यासाची पोलादी गुरूत्ववाहिनी टाकणे, अनुषंगिक कामे करणे, आडव्या जोडण्या करणे व चाचणी देणे इ.कामासाठी रू.२१,५३,५०,०००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असे एकूण रू. ४०/- कोटी रकमेची अंदाजपत्रकाची निविदा प्रसिध्दीस दिली.

ई- निविदा प्रसिध्दीस शुध्दीपत्रक उक्त संदर्भिय निविदेमध्ये दिनांक ९.१.२००९ अन्वये मा.आयुक्तांनी प्रसिध्द झालेल्या निविदेच्या शुध्दीपत्रकास मान्यता दिली. शुध्दीपत्रकामध्ये पूर्व निविदेतील अनुक्रमांक १ मधील काम वगळून पुढील प्रमाणे काम करण्याचे ठरले. त्यात नक्षत्रवाडी संतुलन जलकुंभ ते रेल्वेस्टेशन औरंगाबादपर्यंत १४०० मी.मी.व्यासाची अस्तित्वातील पी.एस.सी. गुरूत्ववाहिनी बदलण्यासाठी नविन पोलादी गुरूत्व वाहिनी पुरविणे, अंथरणे, जोडणे व आडव्या जोडण्यासह जलदाब चाचणी देणे. तसेच शहरा अंतर्गत विविध भागात पोलादी व डी.आय. जलवाहिन्या पुरविणे, अंथरणे, जोडणे व आडव्या जोडणीसह जलदाब चाचणी देणे आणि तद्नुषंगिक कामे करणे करीता, रू.३९.९३ कोटीचे अंदाजपत्रक तयार करून प्रसिध्दीस देण्यात आले. निविदा विक्रीचा दिनांक १९.१.२००९ व निविदा दाखल करण्याचा दिनांक २९.१.२००९ असा होता. दिनांक २२.१.२००९ रोजी निविदा पूर्व बैठकीत निविदा दाखल करण्याची अंतीम तारीख दिनांक २९.१.२००९ ऐवजी दिनांक १०.२.२००९ पर्यंत शुध्दीपत्रक क्र. २ जा.क्र.पापु/जाय (स्थापत्य)/२८/२००९ दिनांक २७.१.२००९ अन्वये प्रसिध्दीस देण्यात आले. दिनांक १०.२.२००९ पर्यंत ३ निविदा विक्री झ ााल्या. २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदेपैकी सर्वात कमी दराची निविदा SMC Infrastructures Pvt.Ltd ,Thane यांची ५.५८% कमी दराची आहे. प्राप्त दरास व एजन्सीला मान्यता प्राप्त करून घेण्यासाठी मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यावर ठराव क्र.२१० दिनांक १३.२.२००९ अन्वये मान्यता प्रदान केली आहे. उक्त ठरावात प्रकल्प सल्लागार म्हणून मे.युनिटी कन्सलटंट या संस्थेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ( ड) मधील प्रकरण ५ चे कलम (२) (२) अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान -२०१० अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस महाराष्ट्र शासनाकडून रक्कम रू.२८ कोटी अनुदान नक्षत्रवाडी मुख्य संतुलन टाकी ते औरंगाबाद शहरापर्यंत मुख्य वाहिनी टाकण्यासाठी मंजूर केलेले आहे. अनुदानाच्या व्यतिरिक्त रू.१२ कोटी रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने उभी करावयाची आहे. एकूण योजना रू. ४० कोटीची आहे . या कामास शासन निर्णय सुनिअ - २००९/ प्र.क्र.६१/पापु-२२ ,मंत्रालय मुंबई दिनांक ७ मे २००९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. शासनाकडून रू.२८/- कोटी अनुदान टप्प्याटप्प्याने प्राप्त झाले आहे. कामाचे कार्यादेश कार्यालयीन पत्र क्र.मनपा/काआ/वॉर्ड -ब व क/८६२/२००९ दिनांक २७.२.२००९ अन्वये देण्यात आले. कामाची मुदत १८ महिने होती. सदरील कामास दिनांक ३०.९.२०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दिलेल्या मुदतवाढी विविध दरम्यानची देयके अदा करते वेळी दिलेल्या आहेत. सुजल निर्मल अभियाना अंतर्गत वेळोवेळी शासनाकडे कामाचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे. संचिकेची सविस्तर तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आल्या आहेत.

१. कार्यालयीन पत्रक्र.मनपा/उअ/पापु/जास्था/४६६/२०१२,दिनांक २८.८.२०१२ अन्वये शासनाचे उपसचिव, पापु व स्वच्छता विभाग यांना उक्त योजनेच्या कामाचा आर्थिक व भौतिक अहवाल सादर करतांना त्यात ८५% काम पूर्ण झाल्याचे नमूद आहे ही परिस्थिती सन २०१२ ची असतांना अद्यापही संचिकेत काम पूर्ण झाल्याचा उल्लेख नाही. तीन वर्षाचा कालावधी उर्वरीत १५% काम पूर्ण होवू न शकल्याचे कारण स्पष्ट व्हावे.

२. कंत्राटी कामाचा विमा दिनांक २६.२.२०१२ पर्यंतच्या कालावधीचाच उतरविलेला आहे. पुढील कालावधीच्या कामाचा विमा उतरविलेला नाही, तसेच विम्याच्या विमापत्रात कामाचे नांव नक्षत्रवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यंतच्याच कामाचा उल्लेख आहे. उक्त विमा पूर्ण कामाचा व पूर्ण कालावधीचा उतरविलेला नाही. त्यामुळे

शासनाचे आर्थिक नुकसान व अपूर्ण विमा उतरविल्याने विमा काढण्याचा हेतू सफल होत नाही.

३. मे.S.M.C. Infrastructures Pvt.Ltd Thane यांनी IDBI बँकेची बँक गॅरेन्टी क्र.२००९००४७ BGF ०१३८ रक्कम रूपये ८० लक्ष २% सुरक्षा ठेव रक्कम म्हणून कार्यादेश देण्यापूर्वी कार्यालयात सादर केली. सदरील बँक गॅरंटीला वेळोवेळी मुदतवाढ घेवून शेवटची मुदतवाढ २६.२.२०१४ पर्यंतची आहे. कंत्राटदाराने अद्यापही काम पूर्ण करून मनपास हस्तांतरीत केलेले नाही. अशा परिस्थितीत बँक गॅरेन्टीला पुढील मुदतवाढ घेणे आवश्यक होते.

४. मे.युनिटी कन्सलटंट पुणे यांना PMC म्हणून नियुक्ती देतांना मा.स्थायी समितीने महाराष्ट्र मनपा अधिनियमाचे अनुसूची - ड चे प्रकरण ५ नियम (२)(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार नियुक्ती दिलेली आहे. परंतू अशी नियुक्ती देतांना मा.स्थायी समितीच्या कार्यवृत्तात कारणे नमूद करणे आवश्यक होते.

५. सदरील कामाच्या संचिकेतील पृष्ठ क्र.१०५ परिच्छेद (२९८) मधील शेवटच्या ३ ओळीमध्ये लेखाशाखेने महाराष्ट्र सुजल व निर्मल योजनेच्या अनुदानाची स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथील बँक खात्यातील रक्कम रू.३.१७ कोटी इतर कामासाठी वापरली असा टिपणीत उल्लेख आहे. दिनांक ५.८.२०१० रोजी खात्यातून रक्कम काढून इतर कामासाठी वापरल्याच्या संचिकेत स्वतंत्र पानावर उल्लेख आहे. शासकीय अनुदानाच्या प्राप्त रकमा त्याच कामावर खर्च करणे बंधनकारक असते. लेखा शाखेने शासनाच्या परवानगी शिवाय रक्कम स्वतंत्र बँक खात्यातून काढून इतर कोणत्या कामासाठी वापरली याबाबत सक्षम प्राधिकरणाच्या मान्यता संचिकेत नाही.

६. संचिकेतील पृष्ठ एनएस-११२ परिच्छेद (३१३) मध्ये योजनेच्या कामात शासकीय अनुदानाचा तिसरा हप्ता रू.९.३३ कोटी अप्राप्त आणि मनपा सहभाग रक्कम बँकेत जमा केलेली नसल्याने कामाची गती मंद झाली असा उल्लेख आहे. त्यामुळे कामास मुदतवाढ देण्यात आली. प्रत्यक्षात योजना सुरू करण्यापूर्वीच मनपाने स्वत:चा हीस्सा स्वतंत्र बँक खात्यात जमा करून शासकीय अनुदानासाठी पाठपुरावा करणे गरजेचे होते. निधी अभावी कामाची गती मंदावणे ही बाब अयोग्य असून रू. ४० कोटीची योजनेच्या लाभापासून नागरीकांना वंचीत ठेवण्यात आले आहे.

७. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियाना अंतर्गत औरंगाबाद पापु योजनेच्या कामासाठीचे अनुदान जमा करणे, मनपा हिस्सा जमा करणे यासाठी शासनाच्या निर्देशानुसार स्वतंत्र बँक खात्यात रकमा जमा होणे आवश्यक होते. मनपाने हिस्सा भरणा करतेवेळी मनपाच्या मुख्य खात्यातून रक्कम पाणी पुरवठा योजनेच्या खात्यात जमा न करता, Enroute Consumers कडून मनपास प्राप्त होणारी पाणीपट्टीची रक्कम परस्पर मनपा हीस्सा म्हणून जमा केली, अशा परस्पर पाणीपट्टीच्या रकमा संबंधित लेखाशिर्षात जमा न होता इतरत्र मनपाच्या बँक खात्यात जमा करणे अयोग्य आहे. तसेच अशी कार्यवाही करण्यासाठी कोणतेही कार्यालयीन आदेश निर्गमित झालेले नाही. प्राप्त रकमा योग्य ठिकाणी जमा झाल्या की नाही याचा ताळमेळ लेखा शाखेने घेणे आवश्यक ठरते. मनपास प्राप्त

होणा-या विविध शासकीय अनुदानाचा समावेश मनपाच्या अर्थसंकल्पात करण्यात येतो, त्याप्रमाणे त्याबाबतच्या जमा व खर्चाच्या नोंदी जनरल कॅश बुक मध्ये असणे आवश्यक आहे.

८. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाच्या अनुदानासाठी स्वतंत्र बँक खाते स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे काढलेले आहे, त्याचा क्र.६२०९८९०८४८३ असा आहे. या खात्यात शासकीय अनुदान व मनपा हिस्सा रक्कम जमा होणे क्रमप्राप्त ठरते. परंतू लेखापरीक्षणास असे निदर्शनास आले की, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद येथे खाते क्र.६२०९४८१०७३१ मध्ये Erroute consumers कडून प्राप्त पाणीपट्टीची रक्कम जमा होते. एकाच योजनेसाठी दोन स्वतंत्र खाते काढण्याचा उद्येश काय आहे याचा बोध झालेला नाही.

९. संचिकेतील पृष्ठ क्र.एनएस १७७ परिच्छेद क्र. ५१८ मध्ये संबंधितांनी सुजल व निर्मल अभियाना अंतर्गत करण्यात येत असलेल्या कामाच्या PMC चे देयक समांतर जलवाहिनी करीता AOSG ची रक्कम रू.६३ कोटीची अर्थसंकल्पीय तरतूद आहे. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतूदीमधून खर्च भागविण्याचे प्रस्तावित केले. याविषयी पृष्ठ क्र.एनएस १७८ मध्ये दिनांक ३०.६.२०१४ रोजी शहर अभियंता यांनी सदरील खर्च सुजल निर्मल अभियाना अंतर्गत जमा असलेल्या खात्यातून रक्कम अदा करण्याची शिफारस केलेली आहे. लेखा शाखेने देयक पारीत केले. परंतू कोणत्या लेखाशिर्षातून खर्च झाला याचा बोध होत नाही. संचिकेत उक्त दोन भिन्न सादरीकरण असतांना नेमके कोणत्या खात्यातून रक्कम अदा केली ही बाब स्पष्ट करणे आवश्यक आहे.

१०. कार्यालयीन पत्र क्र.मनपा/काअ/८३७/२००९, दिनांक १३.२.२००९ अन्वये औरंगाबाद शहर पाणीपुरवठा योजनेबाबत रू.१००/- कोटीच्या कामाची एकच निविदा न काढता कामाच्या स्वरूपानुसार वेगवेगळ्या तीन निविदा काढून पुढील कार्यवाही करण्यासाठी औरंगाबाद मनपा कार्यवाही करीत आहे असे पत्र मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे सादर केलेले आहे. या पत्रात मा.स्थायी समितीने मान्यता दिलेल्या ठराव क्र.२१० चा उल्लेख आहे, तसेच कंत्राटदाराची रू.४० कोटीच्या कामासाठी नियुक्ती झाल्याचेही कळविले होते. याबाबत दिनांक ७.५.२००९ रोजी शासन निर्णय क्र.सुनिअ-२००९/ प्र.क्र.६१/ पापु.२२ अन्वये नक्षत्रवाडी मुख्य संतुलन टाकी ते औरंगाबाद शहरापर्यंत मुख्य वाहिनी टाकणेच्या रू.४०/- कोटी किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. औरंगाबाद मनपाने प्रथम काढलेल्या निविदेच्या कामास मान्यता आहे. शुध्दीपत्रक प्रमाणे केलेल्या बदलाच्या कामास मान्यता प्राप्त झालेली नाही असे प्राप्त अभिलेख्यावरून दिसून येते.

११. शहर विवरण प्रणालीत जुन्या जलवाहिन्या बदलून नविन जलवाहिन्या टाकणेसाठी मंत्रीमंडळ बैठकीत रक्कम रू.३० कोटी निधी मंजूर झालेला आहे. UIDSSMT योजने अंतर्गत उक्त कामे करण्याचे नियोजन होते. कामाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून P.P.P. मॉडेलला जोडून योजना राबविण्याचे नियोजन केल्याचा उल्लेख MJP कार्यालयासोबत झालेल्या पत्रव्यवहारात आहे असे नियोजन मनपाने जर केले होते तर सुजल व निर्मल योजने अंतर्गत रू. ४० कोटी प्रशासकीय मंजूरी प्राप्त कामातील ७०० मी.मी. व्यासाची P.S.C. जलवाहिनी बदलून नविन MS

जलवाहिनी टाकणेचे कामाचे अंदाजपत्रक कमी करून शहरातील जलवाहिन्या बदलण्याचे कामाचे अंदाजपत्रक शुध्दीपत्रकात समावेश करण्याचे प्रयोजन कोणते होते ? त्यास शासनाची मान्यता प्राप्त न होताच कामे सुरू केली याबाबत खुलासा व्हावा.

१२. मे.युनिटी कन्सलटंट, पुणे यांची उक्त कामासाठी P.M.C. म्हणून नियुक्ती दिलेली आहे. संबंधितांना अदा करण्यात आलेल्या एक ते पाच दरम्यानच्या देयकातून आयकर अधिनियमातील कलम १९४ जे नुसार व्यावसायीक सेवा प्रदानातून १०% दराने आयकर कपात करणे आवश्यक होते. परंतू संबंधितांच्या देयकातून २.३% आयकर कपात केला आहे. ७-७% कमी दराने कपात झाल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झालेले आहे. तसेच मनपा Tax Deduction Authority असल्याने मनपात आयकर नियमाप्रमाणे देयकातून आयकर कपात करण्याचे प्रथम कर्तव्य आहे. याबाबत लेखा शाखेशी समन्वय साधून खुलासा करावा.

१३. मे.S.M.C.Infrastructures Pvt.Ltd. यांना अदा केलेले पाचव्या व दरम्यानच्या देयकता withheld केलेले चवथ्या व दरम्यानच्या देयकातील रक्कम रू.४,१७,६६,३९६/- अदा केलेली आहे. तसेच withheld रकमेचे Refund statement तयार करण्यात आलेले आहे. त्यामुळे चवथ्या देयकातील withheld रक्कम पाचव्या देयकात व Refund statement नुसार दोनदा अदा केलेली नाही याची लेखा विभाग व संबंधित विभागाने खात्री करून खुलासा करावा.

१४. सुजल व निर्मल योजने अंतर्गत औरंगाबाद मनपास प्राप्त झालेला निधी, मनपा हिस्स्याबाबत स्वतंत्र खात्याचे बँक पासबुक व रोखकिर्द शासनाकडे भरणा केलेल्या रकमांचे चलन इत्यादी बाबी विभागाने लेखा शाखेकडून हस्तगत करून घेवून लेखापरीक्षण पथकाने वेळोवेळी लेखी व तोंडी सूचित करून सुध्दा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे योजनेसाठीचा प्राप्त निधी व झालेला खर्च याचा ताळमेळ घेता आला नाही.

१५. सदरील योजनेसाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचे स्टॉक रजिस्टर (१०९,११०,१११) लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेली नाही.

१६. मोजमाप पुस्तिकांमधील नोंदी करतांना काम कोणत्या तारखेस पूर्ण झाले याचा उल्लेख नाही.

१७. कामास झालेल्या विलंबाची कारणामध्ये मुख्यत्वे भूसंपादन ही बाब निदर्शनास आली. तथापि योजनेच्या कामाचा कार्यादेश देण्यापूर्वीच भूसंपादन सारखी कामे करणे आवश्यक होते.

१८. कंत्राटदारास अदा केलेले तेरावे व दरम्यानचे देयकापर्यंत रू.४०,२२,६७,४६१=०० खर्च झालेला आहे. निविदा रकमेच्या १०६.६९% झालेला असून योजनेच्या मंजूर निधीपेक्षा रू.२२,६७,४६=०० जास्तीचा अदा केलेल्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता नाही.

१९. कंत्राटदार व पीएमसी यांच्या अदा केलेल्या देयकातून अनुक्रमे १,१७,७७,०१७.०० + ५,१०,६६५ = १,२२,८७,६८२.०० रक्कम सुरक्षा ठेव स्वरूपात कपात करण्यात आलेली आहे. एजन्सीला अदा करण्यात आलेले तेरावे व दरम्यानच्या व पीएमसी ला अदा करण्यात आलेल्या सहाव्या व दरम्यानच्या देयकाच्या रकमेनंतर योजनेच्या ४० कोटीचा खर्च पूर्ण झालेला असून रक्कम रू. २२,६७,४६१.०० जास्तीचा खर्च झालेला आहे. संबंधितांच्या देयकातून कपात केलेल्या रकमा या सुरक्षा ठेव म्हणून ठेवण्यात आलेल्या असून त्या रकमा सदरील योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर संबंधितांना अदा कराव्या लागतात. उक्त दायित्व निभावण्यासाठी संबंधित बँक खात्यात रक्कम रू.१,२२,८७,६८२.०० जमा आहेत किंवा कसे याबाबतचे लेखे उपलब्ध झालेले नसल्याने लेखापरीक्षण विभागाची खात्री झालेली नाही. लेखा विभागाशी समन्वय साधून उक्त बाबींचा खुलासा व्हावा.

२०. नक्षत्रवाडी संतुलन टाकी ते रेल्वेस्टेशन तसेच शहराअंतर्गत अंथरण्यात आलेल्या जलवाहिन्या , अंथरल्यानंतर जुन्या जलवाहिन्या काढण्यात आल्या किंवा कसे ? जुन्या जलवाहिन्या बदलून नविन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले होते. तेव्हा जुन्या जलवाहिन्या काढल्या नसल्यास त्यावरील व्हॉल्व जलवाहिनी जमिनीत राहून खराब होत नाही काय ? जुन्या साहित्यातून मनपास किती उत्पन्न प्राप्त झाले ? इत्यादी बाबींचा अभिलेख्यांसह खुलासा व्हावा.

२१. सुजल व निर्मल योजने अंतर्गत झालेल्या कामाचे पाईप लाईन टाकतांना सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांना अनुक्रमे रू.२०,०२५ + रू. ३४,००० + रू. ३५,९१५ असे एकूण रू. ८९,९४०=०० आणि एम.आय.डी.सी.कार्यालय औरंगाबाद यांना रू. १०,०००/- रस्ता दुरूस्ती खर्च म्हणून अदा करण्यात आलेले आहे. उपरोक्त नुसार एकूण ९९,९४०/- इतका खर्च झालेला असून त्यापैकी ८९,९४०/- खर्च रस्ता दुरूस्ती खर्च या लेखाशिर्षा अंतर्गत नोंदविलेला आहे व रू.१०,०००/- पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षा अंतर्गत नोंदविलेला आहे. प्रत्यक्षात सदरील खर्च हा योजनेच्या प्राप्त निधीतून करणे व त्या लेखाशिर्षा अंतर्गत नोंदविणे आवश्यक होते. लेख्यांचे लेखाशिर्षनिहाय वर्गीकरण योग्य पध्दतीने झालेले नसल्याचे दिसून येते. या संबंधी लेखाविभागाच्या समन्वयाने खुलासा व्हावा.

२२. अतिरिक्त कामाच्या खर्चास वेळोवेळी मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. संचिकेत अतिरिक्त खर्चास मान्यता देतांना अंदाजपत्रकीय दराने मान्यता देण्यापूर्वी संबंधित कंत्राटदारास निविदा दराने काम करण्यास तयार आहे किंवा नाही याची सहमती घेतलेली नाही. एकूण खर्च रू.१६,०४,१८१=०० इतका झालेला आहे. सदरील अतिरिक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून केलेले आहे. त्यास मंजूरी प्रदान आहे. अतिरिक्त खर्च अंदाजपत्रकीय.दराने मान्य केला. तथापि निविदा दराने संबंधित गुत्तेदाराकडून अतिरिक्त काम करून घेण्यात आले नसल्याने रू. ८९,५१३=०० रकमेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. निविदा धारकाने ५.५८% कमी दराची निविदा भरलेली आहे. त्यानुसार संबंधितांनी अतिरिक्त काम योजनेतीलच असल्याने त्याच दराने करणे गरजेचे होते. त्यामुळे जास्तीचा अदा खर्च रू.८९,५१३=०० संबंधिताकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.

२३. सदरील योजनेचे काम हे S.M.C.Infrastructures Pvt.Ltd. ठाणे या एजन्सीला दिलेले होते. सदरील कामासाठी एजन्सीने आयात केलेल्या मालावर L.B.T. भरणे आवश्यक होते. याबाबत स्थानिक संस्था कर अधिकारी यांना दिनांक ५.१२.२०१५ रोजी विचारले असता त्यांनी त्यांचे पत्र दिनांक १८.१२.२०१५ च्या पत्रानुसार असे कळविले की, उपअभियंता (पा.पु.जायकवाडी) यांनी संबंधिताच्या देयकातून L.B.T. रक्कम वळती करून स्थानिक संस्था कराचा भरणा करावा. त्यानुसार विभागाने संबंधिताच्या देयकातून रक्कम कपात करून L.B.T. कार्यालयात भरणा केलेला आहे काय ? खुलासा व्हावा.

करीता, उपरोक्त मुद्यांवर अभिलेख्यासह लेखापरीक्षण विभागात अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.

**विभागाने महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान रक्कम रू.८९,५१३/- संबंधिताकडून वसूल करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अभिलेख्यांसह अनुपालन दर्शवावे.**

**परिच्छेद क्र.११: समांतर जलवाहिनी योजनेतील अनियमिततेबाबत.**

१० द.ल.लि.प्रतिदिन क्षमतेची (हर्सूल) पाणीपुरवठा योजना, ५६=०० दल.ली. प्रतिदिन क्षमतेची (जायकवाडी) जुनी पाणी पुरवठा योजना व १००=०० द.ल.ली. प्रती दिन क्षमतेची (जायकवाडी) नविन पाणी पुरवठा योजना या तीन योजना अनुक्रमे सन १९५४, सन १९७५-७६ व सन १९९२ या वर्षापासून कार्यरत आहेत. जायकवाडी जलाशयातून पाणी उपसा होत असलेल्या दोन्ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने १ एप्रिल १९९८ रोजी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केल्या. रस्त्यातील ग्राहक व वितरण व्यय वजा जाता शहरास निव्वळ पाणी परिणाम १८० द.ल.ली. प्रती दिन प्राप्त होणे गरजेचे असतांना उपरोक्त दोन्ही योजने द्वारे प्राप्त होणारे निव्वळ पाणी परिणाम १२२ ते १२४ द.ल.ली. प्रतीदिन इतके आहे. तोकडे पाणी परिणाम व वितरण व्यवस्थेमधील त्रुटी यांमुळे सन २००१ पासून शहरास एक दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत होता. त्यासाठी औरंगाबाद समांतर जलवाहिनी योजनेचे नियोजन व संकल्पन केले. केंद्र शासनाच्या Urban Infrastructure Development Scheme for small & medium Towns (UIDSSMT) या योजनेतून अनुदान मिळण्यासाठी महापालिकेने रू.३५९.६७ कोटीचा प्रस्ताव सन २००६ मध्ये शासनास सादर केला होता. मा.संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २०.६.२००९ रोजी पत्र देवून केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत औरंगाबाद शहर समांतर, पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावास मंजूरी मिळाली होती.

Request for Qualification (RFQ) ची निविदा सूचना दिनांक २०.०८.२००९ रोजी देशपातळीवरील वृत्तपत्रांतून प्रसिध्द करण्यात आली. दिनांक ०२.१२.२००९ रोजी सदर निविदा उघडण्यात आल्या असता ११ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी २ निविदाधारक अपात्र ठरले. Request for proposal (RFP) ची निविदा कार्यवाही अंतर्गत दिनांक ३०.११.२०१० रोजी निविदा दाखल करण्याच्या अंतीम वेळेपर्यंत ९ निविदाधारकापैकी (१) Subhash Project Marketing Ltd. National Water & Sewerage Corporation NWSC va tech wabag Ltd. And (२) IL&fs water ltd m/s puncak Niaga Hodings Berhad (PNHB) प्राप्त झाल्या. पैकी IL&FS water ltd यांनी सादर केलेल्या Financial Bid मध्ये अटी व शर्ती नमूद असल्याने त्यांची निविदा

Non Responsive Bid ठरल्यानंतर कमी किंमतीची म्हणजेच १ वर्षाकरीता ६३ कोटीची SPML, NWSC va tech wabag Ltd यांची निविदा मान्य करण्यात आली.

सन २००५ -०६ च्या दरसूचीनुसार योजनेचा खर्च रू.३५९.६७ कोटी होता. पण प्रस्तावास / योजनेस मंजूरी मिळणेकरीता ३ वर्षाचा कालावधी लागल्यामुळे योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी तांत्रिक मुल्यांकन करून प्रकल्पाचे सन २००८-०९ दरसूचीनुसार एकूण किंमत अंदाजे रक्कम रू.५११.३१ कोटी प्रस्तावित करण्यात आली.

पी.पी.पी. मॉडेल राबविण्यासाठी लागणारा वाढीव खर्च रक्कम रू.४३२.५३ कोटी प्रस्तावित करून सदरील योजनेस रक्कम रू.७९२.२० कोटीची (रू.३५९+रू.४३२.५३) मंजूरी देण्यात आली.

उपरोक्त योजनेत केंद्रशासन ८०% अनुदान व राज्यशासन अनुदान १०% व महानगरपालिकेचा सहभाग १०% असे ठराव क्र.२१३, दिनांक २२.३.२०११ यात नमूद आहे.

समांतर जलवाहिनी पाणीपुरवठा योजनेची मूळ संचिका अनुषंगिक अभिलेखे लेखापरीक्षणास्तव उपलब्ध झालेले नाही. केवळ करारनामा प्रत व मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३ ची प्रत लेखापरीक्षण कामी प्राप्त झाली, त्यानुसार लेखापरीक्षण कामी खालील बाबी तपासणे आवश्यक आहे.

१. निविदा उघडण्यापूर्वी पुनश्च निविदा मागविण्यासाठी विभागाने कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त होवू शकले नाही.

२ . समांतर योजनेचे २००५-०६ मध्ये नियोजन व संकल्पन केल्या गेले. तथापि प्रस्ताव मंजूरीस ३ वर्षाचा कालावधी लागला. सन २००९ मध्ये योजना कार्यान्वित करण्याची अंमलबजावणी झालेली नाही. योजना कार्यान्वित करण्याच्या कालावधीत झालेल्या वाढीमुळे योजनेच्या अंदाजपत्रकात देखील वाढ झाली. किंमतीत झालेल्या वाढीस जबाबदार कोण याची शहानिशा करून खुलासा व्हावा.

३. UIDSSMT या योजनेअंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणा-या शासकीय अनुदानासाठी शासनाच्या सूचनानुसार Reforms राबविणे बंधनकारक होते. Reforms and MOA - Monitoring and Implementation Assistance करिता क्रिसील संस्थेची निविदा पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली होती. निविदा पध्दतीने केलेली नियुक्ती केवळ एकाच निविदेवर अंतीम केली. ज्यावेळी दोन निविदा विक्री होवून एकच निविदा प्राप्त झाली त्यावेळी पुनश्च निविदा मागविण्यासाठी विभागाने कार्यवाही केलेली नाही . संबंधित क्रिसील एजन्सीने केलेल्या कामाचा व त्यांना अदा केलेल्या रकमांचा तपशील लेखापरीक्षण पथकास लेखापरीक्षण कामी उपलब्ध होवू शकला नाही. त्यामुळे उक्त एजन्सीवर झालेला खर्च योग्य असल्याची खात्री झालेली नाही.

४. दिनांक ३१.१०.२०११ रोजी PPP मॉडेलनुसार योजनेच्या अंमलबजावणीसाठी झालेल्या विकास करारपत्रातील तरतुदीनुसार ३ महिन्याचा एक अशा १२ माईलस्टोनमध्ये विकासक यांना प्रकल्पाची कामे पूर्ण करावयाची आहेत. सर्व माईलस्टोन physical & financial पध्दतीने घ्यावयाचे आहेत. Financial अंतर्गत प्रत्येक माईलस्टोन अंतर्गत असलेल्या कामांकरीता देय अनुदान कन्सेशनर यांनी

टाकावयाच्या स्वत:च्या सहभागाची रक्कम (Equity Part) व (Debt Part) इत्यादी सविस्तर माईलस्टोनची माहिती उपलब्ध झालेली नाही. करारनाम्याच्या अटी व शर्तीनुसार कामे होत आहे किंवा कसे ? याबाबत खात्री करून अभिलेख्यासह खुलासा करावा.

५. उपलब्ध अभिलेख्याच्या तपासणीत औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड कार्यालयांमध्ये कंपनीमार्फत ग्राहकसेवा केंद्राची उभारणी करण्यात आलेली आहे. या जागा water supply Assets म्हणून विकासक यांना हस्तांतरीत केलेल्या नसल्याने या जागांचे भाडे आकारावे लागेल असे महानगरपालिकेने स्पष्ट केल्याचे आढळून येते. हस्तांतरापासून सदर जागांचा भाडे देण्यास कंपनीने तयार दर्शविली होती. त्याचप्रमाणे सदर जागांमध्ये सुरू केलेले ग्राहकसेवा केंद्र लवकरच दुसरीकडे स्थलांतरीत करण्यात येईल असे इतिवृत्तांत नमूद आहे. सदरील जागेचे भाडे घेतल्या जाते अथवा विकासक यांनी ग्राहकसेवा केंद्रे इतरत्र स्थलांतरीत केले आहे काय ? याबाबत लेखापरीक्षण विभागास अवगत करावे.

६. मा.स्थायी समिती विषय क्र.२१३ दिनांक २२.३.२०११ अन्वये पारीत केलेल्या ठरावात सदरील योजनेच्या ठळक बाबीतील मुद्या क्र.२ मधील अटी व शर्तीनुसार collection A/c, water payment A/C, water Reserve A/C तसेच Independent Engineer आणि Independent Auditor यांच्या वार्षिक देयकांची रक्कम जमा करण्यासाठी वेगवेगळी स्वतंत्र बँक खाती Appointed Date च्या वेळी महानगरपालिकेला उघडावी लागणार असल्याचे नमूद आहे. अशी स्वतंत्र बँक खाती उघडल्या गेली आहेत का ? असल्यास प्रत्येक खात्याच्या जमा - खर्चाचे स्वतंत्र अभिलेखे तपासणीस उपलब्ध करून द्यावेत असे तोंडी व लेखी वेळोवेळी विभागास कळवूनही विभागाने लेखा परीक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे संबंधित खात्यातील व्यवहार योग्य पध्दतीने होत आहेत किंवा नाही याची खात्री करता आलेली नाही. याबाबत विभागाने लेखा विभागाच्या समन्वयाने खुलासा सादर करावा.

७. मा.स्थायी समिती ठराव क्र.२१३ दिनांक २२.३.२०११ मधील प्रस्तावित मुद्या क्र.१ अन्वये विकासकाकडून रक्कम रू.१,७४,५०,०००=०० जमा करणे बंधनकारक होते. विकासकाने जमा केलेली रक्कम मनपाने संबंधित शासकीय कार्यालयाकडे वर्ग करणे आवश्यक आहे. त्या बाबींची पूर्तता झाली किंवा नाही याची खात्री करून लेखापरीक्षण विभागास अभिलेख्यासह खुलासा करावा.

८. महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यापूर्वीच समांतर जलवाहिनीसाठी लागणा-या जागेचे भूसंपादन करणे गरजेचे होते. जेणे करून योजना कार्यान्वित करण्यास विलंब होणार नाही. पर्यायाने विकासकास योजनेची वाढीव किंमत द्यावयाची गरज पडणार नाही. समांतर जलवाहिनीसाठी भूसंपादन करून विकासकाला जागा मोकळ्या करून दिल्या बाबतच्या अभिलेख्यासह अनुपालन सादर करावे.

९. विकासकास ASOG म्हणून (Annual Operational support Grant) जे रू. ६३ कोटी द्यावयाचे आहेत त्यासाठी कठोर आर्थिक शिस्त निर्माण करण्याबरोबरच काही अनिवार्य व ऐच्छिक सुधारणा सूचविण्यात आल्या होत्या. त्यानुसार कार्यवाही झालेली असल्यास केलेल्या कार्यवाहीचा अहवालासह खुलासा द्यावा.

१०. सदरील योजनेच्या विमा विकासकाने उतरवयाचा आहे. निविदा पुस्तिकेतील नियम क्र. ५४ नुसार कंत्राटी कामाचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. योजनेवर काम करणा-या कामगारांच्या जिवितास हानी पोहचल्यास विमा संरक्षण संबंधित व्यक्तीला मिळते. त्यामुळे अशा प्रकारच्या विमा उतरविलेला असल्याची विभागाने खात्री करावी व तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा.

११. समांतर जलवाहिनी योजना पूर्ण झाल्यावर अथवा मध्येच रद्द झाल्यास वसूल पाणीपट्टी रकमांच्या अभिलेख्यांबाबत काय धोरण ठरविण्यात आले. याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात यावेत.

१२. PPP मॉडेल अंतर्गत समांतर पापु योजना राबविण्या करीता स्वतंत्र अभियंता व लेखापरीक्षकांची नेमणूक करण्याबाबत करारनाम्यात उल्लेख आहे. त्यानुसार अशा नियुक्त्या केलेल्या आहेत काय ? त्यांचे कामकाज व त्यांना अदा केलेल्या रकमांचे तपशिलासह अभिलेखे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे करारनाम्यातील अटी शर्तींची पूर्तता झाली किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

**करीता, उपरोक्त मुद्यांच्या खुलाशासह व अभिलेख्यांसह अनुपालन अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

### परिच्छेद क्र.१२: सन २०१३-१४ या वर्षात फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता क्लोरीनचा पुरवठा करणे बाबत.अं.प.रक्कम रू. २४,२५,५००/- (खर्च रू.१९,९५,१५०/-)

सन २०१३-१४ या वर्षात फारोळा जलशुध्दीकरण केंद्राकरीता क्लोरीनचा पुरवठा करणेसाठी रक्कम रू.२४,२५,५००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. ई निविदा विभागा मार्फत निविदा दिनांक १९.९.२०१३ रोजी मागविण्यात आल्या. दोन निविदा प्राप्त झाल्या. दोन निविदा प्राप्त झाल्या कारणाने फेर निविदा मागविण्यात आल्या. दिनांक १४.११.२०१३ रोजी निविदा उघडण्यात आल्या. या फेर निविदा प्रक्रियेतून २ निविदा विक्री झाल्या, दोन निविदा प्राप्त झाल्या. दोन्ही एजन्सीच्या दरात एकूण किंमतीत रू. १०/- चा फरक आहे. दोन्ही एजन्सीला वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले. वाटाघाटी अंती दोघांनी भरलेले दर निविदा अं.प.दरापेक्षा १७.९३% ने कमी असल्याने दोन्ही एजन्सीला ५०% काम विभागून देण्यात आले. या प्रक्रियेस मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/पापु/जास्था/६८९ / २०१३ , दिनांक १२.१२.२०१३ अन्वये मे.मधुमय उद्योग, मुंबई यांना कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत ६ महिने नमूद आहे. तसेच कार्यालयीन आदेश क्र.मनपा/पापु / जास्था/६९०/२०१३, दिनांक १२.१२.२०१३ अन्वये मे.रंगरसायण, पुणे यांना कार्यादेश देण्यात आले. यात कामाची मुदत १२ महिने दिलेली आहे. कामास दिनांक ३१.८.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. संचिकेच्या तपासणीअंती खालील बाबी आक्षेपार्ह निदर्शनास आलेल्या आहे.

१. शासन निर्णय क्र. भाखसा १०८८/२५१२/उद्योग मंत्रालय, मुंबई मधील तरतूदीनुसार एखाद्या निविदेतून कमी प्रतिसाद मिळाल्यास निविदा चौकशीला दोनवेळा मुदतवाढ देणे आवश्यक होते. त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही केलेली नाही.

२. मे.मधुमय उद्योग, मुंबई यांना कार्यादेशात ६ महिने कामाची मुदत नमूद आहे. तर मे.रंगरसायण ,पुणे यांच्या कार्यादेशात १२ महिने कामाची मुदत नमूद आहे. एकच काम दोन एजन्सीला विभागून दिल्यानंतर कामाची मुदत एकच असावयास पाहिजे होती.

३. मे.मधुमय द्योग व मे.रंगरसायन यांच्या डिलेव्हरी चलन अन्वये प्राप्त झालेल्या कागदपत्रासोबत Invoice हे मनपा,औरंगाबाद ऐवजी इतर कार्यालयाच्या नांवे आहे, त्यामुळे सदरील साहित्याचा पुरवठा मनपास झालेला आहे काय याबाबत साशंकता निर्माण होते. डिलेव्हरी चालान क्र. व Invoice चे विवरण पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | डिलेव्हरी चालान क्रमांक / दिनांक | Excise cum Com.Invoice No.& Date | पुरवठा कार्यालय पत्ता |
|---|---|---|---|
| १ | MV - ३४४<br>३.१.२०१४ | १४१७६१६७७५<br>३.१.२०१४ | का.अ.म.औ.वि.म.वाळुज पापु विभाग |
| २ | MU - ४१६<br>३.३.२०१४ | १४१७६१८६९५<br>२.३.२०१४ | का.अ.म.औ.वि.म.वाळुज पापु विभाग |
| ३ | MU - ४४२<br>२२.३.२०१४ | १४१७६१९०६४<br>२२.३.२०१४ | का.अ.म.औ.वि.म.वाळुज पापु विभाग |
| ४ | MU - १७<br>१५.४.२०१४ | १४१७६१९७५५<br>१५.४.२०१४ | का.अ.म.औ.वि.म.वाळुज पापु विभाग |
| ५ | MU - २७<br>२२.४.२०१४ | १४१७६१९८९९<br>२२.४.२०१४ | का.अ.म.औ.वि.म.वाळुज पापु विभाग |
| ६ | MU - १०२<br>१९.६.२०१४ | १४१७६२१४१४<br>१९.६.२०१४ | Oil and material Gas corp.Ltd.Uran. |
| ७ | MU - १३१<br>१०.७.२०१४ | १४१७६२१८९३<br>१०.७.२०१४ | का.अ.म.औ.वि.म.धुळे |
| ८ | MU - १३७<br>१४.७.२०१४ | १४१७६२२००३<br>१४.७.२०१४ | का.अ.म.औ.वि.म.धुळे |
| ९ | २५३४<br>१७.१२.२०१३ | ९०३२५५०३<br>१५.१२.२०१३ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पुणे. |
| १० | २४८१३<br>०२.३.२०१४ | ९०३३४७४७<br>२.३.२०१४ | पुणे, महानगरपालिका |
| ११ | २५९९९<br>५.५.२०१४ | ९०३४१७६५<br>३.५.२०१४ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पुणे |

४. मे.मधुमय उद्योग यांनी निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रात त्यांनी United Phosphorus Ltd चे Dealer असल्याचे पत्र जोडलेले आहे. मनपस क्लोरीनचा पुरवठा करतांना उक्त कंपनीचे क्लोरीन सीलेंडर पुरवठा करण्यासोबतच इतर कंपनीच्या उत्पादकांच्या मालाचा पुरवठा केलेला आहे. त्याचा तपशील पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | डीलेव्हरी चालान क्र. व दिनांक | Invoice No.&Date | उत्पादकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | MU -३९३ १०.२.२०१४ | CGPI ४१४६४० १०.२.२०१४ | Century Rayon,Mumbai |
| २ | MU -१ ५.४.२०१४ | CGPI ४४०२१४ ५.४.२०१४ | Century Rayon,Mumbai |
| ३ | MU -११० २५.६.२०१४ | CGPI ४४३६५८ २५.६.२०१४ | Century Rayon,Mumbai |
| ४ | MU -१२० २.३.२०१४ | CGPI ४४३९५४ २.७.२०१४ | Century Rayon,Mumbai |

उक्त प्रमाणे इतर उत्पादका मार्फत निविदा धारकाने केलेला पुरवठा ग्राह्य धरता येईल का ? निविदाधारक संबंधित उत्पादकाचे विक्रेते असल्याचे कागदपत्रे संचिकेत नाहीत. संबंधित उत्पादकाकडून पुरवठा झालेला मालाची गुणवत्ता निविदेतील अटी शर्ती प्रमाणे आहे काय ? याबाबत विभागाने खुलासा करावा.

५. मे.मधुमेय उद्योग मुंबई व मे.रंगरसायण, पुणे यांना अदा केलेल्या देयकांमध्ये प्रथम व अंतीम देयक घ्रसायन सामग्री खरेदीङ या लेखाशिर्षाअंतर्गत केलेले आहे. तथापी दुसरे व दरम्यानचे देयक अदा करतांना सन २०१४-१५ मध्ये AOSG साठी उपलब्ध तरतूदीतून खर्च करण्याचे प्रयोजन काय ? AOSG साठी ठेवलेला निधी P.P.P. मॉडेल अंतर्गत समांतर योजनेच्या कामासाठी आहे. एकच काम दोन वेगवेगळ्या लेखाशिर्षाअंतर्गत नोंदविणे. ही बाब अयोग्य आहे. याबाबत लेखा विभागाच्या समन्वयाने खुलासा सादर करावा.

६. ई निविदा विभागाने निर्गमित केलेली पावती क्र.१९१६, दिनांक १२.११.२०१३ रक्कम रू.२५०००/- मे.मधुमय उद्योग यांनी निविदेसोबत १% इसारा रक्कम भरणा केलेली आहे. याच पावतीचे रूपांतर उक्त कामाचे कार्यादेश देतांना २% रकमेत करण्यात यावे असे पुरवठा धारकाने विनंती केल्याचे संचिकेत नमूद आहे. विभागाने संबंधितांची विनंती मान्य करून त्यांनी १% रकमेच्या पावतीचा संदर्भ देवून पुरवठा आदेश निर्गमित केले. ई निविदा विभागाने संबंधितांची रक्कम लेखा शाखेत जमा केल्याची खात्री विभागाने केलेली नाही. लेखा शाखेतील उपलब्ध अभिलेख्यात सदरील पावती जमा झाल्याची नोंद नाही. त्यामुळे ई निविदा विभागाने संबंधितांनी १% भरलेली निविदे सोबतची इसारा रक्कम परत केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरील प्रकरणी २% अनामत रकमेचा भरणा न करताच पुरवठा आदेश मे.मधुमय उद्योग, मुंबई यांना निर्गमित केले ही बाब आक्षेपार्ह असून मनपाचे तात्पुरते

आर्थिक नुकसान करणारी ठरते. कार्यादेश देण्यापूर्वी २% अनामत रक्कम जमा असणे आवश्यक असते. याचे गांभिर्य विभागाने घेतलेले नाही. करीता उक्त बाबी संबंधी खुलासा सादर व्हावा.

७. विभागाने उक्त मुद्यांप्रमाणे एकंदरीत खरेदी केलेल्य क्लोरीनचा पुरवठ्याबाबत इतरही संचिकेत आपल्या स्तरावर उक्त मुद्यांवर तपासणी करून योग्यतेबाबत खात्री करावी. त्यानुसार प्रमाणित करून अनुपालन दर्शवावे.

८. सन २०१४-१५ मधील रसायन सामग्री खरेदी केलेली आहे. त्यादरम्यान दिनांक १.९.२०१४ पासून पाणी पुरवठा योजना औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनीकडे हस्तांतरीत केली. महानगरपालिकेने खरेदी केलेल्या व शिल्लक रसायन सामग्री साठा औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनी लि. यांना हस्तांतरीत केला असल्यास त्याची Qty व रक्कम संबंधिताकडून वसूली केली किंवा कसे याबाबत खुलासा व्हावा.

**करीता, उक्त मुद्यांवर खुलासा लेखापरीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता अहवाल अंतीम होईपर्यंत खुलासा सादर केलेला नाही.**

**उपरोक्त अनियमिततेबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाहीअंती अनुपालन दर्शवावे.**

# चौकशी अहवाल

## महानगरपालिका केंद्रीय माध्यमिक शाळा, मुकुंदवाडी या शाळेचा लेखापरीक्षण अहवाल.

**प्रस्तावना :**

केंद्रीय मा.शा.मुकुंदवाडी या शाळेस विविध प्राप्त होणा-या निधीमध्ये मुख्याध्यापकाने गैरव्यवहार केल्याबाबतचे निवेदन स.नगरसेवकाने मा.आयुक्त यांना दिनांक १८.१.२०१६ रोजी दिले होते. कार्यालयातर्फे संदर्भिय पत्रानुसार संबंधित शाळेचे लेखापरीक्षणाचे काम दिनांक २९.२.२०१६ रोजी मुख्य लेखापरीक्षक यांनी आदेशित केल्यानुसार सन २०१३ ते १९.१.२०१६ पर्यंतचे लेखे / अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी पत्र देण्यात आले. त्यानुसार संबंधित लेखापरीक्षक पथक शाळेवर गेले असता केंद्रीय माध्यमिक शाळा मुकुंदवाडीचे मुख्याध्यापक यांनी पत्र देवून दिनांक १५.३.२०१६ रोजी अशी विनंती अर्ज दिला की, मला दिनांक १२.३.२०१६ रोजी लेखापरीक्षणाचे आदेश प्राप्त झाले. परंतू नुकतेच ISO करण्याकरिता विविध गठ्ठयांमध्ये अभिलेखे बांधलेले असल्याने ते शोधून उपलब्ध करून देण्यासाठी तसेच मुकुंदवाडी शाळा इयत्ता दहावीचे परिक्षा केंद्र असल्याने परिक्षेच्या कालावधीत लेखे शोधणे शक्य नसल्यामुळे वरील संदर्भिय पत्रानुसार अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी १८.३.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. या प्रकरणाची संपूर्ण कल्पना शिक्षणाधिकारी यांना सुध्दा देण्यात आली. त्या शाळेवर दिनांक ३.३.२०१६ रोजी लेखापरीक्षण पथक गेले असता पूर्वीचे मुख्याध्यापक श्री.डी.आर.सोळुंके यांच्या जागी नविन मुख्याध्यापक श्री.तपकिरे संतोष रूजू झाल्याचे कळले. दिनांक १२.३.२०१६ रोजी सदरील मुख्याध्यापक श्री.देवेन्द्र सोळुंके यांना परिपत्रकाची प्रत देण्यात आली. यानुसार अभिलेखे उपलब्ध करून देणेबाबत सूचित करण्यात आले आहे अशी माहिती संबंधिताने लेखापरीक्षण पथकास सांगितले.

तद्नंतर संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनी सन २०१३-२०१४, २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचे विद्यार्थ्यांचे हजेरी भत्ता वाटप रजिस्टर, अल्पसंख्याक / अस्वच्छ कामगारांचे मुलांकरीता मिळणारी शिष्यवृत्ती, शाळा अनुदान, शिक्षक अनुदान, शाळा दुरूस्ती अनुदान, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत प्राप्त होणारी अनुदाने, माध्यमिक शाळांकरीता, अपंग विद्यार्थ्यांचे विविध योजनेकरीता येणारे अनुदान, मिळणारे अनुदान (रॅम - रेलींग),विशेष भत्ता किंवा चेअर, शस्त्रक्रिया इ.दिनांक १८.३.२०१६ नंतर उपलब्ध करून दिले. उर्वरीत अभिलेखे जसे की, गणवेश वाटप रजिस्टर, RMSA चे अपूर्ण stock रजिस्टर, इ.लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे खातरजमा करता आलेली नाही.

संबंधित शाळेबाबत सर्व शिक्षा अभियानामार्फत जा.क्र./मनपा/मुलेप/१६/३२, दिनांक ०१.३.२०१६ रोजी पत्र देवून सदर शाळेस वाटप केलेला निधी कोणत्या कारणाकरीता वितरीत केला याचा तपशिल उपलब्ध करून देण्यात यावा असे पत्र देण्यात आले.

त्याची प्रत कार्यवाहीस्तव कार्यक्रम अधिकारी सर्व शिक्षा अभियान, नागेश्वरवाडी यांना देण्यात आली. तथापि शिक्षण विभागाने माहिती उपलब्ध करून दिली. करिता पुनश्च शिक्षणाधिकारी व कार्यक्रम अधिकारी सर्व शिक्षा अभियान जा.क्र.मनपा/मुलेप/१६/३७ दिनांक ०९.३.२०१६ रोजी तात्काळ माहिती देण्याविषयी कळविण्यात आले. तद्नंतर दिनांक ०३.०२.२०१६ रोजी सर्व शिक्षा अभियान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार संबंधित शाळेस विविध कामासाठी रक्कम रू.३,१३,६८४/- सन २०१३-१४ मध्ये व रक्कम रू.३,१३,७४०/- सन २०१४-१५ या कालावधीत वितरीत केलेले आहे. महानगरपालिकेकडून दिल्या जाणा-या अनुदानाची माहिती शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेली नाही.

१. महाराष्ट्र नगरपरिषद १९७१ चे नियम ३२ अन्वये रोखकिर्द ठेवणे बंधनकारक आहे व ती दररोज लिहून बंद करणे आवश्यक आहे असे असतांना सुध्दा शाळेत झालेल्या आर्थिक व्यवहाराची नोंद उपलब्ध न होणे ही बाब अत्यंत गंभीर आहे.

२. दिनांक २६.२.२०१४ रोजी ३३,७५०/- रू.पासबुकवर मुलींच्या स्व-संरक्षण प्रशिक्षणासाठी जमा झाल्याची नोंद तपासणीत आढळून आली. रोजकिर्द नोंदणीनुसार

| | | |
|---|---|---|
| १. | संरक्षण प्रशिक्षणासाठी ७५ रू.x३० मुली x१० दिवस | = २२५००/- |
| २. | बॅनर | = ५००/- |
| ३. | फोटो २०x१५ | = ३००/- |
| ४. | प्रमाणपत्र ७५x३.५० | = २६३/- |
| ५. | मुलींसाठी मानधन ११५x ७५ रू. | = ८६२५/- |
| | **एकूण रक्कम रू.** | **= ३२,१८८/-** |

व उर्वरीत रक्कम रू.१५६२/- चेक नं.=५५५४२६/-, दिनांक १८.३.२०१४ अन्वये शासनास परत पाठविण्यात आले.

उपरोक्त बाबत मुलींसाठी वाटप करण्यात आलेल्या मानधनावर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी मानधन वाटप रजिस्टर लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे मानधन वाटपाबाबत पूर्णपणे ताळमेळ घेता आलेला नाही.

२. RMSA अंतर्गत प्राप्त अनुदानातून वेळोवेळी विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यात आल्याचे आढळून आले. तथापि साहित्य वितरणाचे रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध न झाल्यामुळे साहित्य वाटपाबाबत खात्री करता आलेली नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक १४२ (२) अन्वये भांडार जमा रोजकिर्द रजिस्टर (नमुना क्रमांक १०९) भांडार रोजकिर्द (नमुना क्र.११०) भांडार खाते वही (नमुना क्र.१११) बाबत रजिस्टर ठेवणे आवश्यक असतांना देखील अभिलेखे न ठेवणे ही बाब गंभीर स्वरूपाची व संशयास्पद आहे.

३. साहित्य प्राप्त झाल्याबाबत (D.C.) वर कोणत्याही कर्मचा-यांची स्वाक्षरी नाही.

४. केंद्रामध्ये देखभाल दुरूस्ती अंतर्गत कामे करीत असतांना काही प्रकरणात कामास शालेय व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही. ही बाब गंभीर स्वरूपाची आहे व नियमबाह्य काम करून घेण्यात आल्याची निर्देशक आहे.

५. दिनांक ७.१२.२०१५ रोजी voucher No.२२ अन्वये वॉचमन खोलीचा दरवाजा पट खरेदी व मजुरीसह ज्योतीबा झुंबडे यांना चेक नं ३२८६१३ अन्वये २४००/- रू. देण्यात आले. तथापि त्यास मालमत्ता विभागाची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच शाळेच्या हद्दीत निवास करीत असतांना १) श्री.दिलीप पंडीत जाधव २) श्री.आनंद वाघमारे ह्या दोन्हीही वॉचमनच्या पगारातून HRA कपात होणे आवश्यक असतांना ती कपात होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे ही बाब नियमबाह्य आहे.त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे.

६. किशोरी उत्कर्ष मंचसाठी दिनांक ८.४.२०१३ रोजी रक्कम रू.१०,०००/- प्राप्त झ ाल्याचे पासबुक नोंदणी वरून आढळून आले. त्याचा खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे दर्शविण्यात आला.

a)१) Voucer No.५७/१,श्रीमती शिवानी कुलकर्णी यांना समुपदेशनासाठी ८.१०.२०१३ रोजी २५००/- रू. दिल्याची नोंद आहे. तथापि voucher वर दिनांकाच्या ठिकाणी खाडाखोड करून पेनाने ८.४.२०१३ अशी नोंद केलेली आहे. सदरची रक्कम कधी प्रदान करण्यात आली याचा बोध होत नाही. अनुपालन उपलब्ध होईपर्यंत सदरची रक्कम आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

a)२) Voucher No ५७/२ नुसार श्रीमती भालेराव सुरेखा व इतर यांना १९.४.२०१३ राजी सर्वेक्षण मानधन, शिक्षण प्रवासभत्ता व फॉर्म छपाईसाठी २०००/- रू. देण्यात आल्याची नोंद आहे. तथापि अभिलेखे तपासणीस उपलब्ध झालेले नाही.

a)३) Voucher No.५७/३ नुसार श्रीमती तुपे सुरेखा यांना २०.४.२०१३ रोजी चहापान व इतर खर्चासाठी २०००/- रू. दिल्याची नोंद आहे. तथापि सदरील चहापान कोणत्या दिवसासाठीच्या कार्यक्रमासाठी करण्यात आले व किती जणांसाठी केले याबाबत कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे संपूर्ण खर्च अमान्य करणे योग्य.

a)४) Voucher No.५७/४ नुसार दिनांक २१.४.२०१३ रोजी तुकाराम कवडे यांना बैठक व्यवस्था/ चहापान व स्टेशनरी खर्चासाठी रू.२५००/- देण्यात आल्याची नोंद आहे. तथापि सदरील कार्यक्रमाबाबत व स्टेशनरी खरेदी व वाटपाबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध करून न दिल्यामुळे संपूर्ण खर्च अमान्य करण्यात येतो. रक्कम वसूलीस पात्र.

उपरोक्त a(१) ते a(४) बाबत संबंधिताकडून रक्कम रू.१००००/-चा संपूर्ण भरणा करून घेणे योग्य.

७. पासबुकवरील नोंदणीनुसार दिनांक २४.१.२०१४ रोजी voucher no.१९ नुसार SMDC कडून ६०००/- रू.केंद्रीय माध्यमिक शाळेl प्राप्त झाले. प्राप्त रकमेतून अ.क्र.२० नुसार धनादेश क्रमांक ५५५४२१ नुसार ४०००/- काढण्यात आले व अ.क्र.२ २१ वर cash paid to mr.Javed २०००/- अशी नोंद आहे.

तथापि रोजकिर्दवर खालील प्रमाणे खर्च दाखविण्यात आला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | १३६० =०० | दिनांक १५.२.२०१४ | भोजन खर्च |
| २. | १४४०=०० | दिनांक १५.२.२०१४ | लेखन साहित्य व फोटो. |
| ३. | १२००=०० | दिनांक १५.२.२०१४ | व्यवस्थापन समिती सभा खर्च. |
| ४. | १७००=०० | दिनांक ०५.३.२०१४ | मार्गदर्शक मानधन. |
| | **५७००=००** | **एकूण खर्च रक्कम.** | |

उपरोक्त पासबुक नोंदणी व रोजकिर्द रजिस्टर नोंदणी यात तफावत आढळून येते. झालेला खर्च अमान्य करण्यात येवून रक्कम वसूलीस पात्र.

८. दिनांक १९.१२.२०१४ रोजी व्हाऊचर नं.९५ अन्वये शाळा अनुदानातून श्री.मनोज नागरे यांना वर्तमानपत्र बीलाकरीता २०००/- रू. अदा केल्याची नोंद आहे. तथापि सदरील खर्च कोणत्या कोणत्या कालावधीसाठी व कोणत्या वर्तमान पत्रासाठी देण्यात आला याबाबत नोंद नाही. अदा केलेल्या रकमेबाबत खात्री करता आलेली नाही.

१. उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणेबाबत सूचना करूनही लेखापरीक्षण पथकास प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

२. दिनांक २६.२.२०१४ रोजी मुलींच्या स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी अनुदान रक्कम रू.३३,७५०/- मधून रोजकिर्द पान क्र.२६ वर खर्च वजा जाता उर्वरीत रक्कम रू.१५६२/- धनादेश क्र.५५५४२६/- दिनांक १८.३.२०१४ रोजी शासनास परत पाठविल्याची नोंद आहे. तथापि रोजकिर्द रजिस्टर पान क्र.३० वर परत धनादेश क्र.५५२४२६ द्वारे वेगळ्या दिनांकाची म्हणजेच २६.५.२०१४ रोजी १५६२/- रू. पाठविल्याची परत नोंद केलेली आहे. एकच रक्कम एकाच चेकमधून शासनास परत पाठविल्याची नोंद करून रक्कम रू.१५६२/- चा अपहार झाल्याचे निदर्शनास येते. संबंधिताकडून रक्कम रू.१५६२/- चा भरणा करून घेणे योग्य.

३. व्हाऊचर नं. १ व २ दिनांक १४.११.२०१३ रोजी शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षण मानधन म्हणून श्री.सचिन गायकवाड व श्री.किशोर कुंभारे यांना प्रत्येकी १२५००/- असे एकूण २५,०००/- अदा केल्याचे आढळून येते. तथापि व्हाऊचर रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधिताच्या स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाही ही बाब संशयास्पद आहे.

४. दिनांक ३०.४.२०१४ रोजी स्वच्छतागृह बांधकाम करण्यासाठी जास्तीचा खर्च झाला असल्याचे दर्शवून वाढीव रक्कम रू.६०,५१५/- अदा करण्यात आले. दिनांक ९.४.२०१४ रोजीच्या मा.उपअभियंता यांच्या अभिप्रायानुसार सन २०१०-११ या वर्षात स्वतंत्र स्वच्छतागृहाच्या बांधकामासाठी झालेल्या वाढीव खर्चाबाबत शालेय समिती तथा सचिव यांनी रितसर ठराव घेवून संबंधित लेबर ठेकेदारास रक्कम अदा करणेबाबतची कार्यवाही करावी असे नमूद असतांना समितीची मान्यता घेण्यात आल्याबाबतचे अभिलेख, मोजमाप पुस्तिका, मंजूरी संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेली नाही.

५. मुख्य रोखकिर्द पान क्र.१८ वर दिनांक २४.५.२०१४ वर श्री.विजय सरोदे यांना विद्युती करणासाठी ९०००/- देण्यात आले. परंतू व्हाऊचर क्र.१० नुसार मेघा इलेक्ट्रीकल्स सर्व्हिस यांच्याकडून इलेक्ट्रीकल सामान खरेदीसाठी रक्कम रू. ९०००/- अदा करण्यात आले. तथापि देयकावर दिनांक / देयक क्रमांक नाही. विद्युती करणाचे काम अधिकृत ठेकेदाराकडून करून घेण्यात आल्याचे पुरावे लेखापरीक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. देयकावर प्रती नग खर्च दर्शविण्यात आलेला नसून आर्थिंगचे काम करून घेण्यासाठी किती केबल वापरात आणली याचा स्पष्ट उल्लेख नाही. त्यामुळे झालेल्या कामाबाबत साशंकता निर्माण होते.

६. व्हाऊचर क्र.१७ अन्वये सचिन गायकवाड यांच्याकडून तार कुंपण करून घेण्यात आले. त्यासाठी रक्कम रू.७०,५००/- संबंधितास अदा करण्यात आले. परंतू सदरील काम करून घेण्याबाबतची मंजूरी संचिका व शालेय व्यवस्थापन समितीची मान्यता घेतली असल्याबाबतचे लेखे, मोजमाप पुस्तिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे संपूर्णपणे लेखापरीक्षण करता आलेले नाही.

७. व्हाऊचर क्र.१४ अन्वये श्री.जावेद पठाण यांना दिनांक ५.११.२०१४ रोजी ५०००/- रू. सुरक्षागेट दुरूस्ती व पत्रा लावण्यासाठी देण्यात आल्याचे आढळून येते. तथापि त्यानंतर लगेचच २ महिन्यांनी परत व्हाऊचर नं.१८ अन्वये श्री.जावेद पठाण यांना २.१.२०१५ रोजी परत त्याच कामासाठी १०,०००/- रू. अदा करण्यात आले.

उपरोक्त प्रकरणात दोन महिन्यातच सदरील काम पुन्हा करून घेण्याची वेळ येणे म्हणजे काम निकृष्ठ झाले असल्याचे निदर्शनास येते. करिता संपूर्ण खर्च संबंधिताकडून वसूल करणे योग्य.

८. व्हाऊचर क्र.१९ अन्वये रामकिशन कपाळे यांना पाण्याची टाकी -२ नग पाईप लाईन टाकण्यासाठी रक्कम रू.४५,२००/- व स्वच्छतागृह व नविन भांडे बसविण्यासाठी रक्कम रू.३५,२००/- असे एकूण रक्कम रू.८०,५००/- अदा करण्यात आल्याची नोंद आहे. महाराष्ट्र शासन निर्णय १९७१ चे नियम क्रमांक १५९ अन्वये बांधकामाच्या पुढील कार्यपध्दतीचे पालन केले पाहिजे.

१. नियम १६० मध्ये नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिका-याकडून प्रशासनिक मंजूरी घेतली पाहिजे.

२. नियम १६१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिका-याकडून नकाशे व अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेण्यात आलेली नाही.

३. नियम १६२ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे सक्षम प्राधिका-याकडून अंतीम मंजूरी घेतली पाहिजे. सदरील बांधकाम करीत असतांना उपरोक्त नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट दिसून येते. मोजमाप पुस्तिका, देयक मंजूरी संचिका, शालेय व्यवस्थापन मान्यता इ. अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. मंजूरी न घेता करण्यात आलेले बांधकाम नियमबाह्य आहे.

१७. दिनांक १९.११.२०१३ रोजी ममता बुक सेन्टर यांना बिल क्र.२४५ व बिल क्र.२४९ अन्वये स्टेशनरी व इतर साहित्य खरेदी साठी एकूण १२,५००/- रू. अदा करण्यात आल्याची नोंद देयकावर आहे.

तथापि किर्द रजिस्टर व पासबुक मध्ये दिनांक १९.११.२०१३ रोजी बँकेतून रक्कम रू.१३,५००/- काढून रजिस्टरवर १३,५००/- रू. रकमेचा खर्च दाखविण्यात आलेला आहे. देयकान्वये १२,५००/- चा खर्च झाल्यानंतर एकूण रक्कम १३,५००/- मधून १२,५००/- वजा जाता रक्कम रू.१०००/- चा बँकेत परत भरणा करणे आवश्यक असतांना संपूर्ण खर्च झाल्याची नोंद दर्शविण्यात आलेली आहे. रक्कम रू.१०००/- चा अपहार झाल्याचे प्राप्त अभिलेख्यावरून आढळून येते. संपूर्ण रक्कम त्वरीत संबंधिताकडून वसूल करून अनुपालन दर्शवावे.

१८. दिनांक २१.०१.२०१५ रोजी व्हाऊचर नं.२१ ए,बी,सी अन्वये अनुक्रमे ४३०४० + ३६५०० +४,५०० असे एकूण ८४,०४०/- अल्पोपहारासाठी खर्च करण्यात आल्याचे आढळून आले. तथापि सदरचा खर्च कोणत्या कार्यक्रमासाठी केला, एवढ्या मोठया प्रमाणात केलेल्या खर्चास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्याबाबतची संचिका अभिलेखे लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून न दिल्यामुळे झालेल्या खर्चाबाबत खात्री करता आलेली नाही. संपूर्ण खर्च आक्षेपाधिन करण्यात येतो.

करिता, अहवाल माहितीस्तव सादर.

# भाग - ब

# *चौकशी अहवाल*

## औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांचे ग्राहकाकडून वसूल केलेल्या रकमांचा स्वतंत्र बँक खात्यात जमा केल्याबाबतचा तपासणी अहवाल
## १ सप्टेंबर २०१४ ते ३१ डिसेंबर २०१५

**प्रस्तावना :**

मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि. यांच्यामार्फत पाणीपुरवठ्याच्या संबंधी ग्राहकाकडून वसूल केलेल्या रकमा संबंधित कंपनीने स्वतंत्र बँक खात्यात जमा केल्याबाबतची खात्री करून तपासणी अहवाल सादर करण्याबाबत जा.क्र.मनपा/मुलेप/२०१६/०९, दिनांक १४.१.२०१६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते. लेखा परीक्षण विभागातील सदरील कामासाठी नियुक्त पथकाने औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि.यांच्या एन-१ सिडको येथील कार्यालयात जावून संबंधितांनी उपलब्ध करून दिलेल्या सॉफ्ट कॉपी नुसार तपासणी केलेली आहे. संबंधित कंपनीने सादर केलेली माहिती आधारे लेखापरीक्षण पथकाचे खालील प्रमाणे तपासणी बाबत आढळून आलेल्या त्रुटी बाबत सविस्तर अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. औरंगाबाद शहरात खाजगी कन्सेशनर मार्फत पाणीपुरवठा करणे. तसेच नागरीकांकडून केलेल्या पाणीपुरवठ्याच्या संबंधाने असलेली देयके प्रत्येक दोन महिन्याला नागरीकांना निर्गमित करणे,नागरीकांकडून प्राप्त रकमांचा भरणा करण्यासाठी स्वतंत्र ग्राहक केंद्र उभारणे इ.माध्यमातून कंपनीचे काम सुरू आहे. कंपनीने ग्राहक सेवा केंद्रातून जमा केलेल्या रकमा एका स्वतंत्र बँक खात्यात जमा करणे बाबत संबंधितांशी झालेल्या करारानुसार ठरलेले आहे. प्रत्यक्षात कंपनीने स्वतंत्र बँक खाते उघडतांना Axis बँकेत स्वत:च्या नावाने खाते उघडलेले आहे. ज्याचा क्रमांक ९१४०२००३३६९०८८९ असा आहे. या सोबतच I.D.B.I. बँकेत आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नांवे खाते क्र.०३७६१०४००००००१७० या क्रमांकाने कलेक्शन अकाऊन्ट म्हणून खाते उघडण्यात आलेले आहे. Axis बँकेत औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लि. मार्फत रोख रकमेचा भरणा केला जातो तर I.D.B.I. बँकेत धनादेशाद्वारे प्राप्त रकमांचा भरणा केलेला दिसून आला.

सदरील बाबतीत कलेक्शन अकाऊन्ट म्हणून एकच खाते महानगरपालिकेच्या नांवे असणे आवश्यक आहे आणि याच खात्यात औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी रोख व धनादेशाद्वारे प्राप्त पाणीपट्टीच्या रकमा जमा करणे कंपनीस बंधनकारक आहे.

२. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी त्यांच्या नावाने Axis बँकेत भरणा करावयाच्या रकमेसाठी एका खाजगी एजन्सीची (C.M.S.) नियुक्ती केलेली आहे. संबंधित एजन्सी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीच्या ग्राहक सेवा केंद्रावरून रोख रकमा स्विकारून Axis बँकेत भरणा करते. सदरील एजन्सीमार्फत औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांना दिलेल्या सेवेबद्यल प्रतिमाह मोबदला C.M.S.कंपनीस Axis बँकेतून परस्पर दिलेला आहे. अशा रकमा परस्पर देतांना औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी ही बाब औरंगाबाद महापालिकेच्या निदर्शनास आणून दिलेली नाही.

कलेक्शन अकाऊन्ट मधून परस्पर C.M.S. कंपनीस सप्टेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१४ या १५ महिन्यात रक्कम रू.६,२८,३८१/- अदा करण्यात आलेले आहेत. तसेच कंपनीमार्फत यापुढेही संबंधितांना रकमा अदा करण्याबाबतची कार्यवाही चालुच आहे. या संबंधी महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान कंपनीमार्फत वसूल करून महापालिका फंडात जमा करण्याची कार्यवाही होणे गरजेचे आहे.

3. Axis बँकेतील नोंदी तपासल्या असता असे निदर्शनास आले की, दिनांक २३.९.२०१४ रोजी रू.४,८९,१४०/- आणि दिनांक २५.९.२०१४ रोजी रू.६५,५५५/- असे एकूण रू.५,५४,६९५/- रक्कम बँकेने C.M.S. कंपनीस त्यांनी सदरील खात्यात जास्तीची रक्कम भरणा केल्याचे दर्शवून परस्पर रोख रक्कम गोळा करून बँकेत भरणा करणा-या कंपनीस अदा केलेली आहे.

कलेक्शन अकाऊन्ट मधून औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी तसेच औरंगाबाद महानगरपालिका यांची पूर्व परवानगी न घेता कॅश गोळा करणा-या एजन्सीला बँकेने परस्पर रकमा अदा करणे ही बाब आक्षेपार्ह असून महानगरपालिकेचे तसेच औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीचे नुकसान करणारी ठरते. या संबंधी बँकेकडून खुलासा मागवून पुनश्च अदा केलेल्या रकमा सदरील खात्यात जमा करण्याबाबत बँकेमार्फत कार्यवाही करणे उचित ठरते.

४. Axis बँकेतील नांवे पडलेल्या नोंदीमध्ये एक अशीही नोंद आहे की, दिनांक १६.१.२०१५ रोजी S.B.I. बँकेचा धनादेश क्र.१६४०८६ अन्वये रू.९,६००/- ही रक्कम P.T. वजावट झालेली आहे. ?

औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने Axis बँकेतील खाते स्वतःच्या नांवे उघडल्याने त्या खात्यात महानगरपालिकेच्या शहरातील विभागाकडून जमा केलेल्या रकमेतून P.T. चा धनादेश निर्गमित करणे ही बाब अयोग्य आहे. या संबंधी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी सदरील रक्कम महानगरपालिकेकडे तातडीने वर्ग करणे आवश्यक आहे.

५. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी Axis बँकेत जमा केलेल्या रकमा वेळोवेळी महानगरपालिकेने I.D.B.I. बँकेत उघडलेल्या कलेक्शन अकाऊन्ट मध्ये तातडीने/ विनाविलंब जमा करणे किंवा ट्रान्सफर करणे आवश्यक आहे. Axis बँकेतून औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी रकमा ट्रान्सफर करतांना कमीत कमी एक ते जास्तीत जास्त २८ दिवस विलंबाने रकमा ट्रान्सफर केलेल्या आहेत. त्याच नुसार ट्रान्सफर केलेल्या तारखेस शिल्लक असलेली संपूर्ण रक्कम ट्रान्सफर केलेली नाही.

उक्त प्रकरणी Axis बँकेतून I.D.B.I बँकेत ट्रान्सफर करण्यात आलेल्या रकमा, त्याचा विलंब कालावधी व शिल्लक रक्कम इत्यादींचा माहेवार तपशिल परिशिष्ट - अ मध्ये या सोबत अवलोकनास्तव जोडण्यात येत आहे. Axis बँकेतील रकमा पुन्हा I.D.B.I बँकेत ट्रान्सफर करणे असे करण्याऐवजी औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने महानगरपालिकेच्या I.D.B.I. बँकेतील कलेक्शन अकाऊन्ट मध्येच रकमा जमा करणे आवश्यक आहे. जेणे करून महानगरपालिकेच्या खात्यात सर्व रक्कम एकत्रित रित्या जमा असल्यामुळे बँकेकडून जमा देय असलेले रकमेवरच फायदे , व्याज आदी महानगरपालिकेस प्राप्त होतील.

६. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने लेखापरीक्षण विभागाच्या पथकास उपलब्ध करून दिलेल्या माहितीपैकी पाणीपट्टी ग्राहकाकडून एकूण वसूल केलेली रक्कम बँकेत भरणा केलेली रक्कम व शिल्लक रक्कम इत्यादींचा ताळमेळ घेण्यात आला. त्यामध्ये सप्टेंबर २०१४ ते मार्च २०१५ पर्यंत रक्कम रू. ५,१७,३३२/- चा फरक निदर्शनास आलेला आहे. तसेच एप्रिल २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीतील फरक रक्कम रू. ७,८०,७९५/- इतका आहे.

औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने उपलब्ध करून दिलेली माहितीतील एकूण वसूल केलेली रक्कम व बँकेत भरणा केलेली एकूण रक्कम वजा जाता शिल्लक रक्कम वेळोवेळी कलेक्शन अकाऊन्ट मध्ये भरणा करणे आवश्यक होते. तथापि तसे न झाल्याने सप्टेंबर -२०१४ ते डिसेंबर २०१५ पर्यंत फरकाची रकमेत वाढ झालेली आहे. सद्यस्थितीत रू. १२,९८,१२७/- महानगरपालिका फंडात जमा करणे आवश्यक आहे.याबाबतचे विवरण परिशिष्ट - ब मध्ये या सोबत देण्यात येत आहे.

७. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांना महानगरपालिकेच्या वतीने पाणीपट्टी संदर्भात नागरीकांकडून कर वसूली करून स्वतंत्र खात्यात जमा करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांना नागरीकां कडील थकीत पाणीपट्टी व चालू मागणी या बाबतच्या रकमा वॉर्ड कार्यालयातील अभिलेख्यांनुसार देण्यात आलेल्या आहेत. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांच्या मार्फत करण्यात येत असलेली वसूलीच्या पावत्यांमध्ये पाणीपट्टी कोणत्या कालावधीची आहे याचा उल्लेख नाही. तसेच थकीत रकमा प्रथम वसूल करून नंतरच चालू मागणीची पावती देणे अभिप्रेत आहे.

कराची वसूली करतांना प्रथमतः थकबाकीदाराकडून थकीत रकमांची वसूली करणे आवश्यक असते. तद्नंतर चालू मागणीची वसूली होणे अभिप्रेत आहे. असे असतांना औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी महानगरपालिकेकडे सादर केलेल्या कंपनीच्या हिश्श्याची रक्कम मागणी विवरणात चालू मागणीतील हिश्श्याची मागणी केली आहे. परंतू संबंधित ग्राहकाकडे थकीत असलेली पाणीपट्टी तशीच ठेवण्यात आलेली आहे. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांना थकीत रकमांच्या वसूलीवर स्वतंत्रपणे औरंगाबाद महानगरपालिकेने वसूलीच्या प्रमाणात Insentive करारनाम्यात मंजूर केलेला आहे.

८. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी ग्राहकाकडून वसूल केलेली रक्कम तसेच महानगरपालिकेकडे कंपनी नागरीकांकडील वसूल रकमेचा हिस्सा याबाबत मागणी करतांना प्रति माह दिलेली आकडेवारी मध्ये तफावत आहे. सप्टेंबर -२०१४ ते डिसेंबर -२०१५ या कालावधीतील उक्त प्रमाणे वसूल रकमा व मागणी केलेली हिश्याची रक्कम यातील तफावत रक्कम रू. **१,२०,१६,७४८/-** इतका आहे.

सदरील मुद्याबाबत औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी वसूल केलेल्या रकमेवरच महानगरपालिकेकडे त्यांच्या हिश्श्याच्या रकमेबाबत मागणी नोंदविणे आवश्यक आहे. तथापि उक्त प्रकरणी लेखा शाखेमार्फत शहानिशा अंती जादा रक्कम अदा केलेली नसल्याची खात्री करणे योग्य ठरते. याबाबतचे विवरण परिशिष्ट - क मध्ये या सोबत देण्यात येत आहे.

**निष्कर्ष :**

१. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनीचे ग्राहकांकडून वसूल केलेल्या पाणीपट्टीच्या रकमा महापालिकेच्या नांवे I.D.B.I. बँकेत रोख व धनादेशाद्वारे जमा करणे आवश्यक आहे, वा कंपनीस बंधनकारक आहे.

२. महापालिकेस कोणतीही पूर्वसूचना न देता, City Water Utility Company यांनी त्यांच्या नांवे Axis Bank मध्ये खाते चालू केले असून एका खाजगी एजन्सी C.M.S. द्वारे रक्कम परस्पर भरणा करत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून नियमबाह्य आहे.

३. सदर C.M.S. Company महापालिकेकडून १५ महिन्याच्या कालावधीत रू.६,२८,३८९/- एवढी रक्कम अदा केली आहे. महापालिकेचे यामुळे ६,२८,३८१/- एवढ्या रकमेचे नुकसान झाले आहे. रक्कम परस्पर वर्ग करणे हे निश्चित नियमबाह्य आहे. या व्यतीरीक्त C.M.S. कंपनीस कॅश कलेक्शन साठी अदा केलेली रक्कम सुध्दा त्वरीत महानगरपालिकेच्या खात्यात भरणा करण्यात यावी.

४. C.M.S. वर होणारा खर्च Aurangabad City Water Utility कंपनी यांनी स्वतः करावा.

५. Collection Account मधून P.T. धनादेश निर्गमित करणे योग्य नाही. (अशा प्रकारचे इतर बाबींची तपासणी करण्यात यावी.)

६. Axis Bank मधून पाणीपट्टीची वसूल जमा रक्कम ही I.D.B.I. बँकेत विलंबाने जमा झालेली असून यामुळे महापालिकेस बँकेकडून जमा रकमेवर प्राप्त होणा-या व्याज रकमेचे नुकसान झाले आहे.

७. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीने त्वरीत फरकाची रक्कम माहे Sept.२०१४ ते Dec. २०१५ रक्कम रू.१२,९८,१२७/- त्वरीत महापालिकेच्या I.D.B.I. खात्यात जमा करणे योग्य.

८. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलीटी कंपनीने वसूल केलेल्या पावत्यांमध्ये थकीत पाणीपट्टीचा उल्लेख करणे व कालावधी नमूद करणे आवश्यक आहे. त्यानुसार Aurangabad City Water Utility कंपनी तर्फे निर्गमित होणा-या पावत्यांवर उल्लेख नाही ही बाब भविष्यात मनपाचे आर्थिक नुकसान करणारी आहे. त्यामुळे त्वरीत पाणीपट्टी वसूली पावतीत दुरूस्ती व्हावी.

९. Aurangabad City Water Utility कंपनी यांनी वसूल केलेल्या रकमेवरच औरंगाबाद महानगरपालिकेकडे त्यांच्या हिश्श्याची रकमेची मागणी करणे आवश्यक आहे.

१०. औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी यांनी ग्राहकाकडून वसूल केलेली रक्कम तसेच महानगरपालिकेकडे कंपनी नागरीकांकडील वसूल रकमेचा हिस्सा याबाबत मागणी करतांना प्रति माह दिलेली आकडेवारी मध्ये तफावत आहे. सप्टेंबर -२०१४ ते डिसेंबर -२०१५ या कालावधीतील उक्त प्रमाणे वसूल रकमा व मागणी केलेली हिश्याची रक्कम यातील तफावत रक्कम रू. **१,२०,१६,७४८/-** इतका आहे. तथापि प्रकरणी लेखा शाखेमार्फत शहानिशा अंती जादा रक्कम अदा केलेली नसल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

**मुख्य लेखापरीक्षक**
महानगरपालिका,औरंगाबाद.

**परिशिष्ट - अ**
**सप्टेंबर -२०१४**

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | ३.९.२०१४ | ३००००० १२३२९२ | -- | -- | -- | -- | |
| २ | ४.९.२०१४ | ७३५०० | -- | -- | -- | -- | |
| ३ | ४.९.२०१४ | -३००००० | -- | -- | -- | -- | रू.३ लक्ष कंपनीने परस्पर काढून घेतले. |
| ४ | ५.९.२०१४ | १५८०७७ | -- | -- | -- | -- | |
| ५ | ६.९.२०१४ | ४१५२३५ | -- | -- | -- | -- | |
| ६ | ८.९.२०१४ | १६९०४२ | -- | -- | -- | -- | |
| ७ | ९.९.२०१४ | ३६६७५५ | -- | -- | -- | -- | |
| ८ | १०.९.२०१४ | १२२९८२ | -- | -- | -- | -- | |
| ९ | ११.९.२०१४ | २६८५३३ | -- | -- | -- | -- | |
| १० | ११.९.२०१४ | ३०५० | -- | -- | -- | -- | |
| ११ | ११.९.२०१४ | ३०५० | -- | -- | -- | -- | |
| १२ | ११.९.२०१४ | ६१०० | -- | -- | -- | -- | |
| १३ | १२.९.२०१४ | २९३४१२ | १२.९.२०१४ | २०००००० | ३०२८ | ९ | |
| १४ | १३.९.२०१४ | ३३४७१० | -- | -- | -- | -- | |
| १५ | १५.९.२०१४ | ६८९५१ | १५.९.२०१४ | ३००००० | १०६६८९ | २ | |
| १६ | १६.९.२०१४ | २९३७९६ | -- | -- | -- | -- | |
| १७ | १७.९.२०१४ | ३२३३४२ | -- | -- | -- | -- | |
| १८ | १९.९.२०१४ | ५३३५०९ | १९.९.२०१४ | ८००००० | ४५७३३६ | २ | |
| १९ | २०.९.२०१४ | ५०२८१० | -- | -- | -- | -- | |
| २० | २२.९.२०१४ | २३८५५०+७८७ ८८० | -- | -- | -- | -- | |
| २१ | २३.९.२०१४ | ६१७२७१ | २३.९.२०१४ | २०००००० | ६०३८४७ | ३ | |
| २२ | २३.९.२०१४ | -४८९१४० | -- | -- | -- | -- | Rev of Excess credit for cms |
| २३ | २५.९.२०१४ | -६५५५५ | -- | -- | -- | -- | CMS adjestment |
| २४ | २६.९.२०१४ | ५०८५१३ | -- | -- | -- | -- | |
| २५ | २७.९.२०१४ | ३९३५७३ | -- | -- | -- | -- | |
| २६ | २९.९.२०१४ | १६०६७५ | २९.९.२०१४ | १०००००० | १११९१३ | ४ | |
| २७ | ३०.९.२०१४ | ३४२४७८ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **६५५४३९१** | | **६१०००००** | | | |

## परिशिष्ट - अ
## ऑक्टोबर -२०१४

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | ४५४३९१ | -- | -- | -- | -- | |
| २ | १.१०.२०१४ | २३९५९० | -- | -- | -- | -- | |
| ३ | ४.१०.२०१४ | ४७६०३५ | -- | -- | -- | -- | |
| ४ | ७.१०.२०१४ | ३४१०५० | ७.१०.२०१४ | १२००००० | ३११०६६ | ८ | |
| ५ | ८.१०.२०१४ | ४७३२५० | -- | -- | -- | -- | |
| ६ | ९.१०.२०१४ | ४२०४८० | -- | -- | -- | -- | |
| ७ | ९.१०.२०१४ | -१७३०९ | -- | -- | -- | -- | Cms-cash charges sept-१४ |
| ८ | १०.१०.२०१४ | ३२७८४१ | १०.१०.२०१४ | १०००००० | ५१५३२८ | २ | |
| ९ | ११.१०.२०१४ | १९७५८३ | -- | -- | -- | -- | |
| १० | १३.१०.२०१४ | ४८२९४६ | -- | -- | -- | -- | |
| ११ | १४.१०.२०१४ | ४६४०२९ | -- | -- | -- | -- | |
| १२ | १६.१०.२०१४ | ४०३३५० | -- | -- | -- | -- | |
| १३ | १७.१०.२०१४ | ३५०५४८ | -- | -- | -- | -- | |
| १४ | १८.१०.२०१४ | ४२६३१४ | १८.१०.२०१५ | २८००००० | ४००९८ | ८ | |
| १५ | २०.१०.२०१४ | २०२६४६ | -- | -- | -- | -- | |
| १६ | २१.१०.२०१४ | ३५२७०५ | -- | -- | -- | -- | |
| १७ | २२.१०.२०१४ | ३५२९९३ | -- | -- | -- | -- | |
| १८ | २५.१०.२०१४ | २०९०६६ | -- | -- | -- | -- | |
| १९ | २७.१०.२०१४ | ८८००० | -- | -- | -- | -- | |
| २० | २८.१०.२०१४ | ४३२७०० | -- | -- | -- | -- | |
| २१ | २९.१०.२०१४ | २१५६१५ | -- | -- | -- | -- | |
| २२ | ३०.१०.२०१४ | ४१५१०० | -- | -- | -- | -- | |
| २३ | ३१.१०.२०१४ | ३२०२६९ | ३१.१०.२०१४ | २२००००० | ४२९१९२ | ११ | |
| | **एकूण** | **७६२९१९२** | | **७२००००००** | | | |

परिशिष्ट - अ
नोव्हेंबर -२०१४

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | ४२९१९२ | -- | -- | -- | -- | |
| २ | १.११.२०१४ | ११९८०२९ | -- | -- | -- | -- | |
| ३ | ३.११.२०१४ | ४३३१६१ | ३.११.२०१४ | ६०००० | ४६०३८२ | २ | |
| ४ | ५.११.२०१४ | ५९३७४५ | ५.११.२०१४ | ५०००० | ५५४१२७ | २ | |
| ५ | ७.११.२०१४ | ८६४८४५ | | | | | |
| ६ | १०.११.२०१४ | ० | १०.११.२०१४ | १४००००० | १८९७२ | ३ | |
| ७ | १२.११.२०१४ | १४९२७६५ | -- | -- | -- | -- | |
| ८ | १३.११.२०१४ | १५६६८७ | -- | -- | -- | -- | |
| ९ | १३.११.२०१४ | -३०३३२ | -- | -- | -- | -- | Cms cash charges for oct-१५ |
| १० | १४.११.२०१४ | १५८३५८ | १४.११.२०१४ | १६००००० | १९६४५० | ३ | |
| ११ | १५.११.२०१४ | २५२७१७ | -- | -- | -- | -- | |
| १२ | १७.११.२०१४ | ४५७१४३ | -- | -- | -- | -- | |
| १३ | १८.११.२०१४ | ११९६०५४ | -- | -- | -- | -- | |
| १४ | १९.११.२०१४ | ६६४१०० | १९.११.२०१४ | १५००००० | २६६४६४ | ४ | |
| १५ | २०.११.२०१४ | ५१४५५१ | | | | | |
| १६ | २१.११.२०१४ | ३९४०४६ | २१.११.२०१४ | ८०००० | ३७५०६१ | २ | |
| १७ | २२.११.२०१४ | ५४८४३१ | -- | -- | -- | -- | |
| १८ | २४.११.२०१४ | २५८४५० | -- | -- | -- | -- | |
| १९ | २५.११.२०१४ | ६६५४७४ | -- | -- | -- | -- | |
| २० | २६.११.२०१४ | ३१०२७० | -- | -- | -- | -- | |
| २१ | २७.११.२०१४ | ४६६४६९ | २७.११.२०१४ | २१००००० | ५२४१५५ | ६ | |
| २२ | २८.११.२०१४ | ५७१५२० | -- | -- | -- | -- | |
| २३ | २९.११.२०१४ | ५६५७५६ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **१०१६१४३१** | | **८५०००००** | | | |

परिशिष्ट - अ
डिसेंबर -२०१४

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | १६६१४३१ | -- | -- | -- | -- | |
| २ | ०१.१२.२०१४ | ३८६९८१ | -- | -- | -- | -- | |
| ३ | ०२.१२.२०१४ | ६६८०५४ | २१.१२.२०१४ | २०००००० | ७१६४६६ | ४ | |
| ४ | ०३.१२.२०१४ | ७४९४९३ | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०४.१२.२०१४ | ५७४८२९ | -- | -- | -- | -- | |
| ६ | ०५.१२.२०१४ | ६२४२८७ | -- | -- | -- | -- | |
| ७ | ०६.१२.२०१४ | ९६८८५० | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०८.१२.२०१४ | ५९१७२५ | -- | -- | -- | -- | |
| ९ | ०८.१२.२०१४ | -३२९६४ | -- | -- | -- | -- | Cms-cash charges Nov-१४ |
| १० | ०९.१२.२०१४ | ३६१२२७ | -- | -- | -- | -- | |
| ११ | ०९.१२.२०१४ | ५५५४६५ | -- | -- | -- | -- | |
| १२ | १०.१२.२०१४ | १०३५४८० | -- | -- | -- | -- | |
| १३ | ११.१२.२०१४ | १००११२८ | ११.१२.२०१४ | ६०००००० | ११४५९८६ | ८ | |
| १४ | १२.१२.२०१४ | ८५९८१४ | -- | -- | -- | -- | |
| १५ | १३.१२.२०१४ | १२१८०१९ | -- | -- | -- | -- | |
| १६ | १५.१२.२०१४ | ५०५६७५ | -- | -- | -- | -- | |
| १७ | १६.१२.२०१४ | ९३१०१८ | -- | -- | -- | -- | |
| १८ | १७.१२.२०१४ | ६८७४१३ | -- | -- | -- | -- | |
| १९ | १८.१२.२०१४ | ७९९२८९ | १८.१२.२०१४ | ६१००००० | ४७२१४ | ६ | |
| २० | १९.१२.२०१४ | ७८४६३१ | -- | -- | -- | -- | |
| २१ | २०.१२.२०१४ | १०४१३१२ | -- | -- | -- | -- | |
| २२ | २२.१२.२०१४ | ९६९२२८ | २२.१२.२०१४ | २०००००० | ८४२३८५ | ३ | |
| २३ | २३.१२.२०१४ | १११६१३३ | -- | -- | -- | -- | |
| २४ | २४.१२.२०१४ | १०१६४९७ | -- | -- | -- | -- | |
| २५ | २६.१२.२०१४ | ११२९२५६ | २६.१२.२०१४ | ३०००००० | ११०४२७१ | ३ | |
| २६ | २७.१२.२०१४ | ३४९५८२७ | -- | -- | -- | -- | |
| २७ | २९.१२.२०१४ | ६३५२४० | -- | -- | -- | -- | |
| २८ | ३०.१२.२०१४ | १२८१२४० | -- | -- | -- | -- | |
| २९ | ३१.१२.२०१४ | १०८२२९७ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **२६६९८८७५** | | **१९१००००० ** | | | |

परिशिष्ट - अ
जानेवारी -२०१५

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | ७५९८८७५ | -- | -- | -- | -- | |
| २ | ०१.१.२०१५ | ११९५०७८ | -- | -- | -- | -- | |
| ३ | ०२.१.२०१५ | ८६७७८२ | -- | -- | -- | -- | |
| ४ | ०३.१.२०१५ | १०११२८८ | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०५.१.२०१५ | ८७६४१६ | ०५.१.२०१५ | १०००००० | १५४९४३९ | ९ | |
| ६ | ०६.१.२०१५ | १२१६३९० | -- | -- | -- | -- | |
| ७ | ०७.१.२०१५ | ११८७३६२ | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०८.१.२०१५ | १२३२७१६ | -- | -- | -- | -- | |
| ९ | ०९.१.२०१५ | १०८८२१० | ०९.१.२०१५ | ५०००००० | १२७४११७ | ४ | |
| १० | १०.१.२०१५ | १३७०१६६ | -- | -- | -- | -- | |
| ११ | १०.१.२०१५ | -४८३६२ | -- | -- | -- | -- | Cms cash charges dec-१४ |
| १२ | १२.१.२०१५ | ६८१२०० | -- | -- | -- | -- | |
| १३ | १३.१.२०१५ | १०२३०३८ | -- | -- | -- | -- | |
| १४ | १४.१.२०१५ | ८५९४५० | १४.१.२०१५ | ५०००००० | १५९६०९ | ५ | |
| १५ | १५.१.२०१५ | ६२४९४९ | -- | -- | -- | -- | |
| १६ | १६.१.२०१५ | १४२६४० | -- | -- | -- | -- | |
| १७ | १६.१.२०१५ | -९६०० | -- | -- | -- | -- | A/c-P-T.(SBI) cheque १६४०८६ |
| १८ | १७.१.२०१५ | ९५७५०९ | -- | -- | -- | -- | |
| १९ | १९.१.२०१५ | ३७८०७० | -- | -- | -- | -- | |
| २० | २०.१.२०१५ | ८२९६१९ | -- | -- | -- | -- | |
| २१ | २१.१.२०१५ | ६७९००० | -- | -- | -- | -- | |
| २२ | २२.१.२०१५ | ७३५००० | -- | -- | -- | -- | |
| २३ | २३.१.२०१५ | ५४८९९७ | -- | -- | -- | -- | |
| २४ | २४.१.२०१५ | ६९४६१४ | -- | -- | -- | -- | |
| २५ | २७.१.२०१५ | ३०१६६८ | -- | -- | -- | -- | |
| २६ | २७.१.२०१५ | १८५० | -- | -- | -- | -- | |
| २७ | २८.१.२०१५ | ६८९१३३ | २८.१.२०१५ | ६०००००० | ७३३०५८ | ११ | |
| २८ | २९.१.२०१५ | ९२७२९९ | -- | -- | -- | -- | |
| २९ | ३०.१.२०१५ | ७१७०५८ | -- | -- | -- | -- | |
| ३० | ३१.१.२०१५ | ६४३९१७ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **३४६४५८७३** | | **२६०००००० ** | | | |

परिशिष्ट - अ
फेब्रुवारी -२०१५

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | ३०२१३३२ | -- | -- | -- | -- | |
| २ | ०२.२.२०१५ | ६०५९६९ | -- | -- | -- | -- | |
| ३ | ०३.२.२०१५ | ७३५५५० | -- | -- | -- | -- | |
| ४ | ०४.२.२०१५ | ७३३५७९ | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०५.२.२०१५ | ७८३५६० | -- | -- | -- | -- | |
| ६ | ६०.२.२०१५ | ७५४००० | -- | -- | -- | -- | |
| ७ | ०७.२.२०१५ | १०७८९३६ | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०७.२.२०१५ | -४२४८२ | -- | -- | -- | -- | Cms-cash charges for Jan-२०१५ |
| ९ | ०९.२.२०१५ | ६४७२८० | -- | -- | -- | -- | |
| १० | १०.२.२०१५ | ८१५६२४ | -- | -- | -- | -- | |
| ११ | ११.२.२०१५ | ७०३७४८ | -- | -- | -- | -- | |
| १२ | १२.२.२०१५ | ७६६३७० | -- | -- | -- | -- | |
| १३ | १३.२.२०१५ | ७७०८५० | -- | -- | -- | -- | |
| १४ | १४.२.२०१५ | ५९७२७७ | | | | | |
| १५ | १६.२.२०१५ | ६९०८४० | १६.२.२०१५ | १२०००००० | ६६२४३३ | १९ | |
| १६ | १८.२.२०१५ | १०४७२५३ | -- | -- | -- | -- | |
| १७ | २०.२.२०१५ | १७३५७३२ | -- | -- | -- | -- | |
| १८ | २१.२.२०१५ | १५८७४३६ | -- | -- | -- | -- | |
| १९ | २३.२.२०१५ | ९०४९४६ | २३.२.२०१५ | ५०००००० | ९३७८०० | ५ | |
| २० | २४.२.२०१५ | ६९०५४४ | -- | -- | -- | -- | |
| २१ | २५.२.२०१५ | ८२२८०४ | -- | -- | -- | -- | |
| २२ | २६.२.२०१५ | ८०१२७२ | -- | -- | -- | -- | |
| २३ | २७.२.२०१५ | ६७१७०५ | -- | -- | -- | -- | |
| २४ | २८.२.२०१५ | ९४४२२२ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **२१८६८३४७** | | **१७००००००** | | | |

परिशिष्ट - अ
मार्च -२०१५

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | ४८६८३४७ | -- | -- | -- | -- | -- |
| २ | ०२.३.२०१५ | ४४०७३९ | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | ०३.३.२०१५ | ११९०२५७ | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | ०४.३.२०१५ | १०९०५३० | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | ०५.३.२०१५ | १२२०२१८ | -- | -- | -- | -- | -- |
| ६ | ०७.३.२०१५ | ९६२७३१ | -- | -- | -- | -- | -- |
| ७ | ०९.३.२०१५ | ८२६५१० | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०९.३.२०१५ | -३९७४८ | -- | -- | -- | -- | Cms cash charges for Feb -१५ |
| ९ | १०.३.२०१५ | १४४३२१७ | -- | -- | -- | -- | |
| १० | ११.३.२०१५ | १५७६९२८ | -- | -- | -- | -- | |
| ११ | १२.३.२०१५ | १८१५३९५ | १२.३.२०१५ | १३०००००० | २३९५१२४ | १७ | |
| १२ | १३.३.२०१५ | १४७७१२७ | -- | -- | -- | -- | |
| १३ | १४.३.२०१५ | १५४३५३५ | -- | -- | -- | -- | |
| १४ | १४.३.२०१५ | -४ | -- | -- | -- | -- | Service Tax १२.३६% |
| १५ | १४.३.२०१५ | -३५ | -- | -- | -- | -- | Consoulated charges for A/c |
| १६ | १६.३.२०१५ | ११९७११७ | १६.३.२०१५ | ६०००००० | ६१२८६४ | ०४ | |
| १७ | १७.३.२०१५ | १८९०४९४ | -- | -- | -- | -- | |
| १८ | १८.३.२०१५ | १८८७९२५ | -- | -- | -- | -- | |
| १९ | १९.३.२०१५ | १७४३९३४ | १९.३.२०१५ | ५०००००० | ११३५२१७ | ३ | |
| २० | २०.३.२०१५ | १७१५२३४ | -- | -- | -- | -- | |
| २१ | २३.३.२०१५ | १७११४३४ | २३.३.२०१५ | ३०००००० | १५६१८८५ | ३ | |
| २२ | २४.३.२०१५ | २३८१७०० | -- | -- | -- | -- | |
| २३ | २५.३.२०१५ | २१५४०४२ | -- | -- | -- | -- | |
| २४ | २६.३.२०१५ | २०३०१५८ | -- | -- | -- | -- | |
| २५ | २७.३.२०१५ | २०००२९७ | -- | -- | -- | -- | |
| २६ | ३०.३.२०१५ | २५१७२२९ | -- | -- | -- | -- | |
| २७ | ३१.३.२०१५ | ५२६८५३७ | ३१.३.२०१५ | १०००००००० | ७९१३८४८ | ७ | |
| | **एकूण** | **४४९१३८४८** | | **३७००००००** | | | |

**परिशिष्ट - अ**

**एप्रिल -२०१५**

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | ७९१३८४८ | -- | -- | -- | -- | -- |
| २ | ०४.४.२०१५ | ४०९६३८९ | | | | | |
| ३ | ०६.४.२०१५ | २१८८२८६ | ६.४.२०१५ | १३०००००० | ११९८५२३ | ३ | |
| ४ | ०७.४.२०१५ | १०१२१३५ | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०८.४.२०१५ | ८३७९६५ | -- | -- | -- | -- | |
| ६ | ०८.४.२०१५ | -६३३३९ | -- | -- | -- | -- | Cms cash charges for March -२०१५ |
| ७ | ०९.४.२०१५ | ७५७६९९ | -- | -- | -- | -- | |
| ८ | १०.४.२०१५ | ६९४६५० | -- | -- | -- | -- | |
| ९ | ११.४.२०१५ | ९३२९८१ | -- | -- | -- | -- | |
| १० | १३.४.२०१५ | ३७२८०० | १३.४.२०१५ | ५०००००० | ७४३४१४ | ६ | |
| ११ | १५.४.२०१५ | ९२६४८२ | -- | -- | -- | -- | |
| १२ | १६.४.२०१५ | ९४९०४५ | १६.४.२०१५ | १८००००० | ८१८९४१ | ३ | |
| १३ | १७.४.२०१५ | ७५१०८१ | -- | -- | -- | -- | |
| १४ | १८.४.२०१५ | ८१२२७० | -- | -- | -- | -- | |
| १५ | २०.४.२०१५ | ५७२४७७ | -- | -- | -- | -- | |
| १६ | २१.४.२०१५ | ५८०२०६ | -- | -- | -- | -- | |
| १७ | २२.४.२०१५ | ३८८२१३ | २२.४.२०१५ | ३०००००० | ९२३१८८ | ६ | |
| १८ | २३.४.२०१५ | ११८१० | -- | -- | -- | -- | |
| १९ | २४.४.२०१५ | ३९५७०९ | -- | -- | -- | -- | |
| २० | २५.४.२०१५ | ६६४७८० | २५.४.२०१५ | १५००००० | ४९५४८७ | ३ | |
| २१ | २७.४.२०१५ | ३३७२४७ | २७.४.२०१५ | ४९०००० | ३४२७३४ | २ | |
| २२ | २८.४.२०१५ | ९५९०३५ | -- | -- | -- | -- | |
| २३ | २९.४.२०१५ | ८०७०६७ | -- | -- | -- | -- | |
| २४ | ३०.४.२०१५ | ७३३९५६ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **२७६३२७९२** | | **२४७९००००** | | | |

परिशिष्ट - अ

मे -२०१५

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | २८४२७९२ | -- | -- | -- | -- | |
| २ | ०२.५.२०१५ | ५३८६३९ | -- | -- | -- | -- | |
| ३ | ०५.५.२०१५ | ५६१००९ | ०५.५.२०१५ | ३५००००० | ४४२४४० | ८ | |
| ४ | ०६.५.२०१५ | १२७७५१० | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०७.५.२०१५ | ९१३३८१ | ०७.५.२०१५ | २०००००० | ६३३३३२ | ३ | |
| ६ | ०७.५.२०१५ | -४२०५६ | -- | -- | -- | -- | Cms cash charges April-२०१५ |
| ७ | ०८.५.२०१५ | ७६८०१२ | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०९.५.२०१५ | ८२४३१४ | -- | -- | -- | -- | |
| ९ | ११.५.२०१५ | ३५९९६० | -- | -- | -- | -- | |
| १० | १२.५.२०१५ | ९२२४३४ | -- | -- | -- | -- | |
| ११ | १३.५.२०१५ | ७८७५६२ | -- | -- | -- | -- | |
| १२ | १४.५.२०१५ | ७७६००७ | -- | -- | -- | -- | |
| १३ | १५.५.२०१५ | ८२८४६० | -- | -- | -- | -- | |
| १४ | १६.५.२०१५ | ६९२५०८ | -- | -- | -- | -- | |
| १५ | १८.५.२०१५ | ६६३००७ | -- | -- | -- | -- | |
| १६ | १९.५.२०१५ | ५०६८५५ | -- | -- | -- | -- | |
| १७ | २०.५.२०१५ | ८२३६७८ | -- | -- | -- | -- | |
| १८ | २१.५.२०१५ | ७३७७६५ | -- | -- | -- | -- | |
| १९ | २२.५.२०१५ | ५२५५६८ | -- | -- | -- | -- | |
| २० | २३.५.२०१५ | ६८२०९१ | -- | -- | -- | -- | |
| २१ | २५.५.२०१५ | १८२८०० | -- | -- | -- | -- | |
| २२ | २६.५.२०१५ | ५७९६५२ | -- | -- | -- | -- | |
| २३ | २७.५.२०१५ | ५८७१२६ | -- | -- | -- | -- | |
| २४ | २८.५.२०१५ | ५०२८७० | -- | -- | -- | -- | |
| २५ | २९.५.२०१५ | ४७०३६७ | -- | -- | -- | -- | |
| २६ | ३०.५.२०१५ | ५६८३१२ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **१८८८०६२४** | | **५५०००००** | | | |

## परिशिष्ट - अ

### जून -२०१५

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | १३३८०६२४ | -- | -- | -- | -- | |
| २ | ०१.६.२०१५ | ३४७५८० | -- | -- | -- | -- | |
| ३ | ०२.६.२०१५ | ४८७९५२ | -- | -- | -- | -- | |
| ४ | ०३.६.२०१५ | ५६२३३० | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०४.६.२०१५ | ५८०३९१ | -- | -- | -- | -- | |
| ६ | ०५.६.२०१५ | ५०५६४१ | ५.६.२०१५ | १४७००००० | ११६४५१८ | २८ | |
| ७ | ०६.६.२०१५ | ६८००३६ | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०८.६.२०१५ | ४४९८१५ | -- | -- | -- | -- | |
| ९ | ०८.६.२०१५ | -३७३१३ | ८.६.२०१५ | १८४४००० | ४१३०५६ | ३ | Cms cash charges for may -१५ |
| १० | ०९.६.२०१५ | ५८०६४८ | -- | -- | -- | -- | |
| ११ | १०.६.२०१५ | ४८६०५७ | -- | -- | -- | -- | |
| १२ | ११.६.२०१५ | ४७५६४२ | -- | -- | -- | -- | |
| १३ | १२.६.२०१५ | ४७५६४२ | -- | -- | -- | -- | |
| १४ | १२.६.२०१५ | ६२१२४ | -- | -- | -- | -- | |
| १५ | १३.६.२०१५ | ५७३५९० | -- | -- | -- | -- | |
| १६ | १३.६.२०१५ | -१४० | -- | -- | -- | -- | Service tax १४% |
| १७ | १३.६.२०१५ | -१००० | -- | -- | -- | -- | Consulated charges for A/c |
| १८ | १५.६.२०१५ | २३२३६४ | १५.६.२०१५ | ३०००००० | २९७९८३ | ६ | |
| १९ | १६.६.२०१५ | ४११९६७ | -- | -- | -- | -- | |
| २० | १७.६.२०१५ | ४३७६२६ | -- | -- | -- | -- | |
| २१ | १८.६.२०१५ | ४५६३१३ | -- | -- | -- | -- | |
| २२ | १९.६.२०१५ | ३७३४०५ | -- | -- | -- | -- | |
| २३ | २०.६.२०१५ | ४८४८८० | -- | -- | -- | -- | |
| २४ | २२.६.२०१५ | ३३२९४९ | २२.६.२०१५ | २४६२००० | ३३३१२३ | ६ | |
| २५ | २३.६.२०१५ | ४६८१०२ | -- | -- | -- | -- | |
| २६ | २४.६.२०१५ | ५१३५७९ | -- | -- | -- | -- | |
| २७ | २५.६.२०१५ | ३२२४५५ | -- | -- | -- | -- | |
| २८ | २६.६.२०१५ | ३४२३८० | -- | -- | -- | -- | |
| २९ | २७.६.२०१५ | ४३६३९४ | -- | -- | -- | -- | |
| ३० | २९.६.२०१५ | ३३९८३२ | -- | -- | -- | -- | |
| ३१ | ३०.६.२०१५ | ६२५७५३ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **२५३८७६१८** | | **२२००६०००** | | | |

परिशिष्ट - अ

जुलै -२०१५

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | ३३८१६१८ | -- | -- | -- | -- | |
| २ | ०१.७.२०१५ | ५९६७४५ | ०१.७.२०१५ | ३३८१००० | ५९७३६३ | ८ | |
| ३ | ०२.७.२०१५ | ४९९६१८ | -- | -- | -- | -- | |
| ४ | ०३.७.२०१५ | ४७०१०१ | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०४.७.२०१५ | ५३४१११ | -- | -- | -- | -- | |
| ६ | ०६.७.२०१५ | ४६९१६१ | -- | -- | -- | -- | |
| ७ | ०७.७.२०१५ | ५२५६९९ | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०७.७.२०१५ | -३४१६९ | -- | -- | -- | -- | Cms cash charges for June -१५ |
| ९ | ०८.७.२०१५ | ६७०७६८ | -- | -- | -- | -- | |
| १० | ०९.७.२०१५ | ४५०९७० | -- | -- | -- | -- | |
| ११ | १०.७.२०१५ | ५६०२२८ | १०.७.२०१५ | ४१८३६२१ | ५६०२२९ | ८ | |
| १२ | ११.७.२०१५ | ५४५५७० | ११.७.२०१५ | ५६०२२८ | ५४५५७१ | १ | |
| १३ | १३.७.२०१५ | ३९४७६६ | १३.७.२०१५ | ५४५५७० | ३९४७६७ | १ | |
| १४ | १४.७.२०१५ | ६८४३३२ | १४.७.२०१५ | ३९४७६६ | ६८४३३३ | १ | |
| १५ | १५.७.२०१५ | ४३१२७३ | १५.७.२०१५ | ६८४३३३ | ४३१२७३ | १ | |
| १६ | १६.७.२०१५ | ५३४४८० | १६.७.२०१५ | ४३१२७३ | ५३४४८० | १ | |
| १७ | १७.७.२०१५ | ४८१५७० | -- | -- | -- | -- | |
| १८ | २०.७.२०१५ | ६६८५३० | २०.७.२०१५ | १०१६०५० | ६६८५३० | ३ | |
| १९ | २१.७.२०१५ | ६३११९९ | -- | -- | -- | -- | |
| २० | २२.७.२०१५ | ५२२२०७ | -- | -- | -- | -- | |
| २१ | २३.७.२०१५ | ६१४२२३ | -- | -- | -- | -- | |
| २२ | २४.७.२०१५ | ४६५०५६ | २४.७.२०१५ | २४३६१५९ | ४६५०५६ | ३ | |
| २३ | २५.७.२०१५ | ४७४२५९ | -- | -- | -- | -- | |
| २४ | २७.७.२०१५ | ३७२९७४ | -- | -- | -- | -- | |
| २५ | २८.७.२०१५ | ४२६८०६ | २८.७.२०१५ | १३१२२८९ | ४२६८०६ | ४ | |
| २६ | २९.७.२०१५ | ३८८२७२ | २९.७.२०१५ | ४२६८०६ | ३८८२७२ | १ | |
| २७ | ३०.७.२०१५ | ४२५८१० | -- | -- | -- | -- | |
| २८ | ३१.७.२०१५ | ३९६८९० | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **१६५८३०६७** | | **१५३७२०९५** | | | |

परिशिष्ट - अ

ऑगस्ट -२०१५

| अ.क्र. | रोख रक्कम भरणा दिनांक Axis Bank | रक्कम रूपये | रोख रक्कम I.D.B.I. बँकेत ट्रान्सफर केलेली दिनांक | ट्रान्सफर रक्कम रूपये | Axis बँकेत शिल्लक रक्कम रूपये | रक्कम ट्रान्सफर करण्यास झालेले विलंब दिवस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | O.B. | १२१०९७२ | -- | -- | -- | -- | |
| २ | ०१.८.२०१५ | ४१५११० | १.८.२०१५ | १२१०९७२ | ४१५११० | ०४ | |
| ३ | ०३.८.२०१५ | ३६८५२७ | ३.८.२०१५ | ४१५११० | ३६८५२७ | ०२ | |
| ४ | ०४.८.२०१५ | ५८९६४६ | -- | -- | -- | -- | |
| ५ | ०५.८.२०१५ | २७८११० | -- | -- | -- | -- | |
| ६ | ०६.८.२०१५ | ४९८२५३ | -- | -- | -- | -- | |
| ७ | ०७.८.२०१५ | ५५८१७४ | -- | -- | -- | -- | |
| ८ | ०८.८.२०१५ | १०५०५१७ | -- | -- | -- | -- | |
| ९ | ०८.८.२०१५ | -३४९५४ | -- | -- | -- | -- | Cms cash charges July-२०१५ |
| १० | १०.८.२०१५ | ६६९५९५ | १०.८.२०१५ | ३३०८२७३ | ६६९५९५ | ७ | |
| ११ | ११.८.२०१५ | १७५१३१८ | ११.८.२०१५ | ६६९५९५ | १७५१३१८ | १ | |
| १२ | १२.८.२०१५ | ९८९५२४ | -- | -- | -- | -- | |
| १३ | १३.८.२०१५ | ९२६७३८ | १३.८.२०१५ | २७४०८४२ | ९२६७३८ | ३ | |
| १४ | १४.८.२०१५ | १०९४८७४ | १४.८.२०१५ | ९२६७३८ | १०९४८७४ | १ | |
| १५ | १७.८.२०१५ | ११०६६४७ | १७.८.२०१५ | १०९४८७४ | ११०६६४७ | ४ | |
| १६ | १९.८.२०१५ | ११६८२५१ | १९.८.२०१५ | ११०६६४७ | ११६८२५१ | २ | |
| १७ | २०.८.२०१५ | १७७३८८० | -- | -- | -- | -- | |
| १८ | २१.८.२०१५ | १२७००४९ | -- | -- | -- | -- | |
| १९ | २२.८.२०१५ | १३०७६८१ | २२.८.२०१५ | ४२१२१८० | १३०७६८१ | ३ | |
| २० | २४.८.२०१५ | ९८३३४३ | २४.८.२०१५ | १३०७६८१ | ९८३३४३ | २ | |
| २१ | २५.८.२०१५ | १२४१८२५ | -- | -- | -- | -- | |
| २२ | २६.८.२०१५ | १३७७४९५ | -- | -- | -- | -- | |
| २३ | २७.८.२०१५ | ११८८७५६ | -- | -- | -- | -- | |
| २४ | २८.८.२०१५ | ११४३५१५ | २८.८.२०१५ | ४७९१४१९ | ११४३५१५ | ४ | |
| २५ | २९.८.२०१५ | १३७८०६६ | -- | -- | -- | -- | |
| २६ | ३१.८.२०१५ | ६१५४०७ | -- | -- | -- | -- | |
| | **एकूण** | **२४९२१३१९** | | **२१७८४३३१** | | | |

## परिशिष्ट - ब

| अ.क्र. | महिना | एकूण वसूली रक्कम रू. | रोख भरणा रक्कम रू. | धनादेश भरणा रक्कम रू. | एकूण भरणा रक्कम रू. | फरक रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १ | सप्टेंबर-२०१४ | १,१७,३७,३०६ | ६५,४८,५९६ | ४९,७३,३७४ | १,१५,२१,९७० | २,१५,३३६ |
| २ | ऑक्टोबर-२०१४ | २,०३,०१,७७५ | ७१,५०,५४९ | १,३१,२४,८१० | २,०२,७५,३५९ | २६,४१६ |
| ३ | नोव्हेंबर -२०१४ | २,३८,९२,२५८ | ९९,५१,५२३ | १,२६,०६,८८६ | २,२५,५८,४०९ | १३,३३,८४९ |
| ४ | डिसेंबर-२०१४ | ३,८०,७८,७६३ | २,५८,७८,५०५ | १,३३,९०,४७३ | ३,९२,६८,९७८ | -११,९०,२१५ |
| ५ | जानेवारी -२०१५ | १,७७,१८,२७३ | ७७,५२,१९४ | ९८,७७,०२९ | १,७६,२९,२२३ | ८९,०५० |
| ६ | फेब्रुवारी -२०१५ | ३,२७,३९,०८३ | १,८७,२४,२६७ | १,४१,४२,२७३ | ३,२८,६६,५४० | -१,२७,४५७ |
| ७ | मार्च -२०१५ | ५,६९,१४,६८५ | ३,९६,१४,५४९ | १,७१,२९,७८३ | ५,६७,४४,३३२ | १,७०,३५३ |
| ८ | एप्रिल-२०१५ | ४,३४,३१,२२९ | २,०३,२०,९२२ | २,३२,७७,११५ | ४,३५,९८,०३७ | -१,६६,८०८ |
| ९ | मे-२०१५ | ३,०२,७५,५१९ | १,५८,८८,८३१ | १,४३,८४,३४४ | ३,०२,७३,१७५ | २,३४४ |
| १० | जून -२०१५ | २,७२,७९,३९३ | १,२२,९४,६१२ | १,४९,२४,१८५ | २,७२,१८,७९७ | ६०,५९६ |
| ११ | जुलै -२०१५ | २,९२,७१,५५१ | १,३०,५३,९८३ | १,६२,४५,२१४ | २,९२,९९,१९७ | -२७,६४६ |
| १२ | ऑगस्ट-२०१५ | ४,०८,८३,३८७ | २,४४,९९,८८८ | १,६२,४८,५८२ | ४,०७,४८,४७० | १,३४,९१७ |
| १३ | सप्टेंबर -२०१५ | ५,१३,९३,४१० | ३,३३,१०,३५७ | १,८०,०३,८३३ | ५,१३,१४,१९० | ७९,२२० |
| १४ | ऑक्टोबर-२०१५ | ४,७९,४४,२०५ | ३,१३,१६,१५३ | १,६७,५६,४०१ | ४,८०,७२,५५४ | -१,२८,३४९ |
| १५ | नोव्हेंबर -२०१५ | ४,४७,४१,७०९ | २,५०,१२,३७० | १,७२,४८,९९९ | ४,२२,६१,३६९ | २४,८०,३४० |
| १६ | डिसेंबर -२०१५ | ५,०३,५१,५१३ | २,७४,८३,१११ | २,४५,२२,२२१ | ५,२०,०५,३३२ | -१६,५३,८१९ |
| | | **५६६९५४०५९** | **३१८८००४१०** | **२४६८५५५२२** | **५६५६५५९३२** | **१२९८१२७** |

**परिशिष्ट - क**

| अ.क्र. | महिना | एकूण वसूलीची प्राप्त आकडेवारी रक्कम रू. | महानगरपालिकेकडे क्लेम केलेली वसूलीची आकडेवारी रक्कम रू. | फरक |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | सप्टेंबर -२०१४ | १,१७,३७,३०६ | १,१५,५०,६८२ | **-१८६६२४** |
| २ | ऑक्टोबर-२०१४ | २,०३,०१,७७५ | २,००,३०,२२२ | **-२७१५५३** |
| ३ | नोव्हेंबर -२०१४ | २,३८,९२,२५८ | २,४१,२४,३५७ | **२३२०९९** |
| ४ | डिसेंबर-२०१४ | ३,८०,७८,७६३ | ३,४०,४२,७४४ | **-४०३६०१९** |
| ५ | जानेवारी -२०१५ | १,७७,१८,२७३ | ३,४९,१९,९९९ | **१७२०१७२६** |
| ६ | फेब्रुवारी -२०१५ | ३,२७,३९,०८३ | ३,२७,३१,५८३ | **-७५००** |
| ७ | मार्च -२०१५ | ५,६९,१४,६८५ | ६,८६,६२,९८४ | **११७४८२९९** |
| ८ | एप्रिल-२०१५ | ४,३४,३१,२२९ | ३,२१,५२,७४२ | **-११२७८४८७** |
| ९ | मे-२०१५ | ३,०२,७५,५१९ | ३,०२,७५,५१९ | **०** |
| १० | जून-२०१५ | २,७२,७९,३९३ | २,७२,०६,८३८ | **-७२५५५** |
| ११ | जुलै-२०१५ | २,९२,७१,५५१ | २,८१,४१,०२३ | **-११३०५२८** |
| १२ | ऑगस्ट-२०१५ | ४,०८,८३,३८७ | ४,०८,८३,३८६ | **-१** |
| १३ | सप्टेंबर -२०१५ | ५,१३,९३,४१० | ५,१३,९३,४१० | **०** |
| १४ | ऑक्टोबर-२०१५ | ४,७९,४४,२०५ | ४,७९,४४,२०५ | **०** |
| १५ | नोव्हेंबर -२०१५ | ४,४७,४१,७०९ | ४,४७,७७,४११ | **३५७०२** |
| १६ | डिसेंबर -२०१५ | ५,०३,५१,५१३ | ५,०१,३३,७०२ | -२१७८११ |
| | **एकूण** | **५६६९५४०५९** | **५७८९७०८०७** | **१२०१६७४८** |